# काळांतील निवडक निबंध

भाग

४



शि. म. परांजपे

प. गो. जोशी प्रकाशन, पुणे.

M..xM64
016.4
819184

# काळांतील निवडक निबंध

## भाग ४ था

लेखक :

शिवराम महादेव परांजपे

Dhananjayarao Gadgil Library
GIPE-PUNE-079184

★

प्रस्तावना-लेखक

आचार्य शं. द. जावडेकर.

पुनर्मुद्रण २७ सप्टेंबर १९४६

किंमत

कागदी बांधणी ४ रुपये ] [ कापडी बांधणी ४॥ रुपये

प्रकाशक: यशवंत गोपाळ जोशी,
८२३/१५ सदाशिव, पुणें २.

● या पुस्तकाच्या पुनर्मुद्रणाचे, भाषांतराचे, रूपांतराचे वगैरे सर्व प्रकारचे हक्क प्रकाशकाकडे आहेत.

● या पुस्तकांतील उतारे घेणें झाल्यास प्रकाशकाच्या परवानगीशिवाय घेऊं नयेत.

मुद्रक: श्रीपाद रघुनाथ राजगुरु,
राजगुरु प्रेस,
४०१ नारायण पेठ, पुणें २

# अनुक्रमणिका


| | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | ईश्वरी लीला अगाध आहे! ... ... | १ |
| २ | अक्षयतृतीया ... ... ... | १० |
| ३ | खिस्ती धर्माची वाढ ... ... ... | २१ |
| ४ | इंग्रजांचें सामर्थ्य ... ... ... | ३३ |
| ५ | शरदृतूंतील मेघांनो, तुम्हीं काय केलें आहे म्हणून येवढ्या गर्जना करितां! ... ... | ३९ |
| ६ | खोटें बोलण्याच्या विषयांतील परीक्षा आणि बक्षीस ... | ४९ |
| ७ | स्वदेशोन्नतिकारक मंडळीबद्दलची त्रोटक माहिती ... | ६० |
| ८ | खिस्ताची आज्ञा ... ... ... | ७१ |
| ९ | मुद्राराक्षस ... ... ... | ८० |
| १० | लायकर्गसचे कायदे ... ... ... | ९० |
| ११ | दमाल्या मिल्ल ... ... ... | १०१ |
| १२ | दिल्लीचें तक्त आणि भाऊसाहेबांचा घण ... | १०५ |
| १३ | काउंट टॉलस्टॉय यांची हिंदुस्थानांतील समाजसुधारकांना एक सूचना ... | ११५ |
| १४ | आम्रवृक्ष ... ... ... | १२५ |
| १५ | ठराव ... ... ... | १३४ |
| १६ | केवळ झोंप लागली असतां जांभूळ तोंडांत पडलें ... | १४२ |
| १७ | स्थानिक स्वराज्य ... ... ... | १४६ |
| १८ | सगळ्यावर उपाय आहेत, पण— ... ... | १५५ |
| १९ | प्रेसिडेंट रूझवेल्ट आणि प्रेसिडेंट वाञ्छा ... | १६२ |
| २० | कानपूरची विहीर ... ... ... | १६९ |
| २१ | दक्षिण अमेरिका नंबर १ ... ... | १७५ |
| २२ | दक्षिण अमेरिका नंबर २ ... ... | १८५ |
| २३ | निर्हेतुक प्रीति आणि सहेतुक प्रीति ... ... | १९६ |
| २४ | हिंदुस्थानचें दारिद्र्य आणि त्याचीं कारणें ... | २०५ |

एकंदर चालू महागतेमुळें

## काळांतील निवडक निबंधांचीं पुस्तकें

जितक्या कमी किंमतींत द्यावयाची माझी इच्छा होती तितक्या कमी किंमतींत देतां आलीं नाहींत. याकरितां काळांतील निवडक निबंधांचे पहिले भागांत एक सवलतीचें कुपन टाकलें आहे. सवलतीची समग्र माहितीही त्याच खंडांत दिली आहे. ग्राहकांनीं अवश्य वाटल्यास त्याचा फायदा घ्यावा.

व्यवस्थापक :

य. गो. जोशी-प्रकाशन, सदाशिव, पुणें २.

# प्रस्तावना

मराठी वर्तमानपत्रांच्या इतिहासांत 'काळ' पत्राला आणि आधुनिक महाराष्ट्राच्या राजकारणांत काळकर्ते शिवरामपंत उर्फ अण्णासाहेब परांजपे यांना एक विशेष महत्त्वाचें स्थान आहे. आपल्या लेखणीनें महाराष्ट्राला जागृत करून त्याचें अंतःकरण हलवून सोडणारे असे जे कांहीं थोडे संपादक आधुनिक महाराष्ट्रांत झाले, त्यांत चिपळूणकर, टिळक, आगरकर आणि परांजपे यांचें स्थान असामान्य आहे. यांपैकीं प्रत्येकानें आपल्या लेखणीनें आणि कर्तबगारीनें आधुनिक महाराष्ट्राच्या मनाला एक विशिष्ट वळण लाविलेलें आहे. यांपैकीं प्रत्येकाचें एकेक असामान्य वैशिष्ट्य आहे. काळकर्ते परांजपे हे चिपळूणकर-टिळकांच्या राष्ट्रीय साम्प्रदायाचे पुरस्कर्ते आणि राजकारणांतील स्वातंत्र्यवादी क्रान्तिकारक पक्षाचे उद्गाते असे गणिले पाहिजेत. त्यांचे काळांतील लेख हीं आधुनिक भारताच्या स्वातंत्र्याचीं सूक्तें आहेत. अण्णासाहेब परांजपे हे लोकमान्य टिळकांच्या तोडीचे राष्ट्रनिर्माते मुत्सद्दी नव्हेत किंवा क्रॉम्वेल, गॅरिबाल्डी, मॅझिनी अथवा लेनिन यांच्या तोडीचे क्रान्ति-संघटकही नव्हेत. राष्ट्रपितामह दादाभाई नौरोजी, लोकमान्य टिळक आणि महात्मा गांधी या तिघांनीं आधुनिक भारताचा इतिहास घडविला आणि त्याला राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या शिखरापर्यंत नेऊन पोंहोचविलें, ही गोष्ट आतां निर्विवादपणें इतिहास म्हणून नमूद झालेली आहे. या तीन राष्ट्र-पुरुषांच्या योग्यतेचा पुरुष त्याच्या त्यांच्या काळांत झाला नाहीं, याबद्दल कोणासही आतां शंका उरलेली नाहीं. या कोटींत अण्णासाहेब परांजपे यांची गणना करतां आली नाहीं, तरीही लो० टिळकांच्या काळांत महाराष्ट्रीय राजकारणांत परांजपे यांचें एक महत्त्वाचें आणि वैशिष्ट्यपूर्ण स्थान होतें, हें कोणीही नाकारूं शकत नाहीं. कांहीं काळ 'काळ' पत्रानें आपल्या ओजस्वी लेखांनीं आणि क्रान्तिकारक विचारांनीं 'केसरी' पत्रापेक्षांही अधिक पकड महाराष्ट्रीय तरुणांच्या अंतःकरणावर बसविली होती, ही गोष्ट इतिहासांत नमूद

आहे. हिंदी स्वातंत्र्याचा प्रश्न केवळ महाराष्ट्रासारख्या एखाद्या एकजिनसी, एकभाषी आणि प्रायः एकधर्मी छोट्या राष्ट्राला स्वतंत्र करण्यापुरताच मर्यादित व सोपा असता, आणि परांजपे यांच्या वाणींतील व लेखणींतील अलौकिक गुण सफल होण्यास लागणारे क्रान्तिसंघटकाचे असामान्य गुण त्यांच्या अंगीं असते, तर राष्ट्रीय स्वातंत्र्याचा प्रश्न केव्हांच सुटणें शक्य झालें असतें. परंतु भारतीय स्वातंत्र्याचा प्रश्न अधिक संकीर्ण आणि त्याची प्राप्ति अधिक दुर्घट असल्यानें परांजपे यांना आपल्या अंतःकरणांतील स्वातंत्र्याची दिव्य आणि उज्ज्वल स्फूर्ति, तसेंच आपल्या लेखणीचे व वाणीचे अलौकिक गुण याचा विनियोग लोकमान्य टिळक आणि म० गांधी या असामान्य विभूतींच्या राजकारणाचा पुरस्कार करण्यांतच आणि त्यांत एक उग्र तेज निर्माण करण्यांतच करावा लागला. त्यांना आपल्या अंगच्या उत्कट स्वातंत्र्य-भक्तीची, साहित्यनिर्मितीच्या शक्तीची तसेंच प्रभावी वक्तृत्वकला आणि लेखनसामर्थ्य यांची जाणीव असणें अगदीं साहजिक आहे. त्यांचा स्वातंत्र्य-निष्ठ आत्मा काव्यगुणांनीं मंडित होता. त्यांचे लेख हीं स्वातंत्र्याचीं सूक्तें आहेत, असें प्रथम म्हटलें, त्याचा अर्थ हाच आहे. हें वाङ्मय गद्य असलें, तथापि तें काव्यमय आहे. मेलेल्या मनाला जिवंत करणारें आणि भ्यालेल्या मनुष्यांना शौर्याची स्फूर्ति देणारें असें तें वाङ्मय आहे. त्याचा देह अलंकारांनीं मंडित आहे, त्याचप्रमाणें त्याचा आत्मा वीररसानें तेजस्वी बनलेला आहे. त्यांतील कांहीं कांहीं लेख हे नाट्यमय आहेत, आणि त्यांतील स्फूर्ति क्रान्ति-कारकांना जन्म देण्याइतकी उत्कट आहे. ह्यामुळें आधुनिक मराठी वाङ्मयांत काळांतील निबंधांचें स्थान अढळ आणि चिरंतन आहे. राजकीय निबंध इतक्या साहित्यगुणांनीं मंडित इतर कोणाचेही आढळणार नाहींत. अशा क्रान्तिकारक साहित्याला परकीय सत्ताधाऱ्यांनीं बेकायदा ठरवावें आणि स्वातंत्र्याचा उषःकाल झाल्यावरच त्याच्यावरील बंदी उठावी हें यथोचितच नव्हे काय! ही या निबंधांची भूमिगत अवस्था, हाच त्याच्या राजकीय प्रभावीपणाचा पुरावा नव्हे काय! पंचवीस-तीस वर्षे वनवासांत व अज्ञात-वासांत काढून ज्या वेळीं भारतांतील अनेक क्रान्तिवीर प्रकट होत आहेत, त्याच वेळीं काळांतील हे निबंध पुन्हा प्रकट रूपानें मराठी वाचकांना उपलब्ध होत आहेत, हेंच या निबंधांचें गुणवैशिष्ट्य होय.

## महाराष्ट्रीय राष्ट्रीय पक्षांतील काळकर्ते यांचें स्थान

काळ पत्राचा महाराष्ट्रांत प्रथम अवतार इ. स. १८९८ सालीं म्हणजे शके १८२०च्या वर्षप्रतिपदेस झाला. १८९८ इ. मधील महाराष्ट्राचें राजकीय वातावरण लक्षांत घेतल्यावांचून काळाची खरी महती वाचकांच्या लक्षांत येणार नाहीं. महाराष्ट्रांतच हिंदी राजकारणांतील राष्ट्रीय पक्षाचा जन्म झाला. सुधारक पक्ष आणि प्रागतिक राजकारण यांचा उगम राजा राममोहन रॉय यांच्या काळीं बंगालमध्यें झाला. त्याची वाढ होतां होतां प्रागतिक राजकारण करणारी राष्ट्रसभा इ. स. १८८५ सालीं जन्मास आली. सुधारक तत्त्वज्ञान आणि प्रागतिक राजकीय धोरण यांहून भिन्न असें राष्ट्रीय तत्त्वज्ञान व जहाल क्रांतिकारक राजकारण यांना जन्म देण्याचा मान खास महाराष्ट्राकडे येतो. विष्णुशास्त्री चिपळूणकर यांची 'निबंधमाला' इ. स. १८७४ मध्यें सुरू झाली. या निबंधमालेनें राष्ट्रीय तत्त्वज्ञानाचें बीजारोपण तरुण महाराष्ट्राच्या अंतःकरणांत केलें. १८८५ नंतर लोकमान्य टिळकांनीं सुधारक पक्षाविरुद्ध दहा वर्षें वादरण केलें व १८९५ सालीं महाराष्ट्रांत शिवाजीउत्सव, गणेशोत्सव आणि सार्वजनिक सभेच्या मार्फत लोकांच्या आर्थिक व राजकीय चळवळी यांना जोरानें सुरवात केली. महाराष्ट्रांत या वेळेपासून एक नवें तेज निर्माण झालें, आणि या तेजाचा ताप व त्याची दहशत ब्रिटिश राज्यकर्त्यांना जाणवूं लागली. १८९७ पासून दुष्काळ आणि प्लेग या दोन आपत्तींनीं महाराष्ट्रीय जनता होरपळून गेली. तशांत रॅन्डशाहीचा करडा अंमल पुण्यांत सुरू झाला. प्रजेंत जोमानें फोफावणारी राष्ट्रीय वृत्ति आणि साम्राज्यमदानें धुंद झालेली अनियंत्रित नोकरशाही यांचा संघर्ष सुरू होऊन पुण्यांत क्रान्तीची पहिली ठिणगी पडली आणि राष्ट्रीय पक्षाच्या सत्त्वपरीक्षेची वेळ प्राप्त झाली. रॅन्डच्या खुनानंतर लोकमान्य टिळकांच्यावर सरकारी रोपाचा प्रचंड प्रतापी सूर्य आपल्या पूर्ण तेजानें तळपूं लागला. टिळकांना दीड वर्षाचा कारावास भोगावा लागला, आणि त्यांच्या पश्चात् पुणें शहरांत स्वाभिमानी देशभक्तांना वर मान करूनही हिंडणें-फिरणें ब्रिटिश सरकारनें अशक्य केलें. महाराष्ट्रांतील राजधानींत वावरणारे आणि आपल्या ऐतिहासिक राजवैभवाची स्मृति जागृत करून आम्ही पुनः स्वतंत्र होऊं अशी आशा धरणारे चित्पावन ब्राह्मण ब्रिटिशांना कपट-कारस्थानी आणि दगाबाज भासूं लागले. अशा वेळीं व्यवहारचतुर म्हणविणाऱ्या मुत्सद्दयांनीं नदीकांठच्या

कण्हाळ्याची वृत्ति स्वीकारून राजरोगाचा महापूर ओसरून जाईपर्यंत नम्रत्व धारण केलें. देशभक्तीच्या कथा उघडपणें चर्चिण्याची हिम्मत कोणासही उरली नव्हती. अशा भीषण परिस्थितींत १८९८ सालच्या चैत्र शुद्ध प्रतिपदेस 'काळ' पत्राचा अवतार पुणें शहरांत झाला. काळचा बाणा प्रथमपासूनच राष्ट्रीय क्रांतिकारकाचा होता. अर्थात् ब्रिटिश अधिकांऱ्याचें लक्ष त्यानें तात्काळ वेधून घेतलें, इतकेंच नाहीं तर राष्ट्रसभेचे जे प्रागतिक पुढारी त्यांनाही 'काळा'च्या रूपानें पुण्यांत उमटूं लागलेली क्रान्तीच्या नारसिंहाची गर्जना अप्रिय आणि असमंजस वाटूं लागली. हिंदी राजकारणांत तात्त्विक दृष्टीनें क्रान्तीचा उघड पुरस्कार होऊं लागल्याचें 'काळ' पत्र हें एक मूर्त चिन्ह होतें. टिळकांच्या राष्ट्रीय राजकारणाचें अखेरचें टोक या दृष्टीनें त्याच्याकडे सरकार आणि प्रागतिक मुत्सद्दी पाहूं लागले. प्रागतिकांच्याप्रमाणेंच टिळक हेही व्यवहारदक्ष मुत्सद्दीच होते. काळकर्ते परांजपे यांची रसोत्कट भाषाशैली त्यांना अनेकवार असमंजसपणाची किंबहुना बेफामही वाटत असे. परंतु टिळकांना अंतिम दृष्ट्या क्रान्तीचा अग्नि विझवून टाकण्याचा प्रयत्न करणें हें अव्यवहार्यच नव्हे, तर गैरमुत्सद्दीगिरीचें वाटत असे. तरुणांच्या अंतःकरणांतील क्रान्तीची ज्योत विझवून टाकण्याच्या कामीं ब्रिटिशांशीं सहकार्य केल्यानें आपल्या राजकीय प्रगतीचा रथ अधिक वेगानें धावूं लागेल, असा भ्रम त्यांना केव्हांही झाला नाहीं. क्रांतिनिष्ठ तरुणांनीं अविवेकानें अकालीं कळ्यास प्रवृत्त होऊन आपला सर्वनाश ओढवून घ्यावा आणि ब्रिटिश सरकारला जनतेवर दहशत गाजविण्यास संधि द्यावी, हें त्यांच्या विवेकी बुद्धीस केव्हांही पटणारें नव्हतें. तथापि देशभक्तांचें मन दहशतवादाकडे खेचलें जाण्याची बहुतेक जबाबदारी बेगुमान व बेजबाबदार अधिकारी वर्गावर असते, असें त्यांचें विचारपूर्वक मत बनलेलें होतें. यामुळें काळ पत्रांतील कांहीं लेखांसंबंधीं त्यांचा मतभेद असला तरी त्याचा ते उघड निषेध करीत नसत. खासगी रीतीनें वा अप्रत्यक्ष-पणें तरुण क्रांतिकारकांना संयमाचा उपदेश करून त्यांना योग्य मार्गावर ठेवण्याचा प्रयत्न ते करीत असत. केवळ कायदेशीर व सनदशीर मार्गांनींच आरणांत राष्ट्रीय स्वातंत्र्याचें अंतिम शिखर गांठतां येईल, अशी त्यांची निष्ठा कधींही नव्हती. पण तत्कालीन परिस्थितींत क्रांतीचा मार्ग चोखाळणें हें अव्यवहार्य आहे यासंबंधींही त्यांना शंका नव्हती. कायदेशीर व सनदशीर

चळवळी करतां करतांच आपण अंतिम क्रांतीची पूर्वतयारी करीत आहोंत, या निष्ठेनें ते आपलें व्यावहारिक व राजकीय धोरण आखीत असत, आणि काळसारख्या पत्रांतून व्यक्त होणाऱ्या क्रांतिनिष्ठेचा उपयोग आपल्या राजकारणास करून घेत असत. अशा तऱ्हेचे संबंध 'केसरी' आणि 'काळ' या पत्रांचे होते. 'काळ' आणि 'काळ'कर्ते परांजपे हे आपल्या राजकारणांतील एक तेजस्वी अंग आहे, या दृष्टीनें ते त्यांच्याकडे पाहत असत. टिळक हे गणिती बुद्धीचे व हिशेबी वृत्तीचे असल्यानें क्रांतिकार्यास लागणारें साहस ते सहसा प्रकट करणार नाहींत, अशी शंका 'काळ'कर्ते परांजपे कधीं कधीं व्यक्त करीत असत. याच्या उलट क्रान्ति हें साहस असलें, तरी तो जुगार नसून तें शास्त्रीय साहस बनलें पाहिजे, अशी टिळकांची विचारसरणी होती. केवळ क्रान्तिरसानें उत्कट भावना आणि स्वार्थत्यागी आत्माहुति येवढ्यानें क्रान्ति होऊं शकत नाहीं, इतकेंच नाहीं तर असे प्रयत्न विफल होऊन कांहीं काळ प्रतिक्रान्तीची लाटही येऊं शकते. क्रान्ति ही अखेरीस जनतेनेंच करावयाची असते आणि जनतेच्या साहाय्यावांचून ती यशस्वी होऊं शकत नाहीं. यासाठीं जनता आपल्या मागून येत आहे किंवा नाहीं याचें अनुसंधान वारंवार ठेवूनच प्रत्येक क्रान्तिनिष्ठ लोकनायकानें आपलें व्यावहारिक धोरण ठरवीत राहिलें पाहिजे असें टिळक म्हणत. टिळक आणि परांजपे यांच्या धोरणांतील व प्रकृतींतील हा भेद लक्षांत घेऊनही ते दोघे एकाच राष्ट्रीय पक्षाचे नेते होते आणि आपापलें स्थान व योग्यता ओळखूनच दोघांचेंही परस्परांशीं वर्तन होत असे हें विसरून चालणार नाहीं. परांजपे हे टिळकांचे एक तेजस्वी अनुयायी आणि टिळक हे महाराष्ट्राचे एकमेक नेते आहेत ही गोष्ट टिळकांच्या उत्तर आयुष्यांत निर्विवाद सिद्ध झालेली होती व ती दोघांसही पटलेली होती. भारतीय क्रान्तीच्या प्रगतीला असलेल्या व्यावहारिक मर्यादांची स्पष्ट जाणीव परांजपे यांना उत्तर आयुष्यांत झाली व त्याच दृष्टीनें त्यांनीं महात्मा गांधींच्या असहकारयोगास अंतःकरणपूर्वक पाठिंबा दिला. लोकमान्यांच्यापेक्षां गांधीजींची अहिंसानिष्ठा अधिक मूलभूत आहे, हें जितकें खरें तितकेंच त्यांची क्रान्तिनिष्ठाही अधिक जाज्वल्य आहे, याचा प्रत्यय परांजपे यांना १९२० नंतर आलेला होता. तसेंच गांधीजींच्या अहिंसेचें क्रान्तिकारक तेज न ओळखतां त्यांना अहिंसानिष्ठ म्हणून मवाळ ठरवून

आपल्या हिंसावादाचें प्रदर्शन करणारे व क्रान्तिनिष्ठेची प्रौढी मिरविणारे वावदूक टीकाकार हे बेगडी क्रान्तिकारक आहेत, याचीही पूर्ण जाणीव त्यांना झालेली होती. यामुळेंच त्यांनीं लोकमान्यांच्या हयातींत 'काळ' पत्रांतून जशी त्यांना साथ दिली, तशीच लोकमान्यांच्या हयातीनंतर महात्मा गांधींच्या असहकाराला व सत्याग्रहाला साथ देण्यासाठीं त्यांनीं 'स्वराज्य' नांवाचें दुसरें पत्र सुरू केलें. महात्मा गांधी अहिंसक क्रान्तीचा प्रयोग करूं लागण्या-पूर्वीं क्रान्तिकारकाचें दर्शनही घेण्यास जे धजावत नसत. त्यांनीं महात्मा गांधींची क्रान्ति अहिंसानिष्ठ आहे म्हणून तिला विरोध करावा हें परांजपे यांना हास्यास्पद वाटे. तसेंच ज्यांनीं पूर्वायुष्यांत शिवाजी-उत्सव साजरा करण्या-साठीं सद्यःकालीन अधिकारारूढ साम्राज्यसत्तेविरुद्ध बंडाचा झेंडा उभारिला त्यांनींच उत्तर आयुष्यांत अधिकारभ्रष्ट झालेल्या मुसलमान समाजाशीं लढण्या-च्या मिषानें प्रस्थापित उन्मत्त साम्राज्यसत्तेपुढें लोटांगणें घालण्यांत धन्यता मानावी आणि या स्वाभिमानशून्य धोरणासच महाराष्ट्रीय मुत्सद्दीगिरीची कमाल समजावी, हें दृश्य पाहून त्यांना मनःपूर्वक खेद होत असे. आज दिल्लीचें तक्त हिंदु आणि मुसलमान या दोघांपासूनही हिरावून घेऊन तिसऱ्यांनींच बळकावलें आहे. अर्थात् आजचे औरंगजेब आणि अफझुलखान हे निराळे आहेत, असें ते नेहमीं म्हणत. आपण लाविलेल्या क्रान्तिवृक्षाला आलेलीं हीं विकृत फळें पाहून त्याचा अंतरात्मा तळमळत असे. त्यांच्या निधनापूर्वीं एकच वर्ष राष्ट्रीय सभेंत पंडित नेहरू आणि बाबू सुभाषचंद्र यांच्या प्रेरणेनें स्वातंत्र्याचा ठराव पास होऊन ठिकठिकाणीं स्वातंत्र्य-संघांची स्थापना झाली. अशा महाराष्ट्रीय संघाचें अध्यक्षपद ओघानेंच आजन्म स्वातंत्र्याची उपासना करणारे अण्णासाहेब परांजपे यांच्याकडे आलें. या स्वातंत्र्य-संघाच्या अध्यक्ष-पदाचें स्थान मंडित करूनच त्यांनीं आपला देह ठेविला. ज्या संपूर्ण स्वातंत्र्याच्या ध्येयासाठीं आपण आजन्म क्रांतिदेवतेचीं स्तुतिस्तोत्रें गायिलीं तें ध्येय राष्ट्रसभेनें आत्मसात् करून त्यासाठीं क्रांति करण्याचें धोरण तिनें स्वीकारल्याचें दृश्य अण्णासाहेब परांजपे यांना आयुष्याच्या अंतीं पाहावयास लाभलें. फक्त राष्ट्रसभेनें त्या स्वातंत्र्याच्या प्राप्तिसाठीं जो सत्याग्रह-संग्राम १९३० सालीं पुकारला, तो पाहण्यास ते जिवंत राहिले नाहींत.

चौथ्या भागांतील विषय

'काळ' पत्राचें चौथें वर्ष म्हणजे १९०१ मधील वर्षप्रतिपदेपासून १९०२ च्या फाल्गुन अखेरपर्यंतचें वर्ष होय. हा काळ म्हणजे महाराष्ट्रांतील राष्ट्रीय पक्षाच्या नैराश्याचाच काळ होय. प्लेग आणि दुष्काळ या दोन आपत्तींनीं होरपळून निघालेली जनता ब्रिटिश सरकारच्या जुलमानें हवालदिल झालेली होती. लोकमान्य टिळक आपला खडतर कारावास भोगून नुकतेच बाहेर आलेले होते. आणि नामदार गोखले हिंदुस्थान सरकारच्या कायदेमंडळांत लॉर्ड कर्झन यांच्या करड्या अमलावर सनदशीर टीका करण्याची पूर्वतयारी करीत होते. ब्रिटिशांच्या जुलमाचा प्रतिकार केला असतां केवढें उग्र शासन प्रतिकार करणाऱ्यांना मिळूं शकतें याचें प्रत्यक्ष दर्शन चाफेकर प्रकरणानें पुण्यांतील जनतेच्या निदर्शनास आलें होतें. ब्रिटिश सत्तेपुढें मान लववून न चालणारें राजकारण मुळासकट उपटून टाकण्यास ब्रिटिश सत्ता समर्थ आहे याचा अनुभव टिळकांना तुरुंगांत टाकून सरकारनें जनतेला दिलेला होता. सर्व आशिया खंड पादाक्रान्त करण्याची महत्त्वाकांक्षा धरून लॉर्ड कर्झन तिबेट, इराण, अफगाणिस्तान इकडे आपलीं राजकारणें रचीत होते. आशिया खंडांत युरोपच्या तोडीची कोणतीही सत्ता उदय पावूं शकेल अशी कोणास आशाही वाटत नव्हती. दक्षिण आफ्रिकेंतील बोअर लोकांनीं केलेलें ब्रिटिश साम्राज्याविरुद्ध बंड ब्रिटिशांनीं तात्पुरतें तरी दडपून टाकलें होतें. आशियाप्रमाणें युरोपांतहि ब्रिटिशांना कोणी समान प्रतिस्पर्धी नव्हता. आपली वैभवशाली कारकीर्द संपवून व्हिक्टोरिया राणी नुकतीच खिस्तवासी झालेली होती. ऐहिक वैभव आणि अनियंत्रित सत्ता यांच्या शिखरावर विराजमान झालेल्या ब्रिटिशांना स्वर्गस्थ देवांची उपमा देऊन त्यांच्या प्रसादानें मिळतील तेवढे हक्क प्राप्त करून घेण्यांत समाधान मानणें हेंच व्यवहार्य राजकारण असें मानिलें जात होतें. ब्रिटिशांनीं आपलें साम्राज्य कमावितांना कोणकोणतीं कपट-कारस्थानें केलीं त्यांची चर्चा न करतां त्यांना ज्या अर्थी एवढें मोठें सामान्य वैभव प्राप्त झालें आहे त्या अर्थी त्यांची पुण्याईच थोर असली पाहिजे हा सिद्धान्त ऐतिहासिक सत्य म्हणून प्रतिपादिला जात असे. पूर्ण चिकित्सक बुद्धीनें ब्रिटिशांच्या राजनीतीची विचक्षणा करणाऱ्यांना जशी राजदंडाची भीति होती, तशीच व्यवहारदक्ष मुत्सद्दी म्हणविणाऱ्यांकडून अविवेकी गणिले जाण्याची भीति होती. याच

परिस्थितीस उद्देशून 'काळ'कर्ते एका लेखांत म्हणतात, "कोणी महिपीनाथ आपन्नसत्त्व आहे असें म्हटलें तर नऊ महिने झाले आहेत असें म्हणण्याचे हे दिवस आहेत." अशा विपरीत आणि निराशेच्या काळांत "आपण उन्नतावस्थेला येणार हें खात. " भविष्यत्काळ हा आपला आहे. त्यांत आपण जसे सत्यधर्मानें वागूं, त्याप्रमाणें आपलें सुख तेथें लिहून ठेवलेलें आहे. आपण जर गुडघ्यांत मान घालून निराशेचे सुस्कारे टाकीत बसलों, तर त्यापासून आपलें काय हित साधून घेणार आहों! ... निराशा ही मनुष्याचे असलेले हातपाय मोडते; परंतु आशा ही परमानंद माधवाच्या कृपेप्रमाणें लंगड्या माणसालाही गिरीचें उल्लंघन करण्याला प्रवृत्त करते." असा दुर्दम्य आशावाद 'ईश्वराची लीला अगाध आहे' या चौथ्या भागांतील पहिल्याच लेखांत आपणांस मांडलेला आढळतो. काळाचें नवें वर्ष चैत्रांत सुरू होत असे आणि आपल्या इकडे चैत्र-वैशाख हा वसंत ऋतु मानण्याची जुनी रूढि अद्यापि चालू आहे. सृष्टिक्रमाचें प्रत्यक्ष निरीक्षण न करतां पूर्वजांच्या प्राचीन ग्रंथांना प्रमाण मानून आजच्या सृष्टिव्यापारांचें वर्णन करण्याच्या मृतबुद्धीचें हें एक लक्षण आहे. वैशाखाचा वसंत ऋतु नष्ट होऊन ग्रीष्म ऋतु बनला त्यास शेंकडों वर्षें होऊन गेलीं, तथापि आम्ही अद्यापि वैशाखाची वसंतांतच गणना करीत असतों. असें आपण केलें तरी वैशाख महिन्याचा अनुभव घेत असतां 'काळ'-कर्त्यांनीं म्हटल्याप्रमाणें "एखाद्या जुलमी राजाच्या जुलमाप्रमाणें सूर्याच्या प्रखर उन्हानें सर्व मनुष्यांच्या अंगाची लाही लाही होत असते." हा अनुभव आपण विसरूं शकत नाहीं. काळाच्या या लेखांत प्रथमतः ग्रीष्म ऋतूंतील चंडप्रतापी सूर्याचें आणि जुलमी राजसत्तेचें सामर्थ्य वर्णन करून सांगितलें आहे. पण त्याच्याच उत्तरार्धांत याच वैशाख महिन्यांतील उन्हाळ्याचा कडेलोट होतांच आकाशांत ढग जमूं लागतात. हुद्दूहू मेघगर्जना होऊं लागते. सूर्य अभ्रांनीं आच्छादित होतो आणि एकदम वादळ होऊन पावसाचा व गारांचा वर्षाव होतो. सर्व प्राणिमात्र शांत आणि सुखी होतात. या सृष्टि-चमत्काराचें वर्णन 'ईश्वराची लीला अगाध आहे' या पहिल्याच लेखांत मोठें काव्यमय केलेलें आहे. केवळ प्राप्त परिस्थितीचें निरीक्षण करून मानवी बुद्धीनें केलेले तर्क फार मर्यादित असतात; परंतु ईश्वराची कर्तृत्वशक्ति अनंत अथवा अमर्याद आहे. तो अत्यंत प्रतिकूल परिस्थितींत मनुष्याला साहाय्य

करण्यास धावून येतो. अशा आशयाचे अनेक पौराणिक दृष्टान्त देऊन जनतेंत ब्रिटिश सत्तेच्या सामर्थ्यामुळें पसरलेल्या निराशेचा निरास करून श्रद्धापूर्ण आशावाद निर्माण करण्याचा प्रयत्न या लेखांत केलेला आहे. या लेखांत प्रकट झालेला परमेश्वरावरील विश्वास मनुष्याला दुबळा करणारा नसून त्याला प्रतिकूल परिस्थितींतही आशावादी बनविणारा आणि त्याचें पौरुष जागृत करणारा आहे. ब्रिटिशांचें सामर्थ्य आपणांस आज केवढेंही प्रचंड भासत असलें तथापि त्या साम्राज्याचा हेवा करणारे लोकही युरोप खंडामध्यें पुष्कळ आहेत, हें लोकांच्या निदर्शनास आणण्यासाठीं याच भागांतील 'इंग्रजांचें सामर्थ्य' हा चौथा लेख लिहिलेला आहे. त्यांत 'काळ' म्हणतो, "रशिया, जर्मनी, ऑस्ट्रिया वगैरे देश हे इंग्लंडचा हेवा करणाऱ्यांमध्यें प्रमुख होत, व यांचा हेवा म्हणजे नुसता तोंडाचा नव्हे, त्यांच्यापाशीं सैन्यें आहेत अशा दृष्टीनें पाहिलें असतां इंग्लंडच्या वैभवाच्या मानानें इंग्लंडचें सामर्थ्य बरेंच कमी दिसतें." या लेखांत निरनिराळ्या युरोपीय देशांतील सैन्यांचे आंकडे देऊन शेवटीं असें दाखविलें आहे कीं, इंग्लिशांचा एक शिपाई तर फ्रान्सचे तीन, जर्मनीचे चार आणि रशियाचे पांच, अशी स्थिति आहे.

पहिलें अँग्लो-जर्मन युद्ध सुरू होण्यापूर्वीं सुमारें बारातेरा वर्षांपूर्वींचा हा लेख आहे, हें लक्षांत घेतलें पाहिजे. या लेखाच्या प्रारंभीं "युरोप खंडामध्यें निरनिराळ्या राजांच्या दरम्यान केव्हां ना केव्हां तरी एखादी मोठी जंगी लढाई झाल्यावांचून राहणार नाहीं." असें तिकडील लोकांचें अनुमान असल्याचें उल्लेखिलेलें आहे. याच भागांत 'दक्षिण अमेरिका' या मथळ्याचे दोन लेखांक असून त्यांत युरोपांत सतराशें एकूणनव्वदमधील फ्रेंच राज्यक्रांति झाल्यानंतर सर्वत्र पेटलेल्या नेपोलियनकालीन युरोपीय महायुद्धाचा फायदा घेऊन दक्षिण अमेरिकेंतील स्पेनच्या वसाहती कशा स्वतंत्र झाल्या त्याचें रसभरित वर्णन केलेलें आहे. या ऐतिहासिक घडामोडींस 'काळ'कर्त्यांनीं एक मोठा मार्मिक दृष्टान्त दिलेला आहे. तो असा, "एकदां एका मोठ्या बेडकानें एका लहान प्राण्याला आपल्या तोंडामध्यें धरलें. त्या वेळीं त्या लहान प्राण्याची फारच दुर्दशा झाली. ......... आपण ह्या बेडकाच्या तोंडांतून सुटूं अशी आशा त्याला मुळींच नव्हती. पण इतक्यांत एक मोठा सर्प फोंफावत त्या बेडकाच्या अंगावर चाल करून आला. आणि त्यानें यमराजधानीच्या दिल्ली दरवाजाप्रमाणें आपलें

भयंकर तोंड उघडून दोन्ही जबड्यांमध्यें त्या बेडकाला आवळून धरलें त्या वेळीं त्यापासून होणाऱ्या वेदना सहन न होऊन, दीन वाणीनें तो बेडूक आक्रोश करूं लागला. तेव्हां त्याचें तोंड सहजच उघडलें आणि त्याच्या आंतमध्यें जो प्राणी अडकून राहिला होता तो पटकन बाहेर पडला आणि स्वतंत्र झाला."; अशा रीतीनें आपलीं प्राचीन पुराणें, आपला शिवकालीन मध्ययुगीन इतिहास आणि आधुनिक युरोपीय राजकीय घडामोडींचें अनेक दृष्टान्त व दाखले देऊन आज आपणांवर सत्ता गाजविणारी ब्रिटिश साम्राज्यशाही केवढीही प्रचंड दिसत असली आणि तिच्यापुढें आमचें सामर्थ्य कितीही क्षुद्र भासत असलें तथापि निराश व हतबल न होतां अनुकूल परिस्थितीची वाट पाहत व योग्य वेळीं तिचा योग्य उपयोग करून घेतला तर आपण निश्चित स्वतंत्र होऊं हा आशावाद निर्माण करून जनतेंतील सुप्त सामर्थ्य जागृत करणें व तिला पौरुष करण्यास प्रवृत्त करणें हें 'काळ' पत्राचें या वेळचें कार्य होतें, व तें त्यानें अत्यंत मार्मिकपणानें कसें चालू ठेवलें होतें आणि तें करण्यासाठीं काळांतून प्रतिभासंपन्न असें उत्कृष्ट वाङ्मय तत्कालीन युवकांना कसें लाभत होतें याची कल्पना हे लेख वाचले असतां बरोबर येऊं शकते. महाविद्यालयीन युवकांना ओजस्वी, रसपूर्ण आणि अलंकारयुक्त असें मराठी वाङ्मय शिकवावयाचें असल्यास त्यांत काळांतील निबंधांना जवळजवळ पहिलें स्थान द्यावें लागेल असें आम्हांस वाटतें.

आपलीं पुराणें आणि इतिहास यांच्यापासून क्रान्तिकारकांना स्फूर्ति घेण्यासारखे जे जे प्रसंग असतील त्यांची योग्य निवड करून ते कलापूर्ण मार्गेत सजवून मांडण्यांत 'काळा'चा हातखंडा होता. लेखाचा मथळा अगदीं साळस व निरुपद्रवी देऊन त्यांत रसरसणारा क्रान्तिरस ओतण्याची कला हें एक 'काळा'चें वैशिष्ट्य होतें. या लेखसंग्रहांतील दुसराच लेख 'अक्षयतृतीया' या नांवाचा आहे. 'अक्षयतृतीया' म्हटल्याबरोबर स्त्रियांच्या हळदी-कुंकवाचा समारंभ सामान्य मनुष्याच्या डोळ्यांपुढें उभा राहतो. पण ह्या लेखांतील वर्ण्य विषय परशुराम आणि त्याचें अवतारकार्य हा आहे. परशुराम हा एक उन्मत्त व जुलमी क्षत्रिय राजांचा संहार करणारा क्रान्तिपुरुष आहे. कार्तवीर्य सहस्रार्जुनानें परशुरामाचा बाप जमदग्नि याचा अपमान केला. तेव्हां परशुराम ब्राह्मण असूनही त्यानें शस्त्र धारण केलें, आणि कार्तवीर्य

सहस्त्रार्जुनाचा वध केला. पुढें कार्तवीर्याच्या मुलांनीं परशुरामाच्या बापास ठार मारलें. आणि परशुरामानें त्याचा प्रतिकार करण्यासाठीं अथवा सूड घेण्यासाठीं एकवीस वेळां निःक्षत्रिय पृथ्वी करण्याची प्रतिज्ञा करून उन्मत्त राजांच्या रक्तानें भरलेले पांच डोह निर्माण केले; आणि त्या डोहांतील रक्ताच्या ओंजळीनें आपल्या पितरांचें तर्पण केलें. या विषयावर लिहितांना 'काळ'कर्ते म्हणतात, "अशा प्रकारचें शांतवन करणारें पितृतर्पण फारच थोड्या पितरांच्या कपाळीं असतें. उलट, पुत्रांच्या लज्जास्पद, निंद्य, अभिमानरहित आणि भित्रेपणाच्या कृत्यांनीं बहुतेक पितरांना नरकामध्येंच जाण्याची पाळी येत असली पाहिजे." अशाच प्रकारचा 'मुद्राराक्षस' या मथळ्याचा एक लेख आहे. या नाटकाचा मराठी प्रयोग त्या वेळीं पुण्यांत नुकताच झाला होता. त्यास उद्देशून हा लेख लिहिलेला आहे. या लेखांत चाणक्य आणि राक्षस यांच्या स्वभावांचें आणि कर्तबगाऱ्यांचें फार रसपूर्ण वर्णन करण्यांत आलेलें आहे. चाणक्यानें केवळ आपल्या बुद्धीच्या भांडवलावर सैन्य, द्रव्य, लोक यांपैकीं कोणतेंही साधन नसतांना नंदांचें राज्य कसें धुळीस मिळविलें त्याचें प्रथम वर्णन केलेलें आहे. आणि उत्तरार्धांत राक्षसाच्या निःस्वार्थी व उदात्त स्वामिभक्तीचेंही वर्णन करण्यांत आलें आहे. ज्यांच्याशीं आपण एकदां स्वामिनिष्ठा पत्करली त्यांच्याशीं त्यांच्या वैभवाचा अस्त झाल्यानंतर तशीच स्वामिनिष्ठा कायम टेवणें आणि नव्या राजवटीच्या वैभवानें दिपून न जातां कष्टी होणें हें राक्षसाच्या स्वामिभक्तीचें उज्ज्वल अंग होतें. स्वार्थ, लोभ अथवा भीति यांतून उगम पावलेली स्वामिनिष्ठा अशा प्रकारची अव्यभिचारी निष्ठा व्यक्त करूं शकत नाहीं. राक्षसाची स्वामिनिष्ठा एकनिष्ठ व अव्यभिचारी होती व तोच त्याचा मोठेपणा होता. विष्णुगुप्त अथवा चाणक्य आणि राक्षस यांच्या भूमिकांचें हें वर्णन तत्कालीन चालू राजकारणाच्या घडामोडींशीं असंबद्ध किंवा त्यांच्यापासून अलिप्त अशा भावनेनें केलेलें नाहीं. ज्याच्याजवळ बुद्धि आहे तो केवळ आपल्या बुद्धीच्या सामर्थ्यानें मोठमोठ्या राजांना धुळीस मिळवूं शकतो, हा आत्मविश्वास तरुण देशभक्तांच्या अंतःकरणांत निर्माण व्हावा हा एक हेतु, आणि त्याचबरोबर ब्रिटिश सम्राटाशीं राजनिष्ठा व्यक्त करून आपलें मवाळ राजकारण उभारणाऱ्या राजकीय पक्षाची स्वामिनिष्ठा ही खरी स्पृहणीय वस्तु नव्हे, हें वाचकांच्या मनावर बिंबवावें हा दुसरा

हेतु. या दुहेरी वृत्तीनें लिहिलेला हा लेख आहे. एका बाजूनें क्रांतिकारक देशभक्तांच्या स्फूर्तीची ज्वाला प्रज्वलित करीत असतां दुसऱ्या बाजूनें त्या वेळीं सुशिक्षित समाजांत प्रतिष्ठा पावलेल्या सुधारक पक्षाचा आणि मवाळ कारणाचा उपहास आणि उपरोध या शस्त्रांनीं पाडाव करावा हेतूंनीं काळांतील लेख लिहिलेले असत. यांपैकीं दुसऱ्या हेतूनें लिहिलेल्या लेखांत 'शरदृतूंतील मेघांनो!' तुम्ही काय केलें आहे म्हणून एवढ्या गर्जना करतां!' 'खोटें बोलण्याच्या विषयांतील परीक्षा आणि बक्षीस', 'स्वदेशोन्नतिकारक मंडळीबद्दलची त्रोटक माहिती' आणि 'ठराव' हे चार लेख पडतात. त्यांतील विनोद, उपहास आणि उपरोध हे फार उच्च दर्जाचे आहेत. पहिल्या लेखांत यूरोप खंडांत सोळाव्या शतकांत होऊन गेलेल्या मार्टिन ल्यूथर प्रभृति धर्मसुधारक हुतात्म्यांशीं या देशांतील राजाश्रयानें सुखासीन बनलेल्या निष्क्रिय व कर्तृत्वहीन सुधारकांची तुलना केलेली आहे. दुसऱ्या लेखांत या सुधारकांच्याकडून आपल्या कर्तृत्वाच्या ज्या बढाया मारण्यांत येत असतात त्या कशा निराधार आहेत त्याचा निंदागर्भ उपहासानें उल्लेख केला आहे. तिसऱ्या लेखांत गव्हर्नरादि गोऱ्या अधिकाऱ्यांना मानपत्रें देऊन अथवा त्यांचीं स्तुतिस्तोत्रें गाऊन स्वदेशोन्नति करण्याची कल्पना कशी हास्यास्पद व पोरकट आहे, त्याचें विनोदपूर्ण वर्णन केलें आहे. आणि चौथ्या 'ठराव' या लेखांत राष्ट्रसभेत केवळ ठराव केल्यानें आपण एखादें मोठें राजकारण करीत आहोंत व त्यामुळें आपल्या देशांतील लोकांचे राजकीय हक्क वाढणार आहेत ही कल्पना कशी भ्रामक आहे तें आयर्लंडच्या इतिहासाचा दाखला देऊन आणि आयरिश पुढारी जॉन रेडमंड यांच्या भाषणाचा आधार देऊन सिद्ध केलेलें आहे. सुधारक पक्ष आणि प्रागतिक राजकारण यांच्यावर केवळ विध्वंसक टीकाच करून स्वस्थ न बसतां एकदोन लेखांत त्यांना कांही विधायक सूचना केल्याचें दिसून येतें. अशाचपैकीं 'कौंट टॉलस्टॉय यांची हिंदुस्थानांतील समाजसुधारकांना एक सूचना' हा एक लेख आहे. त्यांत 'काळ'कर्ते लिहितात, "हिंदुस्थानांत अशी एक घातक चाल आहे कीं, तेथील एक रहिवासी (शिपाई बनून) दुसऱ्या रहिवाशाचा प्राण घेण्याला तयार होतो. या गोष्टीबद्दल हिंदुस्थानांतील रहिवाशांना जोंपर्यंत कांहीं वाटत नाहीं तोंपर्यंत हिंदुस्थान देश कधींही सुधारावयाचा

नाहीं." सामाजिक सुधारणा परिषदेनें जे विषय अथवा ज्या सुधारणा आपल्या समाजांत घडवून आणण्याचा प्रयत्न चालविला आहे, त्या सर्वांचा उल्लेख करून आपल्या सर्व निंद्य चालींहून व रूढींहून अधिक निंद्य व हानिकारक अशा परकीय सत्तेचे नोकर होऊन आपल्या देशांतील लोकांवर गोळ्या घालण्याची जी दुष्ट चाल आपल्या लोकांत दृढमूल झालेली आहे तिचें निर्मूलन करणें हें कार्य सामाजिक परिषदेनें आपल्या अंगावर घ्यावें अशी एक विनोदी सूचना या लेखांत केलेली आहे. स्वतःला समाजसुधारक म्हणविणारे लोक आपल्या समाजाला दारिद्र्यांत, दुःखांत आणि दास्यांत लोटणाऱ्या दुर्गुणांसंबंधीं उदासीन राहून कांहीं क्षुल्लक मुद्द्यांवरच आपल्या शक्तीचा अपव्यय करीत आहेत हें दाखवून देणें हा या लेखांतील मुख्य रोख आहे.

कोणत्याही समाजांत अनेक बऱ्यावाईट चाली असतात, अनेक सद्गुण व दुर्गुणही असतात; परन्तु फितुरी हा दुर्गुण इतका भयंकर आहे कीं, त्यामुळें समाजाला अथवा राष्ट्राला पारतंत्र्य येतें; आणि पारतंत्र्यांत ह्या दुर्गुणाची वाढ अधिकच होत असते. हिंदुस्थानांतील परकीय सत्तेचा मुख्य आधार हिंदुसमाजाच्या अंतःकरणापर्यन्त भिडलेला हा फितुरीचाच रोग होय. आपल्याच देशांतील लोकांवर परकीयांचा पैसा घेऊन हत्यार चालविण्याचा दुर्गुण ह्या देशांत नसता तर पारतंत्र्य आणि त्यांतून निर्माण होणाऱ्या अनेक आपत्ति ह्या आम्हांस भोगाव्या लागल्या नसत्या. ज्यांना परतंत्र देशाची खरी उन्नति करावयाची असेल त्यांनीं प्रथमतः ह्या दुर्गुणाचें निर्मूलन करण्याचे प्रयत्न जारीनें केले पाहिजेत. हिंदुस्थानांत राष्ट्रीयत्व नाहीं म्हणूनच ब्रिटिश साम्राज्य टिकलेलें आहे याची जाणीव जनतेला करून देणें व त्यासाठीं निरनिराळे प्रसंग शोधून काढून फितुरीचा दुर्गुण किती हिडीस आहे त्याची कल्पना जनतेच्या अन्तःकरणावर बिंबवणें हें काळ पत्राचें मुख्य कर्तव्य होतें. दमाल्या या नांवाचा एक दरवडेखोर खानदेशांतील जिल्ह्यांत निर्माण होऊन अनेक वर्षें लोकांना आणि पोलिसांना सतावीत होता. जिल्ह्यांतील पोलिस सुपरिन्टेंडेंटनें याला अखेरीस पकडलें तेव्हां या पोलिस अधिकाऱ्यानें एक मोठेंच शतकृत्य केलें म्हणून टाइम्स ऑफ इन्डियांत त्याची स्तुति आली होती. ह्या प्रकरणावर 'दमाल्या भिल्ल' या मथळ्याचा एक लेख काळ पत्रांत आला. त्यांतील दृष्टिकोन अगदींच भिन्न आणि थोडासा विलक्षण दिसणारा असा आहे.

'हमाल्या'ला पकडतांना त्याच्या मुलांना पैशानें वश करून पोलिस सुपरि न्टेंडेटनें त्याला पकडलें होतें. ह्यासंबंधीं काळकर्ते लिहितात, " गुन्हे पकडणाऱ्याच्या कामीं सरकारला मदत करणें किंवा सार्वजनिक फायद्यासाठीं आपल्या खाजगी नुकसानीकडे न पाहणें या गोष्टी फार उदात्त आहेत. व असल्या उदात्त हेतूंनीं उद्युक्त होऊन जर 'फुल्या' आणि 'पवार' ह्यांनीं आपल्या बापाला पकडून दिलें असतें तर ते खरोखरच स्तुतीला पात्र झाले असते परन्तु त्या बिचाऱ्यांना वर निर्दिष्ट केलेल्या हेतूची कल्पनाही नसेल. त्यां पांचशें रुपयांची रक्कम किती मोठी असते, ती ठेवायला किती मोठी पिशवी लागेल व त्या रकमेवर मद्य, मांस आणि वेश्या ह्यांच्या उपभोगामध्यें किती दिवस चैन मारतां येईल ह्याची तेवढी कल्पना होती. आणि ह्या कल्पनेप्रमाणें त्यांनीं आपला बाप पांचशें रुपयांला 'लक्' साहेबाला विकला! ज्या देशांत कांहीं थोड्या रुपयांकरितां आपला बाप ( मग तो दरवडेखोर असो किंवा प्रामाणिक असो ) विकणारे मुलगे आहेत त्या देशाला कशाची आशा आहे! त्याला केव्हां चांगले दिवस यावयाचे आहेत आणि त्याचे कधीं पांग फिटावयाचे आहेत! कधीं नाहीं... मुलांकडून बापाला आणि बापाकडून मुलाला पकडण्याच्या ह्या साहेबाच्या युक्त्या आजच्या आहेत असें नाहीं. ह्या युक्त्यांच्या योगानें साहेबांनीं आजपर्यंत हिंदुस्थानांतील राजापासून रंकापर्यंत हजारों लोकांना हस्तगत करून घेतलें आहे. परंतु आपण हिंदुस्थानांतील लोक मात्र प्लासीच्या लढाईच्या पूर्वीं जसे होतों तसेच डायमंड ज्युबिलीच्यानंतरही कायम आहोंत! अजूनही आम्ही अल्पस्वल्प स्वार्थाकरितां पाहिजे ती गोष्ट करण्याला तयार होत आहों. आमच्या विश्वासघातानें इंग्लिशांचें किती तरी सैन्य निरुपयोगी करून टेवलें आहे.

अशा प्रकारें देशांत कोणतीही लहानथोर गोष्ट घडो, तिच्याकडे आपल्या लोकांतील राष्ट्रीयत्व, देशभक्ति आणि स्वार्थत्याग यांची वृद्धि करण्याच्या दृष्टीनेंच पाहावयाचें हा काळाचा शिरस्ता होता. प्रत्येक गोष्टीकडे पाहण्याचा एक नवा प्रतिभासंपन्न आणि काव्यमय दृष्टिकोन काळाच्या वाचकांना अनुभवितां येत असे. आपल्या इतिहासांतील मोठमोठ्या प्रसंगांचें काव्यमय वर्णन करून सद्यःकालीन क्रान्तिभावनेला चेतविण्याचें आणि तरुणांना स्फूर्ति देण्याचें कार्य काळाइतकें कोणत्याही मराठी पत्रानें केलेलें नाहीं. या भागांतील 'दिल्लीचे

र आणि भाऊसाहेबांचे घण ' हा लेख ह्या दृष्टीनें अत्यंत सरस वठलेला
हे. भाऊसाहेबांनीं दिल्लीचें तक्त हस्तगत केल्यानंतर त्यावर स्वतः न बसतां
आपल्या हातांत घण घेऊन फोडलें कां ! याचें विवेचन काळकर्ते पुढील-
प्रमाणें करतात: " भाऊसाहेबांनीं हें दिल्लीचें तक्त फोडलें नव्हे, तर हिंदुस्थानच्या
गुलामगिरीचें डोकेंच फोडलें. गुलामगिरीचीं जोखडें हिंदुस्थानांतील सर्व
लोकांच्या माना दाबून टाकण्याकरितां येथूनच तयार करून बाहेर पाठविलीं
जात असत. बंगाल, बिहार, ओरिसा, अयोध्या, लाहोर, सिंध, गुजरात, नाग-
पूर, विजापूर, गोवळकोंडा आणि दौलताबाद ह्या सर्व ठिकाणच्या हिंदु प्रजेला
जखडून टाकण्यासाठीं गुलामगिरीच्या शृंखला येथेंच घडविल्या जात होत्या.
ह्या भरतखंडांतील लोकांच्या अन्तःकरणाला चावून चावून त्यांना रात्रीची-
झोंप येऊं न देणारे गुलामगिरीचे साप आणि विंचू याच वारुळांतून
बाहेर पडत होते. सर्व तरतरीत लोकांच्या उमेदी आणि महत्त्वाकांक्षी मनुष्यांच्या
आशा करपवून टाकणाऱ्या गुलामगिरीच्या ज्वाला ह्याच अग्निकुंडांतून निघून
सर्व हिंदुस्थानभर सैरावैरा धावत होत्या, आणि काश्मिरांतील हिमालयाच्या
शिखरा, माळव्यांतील सातपुडा आणि दक्षिणेंतील सह्याद्रि अशा मोठमोठ्या उंच
पर्वतांनाही बुडवून टाकणाऱ्या गुलामगिरीच्या प्रचंड लाटा ह्याच समुद्रापासून
उसळत होत्या, त्या दिल्लीच्या तक्ताचें हें स्वरूप आपण लक्षांत आणलें
म्हणजे तें फोडण्यांत भाऊसाहेबांनीं केवढी मोटी कामगिरी बजावली याची
आपल्याला बरोबर कल्पना करतां येईल......... बाकीच्या लोकांचे डोळे
बादशाही वैभवानें दिपून गेलेले होते, पण सदाशिवरावभाऊंची दृष्टि साफ होती.
सदाशिवरावभाऊंना पक्कें माहीत होतें कीं, बादशाही तक्त कसलेंही केलेलें
असो, पण त्याला कोणी फोडणारा भेटला कीं तें फुटलेंच पाहिजे; त्याप्रमाणें
ते तक्त सहासात शतकें अभेद्य झालें होतें, त्याला अखेरीस सदाशिवरावभाऊ
फोडणारा भेटला आणि त्याबरोबर तें फुटलें...... बलाढ्य, सत्त्वशील, सत्य-
प्रिय आणि न्यायोपबृंहित अशा मनगटानें उचललेल्या घणाखालीं निष्कारण
मेलेल्या लोकांच्या रक्तांनीं लाल झालेल्या, गांजलेल्या, शिव्याशापरूपी धरणी-
कंपाच्या धक्क्यानें डळमळूं लागलेल्या, अनन्वित जुलूम-अन्यायांचे कर, प्रजेचा
तळतळाट, राजवल्लभांचीं दुर्व्यसनें, फंदफितुरी आणि बंडाळ्या ह्या अनेक
कीडांनीं आंतून पोखरलेल्या तक्ताचे तुकडे तुकडेच झाले पाहिजेत, ही गोष्ट

भरत आणि भाऊसाहेबांचे घण' हा लेख ह्या दृष्टीनें अत्यंत सरस वठलेला
आहे. भाऊसाहेबांनीं दिल्लीचें तक्त हस्तगत केल्यानंतर त्यावर स्वतः न बसतां
आपल्या हातांत घण घेऊन फोडलें कां ! याचें विवेचन काळकर्ते पुढील-
मार्गे करतातः "भाऊसाहेबांनीं हें दिल्लीचें तक्त फोडलें नव्हे, तर हिंदुस्थानच्या
गुलामगिरीचें डोकेंच फोडलें. गुलामगिरीचीं जोखडें हिंदुस्थानांतील सर्व
लोकांच्या माना दाबून टाकण्याकरितां येथूनच तयार करून बाहेर पाठविलीं
जात असत. बंगाल, बिहार, ओरिसा, अयोध्या, लाहोर, सिंध, गुजरात, नाग-
पूर, विजापूर, गोवळकोंडा आणि दौलताबाद ह्या सर्व ठिकाणच्या हिंदु प्रजेला
जखडून टाकण्यासाठीं गुलामगिरीच्या शृंखला येथेंच घडविल्या जात होत्या.
अखंड भरतखंडांतील लोकांच्या अन्तःकरणाला चावून चावून त्यांना रात्रीची-
ही झोंप येऊं न देणारे गुलामगिरीचे साप आणि विंचू याच वारुळांतून
बाहेर पडत होते. सर्व तरतरीत लोकांच्या उमेदी आणि महत्त्वाकांक्षी मनुष्यांच्या
आशा करपवून टाकणाऱ्या गुलामगिरीच्या ज्वाला ह्याच अग्निकुंडांतून निघून
सर्व हिंदुस्थानभर सैरावैरा धावत होत्या, आणि काश्मिरांतील हिमालयाच्या
शाखा, माळव्यांतील सातपुडा आणि दक्षिणेंतील सह्याद्रि अशा मोठमोठ्या उंच
पर्वतांनाही बुडवून टाकणाऱ्या गुलामगिरीच्या प्रचंड लाटा ह्याच समुद्रापासून
उसळत होत्या, त्या दिल्लीच्या तक्ताचें हें स्वरूप आपण लक्षांत आणलें
म्हणजे तें फोडण्यांत भाऊसाहेबांनीं केवढी मोठी कामगिरी बजावली याची
आपल्याला बरोबर कल्पना करतां येईल......... बाकीच्या लोकांचे डोळे
बादशाही वैभवानें दिपून गेलेले होते, पण सदाशिवरावभाऊंची दृष्टि साफ होती.
सदाशिवरावभाऊंना पक्कें माहीत होतें कीं, बादशाही तक्त कसलेंही केलेलें
असो, पण त्याला कोणी फोडणारा भेटला कीं तें फुटलेंच पाहिजे; त्याप्रमाणें
तें तक्त सहासात शतकें अभेद्य झालें होतें, त्याला अखेरीस सदाशिवरावभाऊ
फोडणारा भेटला आणि त्याबरोबर तें फुटलें......बलाढ्य, सत्त्वशील, सत्य-
युक्त आणि न्यायोपबृंहित अशा मनगटानें उचललेल्या घणाखालीं निष्कारण
मारलेल्या लोकांच्या रक्तांनीं लाल झालेल्या, गांजलेल्या, शिव्याशापरूपी धरणी-
कंपाच्या धक्क्यानें डळमळूं लागलेल्या, अनन्वित जुलूम-अन्यायांचे कर, प्रजेचा
असंतोष, राजवल्लभांचीं दुर्व्यसनें, फंदफितुरी आणि बंडाळ्या ह्या अनेक
किड्यांनीं आंतून पोखरलेल्या तक्ताचे तुकडे तुकडेच झाले पाहिजेत, ही गोष्ट

भाऊसाहेबांच्या मनामध्यें येऊन चुकलेली होती. इतर लोकांना जरी ह्या तख्ताचा मोठा बाऊ वाटत होता तरी भाऊसाहेबांच्या डोळ्यांला बादशाही जुलमामुळें त्याला आधींच भेगा गेलेल्या दिसत होत्या. तें तख्त बादशाही अन्यायानें आधींच फोडून ठेवलें होतें. भाऊसाहेबांनीं नंतर घण उचलला. दक्षिणेंतील भीवर्धनच्या समुद्रकांठचा एक मुलगा उत्तर हिंदुस्थानांतील यमुनेच्या कांठच्या दिल्लीच्या किल्ल्यांत जाऊन आपल्या देशाच्या स्वतंत्रतेसाठीं हातावर शिर घेऊन निघालेल्या लोकांच्या पोटाला अन्न देण्याकरितां सहासात शतकांच्या संचित केलेल्या वैभवानें उभारिलेलें तख्त फोडण्याकरितां आपल्या आजानुलंबी पवित्र हातांमध्यें घण घेऊन उभा राहिलेला आहे ही कल्पना, हा प्रसंग; हें चित्र, हें संविधानक किती आल्हादजनक, किती स्वदेशप्रीतिजनक आणि किती रोमहर्षक आहे, याची प्रचीति आज आपणांला केवळ कल्पनासृष्टीमध्येंच करून घेतली पाहिजे. ज्यांनीं अशा स्थितीमध्यें सदाशिवरावभाऊंना पाहिलें असेल, त्यांचे डोळे धन्य ! त्यांनीं बाहुवीर्याची परमावधि पाहिली ! आणि स्वातंत्र्यप्रीतीची पराकाष्ठा अनुभविली......ज्या तक्तावर बसण्याकरितां शेंकडों बादशहा धडपडत होते, धडपडत आहेत आणि धडपडत राहतील तें तक्त फोडण्यांत भाऊसाहेबांना जास्त कृतकृत्यता वाटली, ह्यांतच त्यांच्या अंगचा थोरपणा दिसून येत आहे. असल्या तक्तांवर बसेल कोणीही, पण जो तीं फोडतो तो त्यांवर बसणाऱ्याच्याही मानेवर बसण्याच्या योग्यतेचा असला पाहिजे." हें एक नाट्यपूर्ण काव्य आहे. त्याच्याकडे ऐतिहासिक शुष्क वस्तुस्थितीच्या जडदृष्टीनें पाहून त्यांतील रस चाखतां येणार नाहीं. भाऊसाहेबांनीं दिल्लीचें तक्त फोडलें कीं त्याच्यावरील चांदीचें छत आटविलें या ऐतिहासिक तपशिलाच्या नीरस दृष्टीनें वरील उताऱ्याचा विचार करण्यांत अरसिकता आहे. तसेंच केवळ तात्कालीन राजकीय घडामोडींच्या दृष्टीनें फलदृष्ट्या अथवा परिणामदृष्ट्या भाऊसाहेबांच्या कृतीचे राजकीय इष्टानिष्ट परिणाम काय झाले ह्याही दृष्टीनें ह्या लेखाचा विचार करणें युक्त नाहीं व केवळ ऐतिहासिक सत्यसंशोधनाच्या दृष्टीनें आपण हा लेख लिहीत नाहीं असा खुलासाही या लेखाच्या प्रारंभीं लेखकांनीं केलेला आहे. ह्या इतिहासांतील गोष्टीवरून ज्या तख्त फोडण्याचे परिणाम अशा रीतीनें अहितकारक झाले त्या गोष्टीला इतकें महत्त्व देणें बरोबर नाहीं असा आक्षेप येणें अगदीं स्वाभाविक

हे. परंतु "आम्ही जें या गोष्टीला श्रेष्ठपद देत आहों तें अगदीं निराळ्या रणासाठीं आहे. सध्यांच्या प्रसंगीं आम्हाला ऐतिहासिक वादाशीं विशेष हीं कर्तव्य नाहीं." इतका खुलासा इतिहाससंशोधनाच्या दृष्टीनें केल्यानंतर लेख उघड उघड व बुद्धिपुरस्पर चालू राजकारणाला विशेष चेतना व णा देण्यासाठीं लिहिलेला आहे त्याकडे केवळ ऐतिहासिक जड सत्याच्या स दृष्टीनें पाहणें युक्त नाहीं असें आम्ही कां म्हणतों त्याचा उलगडा ऊं शकेल.

याच लेखसंग्रहांत विशेष उल्लेखण्यासारखे आणखी दोन लेख आहेत ते जे 'आम्रवृक्ष' आणि 'लायकरगसचे कायदे' हे होत. यांतील विषय ठकर्त्यांच्या नेहमींच्या आवडत्या विषयांहून थोडे भिन्न पण अधिक व्यापक णि खोल आहेत. 'आम्रवृक्ष'च्या लेखांत एका खेड्यांतील स्वतःचें घरदार तवाडी सावकारांकडे गेल्यामुळें मुंबईतील गिरणींत जाऊन मजूर बनलेल्या ा घरंदाज शेतकऱ्याची मनःस्थिति मोठी मार्मिकपणें वर्णन केली आहे. ईतील गिरणींत माग चालवीत असतांही त्याला त्या मागांच्या ठिकाणीं ली शेतवाडी कशी दिसते आणि मधून मधून सभोंवारच्या जगाची गृति होऊन तो आपल्या खेड्यांतील जगाचीं चित्रें मानसचक्षूंपुढें कशी लागतो याचें वर्णन देऊन, पुन्हा तो मधून मधून आपल्या गांवीं आला तां त्याच्या अंतःकरणांत तेथील देखावे पाहून कोणत्या भावना जागृत ात, त्याच्या गैरहजेरींत खेड्यांतील जीवनांत घडामोडी व क्रांति कशी घडत ते आणि या घडामोडी पाहून त्याचें मन कसें विव्हल होतें याचें उत्कृष्ट चित्र या लेखांत काढलेलें आहे. त्याला प्रिय असणारा एक आम्रवृक्ष पाहून ्या भावना कशा सद्गदित होतात आणि तो आम्रवृक्ष त्याच्याशीं कसें गुज करतो तेंहि या लेखांत सविस्तर वर्णिलें आहे. त्या वृक्षाचें हिंवाळ्यांतील पर्णवर्णन एके ठिकाणीं केलें असून, दुसऱ्या ठिकाणीं त्याचेंच वसंत ्या प्रारंभींच्या नवपल्लवांनीं आणि मोहरांनीं सुशोभित अशा रम्य अवस्थेचें त्यांत आलें आहे; पण या दोनही अवस्थांत त्याचें दर्शन घेतांना त्या ीतील कामगाराला समाधान अथवा शान्ति लाभत नाहीं. दोनही वेळीं ा उद्विग्नता प्राप्त होते. कडक हिंवाळ्यांतील त्या वृक्षाची शुष्कपर्ण-

भवरेषा पाहून त्याला जितकें दुःख होतें, तितकेंच वसंत ऋतूंतील त्याचें नयनरम्य स्वरूप पाहूनही त्याला दुःख होतें. कारण, त्याचें पूर्वीचें जग आतां उध्वस्त झालेलें होतें. अशा आपत्कालीं आपलें प्रिय जगत् उध्वस्त झालें असतां इंद्रियांना आल्हाद देणारे देखावेसुद्धां मनुष्याला उद्विग्न बनविण्यास कारण होत असतात. त्या वृक्षाच्या दोनही अवस्था पाहून त्या कामगाराला अखेरीस आपल्या देशाच्या एकंदर स्थितीची जाणीव होते आणि त्या आम्र-वृक्षांतील सर्व रसांचा शोष करून घेणाऱ्या व त्याला निष्पर्ण करणाऱ्या शिशिर ऋतूप्रमाणें आपल्या देशांतील जनतेचें रक्तशोषण करणारें पारतंत्र्य केव्हां नष्ट होईल आणि त्याला स्वातंत्र्याचा वसंत ऋतु केव्हां प्राप्त होईल असा व्यापक विचार त्या कामगाराच्या मनांत उदय पावतो. हा लेख ब्रिटिश साम्राज्यशाहीखालीं उध्वस्त होणाऱ्या खेड्यांतील जीवनाचें करुण दृश्य वर्णन करण्याच्या दृष्टीनें फार सरस वठला असून, स्वतःच्या कौटुंबिक व वैयक्तिक जीवनांतील क्रान्तीच्या अनुभवांतून मनुष्याच्या मनांत राष्ट्री[illegible] परिस्थितीची जाणीव नकळत व स्वाभाविकपणें कशी निर्माण होते याचें यां[illegible] यथार्थ विवेचन केलेलें आहे.

'वायकरगसचे कायदे' या लेखांत समाजांत आर्थिक विषमता वाढ[illegible] त्यानें अनेक दुर्गुण आणि व्यसनें यांची वाढ कशी होत जाते आणि त्यासाठ[illegible] लोकांना सद्गुणी व राष्ट्रनिष्ठ ठेवावयाचें असल्यास श्रीमंत आणि गरीब हा भेद मोडून आर्थिक अथवा सांपत्तिक समानता निर्माण करणारे कायदे कर[illegible] कसें उपयुक्त असतें या विषयाचा जातां जातां उल्लेख आलेला आहे. यासंबंध[illegible] ते लिहितात, "श्रीमंत लोक अतोनात खर्चाचीं पक्वान्नें सेवन करूनही नाजूक आणि कमकुवत बनलेले होते व गरीब लोक पोटभर अन्न न मिळाल्यामु[illegible] उपाशी मरत होते. ही स्थिति बदलण्याकरितां प्रत्येकानें आपापल्या घरीं पंच-पक्वान्नें किंवा अर्धपोटी जेवणाची चाल मोडून टाकून सर्व स्पार्टन लोकां[illegible] एकत्र जमून एकाच प्रकारचें अन्न खावें अशी पद्धत वायकरगसनें सुरू केली. जमिनीसंबंधानें त्यानें केलेल्या कायद्यासंबंधीं लेखक लिहितात, "श्री[illegible] गरीबांवर फार जुलूम करीत होते. ही सर्व अव्यवस्था लोभमूलानि पापा[illegible] ह्या न्यायानें लोभापासून होत आहे असें जाणून, वायकरगसनें प्रथम जमिनीसंबंधानें एक कायदा केला. त्यानें सर्व जमिनींचे एकूण चाळीस हज[illegible]

रखे विभाग केले व ते सगळ्यांना सारखे वांटून दिले. पूर्वी काहीं श्रीमंत कांपाशीं मात्र सर्व जमिनी येऊन राहिल्या होत्या व गरिबांपाशीं एक नभरमुद्रां जमीन उरली नव्हती. त्यामुळें एकाच देशांत अतिशय संपत्ति णि अतिशय दारिद्य हीं जमल्यामुळें जे कांहीं दुष्परिणाम व्हावयाचे ते स्पार्टांतील श्रीमंत-गरीब लोकांना भोगावे लागत होते. उर्मटपणा, मत्सर, गिऱ्या, चैनबाजी वगैरे दुर्गुणांचें स्पार्टामध्यें अतिशय प्राबल्य झालें होतें. सर्वांचा लय ह्या जमिनीच्या सारख्या वांटणीनें झाला. श्रीमंत आणि ब हा भेद बुडाला. श्रीमंतीला सन्मान आणि गरिबीला अपमान ही चाल झाली. सर्व सारखे झाले आणि एकापेक्षां दुसऱ्याला श्रेष्ठत्व मिळवायचें तें तर तें संपत्तीनें मिळेनासें होऊन त्याला केवळ सद्‌गुणांचाच मार्ग डा राहिला."

हा लेख वाचला असतां काळकर्त्यांची राष्ट्रीयत्वाची भावना केवळ परकीय मल नष्ट करण्यापुरतीच मर्यादित नसून, एकाच राष्ट्रांतून श्रीमंत-गरीब हा षम आणि अनर्थावह वर्गभेद नष्ट करून एकवर्गसमाज निर्माण करण्या- त विकासशील होणारी होती असें जर कोणीं म्हटलें तर तें अयथार्थ होणार हीं. अर्थात् १९०१-२ सालचा हा लेख आहे. त्या वेळीं या विचाराची षेक वाढ अथवा स्पष्टीकरण होण्याचा संभव नव्हता हें लक्षांत लें पाहिजे. महाराष्ट्रांतील राष्ट्रीय पक्षाचे पुढारी तत्कालीन सुधारक पक्षावर कीय व सामाजिक दृष्टीनें कठोर टीका करीत असत, येवढ्यावरून ते सर्व माजिक विषयांत केवळ प्रतिगामी वृत्तीचेच होते असा सोपा निष्कर्ष काढणें क्तिक नाहीं, एवढेंच आम्हांस येथें दर्शवावयाचें आहे. ब्रिटिशांच्या संस्कृतीला भूत गेलेले आणि त्यांच्या सत्तेच्या छायेंत सुखानें आराम करून फुरसती- ा वेळीं समाजसुधारणा आणि मवाळ राजकारण यांची चर्चा करणारे रक व त्यांचें प्रागतिक राजकारण यांच्यावर कठोर टीका करणारे क्रान्ति- रक राष्ट्रीय पुढारी हे राजकीयदृष्टया पुरोगामी आणि त्यांचे प्रतिस्पर्धी म्हण- रे सुधारक हे सामाजिकदृष्टया पुरोगामी अशीं समीकरणें मांडणें करणी दिसतें तितकें साधार व सयुक्तिक नाहीं हें आपण ओळखिलें पाहिजे. णि मगच भारतीय राष्ट्रवाद हा पुरोगामी आहे कीं प्रतिगामी आहे याची त्विक चर्चा केली पाहिजे. लोकमान्य टिळक आणि काळकर्ते परांजपे यांनीं

सामाजिक सुधारणेला विरोध दर्शविण्यांत मुळींच प्रतिगामी वृत्ति दाखविल नाहीं किंवा त्यांनीं त्या टीकेच्या भरांत लिहिलेलें सर्वच लिखाण समर्थनी आहे असा मात्र आमच्या वरील लिखाणाचा अर्थ कोणीहि करूं नये. हा प्र दिसतो तितका सोपा व सरळ नाहीं, व त्याचें शास्त्रीय उत्तर अधिक खो दृष्टीनें व विवेचक पद्धतीनें दिलें पाहिजे एवढेंच आमचें म्हणणें आहे.

### वाङ्मयगुण

वक्तृत्व आणि लेखनकला या दोनही बाबतींत परांजपे यांचे वाङ्मयगु आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासांत असामान्य आहेत. त्यांच्यासारखा व मराठींत अद्यापि झालेला नाहीं आणि त्यांच्या निबंधांतील वाङ्मयगुण अद्यापि कोणाच्या लिखाणांत तितक्या उत्कटतेनें आढळणार नाहींत अ आम्हांस वाटतें. वक्रोक्ति हा त्यांच्या लेखणीचा व वाणीचा विशेष गुण म्हण सर्वप्रसिद्धच आहे. या गुणामुळें त्यांची एक विशिष्ट भाषासरणी प्रतिष्ठा पाव असून अनेकांच्या मतानें वक्रोक्ति हाच गुण परांजपे यांच्या लेखनाचें वैशि आहे. तथापि हें मत सर्वस्वीं खरें म्हणतां येणार नाहीं. उपहास आणि उपरे हा कार्यासाठीं वक्रोक्तीचा उपयोग करणें यांत या लेखकाचा हात धरणारा लेख अद्यापि मराठी वाङ्मयांत झाला नाहीं हें खरें असलें तरी, त्यांच्या लेखनशैली तोच एक विशेष गुण आहे असें म्हणतां येणार नाहीं. मनुष्याची लेखनशै त्याच्या अंगच्या रसिकता, बुद्धिमत्ता, विद्वत्ता आणि त्याचें विशिष्ट व्यक्ति मत्त्व यांची निदर्शक असते असें म्हणतात तें खोटें नाहीं. परांजपे यांच्या अं रसिकता, विद्वत्ता आणि अलंकारप्रियता हे सर्वच गुण असल्याचें त्यां लेखनावरून स्पष्ट दिसून येतें. पण त्यांच्या लेखनाची असामान्य छ तत्कालीन महाराष्ट्रीय युवकांच्या मनावर पडण्याचें मुख्य कारण याहून अधिक खोल आहे असें आम्हांस वाटतें. परांजपे यांचा आत्मा स्वातंत्र्या कवीचा आत्मा होता. आत्म्याचे जर कांहीं अंगभूत गुण असतील तर ते म्ह आपलें शुद्ध, बुद्ध व मुक्त स्वरूप प्राप्त करून घेण्यासाठीं त्याची तळमळ अ धडपड किंवा पराकाष्ठेची कळकळ हेच होत. पावित्र्य, ज्ञान आणि स्वातंत्र्य यां प्राप्तीसाठीं जो आत्मा अधिक उत्कटतेनें तळमळत असेल त्याची ती तळ अथवा कळकळ त्याच्या लेखनांत एक प्रकारची विशिष्ट असामान्य तेजस्वि

त्वा ओजास्विता निर्माण करीत असते. हा ओजोगुण ज्या लेखनांत विशेषत्वानें कट झालेला असतो तें लेखन जर अनेक रसांनीं आणि अलंकारांनीं विभूषित केलें असेल तर ती भाषाशैली अत्यंत प्रभावी अशी ठरत असते. विष्णुशास्त्री पळूणकर यांच्या भाषाशैलीचें कारण सांगतांना लोकमान्य टिळक यांनीं के टिकाणीं म्हटलें आहे, " ज्याला आपल्या देशबांधवांस स्वभाषेच्या द्वारें ळकळीनें उपदेश करण्याची आवश्यकता वाटत नाहीं त्याच्या हातून स्वभाषेची वा तरी काय होणार ! आणि जोरदार भाषा तरी कशी निघणार ! कोणत्याही षेतील मोठमोठे प्रसिद्ध ग्रंथकार घ्या. त्यांचीं अंतःकरणें त्यांचें हृद्गत कांस कळविण्यास अत्यंत उत्सुक असतात, असेंच आढळून येतें. आपले चार खरे आणि देशहिताचे आहेत ही स्वतःची खात्री, आणि ते विचार प्रसिद्ध ण्याकरितांच ईश्वरानें आपणांस जन्मास घातलें आहे, असा आपला दृढ नज असल्याखेरीज कोणाच्याही हातून स्वभाषेची खरी सेवा होणें शक्य हीं." विष्णुशास्त्री यांच्यासंबंधीं टिळकांनीं काढलेले हे उद्गार परांजपे नाही बरोबर लागू पडतात. चिपळूणकर, आगरकर व टिळक यांच्या भाषा-र्णीत जें एक विशेष ओज किंवा जिवंतपणा दिसून येतो त्याचें हेंच कारण हे. परांजपे यांच्या अंगीं रसिकता आणि अलंकारप्रियता हे गुण या सर्वांपेक्षां धिक, यामुळें त्यांची भाषा इतरांहून अधिक डौलदार आणि चित्तवेधक झालेली हि. काळांतील निबंधांतील त्यांची ओजस्विता त्यांच्या उत्तरकालीन लेखनांत ढळत नाहीं, अशी जी एक समजूत अथवा तक्रार त्यांच्या वाङ्मयाच्या चकांत आढळून येते त्याचेंहि कारण समजण्यास वरील उपपादनाचा पयोग होईल असें आम्हांस वाटतें. 'काळ' पत्राचें संपादन करीत असतां पल्या लेखनांतून प्रकट होणारे अथवा ध्वनित होणारे जे विचार त्यांच्यावर ा लेखकाची जी दृढनिष्ठा होती तितकी त्यांच्या उत्तरकालीन लेखनांत कट होणाऱ्या विचारांवर असल्याचा अनुभव वाचकांस लाभत नाहीं हेंच तक्रारीचें खरें अथवा मूळ कारण आहे. महात्मा गांधींचें राजकीय नेतृत्व रतम्य दृष्टीनें स्वीकारणें आज राष्ट्राला आवश्यक आहे, याबद्दल त्यांच्या द्धीचा निश्चय झालेला होता. गांधीजींच्या अनत्याचारी असहकारास व त्याग्रहास पाठिंबा देण्यासाठीं ते जे लेख लिहीत असत ते या बौद्धिक श्चयानें प्रेरित होऊनच लिहीत असत. तथापि गांधीजींच्या अहिंसक क्रांतीचें

खरें मर्म आकलन करून त्यांत रंगून जावें असा त्यांचा स्वभावगुण अथवा प्रकृतिधर्म नव्हता. गांधीजींच्या अनत्याचारी असहकाराच्या मार्गानें जातां जातां अखेरीस अनत्याचारित्वाचीं बंधनें राष्ट्राला अखेरीस तोडावीं लागतील अशी त्यांची भावना होती; पण त्याचबरोबर हा काळ त्यांना पूर्वायुष्यांत वाटत होता त्याहून बराच पुढें गेलेला आहे याची जाणीव त्यांना आयुष्याच्या उत्तरकालांत अधिक तीव्रतेनें झालेली होती. यामुळें त्यांच्या पूर्वायुष्यांतील लेखनातील ओज उत्तरकालीन लेखनांत मंद झाल्याचा अनुभव वाचकांस येतो तो खोटा नाहीं. तथापि विद्वत्ता, रसिकता आणि अलंकारप्रियता हे त्यांच्या लेखनाचे गुण अखेरपर्यंत कायम होते.

त्यांची भाषाशैली आज थोडी जुनी झालेली दिसते. कांहीं ठिकाणीं त्यांच्या लेखनाचा विस्तार कंटाळवाणाही भासतो. तथापि त्यांनीं कितीही विस्तारपूर्वक लिहिलेलें असलें तरी त्यांत निरर्थकता आढळणार नाहीं; अथवा त्याच त्याच गोष्टींचा नीरस पुनरुच्चारही आढळणार नाहीं. एकच सिद्धान्त सांगतांना ते अनेक दृष्टान्त अथवा दाखले देतील, पण ते दाखले अथवा दृष्टान्त एकमेकांहून भिन्न व वैशिष्ट्यपूर्ण असतील. एखादें वर्णन करितांना ते तपशिलाची कलाकुसर अधिक करतील, पण ती कलाकुसर चित्तवेधक असेल. कितीही विस्तारपूर्वक लिहिलें तरी त्यांतून प्रकट होणाऱ्या स्पष्टार्थापेक्षां त्यांतून निघणारा ध्वन्यर्थ त्याहून अधिक असल्यावांचून सहसा राहणार नाहीं. तात्पर्य, आपल्या कलाकुसरीनें आपलें लेखन सजवितांना त्यांतील कोणत्याही अंशांतील रम्यत्व कमी न होऊं देण्याबद्दल शक्य ती दक्षता त्यांनीं घेतलेली आपणांस आढळेल. यामुळें त्यांचें लेखन अभ्यास करण्यास योग्य असें झालेलें आहे. त्यांचें जसें अलंकाराकडे व बाह्यसजावटीकडे लक्ष होतें तसेंच भाषेच्या शुद्धीकडे व शब्दसौष्ठवाकडेही असल्याचें आपणांस आढळून येईल. एवढें खरें कीं, अगदीं सामान्य परिचयांतील नवे उपमादृष्टान्त देऊन आपला युक्तिवाद सजविण्याचा प्रयत्न त्यांनीं केलेला फारसा दिसणार नाहीं. ही पद्धति अलीकडील मराठी गद्यांत अधिक वाढूं लागलेली आहे. त्यामुळें परांजपे यांच्या भाषेंत एक प्रकारचा जुनेपणा आजच्या वाचकांस आढळतो. पण त्याचबरोबर हेंही लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, आज सामान्य परिचयांतील नवे उपमादृष्टान्त देऊन आपले युक्तिवाद सजविणारे जे प्रतिष्ठित लेखक म्हणून

के जातात त्यांच्या त्या उपमादृष्टान्तांपैकीं बरेचसे गैरलागू अथवा रसहानि
गारेहि असतात. या विषयासंबंधीं येथें याहून अधिक विस्तार करण्याची
ज नाहीं.

## ार वयांतील कर्तबगारी

काळकर्ते परांजपे यांची तुलना दादाभाई, टिळक किंवा गांधी यांच्या-
ख्या अद्वितीय, असामान्य राष्ट्रनिर्मात्या विभूतींशीं होऊं शकत नाहीं हें
हीं प्रथमच स्पष्ट केलें आहे. महाराष्ट्रांतील राष्ट्रीय पक्षाचे एकमेव नेते
कमान्य टिळक हेच होते. आणि ते मंडालेहून सुटून आल्यानंतर अखिल
तीय राष्ट्रीय नेत्यांतही त्यांचें असामान्य अग्रणीत्व निर्विवाद प्रस्थापित
े. देशकालपरिस्थित्यनुसार ते आपल्या अनुयायांतील क्रांतिकारक वृत्तीच्या
नेमस्त वृत्तीच्या उपनेत्यांना कमीअधिक जवळ करून आपलें व्यवहार्य
कारण चालवीत असत. त्यांच्या अनुयायांत पराजपे, खाडिलकर, देशपांडे
यासारखे क्रांतिकारक वृत्तीचे लोक होते, तसेच केळकर, करंदीकर यांच्या-
खे कांहीं नेमस्त वृत्तीचेहि लोक होते. टिळकांच्या राजकारणांतील हीं
र उपांगें किंवा हे दोन उपपक्ष गणतां येतील. लोकमान्य टिळक हयात होते
र्यंत या दोनही उपपक्षांना एकत्र ठेवून भारतीय क्रांतीची पूर्वतयारी
ण्याचें आपलें नियोजित कार्य ते साधीत असत. त्यांच्या निधनानंतर महात्मा
ी यांच्याकडे भारतीय क्रांतीची पूर्तता करण्याचें अथवा तिचा पुढील
ास व जोपासना करण्याचें कार्य आलें. या वेळीं महाराष्ट्रांतील राष्ट्रीय पक्षा-
महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालीं चाललेल्या राष्ट्रसभेच्या राजकारणासंबंधीं
णती वृत्ति स्वीकारावी हा अत्यंत महत्त्वाचा व जबाबदारीचा प्रश्न येऊन
हेला. लोकमान्य टिळकांनीं निर्माण करून जोपासना केलेल्या राष्ट्रीय
ाचें भवितव्य ठरविण्याचा हा प्रसंग होता. या वेळीं योग्य मार्गदर्शन
ण्यास स्वतः लोकमान्य हयात नव्हते. राष्ट्रसभा व राष्ट्रांतील जनता महात्मा
ींच्या असामान्य नेतृत्वगुणामुळें त्यांच्यामागें खेचली गेली. महात्मा
ींचा अहिंसावाद ही एक राजकारणांतील नवीच शक्ति होती. मानवतेच्या
ी विकासाचें तें एक सूचक पूर्वचिन्ह आहे. भारतीय संस्कृतीच्या समुद्र-
नांतून निघालेलें सत्याग्रह हें एक अमृत आहे. श्रीकृष्ण आणि गौतमबुद्ध

या दोन अवतारी गणलेल्या विभूतींच्या तत्त्वज्ञानांचा समन्वय झालेला त्यांत दिसतो. महात्मा गांधी हे बुद्ध व ख्रिस्त यांच्याप्रमाणें अव्यभिचारी भक्तीनें सत्याची व अहिंसेची उपासना करीत असतात. पण त्याचबरोबर ते श्रीकृष्णाप्रमाणें राजकीय कर्मयोगी आहेत. त्रेतायुगांतील कौरव-पांडवांच्या युद्धाप्रमाणें आधुनिक भारतांत चालू असलेल्या भारतीय स्वातंत्र्य-युद्धाचें नेतृत्व त्यांनी आपणाकडे घेतलेलें आहे, इतकेंच नव्हे तर, आपल्या अहिंसानिष्ठेस अनुरूप अशा तऱ्हेचें एक सत्याग्रहरूपी अपूर्व क्रान्तिशास्त्र ते निर्माण करीत आहेत. आज ते केवळ भारताचे नेते उरलेले नसून अखिल मानवजातीचें मार्गदर्शन करण्याची हिंमत त्यांच्या अंगीं असून त्यांच्या विभूतिमत्त्वाला जगांतील तत्त्वज्ञानी व विचारी पुरुषांनीं मान्यता दिलेली आहे. अशा असामान्य विभूतीच्या राजकीय नेतृत्वाखालीं राष्ट्र खेचलें गेलें असतां त्यांत पंचवीस वर्षांपूर्वी उदय पावलेल्या राष्ट्रीय पक्षाचें भवितव्य आणि त्याचे महात्मा गांधींच्या व्यावहारिक राजकारणाशीं संबंध ठरविणें व तदनुसार महाराष्ट्राला मार्गदर्शन करणें ही गोष्ट सोपी नव्हती. तसें करूं इच्छिणाऱ्याच्या अंगीं जीवनविषयक तत्त्वज्ञान आणि राज्यशास्त्राचें मूलग्राही आलकन हे गुण असून शिवाय निरहंकार वृत्ति आणि पूर्वग्रहशून्यता यांचीहि तितकीच आवश्यकता होती. महात्मा गांधींचें असामान्य व अपूर्व सत्याग्रह-तत्त्वज्ञान एकदम सामान्य जनतेला आचरतां येणार नाहीं. हजारों वर्षे आपले राजकीय लढे हिंसेनें सोडवून घेण्याची मानवाला लागलेली सवय एकाएकीं नष्ट होणार नाहीं, आणि जगांतील महायुद्धें आणि सशस्त्र क्रांत्या बंद करण्याचा प्रयोग त्वरित सफल होणार नाहीं हें कळण्यास फारशा बुद्धिमत्तेची किंवा द्रष्टृत्वाची गरज नव्हती. कोणताही देहधारी मनुष्य संपूर्णतः सत्यमय व अहिंसामय होऊं शकत नाहीं ही गोष्ट सत्याचें व अहिंसेचें आजन्म व्रत घेतलेल्या आणि त्यासाठीं आपल्या सर्वस्वाचा होम करण्यांत ज्यांनीं आपल्या आयुष्यांतील उमेदीचीं सर्व वर्षे घालवलीं त्यांना—त्या महात्म्यांना जितकी माहीत आहे तितकी ह्या गोष्टीची अनुभवसिद्ध जाणीव जगांतील कोणत्याही व्यक्तीला असणें शक्य नाहीं. असें असूनही सत्य आणि अहिंसा हाच मानवाचा खरा व्यक्तिधर्म व समष्टिधर्म आहे असें महात्मा गांधी आग्रहपूर्वक प्रतिपादीत असतात; इतकेंच नव्हे, तर आपलें सर्व जीवित ह्या परमधर्माच्या कार्याची पूर्तता करण्यास

ाध्यभूत केले ही गोष्ट प्रायः सर्वमान्य झाली आहे. काळकर्ते परांजपे यांच्या ीं तत्त्वज्ञान आणि मूलग्राही राजकीय बुद्धि ही जी सामुग्री होती तिच्या ह्याच्यानें त्यांनीं व्यावहारिक राजकारणासंबंधीं दिलेला हा निर्णय इतिहासानें ा ठरविला आणि या निर्णयाच्या प्रचारासाठीं त्यांनीं आपल्या उत्तर युष्यांत जी लेखणी व वाणी शिणविली तिचें यथायोग्य साफल्य केलें. काळकर्ते जपे यांची उत्तर आयुष्यांतील कर्तबगारी ती हीच होय. त्यांच्या ह्या बगारीमुळें टिळकांच्या राजकारणाचा वारसा पुढील तरुणांना मिळाला णि टिळकांचें नांव त्यामुळें चिरंजीव झालें.

तारीख १०-९-१९४६ } शंकर दत्तात्रेय जावडेकर

य. गो. जोशी-प्रकाशन, पुणें

# वाद-विवेचन-माला

| | | |
|---|---|---|
| १ सुलभ समाजवाद | पां. वा. गाडगीळ | १-०-० |
| २ फॅसिझम | ,, | १-०-० |
| ३ साम्राज्यशाही | ना. ग. गोरे | १-०-० |
| ४ अराज्यवाद | पां. वा. गाडगीळ | १-०-० |
| ५ लोकशाही | आचार्य जावडेकर | १-८-० |
| ६ मार्क्सचा भौतिकवाद | पां. वा. गाडगीळ | १-०-० |
| ७ विश्व-कुटुंबवाद | ना. ग. गोरे | १-८-० |
| ८ ईश्वरवाद | आचार्य दांडेकर | १-८-० |
| ९ गांधीवाद | आचार्य जावडेकर | १-८-० |
| १० राष्ट्रवाद | कोल्हटकर | २-०-० |
| ११ जडवाद | तर्कतीर्थ जोशी | १-४-० |
| १२ हिंदुत्ववाद | ज. स. करंदीकर | २-८-० |
| १३ मार्क्सचा कॅपिटल सारग्रंथ | पां. वा. गाडगीळ | १०-०-० |

या तेरा पुस्तकांत वाद-विवेचन-माला पूर्ण होते.

या आवृत्तीची सोल एजन्सी महाराष्ट्र ग्रंथभांडार, गिरगांव, मुंबई, यांजकडे दिली आहे. तरी ग्राहकांनीं व पुस्तक-विक्रेत्यांनीं पुस्तकें त्यांजकडून परस्पर मागवावींत.

# श्वराची लीला अगाध आहे ! : : : १

काळ : अग्रलेख ता. १२–४–१९०१

O वर्षारंभींची प्रार्थना. "निराश होण्याचें कारण नाहीं" हा अशाच आशयाचा अग्रलेख ता. २८–६–१९०१ च्या अंकांत आहे.

ह्याळे दोन्ही पक्षी एका वृक्षावरी । आला दुराचारी पारधी तो ॥
वृक्षाचिया माथां सोडिला ससाणा । धनुष्यासी बाणा लावियेलें ॥
तयेकाळीं तुज पक्षी आठविती । धांवेगा श्रीपती मायबापा ॥
उडोनियां जातां ससाणा मारील । बैसतां विंधील पारधी तो ॥
ऐकोनियां धावा तया पक्षियांचा । धरिला सर्पाचा वेष वेगीं ॥
डंखोनि पारधी भूमिसी पाडिला । बाण तो लागला ससाण्यासी ॥

एक मृगी दोन्ही पाडसांसहित । आनंदें चरत होती वनीं ॥
अवचितां तेथें पारधी पावला । घेऊनियां आला श्वान दोन्ही ॥
एकीकडे त्यानें चिरिल्या वाघुरा । ठेविलें श्वानपुत्रां एकीकडे ॥
एकीकडे तेणें वोणवा लाविला । आपण राहिला एकीकडे ॥
चहोंकडूनियां मृगें वेढियलीं । स्मरों ते लागलीं नाम तुझें ॥
ामा कृष्णा हरी गोविंदा केशवा । देवाचिया देवा पावें आतां ॥
ोण रक्षी आतां ऐशिये संकटीं । बापा जगजेठी तुजविण ॥
ाइकोनी तुम्ही तयांचीं वचनें । कृपा अंतःकरणं कळवळिलां ॥
ाज्ञा तयेवेळीं केली पर्जन्यासी । वेगीं पावकासी विझवावें ॥

ससे एक तेथें उठवूनी पळविलें। तयापाठीं गेले श्वान दोन्ही ॥
मृगे चमकोनी सत्वर चाललीं। गोविंदें रक्षिलीं म्हणोनियां ॥

—तुक

वैशाखाच्या महिन्यांत दोन प्रहरच्या वेळीं एखाद्या राजाच्या स
सूर्याच्या उन्हाचा कडक अमल सर्व भूमंडळावर बसलेला असतो.
जुलमी राजाच्या जुलमाप्रमाणें सूर्याच्या प्रखर उन्हानें सर्व मनुष्यांच्या
काही काही होत असते. लढाईत घायाळ झालेल्या शिपायांच्याप्रमा
लोकांच्या अंगांतून रक्ताप्रमाणें घामाच्या धारा वाहत असतात. डोळ्या
वाटण्यासाठीं किंवा तृषा शांत करण्यासाठीं एक थेंबभर पाणी पाहिजे
तर तेंही कंगाल मुलखांतील द्रव्याप्रमाणें मिळण्याची चोहोंकडे मारामार
असते. निष्ठुर मनुष्यांच्या अंतःकरणांप्रमाणें सर्व जलाशय कोरडे ठाक
असतात. बेबंदशाहींतील वयोवृद्ध माणसांप्रमाणें झाडांचीं पिकलेलीं पानें
गळून पडलेलीं असतात, व अराजकावस्थेमधील दयेप्रमाणें छायेचें नांव
कोठें उरलेलें नसतें. एखाद्या निर्घृण राजाप्रमाणें सूर्य आपल्या हजारों
पृथ्वीवरील लोकांचें जीवन आकर्षण करून घेण्याला उद्युक्त झालेला
लोभाविष्ट लोकांच्या धनतृष्णेप्रमाणें सूर्याच्या उष्णतेनें चोहोंकडे कहर
सोडलेला असतो. अरण्यांतून स्वाभाविक आणि कृत्रिम वणवे पेटून
दुष्काळांतील गरीब माणसांप्रमाणें शेंकडों मुकीं जनावरें प्राणाला मुकत अस
मलत्याच नादाला लावून दिलेल्या लोकांप्रमाणें हरणें मृगजळाच्या पाठी
धांवत सुटलेलीं असतात. जुलमी अमलांतील अन्यायाप्रमाणें अंगाला
विणारा कढत वारा चोहोंकडे सुटलेला असतो. हलक्या लोकांप्रमाणें
जोड्याशींच असण्याची योग्यता, असले रजःकणसुद्धां आपलें स्थान सोडून
येऊन डोळ्यांस त्रास देऊं लागतात. चोहोंकडे उष्णतेचा पूर्ण अमल बसत
खालीं तळ आणि वर पृष्ठभाग अशा रीतीचे पाण्यानें भरलेले जे अनेक महास
पृथ्वीच्या पाठीवर आहेत त्यांच्याहून विपरीत, म्हणजे वर तळ आणि
पृष्ठभाग अशा रीतीनें उपडा केलेला हा आकाशांतील उष्णतेचा महासागर
भूमंडळावर ओतून, त्यांत आपणां सर्वांना गाडून टाकण्याचाच प्रयत्न हा
करीत आहे कीं काय, असा पाहणाराला भास होत असतो. अशा रि

गांजलेल्या लोकांप्रमाणें चातक पक्षी वर मान करून आपल्या संतापशमनाची मार्गप्रतीक्षा करीत बसलेले असतात. परंतु पावसाचें कांहीं एक चिन्ह नसतें, दिशा रखरखीत झालेल्या असतात, व सूर्यमंडलाकडे पाहवतसुद्धां नाहीं, अशी स्थिति झालेली असते. पावसाबद्दल सर्व लोक निराश झालेले असतात व त्या निराशेमुळें हतवीर्य होऊन दुःखाचे सुस्कारे टाकीत व "आतां पाऊस येत नाहीं" असे दुःखाचे उद्गार काढीत दीनवदन होऊन बसलेले असतात.

परंतु इतक्यांत आकाशांत एक लहानसा ढग दिसूं लागतो. त्याच्याच शेजारीं दुसरा एक ढग उत्पन्न होतो. इकडून एक ढग येतो, तिकडून दुसरा येतो. अशा रीतीनें जमतां जमतां अनेक ढग एकत्र होतात. रखरखीत आकाशांत जो एक ढगाचा लहानसा टिपका दिसत होता, त्याचेंच थोडक्या वेळांत मोठें थोरलें मेघमंडळ बनतें. वारा सुटूं लागतो. विजा चमकूं लागतात. आणि मेघगर्जना होऊं लागतात. थोड्या वेळापूर्वी ज्या सूर्याकडे डोळ्याचें पातें उचलून पाहण्याचीही कोणाची छाती होत नव्हती, तोच सूर्य झांकला जातो व कोठें दृष्टीसही पडेनासा होतो. आणि एकाएकीं गारांचा वर्षाव होऊं लागतो आणि मुसळासारखी पावसाची धार सुरू होते. जिकडे तिकडे पाऊस पडतो, आणि सर्व जिवांना शांतता मिळते.

वाचकहो, वरतीं वर्णन केलेला हा सृष्टिचमत्कार तुम्हीं अनेक वेळां पाहिला असेल, पण त्यांत जें एक मोठें थोरलें तत्त्व आहे, तिकडे तुमचें लक्ष कधीं गेलें आहे काय ! हा सृष्टिचमत्कार आपल्याला कांहींच शिकवीत नाहीं काय ! कोठें कांहीं नसतांना एकाएकीं हत्तीच्या सोंडेसारखा जो पाऊस येतो, तो आपल्याला कांहींच शिकविण्याला येत नाहीं काय ! आणि त्याचें जें पाणी वाहून जातें तें आपल्याला कांहीं शिकविल्यावांचून वाहून जातें काय ! आकाशापासून पृथ्वीपर्यंतचा एवढा थोरला लांबचा प्रवास करून जो पर्जन्य आकाशांतून आपल्याकडे येतो, तो आपल्याला आकाशांतील कांहींच तत्त्व सांगत नाहीं काय ! असें नाहीं. तो सांगतो. परंतु तो जें सांगतो, तें लक्ष लावून जे ऐकतात, त्यांना मात्र तें ऐकूं येतें, व जे आपले डोळे काळजीपूर्वक उघडे ठेवितात, त्यांना मात्र तें दिसतें. ज्यांच्या मनाला सूक्ष्म विचार करण्याची शक्ति आहे, त्यांच्या मनावर ह्या सृष्टिचमत्कारानें शिकविलेल्या तत्त्वाचा पूर्ण ठसा उठतो. हा अकस्मात् येणारा पर्जन्य आपल्याला हें तत्त्व

शिकवितो कीं, ईश्वराची लीला अगाध आहे. तो आपल्या मनांत हें बिंबवितो कीं ईश्वराला कांहीं अशक्य नाहीं. मनुष्याला कांहीं गोष्टी अशक्य वाटोत परंतु परमेश्वराच्या ठिकाणीं अशक्य अशी गोष्टच नाहीं. चोहोंकडे इतका संताप आणि प्रळय चालला असतां एका घटकेंत किंवा अर्ध्या घटकेंत पाऊस पडेल असें कोणाला वाटत असतें! विजा कडकडतील, मेघ गडगडतील, आणि पर्जन्यधारा कोसळतील, असें कोणाला वाटत असतें! अशा गोष्टी होतील असें मनुष्याच्या स्वप्नीं तरी आलेलें असतें काय! त्याला सर्व अशक्यच वाटत असतें. पण मनुष्याला जें अशक्य वाटतें, तें परमेश्वर एका क्षणांत शक्य करून दाखवितो. अनंत शक्तीच्या परमेश्वराला अशक्य तें काय असणार! कोत्या दृष्टीच्या मनुष्याला जें तें अशक्य वाटतें, परंतु सर्वशक्तिमान् परमेश्वराला अशक्य हा शब्दच माहीत नाहीं. ईश्वर सर्वज्ञ असूनही त्याला जर कांहीं माहीत नसलें, तर तो अशक्य हा शब्द मात्र होय. सारांश, ईश्वराची लीला अगाध आहे, ह्यांत कांहीं संशय नाहीं.

आतां हें तत्त्व जर आपल्या मनावर चांगलें बिंबलेलें असेल, तर आपल्याला निराश होण्याचें कधींही कारण नाहीं. आपल्या देशाची हल्लींची स्थिति फार वाईट झालेली आहे. तिच्यांतून निघून आपण उन्नतावस्थेला येऊं, अशी आशा बाळगण्याला आज तरी निदान कोणाला कांहीं जागा दिसत नाहीं. आपला उत्कर्ष होण्याचीं आज कोठेंच कांहीं चिन्हें दिसत नाहींत. रहाटगाडग्यावरील दुसऱ्या बाजूच्या लोट्यांप्रमाणें आमच्यांतील पाणी नाहींसें होऊन आम्ही हळूहळू अधोगतीला जात चाललों आहों. आमच्या अभ्युदयासाठीं इंग्रज लोक जिवापाड मेहनत करीत आहेत. तरी पण आमची स्थिति सुधारेल किंवा नाहीं, ह्याच्याबद्दल सर्वांना जबरदस्त शंका आहे. असा प्रकार असल्यामुळें आपल्या मनांत निराशा उत्पन्न होणें अगदीं साहजिक आहे. सध्यां जर हिंदुस्थानांतील बहुतेक लोकांच्या मानसिक स्थितीचें पृथक्करण केलें, तर बहुधा सर्व ठिकाणीं नैराश्याचाच अमल गाजत असलेला आपल्याला दिसून येईल. जेथें तेथें हातपाय मोडलेले, धैर्य खचलेलें व कंबर बसलेली, असाच प्रकार आढळून येतो. आपला एकही उद्योग फलद्रूप होत नाहीं, आपल्या संस्था निर्जीव होत चाललेल्या आहेत, आपले पुढारी तोंडपुजेपणाच्या अन्नावर आपल्या मोठेपणाचा उदरनिर्वाह करीत आहेत, वगैरे स्थिति पाहून आपल्या उन्नतीच्या सर्व आशा

आपल्या मनाला सोडून जातात. अशा स्थितींत आपलें मन शून्य आणि उदास होणें हें मानवी स्वभावाला अनुसरूनच आहे.

ह्या सर्व गोष्टी खऱ्या आहेत. परंतु त्यामुळें आपण आपल्या अभ्युदयाच्या बाबतींत हतवीर्य मात्र होतां कामा नये. आपल्या भावी उत्कर्षाचीं प्रत्यासन्न चिन्हें जरी आपल्याला आज स्पष्ट दिसत नाहींत, तरी त्यामुळें निराश होण्याचें कारण नाहीं. आपण सर्वांनीं या बाबतींत आपलें जें कर्तव्यकर्म आहे, तें सदोदित करीत राहावें, म्हणजे आपली इच्छा परमेश्वर शेवटाला नेल्यावांचून कधींही राहणार नाहीं. आपली आशा परिपूर्ण होण्याची मानवी डोळ्यांला कांहीं चिन्हें दिसत नाहींत, म्हणून ईश्वराला तो आपला इच्छित हेतु सफल करतां यावयाचा नाहीं, असें मानण्याचें कांहीं कारण नाहीं. मनुष्याच्या तर्काची मर्यादा फार आकुंचित आहे. परंतु ईश्वराची कर्तृत्वशक्ति अनंत आहे. मनुष्याचा तर्क आंधळा आहे, त्याला फारच थोडें दिसतें; आणि यदाकदाचित् कांहीं दिसलें, तरी जें अगदीं थोड्या अंतरावर असेल तेवढें मात्र दिसतें. परंतु ईश्वराचें सामर्थ्य अपार आहे. मनुष्याच्या कल्पनेला त्याचें पूर्णत्वानें अवगाहन कधींही करतां येत नाहीं. मनुष्याच्या क्षुद्र, अदूरगामी, आणि अंधप्राय तर्काला परमेश्वराच्या अघटित शक्तींपैकीं काय दिसत असतें, कीं ज्यावरच सर्वथैव विश्वास ठेवून आपण आपलें मन निराशेच्या स्वाधीन करण्याला प्रवृत्त व्हावें! आपल्या तर्काला काय बरें दिसतें आहे! हिरण्यकशिपु आपल्या मुलाला साधुसंतांचा आणि वैष्णवभक्तांचा उच्छेद करण्याला सांगत होता, आणि तें त्यानें ऐकिलें नाहीं, तेव्हां पर्वताच्या कड्यावरून तो दैत्य आपल्या मुलाला ढकलून देत होता, समुद्रांत बुडवीत होता, हत्तीच्या पायाखालीं चिरडवीत होता. त्याच्या आईकडून त्याला विष पाजवून मृत्यूच्या घरीं पाठवीत होता. त्या वेळीं हिरण्यकशिपूचा नाश करण्यासाठीं परमेश्वर नारसिंहाचें स्वरूप धारण करण्याची तयारी करण्यांत गुंतला होता, हें मानवी तर्काला कोठें दिसलें होतें! "तुझा देव कोठें आहे तो दाखीव, नाहीं तर या क्षणीं मी तुझा वध करतों" असें हिरण्यकशिपूनें प्रल्हादाला म्हटलें, त्या वेळीं प्रल्हाद आपल्या बापाच्या क्रोधाला बळी पडणार, असेंच सर्वांना वाटलें होतें. आपल्या भक्ताचें संरक्षण करण्यासाठीं परमेश्वर खांबामध्यें येऊन बसलेला असेल, असें त्या वेळीं कोणाला तरी वाटलें असेल काय! खांबांतून

नारसिंहाची मूर्ति निघेल, ही गोष्ट कोणाला तरी त्याच्या पूर्वी शक्य वाटली असेल काय? परंतु ती गोष्ट माणसांना शक्य वाटली असो किंवा नसो, परमेश्वरानें ती गोष्ट शक्य करून दाखविली. त्याचप्रमाणें द्यूतानें द्रौपदी ही कौरवांची दासी म्हणून ठरली, तेव्हां तिला सभेमध्यें आणून तिच्या अंगावरील वस्त्राचें हरण करण्याविषयीं दुर्योधनानें दुःशासनाला आज्ञा केली, त्या वेळीं आतां द्रौपदी भर सभेमध्यें विवस्त्र केली जाणार, असेंच सर्वांना वाटत होतें. मानवी तर्काची धांव याच्या पलीकडे गेली नाहीं. एका वस्त्राच्या आंत दुसरें वस्त्र अशा रीतीनें सहस्रावधि वस्त्रांचा पुरवठा भगवान् श्रीकृष्ण आपल्या बहिणीसाठीं करील असें, ही गोष्ट घडून येण्याच्या पूर्वी, कोणाच्या स्वप्नांत तरी आलें होतें काय? परमेश्वर अशा रीतीनें द्रौपदीची लाज राखील आणि तिला शत्रूपुढें उघडी पडूं देणार नाहीं, ही गोष्ट मनुष्याच्या तर्काला अगम्य होती. परंतु परमेश्वरानें ती प्रत्यक्ष करून दाखविली. रावण इतका प्रबल झाला होता कीं, प्रत्यक्ष सूर्य आणि चंद्र हे त्याच्या घरीं मशालजींचें काम करीत होते. आणि वायु हातांत केरसुणी घेऊन त्याच्या घरांतील केर काढीत होता. अशा रीतीनें ज्यानें आपला अमल बसविला होता, त्याचें तें जुलमाचें राज्य लयाला जाईल, असें कोणाला तरी वाटलें होतें काय? जो रावण सर्व देवांनाही अजिंक्य झाला होता, त्याला रानांतील माकडें आणि यःकश्चित् माणसें जिंकतील, असें कोणाला तरी वाटलें होतें काय? मनुष्याच्या अंधुक दृष्टीच्या तर्काला असेंच वाटत होतें कीं, रावणाचा हा देवादिकांवरील जुलूम जगाच्या शेवटापर्यंत असाच चालणार, व सर्व पृथ्वी त्याच्या त्रासानें गाईसारखी दीन होऊन जगाच्या शेवटापर्यंत तशाच दीन स्थितींत राहणार. पण परमेश्वराची इच्छा तशी नव्हती. मनुष्यांना ज्या गोष्टी असंभवनीय वाटत होत्या, त्या परमेश्वरानें आपल्या अलौकिक लीलेनें सिद्ध करून दाखविल्या. त्यानें रामाकडून रावणाला मारविलें आणि सर्व पृथ्वीचा भार हरण केला. येशु ख्रिस्तानें एका रक्तपितीच्या माणसाचा रोग बरा करण्याच्या पूर्वी किंवा दुसऱ्या दोघां आंधळ्यांची दृष्टि परत आणून देण्याच्या पूर्वी ह्या गोष्टी शक्य आहेत असें कोणाला वाटलें होतें? जीझस ख्राइस्टला ज्यू लोकांनीं दिलेल्या शिक्षेप्रमाणें त्याचा देहांत झाल्यानंतर त्याचें मृत शरीर थडग्यांत घालून ठेविलें होतें, व त्यांतून त्याला बाहेर जातां येऊं

नये, म्हणून नीट रीतीनें दगड बसवून तें मोहोरबंद केलें होतें, व पायलेट यानें त्या ठिकाणीं आपले पहारेकरीहि पहारा करण्यासाठीं रात्रंदिवस बसविले होते. अशा स्थितींतून जीझस् ख्राइस्टला आपल्या थडग्यांतून बाहेर पडतां येईल, असें त्या वेळच्या त्या फॅरिसीजना वाटलें होतें काय! परंतु ईश्वर हा चमत्काररत्नांचा समुद्र आहे. जो ब्रह्मांड व्यापून राहतो, तो आर्धी थडग्यामध्यें कोंडून कसा राहणार! आणि राहिलाच तर त्याला बाहेर येणें अशक्य आहे काय! परमेश्वराला काय अशक्य आहे! हिंदुस्थानांत १२०० वर्षांच्या पूर्वी कुमारिल आदिकरून मोठमोठ्या पंडितांनीं कर्ममार्गाचें इतकें स्तोम माजविलें होतें, आणि शाक्यमुनीच्या अनुयायांनीं बौद्ध धर्माचा प्रसार सर्व हिंदुस्थानभर इतक्या झपाट्यानें चालविलेला होता, कीं ज्ञानमार्ग आणि वैदिकधर्म यांचें आर्यभूमीवर आतां नांवही उरत नाहीं अशी त्या वेळीं स्थिति येऊन पोंचली होती. जो उठला तो वैदिक धर्माचा तिरस्कार करून गौतमबुद्धाच्या धर्माचा अंगीकार करीत होता. अशा वेळीं ही धर्मांतराची प्रचंड लाट फोडून, तिचे बारीक बारीक कण करून, ते चारी दिशांमध्यें फेंकून देणारा एखाद्या पर्वतासारखा कोणी महात्मा उत्पन्न होईल, असें त्या वेळच्या निराश झालेल्या वैदिक धर्माभिमान्यांना वाटलें होतें काय! श्रीमत् शंकराचार्य, त्यांचें अलौकिक बुद्धिसामर्थ्य, त्यांची वादिमतखंडनाची हातोटी, त्यांनीं केलेलें धर्मसंस्थापन, त्यांनीं संपादिलेला दिग्विजय, त्यांनीं नाचविलेले विजयध्वज आणि गाजविलेले कीर्तिडिंडिम, ह्यांची त्यांच्या आधींच्या लोकांना काय कल्पना होती! भविष्यत् काळाच्या पोटांत असलेल्या ह्या असंख्य गोष्टी त्या वेळच्या लोकांना कोठें दिसत होत्या! पण त्यांना त्या दिसत नव्हत्या म्हणून त्या घडून आल्या नाहींत असें नाहीं. परमेश्वरानें—ज्याला सर्वांच्या योगक्षेमाची काळजी वाहावयाची असते त्या परमेश्वरानें—त्या सर्व गोष्टी घडवून आणिल्या.

हें सर्व जर आपण पाहतों, तर मग आपल्यालाच निराश होण्याचें काय बरें कारण आहे! प्रथमारंभीं दिलेल्या अभंगांत तुकारामांनीं वर्णन केल्याप्रमाणें ज्यानें पक्षी आणि हरिण यांना पारध्यांच्या हातून सोडविलें, ज्यानें प्रल्हादाला अनेक संकटांतून वांचविलें, ज्यानें द्रौपदीची लज्जा रक्षण केली, ज्यानें गाईप्रमाणें दीन झालेल्या पृथ्वीला रावणाच्या जुलमांतून मुक्त केलें, ज्यानें येशु ख्रिस्ताला मरणानंतर तिसऱ्या दिवशीं आपल्या मोहोरबंद थडग्यांतून बाहेर

पडण्याचें सामर्थ्य दिलें, आणि ज्यानें शंकराचार्यांच्या मिषानें आर्य धर्माची आर्य भूमंडळामध्यें फिरून संस्थापन केलें, तो परमेश्वर आपल्यालाही आपल्या अवनतावस्थेमधून बाहेर काढणार नाहीं काय? एखादा राजा चांगला असतो तर त्याच्या वेळीं चांगलीं कृत्यें होतात. परंतु त्याच्यामागून दुसरा वाईट राजा आला असतां पूर्वीच्या सारखीं सत्कृत्यें त्याच्या वेळीं होत नाहींत. अशासारखी देवाची गोष्ट नाहीं. प्रल्हादाच्या, द्रौपदीच्या, रावणाच्या, येशूच्या किंवा शंकराचार्यांच्या वेळीं जो दीनांचा कनवाळू परमेश्वर होता, तोच हल्लींही स्वर्गातील सिंहासनावर विराजमान आहे. इतकेंच नव्हे, तर याच्यापुढेंही जे जे कोणी लोक अवनतीला जाऊन संकटांत पडतील, त्यांना त्यांतून वर काढण्यासाठीं तो परमेश्वर अनंत काळपर्यंत तेथें बसलेला असेल. तर मग आपल्याला निराश होण्याचें काय खरें कारण आहे? आपल्याला आपल्या भावी उन्नतीचीं चिन्हें दिसत नाहींत. परंतु परमेश्वराच्या घरीं कदाचित् आपल्याही उन्नतीची तयारी परिपूर्णही होऊन राहिली असेल. येत्या पावसाळ्यांत कोणकोणते रोपे उगवतील, त्यांपैकीं कोणकोणाचीं पुढें मोठीं झाडें होतील व त्यांपैकीं आपल्या छायेनें संतप्त जनांना कोण संतोषित करतील, आणि आपल्या अधःपतनानें आश्रितजनांना कोण चुरडून टाकतील, याच्याबद्दल आपल्याला आज कांहीं माहिती नाहीं; परंतु परमेश्वराच्या घरीं ह्या सर्व गोष्टी सिद्धवत् आहेत. त्या भावी मोठमोठ्या वृक्षांचीं बीजें जमिनीवर पडलेलीं आहेत व त्यांच्या उपाधिभूत वस्तु त्यांच्या संनिध येऊन पडलेल्या आहेत. ही जशी वृक्षांची गोष्ट आहे, तशीच ती आपल्या भावी उन्नतीचीही आहे.

आपण उन्नतावस्थेला येणार हें खास. आपल्या राजकीय, सामाजिक आणि धार्मिक उत्कर्षासाठीं आपलें इंग्रजसरकार आणि दुसरे कित्येक इंग्लिश लोकांपैकीं महात्मे प्रयत्न करीत आहेत. त्यांचे ते प्रयत्न कधींही व्यर्थ जाणार नाहींत. त्यांना लौकरच फळें येतील. इंग्रजांचे आजपर्यंत बहुतेक प्रयत्न सफळ झालेले आपण पाहिले आहेत. मग आपल्या उन्नतीबद्दलच्याच मात्र त्यांच्या प्रयत्नांना वांझपणा काय म्हणून यावा? आपण हिंदुस्थानांतील लोक मोठे होणार याबद्दल संशयच नाहीं. वाट चालत असतां आपला एखादा सोबती पुढें जाऊन बसतो, आणि आपली वाट पाहत असतो, त्याप्रमाणें आपला अभ्युदय हा आपल्या प्रगतीच्या मार्गांत आपली वाट पाहत बसलेला आहे. तेव्हां ही वाट चालतां

न चालतां तो आपल्याला केव्हां तरी भेटणार हें खास. सौख्य, संपत्ति, उत्कर्ष, विद्या, शौर्य, धैर्य, साहस, सत्यप्रियता, दीर्घायुष्य, आरोग्य, अप्रतिहततेजस्विता इत्यादि इहलोकच्या असंख्य संस्पृहणीय वस्तु आपल्या समोर अंतरिक्षामध्यें अदृश्य रीतीनें आपल्यासाठीं परिणत होऊन बसल्या आहेत. जे आपण ह्या आर्य भूमीच्या उदरांत जन्माला आलों आहों, त्या आपल्याला खात्रीनें पुढें सुख आहे. भविष्यत् काळ हा आपला आहे. त्यांत आपण जसें सत्यधर्मानें वागूं, त्याप्रमाणें आपलें सुख तेथें लिहून ठेवलेलें आहे. आपण जर गुडघ्यांत मान घालून निराशेचे सुस्कारे टाकीत बसलों, तर त्यापासून आपण आपलें काय हित साधून घेणार आहों ! निराशा म्हणजे दुर्बळत्व होय. प्रत्येक सुस्काऱ्याबरोबर आपण आपली कर्तृत्वशक्ति आपल्या शरीरांतून बाहेर घालवीत असतों. निराशा ही मनुष्याचे असलेले हात पाय मोडते. परंतु आशा ही परमानंदमाधवाच्या कृपेप्रमाणें लंगड्या माणसालाही गिरीचें उल्लंघन करण्याला प्रवृत्त करते. आशा हीच मनुष्याची शक्ति आहे आणि आशा हाच मनुष्याचा जोर आहे. ज्याच्या मनाला आशा नाहीं, त्याला भविष्यकाळ असून नसून सारखा. यासाठीं आपण आशा धरली पाहिजे व आपलें जें कर्तव्यकर्म आहे, तें आपण सतत करीत राहिलें पाहिजे; म्हणजे आपला उत्कर्ष आपल्यापासून फारसा लांब आहे असें नाहीं. अशक्यतेच्या कल्पनेनें आपलें मन निराशेच्या स्वाधीन होऊं न देतां भावी उत्कर्षाच्या आशांनीं आणि महत्त्वाकांक्षांनीं आपलें मन पूर्णपणें भरून ठेवून ईश्वराला अनन्यभावानें शरण गेलें पाहिजे; म्हणजे तो सर्व कांहीं गोष्टी, मग त्या आपल्याला कितीही अशक्य वाटत असोत, घडवून आणील, यांत शंका नाहीं. कारण ईश्वराची लीला अगाध आहे.

---

# अक्षयतृतीया : : : २

काळ : अग्रलेख ता. १९-४-१९०१

● हा लेख प्रसिद्ध झाला त्याच्या दुसऱ्याच दिवशीं श्रीशिवजयंत्युत्सव होता. केसरीच्या ता. ९-४-१९०१ च्या अंकांत "श्रीशिवजयंत्युत्सव" हा अग्रलेख येऊन गेला होता.

अक्षयतृतीयेचा दिवस हा अनेक कारणांनीं आपल्याला परमपूज्य झालेला आहे. ज्या महापुरुषाचा संबंध जोडला गेला असल्यामुळें ह्या दिवसाला इतका पवित्रपणा आलेला आहे, त्याला जन्मास येऊन गेल्याला आज किती वर्षें होऊन गेलीं असतील, ह्याचा बरोबर अदमास करणेंही कठिण आहे. तरी पण त्या महात्म्याचा वार्षिक उत्सव आपण अजूनपर्यंतही प्रत्येक वर्षीं करीत आहों. हे आपल्यांतील वार्षिक उत्सव म्हणजे एक प्रकारचीं स्मारकें आहेत. पण हीं जुनीं स्मारकें आणि हल्लींचीं नवीं स्मारकें ह्यांच्यांत कितीतरी अंतर आहे बरें! हीं स्मारकें आम्ही कोणाच्या भिडेनें करतों! तीं करा म्हणून आम्हांला गुप्तपणानें किंवा उघडपणानें कोण आग्रह करतो! अशांतला कांहींएक प्रकार नसून आम्ही आज युगेंच्या युगें हीं स्मारकें करीत आलों आहों; व ह्याचें कारण येवढेंच आहे कीं, हीं स्मारकें म्हणजे हल्लींच्या कांहीं स्मारकांसारखे जुलमाचे रामराम नाहींत. तर पूर्वींच्या त्या त्या महापुरुषांच्या अनुपमेय गुणांनीं मोहित झालेल्या लोकांना त्यांचें स्मारक करावें, अशी स्वाभाविकपणेंच स्फूर्ति होत असते. म्हणून लोक हे उत्सव करण्याला प्रवृत्त होतात. ज्यांच्या सद्गुणांचा लोकांच्या मनावर झालेला संस्कार इतकीं वर्षेंपर्यंत अव्याहत रीतीनें चाललेला असतो, ते पुरुष खरोखरच फार अलौकिक असले पाहिजेत, व ह्या

अलौकिकपणामुळेंच अशा पुरुषांची कधीं कधीं देवांत किंवा देवांच्या अवतारांत गणना झाली, तर त्यांत कांहीं विशेष आहे असें नाहीं. " यद्यद्विभूतिमत्सत्त्वं श्रीमदूर्जितमेव वा। तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंऽशसंभवम्॥ " ह्या गीतेंतील वचनाप्रमाणें पाहिलें म्हणजे अशा अलौकिक पुरुषांना देवाचे अवतार का मानण्यांत आलें, हें कोणाच्याही सहज लक्षांत येण्यासारखें आहे.

परशुराम हा एक वर सांगितलेल्या प्रकारचा अलौकिक आणि विलक्षण पुरुष आपल्यामध्यें होऊन गेला. ह्यानें शौर्याचीं आणि धाडसाचीं अशीं कांहीं कृत्यें केलीं आहेत कीं, त्यांमुळें त्याला परमेश्वराचा अवतार असेंच सर्व लोक सामान्य दृष्टया मानीत आलेले आहेत. असल्या महापुरुषाचे आणि विभूतीचे आपण उत्सव करीत असतों, ही मोठी आनंदाची गोष्ट आहे. परंतु त्यांत व्यंग एवढेंच आहे कीं, परशुरामाच्या चरित्राचें जसें इतिहासदृष्टया विवेचन करावयास पाहिजे, तसें तें आपण करीत नाहीं. परंतु तिकडे लक्ष जाणें अत्यंत आवश्यक आहे. यासाठीं आपण तशा दृष्टीनें परशुरामाच्या चरित्राचें येथें थोडेसें विवेचन करूं.

परशुराम हा जातीचा ब्राह्मण होता. त्याच्या वेळीं ब्राह्मणांचीं कर्तव्यकर्में काय हें ठरून गेलेलें होतें. स्वतः वेदादिकांचें अध्ययन करावें, कोणी शिष्य आल्यास त्यांना वेदाचे पाठ सांगावे, यज्ञयागादि कामें स्वतःचीं किंवा यजमानाचीं करावीं व कोणीं दान दिल्यास त्याचा प्रतिग्रह करावा, हीं त्या वेळच्या चालीरीतीप्रमाणें ब्राह्मणाचीं कर्तव्यें होतीं; व युद्ध करणें, शत्रूला जिंकणें वगैरे क्षत्रियांचीं कर्में होत, म्हणून त्या वेळेला मानलें जात असे. परशुराम हा जातीचा ब्राह्मण होता, हें वर सांगितलेंच आहे. व त्या ब्राह्मण वर्णाच्या धर्माप्रमाणें वेदाध्ययन, तपश्चर्या, यजनयाजन वगैरे गोष्टी परशुरामाच्या अंगीं वसत होत्या, याबद्दल शंका नाहीं. परंतु त्याच्या मनाचा कल म्हटला म्हणजे ब्रह्मविद्येपेक्षां शस्त्रविद्येकडेच अधिक होता. चतुर्वेदांपेक्षां धनुर्वेदाची त्या ब्राह्मणाच्या मुलाला अधिक गोडी लागलेली होती. आणि ब्रह्मकर्म करीत बसण्यापेक्षां क्षात्रकर्म करण्याची त्याला विशेष हौस असे. त्याच्या हातांत गोमुखी आणि जपमाळेपेक्षां शत्रूंचीं डोकीं फोडणारी कुऱ्हाडच जास्त वेळ नाचत असे. अशा प्रकारचा हा अगदीं निराळ्या वळणाचा मुलगा ब्राह्मणकुळामध्यें त्या वेळीं जन्मास आलेला होता. ब्राह्मणांच्या वंशांत हा क्षात्रवृत्तीचा मुलगा कसा निर्माण

झाला, अशी शंका उत्पन्न होणें अगदीं साहजिक आहे. हें कोडें उकलण्यासाठीं पुराणांतून अशी एक गोष्ट सांगण्यांत येत असते कीं, गाधि या नांवांचा कोणी राजा होता. त्याला सत्यवती या नांवाची एक मुलगी होती. तिच्यावर भृगु-ऋषीचा मुलगा ऋचीक हा आसक्त होऊन त्यानें तिच्याशीं लग्न लाविलें. पुढें एके प्रसंगीं आपल्याला आणि आपल्या आईला पुत्रप्राप्ति व्हावी, म्हणून सत्य-वतीनें भृगूची प्रार्थना केली. त्या वेळीं भृगूनें दोन निरनिराळे चरु तयार करून देऊन ते त्या दोघींना भक्षण करावयास सांगितले. परंतु ते चरु भक्षण करतांना असें झालें कीं, सत्यवतीकरितां योजिलेला होता. तो तिच्या आईनें भक्षण केला, व आईकरितां जो चरु योजिलेला होता, तो सत्यवतीनें भक्षण केला. भृगु ऋषींनीं त्या दोन निरनिराळ्या चरूंमध्यें निर-निराळें सामर्थ्य घालून ठेविलेलें होतें. गाधि हा क्षत्रिय राजा असल्यामुळें त्याला क्षात्र तेजानें युक्त असा मुलगा व्हावा, ह्या हेतूनें गाधि राजाच्या बायकोनें खावयाचा चरु क्षात्र सामर्थ्यानें संपन्न असा केलेला होता, व सत्यवतीचा नवरा ऋचीक हा ब्राह्मण असल्यामुळें त्याला व्हावयाचा पुत्र हा ब्रह्मतेजानें युक्त असा व्हावा, ह्यासाठीं सत्यवतीनें भक्षण करावयाचा चरू भृगुऋषींनीं ब्राह्म तेजानें संपन्न असा केला होता. परंतु त्या चरुभक्षणांत विपर्यय झाल्यामुळें तोच विपर्यय पुढेंही कायम राहिला. भृगूला ही चरूची झालेली अदलाबदल कळली. तेव्हां त्यानें सत्यवतीला सांगितलें कीं, ह्या चरुविपर्ययाचा असा परिणाम होणार आहे कीं, तुझा मुलगा ब्राह्मण-वंशांतला असूनही त्याची क्षात्र कर्माकडे प्रवृत्ति राहील; व तुझ्या आईचा मुलगा क्षत्रिय वंशांत जन्मास येऊनही त्याला ब्राह्मणत्वाची आवड राहील. हें सत्यवतीला कळल्यानंतर तिनें भृगूची अशी प्रार्थना केली कीं, हें अपरिहार्यच असेल, तर माझा नातू तसा होवो, परंतु माझा मुलगा ब्रह्मकर्मनिष्ठच व्हावा. ही गोष्ट भृगूनें कबूल केली. तेव्हां सत्यवतीला जमदग्नि हा ब्रह्मनिष्ठ पुत्र झाला. आणि पुढें गाधि राजाला ब्राह्मणधर्माभिलाषी विश्वामित्र हा मुलगा झाला, आणि जमदग्नीला परशुराम हा क्षत्रियवृत्तीचा पुत्र झाला. विश्वामित्राचा ब्रह्मवर्चसाकडे ओढा होता, आणि परशुरामाच्या मनोवृत्ति क्षात्रकर्मांत मग्न झालेल्या होत्या. ह्या गोष्टी ऐतिहासिक आहेत; व ह्या ऐतिहासिक वस्तूंतून दृग्गोचर होणाऱ्या विरोधाचें समाधान करण्याकरितां वरील कथा प्रवृत्त झालेली असावी हें

कोणाच्याही सहज लक्षांत येईल. परंतु तें कांहीं असो. एवढी गोष्ट अगदीं निर्विवाद आहे कीं, परशुराम हा ब्राह्मणवंशामध्यें जन्मास आलेला असून त्याची क्षात्रधर्माकडे विशेष प्रवृत्ति होती. पूर्वीच्या काळीं ब्राह्मणांमध्येंही क्षात्रविद्या अवगत असलेले असे कांहीं लोक होते. सगळेच भस्माचे पट्टे ओढून गोमुख्यांतून हात घालून बसलेले नव्हते. भारतीय युद्धांत जे वीर प्रख्यातीस आले त्यांपैकीं तिघेजण ब्राह्मणवर्णाचे होते. द्रोण ब्राह्मण होता, अश्वत्थामा ब्राह्मण होता आणि कृपाचार्य हाही ब्राह्मणच होता. अशी जरी स्थिति होती, तरी पूर्वीच्या काळचा सामान्य नियम म्हटला म्हणजे असाच दिसतो कीं, तेव्हां ज्ञानभांडार ब्राह्मणांच्या हातीं होतें. शस्त्रापेक्षां ज्ञानाचें महत्त्व अधिक आहे हें खरें; परंतु शस्त्राचा उपयोग तात्कालिक असतो. पूर्वी शहाणपण ब्राह्मणांपाशीं असे, परंतु सत्ता क्षत्रियांचे हातीं होती. आणि सत्तेपुढें शहाणपण चालत नाहीं, ही म्हण सृष्टिनियमाप्रमाणें त्या ब्राह्मणक्षत्रियकाळींही आपला यथार्थपणा कधीं कधीं लोकांच्या प्रत्ययाला आणून देत असे. ब्राह्मणांचें सगळें ज्ञान गुंडाळून ठेवून त्यांना क्षत्रियांनीं छळल्याचीं उदाहरणें पूर्वीच्या इतिहासांतून थोडीं सांपडतात असें नाहीं. शर्मिष्ठेनें देवयानीचे वडील, शुक्रभटजी, यांच्याबद्दल व त्यांच्या मुलीबद्दल कसे उद्गार काढले आहेत, हें पूर्वीचीं काव्यें वाचणारांना माहीत आहेच. विश्वामित्र राजाला वसिष्ठभटजींच्या घरची गाय चांगलीशी दिसल्याबरोबर त्यांनीं त्या गाईवर आपला हक्क कसा शाबीत केला, वगैरे गोष्टीही सर्वत्र प्रसिद्धच आहेत. ह्या व अशाच प्रकारच्या दुसऱ्या अनेक गोष्टींमधून निदर्शनास येणारी स्थिति पूर्वी कधीं कधीं उत्पन्न होत असे. ही स्थिति नाहींशी करणें हा परशुरामाच्या आयुष्यांतील एक मुख्य उद्देश होता. आपल्या डोक्यांत कितीही ज्ञान असलें, तरी जोंपर्यंत आपल्या हातांत सत्ता नाहीं, तोंपर्यंत हें सर्व ज्ञान व्यर्थ आहे अशी परशुरामाची खात्री झालेली होती. आपल्या डोक्यांत सर्व जगाचें ब्रह्मज्ञान सांठवून ठेवून आपण यःकश्चित् गोष्टीसाठींहि जोंपर्यंत क्षत्रियांच्या तोंडाकडे पाहत आहों, तोंपर्यंत ते आपला छळ केल्यावांचून आणि आपल्यावर जुलूम केल्यावांचून कधींही राहणार नाहींत. याकरितां क्षत्रियांची सत्ता क्षीण करून ज्या ब्राह्मणांच्या डोक्यांमध्यें ज्ञान आहे त्यांच्याच हातांत क्षत्रियांची सत्ता आणून ठेवणें अत्यंत जरूर

आहे, ही गोष्ट परशुरामाला समजली व त्यानें ती घडवूनही आणली. परशुरामाच्या पूर्वीचे ब्राह्मण अल्पसंतोषी होते. परंतु परशुराम हा महत्त्वाकांक्षी होता. परशुरामाच्या बरोबर शेंकडों ब्राह्मण जन्माला आले असतील आणि मेले असतील; परंतु त्यांपैकीं परशुरामाचेंच नांव अजरामर होऊन राहिलें आहे, ह्याचें कारण असें कीं, तो एक ब्राह्मणबटु असूनही त्यानें अतर्क्य आणि अघटित अशी एक क्रांति घडवून आणिली. त्या वेळीं क्षत्रिय हे ब्राह्मणांवर जुलूम करीत होते. त्या जुलमाला रसातळाला पोहोंचवून क्षत्रियांचें नांवसुद्धां या पृथ्वीतलावर शिल्लक ठेवावयाचें नाहीं आणि सर्वत्र ब्राह्मणांची स्वतंत्रता स्थापन करावयाची, हा परशुरामाच्या अंतःकरणांतील मुख्य हेतु होता. ह्यासाठींच परशुराम जन्मास आला होता. आणि ती गोष्ट सिद्धीस नेऊन त्यानें आपल्या जन्माचें सार्थक करून घेतलें.

परशुरामाचा क्षत्रियांवर किती कटाक्ष असे, हें पुढील एका गोष्टीवरून चांगलें लक्ष्यांत घेण्यासारखें आहे. कर्ण हा जातीचा क्षत्रिय होता. निदान ब्राह्मण नव्हता, एवढें खास; व ब्राह्मणाशिवाय इतरांना धनुर्वेदाचें शिक्षण द्यावयाचें नाहीं असा परशुरामाचा संकल्प होता. परशुरामाच्या मनांतून क्षत्रियांचें वर्चस्व मोडून टाकावयाचें असल्यामुळें आपली विद्या त्यांना कधींहि सांगावयाची नाहीं, असा परशुरामानें जो निश्चय केला होता तो अगदीं साहजिकच होता. आणि कोणीही झालें तरी ज्यांना आपल्याला जिंकावयाचें आहे त्यांच्या हातीं आपली गुरुकिल्ली देऊन मग त्यांच्या तोंडाकडे पाहत बसण्याचें वेडगळपणाचें कृत्य कधीं तरी करील काय! परशुरामानें कोणाही क्षत्रियाला आपली विद्या सांगितली नाहीं, व कर्णानें जरी त्याला फसवून त्याच्यापासून त्याची विद्या जाणण्याचा प्रयत्न केला, तरी परशुरामानें आपल्या शापानें अखेरीस त्याची विद्या निष्फळ करून टाकली. ह्यावरून क्षत्रियांच्याबद्दल परशुरामाच्या मनामध्यें बाणलेला एक प्रकारचा द्वेष स्पष्ट होत आहे.

परशुरामाच्या वेळीं सहस्रार्जुन हा क्षत्रिय राजा अतिशय बलाढ्य झालेला होता. त्याचें नांव कार्तवीर्य असें होतें. परंतु एक हजार हात असल्यामुळें त्याला सहस्रार्जुन असें म्हणत असत. दत्तात्रेयाच्या प्रसादानें त्याला एक सोन्याचें विमान मिळालें होतें. तसेंच त्याच्या गतीला कोठेंही प्रतिबंध नाहीं

अशा प्रकारचा एक रथ त्याच्यापाशीं होता. त्याच्या योगानें सर्व देव, यक्ष, ऋषि वगैरेंना त्यानें जिंकलें होतें व अभिमानानें उन्मत्त होऊन सर्व लोकांना तो अतिशय पीडा देत असे. त्याच्या त्रासांतून सुटण्याला आपल्याला आतां दुसरा मार्ग राहिला नाहीं, असें जाणून त्या वेळचे सर्व लोक ईश्वरावर भरंवसा ठेवून बसलेले होते. सर्व जग कार्तवीर्याच्या जुलमानें गांजून गेलेलें होतें. मनुष्यांना आपल्या जिवाचा कंटाळा आलेला होता; आणि देवांना आपल्या अमरत्वाबद्दल वाईट वाटत होतें. सर्व भूमंडळावर अन्याय, छळ, जुलूम, गांजणूक यांच्याशिवाय दुसऱ्या कशाचें नांवही नव्हतें.

अशा वेळीं अरण्यांत एका पर्णकुटिकेंत परशुराम जन्माला आला. त्याचे बाळपणाचे दिवस बहुतेक अरण्यामध्येंच गेले. त्या वयांत त्यानें शस्त्र आणि शास्त्र यांचें उत्तम प्रकारें अध्ययन केलें. जमदग्नीला एकंदर पांच पुत्र होते, त्यांपैकीं परशुराम हा सर्वांत धाकटा होता. अरण्यांत वारंवार फिरण्याचा प्रसंग असल्यामुळें, व समिधा वगैरे तोडण्यासाठीं जरूर पडत असल्यामुळें, परशुराम हा आपल्या हातांत नेहमीं एक परशु बाळगीत असे, व म्हणूनच त्याला परशुराम हें नांव मिळालेलें होतें. सहस्रार्जुनाचे लोकांवर चाललेले जुलूम परशुरामाच्या कानावर येत होते. परंतु एकदां खुद्द परशुरामाच्या कुटुंबावरच सहस्रार्जुनाचा जुलूम होण्याची वेळ आली. परशुरामाचा बाप जमदग्नि हा अरण्यांत जेथें राहत असे तेथें एकदां परशुराम वगैरे बाहेर गेले असतां कार्तवीर्याची स्वारी आली. तेव्हां जमदग्नीच्या बायकोनें त्याचा योग्य सत्कार केला; परंतु तो जुलमी कार्तवीर्य स्वभावतःच वक्र असल्यामुळें व त्यांतच राज्यमदानें उन्मत्त झालेला असल्यामुळें त्या आदरसत्कारानें तो संतुष्ट होण्याचें एकीकडेसच राहून, उलट त्यानें त्या आश्रमांतील होमधेनूचें वासरूं चोरून नेलें व जमदग्नीच्या आश्रमांतील सर्व झाडांमाडांचा विध्वंस करून टाकिला. हें जुलुमाचें अनन्वित कर्म करून कार्तवीर्य गेल्यानंतर थोड्या वेळानें परशुराम घरीं आला. तेव्हां आपला पिता खिन्न झालेला, आपली कामधेनु आपल्या वासरासाठीं हंबरडे फोडीत असलेली, आपल्या आश्रमांतील आपली प्रियकर झाडें मोडलेलीं व सर्व आश्रम उद्ध्वस्त करून टाकलेला त्याच्या दृष्टीस पडला. हें पाहून परशुरामाला अतिशय क्रोध आला; व कार्तवीर्याचें हें कृत्य आहे असें समजल्याबरोबर त्याचा नाश करण्यासाठीं लगलाच तो घरांतून बाहेर पडला.

कार्तवीर्याचे एक हजार हात आणि आपले दोनच हात, कार्तवीर्याच्या पदरीं सैन्य अपार आणि मी एकटा, हे विचार त्याच्या मनाला शिवलेसुद्धां नाहींत. आपल्या असंख्य जुलुमांनीं आणि अनंत पातकांनीं कार्तवीर्य आधींच मारला गेलेला आहे, माझी कुऱ्हाड ही त्याला मारण्याला निमित्तमात्र होणार आहे, असा विचार मनांत आणून तो आपली कुऱ्हाड उचलून निघाला तो कार्तवीर्याजवळ आला. कार्तवीर्याशीं त्यानें युद्ध केलें, आणि त्या युद्धांत कार्तवीर्याला त्यानें ठार मारिलें. अशा रीतीनें या ब्राह्मणाच्या लहान मुलानें आपल्या एका कुऱ्हाडीनें त्या वेळच्या अतिशय बलाढ्य परंतु अतिशय जुलमी अशा कार्तवीर्याचे एका पाठीमागून एक असे एक हजार हात झाडाच्या खांद्यांप्रमाणें तोडून काढले. याप्रमाणें परशुरामाला यश मिळालें. परंतु त्याच्या योगानें त्याला स्वस्थता मिळाली असें मात्र नाहीं. हैहयाधिपति कार्तवीर्य मारल्यानंतर पशुरामाचें युद्धाचें काम संपलें असें कोणाला वाटेल, पण असें नाहीं. पशुरामानें जें भयंकर रणसत्र केलें, त्याची येथें समाप्ति झाली नसून उलट, त्याला येथून प्रारंभ झाला असेंच म्हटलें पाहिजे. त्या वेळीं पृथ्वीवर एकटा सहस्रार्जुनच उन्मत्त झाला होता असें नाहीं; तर दुसरेही पुष्कळ क्षत्रिय राजे ब्राह्मणांचा छळ करीत होते व ब्राह्मणांचा छळ करणाऱ्या सर्व लोकांचा विध्वंस आणि निर्वंश करून टाकण्याचा परशुरामानें संकल्प केला होता. तो संकल्प शेवटास नेण्यासाठीं परशुरामानें येथें थांबून कसें चाललें असतें! त्याला त्याच्या पुढें जावयाला पाहिजेच, व त्याप्रमाणें तो गेलाही. हें रणसत्र आरंभिण्याला परशुरामाला लौकरच एक तात्कालिक कारण घडून आलें. कार्तवीर्याला परशुरामानें मारिलें, ही गोष्ट त्याच्या भावाबंदांच्या मनामध्यें जळत होती म्हणून त्याचा सूड घेण्यासाठीं ते सर्वजण एकदां परशुराम नाहीं अशी संधि साधून आश्रमामध्यें गेले व परशुरामाचा बाप जमदग्नि याला एकटा गांठून त्यास ठार मारिलें. कार्तवीर्याचे पुत्र सूड उगविण्याकरितां आपला प्राण घेत आहेत, असें पाहून हताश आणि निरुपाय होऊन आपल्या मुलाला हांका मारीत जमदग्नीनें प्राण सोडला. हें अघोर कर्म करून ते क्षत्रिय निघून गेले. नंतर कांहीं वेळानें परशुराम हातांत समिधा घेऊन आश्रमांत परत आला, तेव्हां त्याचा मेलेला पिता त्याच्या दृष्टीस पडला. तें पाहून त्याला अतिशय दुःख झालें, व त्यानें क्षत्रियांचें बीजही उरूं न देण्याची घोर प्रतिज्ञा केली. नंतर त्यानें यज्ञांत पशु कापतात, त्याप्रमाणें लढाईमध्यें प्रथमतः कार्तवीर्याच्या मुलांचीं डोकीं

कापिलीं. नंतर त्यांचे अनुयायी आणि संबंधी असे जे क्षत्रिय होते, त्या सर्वांचे त्यानें बळी घेतले. परंतु आपल्या बापाला मारल्याबद्दल सूड घेण्याची परशुरामाची इच्छा एवढ्यानेंच तृप्त होईना. त्याची प्रतिकारतृष्णा शांत करण्यासाठीं आणखीही रक्तपाताची अपेक्षा होती. आजपर्यंत पुष्कळांचे बाप पुष्कळांनीं मारिले असतील; परंतु परशुरामासारखा आपल्या बापाचा सूड एका मुलानेंही उगवला नसेल. सूड उगविण्याची गोष्ट लांबच राहो, पण ज्यांनीं आपल्या बापाला मारिलें, त्यांच्याच हातांत हात आणि गळ्यांत गळा घालून नाचणारे आणि वागडणारे अधमाधम आणि कुलांगार असे पुत्र इतिहासानें लोकांना थोडे थोडके दाखविले आहेत असें नाहीं. पण त्यांची किंमत काय ! त्यांची आठवण झाली म्हणजे कोणाच्या कपाळाला आंठ्या पडत नाहींत ! आणि त्यांच्या नांवाचा एखाद्याला शाप देण्याच्या प्रसंगावांचून अन्य वेळीं उच्चार तरी कोण करतो आहे ! कितीही थापट्या मारल्या तरी कुत्रा फिरून आपल्या धन्याच्या मांडीवर लोळावयाला जातोच, त्याप्रमाणें शत्रूंनीं कितीही अपकार केले, तरी त्यांच्या चरणावर ज्यांचीं मस्तकें लोळावयाला जावयाचींच, त्यांचीं त्या कुत्र्यांप्रमाणें स्मारकें तरी कोण करतो आहे ! आणि उत्सव तरी कोठें होत आहेत ! असले लोक जिवंत आहेत तोंपर्यंत खुशामतीसाठीं, आणि मेल्यावर अंधकार, विस्मरण आणि रौरव यांच्यासाठींच निर्माण केलेले असतात. परशुरामासारखे जे महत्त्वाकांक्षी आणि महत्कार्य करणारे असतात, त्यांचेच उत्सव होतात आणि तेच स्वर्गलोकाला जातात. परशुरामाचा क्रोध अनिवार होता. त्यानें बापाच्या मरणाबद्दल सूड घेण्यासाठीं क्षत्रियांचें बीज पृथ्वीवर उरूं न देण्याच्या कार्याला सुरवात केली, व ती गोष्ट त्यानें पूर्णपणें तडीस नेली. पण ही गोष्ट तो एकदांच करून राहिला असें नाहीं; तर त्यानें एकवीस वेळां निःक्षत्रिय पृथ्वी केली. परशुरामाची सूड घेण्याची कल्पना फारच उग्र, अघोर आणि भयंकर होती. त्यानें एकवीस वेळां निःक्षत्रिय पृथ्वी करून सर्व क्षत्रियांचीं शिरें कापून त्यांच्या अंगांतून निघालेलें रक्त स्यमंतपंचकामध्यें पांच ऱ्हद करून त्यांत सांठवून टेवलें होतें. बाप मरण पावला असतां त्याला निवापांजली देऊन पितृतर्पण करावें, असा शास्त्राचा विधि आहे. तो करण्यासाठीं परशुरामाची ही तयारी होती. आपल्या पित्याचें तर्पण पुष्कळ लोक करितात; परंतु त्या तर्पणानें

ते पितर तृप्त होतात किंवा नाहीं हा प्रश्न असतो. परंतु परशुरामाचा पितृतर्पणाचा मार्ग अगदीं भिन्न होता; व त्यानें त्याचे पितर संतुष्टही झाले. शत्रूंच्या रक्तांनीं भरलेल्या ऱ्हदांतून ओंजळी भरून घेऊन परशुरामानें आपल्या पितरांना पाणी पाजिलें. अशा प्रकारचें शांतवन करणारें पितृतर्पण फारच थोड्या पितरांच्या कपाळीं असतें. उलट पुत्रांच्या लज्जास्पद, निंद्य, अभिमानरहित आणि भित्रेपणाच्या कृत्यांनीं बहुतेक पितरांना नरकामध्येंच जाण्याची पाळी येत असली पाहिजे. असो. परशुरामाचें हें अद्‍भुत पितृतर्पण पाहून, त्याचा आजा ऋचीक हा प्रत्यक्ष परशुरामाचे पुढें उभा राहून त्यानें 'आतां हें शत्रुवधाचें काम पुरें कर,' अशी विनंती केल्यावरून परशुरामानें आपल्या रणयज्ञाचें अवभृतस्नान त्या वेळीं केलें. अशा रीतीनें परशुरामानें आपल्या पराक्रमानें, उन्मत्त झालेल्या क्षत्रियांचा धींमोड करून टाकिला, व त्या युद्धांत हस्तगत झालेली सर्व पृथ्वी परशुरामानें काश्यप नांवाच्या ब्राह्मणाच्या हवालीं करून, त्यानें सर्वत्र ब्राह्मणांच्या साम्राज्याची संस्थापना केली. अशा रीतीनें ब्राह्मणाच्या एका यःकश्चित् मुलानें—रानांतील समिधा तोडून यज्ञनारायणाचें अनन्यभावें पूजन करणाऱ्या आणि कंदमुळांवर आपला उदरनिर्वाह करणाऱ्या एका ब्राह्मणाच्या मुलानें—आपल्या कुऱ्हाडीच्या जोरावर हजार हातांच्या कार्तवीर्याचा नाश करून, त्याच्या दायादांना मृत्युमुखांत कोंबून, एकवीस वेळां निःक्षत्रिय पृथ्वी करून, शत्रूंच्या रक्तानें पितृतर्पण करून, आपल्या बापाच्या मरणाचा सूड पूर्णपणें उगवून, सर्व पृथ्वीवर ब्राह्मणांचें साम्राज्य स्थापित केलें. क्षत्रियांची सत्ता सर्वत्र फैलावून अमर्याद झाली होती, तिला आळा घालून तिचें नांवमुद्दां मागें उरूं न देतां या ब्राह्मणाच्या मुलानें ज्ञान आणि सत्ता हीं एका ठिकाणीं आणिलीं. ह्या अनेक गोष्टी परशुरामाचें माहात्म्य वाढविण्याला कारणीभूत झालेल्या आहेत. परंतु ह्या सर्वांतही विशेष गोष्ट ही आहे कीं, परशुरामानें सर्व पृथ्वी जिंकली, परंतु तिच्यावर त्यानें कोणत्याही प्रकारची आपल्या मनाची आसक्ति ठेविली नव्हती. त्यानें सर्व पृथ्वी जिंकून काश्यपाच्या स्वाधीन केली. इतका निर्लोभीपणा अन्यत्र सांपडणें कठिण आहे. वीतभर जमिनीच्या तुकड्या-साठीं प्राण देणाऱ्या कित्येक योद्ध्यांची गोष्ट मनांत आणिली म्हणजेच परशुरामाच्या उदार वृत्तीची बरोबर कल्पना आपल्याला करितां येईल, एरवीं यावयाची नाहीं.

भारतामध्यें ह्या परशुरामाच्या गोष्टीवरून अशी एक शंका काढण्यांत आली आहे कीं, जर परशुरामानें सर्व क्षत्रियांचा नाश केला, तर मग पाठीमागून जे हे क्षत्रिय झाले ते कोठून आले? ह्यावर तेथेंच असें समाधान सांगितलें आहे कीं, परशुरामाच्या भयानें कित्येक क्षत्रिय राजे, वैश्य, शूद्र इत्यादिकांचा आश्रय करून राहिले होते. कोणी गवळ्याच्या घरीं दडून राहिले; कोणी सुताराच्या घरीं दडून राहिले; व कोणी धनगराच्या घरीं दडून राहिले. अशा रीतीनें ज्याला जेथें दडण्याला जागा सांपडली, तेथें ते त्यांचे त्यांचे धंदे करीत दडून राहिले. त्यामुळें हल्ली गवळी राजे, सुतार राजे, धनगर राजे, गुराखी राजे अशा प्रकारचे दुर्बळ, सत्त्वहीन, क्षुद्र आणि पोंचट असे राजे कित्येक ठिकाणीं दृष्टीस पडतात. खरे क्षत्रिय ते मरूनच गेले; आतां क्षत्रिय हें नांव मात्र राहिलें आहे. क्षत्रियाची क्रिया, क्षात्रधर्म, क्षात्रतेज, क्षात्रविद्या वगैरे गोष्टी संध्याकाळच्या सूर्याप्रमाणें पूर्वींच अस्ताला गेलेल्या आहेत.

असो. अशा प्रकारची ही वर वर्णन केलेली अद्‌भूत, अपूर्व आणि अवर्णनीय क्रांति परशुरामानें घडवून आणिली. ह्या गोष्टीचें स्मरण राहावें म्हणून आपण परशुरामाचे आजपर्यंत उत्सव करीत आलों व याच्यापुढेंही जोंपर्यंत आपण आपल्याला हिंदु म्हणवून घेत आहों, जोंपर्यंत आपण महाभारत वाचीत आहों व रामायणाचें अध्ययन करीत आहों, आणि जोंपर्यंत वसिष्ठ, भारद्वाज जमदग्नि इत्यादि महाप्रतापी, महातपस्वी आणि महातेजस्वी ऋषींच्याच हाडां-मांसांपासून आपण उत्पन्न झालों आहों ही गोष्ट आपल्या लक्षांतून जाणार नाहीं, तोंपर्यंत आपण हे उत्सव असेच करीत राहूं, याबद्दल शंका नाहीं. परंतु आपण जें कांहीं करतों तें समजून करावें, ह्यासारखी उत्तम गोष्ट दुसरी कोणतीच नाहीं. परशुरामानें आपल्या जन्मानें अक्षय संस्मरणीय करून ठेविलेल्या अक्षयतृतीयेच्या दिवशीं उत्सवाशिवाय एक श्राद्ध करून उदकुंभ देण्याचा रिवाज पडलेला आहे. हें युगादि श्राद्ध आहे असें कित्येकांचें म्हणणें आहे, व वैशाखांत उन्हाळा फार असल्यामुळें मडक्यांत गार पाणी करून ब्राह्मणाला दान करावें, म्हणजे आपल्याला पुढच्या जन्मीं देव गार पाणी प्यावयाला देईल, अशीही कदाचित् कोणी अर्वाचीन भिक्षुक मंडळी ह्याची उपपत्ति सांगेल. पण अक्षयतृतीयेच्याच दिवशीं हा विधि करावयाचा असल्यामुळें ह्याची मीमांसा निराळ्या रीतीनें केल्यास ती अधिक सयुक्तिक होणार नाहीं काय? श्राद्ध आणि उदकुंभ-दान

हें परशुरामाच्या कृतीचें अनुकरण नाहीं काय ? परंतु अनुकरणात आणि मुळा किती फरक ! परशुरामानें शत्रूंच्या रक्तानें पांच डोह भरून त्या रक्ताच जळांजळी आपल्या पितरांना अर्पण केली, आणि आपण एक पैशाचें मडकें विकत घेऊन त्यांत बिनपैशानें मिळणारें पाणी भरून तें पितरांना अर्पण करतों, आणि परशुरामाच्या पितरांप्रमाणेंच आपल्या पितरांनींही संतुष्ट व्हावें म्हणून आकांक्षा करीत बसतों, हें आपल्या पूर्वाचारांबद्दल आपलें किती बरें अज्ञान आहे ! ह्या अज्ञानांतून आपण बाहेर निघालें पाहिजे, व सत्त्विक गुणाचा, ब्रह्मवर्चसाचा आणि उदात्त विचारांचा मार्ग आम्हीं चोखाळला पाहिजे. ह्यासाठीं परशुरामासारख्या महापुरुषांच्या उत्सवांनीं आमच्या मनाला निर्मल तपश्चरणाचें, निष्कलंक तेजस्वितेचें, अस्खलनीय कर्तव्यदक्षतेचें आणि अनुपमेय सात्त्विक वृत्तीचें वळण लागावें, व त्यायोगें आमची आध्यात्मिक आणि आधिभौतिक उन्नति व्हावी, हीच आमची परमेश्वरापाशीं प्रार्थना आहे.

---

# ख्रिस्ती धर्माची वाढ. : : : ३

काळ : अग्रलेख ता. २६।४।१९०१

● हाच विषय ता. २६।७।१९०१ च्या "खिस्ताची आज्ञा" या लेखांत चर्चिला आहे. दुष्काळानंतर उठलेल्या धर्मांतराच्या वावटळींत प्रस्तुत विषय विशेष जिव्हाळ्याचा होता. मुंबईचे लॉर्ड बिशप रे. डॉ. मॅकआर्थर यांनीं २४।४।१९०१ रोजीं लंडन येथें व्याख्यान देऊन प्रतिपादन केलें कीं, हिंदुस्थानांतील लोकांनीं आपआपले धर्म सोडून खिस्ती धर्माची दीक्षा घ्यावी, म्हणजे त्यांचें एकराष्ट्र सिद्ध होईल.

येशू खिस्ताबरोबर खिस्ती धर्माला सुरवात झाली व तेव्हांपासून तो धर्म हळूहळू वाढत आहे. एकुणीसशें वर्षांच्या पूर्वी कोठें कांहीं नव्हतें. खिस्ती धर्माचें कोठें नांवही ऐकूं येत नव्हतें. त्या वेळीं रोमन लोक सत्ताधीश होते व त्यांचा धर्म चोहोंकडे चालत होता; व इजिप्त वगैरे ठिकाणीं त्या त्या ठिकाणचे निरनिराळे धर्म प्रचलित होते. अशा स्थितीमध्यें येशू खिस्त जन्माला आला व त्यानें आपल्या धर्माची संस्थापना केली. तेव्हांपासून आजपर्यंत हा धर्म एकसारखा वाढतच आहे. तो अमुक ठिकाणीं वाढला परंतु अमुक ठिकाणीं वाढणार नाहीं, असें म्हणण्याला मुळींच जागा नाहीं. त्याचा फैलाव करण्यासाठीं सर्व ठिकाणीं जारीनें प्रयत्न सुरू आहेत, व त्या प्रयत्नांना यशही येत आहे. हा धर्म जसा इतर देशांत वाढत आहे, तसाच तो हिंदुस्थानांतही वाढत आहे. हा धर्म हिंदुस्थानांत कशा प्रमाणानें वाढत आहे, हें दाखविण्याकरितां मुंबईच्या

हें परशुरामाच्या कृतीचें अनुकरण नाहीं काय ? परंतु अनुकरणांत आणि मुळांत किती फरक ! परशुरामानें शत्रूंच्या रक्तानें पांच डोह भरून त्या रक्ताची जळांजळी आपल्या पितरांना अर्पण केली, आणि आपण एक पैशाचें मडकें विकत घेऊन त्यांत बिनपैशानें मिळणारें पाणी भरून तें पितरांना अर्पण करतों, आणि परशुरामाच्या पितरांप्रमाणेंच आपल्या पितरांनींही संतुष्ट व्हावें म्हणून आकांक्षा करीत बसतों, हें आपल्या पूर्वाचारांबद्दल आपलें किती घोर अज्ञान आहे ! ह्या अज्ञानांतून आपण बाहेर निघालें पाहिजे, व सत्त्विक गुणाचा, ब्रह्मवर्चसाचा आणि उदात्त विचारांचा मार्ग आम्हीं चोखाळला पाहिजे. ह्यासाठीं परशुरामासारख्या महापुरुषांच्या उत्सवांनीं आमच्या मनाला निर्मल तपश्चरणाचें, निष्कलंक तेजस्वितेचें, अस्खलनीय कर्तव्यदक्षतेचें आणि अनुपमेय सात्त्विक वृत्तीचें वळण लागावें, व त्यायोगें आमची आध्यात्मिक आणि आधिभौतिक उन्नति व्हावी, हीच आमची परमेश्वरापाशीं प्रार्थना आहे.

# ख्रिस्ती धर्माची वाढ. : : : ३

काळ : अग्रलेख ता. २६।४।१९०१

● ह्याच विषय ता. २६।७।१९०१ च्या "ख्रिस्ताची आज्ञा" या लेखांत चर्चिला आहे. दुष्काळानंतर उठलेल्या धर्मांतराच्या वावटळींत प्रस्तुत विषय विशेष जिव्हाळ्याचा होता. मुंबईचे लॉर्ड बिशप रे. डॉ. मॅकआर्थर यांनीं २४।४।१९०१ रोजीं लंडन येथें व्याख्यान देऊन प्रतिपादन केलें कीं, हिंदुस्थानांतील लोकांनीं आपआपले धर्म सोडून ख्रिस्ती धर्माची दीक्षा घ्यावी, म्हणजे त्यांचें एकराष्ट्र सिद्ध होईल.

येशू ख्रिस्ताबरोबर ख्रिस्ती धर्माला सुरवात झाली व तेव्हांपासून तो धर्म हळूहळू वाढत आहे. एकुणीसशें वर्षांच्या पूर्वी कोठें कांहीं नव्हतें. ख्रिस्ती धर्माचें कोठें नांवही ऐकूं येत नव्हतें. त्या वेळीं रोमन लोक सत्ताधीश होते व त्यांचा धर्म चोहोंकडे चालत होता; व इजिप्त वगैरे ठिकाणीं त्या त्या ठिकाणचे निरनिराळे धर्म प्रचलित होते. अशा स्थितीमध्यें येशू ख्रिस्त जन्माला आला व त्यानें आपल्या धर्माची संस्थापना केली. तेव्हांपासून आजपर्यंत हा धर्म एकसारखा वाढतच आहे. तो अमुक ठिकाणीं वाढला परंतु अमुक ठिकाणीं वाढणार नाहीं, असें म्हणण्याला मुळींच जागा नाहीं. त्याचा फैलाव करण्यासाठीं सर्व ठिकाणीं जारीनें प्रयत्न सुरू आहेत, व त्या प्रयत्नांना यशही येत आहे. हा धर्म जसा इतर देशांत वाढत आहे, तसाच तो हिंदुस्थानांतही वाढत आहे. हा धर्म हिंदुस्थानांत कशा प्रमाणानें वाढत आहे, हें दाखविण्याकरितां मुंबईच्या

ट्रॅक्ट सोसायटीच्या एका हस्तपत्रकामध्यें कांहीं आंकडे दिलेले आहेत. ते आम्ही आपल्या वाचकांकरितां येथें देतों :—

"१८५१ त प्रॉटेस्टंट मताचे केवळ ९१,०९२ एतद्देशीय ख्रिस्ती लोक होते. १८६१ त, म्हणजे दहा वर्षांनंतर, त्यांची संख्या १,३८,७३१ झाली. पुढें दहा वर्षांनीं म्हणजे १८७१ त, २,२४,२५८; १८८१ मध्यें ४,१७,३७२; १८९० त ५,५९,६५२ व १८९८ सालीं हिंदुस्थानांत एकंदर ७,७२,०५५ प्रॉटेस्टंट लोकसंख्या होती. ही केवळ प्रॉटेस्टंट लोकाची संख्या आहे. याशिवाय या देशांत रोमन कॅथॉलिक, ग्रीक व सीरियन मतानुसारी ख्रिस्ती लोक आहेत. १८९१ च्या सरकारी खानेसुमारीवरून कळतें कीं, त्या वेळेस हिंदुस्थानामध्यें एकंदर २२,८४,१७२ ख्रिस्ती लोकांची संख्या होती, व ती आजपर्यंत बरीच वाढली आहे; व १९०१ मध्यें जी खानेसुमारी होईल तिजवरून दिसून येईल कीं, सुमारें ३० लक्ष लोक हिंदुस्थानामध्यें ख्रिस्ती आहेत."

वरील आंकडे जितके विस्तृत व निरनिराळ्या प्रकारची माहिती देणारे असावेत तितके नाहींत. ख्रिस्ती लोकांनीं आपल्या कर्तबगारीचे आंकडे द्यावयाचे म्हणजे ते याहून निराळ्या तऱ्हेचे द्यावयास पाहिजे होते. विशेष चांगल्या प्रकारानें निरनिराळ्या बाबतींमध्यें तुलना करितां येईल, किंवा अनुमानें काढितां येतील, अशा प्रकारचे हे आंकडे मुळींच नाहींत. असे आंकडे कोणापाशीं असले तर ते शोधक मिशनरी लोकांपाशींच असावयाचे. परंतु लोकांना बाटविण्याच्या कामांत गर्क झालेल्या या लोकांनीं आपल्या जमाखर्चाचा खर्डा जसा बारकाईनें आणि तपशीलवार रीतीनें तयार करावयास पाहिजे होता, तसा तयार केल्याचें वरील आंकड्यांवरून दिसून येत नाहीं.

परंतु त्यांनीं वर दिलेल्या ठोकळ आंकड्यांमध्येंही आपणांला कांहीं विचार करण्यासारखें नाहीं असें नाहीं. ज्याला अंतःकरण म्हणून आहे, त्याला भीति वाटण्यासारखें त्या आंकड्यांमध्यें कांहीं तरी आहे, यांत संशय नाहीं. ज्याच्या डोक्यांत ज्ञान म्हणून कांहीं पदार्थ आहे, त्याच्या अंगावर शहारे उठण्यासारखें कांहीं तरी भयंकर त्या आंकड्यांमध्यें आहे, हें खास. ज्याला आपला देश म्हणून कांहीं आहे, ज्याला आपला धर्म म्हणून कांहीं आहे, त्याची छाती दडपून टाकण्यासारखें कांहीं तरी त्या आंकड्यांमध्यें आहे, याबद्दल शंका नाहीं. १८९१ सालमध्यें हिंदुस्थानांतील ख्रिस्ती लोकांची संख्या त्या वेळच्या

खानेसुमारीप्रमाणें २२,८४,१७२ होती, व १९०१ सालामध्यें ही संख्या तीस लक्षांपर्यंत वाढेल असा अंदाज वर दिलेला आहे. मागील दशकांतील खिस्ती लोकसंख्येच्या वाढीच्या प्रमाणाची तुलना केली असतां, १९०१ सालामध्यें येथील खिस्ती लोकांची संख्या तीस लक्षांपर्यंत होईल, हा अंदाज बऱ्याच रीतीनें खरा ठरण्याचा संभव आहे; व हा आंकडा आपण खरा धरून चाललों, तर त्यापासून असा अर्थ निष्पन्न होतो कीं, गेल्या दहा वर्षांमध्यें हिंदुस्थानांत ७,१५,८२८ खिस्ती लोक अधिक वाढले. हिशेबाच्या सोयीसाठीं खिस्ती लोक दहा वर्षांमध्यें सात लक्ष वीस हजार वाढतात असा ठोकळ आंकडा आपण घेतला, तर त्यावरून असें निघतें कीं, प्रत्येक वर्षी ७२,००० खिस्ती लोक जास्त वाढत आहेत. ३६० दिवसांमध्यें ७२,००० लोक वाढले म्हणजे अर्थातच प्रत्येक दिवशीं दोनशें लोकांची भर खिस्ती धर्मामध्यें पडत आहे असें निष्पन्न होतें. किंवा प्रत्येक तासाला खिस्ती लोकांची संख्या सरासरीच्या मानानें आठानें वाढत आहे. आतां प्रत्येक तासाला ज्या या आठ लोकांची भर खिस्ती धर्मात पडत आहे ते सर्व इतर धर्मांतून बाटून त्या धर्मामध्यें गेलेले असतील असें नाहीं. यामध्यें परकीय देशांतून आलेले खिस्ती लोक आणि मूळच्या खिस्ती लोकांच्या पोटीं जन्मास आलेले लोक ह्यांचाही समावेश झालेला आहे. असे लोक आठांपैकीं चार असण्याचा संभव नाहीं, त्यांची संख्या कमी असली पाहिजे. तरी पण ती चार आहे असें मानलें, तरी बाकीचे चार राहतात ते खिस्ती धर्मात कोठून येतात, हा महत्त्वाचा प्रश्न आहे. पण ह्याचें उत्तर शोधण्याला फार लांब जावयाला नको. हे लोक हिंदुस्थानांतील हिंदु, मुसलमान, जैन, शीख, यहुदी, वगैरे धर्मांतील लोकांमधून बाटवून खिस्ती धर्मामध्यें ओढलेले असतात, हें अगदीं उघड आहे. म्हणजे यावरून असें निष्पन्न होतें कीं, हिंदुस्थानांत हल्लीं प्रत्येक पंधरा मिनिटांमध्यें एक मनुष्य बाटविला जात आहे, व प्रत्येक तासामध्यें आपल्या धर्माचे चार अभिमानी लोक स्वधर्माला मुकत आहेत. सूर्य उगवल्यापासून मावळेपर्यंतच्या लहानशा अवधीमध्यें आपल्या देशांतील सुमारें पन्नास लोक बाटविले जात आहेत, व एक रात्र आणि एक दिवस ह्यांच्या अवधींतील मिशनरी लोकांच्या कामाची मोजदाद घेतली तर वरील प्रमाणावरून आपल्याला असें आढळून येईल कीं, तेवढ्या मुदतीमध्यें ते शंभर माणसांना आपल्या धर्मा-

पासून भ्रष्ट करीत आहेत. आणि चंद्राची पृथ्वीभोंवतीं एक प्रदक्षिणा झाली नाहीं तों मिशनरी लोक हिंदुस्थानातील तीन हजार लोक बाटवून टाकीत आहेत, असें प्रमाण निघतें; व एका चैत्र शुद्ध प्रतिपदेपासून फाल्गुन वद्य अमावास्येपर्यंत आपल्या देशांतील धर्मखात्याच्या हिशेबाकडे आपण दृष्टि फेंकली, तर आपल्याला असें दिसून येईल कीं, एवढ्याशा थोड्या मुदतीमध्यें छत्तीस हजार लोक आपल्या धर्माच्या नांवें पडून ख्रिस्ती धर्माच्या खात्यांत जमा झालेले आहेत.

हे आंकडे पाहून आपल्याला कांहीं वाटावयाला नको काय? ही जमाखर्चाची स्थिति पाहून अशाच रीतीनें आपण रोजगार चालविला, तर लवकरच आपलें दिवाळें निघेल, हा विचार आपल्या मनांत यावयाला नको काय? ज्या धर्मांतून प्रत्येक दिवशीं निदान शंभर लोक बाटून दुसऱ्या धर्मांत जात आहेत, त्या धर्माचें पुढें काय होणार याबद्दल कोणालाच दहशत वाटावयाला नको काय? पण त्याबद्दल कोणाला काय वाटतें आहे? जे ते आपआपल्या ठिकाणीं स्वस्थ बसलेले आहेत, व ह्या विषयाकडे जितकें लक्ष जावयाला पाहिजे आहे तितकें कोणाचेंच जात नाहीं, ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे.

ह्या धर्माच्या बाबतींत आमची स्थिति बऱ्याच अंशीं मोंगल बादशहांच्या सारखी झालेली आहे. मोंगल बादशाहीला जे शत्रु उत्पन्न झाले, त्यांनीं प्रथमतः दिल्लीवर किंवा आग्र्यावर स्वारी केली नाहीं, किंवा विजापूरच्या राजवाड्यावर आपलें निशाण लावण्यासाठीं ते गेले नाहींत. ते दूरदूरचे मुलुख हस्तगत करून घेत होते, किल्ले काबीज करीत होते, आणि लोकांपासून वसूल घेत होते. आपल्या बादशाही सरहद्दीवर आपले नवीन उद्भवलेले लहान लहान शत्रु काय करीत आहेत, याची दिल्लीस आणि विजापुरास कोणाला दादही नसे. शराब आणि मजलशी यांमध्यें मुसलमान बादशहा गुंग झालेले असत. परंतु त्यांचे शत्रु फार दक्षपणानें वागून व एकामागून एक प्रांत काबीज करून जेव्हां पुष्कळ बलाढ्य झाले, तेव्हां त्या बादशहांचे डोळे उघडले. पण मग त्याचा काय उपयोग! त्याच्या आधींच त्यांचे डोळे उघडावयाला पाहिजे होते, पण ते उघडले नाहींत. आणि त्याचा परिणाम असा झाला कीं, त्यांचीं मोठमोठालीं राज्यें असूनही तीं अखेरीस शत्रूंच्या ताब्यांत गेलीं. ह्या सोळाव्या

आणि सतराव्या शतकांतील मोंगलाई राज्यांप्रमाणें हल्लीं आमच्या धर्माची स्थिति झालेली आहे. ख्रिस्ती मिशनरी हे आमच्या धर्माच्या अतिशय दूरच्या सरहद्दीवर हल्ले करीत आहेत, व हिंदुधर्माच्या मध्यभागीं असलेल्या मोठमोठ्या राजवाड्यांतून झोंप घेत पडलेले लोक त्यांकडे काडीमरही लक्ष देत नाहींत. हें खरें आहे कीं, आज शूद्र, अतिशूद्र अशाच लोकांना पाद्री लोक विशेषतः बाटवीत आहेत. परंतु त्यांच्याबद्दल वरिष्ठ प्रतीच्या ब्राह्मण वगैरे लोकांनीं बेफिकीर राहणें अगदीं गैरशिस्त आहे. मुसलमान राजे जसे एक प्रकारच्या निद्रेमध्यें होते, तसे जर आपण आपल्या उच्चत्वाच्या आणि श्रेष्ठत्वाच्या निष्फळ निद्रेमध्यें गुंग होऊन राहिलों, तर त्या मुसलमान राजांची जी वाट झाली, तीच आपलीही झाल्यावांचून राहणार नाहीं.

प्रत्येक दिवसाला आपल्या धर्मांतून शंभर लोक बाटून ख्रिस्ती धर्मांत जात असतांना आपण आपला धर्म सुरक्षित आहे असें म्हणून स्वस्थ बसावें, यासारखें संमोहाचें दुसरें कोणतेंच चिन्ह नाहीं. हा सुरक्षितपणा कोठला? असल्या सुरक्षितपणावर विश्वास ठेवून स्वस्थ बसणें व प्रतिकाराचा कांहींही उपाय शोधून न काढणें, हें बिलकूल श्रेयस्कर नाहीं. कोणीं एखाद्यानें एखाद्या मोठ्या वाड्याच्या भिंतीची दररोज एक वीट रात्रीची काढून न्यावयाची असा क्रम ठेविला, तर तो त्या वाड्याच्या भिंतीला एकदम भोंक पाडून आंतील द्रव्याचा अपहार करणार नाहीं हें खरें, तरी पण त्याचा असाच क्रम चालू राहिला, तर तो कधीं तरी एक दिवशीं त्या घरांतील सर्व चीजवस्त झाडून नेल्यावांचून कधींही राहणार नाहीं. परंतु त्या वाड्याचा मालक जर मूर्खपणानें असें म्हणेल कीं, "कांहीं हरकत नाहीं, माझ्या वाड्याच्या भिंती इतक्या मोठ्या आहेत कीं, त्यांची एकेक वीट कोणीं काढून नेल्यानें कांहींही होणार नाहीं," तर अशा मनुष्याच्या सुरक्षितपणाबद्दल आपण त्याचें अभिनंदन करूं, किंवा त्याच्या मूर्खपणाबद्दल त्याची निर्भर्त्सना करूं! हा सुरक्षितपणा नव्हे, तर बुडत्याचा पाय अधिक अधिक खोलामध्यें जाण्याचा हा प्रथमारंभ आहे.

आपण ह्या स्थितीचें कांहीं तरी परिमार्जन केलें पाहिजे. नुसत्या आपल्या धर्माच्या मोठेपणाच्या घमेंडीवर जाऊन उपयोगी नाहीं. आपण आपल्या धर्माच्या इतर बाबींबरोबर ह्याही विषयाची वाटाघाट केली पाहिजे. आपण

प्राणायाम करून पंधरा मिनिटें समाधि लाविली, तर तेवढ्या अवकाशामध्यें मिशनरी लोक आपल्यांतील एका इसमाला परधर्मांत ओढून नेतात, व आपल्या त्या यथासांग समाधीनेंही आपण आपल्या त्या पूर्वीच्या धर्मबंधूचें कांहीं एक कल्याण करूं शकत नाहीं! आपण दररोज सकाळीं एक तास संध्या केली म्हणजे आपल्या सर्व धर्मांची 'आलबेल' आहे असें मानण्याचे हल्लींचे दिवस नाहींत. आपण एक तास संध्या करतों, पण त्याच वेळांत तिकडे आपले चार धर्मबंधु बाटून ख्रिस्ती होतात, त्यांची वाट काय! जर एक तासाला चार याप्रमाणें आपल्या धर्मांतून लोक दुसऱ्या धर्मांत जाऊं लागले, तर संध्या तरी करायला कोण उरणार आहे! याकरितां आपण संध्या तर केलीच पाहिजे, परंतु त्याच्याच बरोबर आपल्यांतील संध्या करणारे लोक धर्मांतरामुळें कमी न होऊं देण्याचीही आपण खबरदारी घेतली पाहिजे. एकादशीच्या दिवशीं ईश्वराचें भजनपूजन करावें व आपण उपोषण व जागरण करून तो दिवस हरिभजनांत घालवावा हें उत्तम होय, व त्याप्रमाणें आपण करितोंही. पण आपण एकादशीचे चोवीस तास भजनपूजन करीत असतां तिकडे त्याच अवकाशांत आपल्या धर्मांतील शंभर लोक आपल्या देवाचें भजनपूजन करण्याला कायमचे अंतरले, हा विचार मनांत आला, म्हणजे आपल्याला कांहींच वाटावयाचें नाहीं काय? नुकतीच अहमदाबादेस आपल्या धर्माच्या उत्कर्षासाठीं तीन दिवस धर्मपरिषद् भरली होती. ती कोणत्या उपायानें आपल्या धर्माचा उत्कर्ष करावा, ह्या गोष्टीचा विचार करीत असतां, तिकडे त्या तीन दिवसांत मिशनरींनीं आपल्या धर्मांतले तीनशें लोक बाटविले! आपण पंधरा मिनिटें जेवीत असलों किंवा आपल्या मित्रापाशीं कांहीं गोष्टी बोलत असलों, तर तेवढ्या अवकाशांत आपल्यांतील एक इसम परधर्मांत जातो. आपलें एक स्नान संपलें नाहीं तों एक मनुष्य आपल्या धर्माला मुकतो. आपण दिवसा केलेल्या श्रमाचा परिहार होण्यासाठीं रात्रीं दहा वाजल्यापासून सकाळीं सहा वाजेपर्यंत झोंप घेण्यासाठीं निजलों असतां आपल्या धर्मांतील तीस बत्तीस इसम परधर्मांत ओढून नेले जातात. आपण जेवीत असलों, स्नात असलों, बोलत असलों, बसत असलों, जागे असलों किंवा झोंपेंत असलों, संध्या करीत असलों किंवा गप्पा मारीत असलों, उपोषण करीत असलों किंवा जेवीत असलों, कांहीं करीत असलों, तरी आपल्या

देशांतले लोक बाटून स्वधर्मभ्रष्ट होत आहेत. अशा स्थितींत आपल्या धर्माला सुरक्षितपणा तो कोठें आहे? आणि आपण कोणत्या आशेवर स्वस्थ बसावें? आपण जागे असतांना बाटविले जाणारे लोक आपल्या डोळ्यांपुढें दिसतात. आणि आपल्याला झोंप लागली असली तरी बाटलेले लोक आपल्याला स्वप्नांमध्यें दिसतात. ह्याप्रमाणें जिकडे जावें तिकडे, आणि जेव्हां पाहावें तेव्हां, मिशनरी लोक आपल्या देशबांधवांना धर्मभ्रष्ट करीत असतांना दृष्टीस पडतात. इतकी भयंकर स्थिति झालेली असून आपण उदासीनच असावें काय? आपण पांघरलेल्या वस्त्राच्या चारी बाजूंनीं पेट घेतला असून आपण स्वस्थ घोरतच पडावें काय?

आपला हिंदु धर्म मोठा आहे, त्यांत मोठमोठे ऋषि होऊन गेले आहेत, तो अनेक वर्षें टिकला आहे, त्याची पाश्चिमात्य पंडित स्तुति गात आहेत, वगैरे पोकळ अभिमानावर दंग होऊन आपण स्वस्थ बसलों, तर त्याबद्दल आपल्याला पुढें पश्चात्ताप होण्याचा संभव आहे. यासाठीं व खिस्ती धर्माच्या ऐहिक सामर्थ्याचें यथास्थित आकलन होण्यासाठीं आपण त्या धर्माच्या पूर्व इतिहासाकडे जरूर लक्ष पुरविलें पाहिजे. आपण म्हणतों, आमच्या हिंदुधर्मामध्यें पुष्कळ लोक आहेत; त्यामुळें खिस्ती लोकांनीं जरी कांहीं खालचीं खालचीं महारेंपोरें बाटविलीं, तरी आपल्याला डगमगण्याचें कांहीं कारण नाहीं. पण हा भ्रम आहे. रोमन लोकांचें राष्ट्र पूर्वी फार विस्तृत झालें होतें. त्या वेळची साम्राज्याची लोकसंख्या सुमारें पांच कोटी चाळीस लक्ष होती. हे लोक बहुतेक रोमन लोकांच्या धर्मानेंच नियंत्रित होते, व रोमन लोकांच्या धर्मामध्येंही कित्येक फारच उत्कृष्ट आणि उदात्त अशा कल्पना होत्या. पण त्या सर्व कल्पना खिस्ती धर्माच्या मतापुढें दिपून गेल्या, व रोमन साम्राज्यांतील त्या पांच कोटी चाळीस लक्ष लोकांपैकीं सर्वजण खिस्ती झाले! रोमन धर्माचें नांव सांगण्याला किंवा ज्युपिटर आणि सॅटर्न ह्यांची पूजा करण्याला आज एकही रोमन मनुष्य उरलेला नाहीं! त्या सर्वांचा खिस्ती धर्मानें खग्रास करून टाकिला आहे. ग्रीस देशांतील मुख्य शहर अथेन्स हेंही विद्येकरितां, शहाणपणाकरितां आणि धर्माच्या श्रेष्ठ आणि सात्त्विक कल्पनांकरितां फार प्रख्यात होतें, व त्या एका शहरची लोकवस्ती सुमारें दीड लक्ष होती. पण त्या दीड लक्ष लोकांपैकींच आज ग्रीक धर्माचा अभिमानी असा कोण उरला

आहे ? किंवा प्लेटो, ॲरिस्टॉटल, अलेक्झँडर आणि अल्किबाइडीज हे ज्या देवतांना पूज्य मानीत होते, त्यांनाच पूज्य मानणारा आज कोणता ग्रीक मनुष्य उरला आहे ? त्या सर्वांला ह्या ख्रिस्ती धर्मानें आपल्या पोटामध्यें गिळून टाकिलें आहे. ख्रिस्ती धर्मानें डॅन्युब नदीच्या पलीकडील त्या वेळच्या रानटी लोकांना दीक्षा देऊन आपल्या निशाणाखालीं ओढिलें, यांत कदाचित् कांहीं विशेष नसेल; ते बोलून चालून रानटीच होते. त्यांना विशेष प्रौढ अशा कोणत्याच धर्मकल्पना माहीत नव्हत्या. परंतु ग्रीस आणि रोम ह्यांची स्थिति तशी नव्हती. जगांतील सर्वांत मोठे म्हणून मानले गेलेले तत्त्ववेत्ते त्या वेळीं ग्रीस आणि रोम येथें होते. पण तें त्यांचें सर्व तत्त्वज्ञान त्यांच्यापाशीं असूनही ख्रिस्ती धर्मानें त्यांना जिंकिलें. असें जर आपण इतिहासामध्यें वाचतों, तर आपल्या धर्माबद्दल घमेंडी मारून बेसावध असण्यापेक्षां सावध राहून कांहीं तरी उपाय योजणें हेंच अधिक शहाणपणाचें काम नाहीं काय ? ग्रीस आणि रोम येथील लोकांचें धर्मांतर घडून आलें, त्या वेळेला ख्रिस्ती धर्मानुयायी लोकांना त्या वेळच्या राजांचें फारसें पाठबळ नव्हतें. पण हल्लींची स्थिति त्याहून अगदीं भिन्न आहे. यासाठीं बेफिकीरपणानें न राहतां स्वधर्मसंरक्षणासाठीं कांहीं तरी सक्त उपाय योजणें अत्यंत आवश्यक आहे.

आतां हे उपाय हल्लींच्या आपल्या स्थितीमध्यें कोणाकडून योजिले जावेत, हा एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे. परंतु कोणींही थोडासा विचार केला असतां त्याला ह्या प्रश्नाचें उत्तर सहज रीतीनें सुचण्यासारखें आहे. सामान्य लोक, त्यांचे धर्मगुरु, नेटिव्ह राजे आणि आमचे सार्वभौम राजे, ह्या चार ठिकाणांहून आमच्यावर येणाऱ्या संकटांचा प्रतिरोध करण्याकरितां कांहीं तरी उपाय योजण्यांत आले पाहिजेत. परंतु यांपैकीं कांहीं जर काम होईल तर तें सामान्य लोकांकडूनच होईल. धर्मगुरु, नेटिव्ह राजे आणि सार्वभौम राजे हे या संबंधांत कुचकामाचे आहेत. त्यांच्यांत शक्ति नाहीं म्हणून कुचकामाचे असें नव्हे, तर त्यांना इच्छा नाहीं. आमचे सार्वभौम राजे इंग्रज सरकार हे तर धर्माचे बाबतींत कानांत तुळशीपत्रें घालूनच बसलेले आहेत. कोणी कांहीं करा, कोणाचें कांहीं होवो, आपण धर्माचे बाबतींत हात घालावयाचा नाहीं, असें ब्रीद बांधून इंग्रज सरकार स्वस्थ बसलें आहे. पण ही त्यांची वृत्ति बरोबर नाहीं. ह्यांत आमचें नुकसान आहे. सरकारनें आम्हाला धर्मस्वातंत्र्य

दिलें आहे, ह्या वेडगळ समजुतीनें भुलून जाऊन आम्ही सर्व फसतों आहों. धर्मस्वातंत्र्य म्हणजे काय ? तर कोणी हिंदु ख्रिस्ती होवो किंवा कोणी ख्रिस्ती हिंदु होवो, सरकार तिकडे लक्ष देणार नाहीं. हें आमचें धर्मस्वातंत्र्य आणि हें आम्हांला सरकारनें दिलें आहे, म्हणून आम्ही उड्या मारितों. पण ह्या आमच्या मूर्खपणाबद्दल हंसावें कीं रडावें, हें मात्र समजणें कठिण आहे. ख्रिस्त्याचा हिंदु होणें हें जर आजमित्तीला शक्य नाहीं व हिंदूचें ख्रिस्ती होणें मात्र प्रत्येक तासाला चार या प्रमाणानें प्रत्यक्ष घडून येत आहे, तर मग कोणी हिंदु ख्रिस्ती होवो किंवा ख्रिस्ती हिंदु होवो, असें म्हणण्यांत काय अर्थ आहे ? असें म्हणणें ही निवळ फसवणूक आहे. माझें तें माझें आणि तुझें तेंही पण माझेंच, अशांतला हा प्रकार आहे. ही खरी साम्यबुद्धि नव्हे. निदान आतांपर्यंतच्या अनुभवावरून असें म्हणणें भाग पडतें कीं, आमच्या धर्मांतील लोक आमच्याच धर्मामध्यें कायम राहण्याकरितां आम्हांला आणि आमच्या धर्माला कांहीं तरी जास्त संरक्षणाचा नियम अवश्य पाहिजे. हा फ्री ट्रेडच्या तत्त्वावर चाललेला आमच्या धर्माचा व्यापार लवकरच हिंदुस्थानांतील लोकांचे डोक्यावरून हात फिरवून त्याला रसातळाला पोहोंचविल्यावांचून कधींही राहणार नाहीं. यासाठीं आम्हांला या धर्माच्या बाबतींत कांहीं तरी जास्त संरक्षण मिळालें पाहिजे. परंतु ख्रिस्ती राजांपासून ख्रिस्ती धर्माच्या हल्ल्याविरुद्ध आम्हांला कितपत संरक्षण मिळेल, याबद्दल अनुमान करणें फारसें कठिण नाहीं.

पूर्वींचे आमचे राजे प्रजेच्या धर्माचें संरक्षण करण्यासाठीं बरेच प्रयत्न करीत असत, अशाबद्दल इतिहासांतून उदाहरणें आढळतात. ह्यांतील अगदीं अलीकडचें उदाहरण म्हणजे आमच्या चिमाजीआप्पांचें होय. वसईकडील लोकांना पोर्तुगीज लोकांच्या इन्किझिशनपासून अतिशय त्रास होत असे. ती दुःखाची कहाणी चिमाजीआप्पांच्या कानांवर गेल्याबरोबर त्यांनीं फिरंग्यांचें पारिपत्य करण्याकरितां वसईची मोहीम केली, व त्यांत ते आपल्या प्रजेच्या धर्मोन्नतीसाठीं इतक्या उत्सुकतेनें लढत होते कीं, वसईचा किल्ला आपल्या हातीं आतां येणें अशक्य आहे, असें त्यांस वाटल्यावर " मला तरी तोफेपुढें बांधून तोफ उडवा, म्हणजे त्या योगानें तरी माझें शिर त्या किल्ल्यामध्यें जाऊन पडेल, " असे त्यांच्या तोंडून उद्गार निघालेले आहेत. पण आतां ती

स्थिति कशाला पाहिजे ? ते राजेही गेले आणि ती वेळही गेली. आता या थंडीच्या कडाक्यांत आंब्यांच्या फळांची आपल्याला कशाला आशा पाहिजे ? बाकी इंग्रज सरकार सुद्धां सर्वच ठिकाणीं धर्माच्या कामीं कानांत तुळशीपत्रें घालून बसत नाहीं. हेंच तत्त्व जर त्यांनीं सर्वत्र पाळिलें असतें, तर आज इतिहासांतल्या किती तरी लढाया कमी झाल्या असत्या, व किती तरी रक्त मनुष्यांच्या शिरांतूनच राहिलें असतें ! पण त्या लढाया ख्रिस्ती धर्मासाठीं होत्या. आणि आम्ही बोलतों आहों ती हिंदुस्थानांतील हिंदु, मुसलमान, ग्रीख वगैरे धर्माबद्दलची गोष्ट आहे, हें लक्षांत बाळगिलें पाहिजे.

दुसरी मदत मिळण्याची जागा म्हटली म्हणजे आपले नेटिव्ह राजे ही होय. परंतु ख्रिस्ती साम्राज्याच्या जात्याच्या तळीमध्यें जोंपर्यंत ते भरडले जात आहेत, तोंपर्यंत ख्रिस्ती धर्माच्याविरुद्ध त्यांच्या स्वतःचे धर्माला—त्यांच्या आईबापांच्या धर्माला—त्यांच्या पूर्वजांच्या धर्माला—ते मदत करतील, अशी आशा बाळगण्याला फारच थोडी जागा आहे. अशा स्थितींत जेव्हां मुसळांना अंकुर फुटतील, किंवा थंडीच्या दिवसांमध्यें कोकिळा ओरडूं लागतील, तेव्हां या नेटिव्ह राजांकडून आपल्या धर्माच्या संरक्षणाला मदत मिळाली तर कोण जाणे ! तोंपर्यंत त्याबद्दल आशा नाहीं. उलट हे लहान लहान राजेही ख्रिस्ती धर्मालाच मदत करीत आहेत. ख्रिस्ती धर्माचीं देवळें, इस्पितळें आणि शाळा हीं ज्या संस्थानांतून नाहींत असें एक तरी संस्थान कोठें सांपडेल किंवा नाहीं, याची वानवाच आहे. सारांश, नेटिव्ह राजे हे आपल्याला मदत मिळण्याचें स्थान नव्हे. तेव्हां यांना सोडून आपल्याला धर्मगुरूंकडेच वळलें पाहिजे.

धर्मगुरु हे धर्माचे गुरु म्हणून त्यांजकडे वळावयाचें; परंतु धर्माचें संरक्षण करण्याची हल्लीं त्यांच्यामध्यें तरी शक्ति व इच्छा आहे किंवा नाहीं, हा एक मोठा प्रश्न आहे. निदान हल्लीं ह्यांच्याकडून आपल्या गुरुत्वाचा लोकांना जसा फायदा मिळावा, तसा मिळत नाहीं. हल्लीं धर्मगुरूंकडून धर्मसंरक्षणाचें कर्तव्यकर्म बरोबर रीतीनें मुळींच बजाविलें जात नाहीं. आमच्या धर्मातले लोक वाटले तर तिकडे इंग्रज सरकार दुर्लक्ष करोत, नेटिव्ह राजे दुर्लक्ष करोत, पण आमच्या धर्मगुरूंनीं ह्या गोष्टीकडे कधींही दुर्लक्ष करतां कामा नये. त्यांच्याकडे आज हजारों रुपयांचीं संस्थानें चालत आहेत तीं कशासाठीं ? त्यांच्या धर्मांतील लोकांनीं अन्नादिकासाठीं बाटून ख्रिस्ती व्हावें आणि त्यांनीं

सार्वजनिक पैशावर मजा मारावी, म्हणून ह्यांना हीं संस्थानें तोडून दिलेलीं आहेत काय ! शंकराचार्यांनीं यांना चारी दिशांला चार मठ स्थापून दिले व त्यांच्यानंतरच्या राजांनीं जहागिरी दिल्या, त्यांचा ह्यांनीं काय उपयोग करावयाचा ! कैक लोक अन्नासाठीं धर्मांतर करीत असतां त्यांनीं स्वस्थ बसणें अगदीं उपयोगाचें नाहीं. त्यांनीं आपल्या मठांतून आणि जुन्या समजुतींतून बाहेर पडलें पाहिजे, व बाहेर जगामध्यें आपल्या मदतीची अपेक्षा करीत किती लोक बसले आहेत, हें त्यांनीं पाहिलें पाहिजे. ख्रिस्ती लोक अमेरिकेंतून आणि इंग्लंडांतून पैसे आणून येथल्या लोकांना वाटवितात, आणि आमच्या धर्मगुरुंच्या जवळचे लक्षावधि रुपये भलत्याच कोठच्या तरी कामांत खर्च होतात, ही किती दुःखाची गोष्ट आहे ! आपल्या धर्मांतील हजारों लोक भाकरीच्या तुकड्यासाटीं दुसऱ्याच्या धर्मांत जात असतां आपल्याला हत्ती, घोडे आणि चांदीचीं व सोन्याचीं भांडीं कशाला पाहिजेत, असे विचार ह्यांच्या मनांत येतील तो खरा सुदिन ! संन्याशांना हत्ती आणि त्यावर सोन्याच्या अंबाऱ्या कशाला पाहिजे आहेत ! संन्याशांनीं स्वधर्माच्या अभिवृद्धयर्थ सर्व गोष्टींचा संन्यासच केला पाहिजे. आपल्या धर्मांतून एक तासाला चार याप्रमाणें लोक परधर्मामध्यें जातात, याच्याबद्दल परमेश्वराच्या घरीं जर कोणी जबाबदार असेल, तर ज्यांच्यापाशीं धर्मासाटीं म्हणून पैसे देऊन ठेविलेले होते आणि ज्यांना धर्माचें संरक्षण करण्यासाटीं म्हणून नेमिलेले होते, त्यांच्यावरच त्याची जबाबदारी आहे. दहा वर्षांमध्यें सात लक्ष लोक परधर्मामध्यें जातात आणि अशा वेळीं आम्हांला धर्मगुरु होते, आणि त्यांच्यापाशीं पैसेही होते, असें जर आम्हीं सांगितलें, तर तें कोणाला तरी खरें वाटेल काय ! आम्ही एकदां असेच बौद्ध धर्माच्या वावटळीमध्यें सांपडून कोणीकडे तरी उडून जाण्याच्या बेतांत होतों. त्या प्रसंगीं आम्हांला आमच्या धर्मगुरुंनीं बचाविलें म्हणून हल्लींच्या वावटळीमध्यें त्यांच्या गादीवर असलेले हल्लींचे धर्मगुरु आम्हांला सोडवितील अशा आशेनें आम्ही हिंदुस्थानांतील सर्व लोक त्यांच्याकडे पाहत आहों. आमची उत्सुकता हेंच त्यांचें बळ आहे. त्याचा फायदा घेण्याचें ज्ञान त्यांच्या अंगांत असेल, तर ते आम्हांला तारतील व आपणही तरतील. नाहींतर दोघेही बुडण्याची ही वेळ आलेली आहे. आज सर्व धर्मगुरुंच्या हातांत जेवढी लक्ष्मी जांभया देत पडलेली आहे, तेवढी जर एखाद्या कर्तृत्ववान् पुरुषाच्या हातीं असती, तर त्यानें तिच्या

साह्यानें सर्व जगाला थक्क करून सोडण्यासारखीं कृत्यें केलीं असतीं. आमच्यांतील लोकांना अन्नासाठीं धर्मांतर करावें लागत आहे, ह्याचें कारण आमच्याजवळ पैसे नाहींत असें नाहीं; तर ज्यांच्यापाशीं ते पैसे आहेत, त्यांना त्यांचा विनियोग कसा करावा, हें कळत नाहीं; अक्कल आणि पैसा ह्यांची चुकामूक पडलेली आहे, हें आहे.

निरनिराळ्या धर्मसंरक्षकांची अशी स्थिति असतांना सामान्य लोकांच्या हातून या बाबतींत विशेष तें काय होणार आहे? तेव्हां परमेश्वराची जी इच्छा असेल ती खरी!



'काळ' कर्ते परांजपे व लो. टिळक ( लोणावळें, १८९५ )

# इंग्रजांचें सामर्थ्य : : : ४

काळ: अग्रलेख ता. ३।५।१९०१

● नांव 'सामर्थ्य' पण विवेचन दौर्बल्याचें. ता. १७-५-१९०१ च्या "इंग्लंडच्या अडचणी" या अग्रलेखांत याच विषयाचा विचार वेगळ्या दृष्टीनें केलेला आहे. त्या काळांतील जनता राज्यकर्त्यांच्या सामर्थ्याच्या अवास्तव कल्पनांमुळें इतकी भारली गेली होती कीं, या भुलीवर असे उतारे जरूर होते. ता. १८।४।१९०२ च्या स्फुट विचारांत 'काळ'कर्ते म्हणतात, 'हा वृक्ष आंतून पोखरत चाललेला आहे.'

युरोपांतील स्थिति कशी झाली आहे, परस्पर राजांच्यामध्यें बाह्यात्कारीं किती प्रेमभाव आहे आणि आंतून किती द्वेष आहे, आपलीं सैन्यें आणि व्यापार वाढविण्याबद्दल कोण कशा खटपटी करीत आहेत, ह्याबद्दल आपण युरोप खंडांमधील वर्तमानपत्रांमधून नेहमीं हकीगती वाचीत असतों. त्या कांहीं कोणाच्या पदरच्या नव्हेत, किंवा त्या आपण कोणीं उत्पन्न केल्या आहेत असेंही नाहीं. तेव्हां त्या हकीकतींवरून पाहतां, पुष्कळांचा असा समज झालेला आहे कीं, युरोपखंडामध्यें निरनिराळ्या राजांच्या दरम्यान केव्हांना केव्हां तरी एखादी मोटी जंगी लढाई झाल्यावांचून राहणार नाहीं. हें अनुमानही आपल्या इकडील लोकांचें नव्हे. हीं तिकडच्याच लोकांनीं केलेलीं भाकितें आहेत. आपल्या लोकांना तिकडच्या परिस्थितीबद्दल काय समजणार! आपण कधीं तिकडे गेलों आहों, किंवा त्यांच्याशीं मिळून मिसळून वागलों आहों, किंवा त्यांच्याशीं कांहीं

कारस्थानाच्या गोष्टी केल्या आहेत, कीं त्याच्या योगानें युरोपांतील खऱ्या राजकारस्थानाचें वर्म आपल्याला कळूं शकेल! आपण सर्व युरोपची स्थिति त्यांच्याच डोळ्यानें पाहणारे आहों. त्यांनीं युरोपांत शांतता आहे म्हटलें, म्हणजे आम्ही आनंदित होतों; आणि त्यांनीं युरोपांत लढाई होण्याचा रंग आहे म्हटलें, म्हणजे आम्ही चिंताग्रस्त होतों. ह्यापलीकडे युरोपियन परिस्थितीसंबंधानें आमचा जास्त अधिकार कांहींएक नाहीं. तरी पण इंग्रजांशीं आमचा संबंध जुळून आला असल्याकारणानें व त्यांच्या सुखदुःखांवर आमचें सुखदुःख अवलंबून असल्यामुळें इंग्रजांच्या परिस्थितीची, आमच्या सामर्थ्याप्रमाणेंच, थोडीबहुत अटकळ बांधणें अत्यंत आवश्यक व स्वाभाविक झालेलें आहे.

तिकडील लेखकांच्या लिहिण्यावरून असें दिसतें कीं, आज इंग्लंडसारखें विस्तृत आणि संपत्तिमान् आणि भाग्यशाली असें दुसरें कोणतेंही साम्राज्य नाहीं; पण ब्रिटिश साम्राज्य हें जर युरोपखंडांत मोठें साम्राज्य असेल, तर त्याच्याच बरोबर हीही गोष्ट कबूल केली पाहिजे कीं, त्या साम्राज्याचा हेवा करणारे लोकही युरोपखंडामध्यें पुष्कळ आहेत. रशिया, जर्मनी, ऑस्ट्रिया, वगैरे देश हे इंग्लंडचा हेवा करणाऱ्यांमध्यें प्रमुख होत, व यांचा हेवा म्हणजे नुसता तोंडाचा नव्हे. त्यांच्यापाशीं सैन्यें आहेत. तेव्हां त्यांच्याबद्दलच्या बलाबलाचा योग्य विचार करणें नेहमीं फार जरूरीचें आहे. युरोपखंडांतील गेल्या शतकाचा इतिहास पाहिला असतां त्यावरून असें आढळून येतें कीं, तिकडे लढाई सुरू झाली म्हणजे बहुधा असें होतें कीं, निरनिराळे राजे निरनिराळ्या पक्षांना जाऊन मिळतात. एकेकट्या राजांना लढण्याचे प्रसंग क्वचितच येतात. लढाईचे पूर्वी कांहीं कारणांवरून निरनिराळे तट पडतात, व निरनिराळे राजे निरनिराळ्या तटांमध्यें सामील होऊन नंतर लढाई सुरू होते. अशा रीतीनें दोन, तीन, चार व कधीं कधीं चारांहूनही अधिक राजांचा एकोपा जाहल्याचीं उदाहरणें इतिहासांतून पुष्कळ वेळां आढळतात व लढाईचा प्रसंग आला असतां आपल्या तटांत कांहीं तरी राजांनीं मिळावें, अशाबद्दल मुत्सद्दी लोकांच्या पुष्कळ खटपटी चाललेल्या असतात; व त्याच्यासाठीं कित्येक गुप्त व उघड तहही त्यांनीं करून ठेविलेले असतात. ह्या सर्व गोष्टी खऱ्या आहेत. तरी पण सामान्यतः बलाबलाचा विचार करावयाचा म्हटलें, तर तो निरनिराळ्या राजांचा स्वतंत्र रीतीनेंच केला पाहिजे.

अशा दृष्टीनें पाहिलें असतां इंग्लंडच्या वैभवाच्या मानानें इंग्लंडचें सामर्थ्य खरेंच कमी दिसतें. इंग्लंडचें सामर्थ्य आम्हां हिंदुस्थानांतील लोकांना फारच मोठें वाटत आहे, पण त्या वाटण्याचा इंग्लंडला प्रसंगीं काय उपयोग होणार आहे? हिंदुस्थानांत जेथें कोठें कांहींच नाहीं, तेथें इंग्लिशांचें सामर्थ्य अपार आहे, अशा कल्पना लोकांच्या मनांत बिंबलेल्या असल्या म्हणून त्यापासून इंग्लिशांना युरोपियन लढाईमध्यें काय फायदा होणार? इंग्लिशांच्या अमर्याद सामर्थ्याविषयींच्या कल्पनांचा फायदा हिंदुस्थानांत जर कांहीं गडबड झाली, तर त्यावेळीं होण्यासारखा आहे, हें कबूल. पण आज हिंदुस्थान इंग्लंडच्या विरुद्ध गडबड करील असा प्रसंग नाहीं. युरोपखंडांत लढाई उपस्थित झाली, तर कोणाचें बलाबल किती आहे, हा सांप्रतचा प्रश्न आहे. त्याचप्रमाणें इंग्लंडच्या बलाढ्यतेचा प्रत्यक्ष अनुभव दक्षिण आफ्रिकेंतील लोकांना आलेला आहे. त्यामुळें त्यांच्यांतील कांहीं लोकांना कदाचित् इंग्लिशांचें सामर्थ्य विलक्षण आहे, असें वाटत असेल. पण हें त्यांचें वाटणेंही प्रस्तुत प्रश्नासंबधानें आभासात्मकच आहे असें म्हटलें पाहिजे. कारण ट्रान्सवाल आणि ऑरेंज फ्री स्टेट हीं लहानशीं स्वतंत्र संस्थानें इंग्लंडनें एक दोन वर्षे श्रम करून व लक्षावधि सैन्य आणि कोट्यवधि रुपये खर्च करून जिंकिलीं, असें एकाद्या जाहीरनाम्यांत म्हटलें, तरी तेवढ्यावरून इंग्लंडच्या खऱ्या सामर्थ्याची खरी कल्पना युरोपियन लढाईच्या अनुरोधानें कोणालाही बांधितां यावयाची नाहीं. ट्रान्सवालमधील विजयश्रीच्या रम्यतेवरून युरोपियन लढाईसंबधानें कांहीं अनुमानें काढल्यास तीं कितपत बरोबर ठरतील, याच्याबद्दल जबरदस्त शंका आहे. सारांश, युरोपियन युद्धाच्या संबधानें इंग्लिशांच्या सामर्थ्याचा अंदाज करावयाचा असेल, तेव्हां तें सामर्थ्य हिंदुस्थानी मापानें किंवा ट्रान्सवाली मापानें मोजून उपयोगी नाहीं. हिंदुस्थानांतील सरहद्दीवरील आफ्रिडी लोकांशीं लढणें निराळें आणि रशियाच्या कोसॅक्सशीं लढणें निराळें. जर्मनीमधून तोफा, बंदुका व दारुगोळा विकत घेऊन रणांगणावर आलेल्या बोअर लोकांशीं लढणें निराळें आणि ज्यांच्याकडून तोफा, बंदुका व दारुगोळा हीं प्रत्यक्ष तयार केलीं जातात अशा जर्मन लोकांशीं लढणें निराळें. तेव्हां ह्या गोष्टी लक्षांत आणून इंग्लिशांच्या बलाबलाचा विचार अगदीं निराळ्या मार्गानेंच केला पाहिजे.

हा मार्ग म्हटला म्हणजे युरोपांतील प्रमुख राष्ट्रांच्या सैन्यांची परस्पर तुलना

करुन पाहणें हा होय. ह्या उपायानेंच इंग्लंडचें खरें सामर्थ्य कळण्याचा संभव आहे. युरोपियन राष्ट्रांच्या सैन्यांचे आंकडे अगदीं बरोबर रीतीनें कळणें कांहीं अंशीं कठीण आहे. तरी पण सामान्य अनुमानानें काढण्याइतके सचोटीचे आंकडे दुर्मिळ आहेत असें नाहीं, म्हणून ते आम्ही येथें देत आहों.

| देशांचें नांव | सैन्यांतील शिपायांची संख्या. |
|---|---|
| रशिया................... | ३५,००,००० |
| जर्मनी.................... | ३०,००,००० |
| फ्रान्स.................... | २५,००,००० |
| ऑस्ट्रिया.................. | १८,७०,००० |
| इंग्लंड.................... | ७,५२,००० |

युरोपांतील राष्ट्रांच्या परस्परबलाचें चित्र वरील कोष्टकामध्यें डोळ्यांपुढें स्पष्टपणें दिसण्यासारखें आहे. वरील कोष्टक हा युरोपियन राष्ट्रांच्या सामर्थ्याचा एक नकाशाच आहे असें म्हटलें तरी चालेल. ह्यापासून कोणता सामर्थ्यपर्वत किती उंच आहे किंवा कोणता शक्तिसमुद्र किती खोल आहे, ह्याची कल्पना बरोबर रीतीनें करतां येण्यासारखी आहे. वरील कोष्टकावरुन असें दिसून येईल कीं, इंग्लिशांच्या सैन्याची संख्या सर्व युरोपियन राष्ट्रांच्या सैन्याहून अतिशय लहान आहे. ऑस्ट्रियाचें राज्य म्हणजे युरोपमध्यें अगदीं यःकश्चित् आहे. त्याचें कोठें साम्राज्य नाहीं, किंवा बाहेर ठिकाणीं त्याच्या वसाहती नाहींत. तरी पण त्याचें सैन्य इंग्लंडच्या अडीचपट आहे. फ्रान्सचें सैन्य पूर्वीं एकदां फार अवाढव्य होतें; परंतु अलीकडे फ्रान्स हें खालावलेल्या राष्ट्रांपैकीं एक आहे. तरी पण त्याचें सैन्यसुद्धा इंग्लंडच्या साडेतीनपट आहे. जर्मनीच्या सैन्याची संख्या इंग्लंडच्या चौपट आहे. आणि रशियाचें सैन्य तर इंग्लंडच्या जवळ जवळ पांचपटीनें अधिक आहे. ह्या सैन्याच्या संख्येमध्यें इतका फरक आहे. याशिवाय फ्रान्स आणि जर्मनी ह्या देशांतून लढाईचीं नवीन नवीन हत्यारें शोधून काढण्याचे प्रयत्न चालू आहेत. आणि हीं हत्यारें म्हणजे एक प्रकारचें सैन्यच आहे. तेव्हां अशा रीतीनें पाहिलें असतां वजनामध्यें इंग्लंडचें पारडें फारच हलकें पडलें आहे. इंग्लंडचें

पारडें आपल्या जिंकलेल्या देशांना आणि वसाहतींना दडपण्याला कितीही जड असलें, तरी रशिया, जर्मनी, फ्रान्स ह्यांच्या सैन्यांच्या मानानें तें अगदीं हलकें आहे असें म्हणावें लागतें. संपत्तीच्या मानानें पाहिलें असतां सर्व युरोपियन राष्ट्रांमध्यें इंग्लंड हेंच अतिशय संपत्तिमान आहे यांत अगदीं संशय नाहीं व हें आंकडयांवरूनही सिद्ध करतां येण्यासारखें आहे. परंतु अतिशय मोठी संपत्ति ही लढाईत नेहमींच फायदेशीर बाबत होते असें नाहीं. अतिशय मोठी संपत्ति आणि तिला अतिशय थोडें संरक्षण ही स्थिति चांगली असें कोण म्हणेल ! कमी संरक्षण आणि अधिक संपत्ति म्हणजे दुसऱ्याच्या तोंडाला पाणी सुटण्याला मोठें जबरदस्त कारण होय. ही इंग्लंडची स्थिति हिंदुस्थानांतील तिजोऱ्यांसारखीच आहे. हिंदुस्थानांतील तिजोऱ्यांमध्ये पैसे अतिशय पुष्कळ आणि त्यांच्या संरक्षणाकरितां लोक अतिशय थोडे असा प्रकार बहुतेक ठिकाणीं आढळतो. परंतु ही स्थिति हिंदुस्थानाच्या मानानें सुरक्षितपणाची आहे असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. कारण येथील सरकारी तिजोरींतील द्रव्याच्या अभिलाषाची कल्पनाच कोणाच्या मनामध्यें नाहीं. त्यामुळें दहा लक्ष रुपयांवर पहारा करण्याकरितां दहा पोलिसचे शिपाई पुरे होतात, यांत कांहींच नवल नाहीं. कारण, दहा लक्ष रुपयांवर पहारा करण्याकरितां दहाच्या ऐवजीं पोलिसचा एक शिपाई असला तरीदेखील त्या दहा लक्षांतील एका सुतळीच्या तोड्यालाही धक्का लागण्याची भीति नाहीं, अशी हिंदुस्थानांतील निरभिलाषित्वाची स्थिति आहे. परंतु युरोपखंडांतील मनें आमच्या इतकीं निरभिलाष आणि निष्काम असतील असें दिसत नाहीं. इंग्लंडची संपत्ति त्यांच्या डोळ्यांमध्यें सलत आहे. इंग्लंडचा उत्कर्ष फ्रान्सला खपत नाहीं. इंग्लंडचा व्यापार कुंटित करण्याविषयीं जर्मनीचे प्रयत्न चालू आहेत, व इंग्लंडचा हिंदुस्थानच्या भूमीवर पाडाव करण्याविषयींची रशियाची महत्त्वाकांक्षा रात्रंदिवस जागत बसलेली आहे. अशा स्थितीमध्यें इंग्लंडनें आपली अतिशय मोठी संपत्ति अतिशय थोड्या लोकांच्या संरक्षणाखालीं टेवावी, हें बरोबर नाहीं. आतां इंग्लंडचें आरमार हेंही युरोपांतील सर्व राष्ट्रांच्या आरमारापेक्षां अतिशय बलाढ्य आहे. किंबहुना इंग्लंडच्यासारखें आरमार दुसऱ्या कोणत्याच देशापाशीं नाहीं. तरी पण पुष्कळ आरमारें झालीं, तरी त्यांचा काय उपयोग ! तीं काय जमिनीवर येऊन लढाई करणार आहेत ! इंग्लंडचें समुद्रावर वर्चस्व असलें तर तेथेंच येऊन त्याला लढाई देतील इतकीं

दुसरीं राष्ट्रें मूर्ख नाहींत, हें इंग्लंडनें गृहीत धरून चाललें पाहिजे. इंग्लंडचा जेथें कमजोरपणा असेल, तेथेंच त्याचे शत्रू त्याजवर हल्ला करणार हें उघड आहे. आणि जमिनीवरील सैन्यांत इंग्लिशांचा कमतरपणा आहे, हें तर वर दिसून आलेंच आहे. इंग्लिशांचा एक शिपाई तर फ्रान्सचे तीन, जर्मनीचे चार आणि रशियाचे पांच, अशी स्थिति आहे. रशियाच्या पांच कोसॅक्सपुढें इंग्लंडचा एक टॉमी काय करील ? हाच इंग्लंडचा सुरक्षितपणा असेल, तर तो फार लटपटीत पायावर उभारलेला आहे, असें म्हणावें लागतें. ही गोष्ट इंग्लंडच्या मुत्सद्यांच्या लक्षामध्यें आली नाहीं असें नाहीं, व त्यामुळेंच हल्लीं इंग्लंडमध्यें कॉन्सक्रिप्शनची पद्धत सुरू असावी, असें पुष्कळांचें म्हणणें आहे; व तशा धर्तीवर इंग्लंडच्या लष्करामध्यें कांहीं तरी फेरफार आणि सुधारणा व्हाव्या हें अत्यंत इष्ट आहे. नाहींतर रशियाचे पांच, जर्मनीचे चार आणि फ्रान्सचे तीन शिपाई असतांना इंग्लंडनें आपल्या संरक्षणासाठीं फक्त एकच शिपाई ठेविला, तर जेव्हां लढाई सुरू होईल तेव्हां इंग्लंडचें कसें होईल, ही काळजी सर्वांना रात्रंदिवस वाटल्या-वांचून कधींही राहणार नाहीं.

---

# शरदृतूंतील मेघांनो, तुम्हीं काय केलें आहे म्हणून एवढ्या गर्जना करितां ? : : ५

काळ : अग्रलेख, ता. १०।५।१९०१

● सुधारक म्हणवून घेणारांचें करणें थोडें, बडबड फार. तारीख २४।५।१९०१ च्या स्फुट विचारांत काळकर्ते म्हणतात, "सुधारकांना छळ सोसावे लागत नाहींत हें ते आपलें एकाअर्थी दुर्भाग्यच समजतात. 'जीं जीं शासनें आपल्या (लोकांच्या) हातीं असतील तीं तीं आम्हांला लागू करा, आम्हांला जें युक्त व न्याय्य दिसेल तें आम्ही करणार.' ही गर्वोक्ति कोणाविरुद्ध ! सत्ताहीन शंकराचार्य व दुबळी जात यांच्याविरुद्ध. यांच्या हातांत शासनें आहेत काय आणि तीं तुम्हीं सहन करणार काय ! राज्यकर्त्यांच्या प्रसंगविशेषींच्या कांहीं कृतींमध्यें अयुक्त आणि अन्याय्य असें कांहींच दिसत नाहीं काय ! मग तेथें सुधारक आपलें शौर्य कां गाजवीत नाहींत !"

राष्ट्रीय प्रगतीला सामाजिक सुधारणेची आवश्यकता नाहीं असें नाहीं; आणि देशकालानुरोधानें प्रत्येक समाजामध्यें कांहीं कांहीं सुधारणा होणें आवश्यक असतें, व त्याप्रमाणें त्या हळूहळू घडूनही येत असतात. पण ज्या सुधारणा नैसर्गिक नियमानें आणि परिस्थित्यनुकूल्यानें घडून येत असतात त्या आम्हीं घडवून आणिल्या असें म्हणणारांचा आपल्या इकडे एक वर्ग आहे. ह्यांतील लोक आपल्याला सुधारक असें म्हणवून घेतात. हे लोक अस्तित्वांत येऊन

अजून फार दिवस झाले नाहींत. इंग्रजी राज्यांत जेव्हां थोडक्या विद्याभ्यासानें मोठ्या पगाराच्या जागा मिळूं लागल्या, जेव्हां इंग्रजीच्या अर्धवट ज्ञानानें संपन्न झालेल्या लोकांची दृष्टि मदांध होऊन त्यांना आपल्यामध्यें कांहींच चांगलें दिसेनासें झालें, व जेव्हां नवीन अधिकाराच्या जोरानें जुनें लोकमत धाब्यावर बसविण्याचें कित्येकांमध्यें सामर्थ्य आलें, तेव्हांपासून हे सुधारक लोक अस्तित्वांत आले असें म्हणण्यास हरकत नाहीं. म्हणजे हा सुधारकवर्ग ह्या जगांत अस्तित्वांत येऊन सरासरी फार तर चाळीसपन्नास वर्षें झालीं असतील. हल्लींच्या या तऱ्हेच्या सुधारणेच्या वयाला इतकींच वर्षें झालीं असलीं पाहिजेत असेंच बहुतेक सर्व समंजस मनुष्यांचें मत आहे. परंतु खुद्द सुधारकांना विचारलें तर ते ही गोष्ट कधींही कबूल करणार नाहींत. आपल्या उपास्य देवतेचें इतकें अर्वाचीनत्व त्यांना कधींही पसंत पडावयाचें नाहीं. ही सुधारणादेवी किती प्राचीन आहे हें सुधारकांनीं अजून सांगितलें नाहीं. परंतु ती वसिष्ठाशीं समकालीन होती, असें एकदां एका सुधारकांनीं प्रतिपादन केल्याचें पुष्कळांना स्मरत असेल. परंतु असल्या प्रकारचीं मनोराज्यें सुधारकांनीं कितीही चालविलीं असलीं तरी त्यांत कांहीं अर्थ नाहीं. सुधारणेचे सर्व खेळ अलीकडच्या ह्या पांचपन्नास वर्षांतीलच आहेत, हें अगदीं निर्विवाद आहे. ह्या मुदतींत सुधारकांनीं काय सुधारणा केल्या आहेत, याबद्दल आपण पाहूं लागलों, तर आपल्याला विशेष असें कोठेंच कांहीं दिसून येत नाहीं. पूर्वींच्यापेक्षां कांहीं जास्त स्त्रिया पुनर्विवाहाच्या युक्तीनें विषयसुखाचा उपभोग घेण्याला समर्थ झाल्या असतील. किंवा मद्यपाननिषेधाच्या योगानें दारूच्या शेंपन्नास बाटल्या कमी खपल्या असतील, किंवा परदेशगमनाच्या सवलतीनें कांहीं लोक येथल्या येथें भ्रष्ट न होतां विलायतेहून भ्रष्ट होऊन आले असतील. असे कांहीं तुरळक तुरळक परिणाम सुधारणेपासून उत्पन्न झालेले कोठें कोठें दृष्टीस पडतात. परंतु याच्या पलीकडे काय! ह्यांच्याव्यतिरिक्त दुसऱ्या नांव घेण्यासारख्या सुधारकांच्या गोष्टी क्वचितच आढळतील. पण सुधारणेबद्दलची बडबड जर आपण पाहूं गेलों, तर आज सर्व जग त्या बडबडीनें दुमदुमून गेलें आहे, असें आपल्या दृष्टोत्पत्तीस येईल. करणें थोडें आणि वटवट फार, ह्या शब्दसमुदायानें जर कोणाच्या गुणांचें वर्णन करावयाचें असेल, तर हे शब्द सुधारकांच्या अंगचे गुण फार उत्तम रीतीनें दाखवितील यांत शंका नाहीं.

अतिशय क्षुद्र आणि क्षुल्लक अशा एखाद्या कृत्याबद्दलही आपली आपण किंवा आपसांत एकमेकांची अतिशय स्तुति करण्याची ह्यांच्यामध्यें प्रथमपासून चाल पडलेली आहे. याचें प्रत्यंतर पाहिजे असेल तर यांच्या पक्षाची कांहीं वर्तमानपत्रें पाहावीं. एखाद्या मनुष्याला अशा एखाद्या ठिकाणीं नेऊन ठेविलें कीं, तेथें त्याला ह्या सुधारकांच्या कृतीचें वास्तविक ज्ञान यत्किंचितही होऊं नये; परंतु ह्यांच्या पक्षाचीं वर्तमानपत्रें आणि सामाजिक परिषदांचे रिपोर्ट हे मात्र त्यांच्या हातीं पडावे, तर त्या पत्रांतील आणि रिपोर्टांतील लेख वाचून त्या बिचाऱ्याला असें वाटेल कीं, सर्व हिंदुस्थान देश सुधारणामय होण्याच्या अगदीं बेतांत आलेला आहे. परंतु हा सर्व भ्रम आहे. त्यांचे शब्द मात्र पाहून घ्यावेत. ते केवळ ब्रह्मवेदांती आहेत. त्यांना शब्दांचें जाळें कसें पसरावें येवढें चांगलें समजतें. परंतु भाताच्या कोंड्यामध्यें जसें कांहीं सत्त्व नसतें, तसें या सुधारकांच्या कृतींमध्यें सत्त्व नसतें. ह्यांच्यांत जर कांहीं विशेष गुण असेल तर तो वल्गना करण्याचा होय.

पण ह्या वल्गना तरी ह्यांनीं कशाबद्दल कराव्या ? असें ह्यांनीं कोणतें शतकृत्य केलें आहे, कीं ज्यासाठीं ह्यांनीं अशा वल्गना कराव्या ? लोखंडाचे चणे खावे तेव्हां ब्रह्मपद प्राप्त होतें, किंवा टाकीचे घाव सोसावे तेव्हां देवकळा प्राप्त होते, असा जगांतील सामान्य नेम आहे. परंतु सुधारकांतील महावीरत्वाची पदवी मिळण्याला असें कांहींच करावें लागत नाहीं. अलीकडच्या कित्येक सुधारकांनीं ही वीरपदवी अगदीं स्वस्त करून टेविली आहे. हे सुधारक म्हणतात मात्र कीं आम्हीं सुधारणा करूं लागलों म्हणजे समाजाचे आक्षेप, मित्रांचे द्वेष, नातेवाइकांचा त्याग, शंकराचार्यांचा बहिष्कार, लोकांची अप्रीति वगैरे अनेक संकटें आम्हांला भोगावीं लागतात; तीं भोगण्याला आम्ही तयार होतों म्हणून आम्ही फार मोठे, विलक्षण आणि अद्वितीय असें कोणी तरी जगाचें उपकर्ते आहों. पण वास्तविक स्थिति अशी मुळींच नाहीं. परंतु हल्लीं आपल्या खोट्या कल्पनांनीं डोकें बिघडून गेलेला प्रत्येक विधवेचा नवरा आपल्याला ल्यूथर म्हणून समजत आहे, प्रत्येक आचरटपणाचें कृत्य करणाराला मीं हल्लींच्या काळचा कोणी तरी मोठा महर्षि आहे असें वाटत आहे. आणि प्रार्थनासमाजांतील प्रत्येक डोळे मिटणाराला मी येशूख्रिस्तच आहे अशी खात्री वाटत आहे. परंतु ल्यूथरवगैरेंची योग्यता यांना कशाला पाहिजे आहे ? त्यांनीं ज्या

गोष्टी केल्या त्या गोष्टी करण्याला त्या वेळीं त्यांना खरोखर अतिशय मोठे प्रतिबंध होते. तसे ह्या आमच्या सुखवस्तु सुधारकांना काय प्रतिबंध आहेत ? युरोपखंडातील मोठमोठ्या सुधारकांप्रमाणेंच आपणही मोठे सुधारक होत आहों असें आमच्या इकडील ह्या शिळोप्याच्या सुधारकांना वाटत आहे. पण त्यांच्या शतांश तरी संकटें ह्यांनीं सहन केलीं आहेत काय ? त्यांच्यासारखे ह्यांनीं हाल सोशिले आहेत काय ? त्यांच्यासारखा धर्मगुरूंचा आणि लोकांचा कडक छळ ह्यांनीं अनुभविला आहे काय ? आणि हे सर्व अनुभवून ह्यांनीं आपलें सत्य पाळलें आहे काय ? आणि कसलींही संकटें आलीं असतां न डगमगतां हे त्यांच्याप्रमाणें आपल्या कर्तव्यकर्माला जागले आहेत काय ? काय, ह्यांनीं ह्यांपैकीं काय केलें आहे कीं, ज्यामुळें ह्यांनीं आपल्या अंगच्या धैर्याबद्दल, शौर्याबद्दल, आणि सत्याबद्दल इतक्या वल्गना कराव्या ? ख्रिस्ती धर्माच्या पहिल्या उत्पादकांनीं आणि नंतरच्या सुधारकांनीं आपल्या धर्मासाठीं इतके हाल सोसले आहेत कीं, ते वाचूनसुद्धां हल्लींच्या या सवंग सुधारकांच्या अंगावर शहारे येतील, मग त्या गोष्टी करण्याचें यांचें धारिष्ट तर लांबच राहिलें. रोमन लोकांच्या साम्राज्यामध्यें जेव्हां ख्रिस्ती धर्माची नवीन स्थापना झाली, तेव्हांपासून रोमन साम्राज्याचा ऱ्हास होईपर्यंत मधून मधून अनेक वेळां ख्रिस्ती धर्माच्या अनुयायांना अनेक रोमन बादशाहांकडून फार त्रास सोसावा लागला. रोमन बादशाहांनीं कित्येक ख्रिस्ती लोकांना खुर्चीवर बसवून त्यांच्या अंगावर तेल ओतून त्यांना जिवंत जाळलें. हेंही त्या ख्रिस्ती लोकांनीं सहन केलें, परंतु त्यांनीं आपला धर्म सोडला नाहीं. आणि तीच हल्लींच्या सुधारकांची गोष्ट घ्या ! हल्लींचा मजेखातर बनलेला सुधारक विडी चिरूट पेटविण्यासाठीं काडी ओढीत असतां तिचा जर कोठें हाताला नुसता चटका बसला तरी सुद्धां थै थै नाचावयाला लागतो. असल्या लोकांच्या हातून काय हाल सहन केले जाणार हें दिसतेंच आहे ! रोमन बादशहांनीं कित्येक ख्रिस्ती लोकांना क्रॉसवर टांगून तेथें त्यांच्या शरिरांना जिवंतपणीं खिळे मारून ठेविलें, कित्येकांना त्यांनीं विष घालून मारलें, कित्येकांना त्यांनीं अन्नपाण्यावांचून कोंडून ठेविलें, व कित्येकांना त्यांनीं अंधारकोठडीमध्यें कोंडून ठेविलें. इतकीं हीं सर्व संकटें त्या वेळच्या ख्रिस्ती लोकांनीं सोशिलीं, परंतु आपल्या धर्मावरील श्रद्धा त्यांनीं सोडली नाहीं ! आणि म्हणूनच ते मोठे झाले. असल्या प्रकारचीं संकटें

इल्लींच्या सुधारकांनीं काय भोगिलीं आहेत कीं, ज्यामुळें त्यांनीं वाटतील तशा वल्गना कराव्या !

युरोपखंडामध्यें कांहीं मतांना अतिशयच प्रतिबंध असल्यामुळें त्यांच्या विरुद्ध मत प्रतिपादन करणारांना बरीच किंमत येत असे. ज्याप्रमाणानें एखादी गोष्ट करण्यांत कठिणपणा असेल, त्याप्रमाणानें ती गोष्ट करण्याला महत्त्व येतें. एखाद्या डबक्यांत बुडी मारण्यापेक्षां समुद्रांत बुडी मारणें कठीण. म्हणून समुद्रांत बुडी मारणारांचे लोक स्तुतिपाठ गातात, व डबक्यांत डुंबणारांचें स्तुतिपाठ कोणी गात नाहींत. आमच्या इकडचे सुधारक हे डबक्यांत डुंबणारे आहेत. परंतु तसे असूनही त्यांना समुद्रांत अवगाहन करणारांची कीर्ति पाहिजे आहे. परंतु ती त्यांना कशी मिळणार ? युरोपांतील सुधारकांसारखे ते आपल्याला मानीत आहेत. परंतु त्यांच्यासारखीं यांनीं कोणतीं संकटें सहन केलीं आहेत ? किंवा त्यांच्यासारखा यांना येथें जाच तरी कोणता होत आहे ! युरोपांत १५४२ चे सुमारास इन्किझिशनची जी संस्था स्थापन झाली होती, तशी सुधारकांना कसोटीला लावून पाहणारी एक तरी संस्था आपल्या इकडे आहे काय, कीं जिच्या कायद्याचा कडकपणा सहन केल्याबद्दल यांना शेखी मिरवितां येईल ! त्या इन्किझिशनची अशी व्यवस्था होती कीं, ज्यांच्या धर्मभ्रष्टतेबद्दल नुसता संशय येईल त्यांना तुरुंगांत टाकलें जात असे; आणि जे धर्मभ्रष्ट ठरले जात त्यांना तर देहांत प्रायश्चित्तच मिळत असे. आमच्या शंकराचार्यांसारखे तिकडचे इन्किझिशनचे अधिकारी दांत पडलेले साप नव्हते. त्यांच्यापाशीं आज्ञापत्रें लिहिण्याला नुसते कारकूनच होते असें नाहीं, तर त्या आज्ञापत्रांची अमलबजावणी करण्याकरितां अंधारकोठड्या, बिड्या आणि शिपाई हेही होते. अशा इन्किझिशनला तिकडच्या सुधारकांनीं जुमानलें नाहीं म्हणून ते मोठे मानले गेले, त्यांच्यासारखें आमच्या ह्या शिळपट सुधारकांनीं काय केलें आहे ! आमच्या शंकराचार्यांपाशीं तिकडच्या इन्किझिनशप्रमाणें अंधारकोठड्या, बिड्या आणि शिपाई असते आणि मग जर ह्या गोगलगायींनीं कांहीं पराक्रम केले असते, तर मग त्यांच्या वल्गना कांहीं तरी शोभल्या असत्या. सांपळ्यांत सांपडलेल्या वाघाला बायकामुलें देखील खडे मारतात. त्यांत हीं सुधारकें जास्त तें काय करीत आहेत ! रोमच्या इन्किझिशनचा मुख्य अधिकारी कराफा यानें असें ठरविलें होतें कीं, कोणी धर्मभ्रष्ट मनुष्य एखाद्या राजाचा आश्रय करून राहिला असला तर तेथून

त्याला मुद्दाम ओढून काढून कडक शासन दिलें पाहिजे. चौकशीअंतीं जो धर्मभ्रष्ट म्हणून ठरला जाईल त्याची सर्व मालमत्ता जप्त करावी असेंही त्यानें ठरविलें होतें. असे कडक नियम असतांनाहीं ज्यांनीं आपली प्रॉटेस्टंट धर्माचीं मतें कायम राखिलीं तेच मोठे म्हणून गणले गेले. अशांची योग्यता हल्लींच्या सुधारकांना कोठून यावी ! यांना हल्लींच्या राजांचें पूर्ण पाठबळ. यांनीं ' का ' म्हटल्या बरोबर सरकार कायदा हातांत घेऊन उभें ! अशा प्रकारच्या ह्या सरकारच्या खुशामतींतील खुशालचंद सुधारकांची आणि त्या इन्क्विझिशनच्या जुलमाखालीं चुरडून जाणाऱ्या प्रॉटेस्टंट रिफॉर्मर्सची बरोबरी कशी व्हावी ! शिवाय पूर्वी कॅथॉलिक धर्माच्या विरुद्ध मतप्रतिपादन केल्यास तसें करणाराची मालमत्ता नष्ट होत असे. परंतु हल्लींच्या सुधारकांची स्थिती कशी आहे ती पाहा ! हल्लीं मालमत्ता नष्ट होण्याची भीति लांबच राहिली. उलट त्यांत भरही पडते. रावसाहेब प्रार्थनासमाजांत जाणारे असले तर त्यांच्या ऑफिसमध्यें चाकरी मिळवूं इच्छिणाऱ्या उमेदवारानें चाकरीचा अर्ज करावा आणि प्रार्थना-समाजांत जाऊं लागावें म्हणजे त्याला चाकरी मिळालीच म्हणून समजावें. एका साहेबाची दुसऱ्या साहेबाला चाकरी मिळण्यासाठीं चिठी पाहिजे असेल, तर मी सुधारक आहें, इतकें सांगितलें म्हणजे बस आहे. किंवा दुसरीकडे कोठेंच टाकी सुरू झाली नाहीं तर गेला बाजार गुप्त-पोलिसमध्यें चाकरी मिळण्याला "मी सुधारक आहें" या मंत्राचा उपयोग झाल्यावांचून राहत नाहीं. शिवाय कित्येक शाळा, कॉलेजें, क्लब वगैरे संस्था "फक्त सुधारकांकरितांच" म्हणून राखून ठेविलेल्या असतात, ही गोष्ट प्रसिद्धच आहे. तेव्हां अशा रीतीनें सुधारणेच्या नांवावर आपला तळीराम गार करून घेणारे हे हल्लींचे तकलादी सुधारक जर त्या युरोपियन सुधारकांचें महत्त्व आपल्याला मिळावें म्हणून इच्छितील तर तें ह्यांना कोठून मिळावें ! इन्क्विझि-शननें युरोपमध्यें फारच कहर करून सोडला होता. आपल्या विरुद्ध मताच्या विद्यादानाचीं बहुतेक विद्यापीठें त्यांनीं बंद पाडलीं होतीं. कोणतेंही नवीन पुस्तक छापावयाचें झालें तर तें आधीं इन्क्विझीशननें पास केलें पाहिजे, असें त्यांनीं ठरविलें होतें. बुकें विकणारांच्या दुकानांतून असलेल्या सर्व पुस्तकांच्या याद्या करण्यांत आलेल्या होत्या व इन्क्विझिशननें नापसंत केलेलीं पुस्तकें विक-ण्याची बंदी सुरू झाली होती; व पुस्तकांचीं पार्सलें कोठून आलीं तर तीं

इन्क्विझिशनपुढें प्रथम हजर केलीं पाहिजेत अशी कस्टम्सच्या अधिकाऱ्यांना सक्त ताकीद असे. अशी स्थिति १५४३ पासून युरोपखंडामध्यें झाली असतांना प्रॉटेस्टंट रिफॉर्मर्सनीं आपलीं मतें प्रतिपादिलीं आणि तीं खरीं आहेत असें जगाच्या अनुभवाला आणून दाखविलें, म्हणून ते मोठे झाले. पण आमच्या सुधारकांनीं मोठे होण्यासाठीं अशा प्रकारचें काय कृत्य केलें आहे ? कोणता जबरदस्त प्रतिबंध असतांनाही ते सत्यालाच चिकटून राहिले आहेत, कीं ज्यामुळें त्यांना लांब जीभ करून वल्गना करण्याला जागा आहे ? ग्रंथ आणि वर्तमानपत्रें ह्यांच्या प्रकाराच्या बाबतींत पूर्वींच्या इन्क्विझिशनच्या नियमांसारखे हल्लींच्या सुधारकांना कांहीं तरी प्रतिबंध आहेत काय ? ह्यांचीं पत्रें आणि पुस्तकें तर सरकारच्या मदतीवर किंवा नुसत्या कृपादृष्टीवर चालणाऱ्या संस्थांच्या टेबलांवर मोठ्या सन्मानानें टेविलीं जात आहेत. जितकी जितकी आपल्या धर्माची अवहेलना हे जास्त करतील तितका तितका ह्यांचा तेथें जास्त सन्मान ! इतक्या ह्यांना सवलती असूनही त्यांनीं काय दिवे लावले आहेत ! युरोपखंडांतील सुधारकांना कांट्याच्या रस्त्यावरून चालवयाचें होतें, परंतु येथील सुधारकांच्या पायांखालीं सरकारच्या मदतीनें गालिचे पसरले जात आहेत; तरी पण ह्यांची रड आहेच कीं, आम्हांला अतिशय छळ सोसावा लागतो. पण हा छळ कोणता ! ह्या गालिचांवरून चालणाऱ्या सुधारकांच्या पायाला त्या गालिच्यांतील लोकरीचे तंतू टोंचून यांचा छळ होतो कीं काय कोण जाणे ! व्हेनिसमध्यें इन्क्विझिशनच्या तर्फे जी शिक्षा देत असत, तिचा प्रकार तर फारच भयंकर असे. समुद्रामध्यें दोन होड्या जवळ जवळ आणून त्यांजवर एक आडवी फळी टेवीत व त्या फळीवर अपराध्याला निजवून त्या दोन बोटी दोहोंकडे केल्या जात व त्यामुळें तो अपराधी समुद्रांत बुडून जात असे. ह्या इन्क्विझिशनच्या भयानें तिकडच्या लोकांना आपलीं बायकामुलें घेऊन ह्या गांवाहून त्या गांवाला पळतां पळतां पुरेवाट होत असे, व त्या वेळच्या लोकांच्या तोंडून इन्क्विझिशनच्या जुलमामुळें उद्गार येत असत कीं, "Scarcely is it possible to be a Christian and die quietly in one's bed." धर्मानें ख्रिस्ती असून आपल्या घरीं आपल्याला सुखानें मरण येईल ही गोष्ट त्या वेळीं अगदीं अशक्य झाली होती. पण अशा प्रकारचा जुलूम सुधारकांवर कोणता होत आहे, कीं जो सहन करण्यांत धैर्य दाखविल्याबद्दल

त्यांनीं हव्या तशा वल्गना कराव्या ! ह्यांना समुद्रांत बुडविण्याकरितां आज कोणीं होडीवर घातलें आहे ? ह्यांच्या सर्व सुधारणा मऊ बिछान्यावर लोळतां लोळतांच चाललेल्या आहेत. मग ह्यांनीं सहन तें काय केलें ? आणि यांचें कौतुक करावयाचें किंवा गोडवे गावयाचे ते कशासाठीं ? ह्यांना शिक्षा व्हावयाच्या लांबच राहिल्या, उलट त्यांच्याकडे कोणी टक लावून पाहिलें कीं, त्याच्याबद्दल लागलीच मिळाली पोलिसला वर्दी व ह्यांच्या विरुद्ध ब्र काढला कीं, लागलीच झाली त्याच्यावर अब्रूनुकसानीची फिर्याद. अशा रीतीनें आमच्या सुधारकांची सुधारणा चालली आहे. असली सुधारणा म्हणजे दुसऱ्यांनाच छळणें आहे; पण ह्यालाच जर सुधारक छळ सहन करणें असें म्हणत असतील, तर शब्दांचे अर्थ अलीकडे फारच फिरले आहेत, असें म्हणावें लागतें.

युरोपांतील रिफॉर्मर्स आणि हिंदुस्थानांतील रिफॉर्मर्स ह्यांच्या परिस्थितीमध्यें ह्याप्रमाणें जमीनअस्मानाचें अंतर आहे. ते गुलाबाच्या कांट्यावर पाय देऊन सुधारणा करीत होते आणि हे गुलाबाच्या फुलांवरून पाय घसरवीत घसरवीत परिपूर्ण सुधारणेच्या गोष्टी बोलत आहेत. तरीपण ह्यांना त्यांच्यासारख्या नांवलौकिकांची महत्त्वाकांक्षा आहे. पण ती कशी होणार ? ज्या शंकराचार्यावर एखाद्या यःकश्चित् मनुष्यालाही अब्रुनुकसानीची फिर्याद करितां येते, त्यांच्यापासून सुधारकांना त्रास तो काय होणार ! लोकसमाज तर इतका क्षीण झालेला आहे कीं, त्यांची सुधारक मुळीच पर्वा करीत नाहींत. शंकराचार्यांनीं आणि लोकांनीं ग्रामण्य करून एखाद्याला बहिष्कार घातला, तर त्यामुळें कोणत्या सुधारकाचें अडलें आहे किंवा त्याचा काय छळ झाला आहे ? असल्या समाजाला किंवा असल्या शंकराचार्यांना जुमानलें नाहीं म्हणून त्यांत मोठा पुरुषार्थ तो काय झाला ! दांत पाडलेल्या सापाच्या शेपटीवर कोणीही नाचेल. चिखलांत बुडालेल्या हत्तीच्या डोक्यावर बेडूकही जाऊन बसतो. आणि सुधारक हे तर बेडकांपेक्षां काहीं तरी पटींनीं मोठे आहेत यांत शंका नाहीं. तेव्हां ते ह्या चिखलांत बुडालेल्या समाजरूपी हत्तीच्या डोक्यावर बसले तर त्यांत आश्चर्य तें कोणतें ! ह्याला कोणी धैर्य, शौर्य, वीर्य, सहनशक्ति वगैरे नांवें देणार नाहीं. खऱ्या धैर्याचें काम म्हटलें म्हणजे हत्तीचें गंडस्थळ फोडून मोत्यांनीं पांढऱ्या आणि रक्तानें लाल झालेल्या सिंहाच्या दाढा त्याच्या तोंडांत हात घालून उपटून काढणें हें होय. खऱ्या शौर्याचें काम म्हटलें म्हणजे आपल्यावर

चवताळून येणाऱ्या आणि आपल्याला पायाखालीं चिरडूं पाहणाऱ्या मदोन्मत्त हत्तीचे सुळे उपटून काढणें हें होय. खऱ्या वीर्याचें काम म्हटलें म्हणजे आपल्या पोटांत नखें खुपसून तें फाडूं इच्छिणाऱ्या वाघाचें पोट चिरणें हें होय. असलीं खऱ्या धैर्याचीं, शौर्याचीं आणि वीर्याचीं कृत्यें जोंपर्यंत सुधारकांच्या हातून घडलीं नाहींत तोंपर्यंत त्यांना धैर्यादिक गुणांबद्दल कोणीही मान देणार नाहीं. सुधारकांच्या अंगांत इतके रक्त वळवळत असेल तर "देवो दुर्बलघातकः" अशा रीतीचें त्यांचें वर्तन कां ? बिचारे शंकराचार्य जेव्हां ब्राह्मणी राज्य गेलें तेव्हांच पराजित झालेले आहेत, व हिंदुसमाज मृतप्राय होऊन केक वर्षें झालीं आहेत. त्यांच्या व्रणांवर आघात एखादा कावळा किंवा कुत्रा किंवा सुधारक कोणीही करील. त्यांत शतकृत्य तें काय ? पण सुधारकांच्या अंगांत खरे धैर्यादिक गुण असतील तर मग असल्या बिचाऱ्यावर वक्रदृष्टि कशाला ? "जागजागीं आहेत वीर कोटी ! भले झुंजारहि शक्ति जयां मोठी" हे एका यःकश्चित् पांखरानें उच्चारिलेले शब्द त्यांना माहीत नाहींत काय ? पण पाडाव झालेल्यांवर जय मिळविण्यापलीकडे यांच्या शौर्याची गति कधींच गेलेली नाहीं. ह्यामुळें सर्वांना असेंच वाटतें कीं, ह्यांच्या सुधारणेची प्रगति होत नाहीं. ती समाजांतील प्रतिबंधामुळें नव्हे, तर ह्या सुधारकांच्या अंगच्या कमकुवतपणामुळेंच होय. शिवाय सरकारकडून आपल्याला मदत मिळते आणि सरकारचा आपल्याला पाठिंबा आहे, या गोष्टींबद्दल कित्येक सुधारकांना मोठा आनंद वाटतो. पण मोठेपणा कशानें मिळतो ह्याचें जर ज्ञान त्यांना असेल तर त्यांनीं सरकारचा आश्रय कधींही करूं नये. मोठ्या माणसांच्या आश्रयानें मोठेपणा मिळत नाहीं, तर आपल्या अंगच्या मोठ्या गुणांनीं मोठेपणा मिळतो. सुधारकांना वाटत असेल कीं, सरकार आपल्याला मदत करीत आहे; पण तसें नाहीं. सरकार त्या योगानें सुधारकांच्या मोठेपणाच्या पायाचे एक एक दगड काढून घेत आहे. सरकारचा आश्रय हा मोठेपणाचा मार्ग नव्हे. अनेक खऱ्या संकटांचें सहन आणि फिरून शांतवृत्ति ह्या मोठेपणाच्या, साधुत्वाच्या आणि सुधारकत्वाच्या पायऱ्या आहेत. तुकारामाच्या पोथ्या नदींत बुडविल्या तेव्हां तुकारामांनीं पोलिसच्या शिपायाकडे वर्दी दिली नाहीं, किंवा ज्ञानदेवांना संन्याशाची प्रजा म्हणून बहिष्कार घातला तेव्हां ज्ञानदेवांनीं कोणावर अब्रुनुकसानीची फिर्याद केली नाहीं. हें तत्त्व—हें सहिष्णुपणाचें तत्त्व—

सुधारकांनीं लक्षांत बाळगिलें पाहिजे. सामाजिक छळाच्या निराकरणासाठीं तुम्हीं पोलिसच्या शिपायाला बोलावणें धाडलें कीं तुमची सुधारकत्वाबद्दलची भावी कीर्ति आणि तुमचा भावी मोठेपणा तुम्हांला सोडून गेलाच म्हणून समजा. तेव्हां निर्मळ सुधारणेची रचना करावयाची असेल तर ती सत्य आणि परमेश्वर यांच्यावर भरंवसा ठेवून खऱ्या सहिष्णुतेच्याच पायावर केली पाहिजे. परंतु अर्वाच्य सुधारकांच्या हातून तसें कांहींच झालेलें नाहीं. भातुकली खेळत असलेल्या पोरी, कोणीं चिमटा घेतला, सांग आईला; कोणीं कांहीं केलें, जा आईकडे रडत, असें करतात. त्याप्रमाणें करून, सुधारणेची इमारत उभारली जावयाची नाहीं. सुधारणा हा कांहीं करमणुकींतला भातुकलीचा खेळ नव्हे. तेव्हां हे सुधारक सरकारच्या कडेवरून उतरून आपल्या पायावर उभें राहण्याचा कांहीं प्रयत्न करतील तर यांची योग्यता वाढण्याचा संभव आहे. नाहीं तर हे आपल्याला आपल्या पंगूपणानें जास्त उपहासास्पद मात्र करून घेतील यांत शंका नाहीं.

---

# खोटें बोलण्याच्या विषयांतील परीक्षा आणि बक्षीस : : : ६

काळ : अग्रलेख ता. २४।५।१९०१

O सुधारकांवर एवढा राग कां ? त्यांचे अंगीं अवसान नव्हतें व ते अवसानघातकी होते म्हणून. याच अंकांतील स्फुट विचारांत 'काळ'कर्ते म्हणतात, "अर्जावर एकदां केलेल्या सह्या चौकशीचे वेळीं नाहीं केल्या म्हणून म्हणण्याच्या व लोटांगणें घालून माफ्या मागण्याच्या शूरत्वाचे कामांत सुधारकवीर गुंतले असले तर नकळे. करणें आणि बडबड यांत कांहीं तरी संगति पाहिजे." पुण्याच्या कांहीं प्रतिष्ठित व पोक्त लोकांनीं गोखल्यांना प्लेग-कमिटीच्या जुलमाबद्दल माहिती दिली, पण गोखल्यांचा पाठपुरावा करण्याचा प्रसंग आला तेव्हां या विद्वानांनीं माघार घेतली आणि गोखल्यांवर माफी मागण्याचा प्रसंग आला. तेव्हांपासून नामधारी सुधारकांवरला राग पुण्यांत धुमसत होता. रानड्यांच्या नांवावर मिरवणाऱ्या या लोकांच्या तेव्हांच्या लीलाच तशा होत्या.

एके शहरीं कोणी एक गृहस्थ राहत असत. हे चांगले संपन्न असून फार सद्‌गुणी आणि सुशील असे होते. जगांत ज्या गोष्टी उत्तम म्हणून मानल्या जात त्याच गोष्टी करण्याकडे यांचा विशेष ओढा असे. परंतु त्या गोष्टी घडवून आणण्याचे ह्यांचे मार्ग थोडेसे निराळे असत. ह्यांच्या मनांत एके दिवशीं

अशी कल्पना आली कीं, शाळांतून, कॉलेजांतून आणि इतर ठिकाणीं पुष्कळ गोष्टींसाठीं पुष्कळ बक्षिसें लाविलेलीं असतात, परंतु त्यांत खोटें बोलण्याबद्दल कोठेंच बक्षीस लाविलेलें नाहीं, तेव्हां तें आपण लावावें. हा विचार मनांत येऊन त्यांनीं तो आपल्या मित्रमंडळींना कळविला. या गृहस्थांचा स्वभाव कशा प्रकारचा आहे, हें त्यांच्या मित्रांना पूर्णपणें माहीत असल्यामुळें त्यांनीं सदर विचाराला आपली संमति दिली, व सर्वांच्या विचारानें खोटें बोलणाऱ्याला बक्षीस लावण्याचा निश्चय कायम ठरला. येथपर्यंत या मंडळीचें काम फार सुलभ होतें. परंतु येथून त्यांच्या अडचणींना प्रारंभ झाला. त्यांना पहिली अडचण ही पडली कीं, खोटें बोलण्यांत बक्षीस द्यावयाचें म्हणजे सर्व खोटें बोलणारांची परीक्षा घेतली पाहिजे, व त्या परीक्षेला ते हजर राहण्यासाठीं सर्व खोटें बोलणारांना अमुक ठिकाणीं त्यांच्या गुणांची परीक्षा व्हावयाची आहे, व त्यात जो सर्वांत अधिक खोटें बोलेल त्याला बक्षीस दिलें जाईल ही बातमी कळली पाहिजे. पण ती कळावी कशी ? कारण, खोटें बोलणारे लोक एकाच ठिकाणीं आहेत असें थोडेंच आहे ! ते सर्वत्र पसरलेले आहेत. तेव्हां ह्या सगळ्या गुणीजनांना ही परीक्षेची बातमी समजावी कशी, ह्या पंचायतींत ते सर्वजण पडले. तेव्हां त्या मंडळींतील एकानें अशी क्लृप्ति काढली कीं, बाकीच्या परीक्षांबद्दल ज्याप्रमाणें वर्तमानपत्रांतून जाहिराती दिल्या म्हणजे उमेदवार लोक जमतात, त्याप्रमाणें ह्या परीक्षेचीही जाहिरात आपण एखाद्या वर्तमानपत्रांत द्यावी म्हणजे झालें. असें केल्यानें आपल्याही परीक्षेला पुष्कळ उमेदवार जमतील. ही क्लृप्ति पुढें येऊन व तिच्याबद्दल थोडीबहुत भवति न भवति होऊन ती बहुतेकांना पसंत पडते आहे न पडते आहे तोंच त्यांतील एकानें जी शंका काढली त्यामुळें सर्वांचे विचार दारू प्यायलेल्या माणसाच्या डोकीवरील पगडीप्रमाणें डळमळूं लागले. त्यांनीं अशी शंका काढली कीं, ही तुमची जाहिरात छापतो कोण ? हल्लीं नीतिशिक्षणाबद्दल आणि नीतिमत्तेबद्दल इतके कडाक्याचे वाद सुरू आहेत कीं अशा प्रसंगीं असली जाहिरात प्रसिद्ध करण्याला कोणीही धजणार नाहीं. धर्मांतर करणें, दारू पिणें वगैरे प्रश्न नीतीखालीं येतात किंवा नाहीं याच्याबद्दल अजून वाद आहेत हें खरें; परंतु खोटें बोलणें हें अनीतीमध्येंच मोडतें असें कोण म्हणत नाहीं ? तेव्हां ही जाहिरात वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होणें अगदीं अशक्य आहे,

असें त्यांनीं आपलें मत मंडळींपुढें मांडिलें. तेव्हां त्या बैठकींतील सर्वजण अगदीं स्तब्ध बसले. सर्वांची अक्कल गुंग होऊन गेली. कोणाची कांहींच मति चालेना. परंतु इतक्यांत सुदैवानें एकाला अक्कल सुचली. तो म्हणाला, " मीं नीतिशास्त्रावरील कोणत्याही पाश्चिमात्य पंडिताचें पुस्तक वाचलेलें नाहीं. तरी पण मला जसें वाटत आहे तसेंच जर इतरांनाही वाटत असेल, तर आपली जाहिरात छापली जाण्याचा कांहींसा संभव आहे. म्हणून मी विचारतों ह्या प्रश्नाचें उत्तर सांगा. दारू पिणें आणि खोटें बोलणें यांत कमी गर्हणीय कोणतें ?" तेव्हां त्या मंडळींतील एका वृद्ध मनुष्यानें उत्तर दिलें कीं, वाईट गोष्टीमध्यें एक दुसऱ्यापेक्षां कमी वाईट असें म्हणतां येत असेल, तर दारूपेक्षां खोटें बोलणें कमी वाईट आहे, असें म्हणण्याला कांहीं एक हरकत नाहीं. " असेंच आमचेंही मत आहे " असें सर्वांनीं सांगितल्यावर मूळ शक्कल काढणाराला थोडासा धीर येऊन तो म्हणाला: " तर मग आपली जाहिरात प्रसिद्ध झालीच पाहिजे. कारण डिवर्नींच्या * * * ब्रँडीच्या बाटलीवर मिळणाऱ्या बक्षिसाची—रुपेरी तबकाची—जाहिरात जर कित्येक पत्रांतून येते, तर खोटें बोलण्याबद्दलच्या बक्षिसाची जाहिरात निदान त्या पत्रांतून तरी कां येऊं नये ! " हा युक्तिवाद इतरांनाही थोडासा पटला, व त्या सर्वांनीं प्रत्यक्ष एखाद्या डिवर्नीवाल्या वर्तमानपत्राकडे जाऊन आपली जाहिरात घेतली जाते किंवा नाहीं, हें पाहण्याचा निश्चय केला; व त्याप्रमाणें ते एका डिवर्नीवाल्याकडे गेले. ते त्यांच्यासमोर अगदीं भीत भीत गेले. कारण आपली अनीतीविषयक जाहिरात हे घेतील किंवा नाहीं याबद्दल त्यांना फार भीति होती, व म्हणून ते आपण लिहून आणलेली जाहिरात त्यांच्यापुढें ठेवण्याला धजत नव्हते. परंतु ही त्यांची स्थिति पाहून इकडे मि. डिवर्नीवाल्यांना असें वाटूं लागलें कीं, यांच्यापाशीं जाहिरातील देण्याकरितां पुरे पैसे नाहींत, म्हणून हे भीत आहेत. अखेरीस आलेल्या मंडळींनीं एकदांचा आपला प्रश्न पुढें काढला. तेव्हां त्या बाबतींत बराच वेळपर्यंत घासाघीस चालली होती. परंतु ती घासाघीस ही जाहिरात नीतीची आहे किंवा अनीतीची आहे याबद्दल होती असें कोणास वाटलें तर तें अगदीं चुकीचें आहे. ती घासाघीस केवळ पैशाची होती. कारण प्रस्तुत जाहिरात अनीतीविषयक असल्यामुळें ती आपल्याशिवाय दुसरी कोठें जागारच नाहीं, अशा खात्रीवर मि. डिवर्नीवाले यांनीं फारच जबर आकार

सांगितला होता, व म्हणून त्याबद्दल ही सर्व घासाघीस चालली होती. मि. डिवर्नीवाले हे ह्यांत अनीति आहे हें न समजण्याइतके मूर्ख होते असें नाहीं; परंतु पैशापुढें त्यांचा अलीकडे इलाज चालेनासा झाला होता. "छापणावळ, कागदांची किंमत, मजुरी, घरभाडें, टपाल" वगैरे बाबतींतील खर्चांनीं हे अगदीं टेकीस आले होते. म्हणून क्षणभर नीति गुंडाळून ठेवून हे आपल्या पडत्या काळांत असल्या जाहिराती घेत असत. असो. कोणत्या का कारणानें होईना, एकदांची खोटें बोलण्याच्या परीक्षेची आणि त्यांतील बक्षिसाची जाहिरात मि. डिवर्नीवाले यांच्या पत्रांतून प्रसिद्ध झाली. ती जाहिरात वाचल्याबरोबर ज्यांना आनंद झाला नाहीं असे हतभाग्य, खरें बोलणारे लोक मात्र काय ते होते. बाकी सर्व जग आनंदानें नाचूं लागलें, व प्रत्येक खोटें बोलणाराला 'मी ह्या परीक्षेंत पहिला नंबर पटकाविणार' असें वाटूं लागलें; व जो तो खोटें बोलण्याचा अभ्यास करण्याच्या तयारीला लागला. परीक्षेची मुदत जशजशी जवळ येऊं लागली तसतशी उमेदवारांच्या अर्जांची गर्दी उडाली; व ही परीक्षेची कल्पना काढणारांना, आपण प्रत्येक उमेदवाराच्या पाठीमागें कांहीं फी ठेविली असती तर त्यामधून आपल्याला एखादी गिरणी काढतां आली असती, किंवा टाटा रिसर्च युनिव्हर्सिटीला मदत करतां आली असती, किंवा व्हिक्टोरिया फंडाचे आपणाला पेट्रन होतां आलें असतें असें वाटलें व ही कल्पना पूर्वींच न सुचल्याबद्दल त्यांना फार पश्चात्तापही झाला. असो. खोटें बोलण्याची परीक्षा घेऊन त्यांत जो सगळ्यांत पुष्कळ खोटें बोलेल त्याला बक्षीस द्यावयाचें, हा ह्या मंडळीचा उद्देश आहे, असें स्पष्टपणें प्रथमतः नोंदून ठेवल्यानंतर त्या मंडळींनीं आपल्यांतील पांच इसमांना परीक्षक म्हणून नेमिलें, व खोटें बोलणारांची परीक्षेकरितां फारच गर्दी झाली, तर ह्या परीक्षकांनीं आपल्या मदतीला आणखीही परीक्षक घ्यावे, असा त्यांना अधिकार देऊन ठेवण्यांत आला होता, व परीक्षेबद्दलचे सर्व नियम ह्या परीक्षकांनींच ठरवावे असेंही मुक्रर करण्यांत आलें होतें. त्याच्या अनुरोधानें परीक्षकांनीं कांहीं नियम ठरविले होते. त्यांत ही खोटें बोलण्याची परीक्षा लेखी घेऊं नये असें सर्वानुमतें ठरलें होतें. खोटें बोलण्याचा सर्व गुण पूर्णपणें बाहेर पडावा हा या परीक्षेंतील मुख्य हेतु असल्याकारणानें, आपलें सर्व खोटें बोलणें कागदावर नमूद करण्याला कोणी कचरतील व परीक्षेचा मूळ हेतु सिद्धीस जाणार नाहीं, असें

मनांत आणून ही परीक्षा तोंडीच घेण्याचें ठरविण्यांत आलें होतें. त्याचप्रमाणें प्रत्येक उमेदवार खोटें बोलत असतां परीक्षकांशिवाय दुसऱ्या कोणींही तें ऐकूं नये, अशी व्यवस्था करण्यांत आली होती. ह्या कामींही पूर्वीच्याप्रमाणेंच परीक्षकांनी फार दूरवर दृष्टि पोहोंचवलेली होती असें म्हणावें लागतें. कारण, सर्व लोकांच्यापुढें खोटें बोलण्याची कोणालाही शरम वाटेल, याकरितां दुसरें कोणी ऐकत नसतां उमेदवारानें खोटें बोलावें, अशी जी परीक्षकांनीं योजना केली होती, ती फार धूर्तपणाची होती, यांत कांहीं शंका नाहीं. ह्या परीक्षेंत वयाची मर्यादा मुळींच ठेवण्यांत आलेली नव्हती. कारण इतर परीक्षांप्रमाणें सोळा किंवा वीस वर्षांची मुदत जर या परीक्षेला ठरविण्यांत आली असती, तर वयाच्या मानाप्रमाणें उत्तरोत्तर खोटें बोलण्यांत अतिशय वाकबगार झालेले म्हातारे उमेदवार वगळावे लागून त्यांचा फायदा घेतां आला नसता. म्हणून बोबडें बोलणाऱ्या मुलांपासून तों दांतखिळी बसलेल्या पेन्शनरांपर्यंत सर्वांना ह्या परीक्षेच्या-हॉलचे दरवाजे उघडे ठेवण्यांत आले होते. अशा रीतीनें सर्व प्रकारची तयारी होऊन सोमवारीं दहा वाजल्यापासून परीक्षेच्या कामाला सुरवात झाली.

पहिल्यानें मराठी शाळेंत जाणारा बिगर यत्तेंतील एक मुलगा आला व जेव्हां आपल्या मनांत खेळावयाचें येईल तेव्हां आपण आपल्या पंतोजीला कांहीं तरी खोटी सबब कशी सांगतों, ह्याबद्दलची माहिती त्यानें परीक्षकांपुढें सांगितली. प्रत्येक मनुष्याच्या मनामध्यें जितका खोटें बोलण्याचा गुण असेल तितका सर्व बाहेर काढण्याविषयीं परीक्षकांनीं प्रयत्न करावा व त्यासाठीं उमेदवारांना परीक्षकांनीं समयोचित लालुचही दाखवावी, अशी परीक्षकांना सूचना देऊन ठेवण्यांत आली होती. त्याप्रमाणें त्या परीक्षकांनीं त्या मुलाला खाऊ, पैसे, गाडी वगैरेंची लालूच दाखविली व दुसरें कांहीं तरी त्यानें खोटें बोलावें म्हणून त्यांनीं पुष्कळ प्रयत्न केले, परंतु ते सर्व व्यर्थ गेले.

नंतर कॉपी करणारा एक मुलगा पुढें आला, व आपण दुसऱ्याची कॉपी कशी करितों व त्याबद्दल कोणीं विचारल्यास साफ नाहीं म्हणून कसें म्हणतों, हें त्यानें सांगितलें. पण त्याच्याशिवाय दुसरें खोटें बोलणें त्याला माहीत नव्हतें. तुला आणखी कांहीं खोटें बोलावयाचें आहे काय, असेल तर बोल, म्हणून परीक्षकांनीं विचारलें; परंतु तो मान हालवीत व आपल्या कोत्या ज्ञानाबद्दल हिरमुसलें तोंड करीत निघून गेला.

त्यानंतर फाटकी बंडी आणि मळकें धोतर घेऊन एक वाणी पुढें आला; व आपण मासला एकांतील दाखवून माल देते वेळीं दुसऱ्यांतील कसा देतों, व गिऱ्हाइकानें शंका घेतल्यास 'तोच' म्हणून कसें खोटें बोलतों, वगैरे खोटें बोलण्याच्या कांहीं पद्धति त्यानें यथाशक्ति परीक्षकांपुढें मांडल्या. परंतु त्याचें खोटें बोलणेंही, बेरीज करून पाहतां, एकंदर चारपांच प्रकारचेंच काय तें भरलें. वाण्यापाशीं देखील इतकें थोडें खोटें बोलणें आढळावें, हें पाहून परीक्षकांची फारच निराशा झाली, व हा खोटें बोलण्याचा गड्डा, हे परमेश्वरा, तूं ठेवला आहेस तरी कोणापाशीं!' अशा प्रकारचे निराशेचे उद्गार त्यांच्या तोंडून निघाले.

इतक्यांत एक दिवाणी कोर्टांतून नेहमीं खोट्या साक्षी देणारा साक्षीदार पुढें आला. त्याची कावरीबावरी मुद्रा, भरसोडीची भाषणपद्धति वगैरे पाहून परीक्षकांना थोडेंसें समाधान वाटलें, व येथें ईश्वरानें कांहीं तरी करामत केली असली पाहिजे, असें त्यांना वाटलें. परंतु त्यांनीं जितका तर्क केला होता तितकें खोटें बोलणें त्यालाही बोलतां येईना. त्याच्या कांहीं ठराविक खोटें बोलण्याच्या युक्त्या होत्या तेवढ्या मात्र तो बोले. याच्या पलीकडे जास्त त्याच्यामध्यें कांहीं एक नव्हतें. जगांतील व्यवहारांत अतिशय नांवाजलेल्या या गृहस्थाच्या ठिकाणींदेखील खोटें बोलण्याची इतकी थोडी पुंजी पाहून खोटें बोलण्याची विपुलता प्राप्त होण्याच्या कामीं ते बहुतेक निराश झाले, व पुढील उमेदवारांची परीक्षा घेण्याला त्यांना उत्तेजन येईना. तरी पण 'बहुरत्ना वसुंधरा' या न्यायानें कदाचित् पुढें कोणी एखादा बुद्धिमान् उमेदवार आढळेल, अशा आशेनें त्यांनीं आपलें काम तसेंच चालू ठेविलें. त्यांच्यापुढें नंतर जे उमेदवार आले त्या सर्वांची हकीकत जर येथें सांगण्याचें मनांत आणिलें तर तें काम कधींही शेवटास जावयाचें नाहीं. त्या उमेदवार मंडळींतील लुंग्यासुंग्यांची हकीकत देणें तर शक्य नाहींच, पण त्यांतील सर्व अट्टल खोटें बोलणारांचीही हकीकत देणें शक्य नाहीं. सबब ह्या दुसऱ्या वर्गांतील मंडळींपैकीं कांहीं ठळक ठळक खोटें बोलणाऱ्या लोकांचीं फक्त नांवें देऊनच वाचकांची जिज्ञासा तृप्त केली पाहिजे.

परीक्षेचें काम रेंगाळत रेंगाळत चाललें होतें. खोटें बोलण्यांत पहिल्या पहिल्यानें पुष्कळांना मजा वाटली, परंतु पुढें त्याचा सर्वांना वीट आला. त्याच

त्याच लुचेगिऱ्या, तेच तेच क्षुद्र हेतु, तेच तेच फसवणुकीचे मार्ग, वगैरे रोज रोज ऐकून परीक्षकांचे कान अगदीं किटून गेले. शंभर जणांची परीक्षा घेतली तर त्यात कांहीं खुबीदार रीतीनें खोटें बोलणारा किंवा कांहीं सुधारलेल्या क्षुद्र हेतूंसाठीं खोटें बोलणारा क्वचितच आढळत असे. अशा रीतीनें पुष्कळ दिवस परीक्षा चालली असतां, परीक्षकांच्या पुढून अनेक प्रकारचे उमेदवार येऊन गेले. बनावट कागद करणारे, खोट्या साक्षी देणारे, चोऱ्या करणारे, खिसे कातरणारे, ठेवी बुडविणारे, खोटे हिशेब करणारे, सरकारी चाकरींत पैसे खाणारे, हवा तो पक्ष घेऊन भांडणारे वकील, पाहिजे त्याच्यावर प्रेम करणाऱ्या वेश्या, अंगारेधुपारे करून बायाबापड्यांना फसविणारे बैरागी, राम मनांत सांटविल्यावांचून बनलेले रामदासी, आधीं नेटिव्हांवर गोळी घालून मग वेडे बनणारे सोजीर, डोळे मिटून ध्यान लावून पाण्यावर तरंगणारे बगळे, जाळें पसरून दूर जाऊन बसलेले पारधी, दोघांचीं भांडणें लावून देऊन आपला स्वार्थ साधून घेणारे पंचतंत्री कोल्हे, अरण्यांत धर्मार्थ पाणपोई घालून वाटसरूंना मारण्याकरितां बसलेले मैंद, राजकारस्थानें करणारे मुत्सद्दी आणि एकीकडे हूल दाखवून दुसरीकडे पळून जाणारे सेनापति, ही सर्व प्रत्यक्ष किंवा पर्यायानें खोटें बोलणारी मंडळी, कोणी स्वतः आणि कोणी प्रतिनिधिद्वारां परीक्षकांपुढून येऊन गेली. व यांपैकीं पुष्कळांनीं आपले खोटें बोलण्याचे प्रकार सोपपत्तिक रीतीनें आणि कधीं कधीं सप्रयोगही परीक्षकांपुढें मांडून दाखविले. परंतु या सर्वांच्या खोटें बोलण्यांत परीक्षकांना एक मोठा थोरला दोष दिसत होता. तो हा कीं, त्यांतील एकालाही सपशेल खोटें बोलतां येत नव्हतें. कोणाला कांहीं तरी आधार असे, व त्यावर अर्ध्या खऱ्यामध्यें मिसळून जो तो अर्धें खोटें पुढें मांडीत असे. परंतु दूध म्हणून सांगून सपशेल पाणी विकणारा असा धाडशी खोटें बोलणारा पठ्या त्यांना कोणीच आजपर्यंत आढळला नव्हता. ह्या परीक्षेंत पहिल्या वर्गांत येण्याला अगर सोळा आणे परीक्षा उतरण्याला ६४ मार्कांची अपेक्षा असे, व पहिल्या वर्गांत कोणी उमेदवार आल्यावांचून त्याला बक्षीस मिळावयाचें नाहीं, असा कमिटीचा ठराव झाला होता; व आतांपर्यंत आलेले उमेदवार जेमतेम २५।३० मार्कांच्या आंतबाहेरच बहुतेक सर्व होते. ह्यामुळें परीक्षक परीक्षा आटपून अगदीं उठण्याच्या बेतांत आले होते. इतक्यांत एके दिवशीं सकाळीं एक गृहस्थ

एक्झॅमिनेशन हॉलमध्यें येऊन मोठ्यानें ओरडून म्हणाला, " अरेरे ! परीक्षकांनो, थांबा थांबा. तुम्ही हें आटपून चाललां कोठें ? थांबा. माझी परीक्षा घेतल्यावांचून तुम्ही हें परीक्षेचें काम आटोपतां हें कसें ? माझ्यासारखा जगद्विख्यात खोटें बोलणारा मनुष्य तुमच्यापुढें येऊन परीक्षा देऊन गेल्यावांचून तुम्ही जातां कोठें ?" हे त्याचे धीर, उदात्त आणि गंभीर शब्द ऐकून सर्व परीक्षक आश्चर्यचकित आणि प्रेममांसल अशा दृष्टीनें त्याच्याकडे बघते झाले. त्यांनी त्या मुद्रेकडे पाहिल्याबरोबरच त्यांच्या मनाची खात्री झाली कीं, आपल्या बक्षिसाचा पटकावणारा आतां मात्र आला खरा. त्याची मुद्रा फार शांत होती व थोडीशी भव्यही होती. परीक्षकांपुढें येऊन तेथें असलेली एक खुर्ची घेऊन तो त्यावर बसला, व डोळ्यांवरील आरशी काढून तिचीं भिंगें खिशांतील हातरुमालानें पुशीत पुशीत तो म्हणाला : " प्रथमतः मला तुमचे आभार मानले पाहिजेत. कारण कीं, तुम्हीं या खोटें बोलण्याच्या गुणाला उत्तेजन देण्याचें मनांत आणलें आहे. जगांत गुणीजन नाहींत असें नाहीं, पण त्यांची किंमत करणारा कोणी नाहीं. गुण आहेत, पण गुणग्राहक पाहिजे आहेत. तुम्हीं खोटें बोलण्याच्या गुणाला बक्षीस लावून ह्या कलेंतील गुणीजन प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न करीत आहां, ह्याबद्दल जगावर तुमचे मोठे उपकार आहेत. ह्या तुमच्या मेहेरबानीमुळें आमचे मागें पडलेले गुण आज पुढें येत आहेत." अशा प्रकारानें यानें केलेली स्तुति ऐकून खुष होऊन परीक्षक त्याला परीक्षेचे नियम समजावून सांगूं लागले. परंतु ते त्या उमेदवाराला मुळींच पसंत पडले नाहींत. तो म्हणाला : " ही तोंडी परीक्षेची पद्धत मला बिलकूल पसंत नाहीं. मला जें कांहीं खोटें बोलावयाचें तें कागदावर लिहिण्यास मला मुळींच दिक्कत वाटत नाहीं. मला जें कांहीं खोटें बोलावयाचें तें मी नेहमीं कागदावरच लिहून ठेवीत असतों. त्याचप्रमाणें, जें मी खोटें बोलेन तें कधीं कोणाच्या कानांवर जाऊं नये ही गोष्टही मला पसंत नाहीं. मी खोटें बोलतों तें कागदावर नमूद केलेलें असतें, इतकेंच नव्हे, तर तें सर्वजणांच्या कानांवर जावें, अशीही माझी इच्छा असते. आतां अलीकडे तें फार लोकांच्या कानांवर जाईनासें झालें आहे, त्याला माझा नाइलाज आहे. परंतु तें माझें खोटें बोलणें कागदावर नमूद व्हावें व तें सर्वांनीं ऐकावें व तें कागदावर नमूद झाल्यानंतर माझी त्याच्याखालीं खदखुरची सहीही व्हावी अशी माझी इच्छा आहे." ह्या त्याच्या अटी

परीक्षकांनी कबूल केल्या, व त्याच्यापुढें कागद, दौत, टांक, टेबल, वगैरे लेखनकलेचीं आयुधें दिलीं. आणि त्याच्या इच्छेप्रमाणें त्याचें खोटें बोलणें ऐकण्याकरितां येण्यासाठीं लोकांना परवानगी देण्यांत आली. परंतु त्या महावीराचें खोटें बोलणें ऐकण्याकरितां प्रथम जरी कांहीं मंडळी जमली होती, तरी पण पुढें पुढें ती हजार पांचशेंवरच येऊन बसली. असो. याप्रमाणें तयारी झाल्यावर मोठ्या समारंभानें परीक्षेच्या कामाला सुरवात झाली, व सर्व लोक उत्सुक झाले असतां परीक्षक त्याला म्हणाले: "हे महावीरा, हं, आतां तूं आपल्या खोटें बोलण्याला सुरवात कर." हे त्यांचे शब्द ऐकल्यानंतर तो उमेदवार आरशी डोळ्यांला लावून हातांतील काठी बुटाच्या टोंकावर हळूहळू ठोकीत मोठ्या विनयानें म्हणाला: "महाराज, मी होऊन खोटें किती बोलूं! तेव्हां माझी अशी विनंती आहे कीं, ज्या बाबतींत कोणीही समंजस मनुष्य खोटें बोलूं धजणार नाहीं म्हणून तुम्हांला वाटत असेल, असे कांहीं बिकट प्रश्न तुम्ही मला विचारा. आणि त्यांचीं जीं अशक्य म्हणून उत्तरें तुम्हांला वाटत असतील, तीं मीं बेधडक दिलीं तरच मी पहिल्या प्रतीचा खोटें बोलणारा आहें असें तुम्ही मला म्हणा." हें त्या उमेदवाराचें म्हणणें परीक्षकांना व इतर प्रेक्षकांना अगदीं पटलें व म्हणून त्यांनीं कांहीं प्रश्न विचारण्याला सुरवात केली. मराठी भाषेला झणझणीतपणा कै. विष्णुशास्त्री चिपळूणकर वगैरे मंडळींनीं आणिला, ही गोष्ट सर्वप्रसिद्ध असल्यामुळें यांत कोणाला खोटें बोलण्याला जागा राहणार नाहीं असें समजून, परीक्षकांनीं उमेदवाराला गोंधळून टाकणारा पुढील प्रश्न प्रथमतः विचारला :—

प्रश्न—मराटी भाषेला झणझणीतपणा आणल्याचें सर्व यश कोणाचें आहे?

उत्तर—सुधारकांचें.

प्रश्न—शास्त्रीबुवांनीं मराटी भाषेला झणझणीतपणा आणिला असा पुष्कळ लोकांचा समज आहे.

उत्तर—तेही सुधारकच होते.

"शाबास! शाबास!! धन्य आहे ह्या खोटें बोलणाराची!" असें सर्वांनीं म्हटलें.

गणपत्युत्सव जुन्या उद्धारक लोकांनीं सुरू केले आहेत ही गोष्ट कोणालाही

नाकबूल करतां यावयाची नाहीं. तेव्हां याबद्दल या उमेदवाराला खोटें बोलतां यावयाचें नाहीं, अशा बुद्धीनें परीक्षकांनीं पुढील प्रश्न विचारला:—

प्रश्न— गणपत्युत्सव कोणीं चालविले आहेत ?

उत्तर— सुधारकांनीं.

ही वचनपरिपाटी ऐकून व सुधारकांचे गणपत्युत्सवाविरुद्ध वेळोवेळीं निघालेले उद्गार स्मरून तेथील सर्व लोक त्या उमेदवाराचे धन्यवाद गाऊं लागले; व असा खोटें बोलणारा आजपर्यंत कोणी झाला नाहीं व पुढें होणार नाहीं म्हणून सर्व म्हणूं लागले. इतक्यांत परीक्षकांनीं पुढील प्रश्न विचारला:—

प्रश्न— शिवाजी-जन्मतिथि म्हणजे शिवाजीचे उत्सव कोणीं चालविले आहेत ?

उत्तर— सुधारकांनीं.

हें उत्तर ऐकून प्रेक्षकांची बालंबाल खात्री झाली कीं, ह्या खोटें बोलण्याच्या परीक्षेमध्यें याचाच पहिला नंबर येऊन ह्याच या विषयांतील बक्षीस खास उपटणार. त्या उमेदवाराची आणखीही चांचणी पाहण्यासाठीं परीक्षकांनीं पुढील प्रश्न विचारले:—

प्रश्न— पुण्यांत पेशवाई कोणीं स्थापन केली होती ?

उत्तर— सुधारकांनीं.

प्रश्न— आगगाड्या व तारायंत्रें हिंदुस्थानांत कोणीं चालू केलीं ?

उत्तर— आम्हीं सुधारकांनीं.

प्रश्न—समुद्राला भरती कोणाच्या बळानें येते ?

उत्तर— सुधारकांच्या.

प्रश्न— सूर्यचंद्रांना कोण उदयाला आणितो ?

उत्तर— सुधारक.

ह्या सर्व उत्तरांनीं परीक्षकांची मति खुंटली व त्यांनीं उमेदवाराला शेवटचा एक प्रश्न विचारला तो असा:—

प्रश्न— क्षुल्लक बाबतीमध्येंही बढाई मारण्यासाठींसुद्धा खोटें बोलावयाचें नाहीं असें ब्रीद कोणाचें आहे ?

उत्तर— आमचें सुधारकांचें.

हें शेवटचें उत्तर ऐकून सर्वांनीं टाळ्यांचा गजर केला, व आज सपशेल खोटें बोलणारा असावा तर असा असावा, म्हणून सर्व लोक त्याची पाठ थोपटूं लागले. अशा अद्वितीय गुणी मनुष्याचें नांव आपल्याला माहीत असावें म्हणून एकानें त्याला तें विचारलें. तेव्हां आपलें नांव सांगण्यासाठीं त्यानें 'सु' हें अक्षर उच्चारिलें न उच्चारिलें तोंच परीक्षकांनीं त्याला बक्षीस देण्यासाठीं जवळ बोलाविलें. त्या गडबडींत तें तितकेंच राहून गेलें. पाठी-मागून खाजगी माहितीवरून कोणीं त्याचें नांव अमुक अमुक आहे म्हणून सांगितलें; परंतु इतक्या खोटें बोलणारानें आपलें जें नांव प्रसिद्ध केलें आहे तें तरी खरेंच कशावरून असेल, असा संशय घेत सर्व लोक तो परीक्षेचा समारंभ पाहून आपल्या घरोघर परत जाते झाले.

---

# स्वदेशोन्नतिकारक मंडळीबद्दलची त्रोटक माहिती : : : ७

काळ : अग्रलेख ता. ७-६-१९०१

● या सुमारास सर भालचंद्र भाटवडेकर व न्या. चंदावरकर यांनी पुढाकार घेऊन बेनेट साहेबाला हिंदू समाजाच्या वतीनें मानपत्र देण्याचा घाट घातला होता. हे साहेब आपल्याला 'ईडियट' म्हणत असत.

परमेश्वरकृपेनें रावसाहेबांच्या घरीं कांहीं कमी नव्हतें. खायलाप्यायला सर्व यथास्थित असे. तरी पण सर्व ऐहिक सुखाच्या राशीवर बसलेले असूनही, रावसाहेबांच्या मनाला सुख कसें तें माहीत नव्हतें. कारण, आपल्या देशाची अवनति होत चाललेली पाहून त्यांच्या मनाला अत्यंत वाईट वाटत असे. ही स्थिति सुधारण्याला मार्ग काय करावा, या विवंचनेमध्यें त्यांच्या रात्रींच्या रात्री झोंपेशिवाय जात असत. आपला इष्ट हेतु सिद्धीस जाण्यासाठीं त्यांनीं हरतऱ्हा करून पाहिल्या. रावसाहेबांना आपल्या देशाची मनापासून कळकळ आहे, याबद्दल शंका नाहीं. तेव्हा आपल्यासारखी इतर देशांची स्थिति झाली असतां त्यांतून वर डोकें काढण्याला त्यांनीं काय काय उपाय केले होते, ह्याविषयीं रावसाहेबांनीं अनेक ग्रंथांतून जें कांहीं वाचलें होतें, त्या सर्वांचे प्रयोग त्यांनीं आपल्या देशावर करून पाहिले. परंतु कशाचाच कांहीं उपयोग झाला नाहीं. आणि त्यांचा देश जो खालीं गेला होता तो तेथून एक काडीमरही वर आला नाहीं. त्यांनीं पुरुषांना शिक्षण देऊन पाहिलें व बायकांना शिक्षण देऊन

पाहिलें; पुरुषांना धोतरांच्याऐवजीं विजारी घालून पाहिल्या, आणि बायकांना लुगड्यांच्याऐवजीं झगे नेसवून पाहिले; स्वदेशांत उद्योगधंदे चालविण्याविषयीं व्याख्यानें देऊन पाहिलीं, व परकीय देशांत उद्योगधंदे शिकण्याकरितां माणसें पाठवून पाहिलीं; विधवांचे विवाह करून पाहिले, जाती मोडून पाहिल्या, अर्जे करून पाहिले, डोळे मिटून पाहिले; पण कोणत्याच उपायांनीं देशाच्या फारच खालावलेल्या प्रकृतीला मुळीं गुण पडेना. तेव्हां आतां काय उपाय करावा, ही तंद्री त्यांना रात्रंदिवस लागून राहिली. लिहितांना, वाचतांना, बोलतांना, फिरावयाला जातांना, चिरूट ओढतांना, चहा पितांना, तपकीर ओढतांना, फार काय, झोंप लागली असतांनाही, आपल्या देशाची उन्नति करण्याकरितां काय उपाय करावा, ह्याच्याबद्दल त्यांच्या मनामध्यें सारखा विचार चाललेला असे; परंतु कांहीं युक्ति सुचेना. तेव्हां पूर्वींच्या ऋषींना असें कांहीं संकट पडलें म्हणजे ते तप करीत, ही गोष्ट रावसाहेबांच्या लक्षांत आली, आणि त्यांनींही तप करण्याचा निश्चय केला. पण हें तप म्हणजे अर्थात् कलियुगांतील देशकाल-वर्तमानाप्रमाणेंच असावयाचें हें साहजिक होतें. म्हणून हें तप करण्यासाठीं रावसाहेबांनीं अगदीं नेमस्तपणानें वागण्याचा निश्चय केला. फार खोटें बोलावयाचें नाहीं, फार चहा प्यावयाचा नाहीं, फार बिस्किटें खावयाचीं नाहींत, फार मद्याला शिवावयाचें नाहीं, फार चहाडखोरपणा करावयाचा नाहीं, वगैरे नियम धर्मशास्त्राच्या आधारानें ठरवून, त्याप्रमाणें हें कडकडीत व्रत पाळून त्यांनीं तप करण्याला आरंभ केला. अशा रीतीनें ही तपश्चर्या चाललेली पाहून सर्व देवादिकांना काळजी उत्पन्न झाली. रावसाहेबांचे इष्ट हेतु आपण मुकाट्यानें सफळ केले पाहिजेत, नाहीं तर हे आपल्या तपोबलानें काय करतील आणि काय न करतील ह्याचा नेम नाहीं, असें त्यांच्या मनाला वाटूं लागलें. तेव्हां स्वर्गलोकामध्यें सर्व देवांनीं जमून रावसाहेबांचे हेतु परिपूर्ण करण्याचा निश्चय केला. असो. इकडे एके दिवशीं डिनरपार्टीला जाऊन नंतर तेथून आपल्या देशाच्या उन्नतीला काय उपाय करावा, याच्याबद्दल चिंतनिका करीत करीत घरीं येऊन रावसाहेब आपल्या सुखशय्येवर पहुडले असतां त्यांना गाढ झोंप लागली. कांहीं अवकाशानें पहाटेची वेळ झाली. पक्षी आपला किलबिल किलबिल शब्द करूं लागले. आकाशांतील नक्षत्रें म्लान झालीं आणि अरण्यांतील पुष्पें प्रफुल्लित दिसूं लागलीं. अशा सुमाराला रावसाहेबांना अरुणो-

त्याच्या शुभ काळीं एकाएकीं एक दृष्टांत झाला. कोणी महापुरुषानें स्वप्नामध्यें येऊन त्यांना भेट दिली, त्याचा प्रकार असा: रावसाहेबांच्या खोलीचा दरवाजा उघडून मंद गतीनें आणि स्मितमधुर मुद्रेनें कोणी एक साहेब रावसाहेबांच्या बिछान्याजवळ येऊन उभा राहिला. व आपल्या थंडगार हातानें त्यांना जागें करीत तो गंभीर स्वरानें म्हणाला: 'रावसाहेबा, ऊठ, असा निजलास काय!' तो दिव्य स्पर्श होतांच आणि तो दिव्य शब्द कानीं पडतांच रावसाहेब खडबडून उठले. नंतर एका पांढऱ्या स्वच्छ टॉवेलामध्यें गुंडाळलेलें कोंबडीचें एक अंडें त्याच्या हातावर ठेवून तो साहेब म्हणाला: 'हें श्रीफळ घे, तुझ्यावर अनुग्रह झालेला आहे. आतां उठून तूं नेत्रस्पर्श कर आणि ध्यान लावून बैस, आणि प्रथमतः जो विचार तुझ्या मनामध्यें येईल त्याप्रमाणें कर, म्हणजे तुझा इष्ट हेतु सफळ होईल.' इतकें बोलून साहेब अंतर्धान पावला. नंतर रावसाहेब उठले आणि त्यांनीं आपल्या बटलराकडून एक चहाचा कप मागवून त्यांतील चहाचें प्राशन करीत करीत रावसाहेबांनीं समाधि लाविली. तेव्हां त्यांच्या मनांत प्रथमतः हाच विचार आला कीं, ज्याअर्थीं आपल्या निराकार ईश्वरानें साहेबाचा आकार धारण करूनच आपल्याला दर्शन दिलें आहे, त्याअर्थीं साहेबांचेंच आपण भजनपूजन करावें. हा विचार प्रथम त्यांचे मनांत आल्यामुळें आपल्याला दृष्टांत झाल्याप्रमाणें हाच आपल्या देशाचा तरणोपाय आहे, अशी त्यांची पक्की खात्री झाली. अशा रीतीनें दृष्टांत होऊन स्वदेशोन्नतीसाठीं काय करावयाचें हा निर्णय ठरल्यानंतर रावसाहेब हे नवीन ईश्वरी तेजोमंडलानें समावृत होऊन जगापुढें आले व असल्या ह्या मताचा प्रसार करण्यासाठीं त्यांनीं ह्या साहेबांच्या भक्तिमार्गावर अनेक भक्तिसूत्रें रचिलीं. हीं सूत्रें फारच प्रेमळ आणि तात्कालिक फल देणारीं असल्यामुळें तीं पुष्कळांना आवडलीं, व रावसाहेबांची शिष्यशाखा फारच झपाट्यानें फैलावत चालली. ज्यांना पोटाला मिळत नव्हतें, ज्यांना चाकरी मिळत नव्हती, ज्यांना चाकरी मिळाली असून प्रमोशन मिळत नव्हतें, ज्यांची ग्रेड वाढत नव्हती, ज्यांना रजा मिळावयाला अडचण पडत होती, श्रीमंत असूनही ज्यांना पदव्या मिळत नव्हत्या, मूर्ख असल्यामुळें ज्याना कोणी विचारीत नव्हतें, साठीमुळें बुद्धि नष्ट झाली तरी आणखी एक्स्टेन्शन मिळावें अशी ज्यांना इच्छा होती, आपण पेन्शन घेतल्यावर आपल्या मुलाला कोठें तरी वर्णी लागावी असें ज्याना वाटत

होतें, ज्यांना आपल्या बाजूनें काम व्हावें असें वाटे ते वकील व पक्षकार, श्रीमंत सरदारांचे निरुद्योगी वारस, फिरून निवडून येऊं इच्छिणारे म्युनिसिपालिट्यांचे आणि कायदे कौन्सिलांचे सभासद, कायद्यांचें ज्ञान नसतां ऑनररी म्याजिस्ट्रेट होऊं इच्छिणारे बड्या बापांचे छोटे बेटे, वगैरे प्रकारचे सर्व लोक त्या पंथामध्यें शिरले. मग प्रत्येकाची अक्कल जशी चालली तसतशी त्यानें ह्या भक्तिमार्गामध्यें जास्त जास्त सुधारणा केली. अर्चनं, वंदनं, आत्मनिरूपणं, पादसेवनं, वगैरे भागवतामध्यें सांगितलेले नवविधा भक्तीचे प्रकार या शिष्यमंडळींच्या हातीं आल्यावर त्यांनीं आपल्या बुद्धीच्या जोरानें ह्या नऊ प्रकारांचे नव्याण्णव प्रकार केले. अशा रीतीनें आपल्या भक्तिमार्गाचा चोहोंकडे फार फैलाव होत चाललेला आहे असें पाहून त्याला कांहीं तरी व्यवस्थित स्वरूप दिलें पाहिजे असें वाटून रावसाहेबांनीं आपल्या ह्या भक्तिपथाचे टिकटिकाणीं मठ स्थापन करण्याचें योजिलें, व त्याप्रमाणें त्यांनीं व्यवस्थाही केली. ह्या आपल्या पंथांतील सर्व मंडळींना त्यांनीं 'स्वदेशोन्नतिकारक मंडळी' असें नांव टेविलें. साहेबांची स्तुति करून, भक्ति करून त्यांना आपल्या भक्तिबळानें आळवून आपल्या देशाची उन्नति करून घ्यावयाची, हा ह्या मंडळीचा उद्देश आहे असें त्यांनीं जाहीर केलें. ह्यांतील स्वदेशोन्नति हें साध्य, आणि साहेबांची स्तुति हें त्याचें साधन, अशा दृष्टीनें ह्या साध्यसाधनांची सांगड कशी बसते आणि ह्या साधनानें तें साध्य कसें सिद्ध होणार हे प्रश्न प्रथमतः उद्भवतात खरे; परंतु ह्या गोष्टींचें सामान्य बुद्धीच्या लोकांना आकलन करतां येण्यासारखें नाहीं, असें रावसाहेब नेहमीं म्हणत. व आजपर्यंत ज्या साधनानें जी गोष्ट कधींही सिद्ध झाली नाहीं, ती गोष्ट या साधनांनीं सिद्ध झालेली लोकांच्या दृष्टीस पडेल, तेव्हांच लोकांची खात्री होईल, असेंही ते म्हणत. त्यामुळें हा भक्तिमार्ग फार बळावून पूर्वींच्या भक्तिमार्गांतल्याप्रमाणें हल्लींच्या भक्तिमार्गांतही अनेक ग्यानबा आणि तुकोबा पैदा झालेले आहेत. व त्यांच्याप्रमाणेंच हेही हल्लींचे प्रसिद्ध भक्तिपंथसाधु टाळवीणा घेऊन वेळीं अवेळीं सदासर्वदा नाचत असलेले लोकांच्या दृष्टीस पडतात. हे आपल्या इष्टदेवतेच्या भजनामध्यें इतके गर्क होऊन जातात कीं, मग त्यांना कशाचेंही भान राहत नाहीं. ह्या पंथाचा इतक्या झपाट्यानें फैलाव झालेला पाहून आतां आपल्या देशाची उन्नति खास होणार, अशी बळकट आशा मनामध्यें उत्पन्न

होऊन ह्या देशांतील सर्व लोक चातकाप्रमाणें उत्सुक होऊन ती आपली उन्नति कोणत्या दिवशीं येत आहे, ह्याची वाट पाहत बसलेले आहेत. तो सोन्याचा दिवस कधीं उगवतो आहे तें पाहण्यासाठीं सर्व लोक आपल्या हातांतील कामधंदे खालीं ठेवून अतिशय उत्कंठित झालेले आहेत. व त्यांची उत्कंठा तृप्त होण्याचा रंग अगदीं जवळ आला आहे. कारण, ह्या भाक्तिमार्गानें बहुतेक कामगिरी करून ठेविली आहे व हिंदुस्थान देश अगदीं उन्नतीच्या कांठावर येऊन बसलेला आहे. आतां थोडें कर्तव्य उरलें आहे, तेवढें झालें कीं झालीच आपल्या देशाची उन्नति. परमेश्वर करो, आणि ती लवकर होवो म्हणजे झालें.

परंतु दैवगति कांहीं विचित्र आहे. ह्या स्वदेशोन्नतिकारक मंडळींना निस्पृह आणि निर्लोभी अशा अलीकडच्या साहेबलोकांमध्यें कांहीं शत्रु उत्पन्न झाले आहेत. ते ह्या मंडळींची फार हेटाळणी करूं लागले आहेत. पूर्वीं कांहीं चांगल्या स्वभावाचे साहेबलोक होऊन गेले. त्यांच्यामुळें ह्या मंडळीचा चांगलाच जम बसला होता. परंतु दुर्दैवानें ते दिवस आतां बदलतात कीं काय, अशी भीति पडूं लागली आहे. हल्लीं निस्पृह आणि निर्लोभी साहेबलोकांचा एक वर्ग वाढत आहे. त्यांच्यापासून ह्या स्वदेशोन्नतिकारक मंडळींना फार भय आहे. त्यांचे कोणी आप्त इष्ट हिंदुस्थानात नवीन आले म्हणजे ते त्यांना चकचकीत असा उपदेश करितात कीं, 'बाबांनो, ह्या देशांत ह्यापुढें तुम्हीं फार जपून वागलें पाहिजे. कारण, येथें एक स्वदेशोन्नतिकारक या नांवाची मंडळी निघाली असून तिच्या टोळ्या सर्व ठिकाणीं पसरलेल्या आहेत. त्यांच्या तावडींत न सांपडण्याबद्दल तुम्ही नेहमीं दक्ष असा. तुमच्यापाशीं कांहींएक काम नसता जो रोज तुमच्या बंगल्यावर खेटे घालीत राहील, तुम्हीं त्याचेकडे पाहिलें नाहीं, तरीदेखील जो तुम्हांस विनाकारण सतरा वेळ सलाम करील, एक शब्द बोलण्याच्या आधीं चार वेळ दांत काढून हंसेल, तो मनुष्य ह्या टोळीपैकीं असलाच पाहिजे असें तुम्हीं खात्रीनें समजावें. असल्या माणसांपासून तुम्ही फार संभाळून राहा.' अशा प्रकारचीं मतें कित्येक साहेबलोकांमध्यें अलीकडे पसरलीं आहेत. असल्या मताचा एक साहेब आपल्या मडमेसहवर्तमान जिल्ह्यांतील एका गांवीं फिरावयास गेला असतां एके दिवशीं आपल्या बंगल्यावर परत येण्याला त्याला फार रात्र झाली. तेव्हां

त्याच्या मेमसाहेब घरीं फार काळजी करूं लागल्या व त्या स्वदेशोन्नतिकारक लोकांच्या टोळींपैकीं कोणीं तरी आपल्या नवऱ्याला खास गांठलें असावें असा त्यांनीं तर्क बांधिला. त्या युरोपियन गृहस्थांना ह्या टोळींतील तोंडपुजे लोकांचें फार भय वाटत असे. ते म्हणत: 'मी जर यांच्या तावडींत सांपडलों, तर हे लोक माझ्यावर कोणकोणत्या गुणांचा आरोप करतील कोण जाणे!' व ह्या भीतीमुळें एखादा पगडी घातलेला किंवा विजार-बूट घातलेला इसम दृष्टीस पडला, म्हणजे त्यांच्या अंगाला दरदरून घाम सुटत असे, म्हणून फक्त कचेरीच्या वेळेमध्यें सरकारी कामानिमित्त ज्यांच्याशीं बोलण्याचा प्रसंग येईल त्यांच्याशीं कामापुरतेंच मात्र ते बोलत असत. इतर वेळीं जर कोणी ह्या टोळीपैकीं इसम त्यांच्याकडे आला, तर दाराला आंतून बोल्ट लावून घेऊन 'साहेब बाहेर गेले आहेत' असें उत्तर ते आपल्या चपराशाकडूनच कळवीत असत. इतक्या बेतानें वागत असतांनाही ह्या युरोपियन गृहस्थांना एके दिवशीं संध्याकाळीं ह्या टोळींतील दोनतीन इसमांनीं अखेरीस गांठिलें व जवळ जाऊन त्यांतील एकजण म्हणाला: 'साहेब फार चांगले आहेत बरें का!' साहेबांनीं यांच्याकडे पाठ वळविली तरी दुसरा हंसत म्हणतोच: 'वा! वा! हे काय विचारावें! असे सज्जन साहेब आजपर्यंत कोणी आलेच नव्हते!' आपल्या पूर्वीं येऊन गेलेले सर्व साहेब एका वाक्यांत दुर्जन बनविलेले पाहून त्या युरोपियन गृहस्थाला फारच आश्चर्य वाटलें. व या लोकांच्या हातून आपली कशी तरी आतां सुटका व्हावी म्हणून तो डोळे मिटून परमेश्वराचा धावा करूं लागला. इतक्यांत तिसरा गृहस्थ पुढें सरसावून म्हणाला: 'महाराज, आमच्या गांवांत स्वदेशोन्नतिकारक मंडळीची शाखा आहे, तिचा मी अध्यक्ष आहें. आमच्या मंडळीच्या मनांतून आपल्याला पानसुपारीला बोलवावयाचें आहे.' साहेबांनीं ओंठ कांपत कांपत विचारलें: 'तुमच्या टोळीमध्यें किती लोक आहेत?' ह्या प्रश्नाचें उत्तर मिळाल्यावर त्या संस्थेच्या मोठेपणानें गांगरून जाऊन साहेब कांही तरी टाळाटाळी करण्यासाटीं म्हणाले: 'मला तुम्ही पानसुपारी काय म्हणून करतां? मीं काय केलें आहे? मीं तर न्यायाला आणि कायद्याला सोडून कांहींच कृत्य केलेलें नाहीं, मग मला तुम्ही ही पानसुपारी कशाबद्दल देतां? शिवाय मी पान किंवा सुपारी कधींच खात नाहीं. ह्या

बाबतींत साहेब बधत नाहीं असें वाटल्यावरून दुसरे गृहस्थ म्हणाले : ' बरें, निदान आमच्या येथे खासगी रीतीनें मी एक चहापार्टी करवितों त्याला तरी आपण यावें.' परंतु तेंही साहेब मान्य करीनात, तेव्हा सर्वांनीं विशेष आग्रह करून त्या दिवशीं एक व्याख्यान होतें तेथें सभास्थान भूषित करण्यासाठीं तरी आपण चलावें, असा विशेष आग्रह केला; तेव्हां निरुपाय होऊन साहेब तेथें गेले होते, व तेथून बंगल्यावर आल्यानंतर त्या लोकांच्या कचाट्यांतून सुटल्याबद्दल त्यांनीं अतिशय मोठा आनंद प्रदर्शित केला.

दुसऱ्या एका युरोपियन गृहस्थाची अकरा वेळा निरनिराळ्या ठिकाणीं बदली होऊन व नंतर तो कांहीं दिवसांची रजा घेऊन विलायतेस गेला होता. ज्या ज्या ठिकाणीं तो होता तेथून तो जाऊं लागे तेव्हां त्यांपैकीं प्रत्येक ठिकाणच्या लोकांनीं त्याला मध्यें बसवून आपण त्याच्याभोंवतीं उभे राहून फोटो काढविलेले होते व प्रत्येक ठिकाणीं सोनेरी फ्रेमींमध्यें बसविलेलीं मानपत्रें त्याला मिळालेलीं होतीं. ते सर्व फोटो आणि तीं सर्व मानपत्रें आपल्या विलायतेंतील इष्टमित्रांना दाखवून तो म्हणाला : ' मित्रहो, मी येथें असतांना तुम्हीं मला अगदीं वेड्यांमध्यें काढिलें होतें. परंतु पाहा, मी हिंदुस्थानांत गेल्यापासून किती शहाणा झालों पाहा. मला अकरा ठिकाणीं मानपत्रें मिळालीं आहेत. आणि माझे अकरा वेळां फोटो काढून घेण्यांत आले आहेत.' इतक्यांत इकडे ह्या नवीन निघालेल्या स्वदेशोन्नतिकारक मंडळीची हकीकत माहीत असलेला एक गृहस्थ तेथें होता तो म्हणाला : ' छे ! छे ! ह्यांत कांहीं अर्थ नाहीं. ह्याच्यापेक्षांही मूर्ख लोकांना तिकडे मानपत्रें मिळालेलीं आहेत. अलीकडे हिंदुस्थानांत कित्येक ठिकाणीं स्वदेशोन्नतिकारक या नांवाच्या कांहीं लोकांच्या टोळ्याच निघालेल्या आहेत. त्यांचा उद्योग म्हटला म्हणजे दुसरा कांहीं नाहीं. साहेब दिसला कीं आणलाच त्याला गांठून, आणि एकदां का साहेब त्यांच्या हातीं लागला कीं मग मानपत्र दिल्यावांचून ते त्याला सोडावयाचेच नाहींत. अशा टोळ्या तिकडे सर्व मोठमोठ्या शहरीं स्थापन झालेल्या आहेत.' ही ह्या टोळ्यांबद्दलची बातमी त्या गृहस्थानें तेथें पुष्कळ लोकांसमक्ष बोलून दाखविल्यामुळें त्या अकरा मानपत्रवाल्या गृहस्थाचा तर हिरमोड झालाच. परंतु ही बातमी पसरत पसरत चोहोंकडे झाल्यामुळें तिकडच्या लोकमतावरही त्याचा फार परिणाम झाला. व तेव्हांपासून हीं मानपत्रें विलायतपर्यंत जाईनाशीं झालीं. व तिकडे

V2xM64
7318.4 H6.4

याची कांहीं किंमत न उरल्यामुळें पुष्कळ साहेबलोक आगबोटींत बसून विलायतेस जाऊं लागले, म्हणजे कोणी टोळीवाला मुंबईच्या किनाऱ्यावरून आपलें कृत्य आतां पाहूं शकणार नाहीं अशी खात्री करून घेऊन नंतर तांबड्या समुद्रामध्यें किंवा भूमध्य समुद्रामध्यें तीं मानपत्रांचीं पुडकीं अलीकडे सोडून देऊं लागले आहेत. ह्या मानपत्रांचे तुकडे सुवेझच्या कालव्यामध्यें टाकण्याची सक्त मनाई करण्यांत आलेली आहे. कारण, हा कचरा जर तेथें टाकूं दिला असता तर विलायतेस जाणाऱ्या आगबोटींना ह्याच्यापूर्वीच केप ऑफ् गुड् होपवरून जाणें भाग पडलें असतें.

ज्या गृहस्थानें इकडील टोळ्यांची बातमी विलायतेंत फोडली म्हणून वर सांगितलें आहे, त्यांनीं तिकडे दुसरे एके ठिकाणीं बोलत असतां आपल्या युरोपियन मित्रमंडळींना असें सांगितलें कीं,' अहो, या मानपत्रांत अर्थ काय आहे ! तीं पाहिजे त्याला मिळूं शकतील. हिंदुस्थानांतील कांहीं लोक अलीकडे इतके कांहीं मूर्ख झाले आहेत कीं, कांहीं सांगण्याची सोय नाहीं. एकदां असें झालें कीं, माझा मुक्काम अलीकडच्या गांवीं होता, व दुसऱ्या दिवशीं मला पुढल्या एका शहरीं जावयाचें होतें. तेव्हां त्याबद्दल कांहीं तरतूद करण्यासाठीं मीं आपले कपडेलत्ते वगैरे कांहीं सामान व आपली गाडी देऊन आपल्या बटलरला पुढें पाठविलें. ते दिवस पावसाळ्याचे होते व एके ठिकाणीं रस्ता ढांसळला होता. त्यामुळें तेथें गाडी उलटून माझा बटलर चिखलामध्यें पडला, व त्याचे सर्व कपडे घाण झाले. तेव्हां तशा कपड्यांनीं शहरांत जाणें बरोबर नाहीं असें वाटून निरुपायास्तव त्यानें माझे कपडे घातले व थंडीचें निवारण करण्यासाठीं तो चिरूट ओढूं लागला, व गाडी फिरून चालू झाली. गाडी ज्या शहराकडे येत होती त्या शहरच्या स्वदेशोन्नतिकारक टोळीच्या लोकांमार्फत शहरच्या चार बाजूंच्या चार रस्त्यांवर चार शिपाई उभे करण्याची व्यवस्था केलेली असे. त्या शिपायांचें काम साहेबांचा वास आल्याबरोबर त्याबद्दलची वर्दी टोळीच्या पुढाऱ्याला द्यावयाची हें असे. माझ्या बटलरच्या अंगावर चांगले कपडे असलेले पाहून त्यांपैकीं एका शिपायाला वाटलें कीं, हा कोणी तरी साहेबच असावा. व आतां आपल्या टोळीला शिकार सांपडली, म्हणून आनंदानें तो ती बातमी आपल्या टोळीच्या नाईकाला कळविण्याकरितां धांवत गेला. व थोड्याच वेळानें माझ्या बटलरच्या गाडीभोंवतीं तेथील स्वदेशोन्नतिकारक टोळी-

तील लोकांचा गराडा पडला. आपल्यावर काय प्रसंग ओढवत आहे याची कल्पन माझ्या बटलरला हळूहळू आली. परंतु तो थोड्या विनोदी स्वभावाचा असल्यामुळं आलेल्या संकटाला पाठ देण्याचा त्यानें निश्चय केला. त्या गांवांत रावसाहे पुष्कळ होते व ते बहुतेक माझ्या बटलरच्या गाडीसभोंवतीं त्या वेळीं सेवेलाई हजर झाले होते. एक रुप्याच्या झारींत पाणी घेऊन उभा होता. त्याच्या शेजार दुसरा रावसाहेब हातांत टॉवेल घेऊन उभा होता. माझ्या बटलरनें गाडींतू खालीं उतरून तोंड धुऊन टाकिलें व टॉवेलला पुशिलें. इतक्यांत तिसरा राव साहेब चहाचा पेला आणि दुसरी कांहीं सामग्री घेऊन पुढें सरसावला. उपाहा संपल्याबरोबर एक फुलांची माळ चवथ्या रावसाहेबांनीं त्याच्या गळ्यामध्यें घातली व अत्तर, गुलाब, हारतुरे वगैरे दिले. इतक्यांत एक मनुष्य एका बाजूल उभा राहून वरच्यावर एका काळ्या फडक्याच्या आंत आपलें डोकें घाली आणि बाहेर काढी. हा त्याचा क्रम बरेच वेळां चालला होता. माझ्या बटलरला फोटोग्राफीसंबंधानें कांहींच माहिती नव्हती. त्याला वाटलें हा आपल्यावर नेम का धरतो आहे कोण जाणे! परंतु इतक्यांत एका रावसाहेबानें आपला फोटो काढून घ्यावयाचा आहे म्हणून सुचविलें. तेव्हां माझ्या बटलरची भीति बरीच कमी झाली. माझ्या बटलरला इंग्रजी बोलतां येत नव्हतें. तेव्हां तो हिंदुस्थानी-मध्येंच बोलूं लागला. तेव्हां त्या टोळींतील एक गृहस्थ दुसऱ्यापाशीं म्हणाला: 'काय पाहा, साहेबलोक बुद्धिमान् असतात! हिंदुस्थानांत आले तर हिंदुस्थानी भाषा तुमच्या–आमच्यापेक्षांही अधिक सफाईनें बोलूं शकतात' व अशा रीतीनें माझ्या बटलरचें साहेबाचें सोंग चांगल्या रीतीनें संपादिलें गेलें. त्या दिवशीं तेथील एका देवळाच्या पायाच्या कामाला सुरवात व्हावयाची होती. परंतु आनायासानें आपल्या गांवामध्यें हा मोठा थोरला साहेब आलेला आहे, तेव्हां ह्याच्याच हातून ह्या देवळाचा समारंभ होईल तर चांगलें, असें वाटून तो समारंभ त्याजकडून करवून घेतला. अशा रीतीनें तो दिवस साजरा झाल्यानंतर आपलें नांव कळेल तर बरें होईल, अशी त्यांनीं विनंती केल्यावरून माझ्या बटलरनें आपलें खरें नांव व धंदा सांगितला. परंतु हें कळल्यावर देखील त्या टोळींतील लोकांना लज्जा न वाटता उलट त्यांतील अध्यक्ष म्हणाले: 'आम्ही आपली एका बटलरची इतकी बरदास्त ठेवली, ह्यांतही आमचा फायदाच झाला आहे. कारण, जर बटलरला आम्ही इतका मान देतों तर त्याच्या साहेबाला किती

मान देऊं, हें आम्ही जगाच्या निदर्शनाला ह्या योगानें आणून देत नाहीं काय? आपल्या येथें येण्यानें आमच्या देशाची अशीच वारंवार उन्नति होत जावी व परमेश्वर आपल्याला दीर्घ आयुष्य देवो! आपले यजमान साहेब येथें येऊन जाफतीचा आम्हांला लाभ देतील तर त्यापासून आमच्या देशाचें अत्यंत कल्याण होणार आहे. ही गोष्ट आपण त्यांच्या कानावर घालाल अशी आशा आहे.' हें भाषण संपल्यावर माझा बटलर तेथून निघाला तो तडक माझ्यापाशीं परत आला. त्यानें सांगितलेली हकीकत ऐकून मी पोंट धरधरून हंसलों, व असल्या वेडगळ लोकांची कांहीं तरी समजूत घालावी म्हणून दोनचार दिवसांनीं मुद्दाम स्वतः मी त्या शहरीं गेलों. तेव्हां मजवरही माझ्या बटलरा-प्रमाणें प्रसंग आला. परंतु तो प्रसंग यावा म्हणून मी गेलों होतों, यासाठीं मला त्याचें कांहीं वाटलें नाहीं. उलट जर कांहीं वाटलें असलें तर तें त्या लोकांच्या मूर्खपणाबद्दल वाईटच वाटत होतें. असो. ते सर्व लोक एकत्र झाल्यानंतर व त्यांच्या पद्धतीप्रमाणें मला मानपत्र, पानसुपारी वगैरे झाल्यानंतर मी मोठ्या आवेशानें व संतोषानें बोलावयाला उठलों. मी म्हणालों : 'हे मूर्ख गृहस्थहो, तुमचा मूर्खपणा पाहून तुमची मला अतिशय कींव येते, तुमच्याइतके मूर्ख जगामध्यें दुसरे असतील किंवा नाहींत, ह्याचेबद्दल प्रत्येकाला शंका वाटणें साहजिक आहे. तुम्ही मूर्ख झालां आहां आणि तुमच्याबरोबर जगाच्या दृष्टीनें तुम्ही आम्हांलाही मूर्ख करूं पाहत आहां. एखाद्या साहेबाला मानपत्रें देण्या-साटीं आणि त्याच्यापुढें हांजी हांजी करण्यासाठीं तुम्ही जो इतका खटाटोप करितां तो कशासाटीं? यापासून तुमचा काय फायदा आहे? तुम्ही कसे भ्रमांत पडलां आहां! ह्या माळांनीं, फुलांनीं, विडयावर लाविलेल्या वर्खांनीं आणि मानपत्राच्या चिटोऱ्यांनीं आम्ही इंग्लिश लोक भुलून जाऊं असें तुह्मांला वाटतें काय? आम्ही इतके भोळे असतों तर आम्हांला येथलें राज्य मिळालें असतें काय? हे मूर्ख गृहस्थहो, तुम्ही आपल्या मंडळीला स्वदेशोन्नतिकारक असें नांव दिलें आहे, व साहेबांची सपाटून स्तुति करून स्वदेशोन्नतीचा उद्देश तुम्ही सिद्धीस नेऊं पाहात आहां. पण मूर्ख गृहस्थहो, साहेबांची स्तुति करण्यांत स्वदेशाची उन्नति काय होणार? तुमच्या देशांत कोणी अन्नावांचून उपाशी मरत नाहींत काय? किंवा धर्मांतर करण्याला प्रवृत्त होत नाहींत काय? असतील तर मग तुम्ही आपले पैसे पानसुपाऱ्यांच्या कामीं व्यर्थ मातींत कां घालतां? तुमच्या

घरीं देव नाहींत काय ? असतील तर त्यांच्यावर हीं गुलाबाचीं फुलें वाहावयाचीं टाकून तीं आमच्या मनगटाला आणून कां बांधितां ? आम्हांला तुम्ही फळफळा-वळीच्या डाल्या वगैरे विनाकारण कां पाठवितां ? तुमच्या घरीं फळफळावळ खाण्याला कोणी मुलें नाहींत काय ? व त्यांना तीं फळें खाववत नाहींत काय ? आमची भर करून तुम्हांला काय मिळावयाचें आहे ? माझ्या हातामध्यें तुमचें खरें कल्याण करण्याचें कांहीं एक साधन नसल्यामुळें, हीं तुमचीं मानपत्रें आणि हे नजराणे घेण्याची मला लाज वाटते, तुम्ही आम्ही मित्र असें म्हणाल तर तें मित्रत्व तरी कसलें ? तिकडे गेलेल्या साहेबलोकांना इकडच्या मानपत्र देणाऱ्या त्यांच्या मित्रांची क्वचितच आठवण होत असेल; किंवा झालीच तर मूर्खांच्या गोष्टी निघाल्या असतां मात्र होत असेल. तेव्हां अशा स्थितीमध्यें सर्वांनीं आपापलें कर्तव्य करावें हाच उत्तम मार्ग आहे. तुम्ही आपलें कर्तव्यकर्म करा. तो तुमच्या देशोन्नतीचा मार्ग आहे. त्या मार्गानें चला. तुम्ही स्वतः फसूं नका व दुसऱ्याला फसविण्याचा प्रयत्न करूं नका. सत्यानें चाला. स्वधर्मानें वागा आणि परमेश्वरावर भरंवसा ठेवा. ह्यांत तुमच्या देशाची उन्नति आहे. निरुपद्रवी, निस्पृह, निर्लोभी अशा माझ्यासारख्या साहेबलोकांना असल्या मानपत्रांनीं सतावून टाकण्यापासून देशोन्नति कधींही व्हावयाची नाहीं. इतकें बोलून, मूर्ख गृहस्थहो, मी तुमची रजा घेतों.' असें मीं त्यांना स्पष्ट सांगितलें. परंतु तें त्यांना रुचलेंसें दिसलें नाहीं.

कार्लाइलनें 'हीरो वर्शिप' चें माहात्म्य तिकडे वाढविलें, त्याप्रमाणें साहेब-वर्शिपचें माहात्म्य वाढविण्याचा क्रम सुदैवानें इकडे होत आहे. परंतु त्याला कांहीं साहेबलोकच विरुद्ध जात आहेत, हें वर दिलेल्या कित्येक हकीगतीं-वरून दिसून येईल. याचा कांहीं तरी बंदोबस्त होऊन आमची स्वदेशोन्नति-कारक मंडळी आमची उन्नति करण्याचें काम मोठ्या झपाट्यानें सुरू ठेवील अशी सर्वांना आशा आहे.

# ख्रिस्ताची आज्ञा : : : ८

काळ : अग्रलेख ता. २६-५-१९०१

● याच सुमारास केसरीकर्त्यांनीं "जागे व्हा नाहीं तर मरा" या मथळ्याखालीं याच विषयावर लेख लिहिला होता.

आपल्या धर्माचा प्रसार करावा आणि तो सामोपचारानें होत नसेल तर तलवारीच्या जोरावर करावा, अशी आज्ञा एकदां महंमद पैगंबरानें आपल्या अनुयायांना दिली होती, व त्या आज्ञेला अनुसरून मुसलमान लोकांनीं एकदां केडीझपासून दिल्लीपर्यंत आपल्या धर्माचीं निशाणें फडकाविलीं होतीं. अशाच प्रकारची आज्ञा जीजस ख्राइस्ट यानेंही केलेली आहे. पैगंबराची आज्ञा ही पाठीमागची आहे व ख्रिस्ताची आज्ञा ही आधींची आहे. परंतु आम्हां हिंदुस्थानांतील लोकांना पैगंबराच्या आज्ञेचा अनुभव प्रथम आला व ख्रिस्ताच्या आज्ञेचा अनुभव पाठीमागून येत आहे. त्यामुळें त्या अनुभवाला अनुसरून आम्हीं येथें प्रथमतः पैगंबराच्या आज्ञेचा आणि नंतर ख्रिस्ताच्या आज्ञेचा निर्देश केलेला आहे. आतां पैगंबराची आज्ञा सध्यां शिळी झाली आहे, आणि ख्रिस्ताची आज्ञा अगदीं ऐन भरांत आलेली आहे. ह्याकरितां ह्या दुसऱ्या आज्ञेचाच आज थोडासा विचार करण्याचें आम्हीं योजिलें आहे.

ज्या येशू ख्रिस्ताच्या एका आज्ञेबद्दल वर उल्लेख केला आहे ती आज्ञा येणेंप्रमाणें आहे: 'Go ye into all the world, and preach the gospel.' 'तुम्ही साऱ्या जगभर फिरा आणि पवित्र शास्त्राचा सर्वांना उपदेश करा' असें येशू ख्रिस्तानें आपल्या भक्तमंडळीला

सांगितलें. तेव्हां ती आज्ञा शिरसावंद्य करून आज ही त्याची भक्तमंडळी—मिशनरी लोक—त्या पवित्र शास्त्राचा सर्व देशभर उपदेश करीत फिरत आहेत. मिशनरी लोकांचीं आजकाल जीं कांहीं बरींवाईट कृत्यें होत आहेत, तीं सर्व ह्या आज्ञेच्या नांवाखालीं खपलीं जात आहेत, ही गोष्ट सर्वत्र मशहूर आहे. हिंदुस्थानांतील लोकांना त्यांच्या धर्मापासून बाटवून, तुम्ही आपल्या धर्मामध्यें कां ओढून घेतां, असें कोणीं विचारलें, तर तशी आमच्या देवाची आम्हांला आज्ञा आहे असें उत्तर मिळतें. 'चीनमध्यें निव्वळ तुमच्या बाटवण्यामुळें मोठमोठे रक्तपात झाले, अतिशय प्राणहानि झाली, आणि असंख्य लोकांवर अनर्थ कोसळले; तर इतक्या सगळ्या अनर्थाला कारणीभूत होण्यापेक्षां तुम्ही चीन देशामध्यें गेलांच नाहीं तर चालवयाचें नाहीं काय ?' असें कोणीं विचारलें, तर 'छे, छे! असें कसें होईल! आम्ही चीन देशांत न जाऊन कसें चालेल ! सर्व जगभर फिरून पवित्र शास्त्राचा उपदेश करावा अशी आम्हांला देवाची आज्ञा आहे. त्या आज्ञेचा आम्हीं भंग कसा करावा ? देवाची आज्ञा आम्हीं मोडावी असा आम्हांला तुम्ही उपदेश करितां होय ?' अशा प्रकारचे रोकडे जबाब पुढें येतात, व देवाच्या आज्ञेपुढें सर्व आक्षेप थिजून जातात. अशी ही जी आजकाल सर्वशक्तिमान् झालेली देवाची आज्ञा, ती आहे तरी काय, हिला कितपत किंमत आहे, हिची इतर आज्ञांशीं कितपत संगति आहे, हिचा इतर धर्मांतील आज्ञांशीं कांहीं विरोध येतो कीं नाहीं, व तो आला असतां ह्या आज्ञेची वाट काय लावावयाची, ह्या आज्ञेला युक्तीचा आणि न्यायाचा कितपत आधार आहे व तिला कांहीं आधार असला तरी तिनें दुसऱ्याच्या प्रदेशांत आक्रमण करितांना तिच्या अमलबजावणीला कांहीं मर्यादा आहे किंवा नाहीं, असे अनेक विचार करण्यासारखे प्रश्न ह्या ख्रिस्ती आज्ञेच्या संबंधानें कोणाच्याही मनांत स्वाभाविकपणें उत्पन्न होतात. ह्यांपैकीं कांहीं प्रश्नांचा आपण विचार करूं.

ख्रिस्ती लोकांच्या धर्मपुस्तकांत बायबलचा प्रसार करावा असें सांगितलेलें आहे. एवढ्याच सबबीवर आजकाल मिशनरी लोक वाटेल तशा सवलती घेऊन परधर्मांतील लोकांना हवें तसें नाडीत आहेत, आणि ह्या देवाच्या आज्ञेच्या नांवावर परके लोक मिशनरी लोकांकडून नाडले जात आहेत. ह्याबद्दलचें प्रत्यंतर पाहणें असल्यास चीनचा ताजा इतिहास पाहावा म्हणजे झालें. अथवा

इतकें तरी लांब कशाला जावयाला पाहिजे ? वरील गोष्टीची सत्यता सिद्ध करून दाखविणारीं उदाहरणें आमच्या येथें हिंदुस्थानांत काय थोडीं आहेत ? आम्ही ज्या देवाला परम पूज्य मानितों आणि म्हणून ज्याच्या दर्शनाला अत्यंत प्रेमभावानें जातों, त्याच देवाच्या देवळाच्या बाहेरच्या बाजूला आमच्या त्या पवित्र देवाची निंदा करणारा मिशनरी उभा असतो. कां तर, आपल्या धर्माचा प्रसार करण्याची खिस्ती लोकांना आज्ञा आहे ! आम्ही ज्या गंगेला आपली आई समजतों व जिच्यामध्यें स्नान केलें असता आम्ही मोक्षाला जाऊं अशी आमची समजूत असते, आणि म्हणून जेथें आम्ही अत्यंत भाविकपणानें स्नानाला जातों, त्याच गंगेच्या घाटावर त्या आमच्या पवित्र गंगेची नालस्ती करणारा मिशनरी उभा असतो. कां तर, आपल्या धर्माचा प्रसार करण्याची खिस्ती लोकांना आज्ञाच आहे ! आमच्या लहान मुलांना वाटतील तशा थाडा मारून आमच्या धर्मापासून बाटवून मिशनरी त्याला राजरोसपणें आपल्या धर्मामध्यें नेतो; आणि इतकें असूनही त्यांत कांहीं अपराध नाहीं असेंही मानण्यांत येतें. कां तर, आपल्या धर्माचा प्रसार करण्याची खिस्ती लोकांना आज्ञाच आहे ! आमच्या हिंदूंच्या किंवा मुसलमानांच्या घरांतून झनाना मिशनच्या स्त्रिया पाठवून, आमच्या मुलांना शाळेंत बायबल वाचावयाला लावून, आमच्यांतील मध्यम लोकांना आपल्या धर्मार्थ दवाखान्यांतील फुकट औषधांनीं भुलवून टाकून आणि आमच्यांतील गरिबांना दुष्काळाच्या दिवसांत गोळाभर अन्नाची लालूच दाखवून, शेंकडो मिशनरी हजारों लोकांना खुशाल बाटवीत आहेत; आणि त्याबद्दल त्यांना कोणी नांव तर ठेवीत नाहींच, पण उलट सर्वजण त्यांची तारीफच करतात. कां तर, आपल्या धर्माचा प्रसार करण्याची खिस्ती लोकांना आज्ञाच आहे ! पण ह्या आज्ञेबद्दल कोणी असा विचार करीना कीं, ही आज्ञा ह्यांना दिली कोणीं ? आणि ती देण्याचा त्या देणाराला काय हक्क होता ? येशू खिस्तानें ही आज्ञा दिली आहे, हें ठीक आहे. पण त्या आज्ञेला बचकून इतर धर्मांतील लोकांनीं तिच्यापुढें आपली मान कां वांकवावी, हें समजत नाहीं. येशू खिस्त म्हणजे कांहीं कोणी बादशहा नव्हता. आणि बादशहाच्या देखील आज्ञा कधीं कधीं कोणी ऐकत नाहींत. मग येशू खिस्ताची आज्ञा इतर लोकांनीं काय म्हणून मानावी ? बायबलचा उपदेश करावा ही आज्ञा उपदेश ऐकणारा कोणी तरी भेटल्यावांचून कधींही परिपूर्ण

व्हावयाची नाहीं, हें उघड आहे; व बायबलचा उपदेश सर्व जगभर करावयाचा म्हणजे अर्थात् सर्व जगांतील लोकांनीं, मग ते कोणत्याही धर्मांचे किंवा पंथाचे असोत, त्या बायबलचा उपदेश ऐकण्याला तयार झालें पाहिजे. म्हणजे परोक्ष रीतीनें ' तुम्ही माझ्या बायबलचा उपदेश ऐका ' अशीच सर्व जगाला आज्ञा केल्यासारखें होत आहे. ह्यांपैकीं जे ख्रिस्ती असतील त्यांनीं बायबलचा उपदेश ऐकला पाहिजे, ह्याबद्दल आमचें कांहीं म्हणणें नाहीं. पण ख्रिस्ती लोकांखेरीज बाकी राहिलेल्या जगांतील इतर धर्मांच्या लोकांवर ' तुम्ही माझ्या बायबलचा उपदेश ऐका,' अशी आज्ञा करून कसें चालणार! त्या लोकांसंबंधानें असा हुकूम फर्माविण्याचा जीजस ख्राइस्टला काय अधिकार होता! हा हुकूम त्यानें निव्वळ आपल्या अधिकाराच्या बाहेर फर्माविलेला आहे. आणि ह्यामुळें त्या हुकुमाला काडीइतकीदेखील किंमत नाहीं. जी गोष्ट ज्याच्या ताब्यांतील नाहीं त्या गोष्टीबद्दल त्यानें कितीही हुकूम सोडिले तरी ते व्यर्थ आहेत. हिंदुस्थानांतल्या एखाद्या मॅजिस्ट्रेटानें आपल्या भोंवतालीं कवून उभे राहिलेल्या शिपायांना सांगितले कीं, ' माझ्या शिपायांनो, तुम्ही अमेरिकेमध्यें जा आणि तेथील गुन्हेगारांना पकडून आणा. ' तर त्याचे पट्टेवाले पाहिजे तर अमेरिकेपर्यंत खेप घालून येवोत, परंतु अमेरिकेंतील लोक ह्या मॅजिस्ट्रेटचा हुकूम पाळण्याला बिलकुल बांधले गेलेले नाहींत. त्याचप्रमाणें हिंदु, मुसलमान, बौद्ध, जैन, यहुदी वगैरे लोकांना ' तुम्ही माझें बायबल ऐका ' असें सांगण्याचा जीजस ख्राईस्टला अधिकार काय? असल्या कामीं तो वाटेल तितक्या आज्ञा करील, पण त्या सर्व निष्फळ आहेत. असल्या आज्ञांच्या जोरावर जर कोणी आमच्या देवळांतून, तीर्थांतून, धार्मिक मेळ्यांतून, घरांतून आणि शाळांतून घुसून बायबलचें घोडें पुढें ढकलील, तर तें अगदीं अन्यायाचें आहे. कारण, आम्ही बायबलचा उपदेश ऐकावा, अशाबद्दलच्या जीजसच्या आज्ञेवरून आपण परकीय धर्मांतील कोणीही लोक यत्किंचित्सुद्धां बांधले जात नाहीं. उलट तो उपदेश न ऐकतां आपल्या धर्मांत जो उपदेश सांगितलेला असेल तोच आपण ऐकावा आणि त्याप्रमाणें आपण वागावें, हें आपलें कर्तव्यकर्म आहे. जीजस ख्राइस्टनें बायबलचा प्रसार करण्याविषयीं ख्रिश्चनांना पुष्कळ आज्ञा केल्या असतील. पण त्यांचें दुसऱ्यांना काय? त्याच्या आज्ञांसाठीं दुसऱ्यांनीं आपल्या आईबापांना, बायकामुलांना, इष्टमित्रांना,

आपल्या देवांना, आपल्या देवाला आणि आपल्या धर्माला मुकावें की काय? त्यांनीं आपल्या सर्वांला मुकावें आणि मिशनरी कोरड्या थापांना माळावें असें कोणीही म्हणणार नाहीं.

पण ह्यावर कोणी मिशनरी असा आक्षेप काढतील कीं, बायबलचा प्रसार करावा ही आज्ञा Revelation मधील (ईश्वरप्रणीत धर्मपुस्तकांतील) असल्यामुळें ती परधर्मांतील लोकांनींही मान्य केली पाहिजे. ह्यावर एवढेंच उत्तर दिलें म्हणजे बस आहे कीं, ज्याप्रमाणें बायबल हें तुमचें ईश्वरप्रणीत धर्मपुस्तक आहे त्याचप्रमाणें कुराण हें मुसलमानांचें ईश्वरप्रणीत धर्मपुस्तक आहे. आणि कुराणामध्यें पैगंबरानेंही आपल्या अनुयायांना अशी आज्ञा दिली आहे कीं, सर्व जगभर तुम्ही हा इस्लामाचा धर्म प्रसृत करा व सर्वांना खुषीनें अगर जबरीनें आपल्या धर्मामध्यें घेऊन सर्वांची शेंडी काढून टाका आणि सुंता करा. आतां ह्या आज्ञेप्रमाणें उद्यां मुसलमान लोक युरोपखंडामध्यें घुसले आणि युरोपियन लोकांना मुसलमान करून त्यांची शेंडी काढून सुंता करूं लागले, तर त्या पैगंबराच्या आज्ञेला युरोपियन लोक कितपत बरें मान देतील! जर पैगंबराच्या आज्ञेला युरोपियन लोक मान देत नाहींत, तर मेशियाच्या आज्ञेला तरी मुसलमानांनीं काय म्हणून मान द्यावा! व ज्या कारणांसाठीं मुसलमानांनीं मान देऊं नये, त्याच कारणासाठीं हिंदु, बौद्ध, जैन, यहुदी, यांनींही देऊं नये असेंच प्राप्त होत नाहीं काय! शिवाय ही रिव्हिलेशन (ईश्वरप्रणेतृत्व) ची सबब इतकी पोंचट झालेली आहे कीं, तिच्यावर आतां फारच थोड्यांचा विश्वास बसतो. वेद हे वसिष्ठानें आणि विश्वामित्रानें लिहिले, व कुराण हें महंमद या नांवाच्या इसमानें लिहिलें, आणि बायबल हें मात्र ईश्वरापासून निर्माण झालें, असें सांगण्याचे आतां दिवस उरले नाहींत. जर जगामध्यें एक ईश्वरप्रणीत पुस्तक असलें तर दुसरेंही कां असूं नये! जर बायबल हें ईश्वरप्रणीत असेल तर मग वेद किंवा कुराण हींही पुस्तकें ईश्वरप्रणीत कां असूं नयेत! किंवा जर वेद आणि कुराण हीं ईश्वरप्रणीत नाहींत तर मग बायबल तरी ईश्वरप्रणीत कोठून असणार! जर सर्वच धर्मपुस्तकें ईश्वरप्रणीत असतील तर एका धर्मपुस्तकांतील वचनानें दुसऱ्या धर्मपुस्तकांतील वचनाचा बाध कसा होऊं शकेल! परंतु बाध तर होतो. ईश्वरप्रणीत वेद, यज्ञ करावा म्हणून सांगतो; आणि बायबल यज्ञाचा निषेध करतें. ईश्वरप्रणीत

बायबल कांहीं धर्मसंस्कारांमध्यें दारूच्या ग्रहणाला अनुमोदन देतें; परंतु वेद दारूचा निषेध करितो, व त्याप्रमाणें कुराणही करतें. ईश्वर अनेक नाहींत हा सिद्धांत सर्व धर्मांतील लोकांना मान्य असल्यामुळें एकच ईश्वर एकदां यज्ञ करावयाला सांगतो, आणि एकदां यज्ञाचा प्रतिषेध करितो, एकदां दारूचें ग्रहण विहित आहे असें म्हणतो, आणि एकदां त्याच्याबद्दल निषेध आणि निंदा व्यक्त करितो, असें मानणें हें असमंजसपणाचें काम आहे. आतां, जर कोणताच ग्रंथ ईश्वरप्रणीत नाहीं तर मग बायबलमध्यें जें कांहीं लिहिलें असेल त्यानें रामभट किंवा इब्राहिमखान हे कसे बांधले जाणार? जर वेदांतल्या किंवा कुराणांतल्या वचनांनीं ख्रिस्ती मनुष्य बांधला जात नाहीं तर बायबलांतल्या वचनांनीं हिंदु किंवा मुसलमान तरी काय म्हणून बांधला जावा? इतर दृष्टींनीं बायबलची कितीही योग्यता असो, परंतु धर्मपुस्तक या दृष्टीनें इतर धर्मांतील लोकांना बाकीच्या पुस्तकांसारखेंच तें एक पुस्तक आहे. ह्यापेक्षां त्याची जास्त किंमत इतरांनीं काय म्हणून मानावी? तें देवानें माणसाला दिलेलें एक पुस्तक आहे, असें परधर्मीय लोक कोणीही मानणार नाहींत. तें देवानें दिलेलें पुस्तक नव्हे, तर माणसांनीं खिळ्याशीं खिळा जुळवून आणि त्याच्यावर शाई फांसून आणि कागद ठेवून छापून काढलेलें तें एक पुस्तक आहे, असेंच लोक मानणार. तेव्हां असल्या एका पुस्तकामध्यें ख्रिस्ती धर्माचा प्रसार चोहोंकडे करा असें म्हटलें आहे, म्हणून त्या धर्माच्या मिशनऱ्यांना आणि शुभ वर्तमान सांगणाऱ्यांना आम्ही आपल्या देवळाजवळ, तीर्थाजवळ आणि सर्व देवळांतील देऊळ आणि सर्व तीर्थांतील तीर्थ असें जें आमचें घर त्या घराजवळ कां येऊं द्यावें? कित्येक मिशनरी लोक आणि त्यांच्या कपटवाग्जालानें मोहून गेलेले कित्येक नेमळट सुधारक लोक असा एक युक्तिवाद सांगतात कीं, धर्माच्या बाबतींत प्रत्येकाला पूर्ण स्वातंत्र्य आहे. [ तेव्हां तुम्ही ख्रिस्ती धर्म स्वीकाराच असें परधर्मीय लोकांना सांगण्याचा ख्रिस्ती लोकांना अधिकार नाहीं. परंतु ते काय सांगतात हें ऐकण्याला तुम्हांला काय प्रत्यवाय आहे? म्हणजे ह्यांच्या म्हणण्यांतील भावार्थ असा कीं, तुम्ही आपलें मन आपल्या धर्मावर कायम ठेवा आणि नुसत्या कानांनीं तुम्ही यांचें म्हणणें ऐका. पण हें म्हणणेंही बरोबर नाहीं. आपल्या धर्मावर निष्ठा ठेवावयाची ती नुसत्या मनानेंच ठेवावयाची आणि आपले कान व डोळे हे दुसऱ्या धर्माकडे लावावयाचे, हें तत्त्व

बिलकूल उपयोगी नाहीं. आपल्या धर्माला आपल्या मनाची जितकी अपेक्षा आहे तितकीच आपल्या कानांची आणि डोळ्यांची आहे. आपल्या कानांवर आणि डोळयांवरही आपल्या धर्माचा ताबा आहे. त्या आमच्या कानांमध्यें जो कोणी आमच्या धर्माच्या विरुद्ध गोष्टी घालण्याचा प्रयत्न करतो, तोही आमचा धर्मदृष्टया अन्यायच करतो असें म्हटलें पाहिजे. किल्ल्याचा आंतला भाग तुह्मी आपल्या पूर्णपणें ताब्यांत ठेवा. आम्हांला फक्त बाहेरच्या दिल्ली दरवाजाच्या आंतमध्यें जाण्याची परवानगी द्या, असें जर एकाद्या ख्रिश्चन किल्लेदाराला त्याच्या शत्रूंनीं सांगितलें, तर तो ऐकेल काय? नाहीं.] तो जर आपल्या शत्रूला दिल्ली दरवाजाजवळ येऊं देणार नाहीं, तर आपण तरी मिशनरी लोकांना आपल्या कानांच्या टापूमध्यें काय म्हणून येऊं द्यावें? धर्मप्रसार करावा अशी आम्हांला देवाची आज्ञा आहे, ही सबब निव्वळ व रमतलबाची आहे. मुसलमानी लोकांना सातव्या शतकापासून सतराव्या शतकापर्यंत "मुसलमानी धर्म वाढवा", "मुसलमानी धर्म वाढवा" म्हणून जी ईश्वरी आज्ञा प्रेरित करीत होती, ती आज्ञा आज कोठें गेली आहे? महंमदानें हल्लीं कुराणांतील ते शब्द रबरानें पुसून टाकले आहेत काय? असें कांहीं नाहीं. तर ह्या सगळ्यांतील सारांश येवढाच कीं, ज्याचा ज्या वेळेला हात चालत असतो त्या वेळेला तो वाटेल तसें करून घेत असतो; व हाच न्याय ख्रिश्चानिटीच्या प्रसारालाही लागू आहे. पुण्यांत पेशवाई होती किंवा दिल्लीस मोंगलाई होती तेव्हां हें शुभवर्तमान सांगणारे लोक, जे आतां प्रत्येक कोनांतून आणि कोपऱ्यांतून पसरलेले आहेत ते कोठें होते? आतां पंढरपूरच्या यात्रेंत आणि प्रयागाच्या मेळ्यांत आपल्या बायबलांतील आज्ञेच्या जोरावर परधर्माची निंदा करणारे हे मिशनरी लोक त्या वेळीं कोठें होते? त्या वेळीं हें बायबलांतील वाक्य उत्तर आणि मध्य हिंदुस्थानासंबंधीनें ही मंडळी अगदींच कशी विसरून गेली होती? आणि आतांच ही आज्ञा कशी प्रत्येकाच्या डोळ्यांपुढें नाचूं लागली आहे? शिवाय बायबलांतील हीच आज्ञा पाळण्याबद्दल इतके धडपडणारे मिशनरी बायबलांतील इतर आज्ञा इमानें-इतबारें पाळीत आहेत काय?

हिंदु आणि मुसलमान प्रजेच्या मनाला मिशनरी लोकांच्या व्याख्यानांपासून उद्वेग प्राप्त होतो, ह्याकरितां तीं त्यांचीं व्याख्यानें बंद करावींत, निदान

परधर्मीय लोकांच्या जमावामध्यें तरी त्यांनीं त्या संबंधानें उद्गार काढूं नयेत. अशी व्यवस्था करण्याविषयीं जर कोणीं सरकारपाशीं गोष्ट काढिली, तर सरकार किंवा सरकारच्या वतीनें दुसरे कोणी असें म्हणणार कीं, त्यांच्या धर्मामध्यें 'तुम्ही आपल्या धर्माचा प्रसार करा,' असेंच सांगितलें आहे. तेव्हां त्यांच्या धर्माच्या आज्ञेविरुद्ध गोष्ट करावयाला त्यांना कसें सांगावें? परंतु ह्यावर कोणाही समंजस मनुष्याला असें प्रत्युत्तर देतां येईल कीं, त्यांच्या धर्मांत अशी आज्ञा आहे हें सर्व खरें; परंतु तात्त्विकदृष्टया ह्याचा विचार केला तर ही एक वेडगळ धर्मसमजूत आहे, असें कोणीही कबूल करील. ख्रिस्ती धर्मांत आल्यानेंच तारण होईल आणि इतर धर्मांत उत्तम ज्ञान, उत्तम आचरण आणि उत्तम भक्ति इतकी सामग्री एखाद्यापाशीं असली तरीही त्याच्या डोक्यावर ते पाण्याचे चार थेंब नसल्यामुळें तो नरकांतच गेला पाहिजे, असल्या कल्पनांना मंदबुद्धि मिशनऱ्यांखेरीज इतर कोणाच्याही डोक्यामध्यें थारा मिळावयाचा नाहीं. ही गोष्ट अलीकडे सूर्यप्रकाशाप्रमाणें स्पष्ट झालेली आहे. तेव्हां आपला धर्मप्रसार होण्यासाठीं ज्याला त्याला बाटविण्याची ही एक वेडगळ धर्मसमजूत आहे, हें सरकारला कळण्यासारखें नाहीं असें नाहीं. पण ह्या वेडगळ धर्मसमजुती बंद करा, असें आपण सरकारला म्हटलें, तर मात्र, आपण त्यांच्या धर्मामध्यें हात घालणार नाहीं, हें सरकारचें पाशुपत अस्त्र प्रतिपक्षाच्या म्हणण्यावर सोडण्याकरितां सज्ज केलेलें आहे, व तें आम्ही दुबळे लोक, अगदीं बरोबर आहे म्हणून समजतों. सती जाण्याची चाल ही इतरांच्या मतानें आमची एक वेडगळ धर्मसमजूत होती, म्हणून तिचा उच्छेद करण्यासाठीं आमच्या धर्मामध्ये हात घालण्याला सरकारला कांहींएक दिक्कत वाटली नाहीं. परंतु जिच्यापासून पुष्कळ प्रजेला पुष्कळ ताप झाला आहे, होत आहे, व होईल, ती ही देवाच्या आज्ञेवरून हिंदुस्थानांतील लोकांना बाटविण्याची मिशनऱ्यांची वेडगळ धर्मकल्पना मोडून टाकण्याविषयीं जर सरकारला विनंति केली, तर मात्र तेथें 'कोणाच्याही धर्मांत हात घालावयाचा नाहीं' हें तत्त्व पुढें येतें; ह्यावरून ख्रिस्ती लोकांच्या ह्या वेडगळ धर्मकल्पनेपासून आपला बचाव करण्याचे कामीं आपलें सरकार किती निरुपयोगी आहे हें स्पष्ट दिसून येणार आहे

परंतु सरकारनें जरी आमच्या धर्माची उपेक्षा केली, तरी परमेश्वर कधीं करणार नाहीं. कारण तो पक्षपाती नाहीं. एक धर्म श्रेष्ठ आणि एक

धर्म कनिष्ठ असें त्याला वाटत नाहीं. निरनिराळे धर्म ह्या आपल्याकडे येऊन पोहोंचण्याच्या निरनिराळ्या वाटा आहेत, असें तो मानतो. बी. बी. अँड सी. आय्. रेल्वेनें कोणी उतारू आला, किंवा दुसरा कोणी आगबोटीनें आला, किंवा दुसरा कोणी जी. आय्. पी. आर्. नें आला, किंवा तिसरा कोणी आगबोटीनें आला, तरी सर्वजण मुंबईला येऊन पोहोंचतात. त्याप्रमाणें कोणी हिंदु धर्माच्या द्वारानें येवो, किंवा कोणी मुसलमानी धर्माच्या द्वारानें येवो, किंवा कोणी खिस्ती धर्माच्या द्वारानें येवो, ते सर्वही जण परमेश्वराच्या ठिकाणीं जाऊन पोहोंचतात. 'अमुकच धर्माच्या द्वारानें माझ्याकडे या' असा निरपेक्ष, निरहंकार, निर्गुण, निर्लेप, आणि निष्कलंक अशा परमेश्वराचा आग्रह नाहीं. हा मिशनऱ्यांचा आग्रह आहे. त्याला न जुमानतां ज्यानें त्यानें परमेश्वराच्या इच्छेला अनुसरून आपापल्या धर्माप्रमाणें वागावें हें उत्तम. म्हणजे त्यामध्येंच परमेश्वराची कृपा आणि परमेश्वराची प्राप्ति ह्या गोष्टी सिद्ध होणार आहेत. दोनतीनशें वर्षांपूर्वी मुसलमानी धर्मप्रसारानें असाच कल्लोळ उसळून दिला होता. पण तो कल्लोळ आज कोठें आहे! कालचा कल्लोळ आज नाहींसा झाला तसा आजचा कल्लोळ उद्यां नाहींसा होणार नाहीं, म्हणून कशावरून! कारण, परमेश्वर सर्वशक्तिमान् आहे.

अथवा

# एका प्राचीन स्वामिभक्ताची गोष्ट

काळ : अग्रलेख ता. २-८-१९०१

अक्षीणभक्तिः क्षीणेपि नन्दे स्वाम्यर्थमुद्वहन् ।
पृथिव्यां स्वामिभक्तानां प्रमाणे परमे स्थितः ॥

आज ह्या गोष्टीकडे लक्ष जाण्याला गेल्या शनिवारीं शाहूनगरवासी नाटक मंडळीनें 'मुद्राराक्षस' नाटकाचा केलेला प्रयोग हें कारण होय. बहुतेकांना हें माहीत असेलच कीं, 'मुद्राराक्षस' हें मूळ संस्कृतमधील एक नाटक आहे. संस्कृतमध्यें अनेक नाटकें आहेत, परंतु त्या सर्वांपेक्षां 'मुद्राराक्षस' नाटकामध्यें शृंगाररसाला मुळींच अवकाश दिलेला नसून, राजकारस्थानीपणाची कुशलता ह्या नाटकामध्यें अगदीं पराकाष्ठेला नेऊन पोहोंचविली आहे. व्याकरणाचीं सूत्रें पाणिनीनें लिहिलीं आणि त्या सूत्रांनीं सिद्ध होणाऱ्या रूपांचे प्रयोग कसे करावे हें उदाहरणाच्या रूपानें दाखविण्यासाठीं भट्टिकाव्य लिहिलें गेलें; त्या प्रमाणें पूर्वीच्या अनेक ग्रंथकारांनीं राजनीतीच्या संबंधानें जे ग्रंथ लिहून ठेविले आहेत, त्यांत वर्णिलेले प्रयोग कसे उपयोगांत आणावे, हें उदाहरणाच्या रूपानें लोकांच्या मनामध्यें बिंबविण्यासाठींच जणू काय हें 'मुद्राराक्षस' नाटक लिहिलें आहे असें वाटतें. ह्या नाटकाचें मराठीमध्यें गद्याच्या ठिकाणीं गद्य आणि पद्याच्या ठिकाणीं पद्य अशा रीतीचें एक भाषांतर येथील के० यत्ते-शास्त्री यांनीं केलेलें आहे. परंतु तें पुस्तक हल्लीं बहुतेक दुर्मिळच आहे. ह्या

नाटकाचें सर्व गद्यपद्यात्मक भाषांतराचें दुसरें एक पुस्तक रा. रा. ज. के. असनारे, हायकोर्ट वकील, उमरावती, यांनीं केलेलें आहे. ह्याच पुस्तकावरून शाहूनगरवासी नाटक मंडळीनें गेल्या शनिवारचा प्रयोग केला. ह्या नाटकाचा प्रयोग संस्कृतमध्यें पूर्वीं कधीं झाला असेल तो असो; परंतु मराठीमध्यें ह्या नाटकाचा हा प्रयोग नवीनच आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. परंतु हा प्रयोग नवीनच असून व त्यांतील भानगडीचे भाग समजण्याला कठिण असूनही शाहूनगरवासी नाटक मंडळीनें आपल्या अंगच्या अभिनयकौशल्यानें त्यालाही गोडी आणली होती, असें म्हणण्यास हरकत नाहीं. चाणक्य, मलयकेतु, चंदनदास, विराधगुप्त, चंद्रगुप्त, भागुरायण वगैरे पात्रांचीं कामें चांगलीं झालीं. परंतु त्या सर्वांहूनही अमात्य राक्षसाचें काम फारच चांगलें झालें. दुसऱ्या अंकांत शत्रूच्या सैन्यानें कुसुमपुराला वेढा दिला ही हकीकत विराधगुप्त अमात्य राक्षसाला सांगत असतां आपल्या कुसुमपुराला आतांच प्रत्यक्ष वेढा पडला आहे असें वाटून राक्षसानें जें भाषण केलें त्या वेळचा अभिनय फारच हृदयंगम होता. त्याचप्रमाणें पांचव्या अंकामध्यें अमात्य राक्षसावर विश्वासघाताचा आरोप निरनिराळ्या जुळून येणाऱ्या गोष्टींनीं दृढ होऊं लागला, त्या वेळचा आणि त्यानंतरचा एकंदर सर्व प्रसंग फार प्रेक्षणीय झाला. परंतु सहाव्या अंकामधील राक्षसाचा जीर्णोद्यानामध्यें प्रवेश, त्या वेळचे त्याचे दुःखाचे उद्गार आणि आपल्या मित्रावर आलेल्या संकटासाठीं आपल्या गळ्याला फांस लावून घेण्याला प्रवृत्त झालेल्या कोणा एका मनुष्याबरोबर झालेला राक्षसाचा संवाद, हे प्रसंग तर इतके हृदयद्रावक झाले कीं, रसज्ञ प्रेक्षकांपैकीं ज्यांच्या नेत्रांतून अश्रु वाहिले नाहींत असे क्वचितच असतील. वास्तविक दृष्टया पाहिलें तर अशाच प्रकारचीं नाटकें रंगभूमीवर आलीं पाहिजेत. परंतु जसें गिऱ्हाईक असतें तसा माल खपतो, ह्या व्यापाराच्या तत्त्वाप्रमाणें नीच मनोवृत्तीच्या लोकांना नीच मनोवृत्तीचीं नाटकें अलीकडे अत्यंत प्रिय वाटूं लागलीं आहेत, ही मोठी दुर्दैवाची गोष्ट आहे. रंगभूमीकरितां म्हणून 'मुद्राराक्षसा'मध्यें कांहीं बरेच फेरफार करून जर पुढें आणिलें, तर हें नाटकही लोकांना आवडण्यासारखें होईल असें म्हणण्यास हरकत नाहीं. असो. ह्या नाटकाच्यासंबंधानें आणि त्याच्या प्रयोगासंबंधानें इतका प्रस्ताव करून आता आपण त्या नाटकांतील प्रमुख पात्र

अमात्यराक्षस याच्या अंगच्या स्वामिभक्तीच्या गुणाकडे वळूं. कारण, तोच आजचा मुख्य विषय आहे.

बंगाल प्रांतांत पाटणा म्हणून जें शहर हल्लीं प्रख्यात आहे त्याला पूर्वी पाटलीपुत्र, कुसुमपुर अशीं नांवें असत. त्या कुसुमपुरामध्यें नंद नांवाचे कोणी बलाढ्य राजे राज्य करीत होते. त्यांच्या हातून विष्णुगुप्त ह्या नांवाच्या एका ब्राह्मणाचा कांहीं अपमान झाला होता. त्यामुळें त्याला अतिशय राग येऊन 'ह्या नंद राजांचीं मी सर्व पाळेंमुळें खणून काढीन' अशी त्यानें घोरतर प्रतिज्ञा केली होती. विष्णुगुप्त हा एक यःकश्चित् ब्राह्मण होता. त्याच्यापाशीं फौजफांटा कांहीं एक नव्हता, व नंदाचें राज्य फारच विस्तीर्ण, संपत्तिमान् आणि दृढ झालेलें होतें. अशा स्थितींत हा यःकश्चित् ब्राह्मण त्या महापराक्रमी नंदाचें राज्य कसें हरण करील आणि त्या नंदांना कसा नामशेष करील, असे प्रश्न कोणाच्याही मनामध्यें उत्पन्न होणें अगदीं साहजिक आहे. परंतु विष्णुगुप्ता-पाशीं जरी सैन्य नव्हतें किंवा संपत्ति नव्हती, तरी त्याच्या डोक्यामध्यें शेंकडों सेनांपेक्षांही आणि शेंकडों द्रव्यराशींपेक्षांही अधिक अशी बुद्धि होती, व तिच्याच सामर्थ्यानें विष्णुगुप्तानें आपल्या प्रतिज्ञेंतील अद्भुत गोष्टी घडवून आणिल्या. शिवाय विष्णुगुप्ताच्या स्वभावामध्यें एक प्रकारचा विलक्षणपणा होता. एकदां असें झालें कीं, त्या ब्राह्मणाच्या पायाला कोठें एका दर्भाचें टोंक बोंचलें. त्यामुळें त्याला इतका संताप आला कीं, दर्भाचीं सर्व पाळेंमुळें त्यानें खणून काढिलीं तेव्हांच तो स्वस्थ बसला. ही दर्भाची गोष्ट यःकश्चित् आहे. हिच्यांत विशेष मतलब आहे असें नाहीं. तरी पण ही क्षुद्र गोष्ट देखील विष्णुगुप्ताच्या मनोवृत्तीची दिशा स्पष्टपणें व्यक्त करीत आहे. अशा प्रकारचा काळजाला जाऊन झोंबलेला द्वेष व कधींही न ढळणारा दृढनिश्चय हे गुण ज्याच्या अंगामध्यें आहेत तो मनुष्य काय करणार नाहीं ! त्याला काय अशक्य आहे ! विष्णुगुप्ताचें ( यालाच चाणक्य असें दुसरें नांव आहे. ) चरित्र म्हणजे जवळ सैन्य नसतां सैन्यवाल्या राजांना कसें जिंकावें, आणि जवळ फुटकी कवडी नसतां नवकोट राजांच्या राज्यांना कसें धुळीस मिळवावें, ह्याचें एक उत्कृष्ट उदाहरण आहे. विष्णुगुप्तानें नंदांचीं पाळेंमुळें खणून काढ-ण्याची प्रतिज्ञा केल्यानंतर त्यांच्या नाशासाठीं त्यानें जी पहिली युक्ति योजिली ती अशी होती: एखाद्या राजाशीं आपल्या स्वतःला सामर्थ्य नसलें तर

त्याच्या तोडीचा दुसरा कोणीतरी राजा पाहून त्यांच्या त्यांच्यामध्यें कलह उत्पन्न करून देणें, हाच मार्ग काय तो शक्य असतो. आपणा स्वतःला त्या राजाशीं टक्कर देण्याचें सामर्थ्य नसलें, तरी दोन सारख्या सारख्या राजांच्यामध्यें तंटा लावून देऊन त्यांच्यापासून आपला फायदा करून घेण्याचें सामर्थ्य कोणामध्यें नसतें असें नाहीं. ही गोष्ट लक्षांत आणून विष्णुगुप्तानें आपल्या उपायांची योजना केली. पर्वतेश्वर म्हणून एक म्लेच्छ राजा नंदाच्या तोडीचाच होता. त्याजकडे जाऊन विष्णुगुप्तानें त्याला असें सांगितलें कीं, जर तूं कुसुमपुरावर चाल करून नंदांचा पराभव करशील, तर त्या नंदांच्या राज्यापैकीं अर्धें राज्य मी तुला देईन. ही गोष्ट पर्वतेश्वराला पसंत पडली. त्यानें कुसुमपुराला वेढा घातला व क्रमाक्रमानें सर्व नंदांचें राज्य रसातळाला नेऊन पोहोंचविलें. अशा रीतीनें बिनभांडवली रोजगाराला प्रारंभ करून, विष्णुगुप्तानें अर्धें राज्य पर्वतेश्वराला दिलें व अर्धें आपण घेऊन त्याजवर चंद्रगुप्ताची स्थापना केली. 'आपल्यापाशीं सैन्य नाहीं, द्रव्य नाहीं, लोक नाहींत, तेव्हां आपण कसें करावें ! नंदांचें राज्य आपल्या हातून कसें नष्ट होईल!' अशा रीतीचे निराशेचे उद्गार गुडघ्यामध्यें मान घालून काढीत न बसतां, विष्णुगुप्तानें राजकारस्थानांतील एका साध्या युक्तीनें नंदांचा निर्वंश करून त्यांचें अर्धें राज्य आपण बळकाविलें व पुढें दुसऱ्या उपायांनीं बाकीचें अर्धें राज्यही संपादन करून त्यानें तें सर्व चंद्रगुप्ताला दिलें, ही केवढी कौतुक करण्यासारखी गोष्ट आहे !

अशा रीतीनें विष्णुगुप्तानें आपल्या बुद्धिबलानें—सैन्यबलानें नव्हे—ज्या नंदांचा उच्छेद केला, त्यांच्या पदरीं त्यांच्या प्रीतींतला राक्षस या नांवाचा एक अमात्य होता. त्याची नंदावर अत्यंत निस्सीम भक्ति होती. सबंध 'मुद्राराक्षस' नाटकामध्यें ज्याबद्दल आपल्या मनामध्यें अत्यंत करुणा आणि आश्चर्यबुद्धि उत्पन्न होते असें जर एखादें पात्र असेल, तर तें अमात्य राक्षस हेंच होय, व आजच्या आमच्या लेखाचाही मुख्य विषय अमात्य राक्षस हाच आहे. नंद राजांचा समूळ उच्छेद झाला तरी पण राक्षसाच्या स्वामिभक्तीचा उच्छेद झाला नाहीं. नंदांचा कुसुमपुरावरील अमल मोडला, परंतु राक्षसाच्या मनावरील स्वामिभक्तीचें प्राबल्य मोडलें नव्हतें. नंदांच्या पक्षांतील कोणीतरी गादीवर बसवावा आणि नंदांचें नांव पुढें चालू ठेवावें, अशी राक्षसाची फार इच्छा होती; व ज्यांचें अन्न आपण खालें त्या नंदांशीं निमकहरामपणा करून

ते गेल्याबरोबर आपण त्यांच्या शत्रूंना जाऊन मिळावें, आणि तिकडून आपली मानमान्यता वाढवून घ्यावी, ही अत्यंत नीचपणाची कल्पना अमात्य राक्षसाच्या मनाला शिवलीसुद्धां नाहीं. नंदांचें राज्य फिरून स्थापन करावें ही त्याची महत्त्वाकांक्षा होती. ती परिपूर्ण करण्यासाठीं त्यानें कशाकडेही पाहिलें नाहीं. कुसुमपुर शत्रूंच्या ताब्यांत गेलें असतांही तेथेंच आपलीं बायकामुलें टाकून, अमात्य राक्षस आपल्या शत्रूंच्याविरुद्ध खटपटी करण्याकरितां व पर्वतेश्वराचा मुलगा मलयकेतु ह्याला आपल्या बाजूकडे वळवून घेण्याकरितां कुसुमपुर सोडून बाहेर गेला. आपल्या बायकामुलांच्या जिवाकडे इतकें दुर्लक्ष करण्याला जो राक्षस तयार झाला तो कशासाठीं ? तर केवळ एका स्वामिभक्तीसाठीं. आपल्या धन्यापाशीं संपत्तीची इच्छा धरून त्याच्यापुढें हांजी हांजी करणारे लक्षावधि सेवक असतील; परंतु नंदराजे नष्ट झाले असतां, त्यांची संपत्तिही नष्ट झाली असतां, आणि त्यांच्यापासून काडीइतकाही फायदा होण्याचा संभव उरला नसतां, त्यांच्यासाठीं पाहिजे तीं संकटें भोगण्याला तयार झालेल्या राक्षसाच्या स्वामिभक्तीसारखें दुसरें उत्कृष्ट, उदात्त, निर्मल आणि निर्हेतुक अशा स्वामिभक्तीचें उदाहरण सांपडणें फार कठीण आहे ! स्वामिभक्तीसाठीं राक्षसाला आपल्या बायकामुलांचा त्याग करावा लागला होता, इतकेंच नव्हे तर याच्यापेक्षांही दुसऱ्या अनुचित गोष्टी कराव्या लागत होत्या. मलयकेतूची चाकरी पत्करून त्याला परदास्यामध्यें दिवस काढावे लागत होते. परंतु इतरांचें परदास्य आणि राक्षसाचें परदास्य ह्यांच्यामध्यें पुष्कळ अंतर होतें. आपलें आयुष्य चैनबाजीमध्यें जावयाला पाहिजे, आपल्याला ऐषआराम भोगावयाला पाहिजेत व त्यासाठीं मोठा पगार मिळाला पाहिजे, म्हणून राक्षसानें दुसऱ्याची गुलामगिरी पत्करिली होती असें नाहीं. राक्षसाच्या मनांतील पूर्वींच्या आपल्या राजांबद्दलची स्वामिभक्ति नष्ट होऊन आणि त्यांच्याशीं कृतघ्न होऊन त्यानें दुसऱ्याची गुलामगिरी पत्करिली होती असें नव्हे. तर मलयकेतूचा आश्रय करून त्या योगानें नंद राजांच्या शत्रूंना ठार मारितां आलें तर त्या योगानें तरी आपले स्वर्गलोकीं गेलेले धनी आपल्या हातून संतुष्ट होतील, अशा ह्या उदात्त आशेनें व हेतूनें राक्षसानें गुलामगिरी पत्करिली होती. राक्षसाला आपली प्रतिष्ठा व्हावयाला नको होती; त्याला आपल्या शत्रूंचा सूड पाहिजे होता. नंद नष्ट झाले तरी अमात्य राक्षस त्यांच्या

बाजूला स्थिर होता. परंतु इतर गोष्टी राक्षसाप्रमाणें नंदांच्या बाजूला कायम राहिल्या नाहींत, हें पाहून राक्षसाला अत्यंत वाईट वाटत असे. एखादी वेश्या ज्याप्रमाणें पहिला यजमान नष्ट झाला कीं लगलीच दुसऱ्या यजमानाचा हात धरून त्याजकडे जाते, त्याप्रमाणें नंदांची राज्यलक्ष्मी नंदांचा नाश झाल्याबरोबर त्यांना टाकून चंद्रगुप्ताकडे गेली, हें पाहून राक्षसाला असें वाटे कीं, ह्या लढाईमध्यें इतक्या वस्तु नाश पावल्या त्याप्रमाणें ही राज्यलक्ष्मी शत्रूंच्या हातांत जाण्यापेक्षां ती नंदांच्याच बरोबर नष्ट झाली असती, तर हिचें काय बिघडलें असतें? अथवा हिला जर दुसऱ्या कोणाच्या तरी गळ्यांत माळ घालावयाचीच होती, तर पृथ्वीच्या पाटीवरचे सर्व राजे मेलेच होते कीं काय, कीं ज्यामुळें त्यां सर्वांना टाकून ही आमच्या शत्रूंनाच माळली! आपल्या स्वामीचें राज्य नष्ट झाल्यामुळें राक्षसाला इतकें वाईट वाटत असे कीं, त्यानें त्या दुःखामुळें आपल्या अंगावर अलंकारभूषणेंदेखील घालण्याचें वर्ज्य केलें होतें. मलयकेतूनें राक्षसाला अलंकार धारण करण्याविषयीं एकदां आग्रहाचा निरोप पाठविला होता. त्या वेळीं निरोप आणणाराजवळ राक्षसानें प्रथम पुढील उद्गार काढले: 'शत्रूंपासून पराभव पावून हल्लीं माझीं अंगें निर्वीर्य झालीं आहेत. ह्या अंगांवर शत्रूंच्या लाथा बसत आहेत. अशा अंगावर दागिने काय घालावे! मी असल्या अंगावर यत्किंचित्ही अलंकार घालणार नाहीं. शत्रूंच्या सर्व सैन्याचा आपण विध्वंस करून टाकूं, सुगांग प्रासादामध्यें आपलें सुवर्णमय सिंहासन स्थापन करूं, आणि मग आपण वाटतील तितके दागिने अंगावर घालूं!' अशा प्रकारची तीव्र चिरड राक्षसाच्या मनामध्यें रात्रंदिवस जागत बसलेली होती. राक्षसाचा शकटदास म्हणून एक मित्र होता. तो स्वामिकार्यासाठीं कांहीं खटपट करीत असतां त्याबद्दल त्याला चाणक्यानें सुळावर देण्याची आज्ञा केल्याचें ऐकून राक्षसाला एका दृष्टीनें आनंद झाला, व स्वामिकार्य करीत असतां शकटदासाला मरण येत आहे, तेव्हां तो मोठा भाग्यवान् व नंदकुलाचा नाश झाला असतांही अजून आपण जिवंत राहण्याची इच्छा करीत आहों, तेव्हां आपण मोठे भाग्यहीन, असें वाटून राक्षसाला अत्यंत शोक उत्पन्न झाला. इतका स्वामिभक्तीचा पगडा राक्षसाच्या मनावर बसलेला होता. परंतु आपण हें लक्षांत ठेविलें पाहिजे कीं, आपला राजा मेला असतां राक्षसही त्याच्याबरोबर मेला नाहीं, ह्याचें कारण त्याला जिवंत राहून चैनबाजी करण्याची इच्छा होती

हें नव्हे; तर जिवंत राहून आपल्या स्वामींचा अर्थ साधावा आणि त्यांच्या शत्रूंचा सूड उगवावा, ह्यासाठींच राक्षस जिवंत राहिला होता. नंद राज्यावर होते त्या वेळेला कौमुदीमहोत्सवासारखे उत्सव राक्षसानें मोठ्या आनंदानें पाहिलेले होते. कुसुमपुरामध्यें नंदाच्या आनंदासाठीं कौमुदीमहोत्सवाप्रीत्यर्थ राजमार्गांवर चंदनमिश्रित जलाचा केलेला वर्षाव, स्तंभांना बांधलेल्या फुलांच्या माळा, जिकडे तिकडे उभारिलेलीं तोरणें, धूपादि द्रव्याचा सुटलेला सुवास, एकमेकांच्या चढाओढीनें नगरवासी लोकांनीं आपापलीं शृंगारलेलीं घरें आणि राजमार्गांमध्यें चालणाऱ्या वारांगना, हे सर्व प्रकार राक्षसानें नंदाच्या वेळ पाहिले होते. पण त्या वेळीं ते पाहून राक्षसाच्या मनाला आनंद होत असे तोच कौमुदीमहोत्सव राक्षसाच्या शत्रूंनीं कुसुमपुरामध्यें करण्याचें योजिलें ऐकून राक्षसाच्या अंतःकरणांत मडमडून आलें. त्याला त्या पूर्वीच्या आपल्या वैभवाचें स्मरण झालें व त्यामुळें त्याचें मन अत्यंत खिन्न आणि उदासीन झालें. नंदाचें राज्य नष्ट झाल्यावर जो पाहावा तो शत्रूच्या पक्षालाच जाऊन मिळालेला राक्षसाच्या दृष्टीस पडे. पूर्वीचे नंदांचे आश्रित लोक नवीन राजाचे सेवक झालेले जेथें तेथें दृष्टी पडूं लागल्यामुळें हें सर्व जग विश्वासघातकीपणा कृतघ्नपणा आणि निमकहरामपणा ह्यांनींच भरून गेलेलें आहे कीं काय, असें राक्षसाला वाटूं लागलें होतें, व मनुष्यांच्या ह्या निमकहरामपणाचें प्रतिबिंब त्याच्या भणाणून गेलेल्या डोक्याला निर्जीव आणि अचेतन वस्तूंमध्येंदेखील दिसूं लागलें होतें. माणसांप्रमाणें बागेतील अप्रबुद्ध झाडेंही कृतघ्न झालीं आहेत असें त्याला वाटे. सूर्य उदय पावला म्हणजे एखाद्या तोंड-पुजाप्रमाणें हीं झाडें आपल्या छायेच्या रूपानें त्याला दूरवर सामोरीं जातात; परंतु तोच सूर्य एखाद्या राजाप्रमाणें अस्ताला जाऊं लागला म्हणजे ह्या झाडांची छाया त्यांना सोडून माघारी दूर दूर जाऊं लागते. तेव्हां हीं झाडेंदेखील मोठीं कृतघ्न आणि निमकहराम असलीं पाहिजेत, असे विचारतरंग त्या निस्सीम स्वामिभक्ताच्या अंतःकरणामध्यें संध्याकाळच्या वेळची झाडांची स्थिति पाहून उठत असत. आपल्या पूर्वीच्या राजांवर भक्ति आणि नवीन राजाबद्दल आणि त्याच्या अनुयायांबद्दल द्वेषबुद्धि राक्षसाच्या मनांत पूर्णपणें बाणली गेलेली असल्यामुळें नवीन राज्यापन्न झालेल्या चंद्रगुप्ताचा नाश करण्यासाठीं मलयकेतूला हातीं धरून राक्षसानें आपले त्यांच्या

मोठ्या जारीनें चालविले होते. ते प्रयत्न निष्फळ करण्यासाठीं मलयकेतु आणि राक्षस यांच्यामध्यें बेबनाव उत्पन्न करण्याच्या इरादानें चंद्रगुप्ताचा मंत्री विष्णुगुप्त, ह्यानें राक्षसाचा एक परमस्नेही शकटदास ह्याजकडून एक बनावट पत्र तयार करविलें होतें. तें पत्र राक्षसापुढें आलें तेव्हां त्याला शकटदासाच्या कृतीबद्दल मोठा विस्मय वाटला. त्या वेळीं राक्षसानें जे उद्गार काढले आहेत, त्यांमध्यें राक्षसानें आपल्या अंतःकरणांतील सर्व मोठेपणा ओतला आहे असें वाटतें. राक्षसाचें मन फक्त एका स्वामिभक्तीनें व्यापिलेलें होतें, त्यामुळें तो आपल्या कुटुंबांतील कोणत्याही प्रेमपाशांची पर्वा करीत नव्हता. त्याच्या मनाला क्षणभंगुर द्रव्याची बिलकूल हांव नव्हती. त्याची सर्व हांव यावचंद्रदिवाकरौ टिकणाऱ्या निर्मळ कीर्तीसाठीं होती. राक्षसाचें मन अशा प्रकारचें उदात्त आणि थोर होतें. त्याला आपल्या परम मित्रानें आपल्याशीं कपट करून खोटें बनावट पत्र तयार केलें असा संशय आल्यावर त्याच्या तोंडून पुढील उद्गार निघाले : 'शकटदासा! आपली सर्व स्वामिभक्ति विसरलास काय? चिरकाल टिकणाऱ्या यशावर पाणी सोडून आणि चंचल अशा द्रव्याला लुब्ध होऊन, शकटदासानें आपलीं बायकामुलें तेवढीं स्मरलीं आणि स्वामिभक्ति स्मरली नाहीं, असें झालें काय!' हे शब्द उच्चारतांना राक्षसाच्या अंतःकरणाला किती पीळ पडला असेल, आपल्या लोकांच्या कृतघ्नपणाबद्दल त्याच्या डोळ्यांतून किती अश्रु वाहिले असतील, आणि त्याचें निराश होत चाललेलें मन ह्या वेळीं किती खोल खळग्यांत जाऊन पडलें असेल, ह्याची कल्पना त्याच्यासारख्याच स्वामिभक्तांवांचून इतरांना काय करितां यावयाची आहे! खाजगी हेतु कांहीं एक नाहीं, सर्व कांहीं स्वामिभक्तीकरितां, हें राक्षसाच्या मनाचें थोडक्यामध्यें पृथक्करण आहे. आपल्यासाठीं कांहीं एक नको; बायको नको, मुलगा नको, स्वामिभक्तीवांचून दुसरें कांहीं एक नको अशा दिशेनें राक्षसाच्या उदात्त मनोवृत्तीचा लोट वाहत होता. आपल्या स्वतःबद्दल, स्वतःच्या सुखाबद्दल, स्वतःच्या दुःखाबद्दल, स्वतःची जी जी गोष्ट असेल त्या प्रत्येकीबद्दल पूर्ण विस्मरण आणि एका स्वामिभक्तीचा रात्रंदिवस निदिध्यास हे राक्षसाच्या अंतःकरणवृत्तीचे मुख्य घटकावयव होते. असल्या सत्त्वशील मनाच्या राक्षसावरही जेव्हां विश्वासघाताचा आरोप आला तेव्हां त्याला अत्यंत वाईट वाटलें. मलयकेतूला राक्षसाबद्दल संशय आला व तो अनेक कारणांनीं

दृढही झाला. त्यामुळें मलयकेतूनें राक्षसाचा अनादरपूर्वक धिक्कार केला. तेव्हां राक्षसाची पूर्ण निराशा झाली. आतां आपल्या हातून चंद्रगुप्ताचें राज्य उलथून पडत नाहीं असें वाटून त्याला फार दुःख झालें व आतां पुढें काय करावें ह्या विचारांत तो पडला. तपोवनांत जाऊन तपश्चर्या करावी असें एकदां त्याच्या मनांत आलें. परंतु तो विचार त्याला पसंत पडेना. कारण, ज्या मनामध्यें वैराग्नि भडकलेला, तें मन शत्रूच्या नाशानेंच शांत झालें पाहिजे. त्याला तपश्चर्या काय करणार! राक्षसाच्या मनांत दुसरी अशी एक कल्पना आली कीं, आपण प्राण देऊन स्वर्गांतील नंदराजांच्या भेटीला जावें. परंतु ही कल्पनाही त्याला पसंत पडेना. शत्रु जिवंत असतांना आपण जीव काय म्हणून द्यावा! हें बायकांचें काम आहे! असें वाटून त्यानें तो बेत रहित केला. राक्षसानें आपलीं बायकामुलें कुसुमपुरांतील चंदनदास या नांवाच्या आपल्या एका मित्राकडे ठेविलीं होतीं, व तीं तो विष्णुगुप्ताच्या स्वाधीन करीना, म्हणून त्याला सुळावर देण्याविषयीं विष्णुगुप्तानें हुकूम केला होता. तेव्हां त्याला सोडविण्यासाठीं अमात्य राक्षसानें अखेरीस कुसुमपुरामध्यें जाण्याचा निश्चय ठरविला. त्या वेळची राक्षसाची स्थिति फारच शोचनीय होती. राक्षस पूर्वीं कुसुमपुरांत होता, त्या वेळीं त्याचा तेथें केवढा मानमरातब असे! हजारों मांडलिक राजे राक्षस बाहेर निघाला म्हणजे त्याच्याबरोबर निघत असत व राक्षस रस्त्यानें जाऊं लागला म्हणजे 'तो पाहा राक्षस' अशा रीतीनें सर्व कुसुमपुरांतील नागरिक राक्षसाला अंगुलीनें दाखवीत असत. परंतु ह्या वेळीं जेव्हां राक्षस कुसुमपुरामध्यें आला, तेव्हां त्याची स्थिति अगदीं निराळी झाली होती. आपल्याला कोणीं ओळखूं नये म्हणून सर्व तोंडावरून बुरखा घेऊन एकटा राक्षस कुसुमपुराच्या बाहेरील एका जीर्णोद्यानामध्यें लपत छपत येऊन बसला. तें जीर्णोद्यान पाहून राक्षसाला आपल्या पूर्वींच्या वैभवाची व आपल्या पूर्वींच्या नंदराजांची आठवण झाली, व त्यामुळें त्याचे डोळे अश्रूंनीं भरून आले, आणि कंठ दुःखानें दाटून आला. तें आपल्या पूर्वींच्या वैभवाचें स्थान पाहून त्याच्या पोटांत कालवूं लागलें व त्याचे दुःखाचे उमाळे त्याला सहन होईनासे झाले. पूर्वींचा सर्व वृत्तांत राक्षसाच्या डोळ्यांपुढें प्रत्यक्षवत् दिसूं लागला. या ठिकाणीं माझ्या राजानें चल-लक्ष्यावर बरोबर नेम मारला, येथें माझे नंदराजे बसत असत, येथें आपल्या मांडलिक राजांशीं ते गोष्टी बोलत

असत, असे एकना दोन, अनेक प्रसंग आठवून राक्षस रडूं लागला व ते राजे आज नाहींत असे उद्गार काढून राक्षसानें आपला शोक अत्यंत पराकाष्ठेला नेऊन पोहोंचविला. नंदराजे होते तेव्हां तें जीर्णोद्यान चांगल्या स्थितींत असे. परंतु ते गेल्यापासून तें फारच वाईट दशेला येऊन पोहोंचलें होतें. त्या बागेंतील राजवाडा अगदीं मोडकळीस आला होता. त्याच्या जवळच्या सरोवरांतील पाणी आटून गेलें होतें. बागेंतले वृक्ष जाग्यावर होते, परंतु त्यांवर एकही फळ कोठें दृष्टीस पडत नव्हतें. आणि बागेंतील जमिनीवर जिकडे तिकडे अस्ताव्यस्त गवत उगवलें होतें. कोणी काळजी घ्यावयाला नसल्याकारणानें चांगल्या चांगल्या वृक्षांवरही कोणीं कुऱ्हाडीचे घाव घातले होते, कित्येक वृक्षांवर सापाच्या काती लोंबत होत्या, कित्येक वृक्षांवरील पूर्वीचें मंजुळ पक्ष्यांचें गायन नाहींसें होऊन तेथें दुःखार्त पक्ष्यांचे आक्रोश मात्र ऐकूं येत होते. कित्येक झाडें आंतून अगदीं शुष्क झालीं होतीं, व त्यांमधून बाहेर जाणाऱ्या येणाऱ्या मुंग्यांच्या रांगा मात्र जिकडे तिकडे दृश्यमान् होत होत्या. उन्हाच्या वेळीं क्षणभर सावली ही तर कोणापाशींच उरली नव्हती. कारण, त्या झाडांना पाणी वगैरे कधींही न मिळाल्यामुळें त्यांचीं सर्व पानें गळून गेलेलीं होतीं. असें तें भयाण जीर्णोद्यान पाहून आणि त्याची पूर्वींची रमणीयता लक्षांत आणून त्या स्वामिभक्त राक्षसाच्या मनाला अत्यंत खेद झाला. अशा खिन्न स्थितीमध्यें राक्षस जीर्णोद्यानांत बसला असतां कुसुमपुरांतून आनंदसूचक मंगल वाद्यांचा ध्वनि राक्षसाच्या कानावर येऊन पडला. आपलें आणि मलयकेतूचें भांडण झाल्यानंतर मलयकेतु एकटा पडून त्याला विष्णुगुप्तानें पकडून आणिलें त्या आनंदाच्या गोष्टीबद्दल हीं मंगल वाद्यें वाजत आहेत, असें लक्षांत आल्यावर तर राक्षसाला त्याचें दुःख सहन होईनासें झालें. कारण, त्या मंगलवाद्यांच्या नादामध्यें राक्षसाच्या सर्व आशांचा उच्छेद भरलेला होता. त्या कुसुमपुरांतील मंगल वाद्यांच्या ध्वनीनें राक्षसाच्या कानामध्यें त्याच्या मनातील सर्व आशांकुरांना होरपळून काढणारें अत्युग्र काळकूट विष ओतलें, व ह्यापुढें राक्षसाच्या आशेची परिसमाप्ति झाली!

ह्याप्रमाणें राक्षसाच्या स्वामिभक्तीचा इतिहास आहे. आपल्यापूर्वींच्या वैभवाबद्दल इतकी प्रीति आणि दुसऱ्याच्या नवीन वैभवाबद्दल इतकी अप्रीति दुसऱ्या कोठेंही सांपडावयाची नाहीं. स्वामिभक्तीचें असें उदाहरण आणि

असें वर्णन आपल्यामध्यें आहे ह्याबद्दल आपल्याला अभिमान वाटणें अगदीं योग्य आहे. राक्षसासारखे स्वामिभक्तीचें उदाहरण घालून देणारे उत्कृष्ट पुरुष आणि विशाखदत्तासारखे त्या स्वामिभक्तीचें वर्णन करणारे उत्कृष्ट कवि आपल्यामध्यें होऊन गेले, हें आपल्या मंदभाग्याचेंही एक मोठें भाग्यच आहे असें म्हटलें पाहिजे.

---

## लायकर्गसचे कायदे : : : १०

काळ : अग्रलेख ता. ९-८-१९०१

युरोप खंडांतील प्राचीन इतिहासामध्यें अतिशय भरभराटीस आलेलीं, अतिशय संपन्न झालेलीं, पराक्रमासाठीं अतिशय नांवाजलेलीं, आणि विद्या, कलाकौशल्य, तत्त्वज्ञान, पांडित्य, शास्त्राभ्यास वगैरे गोष्टींनीं अतिशय सुधारलेलीं अशीं दोन राज्यें होतीं; एक ग्रीसचें आणि दुसरें रोमचें. हीं दोन राज्यें अभ्युदयाला येण्याला जीं अनेक कारणें झालेलीं आहेत त्यांत ग्रीसमध्यें लायकर्गसच्या कायद्यांना आणि रोममध्यें स्टोइक पंथाच्या मतांना बऱ्याच वरच्या प्रतीचें स्थान दिलें पाहिजे. या दोहोंपैकीं स्टोइक पंथाच्या मतांचा अथवा स्टोइसिझमचा इतिहास फिरून केव्हां तरी वाचकांपुढें सादर करण्याचें आश्वासन देऊन आज आम्ही लायकर्गसच्या कायद्यांकडे वळतों.

ग्रीस देशांत अनेक लहान लहान संस्थानें होतीं. त्यांतीलच स्पार्टा हें एक होतें. लायकर्गस हा मूळचा स्पार्टामधील; व ह्यानें कायदे केले ते मुख्यत्वेंकरून आपल्या स्पार्टाकरितांच केले. परंतु क्रमाक्रमानें आणि परंपरेनें त्या कायद्यांचा

परिणाम सर्व ग्रीस देशावरही झाला, व अशा दृष्टीनेंच लायकर्गसचे कायदे ग्रीसच्या अभ्युदयाला कारणीभूत झाले असें वर म्हटलेंच आहे. परंतु वास्तविक दृष्ट्या लायकर्गसच्या कायद्यांचा पहिला परिणाम स्पार्टन लोकांवरच झाला. त्या कायद्यांचा स्पार्टन लोकांवर असा अद्भुत परिणाम झाला, ते लायकर्गसचे कायदे जसे विलक्षण होते, तसें लायकर्गसचें चरित्रही थोडेंसें विलक्षणच आहे. स्पार्टा देशावर युनोमस या नांवाचा कोणी एक राजा राज्य करीत असे. त्याच्या मरणानंतर पॉलिडेक्टस हा त्याचा मुलगा राज्यावर बसला. लायकर्गस हा पॉलिडेक्टसचा भाऊ होता. पॉलिडेक्टस मरण पावला तेव्हां त्याला पुत्रसंतान नव्हतें. परंतु त्याची बायको त्या वेळीं गरोदर होती. तिला जरी पुत्र होण्याची आशा होती, तरी ती उदार अंतःकरणाची असल्यामुळें तिनें लायकर्गसला राज्यावर बसण्याविषयीं फार आग्रह केला. परंतु लायकर्गसचें अंतःकरण तिच्यापेक्षांही अधिक उदार होतें. त्यामुळें ह्या दोघांच्या उदारपणाच्या लढाईमध्यें लायकर्गसच्या उदारपणालाच अखेरीस जय मिळाला. लायकर्गसनें राज्यावर बसण्याचें नाकारिलें व आपल्या भावाच्या बायकोला होणारा मुलगा वयांत येईपर्यंत त्याचें लालनपालन करून त्याचा राज्यकारभार आपण स्वतः लक्षपूर्वक पाहण्याचें पतकरिलें. ह्या उदारपणाच्या बाबतींत लायकर्गसला आपल्या इकडील भीष्माचार्यांचीच उपमा योग्य आहे. स्वतः राज्यावर न बसतां आपला भाऊ विचित्रवीर्य ह्याच्याकडून राज्य चालविणाऱ्या भीष्माचार्यांप्रमाणें असली दुर्घट कृति या लोभी जगामध्यें लायकर्गसशिवाय दुसऱ्या कोणाच्या हातून झाली असती! लायकर्गस हा फार बुद्धिमान् पुरुष होता व त्यानें प्रवासही पुष्कळ केलेला होता. इजिप्त आणि हिंदुस्थान हे जे त्या वेळच्या सुधारणेच्या दृष्टीनें अग्रगण्य देश तेही त्यानें पाहिले होते असें म्हणतात. अशा रीतीनें बऱ्याच देशांतून प्रवास करून परत आल्यानंतर त्याला असें आढळून आलें कीं, आपल्या पुतण्याचा अमल बरोबर बसलेला नाहीं व स्पार्टन लोक अतिशय स्वैराचारी झालेले आहेत. अशी स्थिति पाहून आपल्या देशांतील लोकांना ताळ्यावर आणण्याकरितां व त्यांना इतर सर्व देशांतील लोकांपेक्षां अधिक योग्यतेला नेऊन पोंचविण्याकरितां लायकर्गसनें आपले प्रसिद्ध कायदे रचिले व ते स्पार्टामध्यें चालू केले. ह्या कायद्यांसंबंधानें अशी एक आख्यायिका आहे कीं, हे कायदे सुरू झाल्यानंतर कांहीं वर्षांनीं लायकर्गस परदेशीं प्रवासाला जाण्याकरितां निघाला तेव्हां त्यानें

आपल्या स्पार्टन लोकांना असें सांगितलें कीं, मी परत येईपर्यंत ह्या कायद्यांत कांहीं एक फेरबदल न करितां ते आहेत तसे तुम्ही पाळा. असें सांगून लायकर्गस जो गेला तो फिरून कधींही परत आला नाहीं. सूर्याच्या गतीचाही निरोध करण्यासाठीं प्रवृत्त झालेल्या उद्वृत्त विंध्य पर्वताला 'मी दक्षिण दिशेकडे जाऊन परत येईपर्यंत तूं असाच ठेंगणा होऊन राहा' असें सांगून दक्षिणेकडे गेलेले अगस्ति ऋषि ज्याप्रमाणें दक्षिणेकडून उत्तरेकडे कधींच परत गेले नाहींत, त्याचप्रमाणें स्पार्टामधून गेलेला लायकर्गस स्पार्टामध्यें परत कधींही आला नाहीं. परंतु त्याच्या आज्ञेप्रमाणें स्पार्टन लोक त्याचे कायदे मात्र काळजीपूर्वक रीतीनें पाळीत होते, व त्यापासून त्यांचा फायदाही झाला; व अशा रीतीनें लायकर्गसचा हेतु पूर्णपणें सफळ झाला. डेल्फाय येथील देवतेनें असा शकुन दिला होता कीं, स्पार्टन लोक जोंपर्यंत लायकर्गसचे कायदे पाळतील, तोंपर्यंत त्यांची भरभराटच झाली पाहिजे; व हें भविष्य अगदीं खरें ठरलें. लायकर्गसचे कायदे सुरू होण्याचे पूर्वीं ग्रीस देशामध्यें आरगॉस वगैरे संस्थानें प्रमुख होतीं, व स्पार्टाचा नंबर बराच खालतीं होता. परंतु लायकर्गसचे कायदे सुरू झाल्यापासून सर्व संस्थानांमध्यें स्पार्टा हें प्रमुख झालें. स्पार्टानें मेसीनीचें संस्थान जिंकून पादाक्रांत केलें, शौर्याबद्दलची आपली कीर्ति दिगंतरीं पसरविली, आणि ग्रीस देशांतील बराच भाग आपल्या हस्तगत करून घेतला, व स्पार्टाचें एकंदर इतकें महत्त्व वाढलें कीं, इराणच्या बादशहानें ग्रीस देशावर स्वारी करण्याचें जेव्हां मनांत आणिलें, तेव्हां अथेन्सनेंही स्पार्टाजवळ मदत मागितली. इतकें सर्व महत्त्व लायकर्गसच्या कायद्यांमुळें स्पार्टाला मिळालें. ह्या कायद्यानें स्पार्टामध्यें कोणी मोठमोठे तत्त्ववेत्ते किंवा कारागीर उत्पन्न झाले नाहींत हें खरें; जे झाले ते सर्व ब्रॉसिडास आणि लिओनिडास यांच्यासारखे शूर लढवय्येच उत्पन्न झाले. परंतु यांनींच स्पार्टाचें नांव जगामध्यें अजरामर करून ठेविलें आहे. ज्या कायद्यांमध्यें असा विलक्षण प्रभाव होता आणि ज्या कायद्यांचा असा अद्भुत परिणाम झाला, ते कायदे काय होते व ते कसे पाळले जात असत, याबद्दलची कांहीं माहिती आपल्या लोकांना असल्यास ती केवळ वांयाच जाईल असें नाहीं.

लायकर्गसनें कायदे करण्याच्यापूर्वी स्पार्टामधील लोक बरेच स्वच्छंदचारी आणि दुर्वर्तनी झाले होते, व श्रीमंत लोक गरिबांवर फार जुल्म करीत होते.

ही सर्व अव्यवस्था 'लोभमूलानि पापानि' ह्या न्यायानें लोभापासून होत आहे असें जाणून, लायकर्गसनें प्रथमतः जमिनीसंबंधानें एक कायदा केला. त्यानें सर्व जमिनीचे ३९,००० सारखे विभाग केले व ते सगळ्यांना सारखे वांटून दिले. पूर्वी कांहीं श्रीमंत लोकांपाशीं मात्र सर्व जमिनी येऊन राहिल्या होत्या, व गरिबांपाशीं एक वीतभरसुद्धां जमीन उरली नव्हती. त्यामुळें एकाच देशात अतिशय संपत्ति आणि अतिशय दारिद्र्य अशीं जमल्यामुळें जे कांहीं दुष्परिणाम व्हावयाचे ते सर्व स्पार्टांतील श्रीमंत आणि गरीब लोकांना भोगावे लागत होते. व उर्मटपणा, मत्सर, लुचेगिऱ्या, चैनबाजी वगैरे दुर्गुणांचें स्पार्टामध्यें अतिशय प्राबल्य झालें होतें. त्या सर्वांचा लय ह्या जमिनीच्या सारख्या वांटणीनें झाला. श्रीमंत आणि गरीब हा भेद बुडाला. श्रीमंतीला सन्मान आणि गरिबीला अपमान ही चाल बंद झाली. सर्व सारखे झाले. आणि एका-पेक्षां दुसऱ्याला श्रेष्ठत्व मिळवायाचें झालें तर तें संपत्तीनें मिळेनासें होऊन त्याला केवळ सद्गुणाचाच मार्ग उघडा राहिला. स्थावर मिळकतीसंबंधानें अशा रीतीनें सर्वांमध्यें सारखेपणा उत्पन्न झाला. तरी पण जंगम मिळकती-संबंधानें भेद उरलेलाच होता. तो हळूहळू नष्ट करण्यासाठीं लायकर्गसनें सोन्यारुप्याचें नाणें बंद करून लोखंडाचें नाणें सुरू केलें, व तें लोखंडी नाणें वजनानें अतिशय जड आणि किंमतीनें अतिशय हलकें असें त्यानें केलें. त्यामुळें थोडेंसें द्रव्यही इकडून तिकडे नेण्यासाठीं लोकांना गाडीचाच उपयोग करणें जरूर पडत असे. ह्या उपायानें आणि त्रासानें लोकांची अभिरुचि द्रव्या-वरून हळूहळू उडाली, व तिचा कल शौर्याच्या कामाकडे वळविण्याविषयीं लायकर्गस दुसरीकडून प्रयत्न करीतच होता. कांहीं केलें तरी, किती खोटीं खतें केलीं तरी, किती जबर व्याज घेतलें तरी, आपल्या कुळाची जमीन कमी व्हावयाची नाहीं, आणि आपली जमीन वाढावयाची नाहीं, अशी सर्वांची खात्री झाल्यामुळें स्पार्टन लोकांचें लक्ष स्वाभाविकपणेंच धनसंपन्न होण्यावरून उडून, जगांतील शौर्य, वीर्य इत्यादि उदात्त गोष्टींकडे वळलें. संपत्तीमुळें चैनबाजी वाढते आणि चैनबाजीच्या संवयीपासून पुरुषाच्या अंगामध्यें नाजूकपणा आणि बायकीपणा उत्पन्न होतो, ही कारणपरंपरा लक्षांत आणून, आपल्या देशबांधवांना शौर्यसंपन्न करूं इच्छि-णाऱ्या लायकर्गसानें संपत्तिमूलक अनर्थांचा नाश केल्यानंतर चैनबाजी आणि

ऐषआराम ह्यांच्यापासून होणाऱ्या वाईट परिणामांकडे आपलें लक्ष वळविलें. श्रीमंत लोक अतोनात खर्चाचीं पंचपक्वान्नें सेवन करूनही नाजूक आणि कमकुवत बनलेले होते, व गरीब लोक पोटभर अन्न न मिळाल्यामुळें उपाशी मरत होते. ही स्थिति बदलण्याकरितां प्रत्येकानें आपापल्या घरीं पंचपक्वान्नी किंवा अर्धपोटी जेवणाची चाल मोडून टाकून, सर्व स्पार्टन लोकांनीं एकत्र जमून एकच प्रकारचें अन्न खावें, अशी पद्धत लायकर्गसनें सुरू केली. सार्वजनिक भोजनाच्या वेळीं जें मिळेल तें सर्वांनीं खावें, त्याशिवाय आपल्या घरीं कोणीं कांहीं जास्त खातां कामा नये, असें कायद्यानें ठरलें असल्यामुळें नाजुकपणा लवकरच नाहींसा झाला, व संपत्ति आणि भोजन ह्यांची सार्वजनिक रीतीनें व्यवस्था लागल्यामुळें स्पार्टन लोकांमधील चोरी, लबाडी वगैरे सर्व क्षुद्र मनोवृत्तींचे अन्याय एकदम नाहींसे झाले. कां कीं, ते अन्याय करण्याचें कोणाला कारणच उरलें नाहीं. व अशा रीतीनें स्पार्टन लोक अनायासानेंच सद्‌गुणाच्या आणि उदात्त मनोवृत्तीच्या मार्गाला लागले. सार्वजनिक भोजनाच्या पद्धतीपासून दुसरेही अनेक फायदे उत्पन्न झाले. जेवणांत कोणाचा नाजुकपणा आहे, हें ह्या पद्धतीनें तावडतोब उघडकीस येई; व अशा मनुष्याचा बाकी सर्वजण उपहास करीत. यामुळें सगळ्यांच्या बरोबर मिळालेलें अन्न खाऊन नाजूक लोकही दणगट बनूं लागले. एकेका ठिकाणीं फक्त पंधराच लोकांनीं जेवायला बसावें व त्यांच्या संमतीशिवाय तेथें दुसऱ्या कोणीं येऊन जेवूं नये, असा निर्बंध असे. सार्वजनिक भोजनांतील अन्न तयार करण्याची सामग्री प्रत्येकाला द्यावी लागत असे. परंतु सर्वांनीं सारख्याच प्रतीचें अन्न खावयाचें हा मात्र त्यांत विशेष होता, व कोणी राजा असो किंवा रंक असो, सर्वांनीं सार्वजनिक जेवणच जेविलें पाहिजे, असा नियम असे. एकदां अॅजीस ह्या नांवाचा राजा बाहेर मोठे पराक्रम करून आणि कीर्ति संपादन करून परत आल्यानंतर आपल्या घरींच आपल्या राणीबरोबर जेवूं लागला, व सार्वजनिक जेवणाला येईनासा झाला. त्याबद्दल त्यालाही स्पार्टन लोकांकडून शिक्षा करण्यांत आली. इतके हे कायदे कडक होते. लहान मुलेंही या ठिकाणीं जेवणाकरितां आणलीं जात असत. त्यांना ही एक प्रकारची शाळाच होती. या ठिकाणीं वयोवृद्ध लोक राजकीय गोष्टींबद्दल वादविवाद करीत असत. तो ऐकून लहान मुलांच्या मनाला आयतेंच एक प्रकारचें शिक्षण मिळत असे.

परंतु तेथें ऐकिलेल्या गोष्टी गुप्त ठेवण्याविषयीं मात्र त्या मुलांना ताकीद असे. त्यामुळें त्यांच्यामध्यें गुप्त बातम्या सांगणारे चहाडखोर लोक मोठेपणीं निपजत नसत. सार्वजनिक जेवण हें अर्थातच जाडेंभरडें असे. एकदां डायोनिसिअस हा राजा तेथें जेवायला आला होता. त्याला तें जेवण बिलकुल आवडलें नाहीं. तेव्हां तेथील आचारी म्हणाला: 'आपल्याला हें जेवण आवडलें नाहीं यांत आश्चर्य नाहीं; कारण, ह्याला मसाला घातलेला नाहीं.' त्यांवर डायोनिसिअसनें विचारिलें: 'मसाला कसला?' तेव्हां तो आचारी म्हणाला, 'धांवणें, घाम काढणें, मेहनत करणें व भूक आणि तहान ह्यांचा मसाला ह्याला लागत असतो. हा मसाला असला म्हणजे पाहिजे तें अन्न गोड लागतें.'

चांगले लोक आयत्या वेळीं तयार होत नसतात. लहान मुलांमधून चांगले लोक निर्माण करून घ्यावे लागतात, ही गोष्ट लक्षांत आणून लायकर्गस ह्यानें लहान मुलांच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष पोहोंचविलें होतें. लायकर्गसच्या कायद्यामध्यें स्वदेशालाच काय तें प्राधान्य होतें. सर्व कांहीं जें करावयाचें तें स्वदेशासाटीं, अशी एकंदर विचारांची दिशा असल्यामुळें, आपल्या देशांतील मुलें हींसुद्धां फक्त स्वदेशाकरितां आहेत असें लायकर्गस मानीत असे. प्रत्येक मूल उत्पन्न झालें म्हणजे त्याच्या ज्ञातींतील वयोवृद्ध लोक त्याला पाहण्याकरितां येत असत. आणि त्यांना जर तो मुलगा चांगल्या बांध्याचा, सशक्त आणि मजबूत आहे असें आढळून आलें, तर त्याचें नीट रीतीनें संगोपन करण्याविषयीं ते आज्ञा करीत. परंतु तें मूल जर नाजूक आणि अशक्त आहे असें त्यांना वाटलें, व त्या मुलाचा पुढें सशक्त आणि निरोगी पुरुष बनणार नाहीं असें त्यांचें मत झालें, तर तें मूल फेंकून देण्याविषयीं ते हुकूम करीत. अशा रीतीनें पहिली निवड करून त्यांतून निवडून काढलेलीं मुलें मोटीं झाल्यावर त्यांना खाण्यापिण्याची वगैरे कोणत्याही तऱ्हेची खोड राहूं नये, अशी व्यवस्था करण्यांत येत असे. लहान मुलांनीं चिरचिर करतां कामा नये, व कांहीं झालें तरी चिरडीस जातां कामा नये, किंवा रडतां कामा नये, अशाच तऱ्हेचें त्यांना वळण लावण्यांत येत असे. एकटें असतांना किंवा काळोखामध्यें भीति वाटूं नये अशासाटीं लहान मुलांना त्या त्या गोष्टींची संवय करविण्यांत येत असे. लहान मुलांना पायांत घालण्याला जोडे

वगैरे कांहीं एक मिळत नसत. अंगांत राकटपणा येण्यासाठीं तीं नेहमीं अनवाणीच चालत असत. रात्रीं निजण्याला त्यांना मऊ अंथरुणें नव्हतीं. त्यांना उघड्यावर कोठें तरी निजण्याचा अभ्यास करावा लागत असे. उन्हाळ्याकरितां मलमल आणि हिंवाळ्याकरितां बनाती, असला ऐषआरामाचा प्रकार त्या स्पार्टांतील लहान मुलांना कधींही माहीत नव्हता. सर्व ऋतूंमध्यें त्यांच्या अंगावर एकसारखाच कपडा असे. त्यामुळें तीं स्पार्टा देशांतील मुलें उन्हाळा आणि हिंवाळा ह्यांची सारखीच पर्वा बाळगीत असत. अशा रीतीनें वाढून मुलें सुमारें सात वर्षांचीं झालीं म्हणजे त्यांना शाळेंत घालण्यांत येत असे, व त्या ठिकाणीं सर्वांना एकसारखें शिक्षण देण्यांत येत असे. सर्व मुलें हीं स्वदेशाकरितां आहेत अशी कल्पना असल्यामुळें आपल्या मुलांना निरनिराळ्या रीतीनें निरनिराळ्या प्रकारचें शिक्षण देण्याचा अधिकार त्यांच्या आईबापांकडे न ठेवितां सर्व मुलांना एकच तऱ्हेचें शिक्षण देण्याविषयीं लायकर्गसनें योजना केली होती. त्याच्या सर्व शिक्षणांतील मुख्य भाग म्हटला म्हणजे मुलांना हुकूम पाळण्याला शिकविणें हा होता. त्याचा वेळ निष्कारण मारामर पुस्तकें वाचण्यामध्यें कधींही फुकट जात नसे. अवश्य तेवढाच काय तो विद्याभ्यास ते करीत असत. त्यांच्या सर्व शिक्षणाचा कल हुकूम पाळणें, येतील तीं संकटें सहन करणें, आणि लढाईमध्यें जय मिळविणें ह्या गोष्टींकडे असे. अशा रीतीनें स्पार्टामधील लहान मुलांमध्यें राकटपणा, दणगटपणा आणि सोशिकपणा उत्पन्न करण्याचा क्रम नेहमीं चालू असे.

स्पार्टन लोकांमध्यें ह्या लहान मुलांच्यासंबंधानें एक विलक्षण प्रकारची चाल असे. स्पार्टन लोकांप्रमाणें सद्गुणाची योग्यता दुसरे कोणीही मानीत नसतील. सद्गुण हा त्यांना परमपूज्य होता. हें जरी खरें आहे, तरी त्यांनीं आपल्या मुलांना लहान लहान चोऱ्या करण्याला परवानगी दिलेली होती. सद्गुणाची प्रशंसा आणि चोरीची परवानगी ह्या दोन गोष्टी सकृद्दर्शनीं अगदीं परस्परविरुद्ध दिसतात. परंतु स्पार्टन मुलांना चोऱ्या करण्याची परवानगी त्यांना चोर बनविण्यासाठीं दिलेली नव्हती. लढाईच्या प्रसंगीं लागणारे चपळपणा, धीटपणा वगैरे गुण त्या मुलांचे अंगांत येण्यासाठीं त्यांना ही गोष्ट करण्याची परवानगी असे. इतकेंच नव्हे, तर तसें त्यांनीं केलेंच पाहिजे, असेही हुकूम करण्यांत येत असत. ही चोरी नांवाची मात्र असे. ती द्रव्य चोरण्यासाठीं

नव्हती, तर गुण संपादण्यासाठीं होती. कोणाच्या नकळत एखाद्याच्या बागे-मध्यें जावें आणि तेथील फळें तोडून आणावीं. अशा प्रकारच्या निरुपद्रवी-पणाच्या त्या चोऱ्या असत. परंतु अशा चोऱ्या करितांना जर कोणी मुलगा पकडला गेला तर मात्र दुसऱ्याच्या हातून निसटून जाण्याइतका चपळपणा त्याच्या अंगीं अजून आला नाहीं म्हणून—चोरी केली म्हणून नव्हे—त्याला शिक्षा देण्यांत येत असे. अशी एक गोष्ट सांगतात कीं, एकानें एक कोल्ह्याचें पिलूं चोरलें आणि तें त्यानें आपल्या डगल्याच्या आंतमध्यें दडविलें. तेव्हां तो कोल्हा त्याचें पोट फाडून आंतील आंतडींही खाऊं लागला, व अखेरीस त्या रोगानें तो इसम मेलाही; परंतु आपण कोल्हा चोरला आहे असें त्यानें उघडकीस येऊं दिलें नाहीं. सहनशीलपणाची स्पार्टन लोकांच्या अंगची शक्ति अशा प्रकारच्या पराकाष्ठेला जाऊन पोहोंचली होती. असल्या चोऱ्या करण्याबद्दल लोकांची सम्मति आणि कायद्याची परवानगी पूर्णपणें होती; व ह्यांतील हेतु स्पार्टन मुलांना धारिष्ट, साहस, चपळपणा, चाणाक्षपणा वगैरे गुण अवगत व्हावे हा होता. अशा प्रकारची चोरी म्हणजे चोरी नव्हे, ही कल्पना आपल्याइकडील अशाच प्रकारच्या कृत्यांशीं तिकडील चोऱ्यांची तुलना केली असतां चांगल्या रीतीनें मनांत बिंबेल. आपल्यामध्येंही शिमग्याच्या महिन्यांत अशा प्रकारच्या गोष्टी करण्याची पूर्वीच्या पद्धतीप्रमाणें मोकळीक आहे. परंतु शिमग्यांतील चोरी करणाराला चोर म्हणून आपण कोणीही समजत नाहीं, ही गोष्ट आपल्या सर्वांच्या अनुभवाची आहे. तसाच प्रकार स्पार्टन लोकांच्या ह्या चालीसंबंधानें असला पाहिजे. आपल्यांतील शिमग्यामधील ही चाल वाईट आहे, म्हणून अलीकडे कित्येकांची ओरड चाललेली आहे, व त्या चालीकडे केवळ चोरी या दृष्टीनें आपण जोंपर्यंत पाहतों आहों, तोंपर्यंत ती चाल वाईट, असेंच आपण म्हणूं. परंतु अशाच प्रकारच्या स्पार्टन लोकांच्या एका चालीमध्यें त्यांचा कांहीं विशेष हेतु होता, असें जर आज आपल्याला स्पष्ट दिसून येत आहे, तर तसलाच कांहीं तरी हेतु आपल्याही ह्या चालीमध्यें आपल्या पूर्वजांनीं ठेविला असला पाहिजे, व आपल्याला केवळ चोर बनविण्यासाठींच त्यांनीं ही चाल प्रचारांत आणिली नसावी, असें अनुमान केलें असतां तें कोणालाही मान्य

होईल, यांत शंका नाहीं. स्पार्टन मुलांच्या अंगांतील सहनशक्ति कसोटीला लावण्याचा एक विशेष प्रसंग असे. डायना या नांवाच्या देवीची जत्रा भरत असे. त्या वेळीं आपले आईबाप आणि नगरांतील इतर लोक एकत्र जमले असतां त्यांच्या समक्ष स्पार्टन मुलांच्या अंगांवर चाबकाचे फटकारे ओढण्यांत येत असत, व त्यायोगानें त्यांच्या अंगांतून कधीं कधीं रक्तही वाहूं लागत असे. तरी पण त्या मुलांचा रडण्याचा स्वर किंवा नुसता सुस्काराही कोणाला कधीं ऐकूं येत नसे; व एखादे प्रसंगीं आपलीं मुलें डगमगूं लागलीं तर प्रत्यक्ष त्यांचे आईबाप त्यांना धीर न सोडण्याविषयीं उत्तेजन देत असत. अशा रीतीनें तयार झालेल्या मुलांचेच पुढें अत्यंत शूर शिपाई बनण्याला काय अडचण आहे!

अशा प्रकारच्या बाल्यावस्थेच्या शिक्षणांतून तयार झालेल्या स्पार्टन लोकांना स्वदेशभक्ति आणि सार्वजनिक हित ह्यांतच आपलें सर्व कांहीं आहे, असें वाटणें स्वाभाविक होतें. आपण आपल्या स्वतःकरितां नाहीं, तर आपल्या देशाकरितां आहों, ही कल्पना त्यांच्या हाडामांसांमध्यें अगदीं खिळून गेली होती. त्यामुळें जेथें आपल्या देशाचें कल्याण, तेथें आपलें स्वतःचें कितीही अकल्याण झालें, तरी त्याचा त्यांना बिलकुल खेद वाटत नसे. आपल्या इकडे शुष्काशुष्कीच्या म्युनिसिपालिटीच्या, कौन्सिलच्या वगैरे निवडणुकीसाठीं स्वार्थपरायण लोकांची किती धडपड चाललेली असते, हें आपण पाहतों. पिडॅरेटस ह्या नांवाचा एक स्पार्टन अशाच प्रकारच्या एका निवडणुकीसाठीं उमेदवार म्हणून उभा राहिला होता. तीनशें लोकांची स्पार्टामध्यें एक मोटी सभा असे. त्यांतील एका जागेसाठीं पिडॅरेटस हा उमेदवार होता. परंतु त्यांत त्याला यश आलें नाहीं. तेव्हां आपण निवडून आलों नाहीं ह्याबद्दल यत्किंचितही दुःख न करितां तो मोठ्या आनंदानें असें म्हणाला कीं, 'माझ्यापेक्षां अधिक योग्यतेचे तीनशें लोक स्पार्टामध्यें आज आहेत, ह्याबद्दल मला अत्यंत अभिमान वाटत आहे.' अशा रीतीची सर्व लोकांच्या मनाची प्रवृत्ति झालेली असल्यामुळें तेथें कोणत्याही प्रकारच्या दुर्गुणांना जागाच उरली नव्हती; व जिकडे तिकडे सद्गुणी लोक पसरलेले असल्यामुळें त्यांचें उदाहरण पाहून पुढील लोकही सद्गुणीच निपजत. हा आपल्या लोकांचा सद्गुणीपणा इतर देशांतील दुर्गुणी लोकांच्या संसर्गापासून दूर राखण्याकरितां स्पार्टन लोकांनीं परदेशामध्यें प्रवासाला जाऊं नये, असा लायकर्गसनें प्रतिबंध करून ठेविला

होता. त्याचप्रमाणें परकीय देशांतील वाईट चालीच्या आणि निरुपयोगी लोकांना तो स्पार्टामध्येंही कधीं येऊं देत नसे. कारण हल्लींच्या कित्येक मतांपेक्षां त्याचें मत भिन्न असल्यामुळें तो असें म्हणे कीं, आपल्या शहरामध्यें प्लेग वगैरेसारखे स्पर्शजन्य रोग येऊं न देण्याला जितके प्रयत्न केले जातात, त्याच्यापेक्षां बदमाषपणाच्या आणि हलकटपणाच्या चालीरीती आपल्या शहरामध्यें येऊं न देण्याविषयीं जास्त प्रयत्न करणें, हें फार जरूरीचें आहे. अशा रीतीनें दुसऱ्यांच्या दुर्गुणांचा वारा न लागण्याविषयीं पूर्ण काळजी घेऊन स्पार्टामध्यें सद्गुणाची वाढ केली जात होती. आणि अशा रीतीनें हे सर्व सद्गुण संपादन करून त्यांचा उपयोग स्पार्टन लोक शत्रूंना जिंकण्याचे कामीं करीत असत. लढाई हाच त्यांच्या जन्माचा व्यवसाय होता. आणि शस्त्रावांचून त्यांचा एक क्षणही जात नसे. आणि ते आपल्या शहरामध्यें राहत असोत, किंवा एखादा शत्रु पादाक्रांत करण्याच्या मोहिमेवर गेलेले असोत, त्यांच्या आयुष्यक्रमांतील नियमांचा कडकपणा दोन्ही ठिकाणीं सारखाच असे. त्यांचे लढाईचे मुख्य नियम म्हटले म्हणजे हे होते कीं, शत्रूचें सैन्य आपल्यापेक्षां कितीही मोठें असलें, तरी रणभूमीवरून पळून यावयाचें नाहीं; शत्रूला आपली पाठ दाखवावयाची नाहीं; आपल्या सेनापतीनें ज्या ठिकाणचें संरक्षण करण्याला सांगितलें असेल तेथून एक पाऊलभरही मागें सरावयाचें नाहीं; आणि आपलीं शस्त्रें कधींही शत्रूंच्या स्वाधीन करावयाचीं नाहींत. सारांश, लढाईमध्यें मरावयाचें किंवा मारावयाचें ह्याच्याशिवाय तिसरी गोष्ट त्यांना माहीत नव्हती. अशी एक गोष्ट सांगतात कीं, एकदां आर्किलोकस नांवाचा एक कवि स्पार्टामध्यें आला होता. त्यानें 'आपण लढाईमध्यें मरण्यापेक्षां आपलें हत्यार खालीं टेवून शत्रूला शरण जाणें फार चांगलें,' असें मत आपल्या एका कवितेमध्यें प्रतिपादन केल्याची बातमी स्पार्टन लोकांना लागतांच त्यांनीं त्याला आपल्या शहरांतून तावडतोब हाकलून लाविलें. हा वीरश्रीचा बाणेदारपणा फक्त स्पार्टन पुरुषांमध्येंच होता असें नाहीं, तर तो बायकांमध्येंही पूर्णपणें बिंबला होता. स्पार्टन मुलगा लढाईला जावयाला निघाला म्हणजे त्याची आई त्याला असा उपदेश करीत असे. कीं, 'तूं जय मिळवून घरीं ये, किंवा मरून तरी घरीं ये; परंतु लढाईंतून पळून घरीं येऊं नकोस.' एका आईचा मुलगा लढाईंत पडलेला ऐकल्यानंतर ती दुःख वगैरे

कांहीं एक न करितां शांतपणानें म्हणाली कीं, 'मीं आपल्या मुलाला ह्याच-करतां जन्म दिला होता. दुसरा त्याचा काय उपयोग आहे?' एका लढाई-मध्यें स्पार्टन लोकांकडचे पुष्कळ लोक मेले, तेव्हां त्या मेलेल्या शिपायांच्या आईबापांना इतका आनंद झाला कीं, आपल्या मुलांनीं आपलें कर्तव्यकर्म केलें, ह्याबद्दल त्यांनीं एकमेकांचें अभिनंदन केलें व परमेश्वराची प्रार्थना केली. असले लोक, असले शिपाई, असले मुलगे, आणि असल्या आया ज्या शहरामध्यें आहेत, त्या शहराला तटबंदीच्या भिंती असण्याचें काय कारण आहे? स्पार्टा शहराचा हाच कोट होता. ह्याच्याशिवाय दुसरा कोट खिस्ती-शकापूर्वीच्या चौथ्या शतकापर्यंत स्पार्टा शहराला माहीत नव्हता. अशा प्रकारचे लायकर्गसचे कायदे होते. आणि त्या कायद्यांनीं स्पार्टन लोकांसारखे लोक जगापुढें बनवून दाखविलेले आहेत.

कोणी एका तत्ववेत्त्यानें असें म्हटलें आहे कीं, 'मला एखाद्या मनुष्याचे स्नेही कोण कोण आहेत हें सांगा, म्हणजे मी त्या मनुष्याचा स्वभाव कसा आहे हें बरोबर सांगतों.' जसे लोकांचे स्नेही त्यांच्या अंगच्या गुणावगुणांचे दर्शक आहेत, त्याचप्रमाणें कायदेही लोकांच्या अंगच्या गुणावगुणांचे दर्शक आहेत. जसे कायदे असतील तसे लोक बनतात. कायदे हे एक प्रकारचे सांचे आहेत, आणि मनुष्य हा एक प्रकारचा मातीचा गोळा आहे. मातीच्या गोळ्याला ज्या सांचांत घालावें, त्याप्रमाणें त्याला आकार येतो. तीच गोष्ट कायद्यांची आहे. लायकर्गसनें स्पार्टन लोकांना चांगल्या सांचांत घातलें म्हणून ते शूर लोक बनले. एखाद्या स्वार्थसाधु कायदेवाल्यानें त्यांना आप-मतलबी सांचामध्यें घातलें असतें तर तेच स्पार्टन लोक भित्रे, नेभळे, भेपपात्र, कमकुवत, कुचकामाचे, टाकाऊ, नादान, पाजी, चहाडखोर, धनलोभी, कृतघ्न, नास्तिक, दास्यप्रिय आणि देशद्रोहीही झाले नसते काय?

# रुमाल्या भिल्ल : : : ११

काळ : अग्रलेख ता. १६-८-१९०१

● मूळ अग्रलेखास मथळा नाहीं. ता. ३०-८ च्या अंकांत शहादे-कर यांचें पत्र प्रसिद्ध झालें आहे. रुमाल फरारी झाला नव्हता, तो काशीयात्रेला गेला होता; त्याला त्याच्या मुलांनीं पकडून दिलें नाहीं तर तो आपलें निर्दोषत्व सिद्ध करण्यासाठीं आपण होऊन हजर झाला; आणि त्याच्यावरील खटला त्याच्या साथीदारावरील खटल्याप्रमाणेंच फुसकट असावा, असा खुलासा सदर पत्रांत आहे.

खानदेश जिल्ह्यामध्यें रुमाल्या या नांवाचा कोणी एक दरवडेखोर लोकांना पुष्कळ दिवस त्रास देत होता. हा पूर्वी जंगलखात्यामध्यें नोकरीला होता. परंतु ती नोकरी सोडून तो १८९९ सालापासून दरवडे घालण्याचें काम करूं लागला. हा स्वतः जातीचा भिल्ल असून, त्यानें आपल्याजवळ दुसरे आणखी पांचपन्नास भिल्ल जमा केले होते व त्यांच्या साह्यानें आज तीन वर्षेपर्यंत तो सातपुड्यामध्यें राहून आसपासच्या वाटसरूंवर हल्ले करीत असे, व तालुक्याच्या वगैरे ठिकाणीं दरवडेही घालीत असे. पुढें तो इतका धीट झाला कीं, भर दिवसासुद्धां तो दरवडे घालूं लागला; व गुदस्त सालीं त्यानें जळगांवच्या फौजदाराला एका चकमकीमध्यें ठार मारिलें. खानदेशांत चाललेली ही गडबड बंद करण्याविषयीं सरकारचे बरेच दिवस प्रयत्न चालले होते, व खानदेशच्या पोलिस अधिकाऱ्यांनीं इतर जिल्ह्यांतील पोलिसांची मदत मागितलेली व मिळ-विलेली होती; व एकदां त्यांनीं लष्करी शिपायांचीही मदत मागितल्याबद्दल

बातमी उठली होती. असे अनेक दिवस प्रयत्न करतां करतां अखेरीस रुमाल्या पोलिसच्या हातीं सांपडला. ह्याला कसा धरला, ह्याच्याबद्दल ११ तारखेच्या 'टाइम्स'मध्यें एक पत्र प्रसिद्ध झालें आहे. त्यावरून असें दिसतें कीं, डि० सुपरिंटेन्डन्ट मि० लक आणि पोलिस इन्स्पेक्टर मि० मारुती पांडुरंग ह्यांची या कामाकडे नेमणूक होऊन सुमारें पाऊण महिन्याच्यापूर्वीं ते रुमाल्याला पकडण्याकरितां शहादा तालुक्याकडे गेले. तेथें गेल्यावर मि० लक ह्यांना असें कळून आलें कीं, रुमाल्याला पकडण्याला एकच मार्ग शक्य आहे. रुमाल्या आपल्या पोलिसच्या सैन्यांनीं पकडला जाणार नाहीं. तर त्याला त्याच्या मुलांकडूनच पकडविला पाहिजे. अशी कल्पना मनांत येऊन रुमाल्याचे मुलगे, फुल्या आणि पवार, हे असोद येथें राहत होते, तेथें लक साहेब गेले, व तेथें रुमाल्याच्या मुलांची गांठ घेऊन रुमाल्या कोठें आहे हें सांगण्याविषयीं त्यांनीं त्यांचें मन वळविलें; व तुम्ही जर रुमाल्याबद्दल खरी बातमी सांगाल व तो आमचे हातीं लागेल अशी तजवीज कराल, तर तुम्हांला ५०० रुपये बक्षीस देऊं, असें साहेबांनीं त्यांना सांगितलें. तेव्हां रुमाल्याचे मुलगे ती गोष्ट करण्याला तयार झाले, व अशा युक्तीनें ता. ११ जुलै रोजीं रुमाल्या लक साहेबांच्या हातीं लागला, व तेव्हांपासून लक साहेबांनीं रुमाल्याला पकडलें म्हणून सर्व जग म्हणूं लागलें आहे. रुमाल्याच्या दरवड्यांपासून लोकांचा त्रास चुकला, हें फार चांगलें झालें. आतां खानदेशच्या लोकांवर दुसरे कोणी दरवडे घालीत असोत, परंतु रुमाल्याची तरी त्यांना इतःपर भीति उरली नाहीं. दरवडे घालणें हें वाईट, आणि जे दरवडे घालतात त्यांना शासन हें झालेंच पाहिजे; त्याबद्दल कोणाचाही मतभेद नाहीं. परंतु रुमाल्याच्या ह्या वर दिलेल्या हकीकतीमध्यें एक गोष्ट अशी आहे कीं, त्यामुळें हिंदुस्थानांतील लोकांच्या स्वभावांचें परिशीलन करणाऱ्या मनुष्यांच्या अंतःकरणाचें दुःखानें पाणीच झालें पाहिजे. रुमाल्या पकडला गेला हें ठीकच झालें, परंतु त्याच्या मुलांनीं त्याला पकडून द्यावें, हें हिंदुस्थानांतील मानवी स्वभावाच्या उन्नतीच्या दृष्टीनें ठीक झालें, असें म्हणतां यावयाचें नाहीं. गुन्हे पकडण्याच्या कामांत सरकारला मदत करणें हें प्रजेचें कर्तव्यकर्म आहे. परंतु मुलांनीं आपल्या बापाला फांसावर चढविण्यासाठीं मदत करणें, हें मुलांचें पवित्र कर्तव्यकर्म आहे, असें म्हणतां यावयाचें नाहीं. हिंदुस्थानांतील लोकांना सरकारच्या

संबंधानें कांहीं बंधनें आहेत हें कबूल आहे. म्हणून हिंदुस्थानांतील लोकांना कांहीं कौटुंबिक बंधनें नाहींतच, असें मात्र म्हणतां यावयाचें नाहीं. पण गुन्हे पकडण्याच्या कामीं सरकारला मदत करणें किंवा सार्वजनिक फायद्यासाठीं आपल्या खासगी नुकसानीकडे न पाहणें या गोष्टी फार उदात्त आहेत; व असल्या उदात्त हेतूंनीं उद्युक्त होऊन जर फुल्या आणि पवार ह्यांनीं आपल्या बापाला पकडून दिलें असतें, तर ते खरोखरच स्तुतीला पात्र झाले असते. परंतु त्या बिचाऱ्यांना वर निर्दिष्ट केलेल्या हेतूंची कल्पनाहीं नसेल. त्यांना पांचशें रुपयांची रकम किती मोठी असते, ती ठेवावयाला किती मोठी पिशवी लागेल व त्या रकमेवर मद्य, मांस आणि वेश्या ह्यांच्या उपभोगामध्यें किती दिवस चैन मारतां येईल, ह्याची तेवढी कल्पना होती. आणि ह्या कल्पनेप्रमाणें त्यांनीं आपला बाप पांचशें रुपयांला लक साहेबाला विकला! ज्या देशांत कांहीं थोड्याशा रुपड्यांकरितां आपला बाप ( मग तो दरवडेखोर असो किंवा प्रामाणिक मनुष्य असो ) विकणारे मुलगे आहेत, त्या देशाला कशाची आशा आहे! त्याला केव्हां चांगले दिवस यावयाचे आहेत! आणि त्याचे कधीं पांग फिटावयाचे आहेत! कधीं नाहींत! जोंपर्यंत येथें मुलगे बापांना पकडून देत आहेत, आणि बाप मुलांना पकडून देत आहेत, भाऊ बहिणींना वेश्या बनवीत आहेत आणि बहिणी भावांचे गळे कांपीत आहेत, आणि मित्र मित्रांशीं दगलबाजपणा आणि हरामखोरपणा करीत आहेत, तोंपर्यंत हें हिंदुस्थान ह्या पृथ्वीवरील नरकलोकच होण्याला योग्य आहे! दुसरें याच्या हातून काय व्हावें! मुलाकडून बापाला आणि बापाकडून मुलाला पकडण्याच्या ह्या साहेबांच्या युक्त्या आजच्या आहेत असें नाहीं. ह्या युक्त्यांच्या योगानें साहेबांनीं आजपर्यंत हिंदुस्थानांतील राजांपासून रंकांपर्यंत हजारों लोकांना हस्तगत करून घेतलें आहे. परंतु आम्ही हिंदुस्थानांतील लोक मात्र प्लासीच्या लढाईच्या पूर्वीं जसे होतों, तसेच डायमंड ज्युबिलीच्या नंतरपर्यंतहि कायम आहों! अजूनहि आम्ही अल्पस्वल्प स्वार्थाकरितां पाहिजे ती गोष्ट करण्याला तयार होत आहों. आमच्या विश्वासघातानें इंग्लिशांचें किती तरी सैन्य निरुपयोगी करून टेविलें आहे! हिंदुस्थाना, पूर्वीं एकदां तुझ्या पोटीं असे पुत्र जन्मास येत असत कीं, जे कांहीं झालें तरी आपल्या बापाला दुसऱ्याच्या हातीं देत नसत. पण आतां तसें नाहीं. सध्यांचे दिवस हे पितृ-

वात्सल्याचे किंवा पुत्रवात्सल्याचे नव्हेत, तर द्रव्यवात्सल्याचे आहेत. हिंदुस्थाना! जोंपर्यंत आपल्या बापांच्याही गळयाला फांस लावण्याला न चुकणारे मुलगे येथें जन्माला येत आहेत, तोंपर्यंत तुझी स्थिति सुधारण्याला इंग्रजच काय, पण प्रत्यक्ष ब्रह्मदेव आला, तरीदेखील ती सुधारावयाची नाहीं. ज्या देशांत बाप आणि मुलगा ह्यांच्या शरिरांत खेळणारें एकच रक्त, त्यांचे पूर्वी होऊन गेलेले एकच आजेपणजे, आणि त्यांचें त्यांना अनेक कारणांनीं आवडतें झालेलें एकच कुल, ह्या सगळयांचा एक पैसा एका क्षणांत चुराडा करून टाकतो, त्या देशाचा नाशच झाला पाहिजे. ह्याशिवाय त्याला दुसरा मार्ग नाहीं. पशु म्हणजे सर्व प्राण्यांत मूर्ख. पण तो पशूदेखील ज्यानें आपल्याला जन्म दिला त्या आपल्या बापाला खात नाहीं. पण आम्ही हिंदुस्थानांतील लोक ह्या इंग्रजांच्या पैशाच्या लालचीमुळें पशूंपेक्षांहि पशु बनलों आहों. जें पशूही करणार नाहींत, तें आम्ही पैशासाठीं करण्यास तयार होतों. पैशासाठीं आम्ही आपला मनुष्यपणाही विसरतों. पैशासाठीं जर आपल्या बापाला सुळावर चढविणारे मुलगे आपल्यामध्यें आहेत, तर आपण मोठें होण्यासाठीं काय म्हणून आशा करावी! आपला त्या मोठेपणावर काय बरें हक्क आहे! पूर्वी एकदां अशी वेळ होती कीं, जेव्हां मुलाला आणि बापाला आपलें काय आणि दुसऱ्याचें काय, हें समजत होतें. पण आतां ती वेळ नाहीं. हल्लीं 'मला नाहीं, तुला नाहीं आणि घाल कुत्र्याला' अशी मुलांची आणि बापांची वृत्ति वाढत आहे. त्याला काय करावयाचें? परमेश्वराची मर्जी! हे दुःखाचे उद्गार कोणी एक दरवडेखोर पूर्वी हिंदुस्थानांत कोंडला गेला होता तो हल्लीं एका तुरुंगांत कोंडला गेला म्हणून नव्हेत, तर आपल्या देशांत बाप खाणारे मुलगे निपजतात म्हणून होत.

## दिल्लीचें तक्त आणि भाऊसाहेबांचा घण : : : . १२

काळ : अग्रलेख ता. ६-९-१९०१

शिवाजीच्या उदयापासून तों बाजीरावाच्या अस्तापर्यंत मराठ्यांचा प्रतापरूपी सूर्य सर्व महाराष्ट्रावर प्रकाशमान होत असतां, त्या अवधीमध्यें मराठ्यांच्या हातून अचाट शौर्याच्या अशा अनेक गोष्टी झालेल्या आहेत. त्या सर्वच आपआपल्या परीनें मोठ्या आहेत. परंतु त्या सर्वांमध्यें एक गोष्ट इतकी भव्य, प्रचंड आणि अद्भुत आहे कीं, तिच्याबद्दल विचार करूं लागलें असतां मन अगदीं थक्क होऊन जातें. ती गोष्ट म्हटली म्हणजे सदाशिवरावभाऊंनीं दिल्लीचें बादशाही तक्त फोडिलें ही होय. पानिपतच्या मोहिमेमध्यें बारीकसारीक गोष्टी पुष्कळ घडून आल्या असतील; पण ह्या वर नमूद केलेल्या गोष्टीनें ज्याचें मन आकर्षण करून घेतलें नसेल, असा मनुष्य सांपडणें फार कठीण आहे. पानिपतची मोहीम हा मराठ्यांच्या शौर्याचा कळस होता. पानिपतच्या समरांगणावर मराठ्यांच्या शस्त्रांना यश आलें असतें तर त्यांच्या वैभवाला पारावारच नव्हता. परंतु जरी तेथें त्यांना यश आलें नाहीं, तरी पुण्यापासून अटकेपर्यंत मराठे सरदार अव्याहतपणें कूच करीत आणि खंडण्या घेत गेले, ही गोष्ट कांहीं लहानसहान नव्हे. पानपतच्या मैदानांत पराभव होईपर्यंत ज्या ज्या गोष्टी घडून येत होत्या, त्या त्या सर्व मराठ्यांच्या उत्कर्षाच्याच सूचक होत्या. खुद्द ज्या दिवशीं पानिपतास मराठ्यांचा पराभव झाला, त्या दिवशीं संध्याकाळचा चार घटका दिवस राहीपर्यंतसुद्धां मराठ्यांच्याच पक्षाला यश आलेलें होतें. त्या घटकेपर्यंत मराठ्यांच्या उत्कर्षाची एकसारखी चढतीच कमान होती, असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. ह्या उत्कर्षाच्या कालामध्यें मराठ्यांनीं जीं अचाट कृत्यें केलीं, त्यांतील पहिल्या प्रतीचें कृत्य म्हटलें म्हणजे त्यांनीं दिल्लीचें तक्त फोडिलें हें होय.

दिल्लीचें तक्त फोडावें ही कल्पना भाऊसाहेबांची. सुराजमल जाट हा ह्या कल्पनेला विरुद्ध होता व भाऊसाहेबांनीं दिल्लीचें तक्त फोडलें म्हणून सुराजमल जाट व त्याच्याबरोबर दुसरे कांहीं सरदार मराठ्यांचा पक्ष सोडून निघून गेले. ह्या इतिहासांतील गोष्टीवरून ज्या तक्त फोडण्याचे परिणाम अशा रीतीनें अहितकारक झाले, त्या गोष्टीला इतकें महत्त्व देणें बरोबर नाहीं, असा आक्षेप येणें अगदीं स्वाभाविक आहे. परंतु आम्ही जें या गोष्टीला श्रेष्ठ पद देत आहों, तें अगदीं निराळ्या कारणासाठीं आहे. सध्यांच्या प्रसंगीं आम्हांला ऐतिहासिक वादांशीं विशेष कांहीं कर्तव्य नाहीं. आणि त्या वादांच्या दृष्टीनें विचार केला, तरीही सुराजमल जाटाच्या म्हणण्यांत काय अर्थ होता ? सुराजमलाचें असें म्हणणें होतें कीं, आम्ही बादशहाचे नोकर आहों, तेव्हां आमच्या समक्ष बादशहाचा खजिना आम्ही लुटूं देणार नाहीं. पण जाटाच्या ह्या म्हणण्यांत काय अर्थ होता ? बादशहाचा खजिना कोठला ? बादशहांनीं तो कोठून आणिला होता ? बादशहांनीं जन्मास येते वेळीं स्वर्गलोकांतून आपल्याबरोबर तो आणिला होता काय ? किंवा त्यांच्या आजापणजांनीं आणिला होता ? हा बादशाही खजिना आला कोठून ? लोकांच्या जवळून पैसे लुबाडून ते बादशहानें आपल्या ताब्यामध्यें आणून ठेविले, म्हणजे झाला तो बादशाही खजिना ! पण वास्तविक ते पैसे लोकांच्या श्रमाचे. लोकांच्या खिशांत जेव्हां पैसे येतात तेव्हां ते घामानें भिजून येतात. परंतु जेव्हां ते बादशहाच्या खजिन्यांत जातात, तेव्हां रक्तानें ओले होऊन जातात. गरीब लोक कुदळीनें आणि नांगराच्या फाळानें एक एक पैसा कमावितात, आणि बादशहा तरवारीनें आणि तोफेच्या गोळ्यानें कोट्यवधि रुपयांची लूट मारितात, आणि अशा तऱ्हेनें यांचे खजिने भरतात. असले खजिने बादशहांचे कसले ? ते वास्तविक लोकांचेच आहेत. त्यांच्यावर लोकांचाच हक्क जास्त आहे. बादशहांचा लुटारूपणाखेरीज त्यांवर दुसरा कोणता हक्क आहे ? ज्यांनीं निढळाच्या घामानें पैसा मिळविला, ते सर्व लोक चोर व्हावे, आणि ज्यांनीं ते लोकांपासून लुटून आणिले ते त्याचे मालक व्हावे काय ? दिल्लीचा खजिना दिल्लीच्या बादशहाचा नव्हता. तो दिल्लीच्या लोकांचा होता. तो हिंदुस्थानच्या लोकांचा होता. त्या खजिन्यांत हिंदुस्थानच्या लोकांचे पैसे सांठविलेले होते. आतां ते पैसे कोणापासून किती लुबाडून घेतले होते, याचा बादशहाच्या दप्तरामध्यें जमाखर्च नसल्यामुळें ( कारण लुटीच्या

पैशाचा जमाखर्च कोण ठेवतो !) ते ज्याचे त्याला परत करणें ही गोष्ट अशक्य असल्याकारणानें त्या पैशाचा जर कांहीं योग्य विनियोग करण्याचा मार्ग असेल तर तो एकच होता; आणि तो हा कीं, ज्याचा त्याला परत करतां येत नसलेला हिंदुस्थानांतील लोकांचा पैसा हिंदुस्थानांतील लोकांच्या कोणत्या तरी सामान्य अशा कल्याणाकडे लावावयाचा. आणि हिंदुस्थानांतील लोकांचें त्या वेळीं सर्वसामान्य कल्याण असें कोणतें होतें ? गझनीचा महमद, महंमद घोरी वगैरे मुसलमानी योद्धयांच्या स्वाऱ्यांपासून हिंदुस्थानचें स्वातंत्र्य दिवसें-दिवस नष्ट होत चाललें होतें. तेव्हांपासून जें ग्रहण लागत चाललें त्याचा पूर्ण खग्रास होण्याची वेळ औरंगजेबाच्या कारकीर्दींत आली होती. पुढें दक्षिणेमध्यें शिवाजीमहाराजांसारखे प्रतापशाली पुरुष उत्पन्न होऊन त्यांनीं जरी महाराष्ट्राला स्वातंत्र्याची गोडी लावून दिली होती, तरी उत्तर हिंदुस्थानामध्यें मुसलमानांचा अमल कायमच होता. उत्तर हिंदुस्थानांत मुसलमानांचें पूर्ण वर्चस्व होतें. १७६०।६१ सालचे दिवस असे आले होते कीं, त्या वेळेला मुसलमानांच्या सत्तेला प्रतिबंध करण्याचा कांहीं उपाय योजण्यांत आला नसता, तर पारतंत्र्याच्या जोखडानें हिंदुस्थानांतील लोकांच्या माना कायमच्याच मोडून गेल्या असत्या. दिल्लीच्या बादशहाचें वजन कमी होत चाललें आहे असें पाहून त्याला मदत करण्यासाठीं अहंमदशहा अबदाली हा कंदाहाराहून सैन्य घेऊन येत होता, व अबदालीला मदत करण्यासाठीं रुमशामच्या बादशहानेंही आपलें कांहीं सैन्य पाठविलें होतें. म्हणजे हल्लीं जसें युरोपामध्यें संयोगसंधि (Alliances) झालेले आपण पाहतों, त्याप्रमाणें त्या वेळच्या तीन मोटमोठ्या मुसलमान राजांच्यामध्यें हा Triple allianceच झालेला होता. कॉन्स्टँटिनोपलचा बादशहा, कंदाहारचा बादशहा आणि दिल्लीचा बादशहा हे एकत्र होऊन हिंदुस्थानाला गुलामगिरीमध्यें दडपून टेवण्याविषयीं प्रयत्न करीत होते. असें त्या वेळेचें शत्रूकडील कारस्थान होतें. शत्रु हिंदुस्थानचें स्वातंत्र्य नष्ट करण्यासाठीं खटपटी चालवीत होते आणि त्याच वेळीं आमच्या हिंदुस्थानांतील सुराजमल जाट 'आम्ही बादशहाचा खजिना रक्षण करणार' म्हणून रडत होते. ह्या लोकांच्या अदूरदृष्टीला काय म्हणावें ! त्या वेळेला आपल्या देशाविरुद्ध कोण काय काय कारस्थानें करीत आहेत, याचा जाटांना गंधही नव्हता असें दिसतें. अशा वेळीं जसे मुसलमान एक झाले होते त्याच-

प्रमाणें हिंदूंनींही एक व्हायला पाहिजे होतें. पण तें सर्व एकाच बाजूला राहून जे भाऊसाहेब सर्व हिंदुस्थान स्वतंत्र करण्याचा प्रयत्न करीत होते, त्यांनाच उलट सुरजमल जाट आडवा आला. परंतु भाऊसाहेबांची दृष्टि सुरजमलासारखी वेडगळ समजुतींनीं आणि मतांनीं आंधळी झालेली नव्हती. आपल्या देशावर कोणतें संकट आलें आहे आणि आपला देश स्वतंत्र करण्यासाठीं आपण या प्रसंगीं काय केलें पाहिजे, याची पूर्ण कल्पना भाऊसाहेबांच्या डोळ्यांसमोर होती. त्यांना हिंदुस्थान स्वतंत्र करावयाचें होतें. त्यांना हिंदुपदपादशाहीची इमारत उभी करावयाची होती, व अशाच धोरणानें त्यांचे सर्व प्रयत्न चालले होते. त्यांनीं दक्षिणेंतून गायकवाड, विंचूरकर, पोवार, निंबाळकर वगैरे सरदार गोळा करून बरोबर आणिले होते. पुढें कूच करून माळव्यांत आल्यावर तेथें ज्या फौजा होत्या त्या त्यांनीं बरोबर घेतल्या होत्या. बुंदेले व झांशीवाले तमाम समागमें निघाले. जयपूर, उदेपूर, भरतपूरवाले, कुंभेरी, चितोड, रामनगर वगैरे ठिकाणचे सर्व रजपूत शिपाईही भाऊसाहेबांच्या सैन्यांत येऊन मिळाले. हा अतिशय आणीबाणीचाच प्रसंग होता. १७६१ सालानंतर हिंदुस्थानांत मुसलमानांनीं राज्य करावें कीं हिंदूंनीं राज्य करावें, हिंदु लोकांनीं गुलामगिरी पत्करावी कीं स्वतंत्र व्हावें, या महत्त्वाच्या प्रश्नाचा निकाल करण्याचाच हा प्रसंग होता. आणि यासाठींच हिंदूंच्या बीजाचे म्हणून जे सरदार व शिपाई होते ते सर्व भाऊसाहेबांनीं आपल्या सभोंवतीं गोळा केले होते. हिंदुस्थान हें हिंदुस्थानांतील लोकांकरितां आहे, दुसऱ्यांकरितां नव्हे, हे प्रतिपादन करण्यासाठीं भाऊसाहेबांच्या सभोंवतीं चार लक्षांच्यावर फौजेचा जमाव जमला होता. इतक्या लोकांच्या खर्चाला काय लागणार नाहीं! भाऊंनीं आपल्याबरोबर दक्षिणेंतून पुष्कळ पैका आणिला होता. परंतु तो दिल्लीपर्यंत मजल येऊन पोंचेपर्यंत सर्व खलास होऊन गेला व फौजेंत पैशाची फार टंचाई झाली. दिल्लीच्या बादशाही तख्तामध्यें अपार खजिना असल्याची माहिती सर्वत्र होती. शिवाय तें तख्तही अतिशय मौल्यवान् होतें. ही संपत्ति दिल्लीच्या बादशहांनीं कशी कमाविली होती हें वर आपल्याला दिसून आलेंच आहे. ही हिंदुस्थानांतील लोकांच्या निढळाच्या घामाची संपत्ति हिंदुस्थानच्या लोकांच्या सर्वसामान्य कल्याणाकडे उपयोगांत आणण्याची जर एखादी वेळ असली, तर ती ही होती. हिंदुस्थानांतील लोकांच्या स्वातंत्र्यासाठीं हिंदुस्थानांतील लोकांची संपत्ति उपयोगांत आणा-

वयाची नाहीं, तर ती केव्हां आणावयाची? हिंदुस्थानची संपत्ति हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याकरितांच आहे. ती बादशहांच्या जलशांकरितां नाहीं. अशा उदात्त विचारांनीं प्रेरित होऊन भाऊंनीं दिल्लीचें तक्त फोडण्याचा निश्चय केला. त्यांतील पैका भाऊसाहेबांना स्वतःच्या उपयोगाकरितां नको होता. तक्तावरील जवाहीर काढून त्यानें भाऊसाहेबांना आपलें अंग सुशोभित करावयाचें नव्हतें. तर त्या थोर वीराला सर्व हिंदुस्थान स्वातंत्र्यानें सुशोभित करावयाचें होतें. त्या द्रव्यापैकीं चार दमड्या भाऊसाहेबांच्या पदरांत पडणार होत्या असें नाहीं. त्या पैक्यानें भाऊसाहेबांना आपलें पोट जाळावयाचें नव्हतें. तर हिंदुस्थानाला स्वतंत्र करण्यासाठीं ज्या फौजा निघाल्या होत्या त्यांच्या पोटाला अन्न द्यावयाचें होतें. आणि त्यासाठीं सदाशिवभाऊंनीं हें कृत्य केलें. व अशा दृष्टीनें पाहिलें म्हणजे वर निर्दिष्ट केलेला आक्षेप अगदीं पोकळ आणि कमजोर आहे, असें कोणालाही वाटल्यावांचून राहणार नाहीं.

ह्याप्रमाणें ह्या आक्षेपाचें निरसन केल्यानंतर आपण आतां सदाशिवराव-भाऊंनीं दिल्लीचें तक्त फोडलें या गोष्टीच्या महत्त्वाकडे वळूं. पानिपतच्या लढाईमध्यें कोणाचा पराभव झाला असें हल्लींच्या इंग्रजी शाळेंतील मास्तरानें विचारलें म्हणजे 'मराठ्यांचा पराभव झाला' असें उत्तर देण्याविषयीं मुलांना शिकविलेलें असतें. परंतु ह्या प्रश्नाचें उत्तर इंग्रजीच्या अमदानींतील पवध्या हयत्तेकरितां लिहिलेल्या महाराष्ट्र देशाच्या इतिहासातील उत्तरापेक्षां जरा जास्त बिकट आहे. पानिपतच्या लढाईमध्यें मराठ्यांचें पुष्कळ सैन्य मारलें गेलें हें खरें; परंतु एवढ्यावरून अबदालीचा जय झाला आणि मराठ्यांचा पराजय झाला हें म्हणणें बरोबर होणार नाहीं. मुख्य सेनापति मरणें किंवा पुष्कळ सैन्य मरणें एवढ्याचवरून जयापजयाची कल्पना ठरविणें रास्त नाहीं. या गोष्टीचा विचार करतांना पुढें घडून आलेल्या परिणामांकडेही लक्ष दिलें पाहिजे. पानिपतच्या लढाईंत मराठ्यांचा मोड झाला असला तर अबदालीचाही मोड झाला आहे असें म्हणण्यास कांहीं हरकत नाहीं. कारण, त्यानंतर मुसलमानांची हिंदुस्थानावर काबूलच्या दिशेनें दुसरी स्वारी झाली नाहीं. महंमद गिझनी, तैमूरलंग, नादीरशहा ह्यांच्या मालिकेंतील अबदाली हाच शेवटचा मणि झाला. ही माळ येथेंच कोणीं तोडिली? ह्या स्वाऱ्या येथेंच कोणीं बंद केल्या? हा सर्व पानिपतच्या मोहिमेचाच परिणाम आहे. पुढें

महादजी शिंद्यांना दिल्लीच्या दरबारांत आपला विशेष जोर बसवितां आला, ह्याला मूळ कारण काय? उत्तर हिंदुस्थानांत मुसलमानांचें वर्चस्व बहुतेक कमी होऊन लोक इंग्रजी जाटेखालीं बुडून जाईपर्यंत जो स्वातंत्र्याचा थोडा-बहुत अनुभव घेत होते, तो कशाचा प्रभाव? ह्या सर्व गोष्टी जर पानिपतच्या मोहिमेपासून झाल्या आहेत, तर त्या मोहिमेमध्यें, निदान त्या मोहिमेपासून मुसलमान लोकांचा पाडाव झाला, असें म्हणण्याला काय हरकत आहे? पानिपतच्या लढाईपासून मराठ्यांच्या राज्याला धक्का बसला, हें खरें, पण ह्या लढाईमुळें मुसलमानी राज्याला धक्का बसला नाहीं असेंही नाहीं. अशा रीतीनें ह्या लढाईनंतर तर मुसलमानांचा कमजोरपणा झालाच, पण त्याच्या आधींही हिंदुस्थानांतील मुसलमानी राज्याला पूर्णपणें उतरती कळा लागलेली होती. आणि ही गोष्ट भाऊसाहेबांनीं एका कृत्यानें सर्व जगाच्या दृष्टोत्पत्तीस स्पष्टपणें आणून दिली होती. दिल्लीचें तक्त फोडणें ही गोष्ट लहानसहान नव्हती. त्यामध्यें एक प्रकारचा पुष्कळ राजकीय अर्थ होता. भाऊसाहेबांनीं हें दिल्लीचें तक्त फोडलें नव्हे, तर हिंदुस्थानच्या गुलामगिरीचें डोकेंच फोडलें. गुलामगिरीचीं जोखडें हिंदुस्थानांतील सर्व लोकांच्या माना दाबून टाकण्याकरितां येथूनच तयार करून बाहेर पाठविलीं जात असत. बंगाल, बहार, ओरिसा, अयोध्या, लाहोर, सिंध, गुजराथ, नागपूर, विजापूर, गोवळकोंडा आणि दौलताबाद या सर्व ठिकाणच्या हिंदु प्रजेला जखडून टाकण्यासाठीं गुलामगिरीच्या शृंखला येथेंच घडविल्या जात होत्या. अखंड भरतखंडांतील लोकांच्या अंतःकरणाला चावून चावून त्यांना रात्रीचीही झोंप येऊं न देणारे गुलामगिरीचे साप आणि विंचू याच वारुळांतून बाहेर पडत होते. सर्व तरतरीत लोकांच्या उमेदी आणि महत्त्वाकांक्षी मनुष्यांच्या आशा करपवून टाकणाऱ्या गुलामगिरीच्या ज्वाळा ह्याच अग्निकुंडांतून निघून सर्व हिंदुस्थानभर सैरावैरा धांवत होत्या. आणि काश्मिरांतील हिमालयाच्या शाखा, माळव्यांतील सातपुडा आणि दक्षिणेंतील सह्याद्रि अशा मोठमोठ्या उंच पर्वतांनाहि बुडवून टाकणाऱ्या गुलामगिरीच्या प्रचंड लाटा ह्याच समुद्रापासून उसळत होत्या. त्या दिल्लीच्या तक्ताचें हें स्वरूप आपण लक्षामध्यें आणिलें म्हणजे तें फोडण्यांत भाऊसाहेबांनीं केवढी मोठी कामगिरी बजाविली, याची आपल्याला बरोबर कल्पना करितां येईल. त्या वेळीं दिल्लीच्या बादशहांचा साऱ्या हिंदुस्थानभर अतिशय वचक होता.

व अतिशय दरारा होता. बाबर, हुमायून, अकबर, जहांगीर, शहाजहान, औरंगजेब ह्या सर्व बादशहांनीं तें तक्त पवित्र करण्याकरितां आपली सर्व पुण्याई खर्च केली होती. या सर्व बादशहांचें वैभव त्या तक्तामध्यें एकवटलेलें होतें. तें तक्त म्हणजे मोंगलाई सत्तेची प्रत्यक्ष मूर्तिमंत प्रतिमाच होती असें म्हणण्यास हरकत नाहीं. दिल्लीपासून दौलताबादेपर्यंत जो अमल चालत होता तो या तक्ताचा होता. हिंदुस्थानांतील लोक हत्तीच्याप्रमाणें जुलुमाच्या पाया-खालीं चुरडले जात होते, तरी ' नाविष्णुः पृथिवीपतिः ' हें तत्त्व त्यांच्या मना-मध्यें होतेंच. त्यामुळें ते या तक्ताकडे मोठ्या आदरबुद्धीनें पाहत असत. सर्वांच्या मनांत याच्याबद्दल पूज्यबुद्धि वास करीत होती, व या तक्ताबद्दल येथून तेथून सर्व लोकांच्या मनामध्यें एक प्रकारचा भीतिमिश्रित सन्मान वागत होता. या तक्तावर सोन्याच्या मुलाम्याचे थर चढविण्याकरितां हजारों लोक निमूटपणें जुलमी करांच्या खालतीं वांकत होते. या तक्तावर हिरे आणि माणकें चढविण्यासाठीं कैक श्रीमंत लोक गरीब होत होते; कैक हिंदु देवळांचे जवाहीरखाने उघडे पडत होते; आणि कित्येक रजपूत राजांच्या स्त्रिया आपल्या नैसर्गिक लावण्यांतच संतोष मानून स्वस्थ बसल्या होत्या. ह्या तक्तापुढें शेंकडों मांडलिक राजे आपले करभार आणून ओतीत असत. आणि शेंकडों लढाईंत जिंकलेले कैदी हात जोडून उभे राहत असत. ह्या तक्तापुढें कित्येकांनीं सलाम केले असतील, कित्येकांनीं नाकें घांसलीं असतील, आणि कित्येकांनीं साष्टांग नमस्कार घातले असतील. ह्या तक्तापुढें मेवाडचे राणे, उदेपूरचे टाकूर, बंगालचे सुभेदार आणि दक्षिणेचे राजे लवून रोज मुजरा करीत होते. ह्या तक्तापुढें तंग विजारी घातल्या असल्यामुळें नीट बसतां येत नसलेले इंग्लिशांचे वकील आपण अगदीं सुखानें बसलों आहों, असें आपल्या बाह्यात्कारी हंसतमुख चेहऱ्यानें सभोंवतालच्या मुसलमानांना दाखवीत होते. ' हें तक्त मोडो ' म्हणून दक्षिणे-तील पाणीदार मराठ्यांमध्यें कोणी शिव्याशाप देत असले तर असोत, बाकी हिंदुस्थानभर ' हें तक्त सलामत राहो, ' म्हणून सर्व लोकांच्या तोंडून प्रार्थना निघत होत्या. ह्या तक्ताच्या पुढें हिंदुस्थानांतीलचशा काय, पण इंग्लंड, पोर्तुगाल, हॉलंड, इराण, अफगाणिस्थान, कॉन्स्टँटिनोपल इत्यादि दूरदूरच्या देशांतूनही आलेल्या नजराण्यांच्या राशी पडत असत. असा ह्या तक्ताचा महिमा होता. पण एवढा मोटा महिमाही आपण आपल्या बाहुबलानें त्याला

नेऊं व आपला देश स्वतंत्र करूं, अशी महत्त्वाकांक्षा दक्षिणेंतील मराठे वीरांच्या मनामध्यें उड्या मारीत होती, व ती सदाशिवरावभाऊंनीं शेवटास नेली. सदाशिवरावभाऊंचे पूर्वज म्हटले म्हणजे कोंकणांत समुद्रकांठीं एका खेडे-गांवांत राहणारे गृहस्थ. देवाच्या मनांत नसतें तर विश्वनाथभटाचीं मुलें श्रीवर्धनच्या वाळवंटामध्यें नाचतबागडतच पडलीं असतीं. तीं फार उंच चढलीं असतीं, तर एखाद्या माडाच्या झाडावर चढलीं असतीं, सिंहासनावर चढलीं नसतीं. त्यांनीं फार मजल मारली असती व आपल्या पंचक्रोशींतील अगदीं शेवटच्या गांवांला ते गेले असते, पण अटकेपर्यंत गेले नसते; व त्यांनीं फार फार जिंकलें असतें, तर एखादा माऊंचंदकीचा वाद जिंकला असता, हिंदुस्थान देश जिंकला नसता. श्रीवर्धनच्या नारळीच्या बागांतून आणि समुद्र-किनाऱ्यावरील वाळवंटावरून त्या वेळीं इतर मुलें जशीं नाचतबागडत होतीं, त्याचप्रमाणें बाजी, चिमाजी, रघुनाथ, विश्वास आणि सदाशिव हीं मुलेंही त्यांच्याचबरोबर कदाचित् नाचतबागडत राहिली असतीं. परंतु परमेश्वराची इच्छा कांहीं निराळीच होती. त्याच्या मनांतून ह्या माडावर चढणाऱ्या मुलांना राज्यपदावर चढवावयाचें होतें. त्याच्या मनांतून श्रीवर्धनच्या किनाऱ्यावर या डोंगरापासून त्या डोंगरापर्यंत वाऱ्याप्रमाणें भटकत फिरणाऱ्या या मुलांना त्यांच्या हातांत विजयश्रीचे भगवे झेंडे देऊन साऱ्या हिंदुस्थानभर फिरवावयाचें होतें. त्याच्या मनांतून श्रीवर्धन हें नांव अन्वर्थक करावयाचें होतें. कारण, त्यानें येथील हीं मुलें हातीं धरून साऱ्या हिंदुस्थानच्या विजयश्रीचें वर्धन केलें. सदाशिवरावभाऊही कोंकणांत राहून हल्लीं जसें कित्येक लोक करूं शकतात, त्याप्रमाणें फार तर माडावरील ताजा नारळ बुक्कीनें फोडूं शकला असता; पण सदाशिवरावभाऊंचा जन्म त्याकरितां नव्हता. त्यांचा जन्म जुनें बादशाही तक्त बुक्कीनें फोडण्याकरितां होता, व तें कृत्य सदाशिवरावभाऊंनीं केलें. बादशाही तक्ताचा मोठेपणा आणि सदाशिवरावभाऊंच्या पूर्ववृत्ताचा कोंकणीपणा हीं वर लिहिलेल्या रीतीनें आपल्या डोळ्यांपुढें आपण मांडलीं असतां सदाशिवराव-भाऊंनीं केवढें प्रचंड, अघटित आणि अलौकिक कृत्य केलें, याची आपल्याला बरोबर कल्पना येईल. बाकीच्या लोकांचे डोळे बादशाही वैभवानें दिपून गेलेले होते, पण सदाशिवरावभाऊंची दृष्टि साफ होती. सदाशिवरावभाऊंना पक्कें माहीत होतें कीं, बादशाही तक्त कसलेंही केलेलें असो, पण त्याला कोणी फोडणारा

भेटला कीं तें फुटलेंच पाहिजे व त्याप्रमाणें जें तक्त सहासात शतकेंपर्यंत अभेद्य झालें होतें, त्याला अखेरीस सदाशिवरावभाऊ हा फोडणारा भेटला. आणि त्याबरोबर तें फुटलें. तक्त कसलेंही केलेलें असलें, तरी लोखंडाचा घण ही अशी कांहीं एक अजब चीज परमेश्वरानें ह्या जगामध्यें निर्माण करून ठेविली आहे कीं, त्याच्याखालीं सर्व प्रकारच्या धातूंचे तुकडेच झाले पाहिजेत. लोखंडाचे घण सोन्याचीं आणि हिऱ्यांचींही तक्तें फोडूं शकतात यांत कांहीं शंका नाहीं. आणि असले घणही नेहमीं तयारच असतात. ते घण उचलणारीं मनगटें मात्र पाहिजेत. तीं असलीं म्हणजे कोणतेंही तक्त असलें तरी तें फुटलेंच पाहिजे. बलाढ्य, सत्वशील, सत्ययुक्त आणि न्यायोपबृंहित अशा मनगटानें उचललेल्या घणाखालीं निष्कारण मारलेल्या लोकांच्या रक्तानें लाल झालेल्या, गांजलेल्या शिव्याशापरूपी धरणीकंपाच्या धक्यांनीं डळमळूं लागलेल्या, अनन्वित जुलूम, अन्यायांचे कर, प्रजेचा असंतोष, राजवल्लभांचीं दुर्व्यसनें, फंदफितुरी आणि बंडाळ्या ह्या अनेक भुंग्यांनीं आंतून पोखरलेल्या तक्ताचे तुकडे तुकडेच झाले पाहिजेत. ही गोष्ट भाऊसाहेबांच्या मनामध्यें येऊन चुकलेली होती. इतर लोकांना जरी ह्या तक्ताचा मोठा धाक वाटत होता, तरी बादशाही जुलमामुळें त्याला आधींच भेगा गेलेल्या भाऊसाहेबांच्या डोळ्याला दिसत होत्या. तें तक्त बादशाही अन्यायानें आधींच फोडून ठेविलें होतें. भाऊसाहेबांनीं नंतर घण उचलिला. दक्षिणेंतील श्रीवर्धनच्या समुद्रकांठचा एक मुलगा उत्तर हिंदुस्थानांतील यमुनेच्या कांठच्या दिल्लीच्या किल्ल्यांत जाऊन आपल्या देशाच्या स्वतंत्रतेसाठीं हातावर शिर घेऊन निघालेल्या लोकांच्या पोटाला अन्न देण्याकरितां सहासात शतकांच्या संचित केलेल्या वैभवानें उभारलेलें तक्त फोडण्याकरितां आपल्या आजानुलंबी पवित्र हातांमध्यें घण घेऊन उभा राहिलेला आहे ही कल्पना, हा प्रसंग, हें चित्र, हें संविधानक किती आल्हादजनक, किती स्वदेशप्रीतिजनक आणि किती रोमहर्षक आहे, ह्याची प्रतीति आज आपल्याला केवळ कल्पनासृष्टीमध्येंच करून घेतली पाहिजे. ज्यांनीं अशा स्थितीमध्यें सदाशिवरावभाऊंना प्रत्यक्ष पाहिलें असेल त्यांचे डोळे धन्य! ज्यांनीं बाहुवीर्याची परमावधि पाहिली! आणि स्वातंत्र्यप्रीतीची पराकाष्ठा अनुभविली!

नेऊं व आपला देश स्वतंत्र करूं, अशी महत्त्वाकांक्षा दक्षिणेतील मराठे वीरांच्या मनामध्ये उड्या मारीत होती, व ती सदाशिवरावभाऊंनीं शेवटास नेली. सदाशिवरावभाऊंचे पूर्वज म्हटले म्हणजे कोंकणांत समुद्रकांठीं एका खेडे-गांवांत राहणारे गृहस्थ. देवाच्या मनांत नसतें तर विश्वनाथभटाचीं मुलें श्रीवर्धनच्या वाळवंटामध्यें नाचतबागडतच पडलीं असतीं. तीं फार उंच चढलीं असतीं, तर एखाद्या माडाच्या झाडावर चढलीं असतीं, सिंहासनावर चढलीं नसतीं. त्यांनीं फार मजल मारली असती व आपल्या पंचक्रोशींतील अगदीं शेवटच्या गांवांला ते गेले असते, पण अटकेपर्यंत गेले नसते; व त्यांनीं फार फार जिंकलें असतें, तर एखादा भाऊबंदकीचा वाद जिंकला असता, हिंदुस्थान देश जिंकला नसता. श्रीवर्धनच्या नारळीच्या बागांतून आणि समुद्र-किनाऱ्यावरील वाळवंटावरून त्या वेळीं इतर मुलें जशीं नाचतबागडत होतीं, त्याचप्रमाणें बाजी, चिमाजी, रघुनाथ, विश्वास आणि सदाशिव हीं मुलेंही त्यांच्याचबरोबर कदाचित् नाचतबागडत राहिलीं असतीं. परंतु परमेश्वराची इच्छा कांहीं निराळीच होती. त्याच्या मनांतून ह्या माडावर चढणाऱ्या मुलांना राज्यपदावर चढवावयाचें होतें. त्याच्या मनांतून श्रीवर्धनच्या किनाऱ्यावर या डोंगरापासून त्या डोंगरापर्यंत वाऱ्याप्रमाणें भटकत फिरणाऱ्या या मुलांना त्यांच्या हातांत विजयश्रीचे भगवे झेंडे देऊन साऱ्या हिंदुस्थानभर फिरवावयाचें होतें. त्याच्या मनांतून श्रीवर्धन हें नांव अन्वर्थक करावयाचें होतें. कारण, त्यानें येथील हीं मुलें हातीं धरून साऱ्या हिंदुस्थानच्या विजयश्रीचें वर्धन केलें. सदाशिवरावभाऊही कोंकणांत राहून हल्लीं जसें कित्येक लोक करूं शकतात, त्याप्रमाणें फार तर माडावरील ताजा नारळ बुक्कीनें फोडूं शकला असता; पण सदाशिवरावभाऊंचा जन्म त्याकरितां नव्हता. त्यांचा जन्म जुनें बादशाही तक्त बुक्कीनें फोडण्याकरितां होता, व तें कृत्य सदाशिवरावभाऊंनीं केलें. बादशाही तक्ताचा मोठेपणा आणि सदाशिवरावभाऊंच्या पूर्ववृत्ताचा कोंकणीपणा हीं वर लिहिलेल्या रीतीनें आपल्या डोळ्यांपुढें आपण मांडलीं असतां सदाशिवराव-भाऊंनीं केवढें प्रचंड, अघटित आणि अलौकिक कृत्य केलें, याची आपल्याला बरोबर कल्पना येईल. बाकीच्या लोकांचे डोळे बादशाही वैभवानें दिपून गेलेले होते, पण सदाशिवरावभाऊंची दृष्टि साफ होती. सदाशिवरावभाऊंना पक्कें माहीत होतें कीं, बादशाही तक्त कसलेंही केलेलें असो, पण त्याला कोणी फोडणारा

मेटला कीं तें फुटलेंच पाहिजे व त्याप्रमाणें जें तक्त सहासात शतकेंपर्यंत अभेद्य झालें होतें, त्याला अखेरीस सदाशिवरावभाऊ हा फोडणारा भेटला. आणि त्याबरोबर तें फुटलें. तक्त कसलेंही केलेलें असलें, तरी लोखंडाचा घण ही अशी कांहीं एक अजब चीज परमेश्वरानें ह्या जगामध्यें निर्माण करून टेविली आहे कीं, त्याच्याखालीं सर्व प्रकारच्या धातूंचे तुकडेच झाले पाहिजेत. लोखंडाचे घण सोन्याचीं आणि हिऱ्यांचींही तक्तें फोडूं शकतात यांत कांहीं शंका नाहीं. आणि असले घणही नेहमीं तयारच असतात. ते घण उचलणारीं मनगटें मात्र पाहिजेत. तीं असलीं म्हणजे कोणतेंही तक्त असलें तरी तें फुटलेंच पाहिजे. बलाढ्य, सत्वशील, सत्ययुक्त आणि न्यायोपबृंहित अशा मनगटानें उचललेल्या घणाखालीं निष्कारण मारलेल्या लोकांच्या रक्तानें लाल झालेल्या, गांजलेल्या शिव्याशापरूपी धरणीकंपाच्या धक्क्यांनीं डळमळूं लागलेल्या, अनन्वित जुलूम, अन्यायांचे कर, प्रजेचा असंतोष, राजवल्लभांचीं दुर्व्यसनें, फंदफितुरी आणि बंडाळ्या ह्या अनेक भुंग्यांनीं आंतून पोखरलेल्या तक्ताचे तुकडे तुकडेच झाले पाहिजेत. ही गोष्ट भाऊसाहेबांच्या मनामध्यें येऊन चुकलेली होती. इतर लोकांना जरी ह्या तक्ताचा मोठा बाऊ वाटत होता, तरी बादशाही जुलुमामुळें त्याला आधींच भेगा गेलेल्या भाऊसाहेबांच्या डोळ्याला दिसत होत्या. तें तक्त बादशाही अन्यायानें आधींच फोडून टेविलें होतें. भाऊसाहेबांनीं नंतर घण उचलिला. दक्षिणेंतील श्रीवर्धनच्या समुद्रकांठचा एक मुलगा उत्तर हिंदुस्थानांतील यमुनेच्या कांठच्या दिल्लीच्या किल्ल्यांत जाऊन आपल्या देशाच्या स्वतंत्रतेसाठीं हातावर शिर घेऊन निघालेल्या लोकांच्या पोटाला अन्न देण्याकरितां सहासात शतकांच्या संचित केलेल्या वैभवानें उभारलेलें तक्त फोडण्याकरितां आपल्या आजानुलंबी पवित्र हातांमध्यें घण घेऊन उभा राहिलेला आहे ही कल्पना, हा प्रसंग, हें चित्र, हें संविधानक किती आल्हादजनक, किती स्वदेशप्रीतिजनक आणि किती रोमहर्षक आहे, ह्याची प्रतीति आज आपल्याला केवळ कल्पनासृष्टीमध्येंच करून घेतली पाहिजे. ज्यांनीं अशा स्थितीमध्यें सदाशिवरावभाऊंना प्रत्यक्ष पाहिलें असेल त्यांचे डोळे धन्य! त्यांनीं बाहुवीर्याची परमावधि पाहिली! आणि स्वातंत्र्यप्रीतीची पराकाष्ठा अनुभविली!

बादशाही तक्त भाऊसाहेबांच्या डोळ्यांसमोर होतें. शहाजहान, औरंगजेब, बहादुरशहा, अहमदशहा वगैरे बादशहा ज्या तक्तावर बसून सर्व हिंदुस्थानचें राज्य हांकीत होते, तें तक्त रिकामें झालेलें भाऊसाहेबांच्यापुढें होतें, व त्या तक्तावर बसून आपण बादशहा व्हावें अशी इच्छा भाऊसाहेबांच्या मनांत आली असती, तर त्यांचा हात धरायला त्या वेळीं कोण समर्थ होता? कोणी नव्हता. तरी पण आपण त्या तक्तावर बसावें आणि आपण आतां हिंदुस्थानचे बादशहा झालों आहों, अशी चोहोंकडे द्वाही फिरवावी, ही कल्पना भाऊसाहेबांच्या मनाला शिवलीसुद्धां नाहीं. ज्या तक्तावर बसण्याकरितां शेंकडों बादशहा धडपडत होते, धडपडत आहेत, आणि धडपडत राहतील, तें तक्त फोडण्यांतच भाऊसाहेबांना जास्त कृतकृत्यता वाटली ह्यांतच त्यांच्या अंगचा थोरपणा दिसून येत आहे. असल्या तक्तांवर बसेल कोणीही. पण जो तीं फोडतो तो त्यावर बसणारांच्याही मानेवर बसण्याच्या योग्यतेचा असला पाहिजे. रामानें समुद्रावर सेतू बांधिला म्हणून कित्येकांना मोठी शिफारस वाटत होती. परंतु एका आचमनामध्यें सर्व समुद्राचें पाणी पिऊन टाकणाऱ्या कुंभोद्भव ऋषीची गांठ पडल्याबरोबर ती सर्व फुशारकी फिकी पडली. तद्वत् या दिल्लीच्या तक्तावर बसलेल्या बादशहांना आपण फार मोठे म्हणून अतिशय धन्यता वाटत होती. पण तें तक्त फोडणारा निघाला, तेव्हा त्या सर्व धन्यतेचें पाणी होऊन गेलें असलें पाहिजे. आणि त्याप्रमाणें क्षारोदक समुद्र अगस्त्यमूत्रमय मानला गेल्यामुळें तो रामाला असर्दनीय झाला, त्याचप्रमाणें सदाशिवरावभाऊंच्या घणानें छिन्नविछिन्न केलेलें आणि फोडून टाकलेलें तें तक्त त्यांच्या मागून येणाऱ्या राजांना, जर त्यांच्यांत कांहीं मानीपणा असेल तर, केवळ अनुपभोग्यच झालेलें आहे. अशा रीतीचें अचाट कृत्य सदाशिवरावभाऊंनीं आपल्या इतिहासामध्यें करून ठेविलें आहे. असलीं कृत्यें फार मनन करण्यासारखीं असतात. असल्या कृत्यांत उदार मनोवृत्ती एकसारख्या उचंबळत असतात. सत्त्वगुण, शौर्य, स्वातंत्र्यप्रीति, स्वदेशभक्ति, आत्मोन्नति इत्यादि अनेक गुण असल्या कृत्यांच्या पोटामध्यें सदोदित वास करीत असतात. ज्यांनीं असलीं उत्तम आचरणें केलीं ते स्वार्थीनें स्वर्गलोकालाच गेले असले पाहिजेत.

---

# काउंट टॉलस्टॉय यांची हिंदुस्थानांतील समाज-सुधारकांना एक सूचना : : : १३

काळ : अग्रलेख ता. ११।१०।१९०१

काउंट लिओ टॉलस्टॉय हे रशियांतील हल्लींचे प्रसिद्ध समाजसुधारक आहेत; परंतु ह्यांस आपल्या इकडील शब्दांच्या अर्थाप्रमाणें सामाजिक सुधारक म्हणण्यापेक्षां राजकीय सुधारक म्हणणेंच जास्त बरोबर होईल. ते तिकडील मोठे सुधारक असल्यामुळें त्यांच्याशीं आपण पत्रव्यवहार करावा आणि त्यांचीं हिंदुस्थानांतील सुधारणेबद्दल काय मतें आहेत तीं समजून घ्यावीं, अशा इच्छेनें इकडील कोणी एका कागदी सुधारकानें त्यांस पत्र लिहिलें होतें. त्या पत्राचें उत्तर मद्रासेकडील एका मासिकांत व मुंबईच्या एका साप्ताहिकांत प्रसिद्ध झालेलें आहे. काउंट टॉलस्टॉय यांना आपल्या इकडील सामाजिक स्थिति फारशी चांगली माहीत नसल्यामुळें त्यांचें उत्तर बहुतेक बाबतींत बेताबाताच्याच महत्त्वाचें आहे. सोशिआलिझमच्या तत्त्वांना अनुसरून त्यांनीं आपल्या उत्तरांतील कांहीं भाग लिहिला आहे. तरी पण आपली हिंदुस्थानची समाजस्थिति सुधारण्याला त्यांनीं ज्या कित्येक गोष्टी सांगितल्या आहेत, त्यांमध्यें पुढील एक अतिशय महत्त्वाची गोष्ट आहे. हिंदुस्थानांत अशी एक घातक चाल आहे कीं, तेथील एक रहिवासी (शिपाई बनून) दुसऱ्या रहिवाश्याचा प्राण घेण्याला तयार होतो, ह्या गोष्टीबद्दल हिंदुस्थानांतील लोकांना जोंपर्यंत कांहीं वाटत नाहीं, तोंपर्यंत हिंदुस्थान देश कधींहि सुधारावयाचा नाहीं. हिंदुस्थानांत अनेक वाईट चाली आहेत. त्यांपैकीं कित्येक

वेदानें ( सुधारकांच्या मताप्रमाणें ) आणलेल्या असतील, कित्येक स्मृतींनीं आणलेल्या असतील, आणि बहुतेक पुराणांनीं आणि महात्म्यांनीं आणलेल्या असतील; व या सगळ्या वाईट चालीरीती मोडून टाकण्यासाठीं चांगल्या रीतिरिवाजांचे पुतळे, इंग्लिश लोक, हिंदुस्थानामध्यें अवतीर्ण झालेले आहेत. जे सतीपासून तों तहत मद्यपानापर्यंत आमच्यांतील झाडून सर्व वाईट रीति मोडून टाकण्यासाठीं येथें अवतीर्ण झाले आहेत, त्या इंग्लिशांनीं आमच्यामध्यें एखादी वाईट रीत आणून सोडली असेल असें कोणाच्या स्वप्नींही आलें नसेल; व असें कोणीं सांगितलें तर तें ऐकणारास खरेंदेखील वाटावयाचें नाहीं. पण वस्तुस्थिति अशी आहे खरी. एकाच देशांतील रहिवाशांपैकीं एकानें शिपाई होऊन दुसऱ्याचा जीव घेण्याला कंबर बांधावी, यासारखी दुसरी वाईट चाल असणें शक्य नाहीं. पण ही चाल हिंदुस्थानांत कोणीं रूढ केली? आपल्या भावाच्या रक्ताच्या चिळकांड्या मारण्याची चटक हिंदुस्थानांतील लोकांना कोणीं लाविली? सती जाणारी बिचारी स्त्री आपल्या धर्मावर आणि आपल्या परमेश्वरावर विश्वास ठेवून दुसऱ्यासाठीं आपला प्राण देत असे. ती दुसऱ्याचे प्राण घेत नसे. ती काउंट टॉलस्टॉय म्हणतात त्याप्रमाणें हिंदुस्थानांतील शिपायांसारखी दुसऱ्यांचे प्राण खात्रीनें घेत नसे. तिच्या हातांत पातिव्रत्याची आणि स्वधर्माची पताका असे. तिचे हात परकीय अमलाच्या निशाणानें खात्रीनें भ्रष्ट झालेले नसत. ती सद्गुणाच्या आणि सद्धर्माच्या मार्गानें चालत जात असे. ती आपल्या देशबांधवांच्या जखमी आणि मृत शरीरांनीं समाकीर्ण झालेल्या मार्गावरून चालत जात नसे. ती आपल्या नवऱ्याच्या पर्यंकरूपी चितेवर चढून आपल्या शरीराला अग्नि लावून घेत असे. ती आपल्या देशमातेच्या चितारूप पर्यंकावर चढून आपल्या सौख्यमंदिरावर खात्रीनें कधींही निखारा ठेवीत नव्हती. पण प्रभुसत्तेनें दिवस असे उलटे आले कीं, अशी जी सती जाणारी माउली ती मात्र वाईट ठरली. तिची रीत तेवढी अघोर म्हणून मानण्यांत येऊं लागली आणि ती चाल मात्र बंद पडली. काउंट टॉलस्टॉय ह्यांनीं ज्या वाईट चालीचें दिग्दर्शन केलें आहे, ती चाल आमच्या हिंदुस्थानांत प्रथमतः मुसलमानांनीं आणिली. जोंपर्यंत हिंदुस्थान हिंदुस्थानांतील लोकांकरितांच होतें, जोंपर्यंत हिंदुस्थानावर हिंदुस्थानांतीलच राजे राज्य करीत होते, आणि जोंपर्यंत त्या राजांच्या सदय न्यायीपणामुळें

हिंदुस्थानांतील लोक भाकरीसाठीं वाटेल ती चाकरी पत्करण्याइतके बुभुक्षित झालेले नव्हते, तोंपर्यंत हिंदुस्थानामध्येंदेखील सतीहूनही हजारों पटीनीं भयंकर अशी ही चाल नव्हती. जोंपर्यंत हिंदुस्थानांत स्वराज्य होतें, व जोपर्यंत हिंदुस्थानांतील लोक स्वतंत्र होते, तोंपर्यंत हिंदुस्थानाला हा दुर्गुण माहीत नव्हता. परंतु हिंदुस्थानावर दुर्दैवाच्या वक्रदृष्टीमुळें दहाव्या शतकापासून मुसलमानांचा अंमल आला आणि त्या अमलाबरोबरच ह्या दुर्गुणाचाही अंमल आमच्यावर बसला. गिझनीचा महंमद, महंमद घोरी, महंमद तघलख वगैरे पहिल्या पहिल्या नवशिक्या स्वारी करणारांच्या वेळेला हा दुर्गुण आमच्यांत फारसा बळावलेला नव्हता. परंतु पुढें मुसलमानांमध्यें अकबर हा चांगला बादशहा झाला. अकबर बादशहाला पूर्वींचे लोक चांगला म्हणत असत किंवा नाहीं कोण जाणें; परंतु हल्लीं त्याला चांगला म्हणण्याची वहिवाट पडून गेलेली आहे. परकीय राजांना कोणत्या कृत्याबद्दल चांगलें म्हणावयाचें आणि कोणत्या कृत्याबद्दल वाईट म्हणावयाचें हा एक अत्यंत महत्त्वाचा, तरी पण फार बिकट, असा प्रश्न आहे. त्याचें विवेचन करण्याचें हें स्थल नव्हे. तरी पण लोकप्रवाद असा आहे कीं, अकबर हा एक चांगला बादशहा होऊन गेला. पण याचा चांगलेपणा म्हणजे काय ! ह्यानें आमचें काय चांगलें केलें ! याच्या कोणत्या चांगलेपणाबद्दल आपण त्याचें अभिनंदन करीत आहों ! ऐतिहासिक गोष्टींकडे खऱ्या दृष्टीनें पाहाण्याचे कामांत, इतिहासाच्या हिरेबाजारांत हिरे कोणते आणि गारगोट्या कोणत्या हें ओळखण्याच्या कामांत, पुष्कळ लोक फार अनभिज्ञ असतात. लहान मुलांना वाद्यांची फार गोडी असते. वाद्यांचे आवाज ऐकिले म्हणजे त्यांना अत्यंत आनंद होतो. एकदां असें झालें कीं, शत्रूकडील रणवाद्यें वाजण्याला सुरवात होऊन त्यांचा आवाज एका लहान मुलाच्या कानीं पडला. तेव्हां तो आवाज ऐकून तो मुलगा आनंदानें नाचूं लागला. त्या वेळीं त्याची आई जवळ होती. तिनें आपल्यावर लौकरच गुदरणारा प्रसंग लक्षांत आणिला आणि अश्रु डोळ्यांत आणून आपल्या मुलाला सांगितलें कीं, 'बाळा, हीं वाद्यें तुला आनंदित करण्याकरितां वाजत नाहींत; तर तुला, मला आणि सगळ्यांना जिंकून बंदिवान करण्याकरितां वाजत आहेत.' ह्या गोष्टींतील मुलाला त्या वाद्यांचा जितका अर्थ समजत होता, तितकाच आपल्याला पुष्कळ वेळां इतिहासांतील कित्येक गोष्टींचा समजत असतो. अकबर चांगला कां ! त्यानें

आपलें चांगलें काय केलें ? अकबराला चांगला म्हणणारांपाशीं या प्रश्नांचीं उत्तरेंही आहेत. ते म्हणतात कीं, अकबरानें आपल्या सैन्यांतील मोठमोठ्या हुद्याच्या जागा हिंदु लोकांना दिल्या होत्या म्हणून तो चांगला. आतां या उत्तराचें पृथक्करण करून त्याचा काय अर्थ होतो याचा आपण थोडासा विचार करूं. अकबर हा परकीय मुसलमान राजा होता. राज्य त्याचें होतें, जिंकलेले लोक आणि मुलूख त्यांच्या ताब्यांत होते, व त्यापुढें जिंकले जाणारे लोक आणि मुलूख हेही त्या परकीय मुसलमान राजाच्या ताब्यामध्येंच यावयाचे होते. अशा स्थितींत अकबराच्या सैन्यांतील मोठ्या जागा हिंदूंना मिळाल्या तर त्यांत चांगलें तें काय ? महंमदखानाला जो पगार मिळाला असता तो जसवंतसिंगाला मिळाला असेल. पण राष्ट्राच्या दृष्टीनें या गोष्टीचें महत्त्व तें काय ? व्यक्तींचा फायदा झाला असेल, पण राष्ट्राचा फायदा काय झाला ? एकाद्या सैन्यावर मानसिंग नेमला जावो, किंवा कानसिंग नेमला जावो, तो कोणी असला, तरी करतो काय ? तो काय करणार ? हिंदुस्थानांतील एक रहिवासी इतर रहिवाशांना मारणार किंवा त्यांच्या माना दुसऱ्यांच्या जोखडाखालीं नेऊन अडकविणार, ह्याच्यापेक्षां दुसरें तो काय करणार ? जेव्हां जेव्हां जसवंतसिंग अकबरासाठीं अतिशय मोठे विजय मिळवीत होता, तेव्हां तेव्हां तो आपल्या जन्मभूमीच्या पोटामध्यें आपली कट्यार अतिशय खोल खुपशीत होता, असा त्याचा अर्थ होत नाहीं काय ? अशा रीतीनें ज्यानें आमच्याच लोकांकडून आमच्या लोकांच्या माना मुरगळल्या, ज्यानें आमच्याच लोकांकडून आमचा देश आपल्या ताब्यांत आणून घेतला आणि ज्यानें आमच्याच लोकांकडून आमच्या लोकांच्या संपत्तीचें हरण केलें त्याला आम्हीं चांगले म्हणावें, यापेक्षां जास्त दुर्दैवाची गोष्ट ती कोणती ? ह्यापेक्षां जे मुसलमानांत वाईट राजे होऊन गेले त्यांनींच आमचें एका दृष्टीनें जास्त कल्याण केलें आहे असें म्हणणें भाग पडतें. त्यांनीं निदान आम्हांला मातृद्रोही तरी बनविलें नाहीं. त्यांनीं निदान आमचे हात भ्रातृवधानें तरी रंगवून लालभडक करून सोडिले नाहींत. त्यांनीं निदान आमच्या हातून अंगावर शहारे येण्यासारखीं भयंकर पातकें तरी करविलीं नाहींत. त्यांनीं त्या वेळच्या आपल्या प्रजेला इहलोकीं पुष्कळ छळलें असेल, नाडलें असेल, गांजलें असेल, त्यांचे येथें वाटेल ते हाल झाले असतील; पण निदान परलोकीं तरी ते उजळ माथ्यानें गेले अस-

तील. जमिनीचा शेतसारा देण्याला जवळ पैसा नसल्यामुळें त्यांना येथें डोकी-वर दगड घेऊन चावडीवर उभें रहावें लागलें असेल. पण परलोकीं जातांना तरी निदान आपल्या डोक्यावर पातकांचा भार घेऊन ते गेले नाहींत. त्यांचीं अंतःकरणें आकाशाप्रमाणें निर्मळ होतीं, आणि त्यांचे हात रक्ताच्या थेंबांनीं शिडकावलेले नव्हते. त्यांना देवापुढें जाण्याची भीति किंवा शरम वाटत नव्हती. ते दुःखानें जगले असतील, पण मेले असले पाहिजेत सुखानेंच. कारण त्यांचे बादशाहा वाईट होते. मृत्युलोकांत आपल्यावर चांगला बादशाह असणें आणि परलोकाकरितां पापाची जोड तयार करून ठेवणें, ह्यापेक्षां इहलोकीं वाईट बादशाह आणि परलोकीं ममताळू यम, अशी स्थिति असलेली काय वाईट! अकबरानें चांगलें केलें ह्याचा अर्थ त्यानें आपल्या राज्याभिवृद्धीच्या दृष्टीनें आपलें स्वतःचें चांगलें केलें, पण हिंदुस्थान या राष्ट्राचें राष्ट्र या दृष्टीनें त्यानें काय चांगलें केलें! अकबराचीं दुसरीं कांहीं चांगलीं कृत्यें असतील व तीं आम्हांलाही मान्य आहेत. परंतु प्रस्तुतच्या बाबतींत त्यानें हिंदु लोकांना आपले शिपाई केले, किंवा त्या शिपायांवरील एक मुख्य शिपाई, म्हणजे सेनापति केलें, ह्यांत राष्ट्राच्या गुणसंपन्नत्वाच्या दृष्टीनें विचार करितां कांहीं एक चांगलें नाहीं, असेंच पुढें घडून आलेल्या परिणामावरून म्हणावें लागतें. ही घातुक चाल हिंदुस्थानाला माहीत नव्हती. ती मुसलमान राजांनीं हिंदु-स्थानांत पाडली. हें व्यसन हिंदुस्थानला नव्हतें. तें मुसलमान राजांनीं जडविलें. ही वाईट रीत हिंदुस्थानांतील कोणत्याही वेदांत, स्मृतींत किंवा पुराणांत नव्हती. परंतु ती परकीय अंमलाच्या रूढीनें हिंदुस्थानांतील सर्व आबालवृद्ध लोकांमध्यें रूढ करून सोडली. आपल्या समाजांतील अशास्त्र रूढीवर शस्त्र उचलणाऱ्या समाजसुधारकांनीं आपल्या शस्त्राची धार थोडीशी या रूढीकडेही वळविली तर तें केवळ अप्रासंगिक होईल असें नाहीं.

दुसऱ्याच्या हिताकरितां हिंदुस्थानांतील रहिवाशांपैकीं [ शिपाई होऊन ] दुसऱ्या रहिवाशाचा प्राण घ्यावा ह्या घातुक चालीचें बीजारोपण मुसलमानांच्या परकीय अंमलामध्यें होऊन जो रोपा वाढीस लागला त्याचा हल्लीं तर फारच मोटा अफाट वृक्ष बनला आहे. इंग्रजी कारकीर्दीमध्यें ह्या झाडांची मशागत फारच कुशलतेनें करण्यांत आली. ईस्ट इंडिया कंपनीचे जे पहिले नोकर आले, त्यांना हिंदुस्थानांत हा रोपा पाहून फार आश्चर्य वाटलें. आश्चर्य वाटण्याचें

कारण हेंच की, त्यांच्याकडे असला रोपा कोठेंही नव्हता; व असलें विलक्षण झाड कोठें उगवत असेल असेंही त्यांना कधीं वाटलें नव्हतें. त्यामुळें तर त्यांना विशेषच आश्चर्य वाटलें व या झाडाचा—या ईश्वराच्या अजब कृतीचा—पूर्ण फायदा करून घेण्याचें त्यांनीं मनांत आणिलें. याच झाडाची एक खांदी तोडून तिचा एक दांडा तयार करून जर तो आपल्या कुऱ्हाडीला बसविला तर तो आपल्या स्वतःच्या सर्व गोतांचें निसंतान करण्याला कधींही मागेंपुढें पाहणार नाहीं, अशी त्यांच्या मनाची खात्री झाली. हिंदुस्थानांतील लोक पगार देऊन आपले शिपाई केले तर ते आपल्या वाटेल त्या देशबांधवाचे गळे कापून आपल्या चरणीं सादर करण्याला मोठ्या खुशीनें तयार होतील, असें वाटून मद्रासेस आणि कलकत्त्यास लहान काळीं पलटणें तयार होऊं लागलीं. कंपनीच्या त्या वेळच्या धूर्त कामगारांनीं हिंदुस्थानांतील लोकांबद्दल आपल्या मनामध्यें बरोबर अटकळ बांधून ठेविली होती. हिंदुस्थान हा आपला देश आहे, त्या देशांतील सर्व लोक हे आपले देशबांधव आहेत, त्यांचें जें आपण अकल्याण करूं त्यांत आपलेंही अकल्याण आहे, त्यांना दुसऱ्यासाठीं मारण्यांत किंवा जिंकण्यांत आपणच आपले हात थोटे आणि पाय लुळे करून घेत आहों या कल्पना—या स्वदेशाभिमानाच्या, स्वतंत्रतेच्या आणि आत्मोन्नतीच्या कल्पना—ह्या हिंदुस्थानांतील लोकांच्या डोक्यांत बिलकूल नाहींत, हें त्या वेळच्या इंग्लिश लोकांना पूर्णपणें समजून चुकलें होतें, व त्याचा त्यांनीं पूर्णपणें फायदा घेतला. त्यांनीं जे शिपाई नोकरीला ठेविले, त्यांनीं त्यांची खऱ्या इमानेंइतबारें चाकरी केली यांत मुळींच संशय नाहीं. ह्या शिपाई बनलेल्या हिंदुस्थानांतील रहिवाश्यांनीं आपल्या धन्याची इमानें-इतबारें चाकरी केली खरी, परंतु त्यांचे धनी त्यांच्याशीं तितक्याच इमानें-इतबारें वागले किंवा नाहीं, हा मात्र मोठा प्रश्न आहे. कंपनीच्या नोकरांनीं आपल्या पलटणींतील काळ्या शिपायांच्या पगाराचा हिशेब करतांना कांहीं लबाडी केली असेल असें नाहीं. त्यांत त्यांनीं पैचीदेखील तसनस केली नसेल, याबद्दल त्यांचे हिशेब पाहिल्यावांचूनही खात्री देतां येईल. पण ह्या इमानाबद्दल सध्यांचा प्रश्न नाहीं. जे हिंदुस्थानांतील शिपाई त्या वेळच्या इंग्लिशांची इतक्या इमानेंइतबारें चाकरी करीत होते त्या शिपायांची जन्मभूमि, त्या शिपायांचे देशबांधव, त्या शिपायांचीं आवडतीं घरेंदारें आणि त्या शिपायांचे

त्या वेळीं जन्मास न आलेले नातूपणतू आणि त्या नातवापणतवांचे नातूपणतू या सगळ्यांना हळूहळू पारतंत्र्याच्या जाळ्यामध्यें गुरफटून टाकण्याचा प्रयत्न करणें, हें इमानीपणाचें होतें किंवा नाहीं, हा प्रश्न आहे. ' आम्ही पेज खाऊनही आपले प्राण कसे तरी वांचवूं, परंतु हे जे इंग्लिश शिपाई मरत आहेत त्यांना भात खावयाला द्या, ' असें आपण होऊन म्हणणाऱ्या काळ्या शिपायांच्या कित्येक वंशजांना आणि देशबांधवांना भात तर नाहींच, पण पेजेचें पाणीसुद्धां मिळूं नये इतकी त्यांच्या देशाची त्यांच्याच हातून आणि त्यांच्याच रक्तानें हळूहळू स्थिति करून सोडणें हें इमानीपणाचें काम होतें किंवा नाहीं हा प्रश्न आहे. अर्कोटच्या लढाईतील काळ्या शिपायांना आपल्या ह्या औदार्ययुक्त शब्दांचा अर्थ त्या वेळेला कळला नसला पाहिजे. त्यांना त्या वेळेला त्यांचें औदार्य हें औदार्यच वाटलें असेल, मूर्खपणा असें वाटलें नसेल; पण आतां जर ते क्षणभर जिवंत होतील आणि गेल्या दोन शतकांचें सिंहावलोकन करून जर ते आपल्या शब्दांचा अर्थ करूं लागतील तर त्यांना काय वाटेल! दुसऱ्यांना भात देऊन आपण पेज खाण्याला तयार झालों होतों ते कशासाठीं! आपण पेज कोणासाठीं खाल्ली! आणि त्यांनीं त्याजबद्दल आज आपलें काय कल्याण करून ठेविलें आहे! आपण पेज खाऊन काय बहादुरी केली! तर आपला देश आपण जिंकून दुसऱ्याच्या हवालीं केला! ह्या शिवाय दुसरा काय विचार सद्यःस्थितीचा नकाशा त्यांच्या मनांत उत्पन्न करूं शकेल! अर्कोटच्या शिपायांनो, दुसऱ्यांना भात देऊन आपण पेजेवर रहाण्याचें वळण तुम्हीं घालून दिलें आहे, त्याप्रमाणें तुमचे वंशज वागत आहेत! कारण त्यांना आजमितीला पेजेपेक्षां कांहीं जास्त क्वचितच मिळत असेल.

असो. ही हिंदुस्थानांतील रहिवाशांना शिपाई करून त्यांजकडून हिंदुस्थानांतील इतर लोकांचे प्राण घेण्याची व त्यांना जिंकण्याची जी वाईट चाल, तिला इंग्लिशांनींही आपल्या स्वार्थासाठीं पुष्कळ उत्तेजन दिलें. इंग्लिशांनीं हिंदुस्थान जिंकून घेतलें ही गोष्ट कशीही असो, परंतु सध्यां इंग्रजी अंमलापासून हिंदुस्थानाला जे कित्येक फायदे होत आहेत त्यांवरून पाहतां एका दृष्टीनें ही गोष्ट चांगली आहे असेंही म्हणतां येईल. परंतु तें हिंदुस्थान त्यांनीं हिंदुस्थानांतील लोकांकडूनच जिंकून घेतलें ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे. हिंदुस्थान देश कोणीही घेवो, पूर्वी एकदां तो हिंदुस्था-

मांतील लोकांकडेसच होता. पुढें तो मुसलमानांनीं घेतला. फिरून तो हिंदुस्थानच्या लोकांनीं बहुतेक जिंकून घेतला होता. हल्लीं तो इंग्लिशांच्या ताब्यांत आहे, व पुढें आणखीही कदाचित् फेरफार होतील. त्या गोष्टी कोणाच्या स्वाधीनच्या नाहींत. परंतु एखादा देश जिंकतांना त्या देशांतील लोकांच्या हातून अत्यंत नीच कर्में करविणें हें कोणत्याही जिंकणाराला भूषणास्पद नाहीं. आणि आपला देश आपण जिंकून दुसऱ्याच्या हवालीं करणें याहून अधिक नीच कर्म दुसरें कोणतें आहे! सोंगट्यांच्या खेळांत दैवाच्या आनुकूल्यानें हवा तसा फांसा पडून एखादी सोंगटी जर मरत असेल तर ती दुसऱ्या सोंगटीनें खुशाल मारावी, पण मरणाऱ्या सोंगटीचें लांकूड फुटून जाईल इतक्या जोरानें दुसऱ्या सोंगटीचा आघात तिच्या मस्तकावर होतां कामा नये. आणि राज्यांची उलथापालथ हाही एक सोंगट्यांचाच डाव आहे. यांत एकानें दुसऱ्याचें राज्य घ्यावें, पण ज्या गुणांवर त्यांतील मनुष्यांचें मनुष्यपण अवलंबून आहे, त्या गुणांचा विध्वंस करणें हें कधींही बरोबर होणार नाहीं. इंग्लिशांना हिंदुस्थान देश जिंकावयाचा होता तर त्यांच्यासाठीं इंग्लंडमध्यें थोडेथोडके सोजीर होते असें नाहीं. त्यांनीं ते आणून या देशाचें वाटेल तें करावयाचें होतें; परंतु हिंदुस्थानच्या लोकांकडूनच हिंदुस्थानच्या शरीरावर जखमा करविणें, हें अत्यंत निष्ठुरपणाचें काम होय. आर्यभूमि ही हिंदुस्थानांतील लोकांची आई आहे. तिच्या अब्रूचें त्यांना संरक्षण करितां आलें नाहीं तर ती गोष्ट निराळी. परंतु तिच्या मुलांच्या हातूनच तिचा देह छिन्नविछिन्न करविणें ही गोष्ट मनुष्यांच्या नीतिमत्तेला उचित नाहीं. जिंकलेल्या लोकांचें राज्य जाईल किंवा राहील, परंतु त्यांचे सद्गुण त्यांच्या अंगांत कायम राहिले पाहिजेत. परंतु दुर्दैवाची गोष्ट ही आहे कीं, सर्व सद्गुणांतील वरिष्ठ सद्गुण जो स्वदेशाभिमान त्याचा इंग्रजांच्या रियतींत पूर्णपणें विध्वंस होऊन हिंदुस्थानांतील लोक आपल्याच देशावर आणि आपल्याच देशबांधवांवर शस्त्र उचलण्याला तयार होतात, ही वाईट चाल आम्हांला लागली आहे. ती कोणीही लाविली असो, त्याचा आतां विचार करून कांहीं एक फायदा नाहीं. परंतु जसे आम्ही चोरांच्या, दारूच्या वगैरे व्यसनांपासून अलिप्त रहावें यासाठीं सरकारचे प्रयत्न चाललेले असतात, त्याचप्रमाणें या भयंकर व्यसनापासूनही आम्हांला अलिप्त ठेवण्यासाठीं सरकारनें प्रयत्न केले पाहिजेत. इतर बाबतींत त्याप्रमाणें या बाबतींतही

आम्हांला सद्गुणी करणें हें आमच्या सरकारचें कर्तव्यकर्म आहे. इंग्लंडच्या लोकांनीं फ्रान्सचे शिपाई बनून आपला इंग्लंड देश आपण जिंकून फ्रेंचांच्या हवालीं करणें ही गोष्ट जर वाईट असेल (आणि ती आहेच) तर तीच गोष्ट हिंदुस्थानासंबंधानें चांगली आहे असें निदान इंग्लिशांना तरी म्हणतां यावयाचें नाहीं. असलें कृत्य जर इंग्लंडमध्यें अत्यंत नीचपणाचें म्हणून मानलें जात असेल, तर तें हिंदुस्थानामध्येंही अत्यंत नीच म्हणूनच मानिलें गेलें पाहिजे. कारण, हिंदुस्थान जरी उष्णकटिबंधामध्यें असलें आणि इंग्लंड शीतकटिबंधामध्यें असलें, तरी तेवढ्यावरून नीतीचे नियम कोठें बदलतात असें नाहीं.

परंतु जिंकलेल्या लोकांना जिंकतेवेळींच किंवा जिंकल्यानंतर लागलेच या व्यसनांत घालण्याचा इंग्लिश लोकांचा कांहीं ठिकाणीं जणुं काय नेहमींचा परिपाठ आहे असें दिसतें. चीनदेशांत इंग्लिशांनीं कांहीं मुलूख आपल्या कबज्यांत घेतला आहे, व तेथें त्यांनीं चिनी लोकांचीं पलटणें चिनी लोकांच्या विरुद्धच लढण्याकरितां तयार करण्याचा प्रयत्न सुरू केला असल्याबद्दची बातमी मागें इंग्रजी वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालेली होती. वायव्येकडील सरहद्दीवर आफ्रिडी लोकांशीं इंग्लिशांनीं लढाई केली. त्यानंतर आफ्रिडी लोकांचीं पलटणें आफ्रिडी किंवा सरहद्दीवरील इतर लोकांशीं लढण्याकरितां तयार करून ठेविलीं आहेत. इंग्लिशांची बोअर लोकांशीं हल्लीं लढाई चालू आहे, व त्या लढाईंतील कांहीं कैदी त्यांनीं सिलोनमध्यें टेविले होते. त्यांपैकीं कांहीं लोकांची एक पलटण तयार करण्याचा इंग्लिशांचा प्रयत्न असल्याबद्दल नुकतीच बातमी छापलेली होती. ट्रान्सवालमध्यें बोअर लोक इंग्लिशांच्या आगगाड्या डायनामाइटनें वगैरे अतिशय उडवितात. हा प्रकार बंद करण्यासाठीं इंग्लिशांनीं बऱ्याच जातीची युक्ति योजिली आहे. बोअरविरुद्ध बोअर हीच त्याही युक्तींतील गुरुकिल्ली आहे. इंग्लिशापाशीं शरण आलेले बोअर लोक पुष्कळ आहेत. त्यांपैकीं कांहीं नियमित बोअर लोक प्रत्येक गाडीवर घालून न्यावयाचे असा हल्लीं क्रम सुरू केला आहे. बोअर लोक गाडी उडवतील तर त्यांबरोबर त्यांच्या देशबांधवांच्या अंगच्या चिंधड्या उडणार; धरें न उडवितील तर त्या गाडींतील इंग्लिशांचें सैन्य किंवा अन्नसामुग्री सुरक्षित जाऊन तिकडूनही लढणाऱ्या बोअर लोकांचें नुकसान होणार, अशा पेंचांत बोअर लोकांना धरून बोअर विरुद्ध बोअर या

तरयानें इंग्लिश लोक ट्रान्सवालमध्यें बोअर लोकांना जिंकण्याची खटपट करीत आहेत. सारांश, इंडियनविरुद्ध इंडियन, चिनीविरुद्ध चिनी, आफ्रिडी-विरुद्ध आफ्रिडी, बोअरविरुद्ध बोअर, ही इंग्लिशांच्या कुटिल राजनीतींतील एक ठराविक युक्ति झालेली दिसत आहे. वास्तविक पाहतां इंग्लिशांसारख्या संपन्न, नीतिमान् आणि बलाढ्य राष्ट्रानें असल्या नीच युक्तीचा अवलंब करावा अशी त्यांना आज कोणतीही आवश्यकता नाहीं. कारण, त्यांना स्वतःच्या जोरावर काय वाटेल तें करतां येण्यासारखें आहे. दुसऱ्यांचें राज्य घेण्याकरितां त्यांच्यांतील सद्गुणही घेणें त्यांना जरूर आहे असें नाहीं. पण त्यांना जी एकदां खोड लागली आहे ती कांहीं केल्यानें जातच नाहीं. दादाभाई नौरोजी, वेडरबर्न, केन, दत्त, मॅक्लिन, वगैरे सर्व इंग्लंडमध्यें हिंदुस्थानच्या वतीनें बोलणाऱ्या लोकांची हिंदुस्थानसंबंधानें नेहमीच ओरड आहे ती हीच कीं, इंग्लंडनें हिंदुस्थान देश हिंदुस्थानच्याच लोकांकडून जिंकून आपल्या हातीं घेतला आहे. कॉंग्रेसमध्येंही अनेक वक्त्यांच्या भाषणांतून याच तक्रारीचा उल्लेख झालेला आहे; आणि हिंदुस्थानचे इतिहासकारहि हाच मुद्दा आपल्या इतिहासांत नमूद करून ठेवीत आहेत. तेव्हां त्या वाईट चालीपासून आपल्या समाजाचें नैतिकदृष्ट्या (राजकीय दृष्टि बाजूला ठेवून) जें अहित होत आहे तें बंद करण्याकडे आपल्या देशांतील सुधारकांचें लक्ष लागणें फार जरूर आहे. विधवेचा विवाह न केल्यानें किंवा लहान मुलांचा विवाह केल्यानें, मुलीला वाचतां न आल्यानें किंवा तिच्या सासूनें तिला जास्त काम सांगितल्यानें, हिंदुस्थान देशाचें जितकें नुकसान होणार आहे, त्याच्यापेक्षां हजार पटीनीं अधिक नुकसान आपल्या समाजांतील लोकांमध्यें वर नमूद केलेला सद्गुण नसल्यामुळें झालेलें आहे. आपल्यांत या सद्गुणाची वाण आहे आणि आपण पिढ्यानुपिढ्या या व्यसनाला बळी पडत आहों, ही गोष्ट आपण त्यांत अगदीं मुरले गेलों असल्यामुळें आपल्या लक्षांत आली नाहीं तर त्यांत मोठेंसें आश्चर्य नाहीं. पण काउंट टॉलस्टॉयसारख्या आमची स्थिति पाहणाऱ्या स्वतंत्र तत्त्ववेत्त्यानें आपलें हें व्यसन—आपला हा सामाजिक दोष—आपली ही शास्त्रविरुद्ध रूढी—आपल्या दृष्टोत्पत्तीस आणून दिल्यानंतर जर तिचा पुढील सामाजिक परिषदेच्या कार्यक्रमपत्रिकेमध्यें विषयांच्या यादींत समावेश झाला नाहीं तर मात्र मोठें आश्चर्य आहे. पण बहुधा असें व्हावयाचें नाहीं. हा महत्त्वाचा विषय आहे, व त्याच्या-

कडे सुधारक मंडळी योग्य तेवढें लक्ष जरूर पुरवतील, अशी त्यांच्या अंतःकरणांतील देशहिताविषयींच्या उत्कट इच्छेवरून आशा करण्याला पुष्कळ जागा आहे.

---

## आम्रवृक्ष : : : : : १४

### ( एका गिरणींतील कामगाराची गोष्ट )

काळ : अग्रलेख. ता. ८।११।१९०१.

आमच्या गांवापासून दोनतीन मैलांवर एक आंब्याचें झाड होतें. हें रस्त्यापासून फार दूर नव्हतें, तरी पण रस्त्याच्या फार जवळ होतें असेंही नाहीं. त्यामुळें विचाराला अवश्य तितका एकांतपणा या ठिकाणीं सुलभ रीतीनें उत्पन्न होत असे. रस्त्यानें जाणारे वाटसरू किंवा गाड्या–घोडीं तेथून दिसत, परंतु त्यांच्या कलकलाटानें तेथील शांतता मात्र कधींही भग्न होत नसे. रस्त्यावर कितीही गडबड चालली असली तरी ती इतकी दूर असे कीं, तेथील पक्ष्यांचें मधुर गाणें ऐकण्याला तिच्यामुळें कधींच प्रतिबंध होत नसे. यामुळें ह्या आम्रवृक्षाच्या खालील ठिकाण मला फारच आवडत असे. येथें बसून सभोंवतालच्या परिस्थितीबद्दल विचार करीत मीं आपला कितीतरी वेळ घालविला आहे. येथें मी पहाटेचा बसलेलों आहें आणि संध्याकाळचा बसलेलों आहें. येथें बसून मीं दिनलक्ष्मीचा भाग्योदय आणि विनाशकाळ या दोघांचेंही अवलोकन केलेलें आहे. येथें बसून मीं तारे उगवतांना आणि मावळतांना

पाहिलेले आहेत. सकाळचा अरुणोदय हळूहळू कसा सूर्यप्रकाशाशीं एकरूप होत जातो, आणि संध्याकाळचा संधिप्रकाश क्रमाक्रमानें अंधकारसमुद्रामध्यें कसा निमग्न होतो हें मीं तेथें बसून पाहिलें आहे. प्रभातकाळीं आपल्या घरट्यांत जागें होऊन मधुर वाणीचे पक्षी ज्या भूपाळ्या गात असतात, आणि संध्याकाळीं आपल्या बाहेर गेलेल्या पिलांना बोलावण्याकरितां जीं सुस्वर, मंजुळ आणि प्रेमळ प्रेमळ गाणीं गात असतात, तीं मीं येथें बसून ऐकिलीं आहेत. त्याचप्रमाणें निरनिराळ्या ऋतुमानांतील निरनिराळ्या फेरफारांचाही मीं येथें अनुभव घेतलेला आहे. येथें बसून मीं सूर्य रागावलेला आणि एखाद्या योग्याप्रमाणें कोणी कितीही उपमर्द केले तरी ते सर्व सहन करून शांतपणें बसलेला पाहिला आहे. सूर्यावर हल्ला करण्याकरितां आकाशांतील समरांगणावर मेघराज आपलीं धूम्रमय पलटणें गोळा करीत असतांना मीं येथून पाहिलें आहे. त्यानें सूर्याचें जबरदस्तीनें आक्रमण केलेलें मीं येथून पाहिलें आहे. आणि त्याच्या तोफांच्या लखलखाटांनीं येथें माझे डोळे कितीतरी वेळां दिपून गेलेले आहेत, आणि त्याच्या तोफांच्या गडगडाटांनीं येथें माझ्या कितीतरी वेळां कानठळ्या बसून गेलेल्या आहेत. आणि हा त्या मेघराजाचा पराक्रम पाहण्यामध्यें माझें मन इतकें गर्क होऊन गेलेलें असे कीं, त्यावेळीं माझें अंग भिजून चिंब झालेलें असलें तरी देखील त्याची मला पुष्कळ वेळपर्यंत शुद्ध नसे. अशा रीतीनें त्या आम्रवृक्षानें आणि मीं अनेक सुखदुःखांचा आणि स्थितिविपर्यासाचा एकत्र अनुभव घेतलेला असल्यामुळें माझी एखाद्या मित्राप्रमाणें किंवा आप्ताप्रमाणें त्या वृक्षावर अतिशय प्रीति बसलेली होती, व त्यामुळें मी त्याच्या भेटीला गेल्यावांचून बहुधा कधींही राहात नसें. परंतु माझ्या गरिबीमुळें मला माझा गांव आणि तो माझा मित्र यांना सोडून दुसरीकडे जावें लागलें, व तेव्हांपासून त्याचा सहवास मला अंतरला !

त्या माझ्या आवडत्या झाडाजवळच माझें एक लहानसें वडिलार्जित शेत होतें. हें शेत माझे बाबा मला सांगत असत त्यावरून पंचवीसतीस पिढ्यांपासूनच आमच्याकडेच होतें. इतक्या अवधींत आमच्या शेतावर पुष्कळ वेळां पाऊस पडलेले नसतील, पुष्कळ वेळां तें टोळांनीं खाल्लेलें असेल, आणि पुष्कळ वेळां त्याजवर कीड पडलेली असेल; तरी पण शेतसाऱ्यासाठीं तें शेत विकण्याचा माझ्या पूर्वजांवर कधींही प्रसंग आला नव्हता. परंतु चार-पांच

वर्षांच्या पूर्वी जो दुष्काळ पडला त्यांत सरकारच्या पोटासाठीं मला माझें तें आवडतें शेत — माझ्या पंचवीस पूर्वजांपासून कोणताही दुष्काळ जें हरण करूं शकला नाहीं, तें शेत—दुसऱ्याला विकणें भाग पडलें. तें शेत विकून सरकारचें त्या वर्षाचें कर्ज—शेवटचें कर्ज—देऊन टाकून बाकी उरलेले थोडेसे पैसे पदराला बांधून कांहीं उद्योगधंदा पाहण्यासाठीं मी मुंबईस आलों. इंग्रजी राज्यांत जरी लोकांचीं वडिलार्जित शेतें जात चाललीं आहेत, तरी त्यांना मुंबईसारख्या शहरांत पोटापुरतें काम मिळण्याला हरकत पडत नाहीं, ही मोटी आनंदाची गोष्ट आहे. मुंबईत दोनतीन वर्षें माझें चांगलें चाललें होतें. मी जरी मूळचा शेतकरी, तरी मला चांगलें लिहितां–वाचतां येत असे. त्यामुळें महिन्याच्या कांटीं मला २५।३० रुपये मिळण्याला कधींच अडचण पडत नसे. त्यामुळें मी पूर्वीपेक्षां अधिक सुखांत आहें असें मला वाटत असे. परंतु माझ्या हवालीं केलेलें शेत सरकारची क्षुधा शांत करण्याकरितां मला विकावें लागलें ह्याची आटवण होऊन मला कधीं कधीं अतिशय वाईट वाटत असे. एखादे वेळीं मीं गिरणींत काम करीत असतांनाच मला माझ्या त्या खेडेगांवांतील जमिनीची आटवण होई, आणि माझे डोळे पाण्यानें भरून येत आणि माझे हात काम करण्याचे थांबत. गिरणींतलि मोठमोठया यंत्रांचा धडाधड होणारा आवाज क्षणभर मला मुळींच ऐकूं देईनासा होई, आणि माझ्या खेडेगांवांतील शेताभोंवतीं भरून राहिलेली शांतताच माझे कान ऐकत आहेत असें मला वाटे. त्या गिरणीच्या इमारतींत माझें शेत मला दिसूं लागे, आणि त्या शेतांतील भाताच्या लोंबी पिकून वाऱ्यानें खालीं वांकलेल्या 'न माझ्या मनाला अत्यंत हर्ष होई. अशा वेळीं गिरणींत माणसें काम करीत असलीं तरी तीं मला मुळींच दिसत नसत. मला तेथें माझें शेत मात्र दिसे. शेताच्या भोंवतालच्या बांधावर हिरवें गवत उगवलें आहे, त्यावर माझे बैल चरत आहेत, मी आपल्या हातांत विळा घेऊन आपलें शेत कापतों आहें, आणि एकीकडे तोंडानें कांहीं तरी गाणें म्हणतों आहें असा मला भास होई, व त्या आनंदांत मग्न होऊन मी कित्येक वेळपर्यंत आपल्या पुढचें काम अर्धवट टाकून स्तब्ध बसत असें, व आमच्यावर देखरेख करणारा मुकादम माझ्याजवळ येऊन त्यानें माझ्या पाटीवर थाप मारली म्हणजे मी आपल्या डोळ्यांचें पाणी पुसून फिरून आपल्या कामाला लागत असें.

अशा वेळीं फिरून एकदां तें आपलें शेत आपल्या डोळयांनीं प्रत्यक्ष पाहावें अशी मला वारंवार इच्छा होत असे; व त्याप्रमाणें एकदां मी रजा घेऊन आपल्या गांवीं आलों. माझ्या गांवीं माझें असें कोणीच उरलें नव्हतें. त्या गांवांत एकदां आमचें कुटुंब फार मोठें होतें. पण त्यांपैकीं आतां कोणीच उरलेलें नव्हतें. तरी पण माझ्या त्या शेतावर माझी पराकाष्ठेची ममता होती. म्हणून मी आपल्या गांवीं आल्याबरोबर लागलाच त्या शेताकडे गेलों. माझें शेत जवळ येत चाललें. त्याच्या आणि माझ्यामध्यें सुमारें शंभर पावलांचें अंतर राहिलें, तेव्हां माझा आनंद माझ्या अंतःकरणांत राहीनासा झाला, आणि तो डोळयांच्या वाटेनें अश्रूंच्या रूपानें बाहेर वाहूं लागला, तेव्हां मी क्षणभर तेथेंच उभा राहिलों, आणि डोळ्यांतील टिपूं पुसून मीं आपले डोळे त्या शेताकडे लाविले. पण तेथें माझ्या डोळ्यांना काय दिसलें! माझ्या शेतांत दुसरे लोक, माझ्या गवतांत दुसऱ्यांचीं गुरें आणि माझ्या जमिनींत दुसऱ्यांचे नांगर माझ्या दृष्टीस पडले! त्या शेतांत एक लहानशी उडवी होती व ती मळून कांहीं लोक तें धान्य आपल्या–माझ्या नव्हे—घरीं नेत होते. त्या शेतांत त्या वेळीं दुसऱ्यांचीं मुलें नाचत बागडत होतीं आणि माताच्या गळून पडलेल्या ओंबी गोळा करीत होतीं. हा सगळा देखावा पाहून माझीं आंतडीं तुटूं लागलीं, व मला असें वाटलें कीं, या वेळीं मी हें शेत पाहिलें नसतें तर फार बरें झालें असतें! मी रात्रीच्या प्रहरीं येथें आलों असतों तर काय वाईट झालें असतें! त्या वेळीं हें शेत लोकांचें म्हणून मला दिसलें नसतें. रात्रीनें त्यानं हें शेत माझेंच म्हणून दाखविलें असतें! मला वाटलें, ह्याच्यापेक्षां माझ्या गिरणींत मला जें शेत दिसत होतें तेंच अधिक सुखदायक होतें. त्यांत मला माझ्या शेताचा दुसरा मालक मुळींच दिसत नव्हता! माझ्या बांधावर माझेच बैल चरत होते आणि माझें शेत मींच कापीत होतों! पण ही वास्तविक स्थिति त्याहून अगदीं भिन्न आहे. अशी माझी स्थिति कोणीं केली? मला माझें शेत कां विकावें लागलें? ज्यांचें देणें देण्याला मुदतीच्या पुढें थोडीशी-देखील फुरसत नाहीं, असा कोण दयार्द्र सावकार माझ्या दाराशीं तगादा लावण्यासाठीं येऊन बसला होता? हे विचार माझ्या मनांत येऊन मी अगदीं उद्विग्न होऊन गेलों, व जें शेत पाहण्यासाठीं मी मुंबईहून आपल्या गांवापर्यंत आलों, तें शेत आतां कायतें शंभर पावलेंच दूर राहिलें

राहिलें होतें, तरी त्याच्याजवळ जाण्याकरितां एक पाऊलसुद्धां माझ्याच्यानें पुढें जाववेना. तेव्हां मी अतिशय दुःखानें मागें वळलों, व आतां कोठें जावें म्हणून विचार करूं लागलों. इतक्यांत मला माझ्या त्या आंब्याच्या झाडाची आठवण झाली, आणि मी तिकडच्याच वाटेनें चालूं लागलों.

तो पौष महिना होता. थंडी बरीच पडत असे. अंगाला आणि जमिनीला भेगा पाडणारा वारा साऱ्या दिवसभर सुटत असे. त्या वाऱ्यामुळें सर्व झाडांवरील बहुतेक पानें गळून पडलेलीं होतीं या ऋतुमानाचा त्या आंब्याच्या झाडावर परिणाम होऊन त्याची ही सर्व ..मा नाहींशी झाली होती. त्याचीं बहुतेक पानें गळून खालीं पडलेलीं हो.. आणि वर जीं कांहीं होतीं तींदेखील गळून पडण्याच्या बेतांत आलीं होत.. त्या पूर्वीच्या रम्य झाडावर ती पूर्वींची रम्यता मुळींच उरली नव्हती. त्यावर फळें तर नव्हतींच, पण पूर्वीं त्यावर बसून जे सुंदर पक्षी मधुर गायन करीत असत, तेदेखील त्यावर मला कोठें दिसले नाहींत. बिचारे त्याला सोडून कोठें गेले होते कोण जाणे! सर्व पानांवर सकाळच्या दहिंवराचे थेंब पडून ते खालीं गळत असल्यामुळें तो वृक्ष आपल्या सांप्रतच्या विपर्यस्त स्थितीबद्दल दुःखाश्रूच गाळीत आहे, असा मला भास झाला. त्याच्या जवळ जाऊन सूक्ष्म निरीक्षण केल्यावर मला असेंही दिसून आलें कीं, त्याच्या वाळलेल्या खांद्या कोणीं आपला भात शिजवण्यासाठीं तोडून नेलेल्या आहेत. त्या झाडाच्या तळाशीं माझी बसण्याची जागा असे, पण तेथेंही आतां बसण्याची सोय उरली नव्हती. चोहोंकडे वाळलेलीं पानें, धुरळा आणि मुंग्यांचीं वारुळें पसरलेलीं होतीं. त्या झाडाच्या खालच्या खोडाच्या कोणीं सालीच तोडून नेल्या होत्या. आणि त्याच्या अवशिष्ट राहिलेल्या खांद्यांवरून कांडोर, मणेर, नानेटी, साप वगैरे विषारी जनावरें इकडून तिकडे धांवत होतीं. आणि त्या सगळ्यांच्या शिरोभागीं एक घुबड दिवसाच्या प्रकाशाचीही भीति सोडून देऊन निःशंकपणें आपला भयंकर शब्द उच्चारीत त्या वृक्षाच्या शिखरावर बसलेलें मीं पाहिलें. अशी त्या झाडाची स्थिति झालेली पाहून मलादेखील त्याचें भय वाटूं लागलें. माझ्यानें त्याच्याजवळ जाववेना. तें माझ्या इतक्या प्रीतीचें झाड, पण त्याची मला भीति वाटूं लागली. मी त्याच्यापासून फार दूर नाहीं पण फार जवळही नाहीं, असा

अशा वेळीं फिरून एकदां तें आपलें शेत आपल्या डोळयांनीं प्रत्यक्ष पाहावें अशी मला वारंवार इच्छा होत असे; व त्याप्रमाणें एकदां मी रजा घेऊन आपल्या गांवीं आलों. माझ्या गांवीं माझें असें कोणीच उरलें नव्हतें. त्या गांवांत एकदां आमचें कुटुंब फार मोठें होतें. पण त्यांपैकीं आतां कोणीच उरलेलें नव्हतें. तरी पण माझ्या त्या शेतावर माझी पराकाष्ठेची ममता होती. म्हणून मी आपल्या गांवीं आल्याबरोबर लागलाच त्या शेताकडे गेलों. माझें शेत जवळ येत चाललें. त्याच्या आणि माझ्यामध्यें सुमारें शंभर पावलांचें अंतर राहिलें, तेव्हां माझा आनंद माझ्या अंतःकरणांत राहीनासा झाला, आणि तो डोळयांच्या वाटेनें अश्रूंच्या रूपानें बाहेर वाहूं लागला, तेव्हां मी क्षणभर तेथेंच उभा राहिलों, आणि डोळ्यांतील टिपूं पुसून मीं आपले डोळे त्या शेताकडे लाविले. पण तेथें माझ्या डोळ्यांना काय दिसलें! माझ्या शेतांत दुसरे लोक, माझ्या गवतांत दुसऱ्यांचीं गुरें आणि माझ्या जमिनींत दुसऱ्यांचे नांगर माझ्या दृष्टीस पडले! त्या शेतांत एक लहानशी उडवी होती व ती मळून कांहीं लोक तें धान्य आपल्या—माझ्या नव्हे—घरीं नेत होते. त्या शेतांत त्या वेळीं दुसऱ्यांचीं मुलें नाचत बागडत होतीं आणि भाताच्या गळून पडलेल्या लोंबी गोळा करीत होतीं. हा सगळा देखावा पाहून माझीं आंतडीं तुटूं लागलीं, व मला असें वाटलें कीं, या वेळीं मीं हें शेत पाहिलें नसतें तर फार बरें झालें असतें! मी रात्रीच्या प्रहरीं येथें आलों असतों तर काय वाईट झालें असतें! त्या वेळीं हें शेत लोकांचें म्हणून मला दिसलें नसतें. रात्रीनें ... हें शेत माझेंच म्हणून दाखविलें असतें! मला वाटलें, ह्याच्यापेक्षां माझ्या गिरणींत मला जें शेत दिसत होतें तेंच अधिक सुखदायक होतें. त्यांत मला माझ्या शेताचा दुसरा मालक मुळींच दिसत नव्हता! माझ्या बांधावर माझेच बैल चरत होते आणि माझें शेत मीच कापीत होतों! पण ही वास्तविक स्थिति त्याहून अगदीं भिन्न आहे. अशी माझी स्थिति कोणीं केली? मला माझें शेत कां विकावें लागलें? त्यांचें देणें देण्याला मुदतीच्या पुढें थोडीशी देखील फुरसत नाहीं, असा कोण दयार्द्र सावकार माझ्या दाराशीं तगादा लावण्यासाठीं येऊन बसला होता? हे विचार माझ्या मनांत येऊन मी अगदीं उद्विग्न होऊन गेलों, व जें शेत पाहण्यासाठीं मी मुंबईहून आपल्या गांवापर्यंत आलों, तें शेत आतां कायतें शंभर पावलेंच दूर राहिलें

राहिलें होतें, तरी त्याच्याजवळ जाण्याकरितां एक पाऊलसुद्धां माझ्याच्यानें पुढें जाववेना. तेव्हां मी अतिशय दुःखानें मागें वळलों, व आतां कोठें जावें म्हणून विचार करूं लागलों. इतक्यांत मला माझ्या त्या आंब्याच्या झाडाची आठवण झाली, आणि मी तिकडच्याच वाटेनें चालूं लागलों.

तो पौष महिना होता. थंडी बरीच पडत असे. अंगाला आणि जमिनीला भेगा पाडणारा वारा साऱ्या दिवसभर सुटत असे. त्या वाऱ्यामुळें सर्व झाडांवरील बहुतेक पानें गळून पडलेलीं होतीं. या ऋतुमानाचा त्या आंब्याच्या झाडावर परिणाम होऊन त्याची ही सर्व शोभा नाहींशी झाली होती. त्याचीं बहुतेक पानें गळून खालीं पडलेलीं होतीं. आणि वर जीं कांहीं होतीं तींदेखील गळून पडण्याच्या बेतांत आलीं होतीं. त्या पूर्वींच्या रम्य झाडावर ती पूर्वींची रम्यता मुळींच उरली नव्हती. त्यावर फळें तर नव्हतींच, पण पूर्वीं त्यावर बसून जे सुंदर पक्षी मधुर गायन करीत असत, तेदेखील त्यावर मला कोठें दिसले नाहींत. बिचारे त्याला सोडून कोठें गेले होते कोण जाणे! सर्व पानांवर सकाळच्या दहिंवराचे थेंब पडून ते खालीं गळत असल्यामुळें तो वृक्ष आपल्या सांप्रतच्या विपर्यस्त स्थितीबद्दल दुःखाश्रूच गाळीत आहे, असा मला भास झाला. त्याच्या जवळ जाऊन सूक्ष्म निरीक्षण केल्यावर मला असेंही दिसून आलें कीं, त्याच्या वाळलेल्या खांद्या कोणीं आपला भात शिजवण्यासाठीं तोडून नेलेल्या आहेत. त्या झाडाच्या तळाशीं माझी बसण्याची जागा असे, पण तेथेंही आतां बसण्याची सोय उरली नव्हती. चोहोंकडे वाळलेलीं पानें, धुरळा आणि मुंग्यांचीं वारुळें पसरलेलीं होतीं. त्या झाडाच्या खालच्या खोडाच्या कोणीं सालीच तोडून नेल्या होत्या. आणि त्याच्या अवशिष्ट राहिलेल्या खांद्यांवरून कांडोर, मणेर, नानेटी, साप वगैरे विषारी जनावरें इकडून तिकडे धांवत होतीं. आणि त्या सगळ्यांच्या शिरोभागीं एक घुबड दिवसाच्या प्रकाशाचीही भीति सोडून देऊन निःशंकपणें आपला भयंकर शब्द उच्चारीत त्या वृक्षाच्या शिखरावर बसलेलें मीं पाहिलें. अशी त्या झाडाची स्थिति झालेली पाहून मलादेखील त्याचें भय वाटूं लागलें. माझ्यानें त्याच्याजवळ जाववेना. तें माझ्या इतक्या प्रीतीचें झाड, पण त्याची मला भीति वाटूं लागली. मी त्याच्यापासून फार दूर नाहीं पण फार जवळही नाहीं, अशा

रीतीनें उभा राहून त्याच्याकडे पाहूं लागलों; आणि त्याच्याकडे पाहत असतांना मला माझ्या देशाची आठवण झाली. मला वाटलें, माझ्या देशाचीही हल्लीं अशीच स्थिति झालेली आहे! या वृक्षाच्या पानांप्रमाणें माझ्या देशाचेही सर्व चांगले गुण झडून गेलेले आहेत! माझ्या देशांत जे पूर्वी शहाणे, शूर आणि गुणी लोक होते ते या वृक्षावरील पक्षांप्रमाणें आतां कोणीकडे उडून गेले कोण जाणे! या वृक्षाचीं पानें ज्याप्रमाणें दहिंवराचे थेंब खालीं टाकीत आहेत, त्याप्रमाणेंच माझ्या देशांतील लोक, कोणी अन्नासाठीं तर कोणी वस्त्रासाठीं, कोणी थंडीसाठीं तर कोणी वाऱ्यासाठीं अश्रु टाकीत आहेत. ह्या वृक्षाप्रमाणें माझ्या देशाच्याही खांद्या आपला भात शिजवण्यासाठीं कोणीं तोडून नेल्या आहेत! येथल्याप्रमाणें माझ्या देशांतही जेथें आरामाच्या जागा होत्या तेथें हल्लीं वाळलेला पातेरा पडलेला आहे, त्यावर हल्लीं धुरळा बसलेला आहे, आणि तेथें हल्लीं मुंग्यांचीं मोठमोठीं वारुळें वाढलेलीं आहेत! ह्या वृक्षाच्या बुंधाप्रमाणें माझाही देश हल्लीं चोहोंकडून सोकला गेला आहे! ह्या वृक्षाच्या खांद्यावरून जसे अनेक विषारी प्राणी खेळत आहेत, त्याचप्रमाणें माझ्या देशांतील लोकांच्या खांद्यांवर अनेक विषारी आणि प्राणघातक व्यसनें स्वतंत्रपणानें खेळत आहेत! आणि ह्या सगळ्या वृक्षाच्या अग्रभागीं जसें हें घुबड दिवसाढवळ्या बसून आपला भयसूचक शब्द करीत आहे, त्याचप्रमाणें माझ्या देशांतील सर्व विचारांच्या अग्रभागीं नास्तिकपणाचें घुबड बसून निर्भयपणें दिवसाढवळ्या भयंकर शब्द उच्चारीत आहे! असे विचार मनांत येऊन मला त्या वृक्षाबद्दल आणि माझ्या देशाबद्दल अशा दोघांबद्दलही अतिशय वाईट वाटलें! व दुःखाचा सुस्कारा टाकून मी तेथून मागें परतलों, व माझ्या गांवीं मला आनंद देणारी आतां कांहींच वस्तु उरली नाहीं, असें जाणून मी जों निघालों, तों तडक मुंबईस परत आलों. ह्या माझ्या प्रवासानें मला आनंद होईल असें वाटलें होतें; परंतु तसें न होता उलट उद्वेग मात्र झाला. त्या उद्वेगाचें शांतवन मी कांहीं इकडचीं तिकडचीं पुस्तकें वाचून करीत असे. तरीपण त्या गोष्टीचा मुख्य विसर मला माझ्या गिरणींतील साऱ्या दिवसभर पुरणाऱ्या कामामुळेंच पडत असे. अशा रीतीनें मी आपली कालक्रमणा करीत असतां दोन-तीन महिने लोटले.

आमच्या गिरणीचा मालक पार्शी होता. त्याच्या मुलाला कांहीं एक विकार

जडला होता, व तो मुंबईतील कोणत्याही इंग्रजी औषधानें बरा होईना. तेव्हां त्याला कोणीं कोकणांतील झाडपाल्याचें औषध सांगितलें. तें आमच्या गांवीं मिळत असल्याचें मी बोलल्यावरून शेटजींनीं मला आपल्या स्वतःच्या खर्चानें मुद्दाम माझ्या गांवीं पाठविलें. मला आपल्या गांवीं परत येण्याची बिलकूल इच्छा नव्हती. कारण, तेथें मला सुख देणारी अशी एकही वस्तु उरली नव्हती. तरी पण शेटजींच्या कामासाठीं मला येणें भाग पडलें. वनस्पती आणण्याकरितां रानांत जाण्याची वाट माझ्या शेतावरूनच होती. पण तें शेत मला जास्त दुःखी करण्याला मात्र कारण होणारें असल्यामुळें मीं तिकडे लक्षच दिलें नाहीं. तरी पण माझे डोळे सहजगत्या त्या आंब्याच्या झाडाकडे गेले. मी त्या झाडालादेखील टाळणार होतों. तरी पण माझ्या प्रयत्नांना न जुमानतां त्या माझ्या जुन्या मित्रानें माझीं पावलें आपल्याकडे ओढून नेण्याला सुरवात केली. कशामुळें कोण जाणे, पण परवश होऊन आपल्या इच्छेच्याही विरुद्ध मी त्या झाडाजवळ चालत गेलों. तो चैत्राचा महिना होता. वसंतऋतूला नुक-तीच सुरवात झालेली होती. दोन-चार महिन्यांच्या पूर्वीं तेथें मीं जी स्थिति पाहिली होती त्याच्या अगदीं उलट स्थिति त्या वेळीं माझ्या दृष्टीस पडली. त्या वेळीं सकाळच्या प्रहरीं पूर्वींच्याप्रमाणें थंडी पडलेली नसून सूर्याचें कोंवळें ऊन थोडथोडें प्रखर भासूं लागलें होतें. त्या झाडामध्येंही पुष्कळ स्थित्यंतर झालें होतें. वसंतऋतूमुळें त्याला चोहोंकडून नवीन पालवी फुटली होती. त्या वृक्षाच्या तळाशीं पूर्वीं जो पातेरा पडलेला होता, तो सर्व वाऱ्यानें उडवून नेऊन तेथील जागा स्वच्छ करून ठेविली होती, व तेथें आंब्याचा कांहीं मोहोर गळून पडून त्याच्या सुवासानें ती जागा अगदीं भरून गेली होती. झाडावर जो मोहोर होता त्यालाही मधून मधून लहान लहान फळें आलेलीं होतीं. त्याच्या तोडून नेलेल्या खांद्या नवीन फुटलेल्या पालवींत झांकून गेल्या होत्या. त्या आंब्याच्या कोंवळ्या लुसलुशीत पालवीवर सूर्याचे कोंवळे किरण पडलेले असल्यामुळें पूर्वीं जो आम्रवृक्ष अश्रु गाळीत आहे असा मला भास झाला होता, तोच हल्लीं आनंदानें सतेज आणि टवटवीत झालेला व हंसत असलेला माझ्या दृष्टीस पडला. पूर्वींचे ते विषारी प्राणी त्या झाडावरून जाऊन माझे ते पूर्वपरिचित गोड गोड गाणारे पक्षी फिरून त्या वृक्षावर येऊन राहिलेले मीं पाहिले, व त्यांचे आलाप ऐकून माझे कर्ण तृप्त झाले. वसंतऋतूची बहीण

कोकिळा हीही तेथें होतीच. पूर्वी जेथें घुबड बसलेलें असे, ती जागा फिरून कोकिळेनें घेतली होती, व त्या वृक्षाच्या शिरोभागीं बसून ती त्या वृक्षाची पूर्वीची कुदशा जाऊन हल्लींची आलेली सुस्थिति तेथून मला सांगत होती. ही एकंदर स्थिति पाहून मला आनंद झाला. पण हा माझा आनंद फार वेळ टिकला नाहीं. कारण, ह्याही प्रसंगीं मला माझ्या देशाची फिरून आठवण झाली, आणि माझें मन निराशेनें खिन्न होऊन गेलें व माझ्या मनांत पुढील विचार उभे राहिले : तीन महिन्यांच्या पूर्वी हा वृक्ष आणि माझा देश सारख्या स्थितीमध्यें होते. त्या वेळीं दोघेही समदुःखी होते. पण या तीन महिन्यांत दोघांच्या स्थितीमध्यें किती तरी अंतर पडलें आहे! हे आम्रवृक्षा, तुझा वसंतऋतु इतक्या लौकर आला, पण माझ्या देशाचा वसंतऋतु कधीं येणार? माझा देश जो चोहोंकडून करपत जात आहे त्याला तुझ्याप्रमाणें नवीन पालवी केव्हां फुटणार? माझ्या देशाच्या इतरांनीं तोडून नेलेल्या खांद्या नवीन पालवीनें केव्हां झांकून जातील? तुझ्याप्रमाणें माझ्या या हतभाग्य देशाला मोहोर आणि फळें केव्हां येतील? तुझ्या या मोहोराचा सुगंध जसा चोहोंकडे पसरला आहे, तशी माझ्या देशाची कीर्ति कधीं पसरेल? तुझ्या अंगावर खेळणारीं विषारी जनावरें आणि घुबडें गेलीं तशीं तीं माझ्या देशांतून जाऊन येथें आम्हांला मंजुळ पक्ष्यांचे सुस्वर ध्वनि ऐकण्याचे सुखाचे दिवस कधीं तरी येतील काय? हिंवाळ्याच्या मागून वसंतऋतु येतो हा नियम फक्त अरण्यांतील झाडांकरितांच आहे किंवा माझ्यासारख्यांच्या हतभाग्य देशांनाही तो लागू पडतो, हें तूं सांगूं शकशील काय? सूर्य मावळला तर तो फिरून उगवतो. समुद्राला ओहोटी लागली तर त्याला फिरून भरती येते. चंद्राच्या कलांचा कृष्णपक्षांत क्षय झाला तरी फिरून शुक्ल पक्षांत त्यांची वृद्धि होते. पण माझ्या देशाचा सूर्योदय कधीं होईल? त्याच्या वैभवाला ओहोटी रोजच लागलेली आहे, पण त्याला भरती कधीं येणार? माझ्या देशांतील कलांचा कृष्णपक्ष आज कित्येक वर्षे चालला आहे, तो संपून त्याच्या शुक्ल पक्षाला सुरवात कधीं होणार? हे आम्रवृक्षा, तो आणि तूं समदुःखी होतां, त्या वेळेला तुम्ही एकाच दोघेजण असल्यामुळें माझें मन फारसें कष्टी झालेलें नव्हतें. पण आतां तूं टवटवीत झालेला पाहून तो असाच केव्हां होईल, ह्याबद्दल माझें मन फारच उतावीळ झालें आहे. पण माझ्या उतावीळपणापासून काय व्हावयाचें आहे? परमेश्वराच्या मनांत

जेव्हां येईल तेव्हांच या गोष्टी घडून येणार आहेत. तुझ्या पदरचें पाप संपलें, म्हणून तुझा हिंवाळा संपला व देवानें तुला वसंतऋतु दिला. आतां तूं ह्याचें नीट जतन कर, व यापुढें तो तुझीं हाडें पिळणारा, पानांतील रस शोषून नेणारा आणि तुझ्या डोळ्यांतून टिपें पाडविणारा क्रूर हिंवाळा फिरून तुझ्यावर आपला अमल कधींही न बसवो ! अशी त्या आम्रवृक्षाबद्दल परमेश्वरापाशीं प्रार्थना करून आपल्या देशाच्या वाईट स्थितीबद्दल दुःख करीत करीत मी ती औषधी शोधण्याकरितां एकेक पाऊल पुढें टाकीत आणि एकेक दृष्टि मागें फेंकीत रानांत गेलों.

# ठराव : : : १५

**काळ : अग्रलेख, ता. २२।११।१९०१**

आपली कॉंग्रेस जवळ येत चालली आहे, व आणखी सुमारें एक महिन्यानें हिंदुस्थानांतील पुढारी लोक कलकत्त्यास एकत्र जमून राष्ट्रीय सभेंतील ठराव पास करून टाकण्याच्या कामांत तीन-चार दिवस अगदीं गर्क होऊन गेलेले असतील. हे ठराव कशासाठीं आहेत हें आज हिंदुस्थानांतील अशिक्षित लोकांखेरीज दुसऱ्या कोणाला सांगण्याची आवश्यकता आहे असें नाहीं. हे ठराव हिंदुस्थानांतील लोकांचीं रडगाणीं सरकारच्या कानावर घालण्यासाठीं आहेत. ह्या दृष्टीनें पाहिलें असतां अशा अर्थी ठराव हा शब्द उपयोगांत आणला जावा किंवा नाहीं हा एक डोकें थंड ठेवून विचार करण्यासारखा प्रश्न आहे. इंग्रजींत Resolution ह्या शब्दाचें ठराव ह्या शब्दानें भाषांतर करण्याचा परिपाठ आहे हें खरें. पण ठराव म्हणजे काय ? इंडिया सरकार सिमल्याच्या पर्वतावरून ठराव करतें कीं, अमक्या अमक्या साहेबाला अमुक अमुक रुपयांची बढती मिळावी; व त्याप्रमाणें पुढल्या महिन्याचे अखेरीस त्या साहेबाच्या खिशांत बढतीच्या जास्त रुपयांची रक्कम प्रत्यक्ष येऊन पडते. यांचे क्यासलमधून मुंबई सरकार ठराव करतें कीं, अमुक अमुक कलेक्टराची मध्य भागांतून सिंध प्रांतामध्यें बदली केली आहे; आणि त्याप्रमाणें त्या कलेक्टरसाहेबाला चांगल्या हवेचा जिल्हा सोडून मुंबई इलाख्याच्या एका दूरवरच्या कोपऱ्यामध्यें जाऊन पडावें लागतें. एखादा जज्ज ठराव करतो कीं, प्रतिवादीनें वादीला खर्चासह दाव्याची रक्कम द्यावी; आणि त्याप्रमाणें प्रति-

वादीचें घरदार, जमीनजुमला, जें कांहीं असेल नसेल तें, तो शेतकरी नसेल तर, विकून टिकून बारा बारा वर्षांनीं का होईना, आणि दाव्याच्या रकमेपैकीं चतुर्थांश, अष्टमांश, दशांश कांहीं का होईना, पण कांहीं तरी रकम वादीला मिळते. आपल्या कोर्टांत बसून मॅजिस्ट्रेट ठराव करतो कीं, अमुक अमुक मनुष्य दारू पिऊन बेशुद्ध असलेला सार्वजनिक रस्त्यावर सांपडला म्हणून त्यानें दहा रुपये दंड द्यावा. आणि त्याप्रमाणें जी दारू पिऊन सदर अपराधी सार्वजनिक रस्त्यावर बेशुद्ध झाला त्या दारूच्या किंमतीबद्दल दारूच्या गुत्तेवाल्याकडून कॉंट्रॅक्टरमार्फत सरकारी तिजोरींत जे पैसे जातात त्यांशिवाय आणखी हे दहा रुपयेही सरकारच्या खजिन्यामध्यें प्रत्यक्ष रीतीनें जमा होतात. एखादा परीक्षेला जाणारा मुलगा आपल्या अभ्यासाच्या खोलींत बसून ठराव करतो कीं, मी उद्यांपासून पहाटेचा उठेन आणि प्रत्येक दिवशीं दहा तास अभ्यास करीन; आणि त्याप्रमाणें तो मुलगा पहाटेचा उठूं लागतो आणि दररोज दहा तास अभ्यास करून परीक्षेंत पास होतो. ह्यांना आपण ठराव म्हणतों. ठरावाचीं जर कांहीं उदाहरणें असलीं तर तीं असल्या प्रकारचीं होत. जी गोष्ट अमलांत आण-ण्याचें आपल्या हातामध्यें सामर्थ्य असतें ती घडवून आणण्याबद्दलचा जो निश्चय, त्याला लोक बहुधा ठराव हा शब्द लावितात. आम्हांला अमुक देण्याची मेहेरबानी व्हावी, आणि तमुक देण्याची वेळ आलेली आहे, अशा प्रकारच्या विनवण्यांना ठराव हा शब्द लावणें म्हणजे भाषेंतील शब्दांचे अपयोग आणि दुरुपयोग करण्यासारखें आहे. खेडेगांवांतून फार झालें तर एखाद दुसराच आंधळा असतो. परंतु मोठमोठ्या शहरांतून असले प्रज्ञाचक्षु पुष्कळ असतात. त्यांची चाल अशी असते कीं, त्यांतील पुढारी मंडळी एकत्र जमतात व आपापल्या शक्तीप्रमाणें आणि अंगांतील कसबाप्रमाणें त्यांतील कोणी ढोलकें बाजवितात; कोणी टाळ बाजवितात, कोणी वीणा बाजवितात, कोणी टाळ्या बाजवितात आणि सगळेजण मिळून खूप मोठ्यानें ओरड करतात, व त्यांची पेटी ज्या आळीला येईल ती आळी ते आपल्या भिक्षेच्या शब्दांनीं अगदीं दणाणून टाकतात. असल्या प्रकारच्या ह्या प्रज्ञाचक्षूंच्या समाजानें भिक्षेप्रीत्यर्थ निघाल्यानंतर एखाद्या यजमानाच्या दाराशीं उभें राहून जर असें बोलून दाख-विलें कीं, " यजमानमहाराज, आम्ही भुकेनें उपाशीं मरत आहों, तेव्हां आमचे प्राण वांचविण्यासाठीं आपण आम्हांला यथाशक्ति मूठभर भिक्षा

घालण्याची आमच्या मतें वेळ आलेली आहे, असा आम्ही पहिला ठराव करतों; आणि आम्ही वस्त्रहीन असल्यामुळें आम्हांला ह्या पौष महिन्यांतील थंडी किती लागते, हें पाहण्याकरितां आपण एक कमिशन बसवून नंतर त्या कमिशनच्या मताप्रमाणें आपण आपल्या घरांतील फाटकींतुटकीं रकटीं आम्हांला देण्याची मेहरबानी कराल, असा आम्ही दुसरा ठराव पास करितों;" तर असे ठराव पास करून भिक्षा मागणाऱ्या प्रज्ञाचक्षूंचें कोणालाहि हंसें आल्यावांचून राहणार नाहीं; व ज्यांना यत्किंचितही व्यवहाराचें ज्ञान उत्पन्न झालें आहे, अशीं रस्त्यांतील पोरेंसुद्धां असल्या भिक्षेकऱ्यांना धोणमार केल्यावांचून राहावयाचीं नाहींत. आणि असल्या लोकांच्या ठिकाणीं ठराव हा शब्द जितका अप्रयोजक आहे तितकाच तो कॉंग्रेसच्या मागण्यांबद्दलही आहे. वर दर्शविलेल्या दृष्टीनें पाहतां कॉंग्रेसमधील ठराव हे ठराव नव्हेत. ह्या भिक्षेकऱ्यांच्या आरोळ्या आहेत. हीं दुबळ्या लोकांचीं रडणीं आहेत. हे हतवीर्य लोकांचे आक्रोश आहेत. आणि हे कमकुवत लोकांचे आर्त विलाप आहेत. ह्यांना ठराव हें नांव शोभत नाहीं. प्रत्येक वस्तूला तिच्या ऐपतीप्रमाणें नांव ठेवावें हें चांगलें. ठणठणपाळाला लक्ष्मीपति हें नांव देऊन त्यायोगानें त्याच्यापाशीं चार दमड्या उत्पन्न होतील अशी आशा बाळगणें फुकट आहे.

पण वस्तूंच्या नांवांबद्दल आणि शब्दांबद्दल इतका वाद कशाला पाहिजे? ज्यांना हल्लीं ठराव म्हणून म्हणण्यांत येत आहे, त्यांच्यापासून जर इष्टप्राप्ति होत असेल, तर नांवांसाटीं तंटा कशाला? भिक्षा मागणाऱ्या रामदासस्वामींच्या झोळींत शिवाजीनें राज्याची सनद घातली नव्हती काय? तेव्हां नांवांकडे लक्ष न देतां फलांकडे लक्ष देणें हेंच शहाणपणाचें काम आहे. अशा प्रकारचा हा एक युक्तिवाद आहे. परंतु ह्यामध्यें कांहीं अर्थ आहे किंवा नाहीं ह्याचें मात्र आपण नीट परीक्षण केलें पाहिजे. जगाच्या प्रारंभीं अगदीं प्रथमतः जीं माणसें उत्पन्न झालीं त्यांना या जगांतील व्यवहार बरेच अवघड गेले असतील. कारण, त्यांना पूर्वींच्या अनुभवाची मदत मुळीच नसे. पण त्यांच्या पाठीमागून जन्मास आलेल्या लोकांची गोष्ट तशी नाहीं. त्यांच्या आधींच्या लोकांना ठेचा लागल्या आहेत. आणि त्या पाहून त्यांच्या पुढच्या लोकांना शहाणें होण्यास जागा आहे. मात्र त्यांनीं डोळे उघडून पाहिलें पाहिजे. आपण ज्या आडवाटेनें आज जात आहों, त्याच आडवाटेनें पूर्वीं कोणी गेलेले होते कीं काय,

व त्यांना त्यांत कांहीं टेंचा लागलेल्या आहेत कीं काय, हें आपण डोळे उघडून पाहिलें पाहिजे. आपल्या हातचें गमावून नंतर दुसऱ्याच्या तोंडाकडे पाहत बसण्याचा प्रसंग आपल्यावरच पहिल्यानें आला आहे असें नाहीं. या कामांत आयरिश लोक हे आपल्याहून वडील आहेत. आयर्लंड इ. स. १८०० सालीं ब्रिटिश साम्राज्याच्या पोटामध्यें पडून दाखल झालें, आणि आपली पेशवाई १८१८ मध्यें बुडाली. किंवा सर्व हिंदुस्थानासंबंधानें, निदान हिंदुस्थानच्या मोटमोठ्या भागांसंबंधानें बोलावयाचें म्हटलें तर, ते सर्व भाग लॉर्ड डलहौसी याच्या कारकीर्दीमध्यें खालसा झाले. तेव्हां परतंत्रतेंत पडून नंतर आपल्या अंगीं जसजशी पात्रता येईल त्याप्रमाणें हळूहळू स्वतंत्रतेच्या हक्कांची एकेक पडछाया संपादन करण्याच्या कामाला आयरिश लोकांनीं आपल्या-आधीं कंबरा बांधलेल्या आहेत, व ठराव पास करण्याचें नादीं ते आपल्या-आधीं लागले आहेत. हिंदुस्थानांत जेव्हां पुण्यांतील लोकांना आपली पेशवाई गेली आहे असें चांगलें भासूं लागलें नव्हतें, जेव्हां सातारचे लोक आपल्याच छत्रपतीच्या छत्राखालीं होते, जेव्हां नागपूरचे लोक स्वतंत्र होते, जेव्हां अयोध्येचे नबाब लखनौच्या केसर बागेमध्यें आणि बारादरीमध्यें सर्व प्रकारचे ऐषआराम स्वतंत्रपणानें उपभोगीत होते, आणि जेव्हां पंजाबांतील शूर शीख लोक आपल्या नानकाच्या आणि गुरुगोविंदाच्या क्षात्रतेजाच्या जोरावर आसपासच्या मुसलमानांना आणि इंग्रजांना सारख्याच रीतीनें कांपवीत होते, तेव्हां आयर्लंडांतील लोक कॅथॉलिक इमॅन्सिपेशनसाठीं सभा भरवून ठराव पास करीत होते, व आयर्लंडला न्याय मिळावा म्हणून डॅनिअल ओकोनेल हा ब्रिटिश पार्लमेंटमध्यें कंठशोष करीत होता. तेव्हांपासून आयरिश लोकांचें हें ठराव पास करण्याचें काम चाललेलें आहे. तेव्हां या लोकांना या ठराव पास करण्याच्या पद्धतीबद्दल जवळजवळ एक शतकाचा अनुभव आहे. ते लोक शंभर वर्षांच्या अनुभवानंतर ह्या मुसळाला पल्लव उत्पन्न करण्याच्या युक्तीबद्दल आपला काय अभिप्राय देतात हें, आपला ठराव पास करण्याचा झपाटा क्षणभर थांबवून, पाहण्याकरितां आपण तिकडे वळलों, तर तें केवळ अप्रासंगिक आणि निरुपयोगी होईल असें नाहीं.

मि. जॉन रेडमंड हे आयर्लंडच्या तर्फेनें ब्रिटिश पार्लमेंटचे एक सभासद असून, आयर्लंडांतील नॅशनॅलिस्ट पक्षाचे ते एक प्रमुख पुढारी आहेत. ते

आयर्लंडांतील क्वीन्स कौंटीमधील लोकांना उद्देशून नुकतेंच एक भाषण करीत असतांना तेथील लोकांनीं एका सभेंत सोळा ठराव पास केले होते. ह्या गोष्टीला अनुलक्षून त्यांनीं पुढीलप्रमाणें उद्गार काढिले: "ठराव पास करण्याच्या कामांत आपण फार पटाईत लोक झालेले आहों. आणि जर ठराव पास करून आयर्लंडची स्वतंत्रता परत मिळवण्यासारखी असती, तर आपण आयरिश लोक कधींच स्वतंत्र होऊन बसलों असतों. जर ठरावांच्या योगानें आयर्लंडचा देश आयर्लंडच्या लोकांकरितां स्वतंत्र होण्यासारखा असता, तर आज आपला देश सोडून आपल्याला उद्योगधंद्यासाठीं जें परदेशांमध्यें जावें लागत आहे तें कधींच बंद झालें असतें. आणि आजमित्तीला आपण संतुष्ट आणि श्रीमंत असे झालेले जगाच्या दृष्टीस पडलों असतों. जर ठरावांच्या योगानें शेतांत काम करणाऱ्या शेतकऱ्याला पोटभर खावयाला मिळतें आणि शहरांतील धंदेवाल्या मजुराला नीट रीतीनें राहण्याची ऐपत येती, तर ह्या गोष्टी आपल्याला कित्येक पिढ्यांच्या आधींच मिळाल्या असत्या. खरोखर आपण ठराव पास करण्याच्या कामांत फार पटाईत लोक आहों ह्यांत शंका नाहीं. येथल्या येथें एका दिवसांत तुम्ही सोळा ठराव पास केले! शाबास आहे तुमची! आपल्याला होमरूल पाहिजे आहे, कॅथॉलिक धर्माची युनिव्हर्सिटी पाहिजे आहे, वगैरे गोष्टी, तुम्ही त्यांच्याबद्दल ठराव पास करण्याच्या पूर्वींही, सर्व लोकांना ठाऊक होत्या. तेव्हां त्यांच्याबद्दल ठराव पास करण्यापासून तो काय जास्त फायदा आहे? कोणी एखाद्या वेड्यानें एक खडा घेऊन तो अटलांटिक महासागरामध्यें टाकला तर त्या महासागरांतील भरतीओहोटीवर किंवा वादळावर त्या खड्याचा जितका परिणाम होईल, तितकाच परिणाम ह्या ठरावापासून आयर्लंडच्या भावी स्थितीवर होणार आहे. तेव्हां असले छप्पन्न ठरावहि कांहीं कामाचे नाहींत. ठरावच करावयाचा असेल तर करण्यासारखा असा एकच आहे, आणि तो ठराव म्हटला म्हणजे आपली जी राष्ट्रीय संस्था (National Organisation) आहे, तिला बळकटी आणणें हा होय." वरील भाषणावरून ठराव पास करण्याच्या संबंधानें आयरिश लोकांचा अनुभव काय आहे हें कोणालाहि सहज कळून येण्यासारखें आहे. आयरिश लोक हे परतंत्रतेच्या धंद्यांत आपल्यापेक्षां वयानें आणि ज्ञानानें अधिक वृद्ध आहेत. तेव्हां त्यांचा अनुभव आपल्या विशेष आदराला पात्र झाला पाहिजे. आपण तसें केलें नाहीं तर जगामध्यें पूर्वीच्या

मनुष्यांच्या या श्रमानें संचित झालेलें शहाणपणं आपण फुकट दवडीत आहों असें होईल. आपण जर त्याचा फायदा घेतला नाहीं, तर आपल्या पूर्वीच्या लोकांना फुकट टेंचा लागल्या आणि त्यांच्या अंगांतील रक्त फुकट वाहिलें असें होईल. आपण दरवर्षी राष्ट्रीय सभेमध्यें अगदीं गेला बाजार पंचवीस-तीस ठराव पास करीत असतां सरासरीनें पंचवीस ठराव धरले तर आज पंधरा वर्षांमध्यें आपल्या राष्ट्रानें एकत्र जमून एकंदर तीनशें पंचाहत्तर ठराव पास केले आहेत. याशिवाय प्रत्येक इलाख्याच्या प्रांतिक सभांचे ठराव, महाजन सभांचे ठराव, इंडियन असोसिएशनचे ठराव, प्रेसिडेन्सी असोसिएशनचे ठराव वगैरे ठराव धरले, तर या ठरावांची संख्या किती तरी मोटी होणार आहे! या ठरावांच्या संख्येवरून पाहतां ठराव पास करण्याचे कामीं आपणही जवळजवळ आयरिश लोकांच्या इतके पटाईत झालों आहों. आपला पटाईतपणा त्यांच्याहून कांहीं कमी आहे असें नाहीं. पण या ठरावांचा काय उपयोग! असल्या ठरावांनीं जर आपली स्थिति सुधारती, तर आपण कधींच चांगल्या स्थितींत पडलों असतों. पण तसली शक्ति ह्या ठरावांमध्यें नाहीं. कोळशाच्या खाणीमध्यें तुम्हीं सोनें काढण्याच्या इच्छेनें कितीही खणलें तरी ती कोळशाची खाण तुम्हांलें सोनें कधींही देणार नाहीं. कोळशाच्या खाणीमध्यें सोनें देण्याचें सामर्थ्य नाहीं. उलट तिच्यांत काम करणाऱ्या लोकांच्या तोंडाला कोळशाचा रंग लागण्याचा मात्र संभव आहे. तेव्हां या मराभर ठराव पास करण्याच्या नादीं न लागतां दुसऱ्या कांहीं तरी उपयुक्त गोष्टींकडे लक्ष लावण्यांत जास्त फायदा आहे, व त्याप्रमाणें कॉंग्रेस आपली दिशा बदलून औद्योगिक वगैरे दुसऱ्या विषयाकडे आपलें लक्ष पोंचविण्याला सुरवात करीत आहे, ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे; व अशा नवीन दिशेनें जाऊन हिंदुस्थानांतील हल्लींचे पुढारी हिंदुस्थानचें कांहीं कल्याण करतील तर त्यांच्या पुढारीपणाचें थोडेंबहुत तरी चीज होणार आहे. नाहीं तर त्यांचें पुढारीपण म्हणजे त्यांच्या डोक्यावरील पागोट्याप्रमाणें केवळ त्यांच्या स्वतःच्या शोभेकरतांच होईल, लोकांच्या उपयोगांकरितां होणार नाहीं. कॉंग्रेसमध्यें खर्च होणाऱ्या पैशाचा आपण कांहीं उद्योगधंद्यामध्यें व्यय केला पाहिजे. परदेशांमध्यें आपले विद्यार्थी पाठवून तेथील नवीन कलाकौशल्य शिकून येण्याचें काम घडून आलें पाहिजे. असल्या थोडथोडया उपायांनींच

आपण आपली स्थिति सुधारण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आयरिश लोकांची दिशा याहून जरा निराळी आहे. ती आपल्याला नको.

मि० जॉन रेड्मंड हे वर दिलेल्या प्रसंगींच बोलत असतांना आयरिश लोकांनीं कसें वागावें, ह्या प्रश्नासंबंधानें ते म्हणाले कीं, "राजकीय प्रश्नासंबंधानें इंग्लिश लोकांचे लिबरल, कॉन्झर्व्हेटिव, रॅडिकल, युनिअनिस्ट वगैरे जे पक्ष आहेत, त्यांतील एखाद्या पक्षाचा आश्रय केल्यानें आयर्लंडचें कल्याण होईल असें आजपर्यंत मला कधीं वाटलें नाहीं व यापुढें कधीं वाटणार नाहीं. इंग्लिश लोक परोपकारबुद्धीनें आयर्लंडचें कल्याण करतील ह्या कल्पनेवरही आजपर्यंत माझा कधीं विश्वास नव्हता व तो याच्या पुढेंही कधी असूं शकणार नाहीं. नुसत्या खरेपणाच्या, प्रमाणाच्या किंवा मनधरणीच्या जोरावर आयर्लंडांतील एखाद्या वर्गांतील लोकांना इंग्लंडपासून न्याय मिळण्याचा संभव असल्याचें मला कधींही दिसून आलेलें नाहीं. कॅथालिक इमॅन्सिपेशनच्या दिवसापासून तों आजपर्यंत आपण श्रम केल्यावांचून, दुःख भोगल्यावांचून, नुकसान सोसल्यावांचून आणि ज्याच्या योगानें इंग्लिश लोकांच्या मनामध्यें धास्ती उत्पन्न होईल अशा प्रकारची एखादी प्रचंड चळवळ उत्पन्न केल्यावांचून आपल्याला कांहीं एक मिळालेलें नाहीं. अशा स्थितींत सार्वजनिक कामाच्या बाबतींत मीं आपलें धोरण असें ठरविलें आहे कीं, आयर्लंडमधील सरकारच्या प्रत्येक खात्यांतील नोकरांना कायदेशीर रीतीनें अडविल्यावांचून आपलें कोणतेंही काम व्हावयाचें नाहीं. हें आपलें तत्त्व मीं झांकून ठेविलेलें नाहीं. तें मी हौस ऑफ कॉमन्समध्येंही बोलून दाखविलें आहे. तुम्हांला आपल्या जमिनीची सुधारणा व्हावयाला पाहिजे आहे, तुम्हांला कॅथॉलिक युनिव्हर्सिटी पाहिजे आहे, तुम्हांला मजूर लोकांकरिता न्याय पाहिजे आहे; पण हे लोक त्रासदायक आणि भयंकर आहेत, असें तुम्हीं आपल्याबद्दल इंग्लिश सरकारला भासविल्यावांचून तुम्हांला ह्यांपैकीं कांहीं एक मिळणार नाहीं." परंतु ह्या गोष्टी करतांना आयरिश लोकांनीं कोणतीही अन्यायाची गोष्ट करूं नये, कायदेशीर रीतीनें करतां येण्यासारख्या ज्या चळवळी आहेत त्याच कराव्या. आपण कायद्याविरुद्ध अन्याय केला तर आपल्यावर जास्त जुलमाची राज्यपद्धति सुरू करण्याला मात्र उलट त्यांना जागा सांपडते, म्हणून आपणही न्यायानेंच वागलें पाहिजे, वगैरे मुद्दे मि. जॉन रेडमंड यांच्या भाषणामध्यें होते.

त्यांच्या भाषणांतील हा शेवटचा मुद्दा—अन्यायानें आणि गैरकायदेशीर रीतीनें कोणतेंही कृत्य न करण्याचा मुद्दा—फारच महत्त्वाचा आहे व तो सर्वांनीं अवश्य लक्षांत बाळगिला पाहिजे. आतां मि. रेड्मंड यांनीं सरकारला पावलों-पावलीं अडविण्याचा आणि त्रास देण्याचा जो एक मार्ग आपल्या आयरिश लोकांना सुचविलेला आहे, त्याबद्दल विचार करून पाहतां तसलाही मार्ग आपल्याला नको. इंग्लंडमधील लिबरल पक्षासारख्या पक्षाचा आश्रय केल्यानें हिंदुस्थानचें कल्याण होणार नाहीं असें आपल्याला वाटत नाहीं. इंग्लिश लोक परोपकारबुद्धीनें हिंदुस्थानचें कल्याण करणार नाहींत असेंही आपल्याला वाटत नाहीं. त्याचप्रमाणें नुसत्या खरेपणाच्या, प्रमाणाच्या किंवा मनधरणीच्या जोरावर आपल्याला इंग्लंडपासून न्याय मिळणारच नाहीं, असेंही मानण्याला आपल्याला कांहीं कारण नाहीं. तेव्हां आपली जर ह्या बाबतींत आयर्लंडसारखी स्थिति नाहीं, तर आपल्याला त्यावरचीं आयर्लंडचीं औषधें तरी कशाला पाहिजेत ? तसले मार्ग आपल्याला नकोत. त्यांच्यांत जेवढें चांगलें असेल तेवढें आपण अवश्य घ्यावें, आणि ठराव पास करण्याच्या गोष्टीच्या निरुपयोगीपणाचा त्याचा अनुभव चांगला आहे; बाकीचे त्यांचे उपाय आपल्याला अग्राह्यच होत. बावगी गोष्ट आपण कोणतीही करूं नये. पण त्याच्याच बरोबर निरुपयोगी गोष्टी करण्याचेंही आपण थांबविलें पाहिजे. नुसतें जलताडन करीत बसण्यांत अर्थ काय आहे ?

# केवळ झोंप लागली असतां जांभूळ तोंडांत पडलें ! : : : १६

काळ : अग्रलेख ता. २९।११।१९०१

मि. मलबारी यानीं 'ईस्ट ॲण्ड वेस्ट' ह्या नांवाचें एक मासिक पुस्तक काढलें आहे. त्यांत मि. दत्त ह्यांनीं 'मराठ्यांच्या अमलांतील लोकांची सांपत्तिक स्थिति' ह्या विषयावर एक लेख लिहिला आहे. त्यांत इतर गोष्टींबद्दल लिहीत असतांना पेशव्यांचें राज्य कसें नष्ट झालें, ह्याच्यबद्दलही मि. दत्त ह्यांनीं प्रसंगानुसार थोडासा उल्लेख केलेला आहे. पेशव्यांच्या कुटुंबांत आणि पेशव्यांच्या छत्राखालीं असलेल्या सरदारांमध्यें त्या वेळीं आपसांत तंटे होते ही गोष्ट खरी. परंतु असले बारीकसारीक तंटे नेहमीं चालतच होते. ज्या प्रकारचे आपसांतील तंटे दुसऱ्या बाजीरावाच्या वेळीं उद्भवले होते, तसल्याच प्रकारचे तंटे पंतप्रतिनिधि वगैरेंच्या संबंधानें पहिल्या बाजीरावाच्या वेळीं उद्भवलेले नव्हते असें नाहीं. थोरल्या माधवरावांच्या वेळीं राघोबादादांनीं आपसांत थोडथोडके तंटे माजविले होते असें नाहीं; आणि ह्या गृहकलहांचा आणि बाहेरच्या फितुरीचा नारायणराव पेशव्यांच्या कारकीर्दीमध्यें तर इतका कळस झाला होता कीं, प्रत्यक्ष पेशव्यांच्या गादीवरील मुख्य पुरुषाची आहुति घेतल्यावांचून तो कल्हाग्नि शांत झाला नाहीं. नारायणरावाच्या वधानंतर जें प्रचंड बारभाई कारस्थान झालें, त्यांतून सवाई माधवराव सुरक्षितपणें गादीवर येतील आणि नाना फडणविसांच्या हातीं सर्व राज्यसूत्रें सुयंत्रितपणें पडतील असें कोणालाहि वाटलें नव्हतें. तरी पण आपसांत तंटेबखेडे होत

असूनही सबंध अठराव्या शतकाच्या अखेरपर्यंत पेशव्यांची गादी अव्याहतपणें चालली होती. आतां असलेच तंटे दुसऱ्या बाजीरावाच्या वेळींही होते. तेव्हां त्या तंट्यांमुळेंच दुसऱ्या बाजीरावाच्या वेळीं पेशवाई गेली असें म्हणतां येत नाहीं. त्याला दुसरीं कांहींतरी कारणें असलीं पाहिजेत, व त्या कारणांपैकीं इंग्लिशांचें हिंदुस्थानांतील अस्तित्व हें एक प्रमुख कारण आहे. दुसऱ्या बाजीरावाच्या वेळीं जर इंग्लिश लोक पुण्याच्याभोंवतीं घिरट्या घालीत नसते, तर पूर्वींची आपसांतील पेशव्यांचीं भांडणें आपोआप जिरलीं, त्याचप्रमाणें शेवटच्या बाजीरावाच्या वेळचींही जिरलीं असतीं. परंतु शेवटच्या कारकीर्दींत ह्या भांडणाचा फायदा करून घेण्यासाठीं इंग्लिश लोक टपून बसले होते. त्यामुळें पेशवाईचा ऱ्हास झाला. निदान त्यामुळें पेशवाईचा ऱ्हास लौकर झाला, असें मि. दत्त ह्यांनीं प्रतिपादन केलें आहे. ते म्हणतात कीं, कोणातरी दोघां नेटिव्ह राजांची आपसांत भांडणें चाललेलीं असलीं म्हणजे त्यांत पडून आपलें हित साधून घ्यावयाचें ही कारस्थानाची पद्धत स्वीकारण्याची युक्ति ईस्ट इंडिया कंपनीच्या नोकरांना बंगाल आणि मद्रास ह्या इलाख्यांमध्यें चांगली साधली होती. सुजाउद्दौला, उमीचंद, मीरकासिम हे ह्याच युक्तीनें हतवीर्य करण्यांत आलेले होते. आणि फोर्ट सेंट डेव्हिड, त्रिचनापल्ली, अर्काट, वगैरे ठिकाणीं ह्याच युक्तीनें ओसरीवर बसलेल्या इंग्लिशांनीं आपले हातपाय पसरलेले होते व त्याच प्रकारच्या युक्तीचें अवलंबन करण्याला मुंबई इलाख्यांतीलही कंपनीच्या नोकरांनीं बिलकूल मागेंपुढें पाहिलें नाहीं; व हीं कारस्थानें आणि ह्या युक्त्या पुण्याच्या भोंवतीं पसरल्या असल्यामुळें बाजीरावाचें राज्य लौकर गेलें असें मि. दत्त यांच्या लिहिण्याचें धोरण आहे. परंतु हें लिहिणें 'टाइम्स'कारांना पसंत न पडून त्यांनींही कांहीं दिवसांपूर्वीं यासंबंधानें एक लेख प्रसिद्ध केला आहे. त्यांत त्यांचें असें म्हणणें आहे कीं, इंग्लिशानीं त्यावेळीं कपटकारस्थानें केलीं म्हणून पेशव्यांचें राज्य गेलें असें नसून, मराठ्यांची सत्ता नाहींशी होण्याला दुसरीं कारणें घडून आलेलीं होतीं. त्यावेळीं मराठी राज्य फार भ्रष्ट झालेलें होतें. पेशवे लोकांवर जुलूम करीत होते. आणि कांहीं विशिष्ट जातीचा फायदा होण्यासाठीं बाकीच्या लोकांचे हक्क पायाखालीं तुडविले जात होते. आतां ती सत्ता ब्रिटिश लोकांच्या हातांत आली, ह्याचें कारण एवढेंच कीं, ब्रिटिश लोक पुण्याच्या जवळ होते आणि पेशव्यांचें राज्य घालविण्याला कारणीभूत होणारे

जे दुर्गुण पेशव्यांच्या अंगामध्यें होते, ते इंग्लिशांच्या अंगांत नव्हते. एवढ्याच-मुळें पेशव्यांचें राज्य इंग्लिशांकडे आलें. त्या वेळचे पेशवे लोकांवर जुलूम करीत असत आणि कांहीं विशिष्ट जातींच्या लोकांचा फायदा होण्यासाठीं बाकींच्या-वर जुलूम करीत असत, आणि त्यावेळचे इंग्लिश लोक मात्र सद्गुणांचे मूर्ति-मंत पुतळे होते. ह्या गोष्टी अगदीं तंतोतंत खऱ्या आहेत किंवा नाहींत ह्याविषयीं वाद करण्याचे हे दिवस नाहींत. कोणी महिपीनाथ आपन्नसत्त्व आहे असें म्हटलें तर नऊ महिने झाले आहेत, असें म्हणण्याचे हे दिवस आहेत. तेव्हां अशा स्थितींत हा प्रश्न सोडून देऊन 'टाइम्स'कारांच्या म्हणण्यांतून जेवढें काय निष्पन्न होईल तेवढ्यावरच आपण आज संतुष्ट राहिलें पाहिजे. पण त्यांच्या म्हणण्यांतूनदेखील थोडें निष्पन्न होत आहे असें नाहीं. ते म्हणतात कीं, पेशव्यांचें राज्य घेण्याला इंग्लिशांनीं कपटकारस्थानें केलीं, हें म्हणणें अगदीं खोटें आहे. पश्चिम किनाऱ्यावरील मुंबई इलाख्यांत नवीन मुलूख संपादन करण्याचे कामीं ब्रिटिश लोक जितके मार्ग घेत होते, तितके त्यांनीं दुसऱ्या कोठेंच घेतले नव्हते. म्हणजे एकंदरींत 'टाइम्स'च्या म्हणण्यांतील भावार्थ असा दिसतो कीं, बंगाल आणि मद्रास ह्या इलाख्यांत काय झालें असेल तें असो, पण पश्चिम किनाऱ्यावर इंग्लिशांनीं कांहीं एक कारस्थानें केलीं नाहींत. एखाद्या जांभळीच्या झाडाखालीं सहजगत्या पडलेलें असावें, आणि त्या झाडावरून एखादें जांभूळ अतिशय पिकलें असल्यामुळें सृष्टि-नियमाप्रमाणें गळून पडावें, पण तें नेमकेंच खालीं निजणाऱ्याच्या मिटले-ल्याही तोंडामध्यें येऊन पडावें, त्याप्रमाणें घुणाक्षरन्यायानें ह्या सर्व गोष्टी घडून आल्या आहेत! असें होणें अशक्यच आहे असें नाहीं. पण इंग्लिशांनीं १८०० पासून १८१८ पर्यंत कांहींच कारस्थानें केलीं नाहींत असें दुसरा कोणी वाटेल तर म्हणो, इतिहास म्हणत नाहीं. वसईचा तह हें एक जंगी कारस्थान होतें, व हें कारस्थान अगदीं उघड उघड रीतीनें करण्यांत आलेलें होतें; व दुसरें आणि शेवटचें कारस्थान गंगाधरशास्त्रयांच्या खुनापासून सुरू झालें. हेंही कारस्थान राजरोसपणें चालविण्यांत येत होतें. गायकवाडांना आपल्या हातांत धरून त्यांच्यासाठीं पेशव्यांजवळ कदाई उपस्थित करणें किंवा होळकर आणि पेशवे यांच्या मांडणामध्यें आराग पडणें अशाच प्रकारचीं कारस्थानें इंग्लिशांनीं मद्रास आणि बंगाल्यांत केलीं होतीं. ह्याशिवाय

दुसरें त्यांनीं तेथें तरी काय केलें होतें ! ह्यापेक्षां कांहीं भयंकर कारस्थानें तिकडे योजण्यांत आलीं असलीं तर परमेश्वर जाणे. पण इंग्लिशांनीं लिहिलेल्या इतिहासामध्यें असलींच काय तीं कारस्थानें नमूद करून ठेवण्यांत आलेलीं आहेत. त्यांवरून पाहतां इंग्लिशांनीं बंगाल्यांत आणि मद्रासेंत जें केलें तेंच बहुतेक वसईस आणि पुण्यास केलें. आतां असें जर आहे, तर तिकडच्या-सारखा प्रकार इकडे इंग्लिशांनीं केला नाहीं, असें जें 'टाइम्स' कारांनीं हळूच ध्वनित केलें आहे त्यांत काय अर्थ आहे ? आतां इंग्लिशांनीं पश्चिम किनाऱ्यावर मुलूख मिळविण्याच्या कामीं कशीं कशीं कारस्थानें केलीं, हें जरी वर थोडेंसें दाखविण्यांत आलेलें आहे, तरीदेखील 'टाइम्स'च्या म्हणण्याप्रमाणें इंग्लिशांनीं इकडे कांहींएक कारस्थानें केलीं नाहींत असें आपण क्षणभर गृहीत धरूं. पण असें गृहीत धरलें, तरी त्यापासून इंग्लिशांच्या पथ्यावर पडणारें असें कांय निष्पन्न होत आहे ? पश्चिम किनाऱ्यावर बंगाल आणि मद्रासप्रमाणें मुळींच कारस्थानें केलीं नाहींत, ह्या निर्देशापासून मोठ्या पुरुषार्थाची अशी काय गोष्ट फलित होत आहे ! कपटकारस्थानें करणें ही गोष्ट जर वाईट असेल, तर ती कोठेंही केली म्हणून काय झालें ! वाईट गोष्ट ती सर्व ठिकाणीं वाईटच. मग ती पश्चिम किनाऱ्यावर असो, किंवा कारोमांडेलच्या किनाऱ्यावर असो, किंवा हुगळी नदीच्या किनाऱ्यावर असो. पुण्याचें राज्य बुडविण्यासाठीं कारस्थानें केलीं नसलीं तरी बहार व ओरिसाचें आणि अर्काटचें राज्य बुडविण्याला कारस्थानें केलीं ना ! मग तें चांगलें की वाईट ! 'टाइम्स'कार मुंबई इलाख्यां-तील इंग्लिशांची बाजू सांवरून धरण्याचा प्रयत्न करीत असतां दुसरी बाजू न कळत त्यांच्या अंगावर त्यांच्याच शब्दांनीं येत आहे, हें त्यांच्या लक्षांत आलेलें नाहीं असें दिसतें. मुंबईसंबंधानें लिहावयाचें होतें तेव्हां बंगाल्यांत आणि मद्रासेस इंग्लिशांनीं कारस्थानें केलीं, पण मुंबईकडे केलीं नाहींत, असें ज्याप्रमाणें सांगण्यांत आलें, त्याप्रमाणें उद्यां मद्रासची गोष्ट निघाली, तर बंगाल्यांत आणि मुंबईकडेमात्र कारस्थानें करण्यांत आलीं, मद्रासेस कांहीं एक केलें नाहीं, असें चुकून प्रतिपादन करण्यांत न येवो म्हणजे झालें. कारण, खरें नजरचुकीनें केव्हां आणि कसें बाहेर पडून जातें हें मुळींसुद्धां समजण्यांत येत नाहीं, अशी त्यांच्याबद्दल मोठी भीति असते !

# स्थानिक स्वराज्य ? : : : १७

काळ : अग्रलेख ता. २०-१२-१९०१

सर मॅक्वर्थ यंग हे पंजाबचे ले० गव्हर्नर आहेत. पंजाबमधील डिस्ट्रिक्ट लोकल बोर्डांची व्यवस्था कशी काय चालली आहे, ह्यासंबंधानें सर मॅक्वर्थ यंग ह्यांनीं नुकताच आपला एक अभिप्राय प्रसिद्ध केला आहे. त्यांत सांगितलेल्या कित्येक गोष्टी जरी मुख्यत्वेंकरून फक्त पंजाबसंबंधानेंच सांगितलेल्या आहेत, तरी त्या गोष्टी इतर इलाख्यांनाही लागू पडण्यासारख्या आहेत. लोकलबोर्ड ही संस्था मूळची आपली नव्हे, ही इंग्लिशांची आहे. ही हिंदुस्थानांतील नव्हे, ती इंग्लंडमधील होय. पूर्वी जसें सत्यनारायणाचें व्रत ह्या मृत्युलोकांतील मनुष्यांना माहीत नव्हतें, परंतु त्यांचा उद्धार व्हावा म्हणून वैकुंठवासी भगवंतांनीं तें नारदाच्या मध्यस्थीनें कृपाळू होऊन या भूमंडळावर प्रचलित केलें, त्याप्रमाणें आपल्या इंग्लिश राज्यकर्त्यांनीं आपल्या हिंदुस्थानांतील लोकांच्या उद्धाराकरितां हें स्थानिक स्वराज्याचें तत्त्व लॉर्ड रिपनसाहेबांच्या मध्यस्थीनें या आर्यभूमीमध्यें सुरू केलें आहे. आतां या स्थानिक स्वराज्याच्या तत्त्वापासून हिंदुस्थानांतील लोकांचा कितपत उद्धार झाला आहे हा एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे. हिंदुस्थानांतील लोकांना हा स्थानिक स्वराज्याचा हक्क देण्यामध्यें मूळ उद्देश असा होता कीं, त्यामुळें सदर लोकांना स्थानिक स्वराज्यांतील सार्वजनिक कामें करण्याचें शिक्षण थोडथोडें मिळत जावें, व अशा रीतीनें हिंदुस्थानांतील लोकांना सार्वजनिक कामें करण्याचें शिक्षण मिळालें म्हणजे ते लोक तयार होऊन सार्वजनिक कामें करण्याला पुढें येऊं लागल्यानें सरकारी अधिकाऱ्यांवर सर्वच

प्रकारच्या कामांचा जो हल्लीं अतिशय भार पडत आहे, तो कांहीं तरी हलका होईल, हा सदर देणगी देण्यांतील दुसरा हेतु होय. सरकारच्या हल्लीं असलेल्या अधिकाऱ्यांवर जर अनेक प्रकारच्या कामांचा अतिशय मोठा भार पडत होता व तो हलका व्हावयाला पाहिजे होता, तर त्याला अगदीं सोपी युक्ति होती. आणखी अधिकारी नेमले असते म्हणजे झालें होतें ! आतां एवढें खरें कीं, त्या अधिकाऱ्यांना महिन्याच्या शेवटच्या तारखेला पगार मोजावा लागला असता. त्यांनीं फुकट हमाली केली नसती. तेव्हां सरकारचें कांहीं काम फुकटांत व्हावें, कामाच्या ओझ्यानें लादलेल्या सरकारी अधिकाऱ्यांच्या पाठीवरील कामाचें ओझें पदरचें खाऊन लष्करच्या भाकऱ्या भाजून देणाऱ्या लोकांकडून कांहीं तरी हलकें केलें जावें, एतदर्थ हें स्थानिक स्वराज्याचें तत्त्व आपल्या देशामध्यें अवतीर्ण झालें आहे असें दिसतें. अथवा सरळ भाषेनें बोलावयाचें म्हटलें, तर स्थानिक स्वराज्याचा हक्क म्हणजे भोळसर लोकांकडून फुकट काम करून घेण्याचाच हक्क होय, असें म्हटलें तर तें फारसें गैरशिस्त होईल असें नाहीं. असल्या हक्कापासून सरकारचा काय फायदा होतो, हें स्पष्ट रीतीनें दिसून येण्यासारखें आहे. परंतु लोकांचा ह्यापासून काय फायदा होतो हें मात्र तितक्या स्पष्ट रीतीनें दिसून येण्यासारखें नाहीं. सरकारचे पैसे वांचतात हा सरकारचा फायदा उघड उघड आहे. पण लोकांचा काय फायदा आहे ! निष्फळ निवडणुकीसाठीं अटीस पडून पदरच्या किंवा पुढें पदरांत पडणाऱ्या पैशाचा मुबलक खर्च, हाच त्यांचा फायदा असला तर न कळे. परंतु असा कोणी प्रश्न विचारील कीं, स्थानिक स्वराज्याचें शिक्षण हिंदुस्थानांतील अशिक्षित आणि न सुधारलेल्या लोकांना ह्या योगानें मिळतें हा काय लहानसहान फायदा आहे. लोकलबोर्डें आणि म्युनिसिपालिट्या ह्यांचीं नांवेंसुद्धां आपल्याला माहीत नव्हतीं. परंतु प्रत्यक्ष त्या संस्था इंग्रज सरकारनें मेहेरबान होऊन आपल्याला दिल्या आहेत. तेव्हां त्यांपासून आपला कांहीं फायदा नाहीं असें म्हटलें तर तें सकृद्दर्शनींच विसंगत दिसणार नाहीं काय, असे प्रश्न उत्पन्न होतात. परंतु वस्तुस्थिति याहून अगदीं भिन्न आहे. लोकलबोर्डें आणि म्युनिसिपालिट्या ह्यांच्या द्वारानें सरकार आपल्याला कसलें शिक्षण देतें ! स्थानिक स्वराज्याचें ! हिंदुस्थानांतील लोकांची जन्मभाषा मराठी, गुजराथी, हिंदी, तेलगु, बंगाली किंवा पंजाबी ह्यांपैकीं कोणती तरी असल्यामुळें त्यांना

इंग्रजी भाषेचें शिक्षण देणें हें ठीक आहे. हिंदुस्थानांतील लोकांना आगबोटी बांधतां येत नाहींत, तेव्हां तें जर त्यांना शिकविलें असतें, तर त्यालाही शिक्षण असें नांव देतां आलें असतें. पण जो चांगला पंडित झालेला आहे, त्याला पाटीवर धूळ घालून ओनाम्याचा धडा घोकीत बसविणें, हें त्याला शिक्षण देणें नव्हे. रोजची वीस वीस कोस मजल मारणाऱ्या गड्याच्या हातांत पांगुळगाडा देऊन त्याला ओणवा वांकवून त्याला एकेक पाऊल टाकावयाला लावणें, हें त्याला चालण्याच्या कलेंतील शिक्षण देणें नव्हे. बैठेला शेराच्या किंवा दोन शेराच्या भाकऱ्या उठविणाऱ्या मोठ्या जवान मनुष्याला आपल्या मांडीवर घेऊन अतिशय प्रेमानें त्याची पाठ कुरवाळून 'बाळा, उगी राहा, भुकेसाठीं रडूं नको अं, आतां मुमुहूर्त पाहून तुझें उष्टावण करण्याचा बेत आहे!' असें त्याला सांगणें, म्हणजे त्याला भक्षणशास्त्रांतील प्राथमिक शिक्षण देणें नव्हे, तर हें त्याला उपाशी मारणें आहे. अशाच तऱ्हेचा कांहींसा प्रकार हिंदुस्थानांतील लोकांना स्थानिक स्वराज्याचें शिक्षण देण्यामध्यें होत आहे. हिंदुस्थानांतील लोकांना स्थानिक स्वराज्याचें शिक्षण कसलें देतां! त्यांनीं बदरीकेदाराच्या टेकड्यांपासून तों रामेश्वराच्या वाळवंटांपर्यंत सर्व हिंदुस्थानावर अनेक वर्षें स्वराज्य चालविलें होतें, त्यांना स्थानिक स्वराज्य कसें करावें ह्याचें शिक्षण देणें म्हणजे निष्फळ थट्टा आहे. ह्यांत कोणाला मान वाटत असेल तर असो, पण वास्तविक पाहतां हा एक अपमानच आहे. ज्या मराठ्यांनीं, ज्या रजपुतांनीं, ज्या मुसलमानांनीं आणि ज्या शीख लोकांनीं महाराष्ट्र, राजपुताना, उत्तर हिंदुस्थान, पंजाब वगैरे अनेक ठिकाणीं अनेक वर्षेंपर्यंत सुयंत्रित रीतीनें स्वराज्य चालविलें होतें, त्यांना एखाद्या खेड्यांतील स्थानिक स्वराज्य—तें देखील खरें स्वराज्य नव्हे—करावयाला सांगितलें असतां 'पुरा सरसि मानसे विकचसारसालिस्खलत्परागसुरभीकृते पयसि यस्य यातं वयः। स पल्वलजलेऽधुना मिलदनेकभेकाकुले। मरालकुलनायकः कथय रे कथं वर्तताम्।' ह्या जगन्नाथानें विचारलेल्या प्रश्नाची कोणाला आठवण होणार नाहीं! ज्यांनीं शनवारच्या वाड्यांतून दक्षिणेस श्रीरंगपट्टणापर्यंत आणि उत्तरेस अटकेपर्यंत राज्यकारभार चालविला, ज्यांनीं दिल्लीच्या तख्तावरून अयोध्या, गुजराथ, बंगाल, वऱ्हाड, खानदेश, विजापूर वगैरे दूरदूरच्या मुलुखांचीं कामें सुव्यवस्थित रीतीनें केलीं, आणि ज्यांनीं लाहोरच्या किल्ल्यांतून सर्व शीख लोकांचे हातानें पंजाब

कांहीं दिवसपर्यंत फक्त ‘ पंजाबी लोकांकरितां ’ असें करून ठेविलें होतें, त्या लोकांना आतां पुण्याचे रस्ते झाडण्याचा अधिकार मिळाल्याबद्दल, दिल्लीच्या चांदणी चौकांत दिवे लावण्याचा हक्क मिळाल्याबद्दल, किंवा लाहोरच्या अनारकलींतील रस्त्यावरील धूळ जलसिंचनानें जागच्या जागीं दाबून टाकण्याचा अधिकार मिळाल्याबद्दल भूषण वाटण्याइतका आपल्या पूर्वीच्या वैभवाचा आणि कर्तृत्वाचा कोणाला विसर पडला असेल तो असो. परंतु ज्याच्या डोक्यांत थोडी तरी स्मृति आहे, त्याला असल्या हक्काबद्दल अभिमान वाटणें अशक्य आहे. इंग्लिश लोकांना असें वाटत आहेसें दिसतें कीं, आपण हिंदुस्थान जिंकलें त्याच दिवसापासून जगाला प्रारंभ झाला आहे. त्याच्या पूर्वी हिंदुस्थानांत कोणी मनुष्य नव्हते. असले तरी त्यांना कांहीं येत नव्हतें, आणि आतां उदार अंतःकरणानें त्यांना सर्व कांहीं थोडथोडें शिकविलें पाहिजे. अशी ते आपली समजूत करून घेतात, आणि आमचे इकडील बहुतेक पढतमूर्खांचीही करवितात. ते आपली समजूत अशा तऱ्हेची करून घेतात ह्यांत त्यांचा फायदाच असतो; परंतु आपला मात्र तोटा असतो. आपण स्थानिक स्वराज्यांतील म्हणजे एखाद्या खेड्यांतील नामधारी राजे होऊन आपले रस्ते झाडण्याच्या अधिकारामध्यें गुंग होऊन जातों, व तिकडे ते खऱ्या सार्वत्रिक स्वराज्याचे राजे होऊन खऱ्या सुखाचा अनुभव घेत असतात. अशा रीतीनें आपण उंसाच्या अग्रभागावरील पानांच्या सौंदर्याला भुलून तेथेंच रममाण होतों. परंतु ही आपली चुकी आहे.

इंग्लिश लोक आपल्याला सांगत असतात कीं, हे हक्क तुम्हांला प्रथम दिले आहेत. त्यांचा चांगला उपयोग करून स्थानिक स्वराज्याच्या वरिष्ठ हक्कांला तुम्ही पात्र झालां, म्हणजे ते तुम्हांला देऊं. ह्यांत पूर्वीची अपात्रता ध्वनित केलेली असते. पण वास्तविक स्थिति पाहिली तर हा पात्रापात्रतेचा प्रश्न नाहीं. हक्क मिळण्याच्यापूर्वी अपात्रता नसते आणि जर असेल तर हक्क मिळाल्यावरही ती कायमच असते. ती जाऊन जास्त पात्रता ती काय येते ! लोक हक्क मिळण्याच्यापूर्वी जसे असतात तसेच मिळाल्यावरही असतात. म्हणून हा पात्रापात्रतेचा प्रश्न नव्हे. हा द्यावे कीं न द्यावें, एकदम द्यावे कीं थोडें थोडें द्यावें, ह्यांना दिलें तर आपल्याला काय राहील, ह्याविषयींचा प्रश्न असतो. एखाद्या मोठ्या माणसाला लहान मूल समजून त्याला एखाद्या परोपकारी गृहस्थानें म्हणावें कीं,

'तूं इतकें जेवीत जाऊं नको, ह्यानें तुझी प्रकृति बिघडेल, इतकें खाण्याला तुझ्या अंगीं अजून पात्रता आली नाहीं. तूं दररोजचा सुपारीएवढा भात खात जा, तो तुला पचूं लागला म्हणजे तुझें खाणें दोन सुपाऱ्यांएवढ्या भातापर्यंत वाढवूं, तोंपर्यंत तुझ्या जवळचें अन्न माझ्यापाशीं असूं दे. तुझी पचनशक्ति वाढली म्हणजे मी तुझें तुला परत देईन;' त्याचप्रमाणें ह्या स्थानिक स्वराज्याच्या हक्काची स्थिति आहे. आणि तसल्या प्रकारच्या उपकाराचा भडिमार सरकारकडून आम्हां हिंदुस्थानांतील लोकांवर होत आहे. सरकार फार परोपकारी असल्यामुळें आम्हांला चांगलें चालतां येत असूनही आमच्यापुढें सरकार पांगुळगाडा आणून मांडीत आहे. आणि आम्ही आजपर्यंत अनेक पक्वान्नें सेवन करून पचविलीं असतांही आमचें दयाळू सरकार आमच्या उष्टावणाला मुहूर्त पाहत आहे. अशा स्थितींत ह्या पांगुळगाड्याच्या उष्टावणाच्या किंवा स्थानिक स्वराज्याच्या विटंबनेंत न पडतां श्रीमत् शंकराचार्य विरचित मोहमुद्गरस्तोत्र म्हणत स्वस्थ बसलेलें काय वाईट ! इंग्रज लोक हिंदुस्थानांत येण्यापूर्वीं हिंदुस्थानांतील लोक बोळ्यानें दूध पीत होते असें नाहीं. त्यांना आपल्या कामापुरतें सर्व कांहीं समजत होतें. जे कांहीं नवीन शास्त्रीय शोध आज लागलेले आहेत, ते त्यांना माहीत नसतील; पण बाकी कामापुरतें सर्व त्यांना माहीत होतें. ही गोष्ट त्यांच्या इतिहासावरून अगदीं स्पष्ट होत आहे. असें असतां तुम्हांला अमुक माहीत नाहीं, आणि तमुक माहीत नाहीं, आणि तुम्हांला अमुक शिकविलें पाहिजे, आणि तमुकाबद्दल तुमच्या अंगामध्यें पात्रता उत्पन्न केली पाहिजे, असल्या हुलकावण्या दाखविण्यांत काय अर्थ आहे ! कांहीं द्यावयाचें नसेल तर नाहीं म्हणून स्पष्ट सांगितलेलें काय वाईट ! आपण हल्लीं बोलून चालून जिंकलेले आहों, हें हिंदुस्थानांतील लोक जाणून आहेत. तुम्हांला कांहीं एक मिळणार नाहीं असें म्हटलें तर ते काय करणार आहेत ! त्यांच्या हातीं काय आहे ! आणि त्यांच्या अंगांत काय बकूब आहे ! तेव्हां असें स्पष्ट सांगितलें तर मृगजळापाठीमागें धांवत सुटणाऱ्या बिचाऱ्यांचे पाय तरी दमणार नाहींत. बाकी धांवलें काय आणि स्वस्थ बसलें काय सारखेंच आहे. मग त्यांना हा स्थानिक स्वराज्याचा तरी रिकामा उपद्व्याप पाहिजे आहे कशाला ! हिंदुस्थानांतील लोकांचें समुद्रवलयांकित सर्व हिंदुस्थानावरील विस्तीर्ण स्वराज्य

घेऊन त्यांना अलस्वल असें स्थानिक स्वराज्य द्यावयाचें, आणि तेंही दिल्या-बद्दल स्वकीय औदार्याच्या फुशारक्या ! इतका खटाटोप पाहिजे कशाला ! ज्यांचा कोहळा. गेला त्यांना त्याच्या मोबदला जरी आंवळा मिळाला तरी त्यांत त्यांचें खरें हित तें काय झालें ! ह्याच्यापेक्षां स्वस्थ बसलेलें काय वाईट ! हा विचार जरी अलीकडच्या ओघांत सांपडून भलतीकडेच वाहत जाणाऱ्या कित्येक लोकांना पसंत पडला नाहीं, तरी हिंदुस्थानांतील बहुतेक लोक ह्याच विचाराचे आहेत. आणि म्हणूनच स्थानिक स्वराज्याच्या संस्थेच्या मुळांना ह्या हिंदुस्थानच्या जमिनींत जोर लागत नाहीं, व तो कधीं लागेल असा संभवही नाहीं. स्थानिक स्वराज्याचा हक्क आपल्याला दिला आहे म्हणजे सरकारनें आपल्याला काय दिलें आहे, हें कांहीं मूर्ख लोकांखेरीजकरून बाकी सगळ्यांना पूर्णपणें कळून चुकलेलें आहे. तेव्हां ह्या मुलाम्याच्या भांड्याला कोण भुलतो ! ह्या लहान मुलांच्या खेळण्याच्या वस्तूंशीं कोण विनाकारण बागडत बसतो ! हिंदुस्थानांतील बहुतेक लोकांना सोनें आणि पितळ, चांदी आणि कथील, बर्वे आणि बेगड, ईश्वरनिर्मित आंब्याच्या झाडावरील फळ आणि गोकाकच्या आंब्याचें फळ ह्यांच्यामधील फरक चांगला कळतो. म्हणून ते ह्या स्था.स्व.च्या भरीस फारसे पडत नाहींत. सर मॅक्वर्थ यंग म्हणतात कीं, १८८२ मध्यें हा स्थानिक स्वराज्याचा हक्क लोकांना देण्यांत आला, व त्या गोष्टीला आज अठरा वर्षें झालीं. तरी पण अजून लोकांना ह्याची गोडी लागत नाहीं. कशी लागणार ! आंतून मातीच्या आणि वरून मात्र रंगवलेल्या गोकाकच्या आंब्याच्या फळा-मध्यें कोणाला गोडी लागणार ! चिंध्यांनीं बनविलेल्या बाहुलीवर कोण विषयासक्त होणार ! किंवा गारोड्यानें जादूनें उत्पन्न केलेल्या रुपयांना पाहून कोणाची धनतृष्णा प्रशमित होणार ! इंग्लिश लोक हिंदुस्थानांतील लोकांना इतके मूर्ख समजतात काय कीं, गोकाकचे आंबे पाहून त्यांच्या जिभेला पाणी सुटावें आणि चिंध्यांची बाहुली पाहून त्यांचीं मनें विषयासक्त व्हावीं ! गोका-कच्या आंब्यासाठींहि जिभा चाटणारे आणि चिंध्यांच्या बाहुल्यांसाठींही काम-लंपट होणारे काहीं मूर्ख आहेत. परंतु बाकीच्या सर्व लोकांना ह्या वस्तूंची किंमत समजते. आणि म्हणून ते कधींही अंतःकरणपूर्वक रीतीनें असल्या गोष्टींच्या नादीं लागावयाचे नाहींत. सर मॅक्वर्थ यंग ह्यांनीं किंवा दुसऱ्या कोणीं कितीही भगीरथ प्रयत्न केले, तरी हिंदुस्थानांतील लोकांची प्रीति ह्या खोट्या मोत्यांवर

कधींही बसावयाची नाहीं. हे सृष्टिनियमांच्या विरुद्ध आहे. इंग्लिश लोक कृत्रिम उपायांनीं पाण्याच्या बुडबुड्याला हें मोती आहे म्हणून भासवीत आहेत; परंतु हें त्यांचें करणें नैसर्गिक नियमांच्या विरुद्ध आहे. पाण्याचा बुडबुडा सृष्टीच्या नियमांप्रमाणें एक मिनिटानें, दोन मिनिटांनीं, दहा मिनिटांनीं, पण केव्हां तरी फुटलाच पाहिजे. त्याला इंग्लिश लोक काय करणार ? स्थानिक स्वराज्याची गोडी येथील लोकांना लागणें अशक्य आहे. त्यांना जर विस्तीर्ण स्वराज्याची रुचि काय आहे हें कधींच कळलेलें नसतें, तर कदाचित् त्यांना ह्या स्थानिक स्वराज्यांतही गोडी लागली असती; पण ज्यांनीं प्रत्यक्ष ताजमहाल पाहिला आहे, किंबहुना ज्यांनीं प्रत्यक्ष ताजमहाल बांधिला आहे, आणि ज्यांनीं त्यामध्यें विलास केलेले आहेत, त्यांना जर हल्लींचे संगमरवरी दगडाचें ताजमहालाचें चित्र दाखविलें तर त्यांत त्यांना काय बरें गोडी लागणार आहे ? उलट त्या खऱ्या विस्तीर्ण ताजमहालांतील त्या त्या पूर्वपरिचित अनेक रम्य ठिकाणांची आठवण होऊन ह्या एक फूट औरसचौरस देवहारी पेटीमध्यें राहणाऱ्या ताजमहालाचा त्यांना तिटकाराच आला पाहिजे. जे त्या ताजमहालांत खेळले, त्यांचे आतां तेथें खेळण्याचे दिवस विधिघटनेमुळें गेले असले तर जावोत; पण त्यांना ह्या धाकट्या ताजमहालाच्या चित्रामध्यें तुम्ही फिरा, आणि ह्यांत फिरण्याचा तुम्हांला अभ्यास झाला म्हणजे मग ह्याच्यापेक्षां मोठ्या ताजमहालांत तुम्हांला नेऊं, असें म्हणणें म्हणजे त्यांच्या दुःखावर डाग देण्यासारखें आहे. तुमच्या अंगीं पात्रता आली म्हणजे तुम्हांला जास्त हक्क देऊं हें म्हणणें आणि हें तत्त्व, राज्यकर्त्यांच्या दृष्टीनें कसेंही असो, पण सामान्य लोकांच्या दृष्टीनें हें अगदीं अप्रयोजकपणाचें आहे. पात्रता कसली यावयाची ? हिंदुस्थानांतील लोकांना हीं कामें कशीं करावयाचीं हें पूर्वीं कधीं माहीत नव्हतें ? किंवा त्यांनीं तीं कधीं केलेलीं नाहींत ? मग हें पात्रतेचें घोडें मध्यें कशाला पाहिजे ? कांहीं करावयाचें नसेल तर खुशाल न करावें. पण आज शनवार आहे म्हणून करीत नाहीं, हें कशाला पाहिजे ? हा पात्रतेचा शनवार मध्यें कशाला पाहिजे ? जिंकलेल्या लोकांना स्थानिक स्वराज्याच्या हक्कांशिवाय जिवंत राहतां येत नाहीं. पुष्कळ लोक स्थानिक स्वराज्यावांचून जगलेले आहेत. इतकेंच नव्हे, तर अतिशय संतोषानेंही राहिलेले आहेत. खुद्द इंग्लिशांना एके वेळीं रोमन लोकांनीं जिंकिलें होतें. तेव्हां रोमन

लोकांनीं इंग्लिशांना कोठें स्थानिक स्वराज्याचा हक्क दिला होता? व तो हक्क नव्हता म्हणून इंग्लिशांनीं रोमन लोकांचें काय केलें होतें? अथवा हिंदुस्थानांतील का गोष्ट घ्याना! हिंदुस्थानावर मुसलमान लोकांचें पुष्कळ दिवसपर्यंत राज्य होतें. पण त्या मुसलमान राज्यकर्त्यांना 'स्थानिक स्वराज्या'चा हक्क हें नांवसुद्धां ठाऊक नव्हतें. मग आपल्या जिंकलेल्या प्रजेला भुरळून टाकण्यासाठीं त्याच्यापुढें त्या हक्काचा तुकडा टाकण्याची कल्पना त्यांच्या डोक्यांत आली नव्हती हें सांगावयाचें कारणच नाहीं. स्थानिक स्वराज्याच्या यत्किंचितही ज्ञानाशिवाय मुसलमान बादशहांनीं हिंदुस्थानचें राज्य पांचसहाशें वर्षें चालविलें आणि त्या मुदतींत त्यांची जिंकलेली प्रजाही असंतुष्ट झालेली होती असें नाहीं. प्रजेचा संतोष हा स्थानिक स्वराज्याच्यासारख्या बुडबुड्यावर फारच थोडा अवलंबून असतो. त्याच्याशिवायही प्रजा संतुष्ट राहूं शकते. आणि आज तरी इंग्लिशांच्या अमलाखालील प्रजेच्या मनांत जो संतोष नांदत आहे, त्याचें कारणत्व शंभराव्या हिश्शानेंसुद्धां स्थानिक स्वराज्याच्या बुडबुड्याकडे येईल किंवा नाहीं, याची शंकाच आहे. तेव्हां अशी वस्तुस्थिति असतां स्थानिक स्वराज्याच्या बुडबुड्यासाठीं जिंकलेल्या लोकांनीं अगदीं तुटून पडावें अशी इच्छा बाळगण्यांत किंवा त्यासाठीं प्रयत्न करण्यांत मोठासा अर्थ आहे असें नाहीं. पण इतकेंही करून अखेरीस लोकांच्या हातीं जर स्थानिक स्वराज्याचा बुडबुडाच द्यावयाचा असेल तर निदान तो एकदम तरी द्यावा. त्यांत आढेवेढे कशाला? त्यांत पात्रतेचा शनवार कशाला? आपल्याकडील कित्येक लोकांची मनःपूर्वक अशी समजूत आहे कीं, आपण खरोखरच अपात्र आहों व आपल्याला पात्र झालें पाहिजे. पण हा त्यांचा भ्रम आहे. आपण सर्वगुणसंपन्न आहों असें नाहीं. आपल्यालाही इंग्लिशांपासून कांहीं गुण शिकले पाहिजेत, हें कोणालाही कबूल केलें पाहिजे. परंतु स्थानिक स्वराज्यासारख्या हक्कांच्या देणगीच्या बाबतींत पात्रतेची जी सबब पुढें आणण्यांत येते, त्यांत मात्र कांहीं अर्थ नाहीं, व ह्याच्याबद्दल कांहीं पुरावा पाहिजे असेल तर तोही मिळण्यासारखा आहे. आपण कदाचित् अशिक्षित, अडाणी आणि पाश्चिमात्य सुधारणेच्या आणि प्रगतीच्या तत्त्वासंबंधानें अपरिचित् असूं; परंतु बोअर लोक खात्रीनें तसे नाहींत. त्यांना पाश्चिमात्य सुधारणेच्या सर्व मार्गांची पूर्ण माहिती झालेली आहे, ह्याबद्दल कोणालाही संशय असेल असें वाटत नाहीं. हल्लीं आतां ते

लोक जिंकले जाण्याच्या बेतांत आलेले आहेत. ते जिंकले जाऊन आपल्या ताब्यांत आले म्हणजे त्यांना इंग्लंड कोणत्या रीतीनें वागवील ह्याबद्दल ह्याच्यापूर्वी कित्येक इंग्लिश मुत्सद्यांनीं आपले विचार प्रगट केलेले आहेत, व त्यांतसुद्धां हीच भाषा आहे. बोअर लोकांना प्रथमतः आम्ही आपल्या ताब्यांत घेऊं आणि त्यांच्या अंगीं जसजशी पात्रता येत जाईल तसतसे त्यांना स्थानिक स्वराज्याचे हक्क हळूहळू देण्यांत येतील, अशा अर्थाचीं कित्येक मोठमोठ्या इंग्लिश लोकांचीं भाषणें पुष्कळांना स्मरत असतील. आतां या ठिकाणीं पात्रतेचा अर्थ काय? ट्रान्सवाल्रांतील लोक पूर्वी काय करूं शकत नव्हते, कीं जें आतां इंग्लिशांच्या अमलानें त्यांना साध्य होऊन त्यांच्या अंगची पात्रता वृद्धिंगत होणार आहे असें कांहीं नाहीं. तेव्हां या पात्रतेचा अर्थ काहीं तरी निमित्त काढून द्यावयाचें नाहीं हा होय. 'आशां कालवतीं कुर्यात्।' हें एक वक्रराजनीतींतील तत्त्व आहे, त्याचें हें प्रत्यंतर होय. त्या तत्त्वाचें हें प्रत्यक्ष उदाहरणच होय. तेव्हां बोअर लोकांच्या संबंधानेंहि हा पात्रतेचा प्रश्न पुढें येतो. हें पाहून ह्या पात्रतेच्या सबबीमध्यें कितपत तथ्य आहे, हें हिंदुस्थानांतील कोणाही मनुष्याच्या सहज लक्षांत येण्यासारखें आहे. सारांश, पात्रता, अपात्रता हें सगळें झूट आहे. द्यावयाचें नाहीं एवढें मात्र खरें, हें यावरून निष्पन्न होतें. ह्या युक्त्या सर्व लोकांना समजतात. आपलें पूर्वींचें महत्त्व आणि कर्तृत्व मनांत आणिलें असतां त्याच्यापुढें ह्या स्थानिक स्वराज्यासारख्या हक्काची किंमत काय, हें लोकांना समजतें. आणि म्हणून ह्या असल्या तकलादी आणि निरुपयोगी वस्तूकडे कोणी विशेष लक्ष देत नाहीं. सर मॅक्वर्थ यंग याचें असें मत दिसतें कीं, ही इंग्लिश पद्धत असल्यामुळें ती हिंदुस्थानांतील लोकांना एकदम मानवत नाहीं. परंतु वस्तुस्थिति अशी नाहीं. त्या हक्कांत कांहीं हंशील नाहीं, म्हणून लोक तिकडे लक्ष देत नाहींत. जी वस्तु लोकांच्या खऱ्या उपयोगाची आहे तिच्याबद्दल लोक कधींही अनास्था करणार नाहींत. स्थानिक स्वराज्याचा हक्क हें त्यांच्या दृष्टीनें मृगजळ आहे, म्हणून त्याच्या मागें कोणीही धांवत सुटत नाहीं.

---

## सगळ्यावर उपाय आहेत, पण— : १८

काळ : अग्रलेख ता. २७।१२।१९०१

ह्या मृत्युलोकांत अनेक प्रकारचीं दुःखें भरलेलीं आहेत. येथें सुखें नाहींत असें नाहीं. परंतु तीं सुखें मनुष्याच्या सुखाकरितां येथें ठेविलीं असावींत असें दिसत नाहीं. देवाविरुद्ध ज्यांनीं बंड केलें होतें, ते सेटन आदिकरून देवदूत ज्या अंधारमय नरकलोकामध्यें देवाकडून ढकलले गेले होते, त्या नरकलोकांतील अंधकाराचें वर्णन करतांना प्रसिद्ध इंग्लिश कवि मिल्टन ह्यानें असें म्हटलें आहे कीं, त्या तमोमय नरकलोकामध्यें प्रकाश नव्हता असें नाहीं; तेथें थोडासा प्रकाश होता! तो प्रकाश प्रकाशासाठीं नव्हता, तर त्या नरकलोकामध्यें किती घनदाट अंधकार भरलेला आहे हें त्या पतन पावलेल्या देवदूतांना दिसावें एवढ्यासाठीं आणि एवढ्यापुरता तेथें प्रकाश होता. तो प्रकाश आणि या जगांतील सुख ह्यांची स्थिति सारखीच आहे. सगळेंच जर दुःख भरलेलें असलें तर तें सहन करतां यावयाचें नाहीं. ह्यासाठीं मुद्दाम मधून मधून दुःखामध्यें सुखाची मिसळ केलेली दिसते. तुरुंगामध्ये कैदी असतात. त्यांना रात्रीची विश्रांति देण्यांत येते. ती विश्रांति त्यांच्या विश्रांतीसाठीं नव्हे, तर त्यांना दुसऱ्या दिवसाचे श्रम करण्याला ताकद राहावी आणि हुशारी यावी म्हणून होय. जर त्या कैद्याकडून रात्र आणि दिवस मिळून चोवीस तास काम करून घेतलें तर, असें काम तो फार झालें तर कांहीं दिवस करूं शकेल. परंतु नेहमीं त्याच्यानें असें काम होणार नाहीं, व बिचारा मरून जाईल. आणि असें झालें तर ह्यानें जिवंत राहून दहा वर्षेपर्यंत सक्तमजुरीचें जें काम केलें असतें तें मात्र बुडणार. तेव्हां असा दूरवर सारासार

विचार पाहून कैद्यांना थोडीशी विश्रांति देण्याची वहिवाट पडलेली आहे. परंतु वास्तविक म्हटलें तर तेथें श्रमालाच जास्त प्राधान्य. ही जी तुरुंगामध्यें कैद्याची स्थिति असते तीच स्थिति ह्या संसारामध्यें मनुष्यमात्राची आहे. हें जग हा एक मोठाथोरला तुरुंगच आहे, आणि ह्या जगांतील रहिवासी हे त्या तुरुंगांतील कैदी होत. ह्या विश्वरूपी कारागृहांतील सर्व कैद्यांना इतकीं कांहीं दुःखें भोगावीं लागत आहेत कीं, त्यांमध्यें एकाचें दुःख कमी आणि दुसऱ्याचें दुःख जास्ती असा तारतम्यभाव संभवणें वास्तविक पाहतां अगदीं अशक्य आहे. तरी पण ह्या कैद्यांना सुखाचा आभास वाटत असतो, व त्यामुळें ह्या कैद्यांपैकीं कित्येक कैदी आपल्याला राजे, महाराजे, बादशहा, सीझर, कैसर, झार ह्या नांवांनीं मंडित करून घेत असतात. आणि कित्येक आपल्याला तें आभासमय सुख नाहीं म्हणून आपण गरीब, भिकारी, कंगाल हिंदु किंवा आयरिश आहों, असें मानीत असतात. अशी जगांतील विचारांची रहाटी पडून गेलेली आहे. परंतु हें केवळ दुःखांत सुख मानणें आहे, वास्तविक सुख नव्हे. वस्तुतः सर्वत्र दुःखच पसरलेलें आहे. ह्या जगांत दुःख आहे म्हणून परलोकाला किंमत आलेली आहे. ह्या जगांत अतिशय दुःखें आहेत म्हणून स्वर्गलोक हा स्वर्गलोक झाला आहे. स्वर्गलोकांत कांहीं विशेष आहे असें नाहीं. इहलोकीं दुःखें नसतीं तर देव येथेंही राहिले असते. मोक्षाचें महत्त्व तरी एवढ्याचसाठीं कीं, त्या स्थितीमध्यें दुःखांचा अत्यंत विध्वंस होतो. जेथें कोणतेंही दुःख नाहीं तो मोक्ष आणि जेथें दुःख तो संसार, तो मृत्युलोक, तो नरकलोक, तो तुरुंग आणि तो हिंदुस्थान. अशा रीतीनें मनुष्याचें सर्व आयुष्य अनंत दुःखांनीं व्यापून टाकिलेलें आहे. व तो जिवाला कंटाळूं नये व पुढील दुःखें सोसण्याला त्याला हिंमत यावी म्हणून मात्र त्याच्या पुढें लहान लहान सुखाचे तुकडे टाकण्यांत येत असतात. प्रजेपासून सर्व संपत्ति राजे लोक एकदमच लुटून कां घेत नाहींत, तर तिच्याकडून आपल्या खजिन्यामध्यें पैशाचा झरा सदोदित एकसारखा वाहत राहावा. नेहमीं थोडथोडा कर मिळावा, म्हणून राजे प्रजेला एकदम लुटीत नाहींत. ह्याप्रमाणें मनुष्यानें पुष्कळ दिवस एकसारखीं दुःखें भोगावीं म्हणून त्याला मधून थोडथोडीं सुखें दाखवून त्याजवर एकदम दुःखांचा मार घालण्यांत येत नाहीं. पण

सगळ्याचें तात्पर्य हें कीं, शक्य तितकीं जास्त दुःखें मनुष्याकडून भोगविण्याची व्यवस्था करण्यांत आलेली आहे असें दिसतें. व ह्या कारणानें मनुष्याचें ह्या जगांतील आयुष्य अत्यंत कष्टमय झालेलें आहे.

जगांत दुःखें फार आहेत. पण त्या दुःखांना उपायही आहेत. उपाय नसते तर वाघांनीं अरण्य जसें भयंकर झालें आहे तसें हें जग दुःखांनीं भयंकर झालें असतें. परंतु ईश्वराच्या कृपेनें किंवा मनुष्याच्या बुद्धीनें प्रत्येक संकटावर कांहीं तरी तोड करून ठेवण्यांत आलेली आहे. संकटें अनेक प्रकारचीं आहेत. रोग झाला तर वैद्यशास्त्र आहे. हात मोडला तर तो कापून काढण्याला शस्त्रक्रिया आहे. साप चावला तर त्याला मंत्र आहे. कांटा बोंचला तर त्याला सुई आहे. उन्हाळ्य छत्री आहे. आणि थंडी लागूं लागली तर त्याला शिंपी आहे. अशा रीतीनें बहुतेक सर्व संकटांवर कांहीं तरी रामाचा बाण आहेच. ह्या जगामध्यें कला, विद्या, शास्त्र वगैरे जीं जीं म्हणून प्रवृत्त झालेलीं आहेत, तीं तीं सर्व संकटांचें निवारण करण्यासाठींच प्रवृत्त झालेलीं आहेत. कित्येक शास्त्रें केवळ चैनीकरितां आहेत असीं दिसतात. परंतु तींदेखील सुख उत्पन्न करून त्या द्वारानें दुःख निवारण करण्याच्याच उपयोगीं पडत असतात. अशा या नानाविध शास्त्रांनीं आणि कलांनीं हें जग मूळचें दुःखमय असूनही बरेंच सुखावह झालेलें आहे. अशा रीतीनें प्रत्येकाला कांहींना कांहीं तरी उपाय आहेच. परंतु एका गोष्टीला मात्र कोठें कांहीं उपाय दिसत नाहीं. मोठमोठ्या भयंकर रोगांवरही वाग्भटानें औषधें लिहून ठेविलीं आहेत. आणि गुलामगिरी हा बाकीच्यापेक्षां कमी भयंकर रोग आहे असें नाहीं. पण असें असून त्याजवर कोणींही औषध लिहिलेलें नाहीं. एखादा बारीक सारीक कांटा मोडला तर तो काढण्यासाठीं आज डाक्टरांच्यापाशीं किती तरी प्रकारच्या सुया तयार आहेत. परंतु त्या कांट्याच्या मानानें पाहूं गेलें असतां शत्रूचा कांटा किती तरी भयंकर, किती दुःसह आणि किती वेदना देणारा! त्याच्या सारखा शरिरांतून रक्त वाहविणारा आणि शरिराला यातना करणारा दुसरा कोणीच नाहीं; तरी पण याच्यासाटीं एखादी सुई पाहिजे असल्यास ती कोटेंही मिळणें शक्य नाहीं! साप चावला तर तो एका व्यक्तीला चावतो, आणि त्याचें विष फार फार पसरलें तर तें साडेतीन हात जागेंतच काय तें पसरतें. परंतु गुलामगिरीचा साप हा एकाच व्यक्तीला

चावत नसून तो लक्षावधि लोकांना एकदम चावतो, आणि त्याच्या विषाच्या प्रसाराची मर्यादा साडेतीन हातांचीच नसून हें दारुण विष लक्षावधि मैल लांबीच्या आणि लक्षावधि मैल रुंदीच्या प्रदेशावर एकसारखें पसरतें. ह्या विषानें सर्व राष्ट्रांचीं तोंडें काळीं ठिक्कर पडतात. ह्या गुलामगिरीच्या विषाच्या योगानें शहाणे लोकही बेफाम होतात आणि सशक्त लोकहि निर्जीव होऊन पडतात. साधा साप आणि गुलामगिरीचा साप ह्यांच्यामध्यें, ह्यांच्या वेदनांमध्यें आणि ह्यांच्या परिणामांमध्यें इतका फरक असूनही ह्या गुलामगिरीच्या सापाचें विष उतरण्याचा मंत्र एकाला माहीत असेल तर शपथ! फुरसें, दिवड ह्यांपासून तों थेट वासुकीपर्यंत सर्व सापांवर चालणारे मंत्र आहेत. परंतु गुलामगिरीच्या सापावर कोणापाशींही मंत्र नाहीं. ज्याच्यापासून अतिशय मोठी प्राणहानि झाली तर एका व्यक्तीचीच काय ती होणार अशा एखाद्या सरपटणाऱ्या प्राण्याच्या विषाविरुद्ध लोकांच्या कोण खटपटी चाललेल्या असतात! असल्या क्षुल्लक विषाच्या विरुद्ध एखादा मंत्र यावा म्हणून चंद्राला राहू किंवा सूर्याला केतु कधीं ग्रासून टाकील याची लोक वाट पाहत असतात. ह्या क्षुल्लक विषाच्या निवारणासाठीं मध्यरात्रींच्या वेळींही व अतिशय थंडीमध्येंही गळाभर पाण्यामध्यें लोक प्रहर प्रहर उभे राहतात. ह्या क्षुल्लक विषाचें निवारण आपल्या हातून यथास्थित रीतीनें व्हावें एतदर्थ दिवा गेला किंवा विटाळशी बोलली तर लोक आपल्या पुढें पंचपक्वान्नांनीं भरलेलें ताट आलें असतांही तें टाकून जेवणावरून उठतात; पण ह्या गुलामगिरीच्या विषाच्या निवारणासाठीं कोण काय करीत आहे! ह्या विषावर मंत्रच नाहीं. कोणत्याही जादूगाऱ्यानें ह्या विषावर मंत्रच लिहून ठेविलेला नाहीं. मनुष्याच्या थंडीचें निवारण करण्यासाठीं कोष्टयांनीं अनेक प्रकारचीं वस्त्रें विणलेलीं आहेत, आणि शिंप्यांनीं त्यांचे अनेक प्रकारचे कपडे शिवलेले आहेत. परंतु जेव्हां एखाद्या राष्ट्रामध्यें गुलामगिरीचा हिंवाळा सुरू होतो, तेव्हां त्याचें निवारण करण्यासाठीं कोणीं काय उपाय योजून ठेवलेले आहेत! जेव्हां त्या राष्ट्राचा प्रतापसूर्य दुर्दैवाच्या धुक्यानें आच्छादून जातो, जेव्हां त्या राष्ट्रावर संकटांचें बर्फ कोसळून तेथील सर्व सद्गुणांचीं पिकें गारठून जातात, जेव्हां त्या राष्ट्रांतील लोकांची तोंडपुरेपणानें दांतखिळी वाजत असते आणि जेव्हां त्या राष्ट्रांतील लोकांच्या अंगांत भीतीची हुडहुडी भरलेली असते, तेव्हां त्या लोकांचें त्या गुलामगिरीच्या

थंडीपासून संरक्षण करण्याला कोटी आणि शिंपी पाहिजेत. पण त्या थंडीचें निवारण करण्याची कला कोणत्याही कोष्टयाला किंवा शिंप्याला माहीत नाहीं. युद्ध करावयाचें असेल तर धनुर्वेद आहे. आरोग्य पाहिजे असेल तर आयुर्वेद आहे; पण गुलामगिरीचा अभाव पाहिजे असेल तर त्याला कोणत्याही वेदामध्यें उपाय सांगितलेला नाहीं. संपत्ति पाहिजे असेल तर अर्थशास्त्र आहे. औषध तयार करावयाचें असेल तर रसायनशास्त्र आहे. वादविवाद करावयाचा असेल तर न्यायशास्त्र आहे. कविता करावयाची असेल तर अलंकारशास्त्र आहे, राज्य करावयाचें असेल तर दण्डनीतिशास्त्र आणि भविष्य जाणावयाचें असेल तर ज्योतिःशास्त्र आहे. परंतु गुलामगिरीचा उच्छेद पाहिजे असेल तर त्याला मात्र कोणतेंही शास्त्र नाहीं.

ह्या विषयावर एखादें शास्त्र पाहिजे होतें. ज्या दिवसापासून अल्पसंतोषी आणि दुसऱ्याला लुबाडणारे राजे होऊं लागले, तेव्हांपासून ह्या शास्त्राची आवश्यकता उत्पन्न झालेली आहे. तरी पण आजपर्यंत त्या विषयासंबंधानें कांहींही प्रतिष्ठित उपाय प्रतिपादन करण्यांत आलेला नाहीं. ह्यावरून असेंच म्हणावें लागतें कीं, ह्यावर कांहीं उपायच नाहीं. ह्या उपायाबद्दल जर एखादें शास्त्र असतें तर त्याचा उपयोग आजपर्यंत पुष्कळांनीं करून घेतला असता. असल्या शास्त्राची आवश्यकता आजपर्यंत पुष्कळ लोकांना, देशांना आणि राष्ट्रांना भासलेली आहे. पूर्वी ग्रीक लोक सत्ताधीश होते त्या वेळच्या ग्रीस देशांतील हीलाट्सना ह्या शास्त्राची आवश्यकता होती. गुलामगिरींतून सुटण्याचा जर कांहीं शास्त्रीय मार्ग असता तर तो त्या हीलाट्सना पाहिजे होता. त्याच्यानंतर इटलीमध्ये रोमन लोकांचें साम्राज्य होतें. त्यावेळीं एकटे रोमन लोक विजयश्रीच्या मर्जीतील जेते होते; परंतु दुसरे शेंकडों देशांतील लोक त्यांच्याकडून जिंकले गेलेले होते. एकटे रोमन लोक स्वतंत्र होते, पण त्यांच्यामुळें दुसरे शेंकडों लोक गुलाम झाले होते. ह्या सगळ्यांना वर निर्दिष्ट केलेल्या शास्त्राची फार फार आवश्यकता होती. स्पेन, गॉल, मिसर, कार्थेज वगैरे ठिकाणच्या सर्व लोकांना त्यावेळीं ह्या शास्त्राची जरूरी होती. एके वेळीं इंग्लंडलाही हें शास्त्र पाहिजे होतें. जेव्हां स्पेनची सत्ता चार्लस आणि फिलिप ह्यांच्या अमलाखालीं अमर्याद वाढली होती, त्यावेळीं हॉलंड वगैरे देशांना ह्या शास्त्राची आवश्यकता होती.

स्पेनच्या अमलांतून एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीं चिली, पेरू, मेक्सिको, कोलंबिआ, व्हेनिझुएला, वगैरे दक्षिण अमेरिकेंतील मुलूख स्वतंत्र होण्याच्या पूर्वीं त्यांनाही ह्याची फार आवश्यकता होती. नेपोलियननें त्याच सुमारास जेव्हां पॅरिसपासून मास्कोपर्यंत सर्व युरोपखंड पालथें घातलें होतें, तेव्हां ऑस्ट्रिआ, प्रशिआ, इटली, रशिया, स्पेन, पोर्तुगाल वगैरे देशांना ह्याची फार अवश्यकता होती.

आजपर्यंत इतक्या लोकांना याची आवश्यकता लागली, परंतु ह्यांतून कोणाच्याही हातून ह्याबद्दलच्या उपायांचें यथासांग शास्त्र बनविण्यांत आलेलें नाहीं. इतिहास हें याचें शास्त्र आहे असें कदाचित् कोणाला वाटेल. परंतु वस्तुस्थिति तशी नाहीं. अमक्या राष्ट्राचें अमुक झालें, अमुक राष्ट्रानें अमुक राष्ट्राला जिंकलें, आणि अमुक राष्ट्र अमुक राष्ट्राच्या गुलामगिरींतून स्वतंत्र झालें, अशा प्रकारच्या गोष्टी इतिहासांतून सांगितलेल्या असतात. परंतु क्किनाईन घेतलें म्हणजे ताप जातो हा जसा वैद्यशास्त्रानें सिद्धांत ठरविला आहे, त्याप्रमाणें अमुक अमुक केल्यानें गुलामगिरीचा ताप जातो, असा सिद्धांत इतिहासानें कोठेंच केलेला नाहीं. इतिहास हा विशेष उदाहरणांचा समुच्चय आहे. त्यावरून सामान्य सिद्धांत काढले पाहिजेत. परंतु ते सिद्धांत काढले तरी ते युक्लिडच्या सिद्धांतासारखे नेहमींच अगदीं तंतोतंत बरोबर उतरतील किंवा त्रिकालाबाधित राहतील असा कांहींच भरंवसा नाहीं. आणि म्हणूनच गुलामगिरी कशी घालवावी ह्याच्याबद्दल आजपर्यंत कोणी सामान्य सिद्धांतात्मक शास्त्र केलेलें नाहीं व याच्यापुढेंही तसें करणें शक्य नाहीं. ह्या बाबतींत अमुक केलें म्हणजे अमुक होईलच अशी खात्री नसल्यामुळें निरनिराळे लोक कांहीं तरी करीत असतात, रसायनशास्त्रवेत्ते ज्याप्रमाणें हें द्रव्य त्यांत आणि तें द्रव्य ह्यांत मिसळून आपल्याला पाहिजे तो इष्ट परिणाम होतो कीं नाहीं हें पहाण्यासाठीं निरनिराळे प्रयोग नेहमीं करून पाहत असतात, त्याप्रमाणें सदर बाबतींत लोकांची नेहमीं स्थिति असते. अशा स्थितींत काकतालीय न्यायानें जर त्यांनीं मोडली तर मोडली, अशा तऱ्हेचे लोकांचे अर्धवट प्रयत्न चाललेले असतात. परंतु ते सर्व आंधळ्याच्या चाचपडण्यासारखेच असल्यामुळें अगदीं व्यर्थ होत. हे प्रयत्न म्हणजे पैशाचा फुकट खर्च होय, वेळेचा व्यर्थ अपव्यय होय आणि परिश्रमांची निरर्थक उघळपट्टी होय. ह्या बाबतींत अशा स्थितींत मनु-

त्याचे प्रयत्न निष्फळ ठरल्यामुळें मनुष्याला एकच मार्ग खुला राहतो आणि तो मार्ग म्हणजे परमेश्वराचा मार्ग होय. परमेश्वराची कृपा झाली म्हणजे मनुष्याच्या प्रयत्नांना फळ येऊं लागतें. नाहींतर तोंपर्यंत तें प्रयत्नाचें झाड वांझ असतें. परमेश्वराच्या मनांत आलें म्हणजे अतिशय खोल खोल अशा तळघरांतील अंधारकोटडींतील बंदिवानांच्याही गुलामगिरीच्या शृंखळा तटातट तुटून जातात. उद्‌भूत आणि अनुद्‌भूत अशा दोन्ही प्रकारच्या शास्त्रांचें अधिष्ठान परमेश्वर आहे. परंतु वैद्यशास्त्र, रसायनशास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र, वगैरेंसारखीं जीं उद्‌भूतस्वरूपशास्त्रें आहेत तीं पाहिलीं असतां पाहणाराचें मन तेथेंच थांबतें. परंतु प्रस्तुतसारख्या अनुद्‌भूतस्वरूपशास्त्रांमध्यें मनुष्याचें मन मध्यंतरींच थांबवून धरण्याला कांहींएक सिद्धांत ठरलेले नसल्यामुळें भांबावून जाऊन सर्वतोपरी परमेश्वरावर विश्वास ठेवून स्वस्थ राहण्याकडे त्याची निसर्गतःच प्रवृत्ति होते. कारण, त्याला दुसरा मार्गच नसतो. पण परमेश्वरावर विश्वास ठेवून राहिल्यानें इष्टहेतु सफल होत नाहीं असें मात्र नाहीं. उलट ह्या विश्वासानेंच पुष्कळ अशक्य गोष्टी शक्य होतात, व मनुष्याच्या प्रयत्नानें घडून न येणाऱ्या गोष्टी परमेश्वराच्या कृपाकणानें सहज घडून येतात. असा ज्या परमेश्वराचा महिमा आहे त्या परमेश्वराचें सर्वांनीं सदोदित चिंतन करीत असावें हेंच आपलें कर्तव्यकर्म आहे.

---

# प्रेसिडेंट रूझव्हेल्ट आणि प्रेसिडेंट वाच्छा : : ११

काळ : अग्रलेख ता. ३।१।१९०२

नुकत्याच संपलेल्या डिसेंबर महिन्यांत हिंदुस्थानच्या कॉंग्रेसला सुरवात झाली हें आपल्या इकडील वाचकांपैकीं कोणाला सांगितलें पाहिजे असें नाहीं. परंतु त्याच महिन्यांत युनायटेड स्टेट्सच्याही कॉंग्रेसला सुरुवात झाली, ही गोष्ट आपल्या इकडील पुष्कळांना माहीत नसण्याचा संभव आहे. म्हणून त्या गोष्टीचा प्रथम निर्देश करणें जरूर आहे. ह्या दोन प्रसिद्ध ठिकाणच्या कॉंग्रेसच्या सभा एकाच महिन्यांत घडून आल्याकारणानें ह्या दोन्ही सभांच्या परिस्थितीचें चित्र एकाच वेळीं मनामध्यें उपस्थित होणें अगदीं स्वाभाविक आहे. प्रे. रूझव्हेल्ट हे युनायटेड स्टेटस्च्या कॉंग्रेसचे अध्यक्ष होत, व प्रे० वाच्छा हे हिंदुस्थानच्या कॉंग्रेसचे अध्यक्ष होत. प्रे. रूझव्हेल्ट ह्यांनीं आपल्या कॉंग्रेसला पाठविलेला 'मेसेज' आणि प्रे० वाच्छा ह्यांनीं आपल्या कॉंग्रेसपुढें सादर केलेला 'ॲड्रेस' हे दोन्हीही हल्लीं जगापुढें आलेले आहेत. ह्या दोन्हीही लेखांना एकमेकांच्या जवळ मांडून दोघांचें सूक्ष्म रीतीनें आलोचन केलें असतां मनामध्यें विलक्षण प्रकारचे तरंग उत्पन्न होतात. ह्या दोन लेखांमध्यें कित्येक गोष्टींसंबंधानें दिसून येणारा भेद पाहिला म्हणजे तो पाहणाराच्या मनामध्यें एक प्रकारचा उद्वेग उत्पन्न झाल्यावांचून राहत नाहीं. हे दोन्ही लेख एकाच वेळीं वाचून खालीं टेविल्यानंतर निराशा, खेद, हतवीर्यता, उदासीनता, अनुल्हासवृत्ति इत्यादिकांनीं अंतःकरण व्यापून जातें, व फिरून फिरून मनामध्यें असा प्रश्न उत्पन्न होतो कीं, युनायटेड स्टेट्स आणि हिंदुस्थान या दोन देशांमध्यें इतका फरक कां पडावा !

ह्या दोन देशांत इतकें अंतर कां पडावें? एक इतका भाग्यशाली कां व्हावा, आणि दुसरा इतका भाग्यहीन कां व्हावा? परमेश्वरानें ह्या दोन देशांना उत्पन्न करतांना कांहीं पक्षपात केला असावा, अशी कल्पना करणें शक्य नाहीं. परमेश्वरानें पक्षपात केल्याचें दिसत नाहीं. तेथील जमीन आणि येथील जमीन ह्या दोन्हीमध्येंही त्यांजवर पेरलेलें धान्य वाढविण्याचें सारखेंच सामर्थ्य ठेविलें आहे. अमेरिकेंतील पाणी आणि हिंदुस्थानांतील पाणी ह्या दोहोंचेही घटकावयव तेच आहेत. अमेरिकेंत जसा सूर्य प्रकाशतो, तसाच तो हिंदुस्थानांतही प्रकाशतो, आणि तेथील थंडी जशी कित्येक पिकांना पौष्टिक असते, तशीच इकडील थंडीही येथील पिकांना पौष्टिकपणा देण्यास समर्थ असते. त्यांच्यावर जें निळें आकाश दिसतें तेंच आमच्याही डोक्यावर आहे. परमेश्वरानें मनुष्याच्या कल्याणासाठीं पाठविलेलीं हीं पंचमहाभूतें तर तिकडे आणि इकडे सारखींच आहेत. मग ह्या दोन देशांमध्यें इतका उच्चनीचभाव उत्पन्न झाला आहे तो कशामुळें? त्या प्रदेशांत आलेघनीसारखे मोठमोठे पर्वत आणि मिसिसिपीसारख्या मोटमोठ्या नद्या आहेत, म्हणून देशाची भरभराट होत आहे असेंही नाहीं. कारण, आलेघनीइतके मोठमोठे पर्वत आणि मिसिसिपीसारख्या मोटमोठ्या नद्या हिंदुस्थानामध्येंही आहेत. जर नद्यांच्या पाण्यानें देश सुपीक आणि सुसंपन्न होत असेल तर अमेरिकेंतल्यासारख्या हिंदुस्थानांतीलही नद्या आपल्या पाण्यानें आपल्या आसपासचा प्रदेश सुपीक आणि सुप्रसन्न करण्याकरितां परिश्रम करीत आहेत. सारांश, नैसर्गिक स्थिति पाहिली तर एका देशानें लक्षाधीश व्हावें आणि दुसऱ्याच्या हातांत भिक्षापात्र यावें, असा कांहीं एक दोष परमेश्वरानें हिंदुस्थानच्या नैसर्गिक स्थितीमध्यें ठेविलेला नाहीं. दोघांचीही मूळची स्थिति सारखी. पण आतां दोघांच्या स्थितींत किती फरक! परंतु हा फरक उत्पन्न झाल्याचा दोष ईश्वराकडे खास नाहीं. जर सृष्टि उत्पन्न करतेवेळींच ईश्वरानें हिंदुस्थान देशाच्या पोटांत हतभाग्यतेचें बीज टाकून ठेविलें असतें, आणि युनायटेड स्टेट्सच्या पोटांत भावी भाग्योदयाचा रोपा लावून ठेविला असता, तर गोष्ट निराळी होती. पण परमेश्वरानें तसें कांहीं केलेलें नाहीं. तसें केलेलें असतें, तर जगाच्या प्रारंभापासूनच हिंदुस्थान हतभाग्य आणि युनायटेड स्टेट्स सुसंपन्न होऊन बसलें असतें. पण तसें मुळींच नाहीं. कोलंबसानें अमेरिका शोधून काढण्याचे पूर्वीं अमेरिकेचें नांवसुद्धां कोणास

ठाऊक नव्हतें, व तें निवळ जंगल होतें. परंतु जेव्हां अमेरिका जंगल होतें, तेव्हां हिंदुस्थानासारखा भरभराटीस आलेला दुसरा कोणताच देश नव्हता. जेव्हां अमेरिकेंत सोनें असेल किंवा नसेल ह्याच्याबद्दलची कल्पनासुद्धां तेथील रेड इंडियन लोकांना नव्हती, तेव्हां हिंदुस्थानांत प्रत्यक्ष सोन्याचा धूर निघत होता. त्या वेळीं कोलंबस जो एवढें धाडस करून चालला होता, तो अमेरिका शोधण्यासाठीं चालला नव्हता. त्याला अमेरिका सांपडली, पण तो शोधावयाला चालला होता हिंदुस्थानच. अशी पूर्वींची हिंदुस्थानची स्थिति होती. पण आतां तशी नाहीं! आणि अमेरिकेची आतां जी स्थिति आहे ती पूर्वीं नव्हती. पण हें सगळें स्थित्यंतर केलें कोणीं? परमेश्वरानें हें खास केलें नाहीं. कारण, त्यानें दोघांनाही सारखेंच उत्पन्न केलेलें होतें. तो सगळ्यांनाच सारखे उत्पन्न करतो. आणि सगळ्यांनीं सारखेंच असावें अशी त्याची इच्छा असते. ही त्याची इच्छा परिपूर्ण झाली असती, पण त्यानें धनतृष्णा उत्पन्न केली त्यामुळें सगळें बिघडलें आहे. युनायटेड स्टेट्स आणि हिंदुस्थान हे देश निःपक्षपाती आणि कृपाळु देवानें सारखेच केलेले होते. परंतु धनलोभी आणि महत्त्वाकांक्षी मनुष्यानें त्यांच्यामध्यें अंतर पाडलें. हल्लीं जसा युनायटेड स्टेट्स हा देश आहे, त्याच स्थितींत एकदां हिंदुस्थान देश होता, व हल्लीं ज्या स्थितींत हिंदुस्थान देश आहे, त्या स्थितींत एकदां युनायटेड स्टेट्स हा देश होता. इ० स० १७७६ च्या पूर्वीं युनायटेड स्टेट्स हा देश इंग्लंडचा अमल झुगारून देऊन स्वतंत्र झालेला नव्हता, व हिंदुस्थान हा देश इंग्लंडच्या अमलाखालीं दडपून जाऊन परतंत्र झाला नव्हता. इसवी सन १७७३ मध्यें बोस्टनच्या बंदरांत इंग्लंडचीं चहाचीं गलबतें समुद्रांत पालथीं घालून अमेरिकन लोकांनीं इंग्लंडाशीं युद्ध सुरू केलें, त्याच्यापूर्वीं आपण जसे आज इंग्लंडपुढें नमून वागत आहों, त्याचप्रमाणें अमेरिकन लोक वागत होते. आणि, आपल्याला जसें आज जमिनीच्या साऱ्याचें किंवा प्राप्तीवरील करांचें ओझें जास्त वाटत आहे, त्याप्रमाणें त्यांना त्या वेळीं चहा आणि स्टँप ह्यांच्यावरील करांचें ओझें जड झालेलें होतें. १९०२ सालांत आपण जितके वांकलेले आहों तितके ते १७७३ सालांत वांकलेले होते. आणि ते आज जितके ताठ आहेत तितके आपण १७७३ च्या सुमारास होतों. त्या वेळीं जर आपल्या इकडल्या एखाद्या राजाला मारण करण्याचा प्रसंग आला तर आज

प्रे. रूझव्हेल्ट हे ज्या भाषेनें भाषण करीत आहेत, तसल्याच भाषेनें त्यानें भाषण केलें असतें, व आज प्रे. वाच्छा हे ज्या अदबीनें आणि नेमस्तपणानें आपलें म्हणणें इंग्लिश सरकारला कळवीत आहेत, तसल्याच अदबीनें आणि नेमस्तपणानें अमेरिकन लोक १७७३ मध्यें आपल्या मागण्या विलायत सरकारच्या कानावर घालीत होते. आपण आज जी परतंत्रतेची भाषा बोलत आहों, तीच भाषा १७७३ च्या पूर्वी अमेरिकन लोक बोलत होते. जें आपण ह्या शंभर सवाशें वर्षांमध्यें विसरून गेलों, त्याचा अमेरिकन लोकांनीं त्या मुदतीमध्यें चांगला अभ्यास केला आहे. आणि बरींच वर्षें वापरल्यामुळें जीर्ण झालेला जो परतंत्रतेचा अंगरखा अमेरिकन लोकांनीं १७७६ मध्यें फेकून दिला, तो मोठ्या आदरानें उचलून घेऊन त्या वाकळांनीं आम्ही आपले शीतवातादिकांपासून संरक्षण करण्याला शिकलों आहों. त्यांनीं परतंत्रता टाकण्याला आणि आम्हीं ती उचलून घेण्याला बहुतेक बरोबरच प्रारंभ केला. ज्या वेळेला अमेरिकन लोक इंग्लिशांच्या जुलमाला कंटाळलेले होते, त्याच सुमारास वॉरन हेस्टिंग्ज हे अयोध्येच्या बेगमांवर पैशाच्या संबंधानें जुलूम करण्याला सुरवात करीत होते. ज्या वेळेला ज. वॉशिंग्टन हे अमेरिकेमध्यें स्वतंत्रतेचें निशाण उभारीत होते, त्याच वेळच्या सुमारास हिंदुस्थानांतील लॉर्ड क्लाइव्ह आणि वॉरन हेस्टिंग्ज हे हिंदुस्थानांतील लोकांचीं स्वतंत्रतेचीं निशाणें खालीं ओढून पाडीत होते. बेंजामिन फ्रँक्लीनसारखे लोक स्वदेश स्वतंत्र करण्यासाटीं झटत होते. त्याच सुमारास हिंदुस्थानांतील लोक स्वदेश परतंत्र करण्यासाटीं जिवापाड मेहनत करीत होते, त्या वेळीं अमेरिकेंतील लोक आपल्या स्वातंत्र्याची इमारत उभी करण्यासाटीं झटत होते, त्या वेळीं आपण आपल्या उभ्या असलेल्या इमारतीचे वासे ओढून तिचा नायनाट करण्याच्या उद्योगाला लागलों होतों. अमेरिकन लोक अन्नांवांचून आणि वस्त्रावांचून मोठ्या कष्टानें स्वदेश दुसऱ्याच्या हातून सोडविण्यासाटीं लढत होते, त्या वेळचे सुमारास हिंदुस्थानांतील काळे लोक अन्नावांचून आणि वस्त्रावांचून स्वदेश आपल्या स्वतःच्या हातांतून काढून दुसऱ्याच्या हातांत देण्यासाटीं लढत होते. ज्या वेळीं मॅसाच्युसेट्स, कॉनेक्टिकट, फिलाडेल्फिया वगैरे टिकाणीं परकीय देशाचा आपल्यावरील जुलमाचा अमल दूर करण्यासाटीं रणांगणावर आणि कॉंग्रेसमध्यें अमेरिकन लोक गोळा होत होते,

त्याच वेळेच्या सुमारास पुण्यासारख्या शहरांतून चुलते आणि चुलत्या प्रत्यक्ष आपल्या पुतण्याला आणि राजाला ठार मारण्यासाठीं त्याच राजाच्या हाता खालील नोकरांना बेलभंडार उचलून देत होते. अशा प्रकारची ह्या दोन देशां मध्यें त्या वेळीं स्थिति झालेली होती. १७७२-७३ च्या पावसाळ्यांत ज्यांनीं जसें शेत पेरिलें तशीं त्यांना आतां फळें मिळत आहेत.

वर वर्णन केलेल्या अठराव्या शतकाच्या अखेरच्या सुमारास हिंदु लोक प्राप्त झालेल्या वैभवानें बेफाम झालेले होते. त्या वेळीं ते आपसांत मारामाऱ्या आणि लढाया करीत असत. आपल्या ह्या मारामाऱ्यांचा फायदा घेऊन तिस॰ राच कोणी पुढें सरसावेल, असें त्यांना कधींही वाटलें नव्हतें. अशा स्थितींत ते असतांना ईस्ट इंडिया कंपनीचे नोकर हळूहळू आपलें जाळें चोहोंकडे पसरीत चालले होते, आणि त्यामध्यें हरणाप्रमाणें हिंदुस्थानांतील भोळसर लोक पटापट. पाय अडकून पडले. आणि अशा योगानें अमेरिकेची पूर्वी जी स्थिति होती ती हळूहळू हिंदुस्थानाला प्राप्त झाली. अमेरिकेंतील वसाहती हातून गेल्यामुळें इंग्लंडचें जे वर्चस्व कमी झालें होतें, तें हिंदुस्थानांतील हला हातीं लागल्याचे योगानें फिरून जास्त वाढलें. अमेरिकेच्या अंगावर घातलेलें शृंखलादिक परतंत्रतेच्या शृंगाराचे अलंकार अमेरिकेनें आपल्या अंगावरून काढून टाकल्यामुळें ते जे इंग्लंडपाशीं शिल्लक होते त्यांनीं इंग्लंडनें आपल्या ह्या आर्यजननीचा सर्व देह अशा रीतीनें अत्यंत नीटनेटकेपणानें आणि हृदयंगम प्रकारानें सुशोभित केला. आणि. तेव्हांपासून अमेरिकेंत युनायटेड स्टेट्स हा प्रिय शब्द ऐकूं येऊं लागला, व हिंदुस्थानामध्यें जिकडे तिकडे डिसयुनायटेड स्टेट्स दिसूं लागलीं. तेव्हांपासून अमेरिका स्वतंत्रतेची भाषा बोलूं लागली आणि हिंदुस्थान देश परतंत्रतेची भाषा बोलण्यांत निष्णात झाला.

गेल्या सवाशें वर्षांपासून, किंबहुना त्याच्याही आधींपासून, युनायटेड स्टेट्स आणि हिंदुस्थान ह्या देशांवर त्या त्या देशांतील परिस्थितीचे जे परिणाम झालेले आहेत, त्या सगळ्यांचें एकवटलेलें प्रतिबिंब वर निर्दिष्ट केलेल्या प्रे. रूझव्हेल्ट आणि प्रे. वाच्छा ह्यांच्या भाषणांमधून बरोबर रीतीनें उमटलें आहे. १७७३ मध्यें अमेरिका काय होती, आणि हिंदुस्थान काय होतें, ह्याचा उल्लेख वर थोडासा केलाच आहे. आतां १९०१ च्या अखेरीस अमेरिका काय आहे, आणि हिंदुस्थान काय आहे, हें आपण त्या त्या ठिकाणच्या प्रेसिडेंटांनीं

गवून तयार केलेल्या चित्रपटामध्यें पाहूं. प्रे. रूझव्हेल्ट म्हणतात कीं, आपल्या देशामध्यें उद्योगधंद्यांची वाढ एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धामध्यें अत्यंत पराकाष्ठेची झाल्यामुळें नाना प्रकारच्या सामाजिक अडचणी उद्भवूं लागल्या आहेत, व द्रव्याचा संचय आणि प्रसार अतिशय झपाट्यानें होत चालला असल्यामुळें जुने नियम हल्लीं निरुपयोगी होऊं लागले आहेत. आतां प्रे. वाच्छा ह्यांच्याकडे पाहिलें तर त्यांची हकीगत ह्याच्या अगदीं उलट आहे. हिंदुस्थानांतील व्यापारधंदे बुडाले आहेत, किंवा बुडण्याच्या बेतांत आहेत. ते व्यापारधंदे उर्जित दशेला आणण्याकरितां हिंदुस्थानांतील विद्यार्थी युरोप, अमेरिका, जपान इत्यादि ठिकाणीं वर्षाच्या कांठीं दोन-तीन जात आहेत. परंतु ते तिकडून शिकून आले तरी ते भांडवलाशिवाय काय करणार, असा धीर खचविणारा प्रश्न प्रे. वाच्छा हे विचारीत आहेत. प्रे. रूझव्हेल्ट ह्यांच्या भाषणांत जिकडे तिकडे अमेरिकन लोकांच्या सोन्याच्या रसानें भरलेले समुद्र आणि अमेरिकन कारखान्यांनीं उत्पन्न केलेल्या मालांचे पर्वत ह्यांच्याशिवाय दुसरें कांहीं दिसतच नाहीं. परंतु प्रे. वाच्छा ह्यांच्या सगळ्या भाषणभर जिकडे तिकडे दुष्काळी दुष्काळच पसरून गेला आहे, व त्यामुळें त्यांचें भाषण हा जणुं काय दुसरा एक हिंदुस्थान देशच आहे, असा भास उत्पन्न होतो. सदर भाषणांत दुष्काळाशिवाय दुसरें बोलणें नाहीं. मुंबई सरकारची दुष्काळाची पद्धत, गुजराथेंतील दुष्काळाच्या वेळेची करण्यांत आलेली चौकशी, दुष्काळ-कोडानें दुष्काळ बंद होतो कीं नाहीं, दुष्काळ-कामावर कशी व्यवस्था असावी, दुष्काळ-कमिशननें काय काय सूचना केल्या आहेत, दुष्काळ पडण्याला कारणें काय, इंग्लंडमध्यें 'इंडियन दुष्काळ (फॅमिन) युनिअन' या नांवाची संस्था स्थापन झाली आहे. तिनें काय शिफारशी केल्या आहेत, शेतकऱ्यांच्या पेढ्यांनीं दुष्काळ कांहीं कमी होईल काय, अशा अनेक दुष्काळाच्या आरोळ्यांनीं काटेवाडाप्रमाणें प्रे. वाच्छा ह्यांचें भाषण अतिशय भयंकर आणि भयाण झालेलें आहे. प्रे. रूझव्हेल्ट हे आपल्या भाषणामध्यें 'अमेरिका ही अमेरिकन लोकांकरितां आहे,' हें तत्त्व मोठ्या जोरानें प्रतिपादन करितात, व चीनमध्यें आपल्याला 'ओपन डोअर' पाहिजे, असेंही मोठ्या जोरानें सांगतात. परंतु हिंदुस्थानांतील स्थिति याहून अगदीं भिन्न आहे. हिंदुस्थान हिंदुस्थानांतील लोकांकरितां नाहीं तर तें इंग्लिश लोकांकरितां आहे, आणि

हिंदुस्थानांत इंग्लिशांना ' ओपन डोअर ' आहे, ह्या गोष्टी सिव्हिल सर्व्हिस मध्ये किंवा दुसऱ्या खात्यांतील वरिष्ठ प्रतीच्या जाग्यांवरून युरोपियन लोकांची संख्या किती आहे, हें पाहिल्यावरून अगदीं सहज लक्षांत येण्यासारखें आहे अशा प्रकारची ह्या दोन देशांमधील स्थिति आहे. ती अशी कां असावी, असा प्रश्न साहजिकपणें उत्पन्न होतो. लोकसंख्येच्या मानानें पाहिलें तर हिंदुस्थान देशाचा नंबर युनायटेड स्टेट्सच्या वरच येईल. युनायटेड स्टेट्सची लोकसंख्या अदमासें ६,२६,२२,२५० आहे व हिंदुस्थानची २८,७२,२३,००० आहे. म्हणजे युनायटेड स्टेट्सपेक्षां हिंदुस्थानांत सन १८९० च्या खानेसुमारी-प्रमाणेंसुद्धां २२,४६,००,७५० लोक जास्त आहेत. इतके बावीस कोटी लोक जास्त असून ते केवळ दुःख भोगण्यासाठीं आणि दुष्काळांत उपाशी मरण्यासाठीं जास्त असावे, हें पाहून कोणालाही खेद वाटल्यावांचून राहणार नाहीं. त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतील उत्पन्नासंबंधानें युनायटेड स्टेट्सशीं तुलना केली असतां त्या बाबतींतही हिंदुस्थान कमी नाहीं. सरकारी रेव्हेन्यूच्या आंकड्यांवरून पाहतां युनायटेड स्टेट्सचा रेव्हेन्यू अदमासें ८,१३,८८,५०० पौंड आहे. आणि दहा रुपयांचा एक पौंड ह्या जुन्या पद्धतीप्रमाणें हिंदुस्थानचा रेव्हेन्यू सुमारें ९,६५,६१,५०० पौंड आहे. म्हणजे युनायटेड स्टेट्सपेक्षां हिंदुस्थानचा रेव्हेन्यू १,५१,७३,००० पौंड जास्त आहे. हिंदुस्थानच्या पोटांत इतकी अधिक संपत्ति असतां आणि हिंदुस्थानच्या पाठीवर इतकी अधिक लोकसंख्या असतां त्याच्या कपाळाची हीन स्थिति सुटूं नये, ही मोठी शोचनीय गोष्ट आहे. लॉर्ड कर्झनसाहेब हे चांगले विचारी मुत्सद्दी आहेत. ते हिंदुस्थानांतील लोकांची वर दाखविलेली दुर्दशा दूर करण्याकरितां जर कांहीं खटपट करतील तर त्यांचे हिंदुस्थानावर अत्यंत उपकार होणार आहेत. पण हिंदुस्थानच्या गव्हर्नर-जनरलपेक्षां हिंदुस्थानच्या लोकांनींच आपल्या सद्यःस्थितीचें जास्त परिशीलन केलें पाहिजे, म्हणजे त्यापासून त्यांचा अधिक फायदा होणार आहे.

---

## कानपूरची विहीर : : : २०

काळ : अग्रलेख ता. १०।१।१९०२

मि. स्मेडले ह्या नांवाचे एक युरोपियन गृहस्थ यंदां हिंदुस्थानांत प्रवास करून येथील स्थिति प्रत्यक्ष पाहण्याच्या इराद्यानें व मद्यपाननिषेधाच्याबद्दल व्याख्यानें देण्याच्या हेतूनें इकडे आलेले आहेत, ही गोष्ट पुष्कळांना माहीत असेल. हे गृहस्थ फिरतां फिरतां एकदां कानपुरास येऊन पोहोंचले. कानपूर हें शहर अनेक कारणांसाठीं प्रसिद्ध आहे. हल्लीं तें एक व्यापाराचें जंगी ठिकाण झालें आहे, म्हणून त्याची प्रख्याति आहे. परंतु ही व्यापाराची वाढ कानपुरास अलीकडची आहे. पूर्वीं कानपूर व्यापारासाठीं फारसें प्रसिद्ध नव्हतें. पूर्वीं कानपूर दुसऱ्या एका गोष्टीसाठीं प्रसिद्धीस आलेलें होतें. लॉर्ड डलहौसी साहेबांच्या कृतीनें जेव्हां हिंदुस्थानांतील १८५७ सालच्या भयंकर बंडाला प्रारंभ करविला, त्या वेळीं कानपूर हें शहर सर्वतोमुखीं झालें. नानासाहेब पेशव्यांनीं त्या ठिकाणीं त्या वेळीं युरोपियन लोकांची एक फार भयंकर कत्तल केली. त्या कत्तलींत जे युरोपियन लोक मारले गेले, त्यांचीं प्रेतें गोळा करून तेथील एका विहिरीमध्यें टाकण्यांत आलेलीं होतीं. ती विहीर म्हणजे हल्लीं एक दर्शनीय वस्तु होऊन बसलेली आहे. आग्र्यास गेल्यावर ताजमहाल पाहावयाचा, किंवा प्रयागास गेल्यावर प्रयागचा किल्ला पाहावयाचा, त्याप्रमाणे कानपुरास गेल्यावर ही कानपूरची विहीर पाहावयाची, असा शिरस्ताच पडून गेलेला आहे. कारण, सत्तावन सालच्या बंडामुळें या विहिरीला एक प्रकारचें ऐतिहासिक महत्त्व आलेलें आहे. तेव्हां अशी नामांकित विहीर पाहण्याविषयीं कोणाला इच्छा उत्पन्न होणार नाहीं ! परंतु ह्या बाबतींत आपली इच्छा तृप्त

करून घेण्याचें सगळ्यांच्याच कपाळीं नसतें. कांहीं भाग्यवान् लोकांना मा-
त्र तें सुख अनुभवायाला सांपडतें. हे भाग्यवान् म्हणजे अर्थातच युरो-
पियन लोक होत. युरोपियन लोकांना ही विहीर पाहण्याला परवानगी आहे
इतरांना नाहीं. एखादा हिंदु किंवा मुसलमान म्हणेल कीं, आपण ती विहीर
पाहावी, तर त्याला ती पाहावयाला मिळणार नाहीं. त्यानें ती पाहतां कामा
नये. अशा प्रकारचा एक चमत्कारिक निर्बंध ह्या विहिरीसंबंधानें तेथील
अधिकाऱ्यांनीं करून ठेविला आहे. असा प्रतिबंध असणें वास्तविक बरोबर
नाहीं. पाहण्यासारखी जी वस्तु आहे ती कोणालाही पाहूं द्यावी. ती युरोपिय-
नांनींच पाहावी आणि नेटिवांनीं पाहूं नये, असला जातिभेदाचा नियम कशाला
पाहिजे! नेटिवांनीं ही विहीर पाहूं नये असा नियम नसता, तर कदाचित् ती
विहीर पाहण्याची उत्सुकता नेटिवांच्या मनांमध्यें जागृतही झाली नसती.
कारण, स्वभावतः नेटिवांचें असल्या गोष्टींकडे कांहींसें दुर्लक्षच असतें. त्यांना
असल्या ऐतिहासिक महत्त्वाच्या गोष्टी शोधकबुद्धीनें पाहण्याचा नाद कमीच
असतो. इतिहासापेक्षां धर्माकडे त्यांची प्रवृत्ति जास्त. कृष्णाला यशोदेनें
कोणत्या उखळीला बांधून ठेविलें होतें हें पाहण्याकरितां कोंकणचा ब्राह्मण
कर्ज काढून मथुरेला आणि गोकुळाला जाईल. परंतु खडकीची लढाई कोठें
झाली, त्या नेमक्या जागेबद्दल ज्ञान प्राप्त करून घेण्याची उत्सुकता खुद्द
पुणें शहरांतील लोकांपैकीं शेंकडा पंचविसांना तरी असेल किंवा नाहीं, ह्याच्या-
बद्दल शंकाच आहे. असल्या या ऐतिहासिक स्थलमहात्म्याकडे लक्ष पोहोंच-
विणें ही इंग्रजांतील प्रवृत्ति आहे. ती अजून अशिक्षित नेटिवांच्या मनामध्यें
बिंबलेली नाहीं. ह्यामुळें कानपूरची विहीर पाहण्याचा प्रतिबंध नसता तर त्या
विहिरीबद्दलची जिज्ञासाही नेटिवांच्या मनांत फारशी उत्पन्न झाली नसती.
परंतु नेटिवांना ही विहीर पाहण्याची परवानगी नाहीं, असें म्हटलें म्हणजे
प्रत्येक नेटिवाच्या मनामध्यें ती पाहण्याची उत्कंठा जागी होते. युरोपियन
लोक ती विहीर आपल्याला कां पाहूं देत नाहींत, त्यांत काय आहे, तेथें पूर्वी
काय झालें होतें, तें कोणीं केलें होतें, तें कां केलें होतें, जें केलें तें बरोबर
केलें किंवा अगदीं गैर केलें, अशा प्रकारचे अनेक प्रश्न एका प्रतिबंधामुळें प्रति-
बद्ध झालेल्या नेटिवांच्या मनामध्यें अवश्य उद्भवतात. सत्तावन्न साल आज
पंचेचाळीस वर्षें होऊन गेलीं. सत्तावन्न सालांत कोणीं कशासाठीं आणि

(न्)याय केलें, याची माहिती १९०२ सालांतील निम्मे लोकांना तरी असेल किंवा (न)सेल ह्याची वानवाच आहे. ज्यांनीं ५७ सालांत कांहीं कर्तबगारी केली ते (ब)हुतेक मरूनच गेलेले आहेत. त्या वेळीं काय चाललें आहे हें समजण्याइतके (जे) सत्तावन सालांत तरुण होते ते आज इतके वृद्ध झालेले आहेत कीं, त्या (वे)ळची माहिती दुसऱ्यांना सांगण्याला त्यांच्या तोंडांत दांतही उरलेले नाहींत. (न)वीन लोकांना तर १८५६ च्या पुढील साल १८५७, ह्याच्यापेक्षां सत्तावन सालाची जास्त माहिती क्वचितच असणार. अशा रीतीनें हिंदुस्थानांतील लोकांची सत्तावन साल विसरण्याकडेच प्रवृत्ति होत असतां,. वरच्यासारख्या प्रतिबंधांनीं तिला डंवचणें चांगलें नाहीं. असा प्रतिबंध असणें इष्ट नाहीं व त्या प्रतिबंधांत आणखी जातिभेद असणें हें तर अगदींच इष्ट नाहीं. हा पक्षपात आहे. हा केवळ अन्याय आहे. आणि हा ढळढळीत अन्याय आहे, असें केवळ आपल्याला नेटिवांनाच वाटतें असें नाहीं, तर ज्यांची सदसद्विवेकबुद्धि हिंदुस्थानांतील हवेनें बिघडून गेली नाहीं, अशा कित्येक युरोपियन गृहस्थांनाही हा अन्याय म्हणून वाटत आहे. स्मेडलेसाहेब हिंदुस्थानांतील प्रेक्षणीय वस्तु पाहण्यासाठीं म्हणूनच हिंदुस्थानांत आलेले आहेत. तेव्हां कानपुरास पोहोंचल्यावर साहजिकपणेंच ते कानपूरची प्रसिद्ध विहीर पाहण्याकरितां गेले. त्या वेळीं त्यांच्याबरोबर कोणी एक नेटिव मनुष्य होता. ज्या कांपाउंडमध्यें सदर विहीर आहे, त्याच्या द्वारपाळांनीं स्मेडलेसाहेबांना आंत जाण्याची विनंति केली, परंतु त्यांच्याबरोबर असलेल्या नेटिवाला ते आंत जाऊं देईनात. हा प्रतिबंध निष्कारण, निरुपयोगी आणि उलट चीड आणणारा मात्र आहे, असें स्मेडलेसाहेबांनादेखील त्या वेळीं वाटलें, व त्यावरून स्मेडलेसाहेबांचें आणि तेथील जयविजयसाहेबांचें या प्रश्नासंबंधानें बरेंच वाग्युद्ध झालें.

अशी या विहिरीसंबंधानें थोड्या दिवसांपूर्वीं विलक्षण हकीकत घडून आलेली आहे. ह्या प्रश्नासंबंधानें लिहीत असतांना एका सुधारक जातीच्या पत्रानें आपल्या जातीला आणि कुळाचाराला अनुरूप असे कांहीं अपूर्व उद्गार काढले आहेत. ते वाचून सुधारकांच्या विचित्र मतांबद्दल कोणालाही हसूं आल्यावांचून राहणार नाहीं. हें पत्र म्हणतें, "स्मेडलेसाहेबांनीं नेटिवाला तेथें आपल्याबरोबर कशाला नेला ! त्यांनीं त्याला आंत नेलें म्हणजे नेटिवांच्या इज्जतींत मोठीशी भर पडली असें नाहीं. तेथें काय पाहावयाचें आहे ! विहीर

म्हणजे हिंदुस्थानामध्यें मोठा आश्चर्याचा विषय आहे असें नाहीं!" हे विचा पाहून असल्या विचाराच्या माणसाची कोणालाही कींव आल्यावांचून राहणा नाहीं. 'There is nothing to see there' हे उद्गार जर कानपूरच्या विहीरीसंबंधानें असतील, आणि जर ह्याप्रमाणें कानपूरच्या विहिरीमध्ये पाहण्यासारखें विशेष कांहीं नसेल, तर मग दुसऱ्या अशा कोणत्या विहिरी पाहण्यासारख्या आहेत कोण जाणे! तेथें पाहण्यासारखें काय आहे, ह्याला उत्तर हेंच कीं, तेथें पाहण्यासारखें काय नाहीं? तेथील सर्व कांहीं पाहण्यासारखेंच आहे. सूक्ष्म दृष्टीनें आणि विचारयुक्त अंतःकरणानें पाहणारा असेल तर त्याला तेथें पुष्कळ गोष्टी दिसण्यासारख्या आहेत. त्याला तेथें विधवांनीं केलेले नवरे, किंवा म्लेच्छादिकांशीं अन्नव्यवहार केलेले ब्राह्मण दिसावयाचे नाहींत हें खरें. परंतु ह्याच्यापेक्षां जास्त महत्त्वाच्या गोष्टी जगामध्यें कांहीं आहेत, आणि त्या विचारी नेटिवाला त्या विहिरीमध्यें दिसल्यावांचून राहणार नाहींत. ह्या विहिरींत टाकलेलीं कतल केलेल्या युरोपियनांचीं प्रेतें अजूनपर्यंत जशींच्या तशीं नसतीलच. तेव्हां तीं त्याला दिसणार नाहींत, हें उघडच आहे. परंतु त्याला त्या विहिरींत त्या प्रेतांच्यामधून आपला हिंदुस्थान देश दिसेल. सगळें उत्तर हिंदुस्थान एका हेतूनें एकत्र गोळा झालेलें त्या विहिरीच्या लहानशा जाग्यांत त्याच्या नजरेस पडेल. हिंदुस्थानांत जागृत असलेल्या धर्माभिमानाचा प्रकाश त्या विहिरीच्या तळाजवळील अंधकारामध्येंही त्याला दृग्गोचर होईल. तेथें त्या विहिरीच्या आकुंचित परिघांतील विस्तीर्ण मैदानावर नानासाहेब आणि लक्ष्मीबाई ही जोडी आपले घोडे भरधांव फेकीत असतांना दृष्टीस पडेल. तात्या टोपे आपल्या अव्यवस्थित सैन्याला व्यवस्थितपणानें उभें करीत असलेला त्याला तेथें आढळेल. तुटलेली गंगाजळी, तुटलेलें तारायंत्र आणि फुटलेलीं डोकीं हीं त्याला त्यामध्यें दिसतील. त्याची आशा आणि त्याची निराशा हीं त्याला त्या विहिरीमध्यें दिसतील. वद्यचतुर्दशीच्या चंद्राप्रमाणें अधकतेजाचा हिंदुस्थानचा भाग्योत्कर्ष उगवतां उगवतांच मावळलेला त्याला त्या विहिरीमध्यें दिसेल. त्या विहिरींत हिंदुस्थानचा भाग्यास्त, परंतु हिंदुस्थानांतील ब्रिटिश छत्राखालील भावी सुराज्याचा उदय त्याला दिसेल. एक आशा नष्ट झालेली परंतु ब्रिटिश सरकारच्या तंत्रानें चालून पुढें प्राप्त होणाऱ्या राजकीय हक्कां-

पर्यांची दुसरी आशा उत्पन्न झालेली त्याला तेथें दिसेल. १८५७ सालच्या रिणामापासून निर्माण झालेली निराशा परंतु १८५८ सालच्या जाहीरनाम्यापासून उद्भवलेली आशा त्याला तेथें दिसेल. ह्या व अशा दुसऱ्या अनेक गोष्टी त्याच्या डोक्यांतील कल्पना त्या विहिरीमध्यें उत्पन्न करतील. व अशा वेळची त्या मनुष्याची ती कल्पनासृष्टि इतकी विविध आणि विस्तीर्ण होईल कीं, तिचा समावेश करण्याला ती विहीर फारच लहान होईल. इतक्या गोष्टी तेथें दिसण्यासारख्या आणि पाहण्यासारख्या असून ' तेथें पाहण्यासारखें काय आहे ?' असें एखाद्यानें म्हणावें, ही मोटी लांछनास्पद गोष्ट आहे.

वास्तविक पाहतां ह्या येथें पाहण्यासारख्या गोष्टी आहेत. पण क्षणभर असें गृहीत घेतलें कीं, तेथें कांहीं पाहण्यासारखें नाहीं, तर मग युरोपियन लोक तरी तेथें कशाला जातात ?। तेथें काय पाहण्यासारखें आहे ? ' There is nothing to see there.' इतर विहिरी असतात त्यांतलीच ती एक विहीर ! मध्यें आकाशाची पोकळी आणि त्या आकाशमय पोकळीच्या भोंवतीं पार्थिव विटांचा गराडा. ह्यापेक्षां त्या विहिरींत जास्त काय आहे ? आणि युरोपियनांनीं कधीं आकाशाची पोकळी पाहिली नाहीं ? किंवा विटा पाहिल्या नाहींत ? पाहिल्या आहेत ना ? झालें तर, मग तेथें हे लोक पाहावयाला जातात तें काय ? पण युरोपियन लोक तेथें काय पाहावयाला जातात, याची कल्पना अलीकडच्या काळांतील नेमळ्या आणि एकतंत्री सुधारक लोकांना कोठून असणार आहे ? ' A well is not a curiosity in India,' असेंच तें म्हणणार. पण स्वतंत्रतेच्या हवेंत वाढलेल्या युरोपियन लोकांना त्या ठिकाणीं पाहण्यासारखें पुष्कळच आहे असें वाटत असतें, व म्हणूनच ते ती विहीर पाहावयाला जातात. पण जर युरोपियन ती पाहतात तर नेटिवांनीं तिला कां पाहूं नये ? नेटिवांनींच काय केलें आहे ? त्या विहिरीकडे नेटिवांनींच कां जाऊं नये ? सिव्हिल सर्व्हिसकडे किंवा कूपर्स हिल कॉलेजकडे नेटिवांनीं जाऊं नये, असें जर कोणीं म्हटलें तर तें कां, हें कोणालाही समजतें. कारण, तिकडे पुष्कळ पैसा, थोडें काम, मुबलक ऐषआराम, यथेष्ट चैन, पाहिजे तें करण्याची हातांत सत्ता, सरकारचें राजरहस्य, वगैरे अनेक गोष्टी तिकडे असतात; म्हणून नेटिवांनीं तिकडे जाऊं नये, हें म्हणणें समंजसपणाचें आहे. पण कानपूरच्या विहिरीमध्यें काय आहे ? तिच्यांत काय पुष्कळ पैसे आहेत ?

किंवा कांहीं ऐषआराम आहेत ? असें कांहींच नाहीं. मग नेटिवांना बंदी ती कांहीं मोठ्या पगाराची जागा नाहीं. किंबहुना त्या जागेवर पगार मुळ मिळत नाहीं. मग अशा ठिकाणीं तर नेहमींच्या इंग्रजी पद्धतीप्रमाणें म्ह म्हणजे नेटिवांना मुक्तद्वार असावयाचें. मग तसें येथेंच कसें नाहीं ?

आतां कोणी असें म्हणेल कीं, तें स्थळ पाहिलें असतां नेटिवांचें म खवळेल, म्हणून नेटिवांना तेथें जाऊं देत नाहींत. परंतु हें समाधान फा समाधानकारक नाहीं. नेटिवांचीं मनें खवळतील असें गृहीत धरलें, तरी मनें खवळलीं म्हणून काय करणार ? सत्तावन सालच्या पूर्वी लोकांच्याजा शस्त्रें होतीं. निर्विष आणि निर्दंत झालेले साप मोठ्यानें फोफावले तरी बिचा काय करणार ? त्या बिचाऱ्यांच्या हातून काय होणार ?– पण आधीं नेटि वांचीं मनें जीं खवळणार तीं कशासाठीं ? नेटिवांनीं तेथें युरोपियनांची कत्त केली म्हणून ? मनें क्षुब्ध होण्याला हें कारण जुळत नाहीं. ह्यानें कदाचि कोणा कृतघ्नाला समाधान वाटेल असें म्हटलें तर शोभेल, पण ह्यानें नेटिवांचें मन क्षुब्ध होईल हें म्हणणें सुसंगत नाहीं. जर ह्यापासून कोणाचें मन खवळण्याचा संभव असेल तर तें युरोपियनांचेंच मन होय. 'नेटिवांनीं आपल्या जातभाईंची येथें कत्तल केली काय ? हे नेटिव किती क्रूर आहेत ! ह्यांचा सूड घेतला पाहिजे !' असे विचार साहजिकपणें युरोपियनांच्याच मनामध्यें ही विहीर पाहून उद्भवण्याचा जास्त संभव आहे; व कोणा अदूरदर्शी युरोपियनांच्या मनांत असे विचार आले तर त्याचा वाईट परिणामही नेटिवांनाच सोसावा लागणार आहे. ह्याकरितां ती विहीर पाहण्याची जर कोणाला बंदी करावयाची असेल तर ती युरोपियन लोकांनाच केली पाहिजे, असें वास्तविक न्यायानें निष्पन्न होतें. पण वस्तुस्थिति अशी असतां युरोपियनांना पूर्ण मुक्तद्वार आणि नेटिवांना पूर्ण बंदी असा प्रकार झालेला आहे. बिचाऱ्या नेटिव संन्याशांच्या मागेंच हा विनाकारण सूळ लागलेला आहे, हें चांगलें नव्हे.

लॉर्ड कर्झनसाहेब ह्यांना जुन्या ऐतिहासिक स्थळांची फार अभिरुचि आहे. तीं स्थळें पाहण्यांत काय प्रेम आहे ह्याची खरी कल्पना त्यांना असल्यामुळें त्यांच्या अमलाखालील नेटिव लोकांच्या मनांत उद्भवणाऱ्या तसल्याच प्रेमा-च्या आड येणारे जे प्रतिबंध कांहीं पूर्वींच्या कारकीर्दीपासून सुरू होऊन आतां-

त चालत आलेले आहेत ते बंद करण्याची जर ते योग्य तजवीज करतील, र ते आपल्या लोकप्रियतेच्या मुकुटांतील आणखी एक कोंदण एका चांगल्या हिऱ्यानें भरून काढतील यांत शंका नाहीं.

---

## दक्षिण अमेरिका : : : २१

काळ : अग्रलेख ता. १७।१।१९०२

---

एकदां एका मोठ्या बेडकानें एका लहान प्राण्याला आपल्या तोंडामध्यें धरिलें. त्या वेळीं त्या लहान प्राण्याची फारच दुर्दशा झाली. त्यानें त्या बेडकाच्या तोंडांतून सुटण्याविषयीं पुष्कळ प्रयत्न केले, परंतु त्याचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. उलट तो सुटण्याविषयीं जसजसे जास्त प्रयत्न करी, तसतसा तो त्या बेडकाच्या घशामध्यें जास्तच खोल खोल जाऊं लागला. अशा स्थितींत त्या बिचाऱ्या प्राण्याचा जीव कोंडून गेला. अंगांतील शक्ति नाहींशी झाली. हातपाय हलविण्याची त्याला ताकद राहिली नाहीं. अंतकाळीं संरक्षण करणाऱ्या परमेश्वराचें स्मरण करून आतां आपल्याला मृत्यु केव्हां येईल ह्याची वाट पाहत तो स्वस्थ बसला होता. आपण ह्या बेडकाच्या तोंडांतून सुटूं अशी आशा त्याला मुळींच नव्हती. पण इतक्यांत एक मोठा सर्प फोंफावत त्या बेडकाच्या अंगावर चाल करून आला, आणि त्यानें यमराजधानीच्या दिल्ली-दरवाजाप्रमाणें आपलें भयंकर तोंड उघडून दोन्ही जबड्यांमध्यें त्या बेडकाला आंवळून धरिलें, त्या वेळीं त्यापासून होणाऱ्या वेदना सहन न होऊन दीन-वाणीनें तो बेडूक आक्रोश करूं लागला. तेव्हां त्याचें तोंड सहजच उघडलें,

आणि त्याच्या आंतमध्यें जो बिचारा प्राणी अडकून राहिला होता तो पट- बाहेर पडला आणि स्वतंत्र झाला.

ही जी जुने लोक एका बेडकाची गोष्ट सांगतात, ती पुष्कळ मोठमोठ राष्ट्रांना लागू पडते, पण स्पेनला तर ती विशेषच लागू पडते. अठराव्या श- काच्या अखेरीस स्पेन देश बेडकाप्रमाणेंच फुगलेला होता. आजूबाजूचे बारीक- सारीक जीवजंतु खाऊन जसा एखाद्या बेडूक गलेलठ्ठ बनलेला असतो, त्या- प्रमाणें आसपासचे आणि दूरवरचे, लहान आणि मोठे, अनेक प्रदेश जिंकून आपल्यामध्यें सामील करून घेतलेले असल्यामुळें स्पॅनिश साम्राज्य त्या वेळीं अतिशय विस्तृत आणि अतिशय जबरदस्त झालेलें होतें. हल्लीं जसा ब्रिटिश साम्राज्यावर सूर्य कधींही मावळत नाहीं, तसा तो पूर्वी स्पॅनिश साम्रा- ज्यावर मावळत नसे. हल्लीं ज्याप्रमाणें इंग्लंड आपल्याला आजिंक्य मानीत आहे, त्याप्रमाणें त्या वेळीं स्पेन आपल्याला आजिंक्य मानीत असे. हल्लीं ज्याप्रमाणें दक्षिण आफ्रिका, हिंदुस्थान वगैरे ठिकाणांहून सोनें आणि संपत्ति नेऊन इंग्लंड गबर झालें आहे, त्याप्रमाणें त्या वेळीं दक्षिण अमेरिका, मेक्सि- को वगैरे ठिकाणच्या सोन्यारुप्यावर स्पेन देश गबर झालेला होता. हल्लीं ज्या- प्रमाणें इंग्लंड हिंदुस्थानावर आपला बादशाही अमल गाजवीत आहे, त्या- प्रमाणें त्या वेळीं स्पेन दक्षिण अमेरिकेवर आपला अरेरावी अमल गाजवीत होतें. हिंदुस्थान देश ही पाहिजे ती वस्तु देणारी कामधेनु जशी इंग्रजांच्या हातीं सांप्रत लागली आहे, तशीच दक्षिण अमेरिकेची कामधेनु स्पॅनिश लोकांच्या हातीं लागली होती. आणि आपल्या ह्या आर्यधेनूच्या शरिरांतून ज्याप्रमाणें सुवर्णरस हल्लीं इंग्रजांकडून पिळून घेतला जात आहे, त्याचप्रमाणें त्या वेळीं त्या अमेरिकन कामधेनूच्या अंगापासून स्पॅनिश लोक सुवर्णरस पिळून घेत होते; व हल्लीं ज्याप्रमाणें हिंदुस्थानामुळें—हिंदुस्थानांतील संपत्तीमुळें, हिंदुस्थानांतील सैन्यामुळें, हिंदुस्थानांतील धान्यामुळें, हिंदुस्थानांतील कच्च्या मालामुळें, हिंदु- स्थानांतील गिऱ्हाइकीमुळें—इंग्लंडला युरोप खंडामध्यें एक प्रकारचें वजन आलेलें आहे, त्याप्रमाणें त्यावेळीं दक्षिण अमेरिकेमुळें स्पेन देशाला युरोप- खंडामध्यें एक प्रकारचें वर्चस्व प्राप्त झालेलें होतें.

ज्याच्या योगानें स्पेनला युरोपखंडामध्यें इतकें वर्चस्व मिळालें, त्या दक्षिण अमेरिकेमध्यें तसेच कांहीं विशेष गुण आहेत ह्यांत शंका नाहीं. हिंदुस्थान-

णेंच तें दक्षिण अमेरिकेचें निधान कोणाच्याही हातीं लागलें तरी त्यानें ला श्रीमंतच करून सोडिलें असतें. परंतु पूर्वपुण्याईमुळें दक्षिण अमेरिका निश लोकांच्याच हातीं लागली. आणि तेव्हांपासून तेथील मूळच्या इंडियन लोकाच्या विपत्तीला आणि उपरी झालेल्या स्पॅनिश लोकाच्या संपत्तीला प्रारंभ झाला. ज्याप्रमाणें एखाद्या रोगाचा जंतु एखाद्या रक्तवाहिनी शिरेमधून मनुष्याच्या शरिरामध्यें प्रवेश करितो, त्याप्रमाणें १५१९ सालीं ओरिनोको नदीच्या मधून कोलंबसानें दक्षिण अमेरिकेच्या हृदयामध्यें प्रवेश केला, व त्यानें थमतः तेथें आपल्या राजाचा बावटा उभारिला. हिंदुस्थान देश जिंकण्याला जाणाऱ्या इंग्रजांना परभारेंच का होईना, पण थोड्याबहुत तरी लढाया कराव्या लागल्या. परंतु दक्षिण अमेरिकेमध्यें स्पॅनिश लोकांना तोही त्रास पडला नाहीं. पिझैरो, कोर्टेज, वगैरे स्पॅनिश शिपायांना आपलें क्रौर्य क्वचित् टिकाणीं खर्च करावें लागलें नाहीं असें नाहीं. तरी पण दक्षिण अमेरिका हा देश इतका मोकळा आणि ओसाड पडलेला होता कीं, पाहिजे तेथें जाऊन वसाहत करून राहिल्यास स्पॅनिश लोकांना प्रतिबंध करावयाला तेथें कोणीही नव्हतें. दक्षिण अमेरिकेचा प्रदेश फारच अफाट आणि विस्तीर्ण आहे. त्याचें क्षेत्रफळ ७१,६०,००० चौरस मैल आहे. ही जागा इतकी विपुल आहे कीं, तेथें स्पॅनिश लोकच काय, परंतु आणखी कित्येक लोक तेथें रहावयाला आले तरी त्यांना ती पुरून उरण्यासारखी आहे. पण तेथें नुसती रिकामीच जागा आहे असें नाहीं. तर ती अत्यंत सुपीकही आहे. सुपीकपणाच्या बाबतीमध्यें हिंदुस्थानसारखा जर एखादा प्रदेश असला तर तो दक्षिण अमेरिकाच होय. गंगा, यमुना आणि सिंधु ह्यांच्या योगानें ज्याप्रमाणें उत्तर-हिंदुस्थान जलमय आणि सुपीक झालें आहे, त्याप्रमाणेंच अमेझॉन, ओरिनोको, रायो-डि-ला-प्लाटा वगैरे जगांतील अतिशय मोठ्या नद्यांनीं दक्षिण अमेरिकेला सुपीक करून सोडिलें आहे. नाईल नदीप्रमाणें ओरिनोको नदीला पूर आला किंवा भरतीच्या योगानें तिचें पाणी वाढलें म्हणजे तें आसपास अतिशय दूर अंतरापर्यंत पसरतें. पंपासच्यासारखीं चित्रविचित्र, रम्य आणि विस्तीर्ण मैदानें तर अमेरिकेशिवाय दुसऱ्या कोठें मिळावयाचींच नाहींत. हा प्रदेश कैक कोसपर्यंत मोटमोठ्या झाडांनीं आणि निरनिराळ्या प्रकारच्या रंगांच्या फुलांनीं कित्येक ऋतूंत

सुशोभित आणि मनोवेधक झालेला असतो. ह्या बाह्य सौंद तर दक्षिण अमेरिका स्पॅनिश लोकांना आवडलीच, परंतु त्या प्रदे पोटामध्यें जें सौंदर्य होतें, त्यासाठीं ती त्यांना जास्त प्रिय झाली दक्षिण अमेरिकेसारख्या सोन्याच्या आणि रुप्याच्या खाणी त्या वेळीं ह कोठेंच नव्हत्या. मेक्सिको, पेरू, चिली, पोटोसी, ब्राझिल वगैरे ठिकाणें सुवर्णमय आणि रजतमय होतीं. दक्षिण अमेरिकेंतील निरनिराळ्या ठि च्या खाणींतून एकोणिसाव्या शतकाच्या प्रारंभीं दरवर्षी सुमारें सवा पौंडांहून जास्त किंमतीचें सोनेंरुपें पैदा होत असे. बाकीच्या खंडांमध्ये य सोनेंरुपें सांपडत नसे. हंबोल्ट यानें सर्व खंडांचें जें प्रमाण दिलें आहे असें दिसतें कीं, एशिया खंडामध्यें १८०९ सालीं सुमारें अडीच पौंड किंमतीचें सोनेंरुपें उत्पन्न झालें. युरोप खंडांत सुमारें साडेसहा लक्ष किंमतीचें झालें, परंतु अमेरिका खंडामध्यें त्याच सालीं जवळजवळ कोटीचें झालें. अॅन्डीज पर्वतांतील पोटोसी या ठिकाणीं रुप्याच्या ख पहिल्यानें स्पॅनिश लोकांना इ. स. १५४५ मध्यें सांपडल्या. आणि १८ मध्यें दक्षिण अमेरिकेंतील लोकांनीं स्पॅनिश लोकांविरुद्ध बंडाला प्रथम सुरुव केली. ह्या दोनशें पासष्ट वर्षांच्या मुदतीमध्यें, हंबोल्टनें असें प्रमाण काढि आहे कीं, स्पेननें एकंदर दक्षिण अमेरिकेमधून १,४२,६२,००,००० पौं किंमतीचें सोनेंरुपें काढून नेलें. ह्यापैकीं नुसतें रुपेंच घेऊन त्या सगळ्याचा ज एक वाटोळा गोळा बनविला असता, तर त्याचा व्यास ८५ फूट लांब झाला असता. इतकी संपत्ति स्पेननें दक्षिण अमेरिकेमधून लुटून नेली होती. इंग्रजां खेरीज इतर कोणीं हळूहळू किंवा एकदम इतकी संपत्ति दुसऱ्याच्या देशांतून आपल्या घरीं नेली असेल किंवा नाहीं याची शंकाच आहे!

अशी विपुल संपत्ति दृष्टीस पडल्याबरोबर जसे हिंदुस्थानांत इंग्लिश लोक घुसले, त्याचप्रमाणें दक्षिण अमेरिकेमध्यें स्पॅनिअर्डस्च्या झुंडीच्या झुंडी जाऊं लागल्या. स्पॅनिश लोक सुधारलेले आणि अमेरिकेंतील इंडियन लोक रानटी खरे; परंतु कांहीं दिवसांनीं स्पॅनिश लोक तेथील मूळच्या रहिवाशांशीं शरीरसंबंध करूं लागले आणि त्यांपासून क्रिओल्स या नांवाची एक नवीन व मिश्र जात उत्पन्न झाली. इ० स० १८१० मध्यें ज्या वेळीं दक्षिण अमेरिकेमध्यें बंड उद्भवलें, त्या वेळीं तेथील एकंदर लोकसंख्या सुमारें दीड कोटि होती. इतक्या लोकांवर

राज्य करण्याची स्पेननें जी पद्धत अंगीकारिली होती, तीही मोठीशी समाधानकारक होती असें नाहीं. इंग्लिश सरकार ज्याप्रमाणें हिंदुस्थानांतून संपत्ति नेतें, त्याप्रमाणें स्पॅनिश सरकार दक्षिण अमेरिकेंतील सोनेंरुपें मात्र नेत असे; परंतु तेथील राज्यव्यवस्था लोकांना समाधानकारक अशी क्वचितच ठेवीत असे. हिंदुस्थानांतील हल्लींची राज्यव्यवस्था आणि दक्षिण अमेरिकेंतील त्या वेळची राज्यव्यवस्था ह्यांच्यामध्यें पुष्कळ साम्य आहे. हिंदुस्थानांत जसा व्हाइसरॉय असतो तसाच तेथेंही एक व्हाइसरॉय असे, व येथल्याप्रमाणेंच त्याच्याही हाताखालीं एक कौन्सिल असे. हिंदुस्थानांतील व्हाइसरॉय हे जसे हिंदुस्थानचे बादशाह आहेत, त्याप्रमाणें दक्षिण अमेरिकेंतील व्हाइसरॉय हे तेथील बादशहा असत. त्या व्हाइसरॉयच्या एखाद्या कृत्याविरुद्ध तक्रार करावयाची झाली तर ती स्पेनमध्यें करावी लागत असे. परंतु हिंदुस्थानसारख्या दूर देशांतून इंग्लंडमध्यें तक्रारी करणें हल्लीं जितकें अशक्य व अनुपयोगी आहे, तितकेंच त्या वेळीं दक्षिण अमेरिकेंतून स्पेनमध्यें तक्रारी करणें हें अशक्य व अनुपयोगी होतें. तेथील व्हाइसरॉयांची अमलबजावणी करण्याची पद्धत अरेरावीपणाची आणि जुलमाची होती. आणि त्या जुलमाच्या विरुद्ध अपील करण्याच्या कामीं येणाऱ्या अडचणी हल्लीं हिंदुस्थानांत उत्पन्न होणाऱ्या अडचणींहून फारशा भिन्न होत्या असें नाहीं. येथल्याप्रमाणेंच तेथील गव्हर्नरच्या मुदती पांच वर्षांच्या असत. त्यामुळें लक्षावधि लोकांचें कल्याण किंवा अकल्याण ज्या जागेवर अवलंबून आहे अशा जागेवर गैरमाहीतगार मनुष्य येणें व त्याला आपल्यावरील जबाबदारीची आणि कामाची थोडीशी माहीतगारी होत आहे तोंच त्याच्या जागीं फिरून नवीन ताजा गैरमाहीतगार मनुष्य आणून बसविणें, हे जे तोटे हिंदुस्थानांतील लोक आज सोशीत आहेत, तेच तोटे शंभर वर्षांच्या पूर्वी दक्षिण अमेरिकेंतील लोकांना सहन करावे लागत होते. व्हाइसरॉय म्हटले कीं, कोठें झालें तरी त्यांना काम बेताबाताचेंच. तेव्हां बहुतेक रिकाम्या असलेल्या वेळामध्यें तिकडील व्हाइसरॉय कायद्याच्या कोणत्याही कलमाखालतीं न सांपडतां सपाटून द्रव्य गोळा करण्याच्या कामामध्यें गुंतलेले असत. तिकडे लोकांवर जुलूम होत नसत असेंही नाहीं. सीलोनमध्यें किंवा आसाममध्यें इंग्लिशांच्या फायद्याकरितां चहाची लागवड करण्यासाठीं असे इकडील इंडियन लोक नेले जातात, त्याप्रमाणेंच

तिकडील स्पॅनिश लोकांच्या खाणींतून काम करण्यासाठीं दक्षिण अमेरिकेंतील इंडियन लोकांना ठरीव रोजमुऱ्यावर नेण्यांत येत असे. परंतु तेथें त्यांना काम जास्त पडत असल्यामुळें व पोटाला पुरेसें मिळत नसल्यामुळें ते पटापट प्राणाला मुकत असत. आपल्या इकडे दुष्काळांतील रिलीफ कामावरील लोकांना धान्य विकण्याविषयींचे मक्ते किंवा परवाने जसे कांहीं विशिष्ट लोकांनाच देण्यांत येतात, त्याप्रमाणें ह्या खाणींत काम करणाऱ्या लोकांना विकावयाच्या सामानाचे मक्ते सरकारच्या मर्जींतील स्पॅनिश लोकांना देण्यांत येत असत. परंतु ते मक्तेदार अशी लबाडी करीत कीं, त्यांच्यापासून जास्त किंमत घेऊन फिरून जो अतिशय खराब माल असेल तो ते त्यांच्या पदरीं बांधीत असत. दक्षिण अमेरिकेंतील व्यापाराच्या आणि शेतकीच्या बहुतेक जिनसांचे मक्ते स्पॅनिश लोकांना त्यांचें कल्याण व्हावें म्हणून देण्यांत आलेले असत, व त्यामुळें येथल्याप्रमाणेंच तेथेंही अमुक धंदा नेटिवांनीं करूं नये आणि तमुक धंदा नेटिवांनीं करूं नये, अशा प्रकारच्या प्रतिबंधक नियमांनीं सर्व अमेरिकन उद्योगधंदे लोकांनीं आपल्या फायद्याकरितां बळकावून टाकले होते. परंतु अशा रीतीनें उद्योगधंदे बंद पडत चालल्यामुळें हिंदुस्थानांतील लोकांप्रमाणेंच दक्षिण अमेरिकन लोकांना अतिशय त्रास होऊं लागला. परमेश्वरानें मनुष्याकरितां लागेल तितकें मीठ उत्पन्न करण्याची शक्ति समुद्राच्या पाण्याला देऊन ठेविली आहे. परंतु तें आपल्याशिवाय दुसऱ्या कोणींही उत्पन्न करूं नये, असा नियम इंग्रज सरकारनें जसा हिंदुस्थानांत केला आहे, तशाच प्रकारचे कांहीं जुलमी नियम स्पॅनिश सरकारनेंही अमेरिकेमध्यें करून ठेविले होते. देव देतो, पण स्वार्थपरायण राजा खाऊं देत नाहीं, अशा प्रकारची स्थिति अमेरिकेमध्येंही होती. अमेरिकेंतील जमीन फार सुपीक, वाटेल तो पदार्थ उत्पन्न होण्याचें सामर्थ्य परमेश्वरानें मनुष्याकरितां त्या जमिनीमध्यें ठेविलेलें होतें. परंतु स्पॅनिश सरकारनें स्वार्थासाठीं असा नियम केलेला होता कीं, द्राक्षें, अंजीर, बदाम वगैरे फळांचीं झाडें तेथें कोणींही लावतां कामा नयेत. हायकोर्टांतील ओरिजिनल साइडकडील मोठमोठ्या प्रतींचीं कामें आपल्या इकडील नेटिव वकिलांना चालवितां यावयाचीं नाहींत असें नाहीं. परंतु त्यांनीं फक्त किरकोळ अर्जें वगैरेंचेंच काम करावें, हा ठराव जसा आपल्या सरकारनें युरोपियन बॅरिस्टरांच्या वगैरे फायद्यासाठीं केलेला

आहे, त्याप्रमाणेंच तिकडे लोकांना वापरण्याला जितकें जाडेंभरडें कापड लागतें, त्याच्यापेक्षां जास्त बारीक कापड तेथें विणण्याची सक्त मनाई होती. तेथें बारीक कापड निघालें नसतें असें नाहीं. परंतु आपल्या जातभाईंचा फायदा होण्यासाठीं स्पॅनिश सरकारला असले नियम करणें जरूर वाटत होतें. स्पॅनिश लोक अमेरिकेंतील नेटिवांबद्दल इतके साशंक असत कीं, त्यांना समुद्रांतील मोठमोठे मासे मारण्याची परवानगी दिली तर त्यासाठीं ते गलबतें तयार करतील व या गलबतांच्या योगानें त्या नेटिव लोकांचें एखादें मोठें स्वतंत्र आरमारच बनून ते कदाचित् एखादे वेळीं आपल्या छातीवर बसतील, अशी त्यांना सदोदित भीति वाटत असे; व त्यामुळें नेटिव लोकांना स्पॅनिश अमलाखालीं समुद्रांतील मासे मारण्याचीसुद्धां बंदी असे. म्हणजे एक प्रकारें त्यांना उदरनिर्वाहाची, म्हणजे स्वजीवितसंरक्षणाचीच बंदी असे. आणि आपल्याला तरी स्वजीवितसंरक्षणाची कोठें परवानगी आहे! एखाद्या रानांतील जाळींतून वाघ किंवा एखाद्या लष्करांतील बराकींतून सोजीर पिसाळून आपल्या अंगावर धांवून आला, तर त्याच्यापासून आपलें संरक्षण करण्याला आपल्या हातामध्यें काय आहे! स्पॅनिश सरकारच्याचप्रमाणें इंग्लिश सरकारच्याही मनामध्यें भीति वागत आहे. त्यांना वाटतें कीं, नेटिवांच्या हातांत शस्त्रें असलीं तर ते आपल्याविरुद्ध उठून दंगा करतील. आणि म्हणून ते सशस्त्र असण्यापेक्षां निःशस्त्र असल्यामुळें त्यांना कोणीं मारलें तरी हरकत नाहीं, अशा प्रकारचें धोरण हल्लीं आपल्याकडे चालू आहे, तसेंच पूर्वी तिकडे होतें. अशा प्रकारचे अनेक अन्याय आणि जुलूम दक्षिण अमेरिकेंतील लोकांवर वरच्यावर होत असत. दक्षिण अमेरिकेंतील राज्यकारभार न्यायानें चालावा म्हणून स्पेनच्या राजानें व्यवस्था नीट करून ठेविली होती. हिंदुस्थानांतील राज्यकारभार फार उत्तम प्रकारचा चालावा म्हणून इंग्लंडच्या राजानें ज्याप्रमाणें इंडिया कौन्सिल नेमिलें आहे, त्याप्रमाणें स्पेनच्या राजानें 'कौन्सिल ऑफ दि इंडीज' या नांवाचें एक कौन्सिल नेमिलें होतें. परंतु विहिरीचीं चित्रें बुडूं शकत नाहींत, आणि नौकाचीं चित्रें तारूं शकत नाहींत, हा अनुभव सर्वांना आहे. त्याप्रमाणेंच ह्या कौन्सिलांची स्थिति होय. हीं बिचारीं काय करणार! हीं काय करतात, हें आपल्याला माहीत आहेच. तोच प्रकार कौन्सिल ऑफ दि इंडीजमध्येंही चालला होता. या कौन्सिलमधील सभासद

दक्षिण अमेरिकेंतील लोकांना कसें लुबाडावें, आणि स्पेन देशांतील लोकांना कसें गबर करावें, ह्याविषयीं युक्त्या शोधून काढण्यामध्येंच बहुतेक वेळ गुंतलेले असत. हिंदुस्थानांत जशा बहुतेक वरिष्ठ जागा इंग्लिशांना, तशा दक्षिण अमेरिकेमध्यें त्या स्पॅनिअर्ड्सना मिळत असत. स्पेनचा व्यापार वाढावा आणि त्यापासून अमेरिकेंतून पैसे उकळतां यावे यासाठीं स्पॅनिश लोकांचे सर्व प्रयत्न चाललेले होते. केडीझ आणि कोरुना हीं त्या वेळची लिव्हरपूल आणि मॅन्चेस्टर होतीं. तेथील व्यापारी अमेरिकेंतील पैशानें कसे श्रीमंत होतील हा स्पेनमधील लोकांना निदिध्यास असे; व त्यामुळें स्पेनला दक्षिण अमेरिकेपासून इतका फायदा होत असे कीं, आयात आणि निर्गत मालांचें तारतम्य पाहिलें तर त्यावरून प्रतिवर्षीं स्पेनला सुमारें साडेसत्तावीस लक्ष पौंडांची अविच्छिन्न प्राप्ति असे. ही प्राप्ति इतकी मोठी होती कीं, ती पाहून इंग्लंडच्यादेखील तोंडाला पाणी सुटलें. कारण, त्या वेळीं हिंदुस्थान इंग्लंडच्या पंजामध्यें पुरें सांपडलें नव्हतें.

अशा रीतीनें दक्षिण अमेरिकेंतील लोक स्पॅनिश जुलमाच्या निरनिराळ्या चरकांनीं अगदीं पिळून निघालेले होते, व त्यामुळें ते सहज फितुर होतील असें इंग्लंडला वाटत होतें. हल्लीं हिंदुस्थानावर ज्याप्रमाणें रशियाचा डोळा आहे म्हणून म्हणतात, त्याप्रमाणें त्या वेळीं दक्षिण अमेरिकेचा निदान कांहीं तरी भाग आपल्या हातीं यावा, अशी इंग्लंडची इच्छा होती, व त्यासाठीं स्पेनच्या अमलांतून दक्षिण अमेरिकेला स्वतंत्र केलें तर तेथील व्यापारांतील फायद्याचा बराचसा भाग आपल्याकडे येईल, असें इंग्लंडला वाटत होतें. त्या वेळीं मि. पिट हे इंग्लंडचे मुख्य प्रधान होते, व त्यांनाही दक्षिण अमेरिकेंतील व्यापाराचा ओघ इंग्लिश चॅनलकडे वळवावा असें फार वाटत होतें. लोभ सज्जनाच्याही हातून पाहिजे तीं पातकें घडवितो, मग इंग्लंडची कथा काय ! हल्लीं हॉलंड, जर्मनी, फ्रान्स येथील कित्येकजण बोअर लोकांना निरपेक्षबुद्धीनें मदत करीत आहेत, त्याबद्दल इंग्लिश लोक आंतून अतिशय चडफडत आहेत. परंतु अठराव्या शतकाच्या अखेरीस केवळ स्वार्थबुद्धीनें प्रेरित होऊन इंग्लंड दक्षिण अमेरिकेमध्यें काय करीत होतें ! स्पेनकडचा व्यापार फिरवून तो आपल्या घरांत यावा म्हणून त्या वेळीं इंग्लंडचे अतिशय गैररीतीचे गुप्त प्रयत्न चालले होते. ते प्रयत्न राष्ट्रनीतीच्या अगदीं विरुद्ध होते. तरी पण

स्वार्थनिष्णात इंग्लंडनें त्याही गोष्टी करण्याला मागेंपुढें पाहिलें नाहीं. एकदां तर ट्रिनिदादचा गव्हर्नर सर टॉमस पिक्टन याला १७९७ मध्यें इंग्लंडकडून असेंही सुचविण्यांत आलें होतें कीं, तुमच्या शेजारच्या व्हेनिझुएला ह्या प्रांतांतील लोक स्पेनच्या विरुद्ध बंड करण्याला तयार असतील तर त्यांना जी लागेल ती मदत तुम्हीं करावी, व १८०६ मध्यें वेस्ट इंडीजमधील सैन्यांतील ज. मिरांडा या नांवाच्या एका अधिकाऱ्याशीं इंग्लिशांनीं या बाबतींत कांहीं करारमदारही केलेले होते. परंतु त्या सुमाराला फ्रान्समध्यें जी बंडाळी सुरू झाली, होती आणि नेपोलियननें आपल्या अप्रतिम पराक्रमामुळें साऱ्या युरोप खंडभर जी धुमश्चक्री माजविण्याला प्रारंभ केला होता, त्याच्या योगानें त्यावेळीं इंग्लंडची पांचावर धारण बसून गेली. फ्रान्सचें उदाहरण पाहून इंग्लंडमध्येंही लोकसत्तात्मक राज्याची लाट उसळते कीं काय, आणि युरोपांतील बहुतेक राजांच्या मुकुटाग्रभागावर आपल्या बुटाचा तळवा टेवणारा नेपोलियन आपले विजयांध झालेले शिपाई इंग्लंडच्या किनाऱ्यावर आणून उतरवितो कीं काय, अशी भीति पडल्यामुळें दुसऱ्याचें घर घेण्याचा नाद सोडून इंग्लंड क्षणभर आपल्याच संरक्षणाकडे वळलें.

इकडे दक्षिण अमेरिकेंतील रहिवाशांची स्थिति दिवसेंदिवस अतिशयच वाईट होत चाललेली होती. लोकांमध्यें असंतोष अतिशय वाढलेला होता. जी गोष्ट पाहावी ती केडिझच्या व्यापाऱ्यांच्या फायद्यासाटीं, अशा प्रकारची सर्व व्यवस्था पाहून अमेरिकन लोक अगदीं हतवीर्य आणि हताश झाले होते. राखेखालील निखाऱ्याप्रमाणें ते स्पेनबद्दल अंतर्यामीं अतिशय लाल होत. स्पॅनिश लोक सदासर्वदा ऐषआरामामध्यें असत आणि नेटिव लोकांवर कष्टाचा बोजा अतिशय पडे. असल्या प्रकारच्या जुलमाच्या, अन्यायाच्या आणि बेदादीच्या राज्यपद्धतीला अमेरिकन लोक अगदीं कंटाळून गेलेले होते ! ते त्या राज्यपद्धतीचा मनापासून तिरस्कार करीत असत ! त्यांना ती नकोशी झालेली होती ! परंतु त्या जुलमी अमलाचा उच्छेद कसा करावा, हें त्या लोकांना कांहीं कळेना. स्पेनच्या राजाचें आपल्या मानेवरील जोखड कसें फेंकून द्यावें ह्याविषयीं त्यांना कांहीं उपाय दिसेना; व आपण दुसऱ्याच्या गुलामगिरींतून मुक्त होऊन आपलें स्वातंत्र्य कसें स्थापित करावें, ह्याच्याबद्दल त्यांची कांहीं एक अक्कल चालेना. अशा स्थितींतील लोकांनीं

स्वतःच्या पराक्रमावर आपलें स्वतंत्रतेचें निशाण उभारणें बहुतेक अशक्यच असतें. त्यांना बाहेरूनच कोणाची तरी मदत पाहिजे असते. परंतु इंग्लंडनें त्या कामीं माघार घेतल्यामुळें अमेरिकन लोकांचा तोही आधार सुटून गेला होता, व त्यांना निराशेनें पूर्णपणें ग्रासून टाकिलें होतें. स्पेनच्या तोंडांतून आतां आपण सुटूं, ही अमेरिकन लोकांना आशासुद्धां उरली नव्हती, व त्यामुळें जें संकट येईल तें निमूटपणें सोसण्याला तयार होऊन दक्षिण अमेरिका स्पेनच्या अमलाखालीं, अथवा जुलमाखालीं, कण्हत आणि दुःखाचे व निराशेचे अश्रु ढाळीत स्वस्थ बसली होती. गळेलठ्ठ फुगलेल्या बेडकानें एका गरीब निरुपद्रवी प्राण्याला आपल्या दाढेमध्यें कसें दाबून धरलें होतें, आणि तेथून सुटण्याची त्याची सर्व आशा नाहींशी करीत करीत तो त्याला घशाखालीं उतरविण्याच्या बेतामध्यें कशा रीतीनें होता, ह्याबद्दलची गोष्ट येथपर्यंत झाली. आतां त्या बेडकाला धरण्याकरितां साप त्याच्या अंगावर फोफावून कसा आला, आणि त्या योगानें त्या संकटांत सांपडलेल्या प्राण्याची अचानक सुटका कशी झाली, ह्या उत्तरार्धाचा विचार आपण पुढील अंकीं करूं.

## नं. २

काळ : अग्रलेख ता. २४।१।१९०२

परीस ही काल्पनिक वस्तु असावी असा पुष्कळांचा समज आहे. कवि आपल्या कल्पनेनें वाटेल त्या अशक्य गोष्टींचें शक्यत्वानें वर्णन करितात असें पुष्कळ लोक म्हणतात. त्यांचीं वर्णनें अतिशयोक्तीनें भरलेलीं असतात असा त्यांच्यावर नेहमींचा आक्षेप आहे. लोखंड तें लोखंड ! त्याला कांहीं लागलें म्हणून त्या लोखंडाचें सोनें कसें होईल ! असें कांहीं असतें तर आमच्या हल्लींच्या रसायनशास्त्रवेत्त्यांना त्याची माहिती नसती काय ! असले प्रश्नही कित्येक लोक विचारतात. आतां प्रत्यक्ष परीस तर कोणीं पाहिलेला नाहींच, परंतु तो लोखंडाला लाविला म्हणजे त्या लोखंडाचें सोनें होतें, हेंच जर त्याचें लक्षण असेल तर परीस ही वस्तु केवळ कविसृष्टींतील नसून, परमेश्वराच्या सृष्टीमध्येंही तिचें अस्तित्व आहे असें म्हणावें लागतें. असले परीस पूर्वी होते आणि हल्लीं आहेत. पूर्वी स्पेनच्या संबंधानें दक्षिण अमेरिका हा परीसच होता, आणि इंग्लंडच्या संबंधानें हिंदुस्थान हा अजूनही परीस आहेच. इंग्लंडांत पूर्वी काय होतें ! तेथें जिकडे तिकडे लोखंडाच्या खाणी इतक्या होत्या कीं, त्यांच्यामुळें सर्व इंग्लंड लोहमय होतें, असें विधान केलें असतां त्यांत मुळींच अतिशयोक्ति होणार नाहीं. पण ह्या लोहमय इंग्लंडचा अथवा इंग्लंडमय लोहाचा बादशाही मोगल अदाबियांच्या कृपेनें हिंदुस्थानच्या परिसाशीं समागम झाला, हें सगळ्यांना विदितच आहे. पण त्याचा पुढें परिणाम काय झाला ! ह्या परिसानें आपल्या स्पर्शानें सर्व लोहमय इंग्लंडला थोड्याच अवकाशामध्यें

सुवर्णमय करून सोडिलें व अजूनही ह्या परिसानें आपल्या अंगांतील दुसऱ्यांना सुवर्णमय करण्याचा धर्म सोडला नाहीं, हें आपल्या प्रत्यहीं निदर्शनास येत आहे. तेव्हां आपण तरी निदान परीस नाहीं असें कसें म्हणावें ? अशाच प्रकारचा एक परीस स्पेन देशाला लाधलेला होता. हा परीसही १५१९ पासून १८१० पर्यंत स्पेनला एकसारखा सुवर्णमय करीत होता. परंतु इ. स. १८१० पासून त्याच्या अंगांतील हा धर्म एकाएकीं नाहींसा झाला. हा परीस स्पेनला सुवर्णमय कसा करीत होता ह्याबद्दलची हकीकत मागील अंकीं आलीच आहे. आतां तो त्याचा धर्म एकाएकीं कसा नाहींसा झाला, ह्याचा आपण विचार करूं.

इ. स. १७८९ मध्यें फ्रान्स देशांत फ्रेंच रेव्होल्यूशन उत्पन्न होऊन तेव्हां-पासून सर्व युरोप खंडभर अव्यवस्था माजून राहिली होती. फ्रेंच रेव्होल्यूशनच्या पूर्वी सर्व युरोप खंड जुन्या चालीरीतींनीं आणि जुन्या आचारविचारांनीं जखडून गेलेलें होतें. गरीब लोकांवर राजाचा, बड्या लोकांचा आणि धर्माध्यक्षाचा असा तिहेरी जुलूम चाललेला असल्यामुळें ते संसारांतल्या मनुष्याप्रमाणें त्रिविधतापानें अगदीं त्रस्त झालेले होते. राज्य म्हणजे राजाचें; त्याच्या जोखडा-खालीं मान वांकविण्यापेक्षां प्रजेचा त्याच्याशीं दुसरा कांहीं एक संबंध नाहीं, अशा प्रकारची त्या वेळीं मोगलाई चाललेली होती. परंतु १७८९ सालीं फ्रेंच रेव्होल्यूशनच्या स्वरूपानें सगळ्या युरोप खंडाला एक प्रचंड धरणीकंपाचा धक्का बसला व त्यामुळें सर्व युरोपखंड हलून गेलें. त्या धरणीकंपाचे परिणाम पिरनीज, आल्प्स् आणि व्हेसुव्हियस, बाल्टिक सी, इंग्लिश चॅनल आणि भूमध्य समुद्र ह्यांच्या पाण्यामध्येंही दिसून आले. त्या फ्रेंच रेव्होल्यूशनच्या होमकुंडामधून नेपोलियन बोनापार्ट ही विभूति उत्पन्न झाली. नेपोलियननें फ्रान्सची सत्ता सर्वत्र बसविण्याला सुरवात केली. त्याप्रमाणें त्याचा इंग्लंडवरही डोळा होता. नेपोलियननें कॉंटिनेंटवरील बहुतेक बलाढ्य राज्यें आपल्या कह्यांत आणून व जेनाच्या लढाईमध्यें प्रशियाचा पूर्णपणें पराभव करून १८०६ मध्यें बर्लिन शहरांत प्रवेश केला, व तेथून 'बर्लिन डिक्री' या नांवानें प्रसिद्ध असलेला एक जाहीरनामा काढून इंग्लंडशीं कोणत्याही राष्ट्रानें कोणताही व्यवहार ठेवूं नये असें सर्वांना जाहीर केलें; परंतु पोर्तुगालनें तें न ऐकिल्यामुळें नेपो-लियननें पोर्तुगालवर स्वारी केली व तो देश जिंकून त्यानें तेथील राजाला

ब्राझिलमध्यें पळवून लाविलें. पोर्तुगालमधून नेपोलियनचें सैन्य स्पेनमध्यें आलें; व तेथें स्पेनचा राजा सातवा फर्डिनॅन्ड याला कैद करून नेपोलियननें आपला भाऊ जोसेफ याला गादीवर बसविलें. तेव्हांपासून स्पेनमध्यें बेबंदशाही सुरू झाली, व त्या स्थितीचा दक्षिण अमेरिकेवर थोडा परिणाम होऊं लागला. बेडकानें दक्षिण अमेरिकेच्या गरीब प्राण्याला आपल्या जबड्यामध्यें इतके दिवस घट्ट दाबून धरिलें होतें, परंतु फ्रेंच रेव्होल्यूशनच्या भयंकर वारुळांतून चवताळून निघालेल्या सर्पानें जेव्हां ह्या बेडकाची नरडी धरली, तेव्हां त्याची तारांबळ उडून गेली. व दुसऱ्याला आपल्या जबड्यांत दाबून धरण्याकडून त्याचें सर्व लक्ष निघून तें केवळ आपल्या स्वतःच्या संरक्षणाकडे लागलें. त्या वेळीं स्पेनची अशी स्थिति झाली होती कीं, बहुतेक सर्व देशभर नेपोलियनचे शिपाई पसरलेले होते, आणि स्पेनचा कायदेशीर मालक, सातवा फर्डिनॅन्ड, नेपोलियनच्या तुरुंगामध्यें कैद होऊन पडलेला होता. त्यामुळें दक्षिण अमेरिकेतील लोकांच्या मनामध्यें साहजिकपणेंच असे विचार येऊं लागले कीं, आपण कायदेशीर रीतीनें ज्याची प्रजा होतो तो स्पेनचा फर्डिनॅन्ड राजा जर आज पदच्युत झालेला आहे, तर आतां आपण अर्थात् त्या फर्डिनॅन्डची प्रजा नाहीं. त्याचा आणि त्याच्यामुळें स्पेन देशाचा व आपला जो कांहीं संबंध होता तो सर्व नाहींसा झाला आहे, व त्यामुळें आपल्यावर आज कोणाचीच सत्ता उरलेली नसल्यामुळें आपण स्वतंत्र झालों आहों. स्पेनचा राजा कैद झाल्यानंतर तेथील राजसत्ता केडीझच्या लोकांनीं आपल्या हातामध्यें घेतली होती. परंतु ती सत्ता केवळ नांवाची होती. आणि शिवाय व्यापाराच्या मिषानें केडीझच्या रहिवाशांनीं दक्षिण अमेरिकेतील लोकांचीं घरें धुऊन नेलेलीं असल्यामुळें केडीझचे लोक दक्षिण अमेरिकेमध्यें फारच अप्रिय आणि द्वेष्य झालेले होते. तेव्हां त्यांची सत्ता तर दक्षिण अमेरिकेमध्यें मानली जाण्याचा मुळींच संभव नव्हता. त्याचप्रमाणें स्पेनच्या जोखडांतून अनायासें निघालेली आपली मान दक्षिण अमेरिकेंतील लोक आपण होऊन फ्रान्सच्या जोखडाखालीं घालतील असाही संभव नव्हता. तेव्हां अशा स्थितीमध्यें आपली स्वतंत्रता जगजाहीर करण्यापेक्षां दक्षिण अमेरिकेंतील लोकांना दुसरा मार्गच नव्हता. ते स्वतंत्रतेसाठीं भुकेलेले होते, आणि स्वतंत्रतेचें ताट आयतेंच त्यांच्यापुढें वाढून आलें. मग ते स्वतंत्र होण्याला

विलंब काय म्हणून लावितील! ही स्वतंत्र होण्याची कल्पना बहुतेक अमेरिकन लोकांच्या डोक्यामध्यें एकमदच शिरली, व १८१० सालच्या एप्रिल महिन्याच्या १९ व्या तारखेस दक्षिण अमेरिकेंतील कॅरॅकस, क्युमाना, मार्गारिटा, बार्सिलोना वगैरे ठिकाणचे लोक एकत्र होऊन त्यांनीं अमेरिकन कॉन्फिडरेशन ऑफ व्हेनिझुएला ह्या नांवाखालीं आपल्या सत्तेची द्वाही फिरविली. त्यांनीं उघडपणें स्पॅनिश सरकारची सत्ता झुगारून दिली नव्हती. बाह्यात्कारी ते स्पेनच्या राजाबद्दल राजनिष्ठा प्रदर्शित करीत होते व आपण त्याच्याच नांवानें तें राज्य चालवीत आहों, असेंही ते म्हणत. परंतु ह्या केवळ औपचारिक गोष्टी होत्या. वास्तविक पाहतां स्पेनची गादी डळमळूं लागल्याबरोबर दक्षिण अमेरिकेंतील लोक स्पेनची दक्षिण अमेरिकेवरील सत्ता आपल्या हातांत बळकावून बसले होते. ते लोक स्पेनचा राजा फर्डिनँड ह्याच्याबद्दल राजनिष्ठा दाखवीत. परंतु तिचा काय उपयोग? कारण, तो होता नेपोलियनच्या तुरुंगांत. त्याला ह्या दिखाऊ राजनिष्ठेपासून काय फायदा! ती राजनिष्ठा म्हणजे निवळ प्रजेनें राजाला फसविण्याची एक युक्ति होती. त्याच्या जागीं केडीझ येथील लोकनियुक्त सभा अधिकारापन्न झाली होती. परंतु तिचा अंमल दक्षिण अमेरिकेंतील लोक मुळींच कबूल करीत नव्हते. एवंच राजनिष्ठेचें निवळ ढोंग होतें. स्वतंत्र होण्याची इच्छा ही खरी होती. पूर्वी स्पॅनिश अंमल गाजत होता त्या वेळेला जे स्पॅनिश कौन्सिलर घोड्यावर बसलेले होते त्यांना स्पॅनिश व्हाइसरॉयांच्याच हातून खालीं उतरविण्यांत आलें. 'ऑडेन्शिया रीयल' ह्या नांवाची व्हेनिझुएलामधील स्पेनची सर्व राजकीय सत्ता धारण करणारी एक सभा होती. तिला प्रथमतः हांकून देऊन लोकांनीं आपल्या तर्फेचे सर्व सभासद त्यांत नेऊन बसविले. ह्या सभेनें पुढें लवकरच जीं कृत्यें केलीं त्यांवरून अमेरिकन लोकांची स्पेनच्या टांचेखालीं राहण्याची कितपत उत्सुकता होती हें स्पष्ट दिसून येतें. पूर्वी प्रत्येक माणसावर स्पेनचा कर होता. तो या सभेनें उठवून टाकिला. पूर्वी दक्षिण अमेरिकन लोकांच्या परस्पर-व्यापाराला फार प्रतिबंध होते. परंतु या सभेनें सर्व व्यापार अप्रतिबद्ध करून टाकिला. आणि त्या प्रांतांवर राज्य करण्याकरितां स्पेननें जे गव्हर्नर आणि कौन्सिलर पाठविले होते त्यांना ह्या सभेनें युनायटेड स्टेट्समध्यें सुखरूपपणें पोहोंचतें केलें.

स्वतंत्रता ही एक भरतीची लाट आहे. ती एकदां एके ठिकाणीं उसळूं लागली म्हणजे तिच्यासारख्या लाटा दुसऱ्या शेंकडों ठिकाणीं उसळूं लागतात. व्हेनिझुएलाचें उदाहरण पाहून ब्यूनॉस आयरस, ग्वाथाकिल वगैरे दुसऱ्या अनेक ठिकाणांनीं त्याचें अनुकरण केलें व पूर्वींच्या स्पेनच्या सत्तेच्या सभा मोडून लोकांनीं आपण निवडलेल्या प्रतिनिधींच्या सभा स्थापन करून सर्व राजसत्ता त्यांच्या हातीं दिली. इ. स. १८१० आणि १८११ ह्या दोन सालांमध्यें स्पेनच्या अमलापासून स्वतंत्र होण्याचा दक्षिण अमेरिकेमध्यें जणूं काय ऊतच आला होता. कारण, कोणी शास्ताच उरला नव्हता. तेव्हां जो उठे तो स्वतंत्र होई. फ्रान्समध्यें आणि त्यानंतर पोर्तुगाल, स्पेन, इटली, प्रशिया वगैरे युरोप खंडांतील इतर देशांमध्यें राजकीय संक्रांतीचा सण जागोजाग साजरा करण्यांत येत असल्यामुळें, त्या सणानिमित्त कांहीं तरी मंगल पदार्थ लुटविण्याचा जो संप्रदाय आहे, त्याप्रमाणें त्या वेळीं दक्षिण अमेरिकेमध्यें स्वतंत्रतेची लूट चालली होती. एखादें गलबत वादळानें फुटून त्यांतील माल बिनवारशी होऊन किनाऱ्यावर पडला असतां तो जसा पाहिजे त्यानें लुटून न्यावा, त्याप्रमाणें नेपोलियननें युरोप खंडाच्या महासागरामध्यें उत्पन्न केलेल्या वादळानें स्पेनच्या गलबताचे तुकडे होऊन त्याच्या पोटांतील माल बिनवारशी होऊन दक्षिण अमेरिकेच्या किनाऱ्यावर पडला. त्या वेळीं तो ज्याच्या हातीं लागला त्यानें तो पळवून नेला. त्या वेळीं ही स्वातंत्र्याच्या गंगेची लाट जुलुमानें आणि पारतंत्र्यानें गांजलेल्या अमेरिकन लोकांना पावन करण्याकरितांच उसळलेली होती व तिनें आळशांनाही पावन करून टाकिलें.

अशी उत्कृष्ट पर्वणी आली असूनही ह्या स्वतंत्रतेच्या गंगेपासून पळून जाऊन गुलामगिरीच्या नरककुंडामध्येंच आकंठ बुडून राहूं इच्छिणारे कांहीं लोक निघाले. जोखडाखालींच आपली मान सदोदित सुरक्षित असावी असें मानणारे कित्येक बैल असतात; आणि आपण शेणांतच आजन्म राहावें अशी महत्त्वाकांक्षा बाळगिणारे कित्येक किडे असतात. ईश्वरानें विविध सृष्टि निर्माण केली आहे. आणि पृथ्वी ही बहुरत्ना आहे. तेव्हां ह्या पृथ्वीवर स्वातंत्र्याला पराङ्मुख होणारीं कांहीं रत्नें आढळलीं तर त्यांत मोठेंसें आश्चर्य आहे असें नाहीं. पोर्टोरिको, मेक्सिको, पेरू, ग्वायेना, क्यूबा वगैरे प्रांत स्पेनच्या सत्तेलाच चिकटून बसले होते. केडीझ येथें स्पॅनिश लोकांनीं जी सत्ता उभारली

होती ती ह्यांनीं कबूल करून फ्रान्सविरुद्ध लढण्याकरितां मदतीसाठीं म्हणून ह्या प्रांतांनीं केडीझला खंडणीही पाठविली.

केडीझ येथेंही फार मोठ्या खटपटी चालल्या होत्या. दक्षिण अमेरिकेंतल्या-सारख्या वसाहती आपल्या हातून जाव्या ही कल्पना केडीझ येथें नवीन स्थापन झालेल्या सरकारला पसंत पडली नाहीं. त्या वेळीं स्पेनमध्यें तर इतकी बंडाळी माजली होती कीं, ह्या केडीझ येथील सरकारला स्पेनमधून कांहीं एक वसूल मिळणें शक्य नव्हतें. म्हणून अशा स्थितींत ह्या सरकारचा खर्च केवळ दक्षिण अमेरिकेंतील खाणींच्या उत्पन्नावरच अवलंबून होता. म्हणून कसेंही करून दक्षिण अमेरिकेंतील संस्थानें आपल्या ताब्यांत ठेवणें केडीझच्या लोक-नियुक्त सरकारला जरूरच होतें. दक्षिण अमेरिकेंतील संस्थानें स्वतंत्र झाल्याची बातमी ऐकून केडीझच्या व्यापाऱ्यांच्या अंगाचा फार संताप झाला. दक्षिण अमेरिकेंतील लोकांनीं स्पेनचा जुलूम अजूनपर्यंत इतक्या सभ्यपणानें, नेमस्तपणानें, निमूटपणानें आणि उल्हासवृत्तीनें सहन केला होता कीं, त्यावरून ते आपल्या मानेवरचें स्पॅनिश जोखड हवेमध्यें फेंकून देण्याची इच्छा करीत असतील, असें केडीझच्या लोकांना कधींही वाटलें नव्हतें. त्यामुळें तर त्यांना ह्या गोष्टीचा जास्तच राग आला, व हे प्रांत फिरून आपल्या ताब्यांत यावे म्हणून केडीजच्या लोकांनीं भगीरथ प्रयत्न चालविले. बंडखोर प्रांतांविरुद्ध भयंकर ठराव केडीझच्या सरकारनें प्रसिद्ध केले, व अमेरिकन लोकांची परत आपल्या जोखडाखालीं माना देण्याविषयीं समजूत घालण्याकरितां व त्यांना कायद्याच दाखविण्याकरितां आंतून अनेक गुप्त प्रयत्न करण्यांत आले, व कांहीं प्रांतांवर त्या प्रयत्नांचा सुपरिणामही झाला. ग्वाटामालाच्या प्रांतानें पूर्वी आपल्या स्वतंत्रतेची द्वाही फिरविली होती. परंतु तो प्रांत फिरून स्पेनच्या पक्षाला जाऊन मिळाला. स्पेनच्या राजकीय पक्षाला ह्याशिवाय आणखी-ही कित्येक ठिकाणीं यश आलें. क्विटो हा प्रांत स्वतंत्र झाला होता. तेथील लोकपक्षाचे सुमारे तीनशें पुढारी ठार करून व तेथील लोकनियुक्त सभा उध्वस्त करून स्पॅनिश लोकांनीं तो प्रांत परत आपल्याकडे घेतला. मेक्सिको-मधील देशभक्तांचा एकदोन लढायांमध्यें पराभव करून स्पेननें तोही बहुतेक प्रांत परत आपल्या ताब्यांत घेतला. परंतु एवढा भाग खेरीजकरून बाकी सर्व ठिकाणीं स्पेनच्या अमलाला उच्चाटणच मिळालेलें होतें. बंडाची लाट

एका शहरापासून दुसऱ्या शहराला आणि एका प्रांतापासून दुसऱ्या प्रांताला, ह्याप्रमाणें पसरत चालली. ब्यूनॉस आयर्स येथील बंडवाल्यांनीं कॉर्डोव्हाच्या गव्हर्नरचा पराभव केला. कॅरॅकस आणि ब्यूनॉस आयर्स ह्यांच्याप्रमाणें चिली ह्या प्रांतानें आपली स्वतंत्रता जगजाहीर केली. कार्थाजेना, न्यूग्रॅनडा वगैरे ठिकाणींही तोच प्रकार झाला. पेरूच्या प्रांतामधील मूळचे इंडियन लोक हातात शस्त्र घेऊन स्पॅनिश लोकांविरुद्ध उठले, व साऱ्या दक्षिण अमेरिकेभर स्पेनचें साम्राज्य नाहींसें होऊन अस्वस्थतेचें साम्राज्य प्रबळ झालें. रक्तपात, ज्वाळा, लुटालूट आणि कत्तल ह्यांशिवाय दुसरी गोष्ट नाहीं अशी स्थिति दक्षिण अमेरिकेमध्यें एकाएकीं चालू झाली.

ह्याप्रमाणें स्पॅनिश लोक आणि अमेरिकन लोक ह्यांच्यामध्यें भयंकर रणकंदनाला सुरवात झाली. ह्या युद्धांत अमेरिकन लोकांना लढाईचें साहित्य कसें मिळालें ह्याबद्दलची हकीगत मोठी आश्चर्यकारक आहे. दक्षिण अमेरिका हा मूळचा रानटी देश. स्पॅनिश लोक वसाहत करण्याकरितां तेथें आले, त्या वेळीं तेथें जमीन सुपीक, प्रदेश रमणीय आणि जागा विपुल होती खरी, परंतु सुधारलेल्या मनुष्यांच्या गरजा भागविण्याकरितां ज्या गोष्टी लागतात त्यांपैकीं कांहीं कांहीं तेथें बिलकूल नव्हत्या. दक्षिण अमेरिकेमध्यें घोडे, गाई, शेळ्या वगैरे प्राणी मुळींच नव्हते. हे प्राणी स्पॅनिश लोकांनीं अमेरिकेमध्यें नेले. हिंदुस्थानांत पूर्वी आगगाड्या नव्हत्या. त्या इंग्रजांनीं येथें आणिल्या. त्या आणण्यांत आपल्याला पाहिजे तेथून पाहिजे तितक्या थोड्या वेळांत पाहिजे तितकें सैन्य पाहिजे तिकडे नेतां यावें व व्यापाराच्या आणि प्रवाशांच्या द्वारानें हिंदुस्थानांतील पैसा सहज रीतीनें काढून नेतां यावा, हा इंग्रजांचा मूळचा हेतु होय. परंतु त्या आगगाड्यांपासून हिंदुस्थानांतील लोकांनाही आतां पुष्कळ फायदे होऊं लागले आहेत. त्याचप्रमाणें दक्षिण अमेरिकेंत स्पेनची स्थिति झाली. स्पेनचे थोडे अमेरिकेंतल्या रानटी माणसांची पारख करण्याला जेव्हां निघत. तेव्हां ते घोड्यावर बसून जात, व मूळच्या अमेरिकन लोकांपाशीं घोडीं वगैरे जलद चालण्याचें साधन कांहींएक नसल्यामुळें तीं माणसें पटापट स्पॅनिश लोकांच्या हातीं लागत. हा फायदा लक्षांत आणून मूळच्या इंडियन लोकांना सुलभ रीतीनें जिंकण्यासाठीं म्हणून स्पॅनिश लोकांनीं अमेरिकेमध्यें घोडे आणिले. त्याचप्रमाणें अमेरी-

केंतील सोन्याच्या खाणीही घोड्याच्या प्रवेशाला कारणीभूत झाल्या. सोन्याच्या खाणी किनाऱ्यापासून आंत बऱ्याच दूर अंतरावर असत, व त्या खाणींतून निघालेलें सोनें प्रथमतः माणसांकडून समुद्रकिनाऱ्यावर स्पेनमध्यें पाठविण्याकरितां आणलें जात असे. पण स्पेनला सोन्याची इतकी हांव सुटली होती कीं, माणसांकडून सोनें आणिलें असतां जो बराच अवकाश लागे तोमुद्धां स्पेनला सहन करतां येईनासा झाला. म्हणून स्पेननें जलदीनें सोनें वाहून नेण्याकरितां अमेरिकेमध्यें घोडीं आणिलीं. परंतु एकदां ही घोड्यांची जात अमेरिकेमध्यें आल्यावर लवकरच तिचा फैलाव चोहोंकडे झाला व अमेरिकेंतील रानटी लोक लौकरच घोड्यावर बसण्यामध्यें पटाईत झाले. ज्या रानटी लोकांना पूर्वी घोडा हें जनावर माहीतसुद्धां नव्हतें ते इतके तरबेज घोडेस्वार बनले कीं, ह्या बंडाच्या वेळीं पेरू देशांतील बंडवाले आपल्या स्वातंत्र्यासाठीं शेवटची निकराची लढाई लढत असतां त्यांचा एके वेळीं स्पॅनिश सैन्याकडून अगदीं मोड होण्याचा रंग आला होता, परंतु तो प्रसंग ह्या रानटी लोकांच्या घोडेस्वारांच्या पलटणीनें टाळला आणि पेरू देशाला स्वतंत्र करून सोडलें. घोड्याप्रमाणें दुसरेंही एक लढाईचें साधन स्पेननेंच अमेरिकन लोकांच्या हातीं आणून दिलें. पूर्वीं अमेरिकेंत जसे घोडे नव्हते तसेंच लोखंडही नव्हतें. तेथें सोनें वाटेल तितकें होतें, पण लोखंडाचें दुर्भिक्ष होतें. परंतु स्पेननें तें दुर्भिक्ष दूर केलें. ज्याप्रमाणें हिंदुस्थानांतील सोनें नेऊन त्याच्याऐवजीं हिंदुस्थानांत आगगाडीचे रूळ, पुलाचे खांब, पत्रे, गिरण्या, आगबोटी, बॉयलर, चक्रें, इत्यादिकांच्या रूपानें इंग्लंडनें लोखंड आणून भरलें आहे, त्या प्रकारची कृति स्पेननें अमेरिकेमध्यें केली. अमेरिकेंतील पूर्वींचे लोक नदींतील वाळू गाळून त्यांतून सोनें काढीत असत. परंतु इतक्या मंदगतीच्या साधनांनीं स्पेनची क्षुधा भागण्यासारखी नव्हती. त्याला सोन्याची वखवख फार सुटली होती. म्हणून स्पेननें खाणी खणण्याकरितां लोखंडाचीं हत्यारें आणिलीं, व अशा रीतीनें अतिशय झपाट्यानें जें सोनें तयार होऊं लागलें त्याचें संरक्षण होण्याकरितां स्पेननें पोलादाचीं शस्त्रेंही आणिलीं. अशा प्रकारानें दक्षिण अमेरिकेमध्यें लोखंडी हत्यारांचा चोहोंकडे फैलाव झाला. घोडीं आणि हत्यारें हीं स्पेननें दक्षिण अमेरिकेंतील लोकांना पिळून काढण्याकरितां तिकडे नेलीं होतीं; परंतु ईश्वराच्या घरची लीला अगाध आहे. ज्या साधनांनीं स्पेन दक्षिण अमेरिकेला

सत्वहीन करण्याला पघत होतें, तींच साधनें अखेरीस स्पेनच्या छातीवर घसलीं. मनुष्य आपल्या बुद्धीनें अनाथांना नाडण्याचा विचार करीत असतो; परंतु परमेश्वराची योजना कांहीं निराळीच चाललेली असते. ज्या हातानें भस्मासुर इतरांचें भस्म करूं पाहत होता, त्याच हातानें त्याचें स्वतःचेंच भस्म झालें, ही ज्या परमेश्वराची करणी, त्याचे मार्ग राज्यमदानें अंध झालेल्या लोकांना कसे दिसणार!

अशा प्रकारानें दक्षिण अमेरिकेंतील लोकांना लढाईचीं साधनें मिळून ते आपल्या नवीन मिळविलेल्या स्वातंत्र्याचें संरक्षण करण्याकरितां हातांत शस्त्रें घेऊन रणभूमीवर सज्ज झाले. परंतु ह्या सुमारास एक दैविक गोष्ट घडून आली, आणि तिचा तेथें चालू असलेल्या बंडावर फार विलक्षण परिणाम झाला. इ. स. १८११ च्या मार्च महिन्यांत कॅरॅकस या शहरांत धरणीकंप झाला, व त्या योगानें तेथें अतिशय नुकसान झालें. देवळांत प्रार्थना करण्याकरितां जमलेले लोक तेथल्या तेथें दडपून गेले. एकंदर वीस हजार लोक सुमारें पांच मिनिटांच्या अवकाशामध्यें प्राणाला मुकले. हें संकट आलेलें पाहून वेडगळ लोकांच्या मनामध्यें भलभलतेच कुतर्क येऊं लागले. गणपतीचा उत्सव सुरू केला म्हणून हिंदुस्थानामध्यें प्लेग आला, ही जशी कल्पना आपल्या इकडे हल्लीं कांहीं ठिकाणीं उद्भवली आहे, त्याप्रमाणें तिकडच्या कांहीं लोकांना असें वाटूं लागलें कीं, आपल्याला स्वतंत्रतेचा विटाळ झाला, ही गोष्ट आपण परमेश्वराच्या इच्छेविरुद्ध केली, व त्यासाठीं हा आपल्यावर ईश्वरी क्षोभ झाला आहे. दक्षिण अमेरिकेंतील लोकांनीं आपलें स्वातंत्र्य टाकून देऊन फिरून स्पेनच्या अमलाखालीं यावें, या गोष्टींत ज्यांचें हित होतें अशा लोकांना ही उत्कृष्ट संधि आली होती. त्यांनीं लोकांच्या ह्या वेडगळ कल्पनेचा पूर्णपणें फायदा घेतला. आणि तुम्ही स्वतंत्र झालां म्हणून परमेश्वरानें भूकंपाच्या योगानें तुमचा संहार केला, आतां परत स्पेनच्या जोखडाखालीं तुम्ही आपल्या माना घाला, म्हणजे ईश्वर तुमचें संरक्षण करील, अशा प्रकारचीं थोतांडें पिकवून स्वार्थसाधु मंडळींनीं बंडवाल्यांपैकीं बऱ्याच लोकांना भेवडावून पारतंत्र्याच्या जाळ्यामध्यें गुरफटून घेतलें. आणि जो व्हेनिझुएलाचा प्रांत सर्वांच्या आधीं स्वतंत्र झाला होता, तोही परत स्पेनच्या चरणीं लोळूं लागला. मूर्ख लोक

द्वे लोकांकडून कसे फसले जातात, ह्याचें ह्याच्यापेक्षां दुसरें जास्त चांगलें ऐतिहासिक उदाहरण सांपडणें कठिण आहे.

परंतु ही ईश्वरी क्षोभाची भीति क्षणिक होती. थोड्या वेळानंतर ती भीति नाहींशी झाली, व निष्ठुर स्पॅनिश जुलमाची भीति अमेरिकन लोकांच्या डोळ्यांपुढें फिरून दिसूं लागली, व प्रत्यक्षही भासूं लागली. जे बंडवाले शरण गेले होते, त्यांना स्पेननें कैदेंत ठेविलें. अशा लोकांना कोंडण्यासाठीं कैदखाने पुरतना, म्हणून खाजगी घरांचे कैदखाने करावे लागले. असंख्य लोकांना फांसावर चढविण्यांत आलें, आणि शरण आलेल्यांच्या रक्ताचे पूर वाहिले. अशा कृत्यांचा परिणाम स्पेनला जास्तच अहितकारक झाला कारण, त्यामुळें बंडाची लाट पूर्वींपेक्षां दुप्पट जोरानें फिरून उसळली. ह्या वेळीं बॉलिव्हर ह्या नांवाचा प्रसिद्ध योद्धा दक्षिण अमेरिकेंतील लोकांना स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठीं पुढें आला व यशस्वी झाला. हा लहानपणापासूनच फार महत्त्वाकांक्षी होता. फ्रेंच रेव्होल्युशनचे इतिहास हा लहानपणीं वारंवार वाचीत असे. व वॉशिंग्टन आणि फ्रँकलिन ह्यांच्यासारखे आपण कधीं होऊं काय, असे विचार त्याच्या मनांत घोळत असत. ते विचार फलद्रूप होण्याची संधि त्याला ह्या वेळीं मिळाली. न्यूग्रॅनडामधील सहा हजार व्हालंटियर लोकांच्या एका टोळीचा डॉन सायमन बॉलिव्हर हा पुढारी झाला. व स्पॅनिश सेनापति मॉटव्हर्ड ह्याचा पराभव करून व पंधराशें स्पॅनिश लोक कैद करून बॉलिव्हरनें कॅरॅकस हें शहर इ.स. १८११ च्या ऑगस्ट महिन्याच्या चवथ्या तारखेला हस्तगत करून घेतलें. त्या वेळीं कॅरॅकसच्या लोकांना अतिशय आनंद झाला व त्यांनीं बॉलिव्हरला आपला डिक्टेटर नेमिलें. परंतु एवढ्यानेंच बॉलिव्हरचे कष्ट संपले होते असें नाहीं. म्यूरिलो ह्या नांवाचा एक नवीन स्पॅनिश सेनापति येऊन त्यानें बॉलिव्हरला फिरून जमेकामध्यें पळून जाण्यास भाग पाडिलें. त्या वेळीं ग्रेट ब्रिटन ह्या भांडणांत पडून त्यानें दक्षिण अमेरिकेसाठीं लोक व पैसे गोळा केले. त्याच्या मदतीनें बॉलिव्हर फिरून पुढें आला व इ. स. १८२१ मध्यें कॅरॅबोबो येथील लढाईमध्यें स्पॅनिश लोकांचा पराभव करून बॉलिव्हरानें अखेरीस सर्व कोलंबिया प्रांताच्या स्वतंत्रतेची द्वाही फिरविली. बॉलिव्हर कोलंबियाच्या स्वतंत्रतेसाठीं पळत होता, मदत मागत होता, आणि लढत होता, त्याच वेळीं चिली हा देश स्वतंत्र करण्यासाठीं सॅन मार्टिन

हा आपल्या हाताखालीं चार हजार निवडक लोक घेऊन अँडिझ पर्वत ओलांडून चालला होता. त्यानें इ० स० १८१७ च्या फेब्रुवारी महिन्यांत चॅकाब्युको या ठिकाणीं स्पॅनिश लोकांचा पराभव करून चिलीचें संस्थान स्वतंत्र केलें, व त्या संस्थानचा तो प्रेसिडेंट म्हणून निवडण्यांत आला. पेरू हा प्रांत स्वतंत्र करण्याला फारच प्रयास पडले. परंतु बॉलिव्हर याच्या अश्रांत मेहनतीनें, पाएझ ह्याच्या अवर्णनीय धैर्यानें आणि ज. मिलर ह्याच्या अद्भुत पराक्रमानें अयाक्युचो येथील लढाईमध्यें स्पॅनिश लोकांचा पराभव होऊन पेरूही अखेरीस पूर्णपणें स्वतंत्र झाला. मेक्सिकोमध्यें पुष्कळ वर्षेंपर्यंत दोन्ही पक्षांचें प्राबल्य आळीपाळीनें होत होतें. परंतु अखेरीस इ. स. १८२२ च्या मे महिन्यामध्यें मेक्सिकोच्या बंडवाल्यांनाही कायमचें यश येऊन ते शेवटीं स्वतंत्र झाले. अशा रीतीनें दक्षिण अमेरिकेंतील सर्व संस्थानें एका पाठीमागून एक स्वतंत्र होऊन तेथील स्पेनची सत्ता दहा-बारा वर्षांच्या अवकाशामध्यें होती का नव्हती अशा स्थितीला येऊन पोहोंचली. अशा रीतीनें स्पेनच्या अमलांतून दक्षिण अमेरिकेची सुटका झाली. ह्या सर्पमंडूकन्यायानें दक्षिण अमेरिकेची सुटका करावी असें परमेश्वराच्या मनांत आलें, म्हणून त्यानें त्या मार्गानें त्यांची सुटका केली. परमेश्वर समर्थ आहे ! मनुष्य त्याच्यापुढें काय करणार ! त्या परमेश्वराच्या मनांत येईल तें खरें !

## निर्हेतुक प्रीति आणि सहेतुक प्रीति : : २३

काळ : अग्रलेख ता. ७।२।१९०२

"I do not think the natives love us, but they are evidently impressed with the honesty and fairness of our administration. They appreciate better than formerly the honesty of our intentions, and the impartial and incorruptible justice they are able to secure in our courts of law."

मि. जे. सी. कॉलिन्स ह्या नांवाचे एक पार्लमेंटचे सभासद नुकतेच हिंदुस्थानांत प्रवास करण्याकरितां आलेले होते. ते इकडून विलायतेस परत गेल्यानंतर त्यांचे हिंदुस्थानासंबंधानें काय ग्रह झालेले आहेत हें जाणण्याच्या इच्छेनें बर्मिंगहॅम डेली पोस्ट ह्या नांवाच्या एका वर्तमानपत्राच्या बातमीदारानें त्यांची मुलाखत घेतली होती. त्या वेळीं त्यांनीं जी माहिती सांगितली, तीपैकीं वर दिलेलें हें एक वाक्य आहे. ह्या वाक्यांत सत्याचा बराच अंश गोंवलेला आहे ह्यांत शंका नाहीं. हिंदुस्थानांतील लोक इंग्रजांवर प्रीति करतात, त्यांना इंग्रजी राज्य अत्यंत आवडतें, त्यांच्या राजनिष्ठेला सीमा नाहीं, इत्यादि प्रकारचे उद्गार अनेक प्रसंगीं ऐकूं येतात. परंतु ते सर्वांशीं खरे असतात असें नाहीं. कार्यसाधु लोक असले उद्गार काढितात, आणि स्वकीय सत्कृत्यानें लोकप्रियता संपादन करण्याच्या कामीं असमर्थ असलेले राजकीय लोक त्यांजवर विश्वास ठेवितात. वास्तविक त्यांत कांहीं अर्थ नसतो. जो निरपेक्ष असेल तोच खरें

बोलतो. कार्यसाधु लोकांचे शब्द कानाला गोड लागतील, पण ते सत्य असतीलच असा कांहीं नेम नाहीं. एखाद्या राजाला किंवा राजाच्या अधिकाऱ्याला भीतीनें, लोभानें अगर शिष्टाचारानें मानपत्र देण्याला प्रवृत्त झालेल्या लोकांनीं आम्ही फार राजनिष्ठ आहों असें म्हटलें तर त्यांत कांहीं मोठेंसें नाहीं. त्यावरून त्या लोकांच्या राजनिष्ठेचें मापन करणें हें कधींही बरोबर नाहीं. मानपत्र म्हणून देण्याला जे लोक प्रवृत्त झाले ते 'आम्ही राजनिष्ठ आहों', असें न म्हणतील तर काय 'आम्ही राजनिष्ठ नाहीं', असें आपल्या तोंडानें उघड सांगतील! ते त्यांच्या राजनिष्ठेचे उद्गार किती किंमतीचे आहेत हें ज्यांना उद्देशून ते उद्गार निघालेले असतील त्यांनीं ठरविलें पाहिजे. दुसरी एक गोष्ट अशी आहे कीं, ज्याच्या अंगांत एखादा सद्गुण असतो, तो त्या सद्गुणाची आपल्याच तोंडानें जेथें तेथें प्रदर्शनें करीत नाहीं. उलट तो सद्गुण झांकून टेवण्यासाठींच त्याचा थोडाबहुत प्रयत्न चाललेला असतो. परंतु ज्याच्या अंगांत तो सद्गुण थोड्या प्रमाणानें वास करीत असतो, तो त्या सद्गुणाबद्दल तितक्या जास्त प्रमाणानें बडबड करीत असतो. पतिव्रता आपल्या पातिव्रत्याबद्दल जितका मूक भाव अंगीकारिते, तितकी त्याबद्दलची वल्गना दुसऱ्या जातीच्या स्त्रियांकडून झालेली ऐकण्यांत येत असते. उथळ पाण्याला खळाळी फार असते, हें कोणाला माहीत नाहीं! आणि हाच नियम थोड्याबहुत प्रमाणानें राजनिष्ठेलाही लागू पडतो. पावलोपावलीं आपल्या राजनिष्ठेचा गवगवा करणाऱ्या लोकांच्या ठिकाणीं खरी राजनिष्ठा कितपत असेल, ह्याच्याबद्दल सुज्ञ आणि धूर्त राज्यकर्त्यांनाही संशय आल्यावांचून कधीं राहणार नाहीं. तात्पर्य, कोणत्या तरी हेतूनें केलेल्या स्तुतीमध्यें सत्याचा अंश बहुधा कमीच असतो. आणि जो निरपेक्ष असतो तोच खरें बोलतो. इंग्रजांच्यासंबंधानें हिंदुस्थानांतील बहुतेक लोकांचे उद्गार हे सहेतुकच असतात. परंतु मि. जे. सी. कॉलिन्स हे निरपेक्ष आहेत. त्यांना इंग्रज लोकांपासून भय बाळगण्याचें कांहीं कारण नाहीं. किंवा हिंदुस्थानांतील लोकांपासून त्यांना कांहीं मागावयाचें नाहीं. अशा मनुष्याचे उद्गार खरेच असले पाहिजेत. कारण, ते खोटे असण्याला कांहीं हेतु नाहीं.

वर दिलेल्या विचारसरणीनें विचार करून पाहतां मि. जे. सी. कॉलिन्स यांचें म्हणणें खरें ठरतें. ते असें म्हणतात कीं, 'नेटिव लोक आपल्यावर प्रीति करितात असें मला वाटत नाहीं. परंतु आपल्या राज्यकारभारामधील प्रामा-

णिकपणा आणि निःपक्षपातीपणा ह्या गुणांचा त्यांचे मनावर खात्रीनेंच परिणाम होतो. आपण स्थापन केलेल्या कायद्याच्या कोर्टांतून त्यांना पक्षपाताशिवाय आणि लाचलुचपतीवांचून न्याय मिळूं शकतो आणि आपले एकंदरींत सद्धेतु आहेत, ह्या गोष्टी नेटिव लोकांना पूर्वीपेक्षां हल्लीं जास्त चांगल्या रीतीनें कळूं लागल्या आहेत.' परंतु येथें असा एक प्रश्न उत्पन्न होतो कीं, नेटिव लोक इंग्रज लोकांवर प्रीति करीत नाहींत, हें जर खरें मानावें, तर हिंदुस्थानांत श्रीमंतांपासून गरिबांपर्यंत जी एक प्रकारची राजनिष्ठामूलक संतोषवृत्ति नांदत असलेली दिसते ती कशी ? राजनिष्ठा मनांत असणें निराळें आणि तोंडांत असणें निराळें. प्रत्येक मानपत्राच्या वेळीं पढूं लागणारी थोड्या लोकांची बोलकी राजनिष्ठा निराळी आणि तीस कोटी लोकांना आपल्या झोंपडींतून किंवा राजमहालांतून संतोषवृत्तीनें नांदविणारी मुकी राजनिष्ठा निराळी. ह्यांपैकीं वाचाळ राजनिष्ठेशीं सध्यां आपल्याला कांहीं कर्तव्य नाहीं. जी सोन्याच्या पेटींतून मानपत्रें अर्पण करीत नाहीं, जी दरबारांतून स्तुतिपर भाषणें करीत नाहीं, किंवा जी कॉंग्रेसमध्यें अभिनंदनपर ठराव पास करीत नाहीं, परंतु जिच्या योगानें कोट्यवधि कुटुंबें सुखासमाधानानें आणि आनंदानें आपले दिवस कंठित आहेत, त्या मुक्या परंतु अव्याज राजनिष्ठेबद्दल आपल्याला प्रस्तुत प्रसंगीं विचार कर्तव्य आहे. जे असंख्य लोक साहेबांच्या गळ्यांतून हार घातल्यावांचून जिवंत राहिले आहेत आणि मानपत्रांवर सह्या केल्यावांचून आपला उदरनिर्वाह करूं शकत आहेत, त्यांच्याबद्दलचा हल्लींचा प्रश्न आहे. हे तीस कोटी नेटिव लोक मि. जे. सी. कॉलिन्स यांच्या म्हणण्याप्रमाणें इंग्रजांवर प्रीति करीत नाहींत; तरी पण इंग्रजांच्या राज्यांत ते संतोषवृत्तीनें राहतात; ह्या दोन परस्परविरुद्ध गोष्टी कशा संभवतात, हा एक विचार करण्यासारखा प्रश्न आहे.

हिंदुस्थानांतील नेटिव लोक इंग्लिशांवर प्रीति करीत नाहींत, हें तर एका दृष्टीनें खरेंच आहे. पण ह्याचा अर्थ नेटिवांची इंग्लिशांवर कोणत्याही प्रकारची प्रीति नाहीं असा नाहीं. प्रीति असणें हा एक मनाचा धर्म आहे. आणि सर्व मनोधर्म बहुतकरून दोन प्रकारचे असतात. एक निर्हेतुक (intuitive) आणि दुसरा सहेतुक (utilitarian). प्रीति हा मनोधर्मांतील निर्हेतुक आणि सहेतुक अशा दोन प्रकारचा आहे. लहान मूल आपल्या आईवर

प्रीति करतें ती निर्हेतुक होय आणि चाकर आपल्या धन्यावर प्रीति करितो ती सहेतुक होय. निर्हेतुक प्रीति ही स्वभावतःच अंतःकरणामध्यें उत्पन्न होते; परंतु सहेतुक प्रीति ही एकंदर हिताहिताचा विचार करून त्यांत जास्त हित दिसलें म्हणजे त्या हितासाठीं उत्पन्न होते. निर्हेतुक प्रीतीला कांहीं कारण लागत नाहीं. परंतु सहेतुक प्रीति कारणावांचून उत्पन्न होत नाहीं. पहिली स्वाभाविक आहे आणि दुसरी कृत्रिम असते. पहिली ईश्वर निर्माण करितो आणि दुसरी ऐहिक व क्षणभंगुर अशा नफानुकसानीवर अवलंबून असते. अशा प्रकारचे प्रीतीचे दोन विभाग केले म्हणजे मग नेटिव लोकांची इंग्लिशांवर प्रीति नसते आणि असते असे दोन्हीही परस्परविरुद्ध सिद्धांत खरे टरविण्याला मुळींच पंचाईत पडणार नाहीं. व अशा दृष्टीनें पाहिलें असतां नेटिव इंग्लिशांवर प्रीति करीत नाहींत आणि करितात ह्या दोन्ही गोष्टी संभवतात. इंग्लिशांवर नेटिवांची निर्हेतुक प्रीति नाहीं, असाच मि॰ जे. सी. कॉलिन्स ह्यांच्या म्हणण्यांतील भावार्थ असला पाहिजे. व नेटिवांची अशी निर्हेतुक प्रीति इंग्रजांवर नसणें हेंही अगदीं स्वाभाविक आहे. त्यांच्यावर नेटिवांची निर्हेतुक प्रीति कशी असावी! नेटिव लोक म्हणजे काय माणसें नव्हेत! किंवा त्यांना कांहीं स्मरणशक्ति नाहीं! मागें आपलें काय होतें आणि पुढें आपलें काय होणार, हें त्यांना जोंपर्यंत समजत आहे, तोंपर्यंत त्यांची निर्हेतुक प्रीति कशी असावी! निर्हेतुक प्रीति स्वतःच्या राजांवर असूं शकेल. परकीय लोकांवर ती कशी असणार! ज्या ज्या नेटिवांना म्हणून आपला पूर्वीचा इतिहास कळत आहे, त्यांच्या त्यांच्या मनांमध्यें निर्हेतुक प्रीति कशी उत्पन्न होणार! पूर्वी आपलीं राज्यें होतीं आणि तीं आतां गेलीं, ह्या गोष्टी नेटिव लोक कशा विसरणार! सारांश, हिंदुस्थान आणि इंग्लंड ह्यांच्यामध्यें असलेलें पांच हजार कोसांचें अंतर, हिंदुस्थानांतील लोक आणि इंग्लंडांतील लोक ह्यांचे रीतिरिवाज, आचारविचार, धर्मभेद, वर्णभेद, जातिभेद वगैरे अनेक गोष्टींमधील ५ हजार कोसांपेक्षांही किती तरी पटींनीं जास्त असलेलें अंतर, आणि हिंदुस्थानांत ईस्ट इंडिया कंपनीनें पाऊल टेविल्यापासून आजमित्तीपर्यंत इंग्लंडनें हिंदुस्थानशीं कांहीं कांहीं बाबतींमध्यें केलेलें वर्तन ह्या सगळ्यांनीं इंग्लिशांबद्दल नेटिवांची निर्हेतुक प्रीति अशक्य करून टाकिली आहे. निर्हेतुक प्रीति अशक्य करून टाकणारीं हीं कारणें अशीं ढोबळ आहेत कीं, एक वेळ सूर्य झांकला जाईल, पण तीं झांकलीं जाणार नाहींत. त्याला

कोण काय करणार? ह्याला नेटिवांचा तरी काय उपाय आहे? जसें स्कॉटलंड इंग्लंडला चिकटलें आहे, तसें जर कांहीं कृतीनें इंग्लिशांनीं हिंदुस्थान इंग्लंडच्या किनाऱ्याला नेऊन चिकटविलें, तर हिंदुस्थानांतील नेटिवांच्याही मनांमध्यें इंग्लिशांबद्दल निर्हेतुक प्रीति उत्पन्न होणें शक्य आहे. परंतु असें झालें नाहीं तोंपर्यंत ती कशी उत्पन्न व्हावी? ईश्वरानेंच जेथें अंतर उत्पन्न करून ठेविलें आहे तेथें मनुष्य काय करणार? अशा स्थितींत जी अपरिहार्य गोष्ट आहे, ती गृहीत धरूनच चाललें पाहिजे. म्हणजे स्वाभाविक परिस्थितीमुळें निर्हेतुक प्रीति उत्पन्न होणें शक्य नाहीं, ही निरुपायाची गोष्ट आहे, असें समजूनच चाललें पाहिजे.

परंतु ही निर्हेतुक प्रीति नसली म्हणजे तिच्या योगानें व्यवहारांतील गोष्टींना कांहीं कमीपणा येतो असें नाहीं. राजा आणि प्रजा ह्यांच्यामधील सर्वसामान्य व्यवहार ह्या सहेतुक प्रीतीनेंही यथासांग पार पडूं शकतात. ही सहेतुक प्रीति म्हणजे काय ह्याचें सामान्यतः दिग्दर्शन वर केलेलेंच आहे. ही प्रीति बाह्य गोष्टींवर अवलंबून असते. इंग्लिशांबद्दल नेटिवांच्या मनांमध्यें निर्हेतुक प्रीति असो किंवा नसो, त्यांच्याबद्दल नेटिवांच्या मनांत सहेतुक प्रीति अत्यंत वास करीत आहे ह्यांत शंका नाहीं. इंग्रज लोक ह्या देशांत जी जी लोकोपयोगी गोष्ट करीत आहेत, ती ती प्रत्येक गोष्ट त्यांच्याबद्दल नेटिवांच्या मनामध्यें प्रेमबुद्धि उत्पन्न करण्याविषयीं झटल्यावांचून राहणार नाहीं. हिंदुस्थानांत पूर्वीं नव्हत्या अशा इतक्या सुखकारक गोष्टी इंग्लिशांनीं येथें नवीन आणिल्या आहेत कीं, त्यामुळें नेटिवांचीं मनें इंग्लिशांबद्दलच्या सहेतुक प्रीतीनें अगदीं ओथंबून गेलेलीं आहेत. इंग्लिशांबद्दल नेटिवांच्या मनांत प्रेम उत्पन्न करण्याकरितां आगगाड्या आणि आगबोटी रात्रंदिवस डोंगरांतून आणि समुद्रांतून धांवत आहेत. तारायंत्रांपासून हिंदुस्थानांतील लोकांना जे असंख्य फायदे होत आहेत, ते पाहून इंग्लिशांबद्दल कोणाच्या मनांमध्यें सहेतुक प्रीति उत्पन्न होणार नाहीं? इंग्रजी राज्यामुळें येथील कोट्यवधि लोकांना आज पोटाला मिळत आहे; कोणाला पगार म्हणून मिळतो; कोणाला पेन्शन म्हणून मिळतें; कोणाला वाढलेल्या व्यापारामुळें सावकारी चाकऱ्या मिळतात; कोणाला गिरण्यांतून आणि कारखान्यांतून मजुरी मिळते; ह्याप्रमाणें कोणत्याना कोणत्या तरी रीतीनें आज असंख्य माणसांच्या पोटाला मिळत आहे; हीं माणसें

इंग्लिशांबद्दल सहेतुक प्रीति मनामध्यें न बाळगण्याइतकी कृतघ्न असतील असें शक्य तरी आहे काय ! म्युनिसिपालिट्या, लोकलबोर्डें शाळा-कॉलेजें, दवाखाने, धाकटीं कौन्सिलें आणि थोरलीं कौन्सिलें, असोसिएशन्स, कॉन्फरन्सेस, कमिशन्स वगैरे ज्या अनेक चांगल्या संस्था केवळ इंग्रजी अमलानें येथें अस्तित्वांत आणिल्या आहेत, त्यांच्या योगानें सुशिक्षित नेटिव लोक तर सहेतुक प्रीतीच्या आनंदभरानें केवळ वेडे होऊन जात आहेत. कित्येक इंग्लिश लोक कांहीं अन्यायाच्या गोष्टी करीत असतांही इंग्लिशांनीं स्थापन केलेलीं न्यायकोर्टें नेटिवांच्या मनामध्यें इंग्लिशांबद्दल सहेतुक प्रीति उत्पन्न करीत आहेत. दुष्काळ कशानेंही पडोत, परंतु दुष्काळांत रिलीफ कामावर अथवा पुअर हाऊसमध्यें नेमस्त खाऊन ढेकर देणाऱ्या लक्षावधि नेटिव लोकांच्या मनामध्यें अशा अन्न देणाऱ्या इंग्रज लोकांबद्दल सहेतुक प्रीति उत्पन्न झाल्यावांचून कधीं तरी राहील काय ! नेटिव्ह ख्रिस्ती लोकांना केवळ ज्यांच्यामुळें आपलें धर्मस्वातंत्र्य पूर्णपणें राखितां येतें त्यांच्याबद्दल त्यांच्या मनामध्यें सहेतुक प्रीति कशी बरें असणार नाहीं ! लोकांपाशीं जरी पूर्वीप्रमाणें शस्त्रें नाहींत तरी सैन्याच्या आणि पोलिसच्या उत्कृष्ट व्यवस्थेमुळें लोक पूर्वीपेक्षां अन्य शत्रूंपासून आणि चोरांपासून जास्त निर्भय झाले आहेत; व देशांत कांहीं व्यक्ति जरी अत्यंत गरिबीच्या अवस्थेला जाऊन पोहोंचल्या आहेत तरी एकंदर देशांतील व्यापार, कला, उद्योग, धंदे आणि संपत्ति हीं वाढत आहेत. ह्याप्रमाणें इंग्लिशांनीं हिंदुस्थानांत अनेक उपयुक्त गोष्टी आणून सोडिल्या आहेत, व त्यांपासून त्यांचें कोणत्याना कोणत्या तरी रीतीनें कल्याण झालें नाहीं असा एकही मनुष्य ह्या आर्यावर्तामध्यें सांपडावयाचा नाहीं. आणि जेथें कल्याण झालेलें आहे तेथें त्या कल्याणाच्या मानानें थोडीबहुत तरी सहेतुक प्रीति उत्पन्न झालीच पाहिजे. इंग्रजांचे पूर्वी हिंदुस्थानांत कांहीं एक नव्हतें, असें असून त्यांनीं येथें एवढी मोटी बादशाही नवीन स्थापन केली आहे, तेव्हां ती स्थापन करण्यामध्यें त्यांच्या हातून कित्येकांचें नुकसानही झालें असेल हें खरें. कारण, कोणाचें तरी गेल्यावांचून ह्यांच्यापाशीं येतें कोठून ! परंतु राज्यसंस्थापनेच्या कामीं अशीं नुकसानें अपरिहार्य आहेत; तरी पण ह्या कामींसुद्धां इंग्रजांच्या हातून फारच थोड्या लोकांचीं नुकसानें झालेलीं आहेत; व तीं नुकसानें झाल्यालाही आज कैक वर्षें होऊन गेलीं आहेत. इतक्या अव-

धीत नुकसान झालेल्यांपैकीं कोणी जिवंत असतील किंवा नाहीं याची वानवाच आहे. हल्लीं हिंदुस्थानचा भूप्रदेश नवीन चेहऱ्यांनीं प्रफुल्लित झालेला आहे, व त्या वनश्रीच्या सौंदर्याचा बेरंग करणारे पूर्वीच्या नुकसानीनें दुर्मुखलेलें एखादें तोंड दृष्टीस पडण्याचा क्वचितच संभव आहे. पूर्वीचें झालेलें नुकसान हल्लीं कोणाला माहीतही नाहीं. उलट इंग्रजी अमलापासून झालेल्या फायद्यांनीं हल्लीं सर्व हिंदुस्थान हंसत आहे. अशा स्थितींत सहेतुक प्रीति प्रत्येक अंतःकरणात उचंबळल्यावांचून कशी राहील! निर्हेतुक प्रीति नसली तरी सहेतुक प्रीति उत्पन्न झालीच पाहिजे, व ती प्रीति हिंदुस्थानांतील नेटिवांच्या मनामध्यें इतकी पुष्कळ उत्पन्न झालेली आहे कीं, हिंदुस्थानांत आणखी दुष्काळ पडले, प्लेग चालू राहिला, हिंदुस्थानचें सैन्य सोडनमध्यें आणि हिंदुस्थानचें द्रव्य इंग्लंडमध्यें गेलें, हिंदुस्थान सरकारचा कर आणि लोकांचा कंगालपणा वाढला व रॅंस-साहेबांच्यासारखे खटले आणि बॉम्बे लँड रेव्हेन्यू कोडसारखे कायदे झाले, तरीसुद्धां ती प्रीतीची पुंजी इंग्रजांना अजून किती तरी दिवस पुरेल. अशा रीतीची अपार सहेतुक प्रीति नेटिवांच्या मनांत इंग्लिशांबद्दल वागत आहे, व हीच सहेतुक प्रीति मनामध्यें पुष्कळ दिवस वागत गेली म्हणजे हिच्या-पासूनच मनाला निर्हेतुक प्रीति करण्याची संवय लागते. सहेतुक प्रीति हीच कांहीं काळानें निर्हेतुक प्रीतीच्या रूपानें परिणत होते. त्याप्रमाणें इंग्लिशांवर आज जी सहेतुक प्रीति आहे, ती त्यांच्या खऱ्या लोकोपयोगी सत्कृत्यांच्या मानानें थोड्याबहुत अवकाशांत निर्हेतुक होण्याचाही संभव नाहीं असें नाहीं.

'ना विष्णुः पृथिवीपतिः' असें एक वचन नेटिव लोकांच्या शास्त्रांत आहे. पण इंग्रजी अमलांत मिळालेल्या स्वातंत्र्याचा दुरुपयोग करून कित्येक वात्र-टांनीं नेटिवांच्या समाजामध्यें जो वाष्कळपणा सुरू केला त्याचा परिणाम असा झाला कीं, नेटिव लोकांचा आपल्या जुन्या शास्त्रांवरचा भरंवसा अगदीं उडून गेला. त्यायोगानें शास्त्रें बिनभरंवशाचीं ठरल्यामुळें ह्या अश्रद्धेच्या वावटळी-मध्यें इतर शास्त्रवचनांबरोबर वर दिलेलेंही वचन सांपडून तें कोणीकडे गेलेलें आहे ह्याचा हल्लीं कोणाला पत्ताही नाहीं. इंग्लंडमध्यें King by divine right हें जें एक तत्त्व पूर्वीं प्रचलित होतें, तसल्याच जातीचें हें थोड्याबहुत प्रमाणानें हिंदुस्थानांतील तत्त्व आहे. पण इंग्लंडमधील हें थोतांड कधींच ल्याला गेलेलें आहे, व हिंदुस्थानामध्यें तें इंग्लंडच्या इतकें कधींच जोरांत

आलेलें नसल्यामुळें तें येथेंही लयास गेल्यासारखेंच आहे. शिवाय हल्लींच्या काळांतील लोकांची अशी भावना व्हावी कशी! अमुक अमुक राजा हा विष्णु आहे असें लोकांना कसें वाटावें! त्यांत कांहीं अंशीं लोकांचा दोष असेल, पण पुष्कळ अंशीं राजांचाच दोष आहे. हल्लींच्या काळांत असा एक तरी राजा सांपडेल काय कीं, जो आपल्या आंगच्या सद्गुणानें व आपल्या हातांच्या सत्कृत्यानें आपण विष्णुच आहों असें वाटण्याला लोकांना भाग पाडील ! विष्णूसारखे राजे पूर्वी होऊन गेले. पण आतां तसे कोण आहेत! रामचंद्र, हरिश्चंद्र इत्यादिक राजे या हतभाग्य भूमीला अलंकृत करीत. त्या वेळेला राजे हे प्रत्यक्ष विष्णुच होत अशी लोकांची कल्पना झालेली होती. परंतु तेव्हांपासून पुढें झालेल्या राजांपैकीं कांहींनीं लोकांची ही कल्पना टिकूं दिली नाहीं. त्यांनीं आपल्या अघोर, अन्यायी, अनन्वित आणि जुलुमी कृतींनीं—लोकांच्या शापांनीं जड झालेल्या कृतींनीं—असल्या कल्पनांवर विश्वास ठेवणाऱ्या लोकांना मूर्ख आणि धर्मभोळे म्हणून ठरवून टाकिलें आहे. तेव्हां हीं जुनीं सत्ययुगांतलीं वचनें ह्या असत्ययुगांत काय कामाचीं! राजाला विष्णु मानणें म्हणजे त्याच्या ठिकाणीं निर्हेतुक प्रेम असण्यासारखेंच होय. पण सध्यांच्या हिंदुस्थानच्या स्थितीकडे वळून पाहिलें तर इंग्रजांच्या संबंधानें विष्णुत्वबुद्धि आहे ही गोष्ट त्यांच्याबद्दल निर्हेतुक प्रीति असण्या-इतकीच अशक्य आहे. नेटिव लोकांनीं आपल्या कल्पनेची खुंटी अतिशय पिळली तरी त्यांच्या मनांमध्यें इंग्रज हे विष्णु आहेत ही बुद्धि कशी बाणावी! इंग्रज लोक आपल्या जातभाईसाटीं मोठ्या पगाराच्या जागा राखून ठेवितात, ह्यावरून ते विष्णु म्हणून नेटिवांनीं मानावें ! पण असें नाहीं. कारण विष्णूचें सर्व जगच जातभाई अथवा त्याचा कोणीच जातभाई नव्हे. ज्या इंग्रजांनीं आपला व्यापार वाढविण्याकरितां हिंदुस्थानांतील मालावर जबर जकात बसवून तेथील व्यापार अंशतः बुडविला, ज्या इंग्रजांनीं रविवार हा देवाचा दिवस आहे, अशा सबबीवर आपला माल कमी खपण्याला कारणीभूत झालेल्या हिंदुस्थानांतील गिरण्यांचें रविवारचें काम बंद पाडविलें, जे इंग्रज लोक हिंदुस्थानांतून इंग्लंडमध्यें प्रतिवर्षी सुमारें तीस कोटी रुपये नेतात, आणि जे इंग्रज लोक कधीं कधीं स्वजातीय आरोपी असला तर त्याजवर बाजवीपेक्षां फाजील दया दाख-वितात, त्यांना नेटिव लोक विष्णु म्हणून कसे मानतील! ही गोष्ट कधींही

शक्य नाहीं. ज्यांच्या अंगांत मनुष्याच्या उणिवा भरलेल्या दिसतात, ज्यांना कोमासारखे रिपु मुळींच वर मान काढूं देत नाहींत, आणि ज्यांचे १८५८च्या जाहीरनाम्याप्रमाणें कित्येक आशीर्वाद फक्त देण्याकरितांच मात्र आहेत आणि खरे होण्याकरितां नाहींत, त्यांना देव म्हणून कोण मानणार ?

पण इंग्रज लोक हे जरी देव नसले तरी ते मनुष्यवर्गामध्यें बरेच श्रेष्ठ आहेत यांत संशय नाहीं. आणि नेटिवांच्या मनामध्यें त्यांच्याविषयीं देवाप्रमाणें पूज्य-बुद्धि नसली तरी उत्तम मनुष्यासंबंधानें जरूर दाखवावयाला पाहिजे तितकी आदरबुद्धि त्यांच्या मनामध्यें खात्रीनें आहे; व ह्यांत जो भावार्थ आहे तोच सहेतुक प्रीति आणि निर्हेतुक प्रीति यांमध्यें आहे. मानपत्रवाले कांहीं म्हणत असले तरी इंग्लिशांबद्दल नेटिवांच्या मनांमध्यें निर्हेतुक प्रीति नाहीं, असें जर कोणी म्हणेल तर तें अगदीं खोटें आहे. आणि ह्याच अर्थ मि० जे. सी. कॉलिन्स ह्यांनीं आपल्या वाक्यामध्यें सूचित केला आहे. नेटिव लोकांची आपल्यावर प्रीति नाहीं असें जेव्हां ते म्हणतात, तेव्हां त्याचा अर्थ हा कीं, इंग्रजांवर नेटिवांची निर्हेतुक प्रीति नाहीं. कारण, त्यांच्या वाक्यांतील उत्तरार्धा-वरून इंग्रजांवर नेटिवांची सहेतुक प्रीति आहे हें उघड होतें. याचप्रमाणें इंग्लिशांवर नेटिवांची प्रीति नाहीं, तर मग इंग्लिशांच्या अमलाखालीं इतके तीस कोटी नेटिव लोक समाधानानें कसे राहतात, ही जी शंका उत्पन्न होते, तिचेंही निराकरण प्रीतीच्या वर केलेल्या दोन प्रकारच्या विभागांपासून चांगल्या रीतीनें होऊं शकते. नेटिवांची इंग्रजांवर प्रीति नाहीं म्हणजे निर्हेतुक प्रीति नाहीं; पण ते संतोषवृत्तीनें आणि समाधानानें राहतात, ह्याचें कारण त्यांच्या मनामध्यें इंग्लिशांविषयीं सहेतुक प्रीति आहे हें होय. ही सहेतुक प्रीति जसजशी वाढत जाईल तसतशी इंग्रजी राज्याला जास्त बळकटी येईल. परंतु ती प्रीति वाढणें किंवा कमी होणें ही गोष्ट इंग्रजांच्या कृत्यांवर सदोदित अवलंबून राहणार आहे. निर्हेतुक प्रीति जशी कांहीं झालें तरी नाहींशी व्हावयाची नाहीं, तशी सहेतुक प्रीति नाहीं. सहेतुक प्रीतीची एखाद्या रोप्याप्रमाणें जर चांगली मशा-गत केली तरच ती वाढेल.

# हिंदुस्थानचें दारिद्य आणि त्याचीं कारणें : २४

काळ : अप्रेल ता. ७।३।१९०२

● दादाभाई नौरजी यांचें 'Poverty and Un-British Rule in India' आणि डिग्बी यांचें 'Prosperous India' हीं पुस्तकें नुकतींच प्रसिद्ध झालीं होतीं. लो. टिळकांनीं केसरींत ता. १०।१२।१९०१, १७।१२।१९०१ व १४।१।१९०२ या अंकांत या पुस्तकांवर व विषयांवर लेख लिहिले.

थॉरबर्न यांनीं विलायतेंत एका व्याख्यानांत प्रतिपादन केलें कीं, हिंदुस्थानावर राज्य करण्याच्या इंग्लिशांच्या पद्धतीमुळें हिंदुस्थान कंगाल परिसीमेला पोंचला आहे. उलट पक्षीं हिंदुस्थानचे प्रधान लॉर्ड हॅमिल्टन यांनीं ब्रिटिश अमलामुळें हिंदुस्थानची स्थिति सुधारत असल्याचें एका व्याख्यानांत जाहीर केलें. याच सुमारास राज्यारोहणाच्या बादशाही समारंभाची धामधूम चालली होती.

ब्रिटिश सरकारचे ताब्यांत हिंदुस्थान देश गेल्यामुळें त्याची मरमराट होत चालली आहे, ह्या म्हणण्यांत सत्यतेचा अंश बिलकुल नसून अगदीं उलट प्रकार घडत आहे, ही गोष्ट आतां सर्वांस मान्य झाली आहे, असें म्हणावयास कांहींच हरकत नाहीं. आजपर्यंत सरकारी अमलदारांची ह्या गोष्टीबद्दल खात्री होत नव्हती; परंतु आतां त्यांनाही ही गोष्ट निमूटपणें कबूल करावी लागत आहे. आणि ह्यांत नवलही नाहीं. आमच्या हिंदुस्थानांतल्या सूर्याचा प्रकाश अगदीं स्वच्छ पडत असतो, तरी त्यासमुद्धां वर्षांतून कित्येक दिवस ढगाच्या

शक्य नाहीं. ज्यांच्या अंगांत मनुष्याच्या उणिवा भरलेल्या दिसतात, ज्यांना लोमासारखे रिपु मुळींच वर मान काढूं देत नाहींत, आणि ज्यांचे १८५८ च्या जाहीरनाम्याप्रमाणें कित्येक आशीर्वाद फक्त देण्याकरितांच मात्र आहेत आणि खरे होण्याकरितां नाहींत, त्यांना देव म्हणून कोण मानणार ?

पण इंग्रज लोक हे जरी देव नसले तरी ते मनुष्यवर्गामध्यें बरेच श्रेष्ठ आहेत यांत संशय नाहीं. आणि नेटिवांच्या मनामध्यें त्यांच्याविषयीं देवाप्रमाणें पूज्य-बुद्धि नसली तरी उत्तम मनुष्यासंबंधानें जरूर दाखवावयाला पाहिजे तितकी आदरबुद्धि त्यांच्या मनामध्यें खात्रीनें आहे; व ह्यांत जो भावार्थ आहे तोच सहेतुक प्रीति आणि निर्हेतुक प्रीति यांमध्यें आहे. मानपत्रवाले कांहीं म्हणत असले तरी इंग्लिशांबद्दल नेटिवांच्या मनांमध्यें निर्हेतुक प्रीति नाहीं, असें जर कोणी म्हणेल तर तें अगदीं खोटें आहे. आणि हाच अर्थ मि० जे. सी. कॉलिन्स ह्यांनीं आपल्या वाक्यामध्यें सुचित केला आहे. नेटिव लोकांची आपल्यावर प्रीति नाहीं असें जेव्हां ते म्हणतात, तेव्हां त्याचा अर्थ हा कीं, इंग्रजावर नेटिवांची निर्हेतुक प्रीति नाहीं. कारण, त्यांच्या वाक्यांतील उत्तरार्धा-वरून इंग्रजांवर नेटिवांची सहेतुक प्रीति आहे हें उघड होतें. याचप्रमाणें इंग्लिशावर नेटिवांची प्रीति नाहीं, तर मग इंग्लिशांच्या अमलाखालीं इतके तीस कोटी नेटिव लोक समाधानानें कसे राहतात, ही जी शंका उत्पन्न होते, तिचेंही निराकरण प्रीतीच्या वर केलेल्या दोन प्रकारच्या विभागांपासून चांगल्या रीतीनें होऊं शकते. नेटिवांची इंग्रजांवर प्रीति नाहीं म्हणजे निर्हेतुक प्रीति नाहीं; पण ते संतोषवृत्तीनें आणि समाधानानें राहतात, ह्याचें कारण त्यांच्या मनामध्यें इंग्लिशांविषयीं सहेतुक प्रीति आहे हें होय. ही सहेतुक प्रीति जसजशी वाढत जाईल तसतशी इंग्रजी राज्याला जास्त बळकटी येईल. परंतु ती प्रीति वाढणें किंवा कमी होणें ही गोष्ट इंग्रजांच्या कृत्यांवर सदोदित अवलंबून राहणार आहे. निर्हेतुक प्रीति जशी कांहीं झालें तरी नाहींशी व्हावयाची नाहीं, तशी सहेतुक प्रीति नाहीं. सहेतुक प्रीतीची एखाद्या रोप्याप्रमाणें जर चांगली मशा-गत केली तरच ती वाढेल.

# हिंदुस्थानचें दारिद्र्य आणि त्याचीं कारणें : २४

काळ : अप्रेल ता. ७।२।१९०२

● दादाभाई नौराजी यांचें 'Poverty and Un-British Rule in India' आणि डिग्बी यांचें 'Prosperous India' हीं पुस्तकें नुकतींच प्रसिद्ध झालीं होतीं. लो. टिळकांनीं केसरींत ता. १०।१२।१९०१, १७।१२।१९०१ व १४।१।१९०२ या अंकांत या पुस्तकांवर व विषयांवर लेख लिहिले.

थॉरबर्न यांनीं विलायतेंत एका व्याख्यानांत प्रतिपादन केलें कीं, हिंदुस्थानावर राज्य करण्याच्या इंग्लिशांच्या पद्धतीमुळें हिंदुस्थान कंगाल परिसीमेला पोंचला आहे. उलट पक्षीं हिंदुस्थानचे प्रधान लॉर्ड हॅमिल्टन यांनीं ब्रिटिश अमलामुळें हिंदुस्थानची स्थिति सुधारत असल्याचें एका व्याख्यानांत जाहीर केलें. याच सुमारास राज्यारोहणाच्या बादशाही समारंभाची धामधूम चालली होती.

ब्रिटिश सरकारचे ताब्यांत हिंदुस्थान देश गेल्यामुळें त्याची भरभराट होत चालली आहे, ह्या म्हणण्यांत सत्यतेचा अंश बिलकुल नसून अगदीं उलट प्रकार घडत आहे, ही गोष्ट आतां सर्वांस मान्य झाली आहे, असें म्हणावयास कांहींच हरकत नाहीं. आजपर्यंत सरकारी अमलदारांची ह्या गोष्टीबद्दल खात्री होत नव्हती; परंतु आतां त्यांनाही ही गोष्ट निमूटपणें कबूल करावी लागत आहे. आणि ह्यांत नवलही नाहीं. आमच्या हिंदुस्थानांतल्या सूर्याचा प्रकाश अगदीं स्वच्छ पडत असतो, तरी त्यासमुद्धां वर्षांतून कित्येक दिवस ढगाच्या

शक्य नाहीं. त्यांच्या अंगांत मनुष्याच्या उणिवा भरलेल्या दिसतात, ज्यांना लोभासारखे रिपु मुळींच वर मान काढूं देत नाहींत, आणि ज्यांचे १८५८ च्या जाहीरनाम्याप्रमाणें कित्येक आशीर्वाद फक्त देण्याकरितांच मात्र आहेत आणि खरे होण्याकरितां नाहींत, त्यांना देव म्हणून कोण मानणार ?

पण इंग्रज लोक हे जरी देव नसले तरी ते मनुष्यवर्गामध्यें बरेच श्रेष्ठ आहेत यांत संशय नाहीं. आणि नेटिवांच्या मनामध्यें त्यांच्याविषयीं देवाप्रमाणें पूज्य-बुद्धि नसली तरी उत्तम मनुष्यासंबंधानें जरूर दाखवावयाला पाहिजे तितकी आदरबुद्धि त्यांच्या मनामध्यें खालीनें आहे; व ह्यांत जो भावार्थ आहे तोच सहेतुक प्रीति आणि निर्हेतुक प्रीति यांमध्यें आहे. मानपत्रवाले कांहीं म्हणत असले तरी इंग्लिशांबद्दल नेटिवांच्या मनांमध्यें निर्हेतुक प्रीति नाहीं, असें जर कोणी म्हणेल तर तें अगदीं खोटें आहे. आणि हाच अर्थ मि० जे. सी. कॉलिन्स ह्यांनीं आपल्या वाक्यामध्यें सुचित केला आहे. नेटिव लोकांची आपल्यावर प्रीति नाहीं असें जेव्हां ते म्हणतात, तेव्हां त्याचा अर्थ हा कीं, इंग्रजांवर नेटिवांची निर्हेतुक प्रीति नाहीं. कारण, त्यांच्या वाक्यांतील उत्तरार्धा-वरून इंग्रजांवर नेटिवांची सहेतुक प्रीति आहे हें उघड होतें. याचप्रमाणें इंग्लिशांवर नेटिवांची प्रीति नाहीं, तर मग इंग्लिशांच्या अमलाखालीं इतके तीस कोटी नेटिव लोक समाधानानें कसे राहतात, ही जी शंका उत्पन्न होते, तिचेंही निराकरण प्रीतीच्या वर केलेल्या दोन प्रकारच्या विभागांपासून चांगल्या रीतीनें होऊं शकते. नेटिवांची इंग्रजांवर प्रीति नाहीं म्हणजे निर्हेतुक प्रीति नाहीं; पण ते संतोषवृत्तीनें आणि समाधानानें राहतात, ह्याचें कारण त्यांच्या मनामध्यें इंग्लिशांविषयीं सहेतुक प्रीति आहे हें होय. ही सहेतुक प्रीति जसजशी वाढत जाईल तसतशी इंग्रजी राज्याला जास्त बळकटी येईल. परंतु ती प्रीति वाढणें किंवा कमी होणें ही गोष्ट इंग्रजांच्या कृत्यांवर सदोदित अवलंबून राहणार आहे. निर्हेतुक प्रीति जशी कांहीं झालें तरी नाहींशी व्हावयाची नाहीं, तशी सहेतुक प्रीति नाहीं. सहेतुक प्रीतीची एखाद्या रोप्याप्रमाणें जर चांगली मशा-गत केली तरच ती वाढेल.

# हिंदुस्थानचें दारिद्र्य आणि त्याचीं कारणें : २४

काळ : अग्रलेख ता. ७।२।१९०२

● दादाभाई नौरजी यांचें 'Poverty and Un-British Rule in India' आणि डिग्बी यांचें 'Prosperous India' हीं पुस्तकें नुकतींच प्रसिद्ध झालीं होतीं. लो. टिळकांनीं केसरींत ता. १०।१२।१९०१, १७।१२।१९०१ व १४।१।१९०२ या अंकांत या पुस्तकांवर व विषयांवर लेख लिहिले.

थॉरबर्न यांनीं विलायतेंत एका व्याख्यानांत प्रतिपादन केलें कीं, हिंदुस्थानावर राज्य करण्याच्या इंग्रजांच्या पद्धतीमुळें हिंदुस्थान कंगाल परिस्थितीला पोंचला आहे. उलट पक्षीं हिंदुस्थानचे प्रधान लॉर्ड हॅमिल्टन यांनीं ब्रिटिश अमलानुळें हिंदुस्थानची स्थिति सुधारत असल्याचें एका व्याख्यानांत जाहीर केलें. याच सुमारास राज्यारोहणाच्या बादशाही समारंभाची धामधूम चालली होती.

ब्रिटिश सरकारचे ताब्यांत हिंदुस्थान देश गेल्यामुळें त्याची मरमराट होत चालली आहे, ह्या म्हणण्यांत सत्यतेचा अंश बिलकुल नसून अगदीं उलट प्रकार घडत आहे, ही गोष्ट आतां सर्वांस मान्य झाली आहे, असें म्हणावयास कांहींच हरकत नाहीं. आजपर्यंत सरकारी अमलदारांची ह्या गोष्टीबद्दल खात्री होत नव्हती; परंतु आतां त्यांनाही ही गोष्ट निमूटपणें कबूल करावी लागत आहे. आणि ह्यांत नवलही नाहीं. आमच्या हिंदुस्थानांतल्या सूर्याचा प्रकाश अगदीं स्वच्छ पडत असतो, तरी त्यासमुद्धां वर्षांतून कित्येक दिवस ढगाच्या

आड बसण्याची पाळी येते. आणि त्यामुळें चांगल्याही डोळ्याच्या माणसास तो दिसेनासा होतो. पण हिंदुस्थानांतील लोकांचें दारिद्र्य इतकें कांहीं वाढलें आहे कीं, तें कशानेंही लपत नाहीं. आणि कोणीं डोळ्यांवर कितीही कातडें ओढलें तरी अखेरीस त्यास इकडील लोक दरिद्री होत चालले आहेत, ही गोष्ट कबूल करावीच लागते. हल्लीं ह्या देशाशीं संबंध असलेल्या अमलदारांच्या तोंडून लोक दरिद्री होत चालले आहेत, असे उद्गार निघूं लागले आहेत. इकडील देशाच्या राज्यकारभाराचीं सूत्रें हातीं धरणारे प्रधान लॉ. जॉर्ज हॅमिल्टन यांनीं आपल्या डोळ्यांपुढें एक जंगी भिंतच उभी केली होती; व त्याच्यांतील हिंदुस्थानवासीय लोकांचें दारिद्र्य त्या भिंतीआड दडवून ठेवून ते तें आपणास मुळींच दिसूं देत नव्हते. परंतु त्यांनीं उभारलेल्या ह्या भिंतीवर इकडील लोकांच्या कैवाऱ्यांकडून इतका कांहीं मारा झाला कीं, ती हल्लीं सर्वैथैव ढांसळून गेली आहे, व इकडील लोकांपैकीं बराच भाग दारिद्र्यांत बुडाला आहे, असें तेही कबूल करूं लागले आहेत. ह्या देशाच्या एकंदर वस्तीपैकीं कितवा भाग दरिद्री आहे, याजबद्दल आतां काय तो वाद उरला आहे. कोणाच्या मतें इकडे सुमारें चार कोट लोक प्रत्यहीं उपोषित असतात. दुसऱ्या कित्येकांस हीं उपोषणें काढीत असलेल्या लोकांची संख्या चार कोटींहूनही पुष्कळच जास्त असली पाहिजे असें वाटतें. त्यांनीं ह्या उपोषितांच्या संख्येची मर्यादा सात कोटीपर्यंत नेली आहे. आपल्या देशाचे प्रस्तुतचे व्हाइसरॉय लॉर्ड कर्झन ह्यांच्या मतें इकडील प्रजेपैकीं सुमारें अठरा कोट लोकांचें वर्षाचें उत्पन्न वीस रुपयांहून जास्त नसावें असें आहे. लॉ॰ जॉर्ज हॅमिल्टन ह्यांनीं आपला कंडाव अद्यापि सर्वथैव सोडला नाहीं. तथापि आतां ते माघार घेऊं लागले असून लोकें दरिद्री होऊं लागले आहेत, ही गोष्ट कबूल करीत आहेत, हें एक सुचिन्हच आहे. हल्लीं त्यांनीं आपलें समाधान करून घेण्यास नवीनच एक जागा काढिली आहे. हिंदुस्थानांत दारिद्र्याचा जसा वास आहे, तसा तो इतर देशांतूनही असतो. तेव्हां हिंदुस्थानाबद्दल शोक कां करावा, अशा शोकावर त्यांनीं आपले बोलणें नेलें आहे. लंडनसारखें श्रीमान् शहर साऱ्या पृथ्वींत दुसरें नाहीं. तरी खुद्द लंडनच्या वस्तीपैकीं शेंकडा ३० लोक भिकारी आहेत, ही गोष्ट कोणीं विसरूं नये, असें ते सुचवितात. पण त्यांचा हा कोटिक्रम अमान्य करण्यास कांहीं तजवीज योजणें इष्ट आहे कीं नाही हा प्रश्न कांहीं नाहींसा होत

नाहीं. लंडनमध्यें विशेष भिकार आहे हें जरी खरें आहे, तरी त्याची स्थिति सुधारण्यासाठीं काय उपाय योजावेत, ह्याचे विचार चालूच आहेत. आणि त्याचप्रमाणें विचार हिंदुस्थानांतील लोकांची स्थिति सुधारण्यासाठीं झाले पाहिजेत, हें अगदीं निर्विवाद आहे. हा विचार करण्याचा क्रम सुरू झाला असतां अगदीं पहिला प्रश्न म्हटला म्हणजे, ह्या दारिद्र्याचीं कारणें काय असावींत, हा उत्पन्न होणार आहे. लोक इतके दरिद्री कां झाले आहेत व त्यांजजवळील संपत्ति कोणत्या कारणानें नष्ट झाली आहे, ह्या मुद्यांचा योग्य रीतीनें उलगडा होईल, तर त्याच्या निरसनाचे उपाय बऱ्याच पक्केपणानें योजतां येतील. लोकांतील दारिद्र्याचा प्रवाह कोणीकडून वाहत आला आहे याचा शोध काढून त्याच्या उगमापाशीं जाण्याचे श्रम घेतले, तर मात्र त्या प्रवाहास प्रतिबंध करतां येणार आहे. ह्यासाठीं अगदीं पहिला प्रश्न म्हटला म्हणजे, लोक इतके दरिद्री कशानें झाले हाच असून, त्याचें उत्तर शोधण्याचा प्रयत्न झाला पाहिजे. त्या प्रयत्नास आरंभ लागलों असतां इकडील लोकवस्तीचा बाजवीपेक्षां फारच मोठा भाग शेतीचा धंदा करीत आहे असें आपणांस आढळून येईल. तेवीस कोटी प्रजेपैकीं अठरा कोटी लोकांस उदरनिर्वाहाचें साधन शेतकीखेरीज दुसरें नसावें ही गोष्ट अतिशय असमाधानकारक आहे. कोणत्याही देशांत तेथील लोकवस्तीपैकीं शेंकडा ८० इसम शेतीच्या धंद्यावर राहूं लागले तर त्यांना लौकर किंवा उशिरानें दारिद्र्याच्याच फेऱ्यांत यावें लागेल; देशांत जितके धंदे जास्ती आणि वेगवेगळ्या धंद्यांत लोकांची वांटणी होण्याची सोय जितकी जास्ती, तितका देशांत दरिद्री लोक असण्याचा संभव कमी. परंतु दारिद्र्यास देशाबाहेर घालवून देण्याची ही सोय ह्या देशांत आतां फारच कमी होत चालली आहे. इकडील लोकांच्या उपयोगी पडणारा प्रत्येक जिन्नस हल्लीं परदेशांतून येत आहे. इकडील लोकांच्या उपयोगांत येणारे जिन्नस इकडे फारसे तयार होत नाहींत, त्याचप्रमाणें इकडे येणारा माल वेगवेगळ्या ठिकाणीं नेऊन पोहोंचविण्याचा धंदाही इकडील लोकांच्या हातीं राहिला नाहीं. म्हणजे प्रपंचांत लागणारे पदार्थ तयार करण्याचा आणि लोकांत त्यांची वांटणी करण्याचा, असे दोन्हीही धंदे इकडील लोकांच्या हातून निघून परकीय लोकांचे हातीं गेले आहेत, व शेतीच्याही धंद्याची तीच स्थिति

होण्याचा रंग दिसत आहे. दुष्काळाच्या वर्षांतून आतां परदेशाहून धान्य येऊं लागलें आहे, व हाच क्रम इतरही वर्षांतून होऊं लागेल कीं काय, असा धाक वाटत आहे. हल्लीं इकडे तयार होऊन युरोपांत जाणाऱ्या धान्याची किंमत तिकडे आतां पूर्वीसारखी येत नाहीं. इकडील धान्यापेक्षां अमेरिकेहून तिकडे जाणाऱ्या धान्यास किंमत जास्त येते. ह्यामुळें ज्याप्रमाणें अमेरिकेंतील धान्य युरोपांत जास्त जातें, त्याचप्रमाणें तें कर्मधर्मसंयोगानें इकडेही जास्त येऊं लागेल तर लोकांच्या चरितार्थाचें हल्लींचें साधन जी शेती तीही आमच्या लोकांच्या हातची जाऊन, दारिद्र्याचें प्रमाण हल्लींच्याहून जास्त वाढेल, तेव्हां लोकांचे दारिद्र्यच नाहींसें करावें अशी खरी इच्छा असेल, तर वेगवेगळ्या धंद्यांची दिशा जास्त सुरू करण्याचे उपाय शोधून काढण्याची तसदी घेतली पाहिजे. धंद्यांची संख्या जास्त वाढल्याखेरीज लोकांचें दारिद्र्य कमी होणार नाहीं. सरकार आणि सावकार हीं हल्लींच्या दारिद्र्याचीं कारणें आहेत, असा बहुतेकांचा मह झालेला दिसतो. परंतु ज्या देशांतील लोकांस निरनिराळ्या प्रकारचे धंदे, जोरानें चालून त्यांत फायदा मिळविण्याची सोय असते, त्यांना सरकार आणि सावकार यांचें मुळींच ओझें वाटत नाहीं म्हटलें तरी चालेल. सरकारी देण्याच्या ओझ्यांत लोकांस दरिद्री करण्याची शक्ति असती, तर ज्या देशांतील लोकांवर करांचा बोजा फार पडतो त्या देशांतील लोक जास्त दरिद्री असावयास पाहिजेत. परंतु तसा अनुभव मुळींच येत नाहीं. ग्रेट ब्रिटनांतील लोकांवर सरकारच्या देण्याचें जें ओझें पडतें त्याच्या मानानें पाहिलें तर आमच्या हिंदुस्थानच्या लोकांस फारच कमी ओझें पडतें असें म्हणावयास हरकत नाहीं. परंतु सरकारदेण्याच्या प्रमाणांत ह्याप्रमाणें अंतर आहे, तरी ग्रेट-ब्रिटनांतील लोक हिंदुस्थानांतल्या लोकांसारखे दरिद्री नाहींत. तेव्हां दारिद्र्य पदरांत बांधण्याच्या दोषाचें गांठोडें, सरकारदेण्याच्या मस्तकीं घालण्याचें अगदीं प्रयोजन नाहीं. सावकार हे दारिद्र्याचें कारण केव्हांच नसतात. श्रीमंतांच्या घरांत सावकार शिरत नाहींत. दारिद्र्य येण्यास सुरवात झाली म्हणजे सावकाराचें पाऊल घरांत शिरतें, आणि ज्या मानानें दारिद्र्य वाढत जातें त्याच मानानें सावकाराचा पगडा जास्त बसत जातो. यावरून सावकार हे दारिद्र्याचें कारण नसून परिणाम आहेत, असें सहज दिसून येणार आहे. तेव्हां सरकार आणि सावकार हीं लोकांस दरिद्री करणारीं कारणें


नसतां, तींच त्याचीं कारणें आहेत, अशी कल्पना करून घेऊन त्यांजविषयीं विचार करण्याची खटपट होईल तर, चोर एका बाजूनें जावा आणि दुसऱ्याच दिशेनें त्यास धरण्याचा प्रयत्न व्हावा, ह्याजपासून जितकी कार्यसिद्धि होईल, तितकीच ह्या खटपटीपासून कार्यसिद्धि होईल.


आतां हल्लींच्या स्थितीकडे लक्ष दिलें तर वेगवेगळे धंदे आमच्या देशांतील लोकांच्या वांट्यास आणून देतां येतील का नाहीं, ह्याचा विचार करणें इष्ट आहे. युरोपांतील प्रबल राष्ट्रांतल्या लोकांची आणि सरकारांची प्रत्येक धंदा आपल्या देशांत काय तो असावा आणि आपण पृथ्वीवरच्या लोकांस माल पुरवावा, अशी इच्छा असल्याचें दिसत असून, त्या धोरणानें त्यांचे प्रयत्नही सुरू आहेत. ज्या त्या देशांतील लोकांस आपल्या प्रयत्नांना आडकाठी आणण्याचें सामर्थ्य नाहीं असें त्यांच्या प्रत्ययास येतें, त्या त्या देशांतील लोकांच्या गळ्यांत आपल्या कारखान्यांतून तयार झालेला माल बांधण्याची व्यवस्था त्यांजकडून जारीनें होत आहे. आपण हिंदुस्थानांतील लोक अगदींच नादान ठरलों असून आपल्या हातून युरोपियन लोकांच्या प्रयत्नास कोणत्याही प्रकारची आडकाठी होणार नाहीं, अशी त्यांची खात्री झालेली आहे. त्यामुळें नवीन एकही धंदा आपल्या वांट्यास येणार नाहीं इतकेंच नव्हे, तर हल्लीं थोडी थुगथुगी असलेले आपले धंदे आपले हातून लवकरच जातील, आणि दारिद्र्याचें आज जें प्रमाण दृष्टीस पडत आहे, त्याजहून आणखी दहा-वीस वर्षांचे अवकाशांत आपलें दारिद्र्य दुपटीनें तरी वाढलें आहे असें आपल्या प्रत्ययास येईल.

हा भयंकर परिणाम टाळतां येणार नाहीं असें नाहीं. परंतु तो टाळण्याचे उपाय ब्रिटिश मुत्सद्दी योजतील ही आशा बाळगणें अगदींच वेडेपणाचें काम आहे. ह्या देशांतील लोकांचें दारिद्र्य स्पष्टपणें दिसत असतांही तें नाकबूल करण्याचा त्यांचा आजपर्यंतचा क्रम होता. हा क्रम ह्यांस हें दारिद्र्य खरोखरीच न दिसल्यामुळेंच त्यांजकडून सुरू राहिला होता असें नाहीं. त्यांच्या राज्य करण्याच्या धोरणाचें तें एक लक्षण आहे. ताब्यांतील प्रजेची अनर्थकारक स्थिति नाकबूल करतां येईल तोंपर्यंत ती नाकबूल करावी, हें ब्रिटिश मुत्सद्द्यांचें पहिलें लक्षण आहे. आणि याच लक्षणाच्या धोरणानें

हिंदुस्थानांतील लोक दरिद्री नाहींत, असें आजपर्यंत म्हणण्यात येत होतें. आतां तशी उडवाउडवी करण्याची सोय राहिली नाहीं. इकडील लोकांच्या दारिद्र्याचीं आतां इतकीं कांहीं प्रमाणें येऊन मिळत आहेत कीं, तें आंधळ्यासही दिसेल आणि बहिऱ्यासही ऐकूं येईल. ह्या प्रमाणानें ब्रिटिश मुत्सद्दी अगदीं चोहोंकडून कोंडल्यासारखे झाले आहेत. तेव्हां आतां हळूच त्यांच्या तोंडून हिंदुस्थानचे लोक दरिद्री आहेत. असे उद्गार निघूं लागले आहेत. तरीही अद्यापि. इकडील दारिद्र्याचें खरें प्रमाण कबूल करण्यांत येत नाहीं. ह्यापुढील युक्ति म्हटली म्हणजे खरें प्रमाण ठरविण्यातच घालवतील तितकीं वर्षें घालवावींत, ही आहे. अशा युक्तीनें बरीचशी मुदत घालविल्यानंतर दारिद्र्याच्या कारणांची चौकशी करण्याकरितां आणि तें नाहींसें करण्याचे उपाय सुचविण्याकरितां एखादें कमिशन नेमण्याची योजना होईल. ह्या युक्तीनें पुन्हाही कांहीं वर्षें घालवितां येतील. पुढें कमिशनच्या रिपोर्टांचा विचार करावयास प्रधानमंडळीस मुदत मिळाली पाहिजे. ही मुदत थोडीशी देऊन उपयोग होणार नाहीं. बरींच वर्षें विचार करण्यास लागतील. पुढें तो विचार होऊन त्याप्रमाणें पुरा अंमल होण्यास सन वीसशें-च्या जानेवारीच्या पहिल्या तारखेस सुरवात होईल किंवा नाहीं कोण जाणे! त्या अवधींत हिंदुस्थानची लोकसंख्या आज २९ कोटि आहे ती मात्र ९९ कोटीपर्यंत वाढेल, हा सर्व फायदा आपल्या देशास आपला ब्रिटिश सरकाराशीं शाश्वतचा संबंध जडल्यामुळें होईल.

— समाप्त —




.जंट्स—

न्ड को.

२.

—

नेक

र ण

हिंदुस्थानांतील लोक दरिद्री नाहींत, असें आजपर्यंत म्हणण्यात येत होतें. आतां तशी उडवाउडवी करण्याची सोय राहिली नाहीं. इकडील लोकांच्या दारिद्र्याचीं आतां इतकीं कांहीं प्रमाणें येऊन मिळत आहेत कीं, तें आंधळ्यासही दिसेल आणि बहिऱ्यासही ऐकूं येईल. ह्या प्रमाणानें ब्रिटिश मुत्सद्दी अगदीं चोहोंकडून कोंडल्यासारखे झाले आहेत. तेव्हां आतां हळूच त्यांच्या तोंडून हिंदुस्थानचे लोक दरिद्री आहेत. असे उद्गार निघूं लागले आहेत. तरीही अद्यापि. इकडील दारिद्र्याचें खरें प्रमाण कबूल करण्यांत येत नाहीं. ह्यापुढील युक्ति म्हटली म्हणजे खरें प्रमाण ठरविण्यातच घालवतील तितकीं वर्षें घालवावींत, ही आहे. अशा युक्तीनें बरीचशी मुदत घालविल्यानंतर दारिद्र्याच्या कारणांची चौकशी करण्याकरितां आणि तें नाहींसें करण्याचे उपाय सुचविण्याकरितां एखादें कमिशन नेमण्याची योजना होईल. ह्या युक्तीनें पुन्हाही कांहीं वर्षें घालवितां येतील. पुढें कमिशनच्या रिपोर्टाचा विचार करावयास प्रधानमंडळीस मुदत मिळाली पाहिजे. ही मुदत थोडीशी देऊन उपयोग होणार नाहीं. बरींच वर्षें विचार करण्यास लागतील. पुढें तो विचार होऊन त्याप्रमाणें पुरा अंमल होण्यास सन वीसशें-च्या जानेवारीच्या पहिल्या तारखेस सुरवात होईल किंवा नाहीं कोण जाणे! त्या अवधींत हिंदुस्थानची लोकसंख्या आज २९ कोटि आहे ती मात्र ९५ कोटीपर्यंत वाढेल, हा सर्व फायदा आपल्या देशास आपला ब्रिटिश सरकारापाशीं शाश्वतचा संबंध जडल्यामुळें होईल.

— समाप्त —

## सर्वांत जुना ! व सुप्रसिद्ध !

### सर्व प्रकारच ा रबरी मालाचा कारखाना

*

- रबरी फुगे
- दुधाच्या बाटल्यांचीं निपल्स
- संतति प्रतिबंधक साधनें.

कच्च्या मालाचा अ पुरा पुरवठा व वाढती मागणी ह्यामुळें अजून कांहीं दिवस मागणीप्रमाणें माल पुरविणें कठीण आहे. परंतु लवकरच परिस्थिती सुधारून भरपूर पुरवठा करूं शकूं अशी उमेद आहे.

# हिंदुस्थान रबर प्राडक्टस्

११० मंगळवार, इंदौर २.




—महाराष्ट्राचे सोल एजंट्स—

**मे. जयप्रकाश ॲन्ड को.**


सदाशिव पेठ, पुणें २.

—:o X o:—

सर्वोत्कृष्ट टॉनिक

# हेम किरण

२५ वर्षांची जुनी—




DTP.2 NINAD LTD.

—: याशिवाय :—

पोरवाल नेत्रांजन : सर्व प्रकारच्या नेत्ररोगांवर अप्रतिम

पोरवाल बाम : डोकें दुखीवर अप्रतिम

पोरवाल आणि कंपनी, पुणें २

## य. गो. जोशी प्रकाशन, पुणें

# ❀ वाद-विवेचन-माला ❀

| | | |
|---|---|---|
| १. सुलभ समाजवाद | पां. वा. गाडगीळ | १–०–० |
| २. फॅसीझम | पां. वा. गाडगीळ | १–०–० |
| ३. साम्राज्यशाही | ना. गं. गोरे | १–०–० |
| ४. अराज्यवाद | पां. वा. गाडगीळ | १–०–० |
| ५. लोकशाही | आचार्य जावडेकर | १–८–० |
| ६. मार्क्सचा भौतिकवाद | पां. वा. गाडगीळ | १–०–० |
| ७. विश्वकुटुंबवाद | ना. गं. गोरे | १–८–० |
| ८. ईश्वरवाद | आचार्य जावडेकर | १–८–० |
| ९. गांधीवाद | आचार्य दांडेकर | १–८–० |
| १०. राष्ट्रवाद | कोल्हटकर | २–०–० |
| ११. जडवाद | तर्कतीर्थ जोशी | १–४–० |
| १२. हिंदुत्ववाद | ज. स. करंदीकर | २–८–० |
| १३. मार्क्सचा कॅपीटल सारग्रंथ | पां. वा. गाडगीळ | १०–०–० |

* या तेरा पुस्तकांत वाद-विवेचन-माला पूर्ण होते. *

—: सोल एजंट :—

**महाराष्ट्र ग्रंथ भांडार, गिरगांव, मुंबई**

ग्राहकांनीं व पुस्तकविक्रेत्यांनीं पुस्तकें महाराष्ट्र ग्रंथ भांडार, मुंबई. यांजकडून परस्पर मागवावींत.


बायोटोना
मुलांना
निरोगी, सशक्त आणि
तेजस्वी बनवितो.
BIO
TONA
रॉय आणि कं.

## या महत्त्वाच्या गोष्टी जरूर ध्यानांत ठेवा

१ एक महिन्याचे अवधींत एक लक्ष रुपयांचे शेअर्स खपले असून शेअर विक्री रोज चालू आहे.

२ कंपनीची एकूण मालमत्ता पांच लाखांचेवर आहे.

३ ४०० टन ऊंस रोज गाळला जाईल अशा प्रकारची मशिनरी मेसर्स स्कोडा वर्क्स लि. प्राह, झेकोस्लोव्हेकिया यांचेकडून मागविली आहे. त्यासाठीं रु. १,१२,००० वर आगाऊ रक्कम भरली असून ही मशिनरी १९४७ च्या जूनमध्यें येऊन १९४७–४८ च्या हंगाम चालू करतां येईल, असा अंदाज आहे.

४ कंपनीनें एकूण २००० एकरांचे वर जमिनी मिळविल्या असून चालू सालीं १००० एकर ऊंसाची लागवड करण्यांत येणार आहे व १००० एकर जमीन अन्नधान्याच्या उत्पादनासाठीं उपयोगांत आणली जाईल.

## दि डेक्कन ॲग्रि० इंडस्ट्रीज, लि०

४७९।२ सदाशिव, टिळकरोड, पुणें.

# दि बरोडा बॅटरीज लि.

## गोया गेट, बडोदे

### शेअर विक्री चालू आहे.

अधिकृत भांडवल रु. १०,००,००० (दहा लाख)
विक्रीस काढलेलें व
खपलेलें भांडवल रु. ३,००,००० (तीन लाख)

हें भांडवल पुढीलप्रमाणें ऑर्डिनरी व प्रेफरन्स शेअर्समध्यें विभागलें आहे.

ऑर्डिनरी शेअर्स प्रत्येकीं रु. २० चा. ५% पेड अप.

५½% क्यूम्यूलेटिव्ह प्रेफरन्स शेअर्स प्रत्येकीं रु. ५० चा एक ५% पेड अप.

४½% रिडीमेबल प्रेफरन्स शेअस प्रत्येकीं रु. ५० चा एक. सर्व हप्ते भरलेले फक्त बडोदे सरकारसाठीं राखीव.

**जास्त माहितीकरतां वरील पत्त्यावर लिहा.**

चेअरमन
कॅ. प्रिन्स उदयसिंहराव गायकवाड B. A. (Com)

मॅनेजिंग एजंटस्
**पानसे अँन्ड को.**

पुढील पत्त्यावर चौकशी केल्यास जरूर ती माहिती पुरविण्यांत येईल.

**दि पनावा एजन्सीज लि.,**
४३ फोर्बस् स्ट्रीट, फोर्ट, मुंबई नं. १.

श्रीमती विजयालक्ष्मी पंडित, नामदार श्री. दादासाहेब मावळंकर, स्पीकर, बॉंबे लेजिस्लेटिव्ह असेंब्ली, पंतप्रधान श्री. बाळासाहेब खेर, स्वामी कुवलयानंद, चेअरमन फिजिकल एज्युकेशनल बोर्ड, डॉ. जे. एम. कुमाराप्पा, डायरेक्टर, टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशल सायन्सीस, डॉ. सी. जी. पंडित, डायरेक्टर, किंग इन्स्टिटयूट, मद्रास, डॉ. के. ए. गांधी, डायरेक्टर ऑफ पब्लिक हेल्थ, बॉंबे गव्हर्मेंट, डॉ. जास आल्बान डिसोझा, मेयर ऑफ बॉंबे, श्री. नगिनदास मास्तर, एक्स मेयर व अध्यक्ष, बी. पी. सी. सी.; स. का. पाटील, सेक्रेटरी, बी. पी. सी. सी., डॉ. बी. सी. दासगुप्ता, एक्झीक्यूटिव हेल्थ ऑफिसर, बॉंबे म्युनिसिपालिटी, श्री. नानासाहेब पुराणिक, माजी अध्यक्ष, ऑल महाराष्ट्र फिजिकल कल्चर कॉन्फरन्स, बडोद्याचे प्रो. माणिकराव, श्री. आबासाहेब मुजुमदार, अमरावतीचे वैद्य हरिहरराव देशपांडे, श्री. के. संजीवराव, एम. ए. सी. आय. ई. चेअरमन फेडरल पब्लिक सर्व्हिस कमिशन, सिमला. श्रीमती लीलावती मुन्शी, सभासद, बॉंबे म्युनिसिपल कार्पोरेशन, श्री. एन. माधवराव दिवाण, म्हैसूर संस्थान, यांसारख्या अनेक थोरांनी जिच्या ध्येयनिष्ठ, सेवाभावी व राष्ट्रहितवर्धक कार्याची मुक्तकंठानें प्रशंसा केली आहे अशी.

## हिंदुस्थानांतील एकमेव

# आदर्श विमा संस्था

**ट्रिनिटी म्यूचुअल**

**ॲशुअरन्स · कंपनी · लिमिटेड.**

मुख्य कार्यालय —— फोर्ट — मुंबई.

"एकमेवाद्वितीयम्–" या संज्ञेस पात्र झालेल्या या संस्थेच्या आश्रयदात्यांत आपलीहि गणना व्हावी असें प्रत्येकास वाटणें साहजिक होय.

मॅनेजिंग डायरेक्टर :—

**स. पां. नाडकर्णी, बी. कॉम. एम. सी., ए. सी. आय. आय. ( लंडन ).**

सतत २५ वर्षे नावाजलेले

तयार कपड्यांचे सर्वांत मोठे व्यापारी

# महिंद्रकर ब्रदर्स

एकदां समक्ष भेटाच.

बेलबाग्यान्याजवळ
बुधवार पेठ
पुणें २

पोर्तुगीज चर्च–
ट्रामनाक्याजवळ
गिरगांव, मुंबई ४

दम्यावर अप्रतिम औषध नाहीं
असें कां समजतां ?

## सोमासव

घेऊन संपूर्ण बरे व्हा.

२० तो. किं. १ रुपया.

हें औषध सोम नांवाच्या वनस्पतीपासून केलें आहे. जुनाट दमा व खोकला ह्यानें बरा होतो.

इतर औषधांकरितां आजच कॅटलॉग मागवाः—

आयुर्वेदीय औषधि भांडार पुणें २



K.T. DONGRE & Co.
GIRGAON BOMBAY.

डोंगरे यांच्या बालामृताने
अशक्त मुलें सशक्त होतात



दम्या-वरील उपाय
आतां ठरून गेला.

पुरोहित श्वासहारी हा एकच असा दम्यावरील उपाय आहे कीं त्याची सुरुवात करतांच कफ सुटतो धाप कमी होते, शौचाची तक्रार उरत नाहीं, पचनक्रिया सुधारते, हळुहळू शक्ति भरून येऊन फुप्फुसें मजबूत होतात व दमा निखालस बरा होतो. दमा, धाप लागणें, पहांटेचा ठसका, कंठदाह करणारा खोकला वगैरेसाठीं पुरोहित श्वासहारी प्लेन (निळें पॅकिंग) व बद्धकोष्ठ व आम्लपित्त बळावलेल्या दमेकऱ्यासाठीं पुरोहित श्वासहारी कंपाऊंड (लाल पॅकिंग) वापरावें. १, ६ व १२ औंसी बाटल्यांतून अनुक्रमें रु. १-६ रु. ५-१२ व रु. १० किमतीस सगळीकडे मिळतें.

दमा, श्वासविकार बरे करणारा एकच डाक्टरी उपाय



पुरोहित श्वासहारी
डॉ. पुरोहित फार्मसी

## पांढरी व तांबडी धुपणी, गर्भाशयदोष इत्यादि रोगांवर अमूल्य

# रक्तसुधा

**मुख्य औषधें** :—अशोक, अडुळसामूळ, शतावरी, लोध्र, दर्भाचें मूळ, त्रिफळा, चिकणामूळ, दारुहळद, यासारख्या रक्त ( आर्तव ) दोषनाशक अशा अनेक द्रव्यांनीं बनविलेलें औषध.

**उपयोग** :—स्त्रियांची पांढरी व तांबडी धुपणी, लघवीची आग, दुर्गंधयुक्त स्राव, गर्भाशयांतील सूज, वंध्यत्व, वारंवार गर्भपात होणें. विटाळाची अनियमितता वगैरे रोगांवर फारच उत्तम गुण देतें.

या औषधानें वरील रोग बरे होतातच, शिवाय तदंगभूत उद्भवणारे पंडुरोग-( ॲनिमिया ) सूज, अग्निमांद्य, रक्तपित, दाह, जीर्णज्वर, डोकें दुखी; वातविकार, मूर्च्छा, शोष वगैरे विकारांवर चांगल्या प्रकारें उपयोग होतो.

**अनुपान** :—हें औषध सकाळीं ४ चमचे व रात्रीं झोपतांना ४ चमचे तापवून थंड केलेल्या पाण्याबरोबर घेणें.

**दीनबंधू फार्मसी लिमिटेड,** केनेडी पुलाजवळ, मुंबई नं. ७.

---



## रामतीर्थ ब्राह्मी तेल

### स्पेशल नं. १.

मेंदूचे ज्ञानतंतु बलवान होऊन सफेत केस काळे होतात व टक्कल पडलेल्या ठिकाणीं केस येतात. सवडे नष्ट होतात. स्मरणशक्ति व दृष्टीची वाढ होऊन गाढ झोंप लागते. डोकेंदुखी थांबते. प्रत्येक ऋतूंत स्त्री-पुरुष आणि मुलें यांसाठीं अत्यंत फायदेशीर आहे. लिखा आणि ऊवा यांचा नाश करितें.

मोठी बाटली रु. ३-८-० लहान रु. २-०-०

सर्वत्र मिळतें.

**श्रीरामतीर्थ योगाश्रम**

४४८ सँढर्स्ट रोड, मुंबई ४.

# BIG MONEY IN RADIO

REI courses in Radio Electrical Engineering, Wireless Telegraphy, AMIEE., Air conditioning are advanced modern courses and designed to equip you for the numerous money-making opportunities open to Technicions.

Fresh sessions commence in **June each year.**

HUNDREDS ENROL EVERY YEAR.

**You also can Join after Matriculation**

## Radio Electric Institute

**Pioneers of Radio Education in INDIA.**

**LAMINGTON CHAMBERS., LAMINGTON ROAD, BOMBAY.**

---

## वझे -कृत- कफनाशक गोळ्या

**लहानांस**:—पोटांतील हवा, सुषी, उडतें इत्यादि विकारां-वर दोन तासांत गुण देतात.

**मोठ्यांस**:—सर्व प्रकारच्या कफविकारांवर उपयोगी. कोणत्याही तापाचीं लक्षणें दिसूं लागतांच वझे-कृत कफनाशक गोळ्यांचा प्रथमतः रेचक द्यावा म्हणजे कोठा साफ होऊन तापाचा जोर कमी होईल व न्युमोनियासारखे विकार होण्याची भीति नाही.

# खाजाव

★

ग्लूकोज, व्हिटामिन व प्रोटीनयुक्त
खाजावचा खुराक रोज चालू ठेवा.

★

रक्तवर्धक आंबावडी

स्वादिष्ट रुचिको

****

आपल्या दुकानदारांकडे मागणी करा.

★

## फडके-प्रॉडक्टस

पौष्टिक खाद्यपदार्थांचे कारखानदार — नागनाथपार, पुणे नं. २




थकल्याने

आंबलेले मांसे नरेंद्र फार्मसीचे **नरेंद्र एम्ब्रोकेशन** चोळल्यानें बरे होतात. मानेची तिरप, लचक, ठेंच, कंबरेंतील उसण व इतर वात यांवर तो जलद आराम देणारा उपाय आहे. केमिस्ट व वाण्यांकडे मिळतें.

सोल एजंट, **हनुमान एजन्सी, परळ, मुंबई १२.**

---


# सावधगिरी

कॉलरा, अमांश सारखे साथीचे रोग हल्ली नेहमींचेच झाले असून वेळेवर उपचार न झाल्यास रोगी दगावण्याची भीति असते. अशा वेळीं **जवेरियन जीवन मिक्श्चरचे** थोडे थेंब पाण्यांतून घेतल्यानें या रोगांपासून बचाव होतो. कुटुंबांत नेहमींचेच असणारे कैक किरकोळ विकार—उलटी, अपचन, सर्दी, पोट-दुखी, दातदुखी, लहान मुलांच्या शौचाच्या तक्रारी, जंतूदंश, मूत्र वगैरे **जवेरियन जीवन मिक्श्चर** त्वरित बरें करते. लाखों कुटुंबांत आज **जवेरियन जीवन मिक्श्चर** नित्यनें वापरीत आहेत. डॉक्टरांच्या गैर-हजेरींत उपयोगी पडणारें हें औषध घरांत व प्रवासांत राखणें खात्रीनें सावधगिरीचें ठरतें. केमिस्ट व खेडोपाडीं वाण्याकडे मिळतें.

**एम्. एच्. जवेरीयन ॲण्ड कंपनी**

**देवकरण मॅन्शन, प्रिन्सेस स्ट्रीट, मुंबई.**

तिची निवड—




फेसपावडर खेरीज—

❀ब्रिलियंटाईन, ❀हेअर ऑईल्स, ❀नखरंजकें

इत्यादि तयार करणारी हिंदुस्थानांतील

--अग्रगण्य संस्था--

आशा–सौंदर्य–प्रसाधनें

एकंदर चालू महर्गतेमुळें

काळांतील निवडक निबंधांचीं पुस्तकें

जितक्या कमी किंमतींत द्यावयाची माझी इच्छा होती, तितक्या कमी किंमतींत देतां आलीं नाहींत. याकरितां काळांतील निवडक निबंधांचे पहिले भागांत एक सवलतीचें कुपन टाकलें आहे. सवलतीची समग्र माहितीही त्याच खंडांत दिली आहे. ग्राहकांनी अवश्य वाटल्यास, त्याचा फायदा घ्यावा.

★

व्यवस्थापक :

य. गो. जोशी-प्रकाशन,

सदाशिव, पुणें २.